

मी पाहिलेले

# यशवंतराव

संपादिका
डॉ. सरोजिनी बाबर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# मी पाहिलेले यशवंतराव

संपादिका
डॉ. सरोजिनी बाबर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

- पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९८८
- दुसरी आवृत्ती : ऑगस्ट २००७

- **प्रकाशक** :
  सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
  तिसरा मजला, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
  दादर, मुंबई – ४०० ०१४.


© प्रकाशकाधीन


- **मुद्रक :**
  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय, ताराबाई पार्क,
  कोल्हापूर – ४१६ ००३.

- **मूल्य :** रूपये २९५/-

# निवेदन

श्री. यशवंतरावजी चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने शिल्पकार होत. ते महाराष्ट्राचे केवळ शासक नव्हते. साहित्य, कला, समाजजीवन, उद्योग इत्यादी प्रत्येक क्षेत्रात मराठी माणूस घडविण्यात त्यांचा हातभार लागला. आज यशवंतरावजी आमच्यात नाहीत पण त्यांनी साकारलेला इतिहास मात्र त्यांच्या अनेक लहानथोर मित्रांच्या स्मृतीतून जिवंत आहे. ही स्मृतिपुष्पे एकत्र करून, ती यशवंतरावजींना अर्पण करणे हे त्यांच्याबद्दलच्या आपल्या कृतज्ञतेचे प्रतीक. या स्मृतिपुष्पांचे संपादन करण्याची जबाबदारी डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या शिरावर घेऊन, "मी पाहिलेले यशवंतराव" या पुस्तकाच्या रूपाने ती पूर्ण केली याबद्दल त्यांचे पण आभार.

४२, यशोधन,
मुंबई-४०० ०२०
२५ नोव्हेंबर, १९८८

**सुरेन्द्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ



माता माऊली विठाबाई



सहवास हा सुखाचा



लोकसाहित्याचा मानसन्मान
डॉ. सरोजिनी बाबर आणि यशवंतराव



॥ कृष्णा मिळाली कोयनेला ॥
वसंतदादा आणि यशवंतराव




माथाडी कामगार मेळावा



॥ आधीक देखणे तरी निरंजन पाहणे॥
पंडित भीमसेन जोशी आणि यशवंतराव



अज्ञातवासींच्या सहवासात



चित्र रसिक
चित्रकार : गं. ना. जाधव यांचे समवेत

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| वसंतदादा पाटील | १ |
| श्रीमंत छ. राजमाता सुमित्रा राजे भोसले | ४ |
| म. ध. चौधरी | ६ |
| तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | १९ |
| द. र. कोपर्डेकर | २९ |
| धन्वंतरी | ३५ |
| वि. ना. नेने | ४४ |
| व्यंकटराव पवार | ५९ |
| नीळकंठराव कल्याणी | ६५ |
| तात्यासाहेब कोरे | ६९ |
| वि. स. पागे | ७३ |
| बा. म. गोगटे | ७५ |
| पु. पां. गोखले | ८० |
| बाबूराव घोरपडे | ८६ |
| धुळाप्पाण्णा नवले | ८९ |
| धोंडीराम माळी | ९४ |
| शांताबाई पाटील | ९६ |
| अनंतराव कुलकर्णी | ९७ |
| आप्पासाहेब देशपांडे | ९९ |
| शांतारामबापू इनामदार | १०३ |
| भाई माधवराव बागल | १०६ |
| वामनराव कुलकर्णी | ११० |
| शांताराम गरगटे | ११४ |
| संभाजीराव थोरात | ११८ |
| शंतनुराव किर्लोस्कर | १२७ |

| | |
|---|---|
| शांताराम गरुड | १३२ |
| प्र. को. भावकर | १३६ |
| नरूभाऊ लिमये | १४० |
| ना. वसंतराव नाईक | १४७ |
| ना. मा. सो. कन्नमवार | १५१ |
| ना. शरद पवार | १५७ |
| डी. सी. शहा | १६३ |
| कमलाशंकर पंड्या | १६८ |
| एस. एम. जोशी | १७१ |
| नानासाहेब गोरे | १७४ |
| बाबूराव पारखे | १७८ |
| कुलगुरू दत्ताजीराव सांळुखे | १८२ |
| टी.एस. शृंगारे | १८७ |
| ग. नी. जोगळेकर | १९० |
| डॉ. आर. डी. शिंगटे | १९५ |
| चांदमल कटारिया | २०२ |
| रा. ना. ऊर्फ बन्याबापू गोडबोले | २१० |
| आनंदीबाई शिर्के | २१५ |
| कविवर्य ग. दि. माडगूळकर | २१८ |
| प्रा. वामनराव चोरघडे | २३२ |
| सुधांशु | २४२ |
| शिवाजी सावंत | १६५ |
| बा. ह. कल्याणकर | २५० |
| शंकर खंडू पाटील | २७० |
| बाळ कोल्हटकर | २७२ |
| रणजित देसाई | २७८ |
| ना. धों. महानोर | २८४ |

| | |
|---|---|
| दिलीप जामदार | २८५ |
| प्राचार्य मधुकर अष्टीकर | २८७ |
| पंडित भीमसेन जोशी | २९५ |
| दिनकरा साक्रीकर | ३०१ |
| अनंत माने | ३०५ |
| म. द. हातकणंगलेकर | ३०८ |
| ग. प्र. प्रधान | ३१३ |
| चित्रकार ग. ना. जाधव | ३१६ |
| आशा मुंडले | ३२२ |
| डॉ. प्र. चिं. शेजवरकर | ३२८ |
| भालचंद्र फडके | ३३१ |
| सूर्यकांत ग. देशपांडे | ३३५ |
| डॉ. सविता जाजोदिया | ३३८ |
| सौ. इंदिरा कुलकर्णी | ३४० |
| चित्तरंजन कोल्हटकर | ३४६ |
| पोपटलाल शहा | ३५१ |
| धों. म. मोहिते | ३५५ |
| डॉ. शरच्चंद्र गोखले | ३६१ |
| सुमतीबाई शहा | ३६५ |
| श्रीमती अनुताई वाघ | ३६८ |
| बॅ. पी. जी. पाटील | ३७२ |
| टी. जी. देशमुख | ३७७ |
| विनायकराव पाटील | ३८३ |
| मोहन धारिया | ३८८ |
| सौ. कमलाबाई अजमेरा | ३९४ |
| डॉ. जयंत पाटील | ३९८ |
| कमलाबाई काळे | ४०१ |

| | |
|---|---|
| डॉ. शां. ब. मुजुमदार | ४०४ |
| बंडोपंत सरपोतदार | ४०८ |
| नलिनीबाई शिंदे | ४१३ |
| वसंत थोरात | ४१७ |
| डॉ. सतीश देसाई | ४१९ |
| मधुसूदन कोल्हटकर | ४३८ |
| भु. आ. कुलकर्णी | ४४१ |
| डी. डी. साठे | ४४९ |
| श्रीधर प्रधान | ४५३ |
| विनोदराव | ४६७ |
| कृ. पां. मेढेकर | ४७४ |
| एक निवृत्त सेवक | ४८० |
| ले. ज. शंकरराव थोरात (निवृत्त) | ४८२ |
| श्री. प. मराठे | ४८७ |
| एन. आर. खालावडेकर | ४९१ |
| शंकरराव साळवी | ४९६ |
| अनंतराव जाधव | ५०० |
| ज. बा. कुलकर्णी | ५०५ |
| आचार्य अत्रे | ५०९ |
| बाळासाहेब पाटील | ५११ |
| पु. शं. पतके | ५१३ |
| अनंतराव पाटील | ५१८ |
| वि. सा. माडीवाले | ५२३ |
| सर्वोदय साधना | ५२९ |
| शशिकांत टेंबे | ५३५ |
| साधना साप्ताहिक | ५३९ |
| श्री. एस. के. कुलकर्णी | ५४७ |

| | |
|---|---|
| श्री. द्वा. भ. कर्णिक | ५५२ |
| श्री. गोविंद तळवलकर | ५५६ |
| श्री. रमेश भोगटे | ५६२ |
| श्री. विश्वनाथ वाबळे | ५६८ |
| श्री. कमलाकर कर्णिक | ५७३ |
| दि. रा. घोरपडे | ५७७ |
| वि. ना. देवधर | ५८५ |
| श्री. भा. द. खेर | ५८९ |
| यदुनाथ थत्ते | ५९२ |
| प्रा. सदाशिव माळी | ५९७ |
| वरूणराज भिडे | ६०६ |
| गजानन शं. खोले | ६११ |
| मनोहर दत्तात्रय तथा बाळ पुळ्ळी | ६१६ |
| राष्ट्रवीर | ६१९ |
| म. सु. कारेकर | ६२१ |
| श्री. रामभाऊ जोशी | ६२८ |
| बंडोपंत सरपोतदार | ६३५ |
| मोहन कुलकर्णी | ६३९ |
| यशवंतरावांच्या भगिनी राधाक्का | ६४२ |
| सौ. लीलाबाई बाबूराव काळे | ६४५ |
| श्री. बाबूराव कोतवाल | ६५४ |
| बाबूराव काळे | ६५९ |
| श्री. ना. वा. ढवळे | ६७० |
| सौ. शरदिनी मोहिते | ६७९ |
| सरवत (साहेबांचा नोकर) | ६८५ |
| डॉ. सरोजिनी बाबर | ६८७ |
| तुळशीदास जाधव | ७०४ |

| | |
|---|---|
| सौ. ताराबाई साठे | ७१२ |
| ना. प्रा. राम मेघे | ७१६ |
| श्री. आप्पासाहेब भाऊराव पाटील | ७२२ |
| मुकुंद शं. किर्लोस्कर | ७२५ |
| श्री. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले | ७३१ |
| सौ. शैलजा राजे | ७३७ |
| डॉ. दि. गं. केळकर | ७३९ |
| गंगाराम (साहेबांचा नोकर) | ७४३ |
| प्रा. माधव द. तबीब | ७४५ |
| चंद्रकांत मांढरे | ७४९ |
| बाबूराव शेटे | ७५२ |
| श्री. भा. कृ. केळकर | ७६० |
| डॉ. वसंत पटवर्धन | ७६४ |
| आत्माराम सावंत | ७६७ |
| माधवी रणजित देसाई | ७७८ |

## वसंतदादा पाटील
## आमचे नाते भावाभावाचे

सांगली जिल्ह्याच्या तासगाव तालुक्यातील अंकलखोपचा कृष्णाकाठ, प्रचंड जनसमुदायाने गजबजला होता. या ठिकाणी एका जाहीर समारंभात गेली चार वर्षे व पंधरा दिवस चालत राहिलेले, वैचारिक मतभेदातून व गैरसमजातून चालू झालेले आणि विनाकरण धुमसत राहिलेले माझे आणि यशवंतरावांचे भांडण कृष्णामाईच्या साक्षीने संपणार होते. आम्ही दोघे जिवाभावाचे मित्र.आम्ही चाळीस वर्षे खांद्याला खांदा लावून काम केले होते. स्वातंत्र्य संग्राम,संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा कितीतरी समरप्रसंगात आणि कित्येक आनंदाच्या प्रसंगी, जबाबदारीच्या, कोंडी करणाऱ्या प्रसंगात आम्ही एकमेकांच्या बरोबर राहिलो.पण क्षुल्लक कारणासाठी आम्ही भांडलो. आमचे हे भांडण आमच्यापुरतेच राहिले नव्हते, तर महाराष्ट्राच्या घराघरात ते जाऊन पोचले होते. एक प्रकारची यादवी निर्माण झाली होती. खरे म्हणजे कोणालाच, आम्हा दोघांनाही, ही स्थिती आवडत होती असे नाही. आम्हालाही यातून मार्ग काढून बाहेर पडायचे होते. २४ मे १९८२ रोजी अंकलखोपला झालेल्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्हा दोघांच्या मित्रंमडळींच्या प्रयत्नांना यश आले आणि आमची दिलजमाई झाली.

या कार्यक्रमासाठी आम्हा दोघांवर, महाराष्ट्रावर, प्रेम करणाऱ्यांची गर्दी जमली होती. राजकीय, सामाजिक, सहकारी क्षेत्रातील नेते, कार्यकर्ते जमा झाले होते. गावकऱ्यांनी आम्हा दोघांच्या ऐक्याचे निमित्ताने आमची फुलांनी सजवलेल्या उघड्या जीपमधून ऐक्य मिरवणूक काढली होती. त्यानंतर सभास्थानी आम्हाला भगवे फेटे बांधण्यात आले होते. आपल्याला बांधण्यात आलेल्या फेट्यामुळे माझे भाषण नीट ऐकू येत नाहीसे वाटल्यावरून यशवंतरावांनी आपला फेटा काढून ठेवला आणि

टोपी डोक्यावर चढवली. या सभेत मी केलेले भाषण उत्सुकतेने ऐकले. कारण आम्ही दोघे केवळ मित्रच नव्हतो तर त्यांनीच त्या सभेत म्हटल्याप्रमाणे – 'आमचे नाते पुढारी अनुयायाचे नसून, मित्रामित्राचे, भावाभावाचे ' होते.

या वेळच्या भाषणात मी म्हटले होते, "आम्ही दोघे भांडलो, परस्पर विरोधी मतप्रदर्शन केले, जे बोलू नये ते बोललो. या भांडणाने उभ्या महाराष्ट्राचे नुकसान झाले. हे भांडण घराघरात, चुलीपर्यंत गेले. हे काम वैराचे असल्याची अनेकांची समजूत झाली. संपत्तीने मोठे झालेल्या यादव कुलाचा नाश झाला. त्याप्रमाणेच आमच्या भांडणाने माणसे व कार्यकर्ते फरफटले गेले. त्याबद्दल मी महाराष्ट्राची माफी मागतो. पक्षांतर्गत यादवीमुळे प्रथम भांडणाऱ्या व्यक्ती व नंतर पक्ष खड्ड्यात जातो याची मला जाणीव झाली.

मी जन्मभर यशवंतरावांना नेता मानले. मला वाढविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांचे उपकार मी कधीही विसरणार नाही, आणि पुनः कधी त्यांच्याशी भांडणार नाही. आम्ही एकोप्याने संघटनेचे जनहिताचे काम करत राहू अशी मी हमी देतो.

यानंतरच्या भाषणात यशवंतराव म्हणाले, "दादांचे भाषण मी लक्षपूर्वक ऐकले आणि मन भरून आले.. आमच्या भांडणाने महाराष्ट्राचे नुकसान झाले का नाही हे मला माहीत नाही, पण आम्हा दोघांचे मात्र फारच नुकसान झाले."

या सभेत आम्ही दोघांनीही खुल्या दिलाने महाराष्ट्राची माफी मागितली आणि त्या वेळी हमी दिली, त्याप्रमाणे पुनः कधीही भांडलो नाही. आमचे भांडण आम्ही नेहमीसाठी कृष्णेच्या पवित्र पाण्यात विसर्जन करून टाकले होते...

## श्रीमंत छ. राजमाता सुमित्रा राजे भोसले
## एक सौजन्यशील व्यक्तिमत्त्व

मा. यशवंतरावजींचे जीवन – चरित्र हीच एक मोठी आठवण आहे. अत्यंत गरिबी आणि प्रतिकूल परिस्थिती असताना त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी शिकत असतानाच समाज जाणला, राष्ट्र जाणले, स्वातंत्र्याची महती ओळखली. परकीय चाकरीचा मोह त्यांना आकर्षित करू शकला नाही. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेले यशवंतराव आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सत्तास्थानावरून राष्ट्राची सेवा करणारे यशवंतराव चव्हाण विविध आव्हाने पेलू शकले. त्यांच्या राजकीय, सामाजिक किंवा शैक्षणिक क्षेत्रातल्या वाटचालीत त्यांची वैचारिक जडणघडण महत्त्वाची वाटते. त्यांच्या भेटीत आम्हाला त्यांच्या ठिकाणी असलेली वैशिष्ट्ये जाणवली ती अशी की, त्यांचे वाचन दांडगे होते. त्यांचे स्वतःचे ग्रंथालय विविध प्रकारच्या उपयुक्त ग्रंथांनी समृद्ध होते. त्यांची स्वतःची कृति चिंतनशील होती. ते राजकीय नेते होते. परंतु त्यांचे नेतृत्व अभ्यासू होते. त्यांचे वागणे आणि बोलणे अत्यंत संयमशील असेच असायचे. सौजन्यशीलता हा त्यांचा स्थायीभाव होता. मोजक्या शब्दात परिणामकारकता कशी साधावी याचे कौशल्य त्यांनी साध्य करून घेतले होते.

यशवंतराव चव्हाणांनी विविध पदे भूषविली. परंतु या पदांवरून त्यांनी जे समाज प्रबोधन केले ते महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय ऐक्यभाव, एकात्मतेची गरज, सामाजिक समता, आर्थिक विषमता, अस्पृश्यता आणि जातिभेद, साहित्य शिक्षण व संस्कृती, कृषि औद्योगिक समाजरचना इत्यादी संबंधीची त्यांची विचारसरणी मार्गदर्शक स्वरूपाची आहे. त्यांचे 'विचार-धन ' हा एक अभ्यासाचा स्वतंत्र विषय होऊ शकेल.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे कर्तृत्व संपन्न वाटचालीचा उल्लेख अटळ आहे. प्रतापगड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण समारंभास भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आले होते. या सोहळ्याचे वेळी फलटणचे मालोजीराजे निंबाळकर आणि यशवंतराव चव्हाण यांनी पंतप्रधानांचा हा कार्यक्रम अत्यंत समयसूचकतेने आणि कौशल्याने पार पाडला.

अनेक सभा-समारंभाच्या निमित्ताने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारातील विवेकाची आणि सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची जीणीव स्पष्ट होत असे. त्यांची बोलण्याची शैली श्रोत्यांना जिंकून घेणारी असे. वक्तृत्व आणि कर्तृत्व यांचा संगम झालेले यशवंतराव चव्हाणांचे सौजन्यशील व्यक्तिमत्त्व महाराष्ट्र विसरू शकणार नाही.

## म. ध. चौधरी
## यशवंतरावजी : आमचे कुटुंबप्रमुख

यशवंतरावजींना (आपल्यातून) जाऊन एक वर्षापेक्षा अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या आठवर्णीनी महाराष्ट्राचे समाजमन आजही आकंठ भरून आहे. ह्या आठवणींनी ते गहिवरते, व्याकुळ बनते, कृतज्ञतेने भरुन येते. त्यांच्या निर्वाणानंतर अनेकांनी श्रद्धांजली अर्पण करणारे, त्यांच्या चतुरस्त्र व्यक्तमत्त्वाचे वर्णन करणारे, तसेच त्यांच्या अनेकविध कार्याचे मूल्यमापन करणारे भाष्य व लिखाण केले. तरीही त्या पलीकडे सामान्यापर्यंत पोहोचलेली यशवंतस्मृति सर्वार्थाने अभिव्यक्त झाली असे म्हणता येणार नाही. कारण उण्यापुऱ्या अर्धशतकाच्या सार्वजनिक कार्यातून ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचले होते. आयुष्याच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या कोंडीमुळे ते अवघडले, अडखळले. थोडे बाजूला पडले. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर इतका व्यापक प्रभाव असणारा समाजजीवन घडविणारा दुसरा नेता महाराष्ट्रात झाला नाही. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणण्यात येते.

त्यांची विवेक विचक्षण बुद्धी, निर्धारी परंतु भावूक मन, लोकसंग्राहक स्वभाव, धीरगंभीर वृत्ती व या सर्वातून प्रगट झालेले भारदस्त व्यक्तिमत्त्व त्यांच्या सहवासात येणाऱ्याला आकर्षून घेणारे होते. राजकीय विरोधक किंवा पक्षांतर्गत विरोधकांशी देखील ते तत्त्वासाठी भांडले पण कधी फटकून वागले नाहीत व संबंध तोडून बसले नाहीत. सहिष्णुता व खिलाडू वृत्तीने त्यांनी आपले व समाजाचे जीवन निश्चितच समृद्ध बनविले. आपल्यापेक्षा मोठ्यांच्याबद्दल आदर व अदब बाळगत असतानाच आपल्यापेक्षा लहानांना त्यांनी नेहमीच सन्मानाने व औदार्याने वागविले.

माझी यशवंतरावजींची प्रथम भेट, १९५२-५३ च्या सुमाराला झाली. त्यानंतरच्या एका लहान प्रसंगाने परिचय दृढ झाला. प्रसंग लहानसा परंतु त्यातून त्यांच्या उदार स्वभावाचे दर्शम घडते. माझ्या वडिलांच्या हत्येनंतर मी पुढचे शिक्षण सोडून सातपुड्याच्या आदिवासी भागात त्यांनी सुरू कलेले काम एक आव्हान म्हणून स्वीकारले होते. सामान्य माणसाची अपार सहानुभूती होती. आदिवासी बांधवांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळत होते. सरकारी अधिकारीही सहकार्याचा हात देत होते. कै. बाळासाहेब खेर, मोरारजीभाई, वैकुंठभाई, आबासाहेब बी.डी. देशमुख, वांद्रेकर आदी नेत्यांचे कृपाछत्र होते. परंतु अनेक अडचणी होत्या. छुपा विरोधही खूप होता. अशा परिस्थितीत वनविभागाचे असे एक नवे अधिकरी बदलून आले की ज्यांनी आमचे सारे कार्यच उखडून टाकायचे ठरविले होते जणू. आम्ही त्यावेळचे उपमंत्री बी. डी. देशमुख व द. न. वांद्रेकर यांच्यासनोर त्या अधिकाऱ्याची कृष्णकृत्ये उघडी पाडली व त्यांच्याचमार्फत यशवंतरावजींना भेटले. ते त्या वेळी वनमंत्री होते. त्यांनी परिस्थिती समजून घेतली व ताबडतोब योग्य ती कार्यवाही करतो म्हणून सांगितले. त्यानंतर आठवण देण्यासाठी आणखी एकदोनदा भेटलो. संयुक्त महाराष्ट्राच्यासाठी चाललेल्या आंदोलनाचे ते दिवस होते. तिसऱ्यांदा भेटलो तेव्हा ते थोडे व्यग्र वाटले. पण आम्ही हळूच कामाची आठवण दिली. व त्यांच्या व्यग्रतेला जणू तोंड फुटले. मला म्हणाले," तुमच्याने काम होत नसले तर सोडून द्या परंतु पुन्हा मला त्रास देऊ नका. "मी त्यांना म्हणालो, "ह्या अधिकाऱ्याने आमचे सारे काम उद्ध्वस्त करण्याचा जणू विडा उचलला आहे. आपण हे थांबविण्याच्या दृष्टीने काही कार्यवाही करतो असे आश्वासन दिले म्हणूनच आठवणीसाठी मी आपणाला भेटत असतो. आपल्याकडून काम होणार नसेल तर आम्ही त्याला तोंड देऊ. परंतु मी काम सोडावे हे सांगण्याचा अधिकार आपल्याला नाही ! कारण हे एक आव्हान म्हणून स्वेच्छेने स्वीकारले आहे. मात्र आपल्याला असे सांगण्याचा आम्हाला अधिकार आहे. कारण आपण लोकांनी नियुक्त

केलेले प्रतिनिधी आहात.” ह्या बोलण्याने यशवंतरावजी चिडले असते तर माझ्यासारख्या एका पंचविशीतल्या दरीडोंगरात काम करणाऱ्या लहानशा कार्यकर्त्याला त्यांना अधिकाराचा वापर करून खूप अद्दल घडविता आली असती. परंतु झाले वेगळेच, त्यांच्या चेहऱ्यावरची व्यग्रतेची, रागाची जागा क्षणात करुणेने घेतली. मला प्रेमाने जवळ घेऊन त्यांनी आश्वस्त केले व ‘तुमच्या अडचणींची मला जाणीव आहे. तुमचे काम करतो . ‘असे म्हणून लगेच फोन उचलला. आमच्या कामावरचे संकट दूर झाले.

त्यानंतरचा प्रसंग भाषावार प्रान्तरचनेचा. काँग्रेसने स्वीकारलेल्या तत्त्वानुसार अलग अलग राज्यात विखुरलेल्या सर्व मराठी भाषिकांचे एकत्रित व स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची मागणी जोरात सुरू होती. सारे प्रयत्न करूनही मराठी भाषिकांचे एक राज्य मिळण्याची शक्यता दिसत नव्हती. फाजल अली कमिशनच्या शिफारशीनुसार विशाल मुंबई राज्य निर्मिती करण्याचा केन्द्र शासनाचा विचार जवळजवळ पक्का झालेला दिसत होता, म्हणून महाराष्ट्रात सर्वपक्षीय समिती स्थापन करून तिच्या मार्फत आंदोलन सुरू करायचे असा विचार जोराने पुढे आला होता. महाराष्ट्रातील काँग्रेस जनांची परिस्थिती मोठी विचित्र झाली होती. सर्वपक्ष समितीमध्ये सामील होऊन आंदोलन करावयाचे तर पक्षाच्या तत्कालीन धोरणाविरुद्ध व नेतृत्वाविरुद्ध बंड केल्यासारखे होईल व न सामील झाल्यास मराठी भाषिकांचे राज्य मिळणे अशक्यच दिसत होते. श्री. यशवंतरावजी मराठी भाषिकांच्या एकत्रित राज्याचे समर्थक होते. परंतु या विचित्र परिस्थितीचा सखोल विचार करून त्यांनी फलटणच्या सभेत “महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे (म्हणजे देश मोठा ) आम्ही नेहरूजींच्या नेतृत्वाखाली राहू. “अशी आपली भूमिका जाहीर केली. साऱ्या महाराष्ट्रभर एकच गदारोळ माजला. त्यांच्यावर महाराष्ट्र द्रोहाचे आरोप – प्रत्यारोप सुरू झाले. परंतु यशवंतरावजी घेतलेल्या भूमिकेवर ठामपणे उभे राहिले व महाराष्ट्रभर दौरा काढून आपला विचार कार्यकर्त्यांसमोर मांडू लागले. त्यावेळी ते जळगाव जिल्ह्याच्या

(त्यावेळच्या पूर्व खानदेश जिल्ह्याच्या ) दौऱ्यावर आले होते. त्यांनी आमचे आमदार भाऊसाहेब बोंडे व मला मुद्दाम बोलावून घेतले. कार्यकर्त्यांची सभा झाली. रात्री आम्हा दोघाचौघा कार्यकर्त्यांजवळ मोठ्या विश्वासाने बोलत होते. त्या वेळी मी कुठल्याच पक्षात नव्हतो.घरातील वातावरण खिरोद्याच्या राष्ट्रीय शाळेतील व राष्ट्र सेवादलातील संस्कार, स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग यामुळे काँग्रेसकडे कल होता. परंतु काँग्रेस श्रेष्ठींनी मराठी भाषिकांचे एकत्रित राज्य निर्माण करण्याच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेमुळे माझ्या मनात काँग्रेसच्या ह्या दुटप्पी राजकारणाबद्दल चीडच होती. ती संभाषणात व्यक्त होत होती. परंतु आपल्या वाक्चातुर्याने, हळूवार परंतु मु द्देसूद विवेचनाने यशवंतरावजींनी अशी काही आपली भूमिका मांडली की त्यामुळे आमचा अर्धा विरोध कमी झाला. त्यांचे एक वाक्य अजून स्पष्टपणे आठवते. ते म्हणाले होते "गैरसमज असो अथवा अविश्वासामुळे असो आपले म्हणणे जर आपले राष्ट्रीय नेते मान्य करीत नसतील तर त्यांच्यावर न रागावता, किंवा त्यांच्या विरोधात न जाता, त्यांचा आपल्याबद्दलचा गैरसमज व अविश्वास आपल्या कृतीने दूर करूनच आपण आपले मन वळविले पाहिजे, त्यांना जिंकले पाहिजे. आणि मला विश्वास वाटतो की ह्याच पद्धतीने मराठी भाषिकांचे राज्य आपण मिळवू शकू. म्हणून माझ्या भूमिकेत महाराष्ट्र द्रोह नाहीच." पुढील काळात घडलेल्या घटनांवरुन त्यांचे त्या वेळचे निदान व कृती किती अचूक होती हे स्पष्टच झाले. विशाल द्विभाषिकाची निर्मिती झाली. यशवंतरावजी १९५६ च्या नोव्हेंबरमध्ये मुख्यमंत्री झाले व लगेच १९५७ च्या विधानसभेच्या निवडणुकी जाहीर झाल्या. महाराष्ट्रातील वातावरण काँग्रेसच्या व यशवंतरावजींच्या विरोधात खूपच तापलेले होते. मला काँग्रेस श्रेष्ठींनी निवडणूक लढण्याचा आदेश दिला. त्या झंझावाती वातावरणात मी निवडून आलो. काँग्रेसलाही बहुमत मिळाले. पक्षनेता निवडीसाठी काँग्रेसच्या नवनिर्वाचीत आमदारांची सभा घेण्यात आली होती. तिला

हजर रहावयास गेलो. यशवंतरावजींची एकमताने पक्षनेतेपदी पुन्हा निवड झाली व त्यांची ओझरती भेट घेऊन आम्ही परतलो.

पुढच्या दोनतीन दिवसानंतरचा प्रसंग लिहिताना संकोच वाटतो कारण त्यात एखाद्याला आत्मप्रौढीचा वास येईल. परंतु यशवंतरावजींच्या कार्यपद्धतीवर व मोठेपणावर काही प्रकाश त्या प्रसंगाने पडतो म्हणूनच लिहीत आहे. एका रात्री दोन- अडीच वाजता मला जागे करण्यात आले. समोर त्या वेळचे आमच्या जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष श्री. राजाराम पाटील उभे होते. मी काही विचारण्या आधीच ते म्हणाले, "कपडे घाला. तुम्हाला मुंबईला घेऊन येण्यासाठी यशवंतरावजींनी पाठविले आहे." ध्यानिमनी काही नसतांना घडत असलेला प्रसंग तो होता. त्यामुळे मी भांबावून विचारले "कां बोलाविले ?" त्यांनी स्मित हास्य केले व म्हणाले "ते मुंबईला गेल्यानंतर कळेल." आम्ही तसेच निघालो. मुंबईला पोहोचलो व लगेच यशवंतरावजींना भेटण्यास 'सह्याद्री ' बंगल्यावर गेलो. बाहेरच्या दिवाणखान्यात ते व सौ . वेणूताई दोघेच चहा घेत बसले होते. धुवट खादीच्या मळलेल्या वेषातच त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलो व म्हणालो, "आपण बोलाविल्याचा निरोप आला म्हणून भेटायला आलो." ते हसत उभे राहिले व मला प्रेमाने जवळ घेऊन म्हणाले," बोलाविले नाही. तुम्हाला एस्. ओ. एस्. पाठविला होता. माझ्या मंत्रिमंडळात येणार का ?" व लगेच वेणूताईकडे वळून म्हणाले, "वेणूबाई, हा युवक लहान असला व वेष बावळा दिसत असला तरी ह्याने माझ्याशी" भांडण केले आहे एकदा व म्हणूनच मला हा आवडला व मी त्याची सहकारी म्हणून निवड केली आहे." एका लहानशा कार्यकर्त्याच्या उद्धटपणाचे कोण हे कौतुक! मी संकोचून उभा राहिलो. सौजन्यशील मांगल्यमूर्ती वेणूताई कौतूक भरल्या डोळ्यांनी माझ्याकडे पहात होत्या. त्यामुळे मी अधिकच भांबावलो.

ह्या प्रसंगाने यशवंतरावजींनी मला जिंकले, आपलेसे केले. आपल्या कुटुंबातील एक बनवले. खूप प्रेम विश्वास दिला. असं त्यांनी अनेक

कार्यकर्त्यांना घडविलं. त्यांना वैचारिक व भावनिक जीवन दिले. पुढे काही बाबतीत मतभेद झाले पण त्यांचा जिव्हाळा काही कमी झाला नाही. वैयक्तिक संबंधात दुरावा कधी त्यांनी येऊ दिला नाही. हीच त्यांची थोरवी.

त्यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचा एक सहकारी व संघटनेतील कार्यकर्ता म्हणून कितीतरी हृद्य प्रसंग त्यांच्या सहवासात अनुभवले. ते सारेच एका लहान लेखात कथन करणे शक्य नाही. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप मनावर उमटलेली आहे. ते सहकाऱ्यांच्या वैयक्तिक जीवनात सहज व सहृदयतेने प्रवेश करीत व त्यांच्या सुखदुःखाशी समरस होत. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असेपर्यंत महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ केवळ राजकारणी लोकांचा संच नसे. तर कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध असलेले एक मोठे कुटुंबच असे. विशाल मुंबई राज्यात मराठी व गुजराथी भाषिक मंत्री व उपमंत्री होते. विकासाच्या प्रश्नावर मतभेद होत, परंतु एखादा दुसरा अपवाद सोडला तर कौटुंबिक संबंधामुळे कधी दुरावा निर्माण होत नसे. मोठे खेळीमेळीचे व भ्रातृभावाचे वातावरण असे. असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न यशवंतरावजी आवर्जून करीत व लहानमोठ्या प्रसंगातून कुंटुंबप्रमुखाची भूमिका बजावित.

मंत्रिमंडळाच्या बैठकीतील प्रत्येक प्रश्नावरील चर्चेचा दर्जा फार वरचा असे. सभेसमोर येणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर सखोल चर्चा होई. प्रत्येकाला आपले मत मांडण्यास वेळ मिळे. वेळ कमी आहे म्हणून 'चर्चा लवकर आटोपा ' असे क्वचितच घडे. किंबहुना एखाद्या महत्त्वाच्या विषयावर कोणी बोलायचे राहिले तर यशवंतरावजी त्यांचेही मत अजमावून घेत. अंती सर्वसंमतीने निर्णय घेतले जात. आपले मत आधी सांगण्याऐवजी सर्वांचे ऐकून घेतल्यानंतर ते आपले मत देत. व त्यांचे मतप्रदर्शन त्या प्रश्नावर अनेक बाजूंनी प्रकाश टाकणारे, बऱ्याचदा नावीन्यपूर्ण असे. त्यामुळे त्यांच्याबद्दल सहकाऱ्यांमध्ये आदरयुक्त प्रेम व आपुलकी सहजच निर्माण झाली होती. मंत्रिमंडळाचे निर्णय एकमताने होत. ते मुख्यमंत्री

असताना तीनच वेळा मंत्रिमंडळात मते घेण्याचा प्रसंग आला. तिन्ही वेळा प्रश्न तसेच गुंतागुंतीचे व नवी धोरणात्मक दिशा देणारे होते.

१९५८-५९ चा सुमार असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन ते हिंदू धर्मातून बाहेर पडले, त्यानंतर मागासवर्गीयांना अनुसूचित जाती म्हणून घटनेनुसार मिळत असलेल्या सवलती द्यायच्या कां असा प्रश्न मंत्रिमंडळासमोर आला. घटनेनुसार तसे सरकारवर बंधन नव्हते. डॉ. बाबासाहेबांचा काँग्रेस विरोध व आता धर्मान्तराचा त्यांचा प्रक्षोभक निर्णय यामुळे त्यावेळच्या मंत्रिमंडळात त्यांच्या भूमिकेबद्दल खूपच नाराजी होती. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर प्रश्न आल्यानंतर कडाक्याची चर्चा झाली. मते अजमावण्यात आली तेव्हा बहुसंख्य सदस्य सवलती चालू ठेवण्याच्या विरोधात दिसून आले. यशवंतरावजींसह आम्ही चारच सदस्य सवलती चालू ठेवाव्या या मताचे होतो. कारण धर्म बदल झाला म्हणून लगेच मागासपण गेले असे होत नाही व कायदेशीर बंधन नसले तरी नैतिक व सामाजिकदृष्ट्या सवलती चालू ठेवणेच न्याय्य आहे असे आमचे मत होते. मुख्यमंत्रीच अल्पमतात असा विचित्र प्रसंग प्रथमच निर्माण झाला. यशवंतरावजी खूप दुःखी झाले. त्यांनी अतिशय कळवळून बाजू मांडली. शेवटी बरीच चर्चा होऊन विषय तहकूब ठेवण्यात आला व मुख्यमंत्र्यांनी पंडितजींशी याबाबत आधी चर्चा करावी असे ठरले. पुढच्या बैठकीच्या वेळी यशवंतरावजी अतिशय आनंदी दिसले. सुरूवातीलाच त्यांनी पंडित जवाहरलालजींशी झालेल्या चर्चेचा वृत्तांत व पंडितजी सवलती चालू ठेवण्याला अनुकूल असल्याचे सांगितले. नवबौद्धांना मागासवर्गीयांच्या शक्य त्या सर्व सवलची चालू ठेवण्याच्या मंत्रिमंडळाचा ऐतहासिक निर्णय झाला. “आज आपणाला कृतार्थ वाटते.” असे उद्गार यशवंतरावजींनी काढले. राजकारणी विचारावर सामाजिक न्याय्य भावनेने मात केली असेच त्या प्रसंगाचं वर्णन करता येईल.

असाच आणखी एक अगदी अटीतटीचा प्रसंग आठवतो. दारिद्र्यामुळे ज्यांना शिक्षणापासून वंचित रहावं लागतं अशा सर्व जाती धर्मातील गरीब बांधवांच्या मुलांना मोफत शिक्षण द्यावं असा प्रस्ताव समाजकल्याण विभागाच्या वतीने मंत्रिमंडळाच्या एका सभेसमोर आला. कल्याणकारी राज्याचे एक पुरोगामी पाऊल म्हणून आम्ही अनेकांनी त्याचं स्वागत केले. परंतु तेवढाच कडाक्याचा विरोध काही दिग्गजांकडून झाला. राज्याच्या आर्थिक परस्थितीचे कारण सांगण्यात आले. यशवंतरावजींनी विरोध करणाऱ्यांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला परंतु या योजनेसाठी तिजोरी उघडण्याची शक्यता दिसेना. शेवटी गरीब बांधवांसाठी असलेली इतकी आवश्यक व पुरोगामी योजनाही आम्ही हाती घेऊ शकणार नसू तर हे मुख्यमंत्रीपद काय कामाचे ? असे निर्वाणीचे उद्गार काढून ते उद्वेगाने बैठकीतून उठून गेले. त्यानंतर खूप भवती न भवती झाली. आम्ही काही सहकाऱ्यांनी समजावण्याची शिकस्त केली. तुटेपर्यंत ताणू नका म्हणून परोपरीने सांगितले. दबावाखाली का होईना विरोधकांची मनं तयार झाली. यशवंतरावजींना परत बोलाविण्यात आलं व ९०० रु. खाली उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास (इ.बी.सी.) वर्गासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना मंजूर झाली. आपले मुख्यमंत्रीपद पणाला लावून यशवंतरावजींना ही योजना मंजूर करून घ्यावी लागली.

विशाल द्विभाषिक प्रामाणिकपणे राबविण्याची शिकस्त होत असूनही अशा अनेक अनुभवांमुळे विकासाच्या अनेक चांगल्या व अत्यावश्यक योजना राबविण्यात अडथळे येतात. विकासकार्यात प्रादेशिक समतोल साधता येत नाही. या निर्णयावर यशवंतरावजी आले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे बाह्य दडपणही होतेच. शेवटी ही सारी परिस्थिती राष्ट्रीय नेत्यांच्या समोर मांडून त्याचा विश्वास संपादन करून मोठ्या कौशल्याने त्यांनी मुंबईसह साऱ्या मराठी भाषिक प्रदेशाचे एक राज्य "महाराष्ट्र राज्य" निर्माण करण्यात यश मिळविले. हा इतिहास सर्वश्रुत आहे.

'महाराष्ट्र राज्य' निर्मितीचा निर्णय झाला आणि यशवंतरावजींच्या उत्साहाला व कर्तृत्वाला जणू बहर आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून तावून सुलाखून यशस्वीपणे बाहेर पडलेले यशवंतरावजी, अनुकूल परिस्थिती प्राप्त होताच सर्वांगाने फुलून आले. सारा महाराष्ट्र फुलविण्याचे स्वप्न बघू लागले व स्वप्न साकार करण्यासाठी अनेकानेक योजना आखू लागले, कार्यकर्ते शोधू लागले. योजना कार्यान्वित करू लागले. त्यांच्या जीवनातील हा सर्वोत्तम कालखंड म्हणता येईल.

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाची पहिली बैठक मला आठवते. यशवंतरावजींच्या चेहेऱ्यावरील आनंद ओसंडून वहात होता. डोळ्यात स्वप्न तरळत होते. मोठ्या उत्साहाने व उमेदीने त्यांनी बोलायला सुरूवात केली. उद्याच्या महाराष्ट्राचे कल्पनाचित्र ते रेखाटत होते. महाराष्ट्राच्या कृषि – औद्योगिक विकासाचे अतिशय रम्य चित्र त्यांनी उभे केले व त्या धर्तीवर एक मास्टरप्लॅन तयार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. मंत्रिमंडळातील आम्ही सारे क्षणभर भावधुंद झालो होतो. त्यानंतर महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी कितीतरी निर्णय घेतले गेले. योजना आखल्या व राबविल्या गेल्या, त्याचा आढावा स्वतंत्रपणे घ्यावा लागेल. पण एक गोष्ट नमूद केली पाहिजे की यशवंतरावजींची कल्पकता, योजकता, निर्णयक्षमता, ध्येयवाद व व्यवहारवाद यांची सांगड घालण्याचे कौशल्य, व्यक्तींना हेरून त्यांना कार्याला लावण्याचे कसब, साऱ्या जाती जमातींना एकत्र घेऊन चालण्याची धडपड यामुळे मराठी राज्याची जडणघडण प्रारंभीच्या काळी मोठ्या भरभक्कम पायावर झाली. मला बऱ्याचदा वाटते यशवंतरावजी महाराष्ट्रात बराचकाळ रहाते तर भरभराटीला आलेले व कारभाराच्या दृष्टीने आदर्श असे एक राज्य देशाला मिळाले असते. ते आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या विकसित असे वैभवशाली राज्य झाले असते. परंतु नियतीच्या योजना वेगळ्याच होत्या. ऐन उमेदीत महाराष्ट्र सोडून देशाची हाक म्हणून, त्यांना दिल्लीला जावे लागले. तिथेही त्यांनी

अनेक मंत्रालयाचा कारभार समर्थपणे व यशस्वीपणे हाताळला. परंतु दिल्लीला काम करीत असले तरी मनाने ते तेथील वातावरणात एकरूप होऊ शकले नाहीत. एक मुत्सद्दी, राजकारणी, कारस्थानी बनू शकत नाही त्यामुळे ते जीवनाच्या उत्तरार्धात सतत दुःखी राहिले. श्रीमती वेणूताईंच्या निधनानंतर तर ते शरीराने उभे असले तरी मनाने पूर्णपणे कोसळत होते असे एकदोनदा मला जाणवले. असे असले तरी त्यांच्यामधला माणुसकीचा ओलावा व ऋजुता कधी कमी झाली नाही. काजळली नाही. आणि ह्यातच त्यांचे मोठेपण सामावलेले आहे.

अशा ह्या समाजाभिमुख, राजकारणधुरंधर, विचारवंत व भावनाशील नेत्याला महाराष्ट्र कधी विसरू शकणार नाही.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
# शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा कालखंड हे भारताच्या इतिहासातील प्रज्ञावंत पुरुषांना, शुद्ध चारित्र्याच्या त्यागी वीरांना जन्म देणारे आणि भारताला आदर्श नेतृत्व मिळवून देणारे युग होय. त्या स्वातंत्र्य आंदोलनात ज्यांच्या जीवनाचा अर्थ समजून घ्यावा, महत्ता अजमावण्याचा प्रयत्न करावा, अशा अनेक व्यक्ती होऊन गेल्या. राष्ट्रीय जीवनात व समाजजीवनात समाजाच्या अत्यंत खालच्या थरापासून तो वरच्या थरापर्यंत चमकणाऱ्या अगणित व्यक्ती झाल्या. त्यांपैकी काही थोड्या व्यक्ती अशा झाल्या की, त्यांच्या जीवनात वर्तमानयुगाचा अर्थ भरलेला दिसतो. वर्तमान युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे आणि महत्त्वाच्या घडामोडी त्यांचा ध्वन्यर्थ उमटलेला त्यात दिसतो. अशा थोड्या व्यक्तींपैकीच यशवंतराव चव्हाण होत.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली या देशात परकीय पारतंत्र्याविरुद्ध तीन मोठी देशव्यापी वादळे १०-१२ वर्षांच्या अंतराने निर्माण झाली. शेवटच्या वादळाचे फळ ब्रिटिश साम्राज्याशाहीचा अंत. पहिले वादळ असहकारितेचे, ते १९२० साली सुरू झाले, १९२३ च्या सुमारास शमले. १९३० साली दुसरे अधिक मोठे सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे वादळ उठले. या वेळी यशवंतराव (वय वर्षे १६) माध्यमिक विद्यालयाच्या शालान्त परीक्षेचा अभ्यास करीत होते. या वादळात ते सामील झाले, त्या वेळी ते यौवनाच्या पहिल्या उन्मेषात होते. भारतीय राष्ट्रवाद त्यांच्या जीवनाचा कायमचा मार्गदर्शक तेव्हाच ठरला. मनाची कवाडे खुली ठेवल्यामुळे इकडे विद्यालयीन पुस्तकी शिक्षण चालू असतानाच भोवतालचे राष्ट्रीय जीवन आणि जागतिक उलाढाली यांचेही पडसाद त्यांच्या बुद्धीत उमटू लागले. भोवतालची वैचारिक आंदोलनेही त्यांच्या

विचारांना चालना देत होती. १९३० ते १९४५ या कालखंडात त्यांनी विश्वविद्यालयीन शिक्षण पुरे केले. त्याबरोबरच स्वातंत्र्याच्या आंदोलनात वारंवार कारावासाच्या शिक्षा भोगून राजकीय आणि सांस्कृतिक विषयाचे धडे गिरवले. बंदिशाळा ही त्यांचे विद्यापीठ बनले. अभ्यासाने त्यांची बुद्धी व विचार संपन्न व समर्थ बनले. लो. टिळक, म. गांधी, जवाहरलाल नेहरू, एम.एन. रॉय इत्यादींचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केले. त्याबरोबरच पश्चिमेकडील क्रांत्यांच्या मुळाशी असलेली विचारसरणी तुलनात्मक रीतीने अभ्यासली. प्रत्यक्ष राजकीय आंदोलनाला मर्यादा पडल्या. परंतु भारतीय वस्तुस्थिती, राजकीय व सामाजिक वस्तुस्थिती व ध्येयवाद आणि तत्त्वज्ञाने यांच्या तुलनात्मक अध्ययनाने समन्वयवादी दृष्टिकोण प्राप्त झाला. तत्त्वांशी तडजोड करणे प्राप्त झाले तरी ध्येयवादाच्या प्रकाशापासून विचार दूर जाऊ दिला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनात त्यांनी अनुयायित्व प्रथम निष्ठेने पत्करले. मनोरचना विचारवंताची असल्यामुळे त्यातच विचारपूर्वक भाग घेतला. कोणतीही कृती किंवा कार्यक्रम अंमलात आणणारा माणूस जेव्हा त्या कृतीचा अभ्यास करतो, साधकबाधक दृष्टीने कृती करू लागतो, तेव्हा त्याचे ते जीवन वैचारिक जीवन बनते. त्यातच नेतृत्वाचे बीज रोवले जाते. या अनेक आंदोलनामध्ये विचारांबरोबर वक्तृत्वाची कला यशवंतरावांना संपादन करता आली. त्यांची भाषणशैली अगदी वेगळ्या प्रकारची होती. त्यात एक खास वैशिष्ट्य होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत ग्रामीण जनतेत वावरत असताना त्यांना सामान्य जनांचे अपार कष्ट दिसत होते. त्याबरोबरच सामान्य जनांचे अथांग प्रेमही ते अनुभवत होते. या जनतेच्या प्रेमाने त्यांच्या वक्तृत्वकलेला अगदी वेगळा असा आकृतिबंध दिला. आपल्या माणसांशी आपण विचारविनिमय करत असतो तेव्हा हृद्गत बोलतो, हितगुज करतो, भावुकतेने आत्मनिवेदन करतो. अशा तऱ्हेचे त्यांचे वक्तृत्व होते. जिव्हाळ्याच्या माणसांशी बोलणाऱ्यांची रीत त्यात दिसत होती. या मोठमोठ्या आंदोलनांमध्ये देशभर वृद्ध, मध्यमवयीन,

तरुण वक्ते आणि प्रवक्ते, सभा-मोर्चे, अधिवेशने यांच्यामध्ये गर्जत आणि गाजत असत. लोकशाहीच्या आवश्यक साधनांपैकी वक्तृत्व ही कला असते. हा लोकशाहीचा वक्ता अनेक वेळा जनतेपेक्षा वेगळा असलेला, जनतेच्या उद्धाराचा बाणा बाळगणारा, तडफदार असतो, पण असा वक्ता म्हणजे यशवंतराव नव्हे. त्यांना फड जिंकायचा नव्हता, जनतेवर मोहिनी टाकून तिला वाहवत न्यावयाचे नव्हते किंवा नादी लावायचे नव्हते. जनतेला शिक्षण देणारा शिक्षक म्हणून यशवंतराव सभा-संमेलनामध्ये बोलत असत. यशवंतरावांना लोकशाहीची जोपासना करायची होती. लोकशाहीचा नेता हा लोकशिक्षक असावा लागतो.

१९४२ च्या ' भारत छोडो ' या अखेरच्या आंदोलनात यशवंतरावांनी त्या वेळच्या मोठ्या सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. १९४१ साली कायद्याची पदवी परीक्षा ते उत्तीर्ण झाले होते. वकिलीची सनद हातात पडल्यावर वकिलीकडे लक्ष न देता सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची धुरा त्यानी आपल्या खांद्यावर घेतली. २ जून १९४२ ला एका सुखवस्तू घरंदाजाच्या मुलाशी विवाहबद्ध झाले. दिसायला नीटनेटक्या, सुरेख म्हणून पसंत झालेल्या वेणूताईंशी लग्न केले. विवाहाचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. परंतु लगेच भूमिगतांचे नेतृत्व सुरू झाले. स्वातंत्र्यसंग्रामात अखेरचे १९४५ पर्यंतचे जे जे महाराष्ट्रात नेते झाले, त्यांच्यातील सर्वांत तरुण यशवंतराव हे होते. १९४६ साली विधानसभेवर ते निवडून आले.

मुंबई ही एका अर्थाने भारताची आर्थिक राजधानी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या सर्व सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय चळवळीचे भारतातील श्रेष्ठ असे एक केन्द्रस्थान मुंबई होय. त्या वेळच्या बहुभाषिक मुंबई होय. त्या वेळच्या बहुभाषिक मुंबई राज्याच्या राजधानीत यशवंतराव एक पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून राहावयास गेले. १४ एप्रिल १९४६ ला या भूमिकेतून या पदाची सूत्रे त्यांनी स्वीकारली. साताऱ्याकडील अनेक मित्रमंडळींची आणि एकंदरीत राजकीय दृष्ट्या

अत्यंत जागरूक अशा मतदारवर्गाची उत्कट इच्छा होती की, यशवंतरावांना मुंबईतील खेर मंत्रिमंडळात मंत्रिपदाचा अधिकार मिळावा. परंतु यशवंतरावांचा स्वभाव जे अनायासे प्राप्त होते, ते समाधानाने स्वीकारावयाचे. शासनाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळाला यातच सामाधान मानले. त्या वेळी मोरारजी देसाई हे गृहमंत्री होते. महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे स्थान भक्कमपणे मांडता येणार नाही हे ओळखून त्याकरिता सामान्य ग्रामीण जनतेला नवोदित, कर्तबगार तरूणाला हाताशी घेणेच आवश्यक आहे याची त्यांना जाणीव होती. म्हणून मोरारजींनी अशा आपुलकीच्या आर्जवी भाषेत यशवंतरावांची विचारपूस केली. गृहखात्याकडेच दाखल का होत नाही ? असा विनंतीवजा शब्द टाकला आणि मोरारजींच्याच खात्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून रूज होऊन यशवंतराव कारभार पाहू लागले.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावर राहून यशवंतराव मुंबईत काम करत होते. शरीर मुंबईत, पण मन कराडात, मुंबईतील राज्यकारभारात त्याचप्रमाणे कराड येथील घरात, अशा द्विधा स्थितीमध्ये मन ताणले गेले होते. परमप्रिय वडील बंधू गणपतराव क्षयाने आजारी होते. त्यांची सेवा करीत असताना गणपतरावांच्या पत्नींनाही त्या संसर्गजन्य रोगाने पछाडले. या दोघांच्या सेवेमध्ये यशवंतरावांची तरुण वेणूताई सारख्या झटत होत्या. त्यांनाही क्षयाची बाधा झाली! १९४७ च्या डिसेंबर महिन्यात गणपतराव दिवंगत झाले. दोन वर्षांत यशवंतरावांची भावजय म्हणजे गणपतरावांच्या पत्नी याही इहलोकातून गेल्या. गणपतरावांच्या मुलांची म्हणजे पुतण्यांची जबाबदारी यशवंतरावांवर पडली. सेवा करीत असताना वेणूताईंची प्रकृतीही ढासळलीच. अशा आपत्तीच्या वेढ्यात यशवंतराव सापडले. वेणूताई मिरजेच्या डॉ. जॉन्सन या मिशनरी डॉक्टरांच्या उपचाराने या संकटातून बाहेर पडल्या.

प्रत्यक्ष काँग्रेस संघटनेमध्ये महाराष्ट्रात काँग्रेसमधून फुटून निघालेल्या डाव्या गटाचा शेतकरी कामकरी पक्ष १९४९ सालच्या दरम्यान स्थापन

झाला. बहुजन समाजातले काही मुरब्बी नेते काँग्रेस सोडून या नव्या पक्षाचे नेतृत्व करू लागले. शंकरराव मोरे, केशवराव जेधे, दत्ता देशमुख, तुळशीदास जाधव, र. के. खाडिलकर,यशवंतराव मोहिते इत्यादिकांनी या पक्षाच्या प्रसारास वेग आणला. यशवंतराव चव्हाण या पक्षाच्या स्थापनेच्या वेळी जी अनेक खलबते झाली त्यांतील काही बैठकीत स्वतः उपस्थित होते. परंतु आयत्या वेळी पक्षस्थापनेच्या प्रसंगी पुन्हा बाजूला होऊन ते काँग्रेसलाच चिकटून राहिले. खरोखर हा यशवंतरावांच्या दृष्टीने इकडे जावे की तिकडे जावे अशा तऱ्हेचा मानसिक भावनांचा संघर्षच होता. त्यातून विवेकाने ते क्षणात बाहेर पडले...

१९५२ सालची भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक होय. महाराष्ट्रात काँग्रेसविरूद्ध शेतकरी कामकरी पक्ष असा निकराचा सामना होऊन जेधे-मोरे यांचा नवा पक्ष मार खाऊन खाली बसला. नंतर थोड्याच म्हणजे ४-५ वर्षांच्या अवधीत जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर यशवंतराव मोहिते वगैरे मंडळी काँग्रेसमध्ये म्हणजे स्वगृही परतली.

१९५२ च्या निवडणूकीत बाळासाहेब खेरांची राजवट संपली. खऱ्या अर्थाने ती मोरारजींचीच राजवट होती. परंतु आता या नव्या निवडणुकीनंतर मोरारजी पक्षनेते म्हणून निवडून आले. मोरारजींनी आपल्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे या दोघा ग्रामीण जनतेच्या नेत्यांना सामावून घेतले. या काळात महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपदही भाऊसाहेब हिरे यांच्याकडेच आले. हे बहुभाषिक मुंबई राज्य होते. यात गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक हे तिन्ही भाषिक प्रदेश समाविष्ट होते.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये, एवढेच नव्हे तर भारताच्या राजकारणामध्ये,भाषिक राज्यांच्या मागणीचे आंदोलन त्या वेळी वाढीस लागले. भारताचे काँग्रेस पक्षीय केंद्रीय सत्ताधारी भाषिक राज्यनिर्मितीच्या बाबतीत साशंक मनःस्थितीत होते, परंतु भाषिक प्रदेश राज्यांची मागणी

अत्यंत गगनभेदी आवाजाने होऊ लागली. आंध्रमध्ये हा प्रश्न धसास लागला. नाखुशीने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र आंध्र राज्याची योजना लोकसभेपुढे मांडून मान्य करून घेतली. १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी पुढाकार घेतला. साहित्यकारांनी निर्माण केलेल्या आंदोलनात रूपांतर होऊ शकते, याचे आश्चर्यकारक प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये मिळाले. भारत सरकारने भाषावार प्रांतरचनेकरिता फाजलअली आयोग निर्माण केला. त्या आयोगाचा अहवाल १९५५ च्या ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हा महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन शहारले. महाराष्ट्राच्या काँग्रेस समितीने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव एकमताने सम्मत केला. फाजलअली आयोगाने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये नेमस्त गट व जहाल गट असे गट पडले. भाऊसाहेब हिरे हे जहाल गटाचे नेते होते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा वाढत होता. त्याला भाऊसाहेब हिऱ्यांचा पाठिंबा होता. यशवंतराव चव्हाण हे मनापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे पुरस्कर्ते होते, परंतु वेळ पडली तर काँग्रेसमधून फुटून लढ्यामध्ये सामील होण्यास उत्सुक नव्हते. १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षात फूट पडली. त्यामुळे मोरारजी देसाई यांनी पक्षनेता म्हणून उभे न राहता यशवंतराव चव्हाण यांनाच पक्षाचे नेते म्हणून उभे केले. यशवंतराव चव्हाण पक्षनेते म्हणून बहुमताने निवडून आले.

१ नोव्हेंबर १९५६ला द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी सत्ता हाती घेतली. त्या वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला अत्यंत विशाल, उत्कृष्ट आणि भव्य रूप प्राप्त झाले होते. भव्य मोर्चे आणि अफाट प्रचंड सभा यांच्या योगाने महाराष्ट्र खवळून उभा राहिला होता. मोरारजी देसाईंच्या १९५२ सालापासून ते १९५६ सालापर्यंतच्या या कारकीर्दीत

मुंबई राज्याच्या प्रशासनाने आंदोलन दडपण्याकरता १०५ बळी घेतले गेले. हा सगळा इतिहास डोळ्यासमोर घडत असताना यशवंतरावांनी मोठ्या द्विभाषिक मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली हे मोठेच धाडस होते. ही धुरा वाहात असताना यशवंतरावांनी असा पण जाहीर केला की, मी बंदुकीची गोळी न वापरता राज्य चालवणार, त्याप्रमाणे त्यांनी शिताफीने राज्य चालविले. पंडित जवाहरलाल नेहरूंसारख्या संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या बाबतीत साशंक असलेल्या वरिष्ठ नेत्यांना पटवून दिले की, गुजराती, मराठी आणि कानडी या तीन भाषिक जनतेच्या नेत्यांची एका राज्यात राहून मनापासून सहकार्याने काम करण्याची तयारी नाही. अखेरीस असेही सांगितले की, यापुढील सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचे राज्य महाराष्ट्रात आणि गुजरातेत येऊ शकणार नाही. काँग्रेस या दोन्ही राज्यांत पराभूत होणार. ही गोष्ट वरिष्ठ नेत्यांना पटली आणि वऱ्हाड, मराठवाडा आणि कोकणसह उत्तर-दक्षिण महाराष्ट्र असे हे मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याचे विधेयक लोकसभेने आणि राज्यसभेने स्वीकारले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. या १९४६-६० पर्यंतच्या कालखंडात यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेचे राजकारण यशस्वी झाले. मैत्री, सद्भावना, शुद्ध चारित्र्य आणि व्यावहारिक शहाणपण या सद्गुणांचे फळ म्हणून यशवंतराव हे यशस्वी होऊ शकले.

१९५६ पासून तो १९६२ पर्यंतच्या ६ वर्षांच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. गरीब माणसाला शिक्षणाच्या बाबतीत कुठेही अडचण येऊ नये म्हणून शिक्षणविषयक महत्त्वाचे विधेयक अंमलात आणले. ग्रामीण भागाचा विकास होऊन ग्रामीण भागाची अवनत दुर्दशा संपावी म्हणून ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्था समर्थ व्हाव्या म्हणून नवा कायदा पारित केला. सहकारी संस्थांचा विस्तार करून महाराष्ट्राच्या कृषि-

औद्योगिक अर्थव्यवस्थेचा पाया घातला. या अवधीत यशवंतरावांची महाराष्ट्रातील राजकारणी कर्तबगारीची कीर्ती भारतात वेगाने पसरली.

## द. र. कोपर्डेकर
## आम्ही एका जोडीचे

कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत असल्यापासूनच यशवंतराव चळवळीत भाग घेत असत. २६ जाने. १९३२ ला चावडीवर झेंडा लावायचा असे ठरवले. झेंडा लावला, पोलिसांनी डोईफोडे नावाच्या मित्राला पकडले. यशवंतराव निसटले. दुसरे दिवशी टिळक हायस्कूलमध्ये जाऊन हे. मा. कडून बोलावून घेऊन त्यांना पकडले. खटला होऊन शिक्षा झाली.

येरवड्याच्या कँप जेलमध्ये (राहुट्याच्या) १२ नं. च्या बराकीत त्यांना ठेवण्यात आले. त्या बराकीला विद्वानांची बराक म्हणत असत. त्यात आचार्य भागवत, एस. एम. जोशी, ह. रा. महाजनी, वि. म. भुस्कुटे, रावसाहेब पटवर्धन, राघुअण्णा लिमये वगैरेंना ठेवले होते. आचार्य भागवत रोज काही तास मराठी वाङ्मय, काव्य यावर बोलत असत. केशवसुतांवर त्यांनी ८|१० दिवस रसग्रहण कसे करावे हे समजावून देऊन आपले विचार मांडले. तसेच सावरकरांच्या सुप्रसिद्ध कमला खंडकाव्याचा शब्द न् शब्द फोड करून ते काव्य शिकवले. यशवंतरावांचा व माझा असे बिस्तारे शेजारी शेजारी. रोज आम्ही संपूर्ण कमला काव्य आवडीने म्हणत असू.

रावसाहेब पटवर्धन यांनी ऑप्टन सिंक्लेअरच्या कादंबऱ्या व गॉर्कीची मदर आणली होती. ती सर्व पुस्तके यशवंतरावांनी अभ्यासली.

प्रसिद्ध संस्कृत पंडित ह. रा. महाजनी यांनी आम्हाला 'शाकुंतल' समजावून सांगितले. मी व यशवंतराव शाकुंतल वरचेवर वाचत असू.

राघुअण्णांचा आवाज चांगला होता. आणि ते नाशिकचे राष्ट्रशाहीर गोविंद यांच्या कविता व यशवंत कवींची बंदिशाला- 'वाढु दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती'- ही कविता म्हणत असत. त्या ऐकून आम्हीही

गुणगुणत असू. कँप जेलमध्ये म. गांधींचे सुपुत्र रामदास गांधी त्या वेळी होते. कर्नाटक, गुजराथ यामधील थोर थोर कार्यकर्ते यांच्या विचारांची देवाणघेवाण होत असे.

सहा महिन्यांनी येरवड्याहून विसापूर जेलमध्ये आम्ही गेलो. या जेलजवळ सुमारे एक मैल अंतरावर एक मोठा तलाव होता. तिथे आम्ही पोहायला जात असू. परिसर रम्य होता. तिथेही काम काहीच नसल्याने आम्ही खूप वाचन व चर्चा करीत असू. म. गांधींचे आफ्रिकेतील सहकारी रावजीभाई, 'यंग इंडिया' चे मोहनलाल भट्ट, आमच्या बराकीत असल्याने आम्हाला म. गांधींचे जीवन व विचार यांचा जवळून परिचय झाला.

विसापूर जेलमध्ये गुजराथी लोक जास्त. त्यामुळे यशवंतरावांना गुजराथीचाही (लिपीसकट) अभ्यास करता आला. उर्दूचे प्राथमिक ज्ञानही झाले.

या जेलमध्ये आम्ही राष्ट्रीय सण साजरे करत असू.

एस्. के पाटील नुकतेच इंग्लंडला जाऊन आले होते. त्यांची इंग्रजीत व्याख्याने होत. त्यामुळे जगातल्या राजकारणाची आम्हाला ओळख होत होती.

विसापूरला आम्हाला खूप स्वातंत्र्य मिळण्याचे कारण म्हणजे तेथील आयरिश जेलर. तो काहीच पाहात नसे. एस्. के. पाटीलच पाहात असत. जणू तेच कंट्रोलर त्यामुळे त्रास नव्हता आणि आचारविचार स्वातंत्र्य भरपूर. अभ्यासही करता आला.

तुरुंगातून सुटल्यावर अभ्यास पुनः चालू झाला. अकरावीचा अभ्यास करताना हे.मा.च्या समाधानासाठी संस्कृत घेतलेले. पण जिल्हाभर काँग्रेस संघटना बांधणे, कार्यकर्त्यांशी चर्चा करणे यात वेळ जात असल्याने संस्कृतच्या कारिका, रूपे इत्यादी पाठ करण्याला वेळ झाला नाही. म्हणून ऐन वेळेला फॉर्म भरताना संस्कृतऐवजी मराठी हा विषय हे. पा. ला नकळत घेतला. महिनाभराच्या अभ्यासाने यशवंतराव मराठी विषयात पहिले आले ! हे. मा. ला हा धक्काच होता.

अकरावीच्या सेंड ऑफच्या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांतर्फे इंग्रजीतून आभाराचे भाषण केले. ते हे. मा. व मुख्य पाहुणे यांच्या भाषणापेक्षाही सरस ठरले.

अकरावीनंतर यशवंतराव कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये गेले व मी पुण्याला आलो.

बिंदू चौकात भुसारी वाड्यात खोली घेऊन राहून त्यांनी कोल्हापुरात अभ्यास केला.

सातारा जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे अधिक लक्ष असल्याने त्यांची हजेरी भरत नसे. प्राचार्य डॉ. बाळकृष्ण हे यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेकडे व सौजन्याकडे पाहून या गोष्टीकडे काणाडोळा करून माफ करत असत.

इंटरला असताना यशवंतराव टॉयफाइडने आजारी पडले. फॉर्म भरायच्या वेळी त्यांना टॅक्सीने कोल्हापूरला नेले व १|| महिन्याच्या अभ्यासाने इंटर परीक्षा उत्तीर्ण झाले.

बी. ए. नंतर एल्.एल्. बी. साठी पुण्यात आले. मी त्या वेळी सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेत नोकरी करत होतो. मला ते म्हणाले, "अरे, आपल्या कऱ्हाडच्या पंडित सड्यांचे काव्य छापू या."

टिळक स्मारक मंदिरात प्रकाशन समारंभ झाला. प्रा. माटे अध्यक्ष होते. यशवंतराव त्या वेळी हजर होते. या प्रकारे त्यांनी मला प्रकाशक बनविले.

कऱ्हाडहून निघताना ते मला म्हणाले, "तू डॉक्टर हो, मी वकील होणार." मी त्यानुसार आयुर्वेदाचा चार वर्षे अभ्यास केला परंतु मी झालो प्रकाशकच. ते मात्र ठरवल्याप्रमाणे वकील झाले.

आम्ही शाळेत बरोबर होतो. तुरुंगात बरोबर होतो. त्यांच्या एल्.एल्.बी.च्या वेळी पुण्यातही दोन वर्षे बरोबर होतो. मी माझे पूर्वज कृष्णदयार्णव यांच्या हरिवरदा ग्रंथाचा पहिला खंड यशवंतरावांच्या हस्ते साहित्य परिषदेच्या हॉलमध्ये प्रकाशित केला. त्या वेळी ते म्हणाले होते, "मी मंत्री म्हणून आलो नसून मित्र म्हणून आलो आहे. लहानपणी दयार्णव

नाव का ठेवले असे मी त्यांच्या वडलांना विचारले होते. ते नाव ठेवणे आज सार्थ झाले." या समारंभात आभार मानताना मी म्हटले, "यशवंतराव मंत्री झाले नसते तर साहित्यिक झाले असते. त्यांनी हायस्कूलमध्ये असताना मेळ्याची पदे लिहिली होती त्यातील 'बाल तिलक वंदू या' हे गाणे अजून मला पाठ आहे." २२०० पानांचा हरिवरदा ग्रंथ पूर्णपणे प्रकाशित झाला याची प्रेरणा यशवंतरावांचीच आहे.

यशवंतराव पुण्यात माझ्या घरी उतरत त्या वेळी ते काव्य, साहित्य, समीक्षा अशीच पुस्तके वाचीत असत. इतर सटरफटर वाचनाची त्यांना आवड नव्हती. पुढे ते मंत्री झाल्यावर ते ज्या त्या खात्याचा संपूर्ण, मूलगामी अभ्यास करत. त्यासाठी रात्री उशीराही पुस्तक मागून घेत.

यशवंतरावांचा व माझा घरगुतू स्नेह होता. जाणेयेणेही होते. ते कऱ्हाडला गेले असता मी त्यांच्या घरी गेलो होतो. त्यांची आई मला म्हणाली, "अरे, यशवंता कसली नोकरी करतुया रे? सारखी माणसं. त्याला जेवायलाही सवड नाही. घरातल्या माणसांशी बोलायलाही सवड नाही."

मी त्या वेळी म्हटले, "अग आई, तो राजा आहे, तो राज्य करतो."

यशवंतराव पुण्यास माझ्याकडे आले. माझी आई, माझे वडील व माझी पत्नी यांच्या समवेत त्यांच्या माझ्या गप्पा चालू होत्या. त्यांनी आमच्याकडे दोन मुलींची हकीगत सांगितली. एक एका डी. एस.पी.ची इंटर झालेली मुलगी होती, व दुसरी मोऱ्यांची मुलगी. यातली कोणती पसंत करू असे त्यांनी विचारले. तेव्हा आम्ही सर्वांनी एकमताने त्यांना सांगितले की "त्या डी. एस. पी. च्या मुलीऐवजी दुसऱ्या मुलीशी लग्न कर. म्हणजे तुझं घर फुटणार नाही. एकत्रच राहील. "त्याने तो सल्ला मानला. ती दुसरी मोऱ्यांची मुलगी म्हणजेच वेणूताई. वेणूताईंनी त्यांना आयुष्यभर उत्तमच साथ दिली.

यशवंतरावांचे व माझे बाळपणापासूनचे स्नेहसंबंध कायमच राहिले. पुण्यात कृष्णाकाठ, हिरोशिमा व बंद दरवाजा या पुस्तक प्रकाशनात

त्यांची भाषणे झाली त्यांनी मी हजर होतो. बंद दरवाजाचा कार्यक्रम संपला व मी विचारले, “यशवंतराव किती दिवस मुक्काम?” ते म्हणाले, “असाच विमानतळावर जाणार आहे,” हे त्यांचे माझे शेवटचे संभाषण.

त्यानंतर ते लवकरच गेले व मात्र चुटपुट लागून राहिली.

## धन्वंतरी
## ज्ञानसूर्य

मा. यशवंतरावांच्या घराशी माझा ऋणानुबंध १९३२ पासून. मी त्यांचा घरचा वैद्य होतो. मा. यशवंतराव विद्यार्थिदशेत! परंतु तडफदार! "मुलाचे पाय पाळण्यात दिसतात!! त्याप्रमाणे ते स्वतंत्र वृत्तीचे स्वयंप्रकाशी दिसत! त्यांच्याजवळ निरीक्षणदृष्टी व जेथे ज्याचा गुण दिसेल तो घेण्याची प्रवृत्ती जाणवत असे." त्याचप्रमाणे खऱ्या राष्ट्रीय वृत्तीचे साहित्यिक व उत्कृष्ट वक्ते ह्या त्यांना परमेश्वराकडूनच देणग्या मिळाल्या होत्या. त्या त्यांनी आपल्या आयुष्यात अत्यंत परिश्रमाने आयुष्याच्या अखेरपर्यंत जोपासल्या.

माझा प्रत्यक्ष परिचय प्रथम १९३६ साली झाला. त्या साली डॉ. गिल्डर आरोग्य मंत्री काँग्रेस राज्यात होते. त्या वेळी त्यांनी आयुर्वेदास घातक असे बिल कौन्सिलमध्ये आणले. त्यांस महाराष्ट्रातील सर्व वैद्यांनी कडाडून विरोध केला. मी आमची बाजू आमदार आत्माराम पाटील बोरगावकर यांना चांगली समजावून सांगून विरोध करून ते बिल स्थगित केले!!

नंतर माझा प्रत्यक्ष परिचय सन १९४२ साली झाला. ते पहिले डिक्टेटर (म्हणजे हुकूमशहा नव्हे). सर्व जिल्ह्यात निरनिराळे ग्रुप नीरा नदीपासून वारणा नदीपर्यंत काम करत होते. त्यांत प्रथम तालुका कचेऱ्यांवर उघड मोर्चे नेणे, त्यांचे नियोजन करणे व ते यशस्वी पार पाडणेस लागणारे कौशल्य ते पार पाडीत.

कराड, तासगाव मोर्चा यशस्वी झाला ! ब्रिटिश सरकार चिडले आणि वडूज, इस्लामपूर येथे गोळीबार करून चांगली चांगली देशभक्त माणसे ठार मारली गेली! मग सातारा जिल्ह्याची चळवळ भूमिगत (अंडरग्राऊंड) सुरू झाली ! त्याचेही नेतृत्व यशवंतराव पकडले जाईपर्यंत करत होते!!

वरच्या लोकांचे – आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, शिरू लिमये, एस्.एम्. जोशी यांच्याशी संबंध ठेवीत व दारूगोळा, पैसे खाली सर्वांना पोचवत !

मी काही कट्टर गांधीवादी नव्हे ! क्रांतिकारकवादी !

मला हाक मारली – धन्वंतरी हे नाव त्यांनीच दिले ! व म्हणाले, दोनतीन वेळा प्रयत्न केला तरी शिरवडे स्टेशन जाळण्याचे जमले नाही, तेथे पाच बंदुका वगैरे आहेत!

मी म्हटले, "आमच्या ग्रूपवर जर सर्वस्वी जबाबदारी टाकत असाल तर त्या कामगिरीचा विडा उचलतो, कामगिरी यशस्वी करू नाही तर मरून जाऊ." ते म्हणाले ठीक आहे ! – माझ्या ग्रूपमध्ये माधवराव जाधव वगैरे १५-२० हायस्कूलमधील मुले ! मी स्वतः जाऊन वॉच (निरीक्षण) करून आलो! तर पोलीस ७ ते ७॥ ला रात्री जेवणास जातात व ८॥ ला परत येतात ! मुलं जरी असली तरी चिवट, जिद्दी, निर्व्यसनी, उत्साही, आनंदी असत. लागलीच तयारी केली व बरोबर ७। ला स्टेशनवर चढाई केली ! तिथले पोर्टर वगैरे कामगारांना एकत्र करून एक पिस्तुलधारी उभा केला, एवढ्यात स्टेशनमास्तरने कराड पोलिस पार्टीस फोन केला, "स्टेशन जळाले !" त्याबरोबर आमच्यातल्या एकाने स्टेशन मास्तर यांना धरले, पण मी सांगितले "त्यांना हात लावू नका !" मी कामास लागलो. सर्व एकत्र करून पेटवणे ! स्टेशनमास्तरला एकाने तडाखा दिला. तो माझ्याकडे रडत आला ! मी कोणी मारले ? म्हणून चौकशी करून त्याच्या जोरात एक कानफाडात दिली ! माझ्याबद्दल स्टेशनमास्तरला सहानुभूती निर्माण झाली व तो मला म्हणाला "आत बंदुका आहेत" स्टेशन पेटलेले ! तथापि त्यांस घेऊन आत गेलो व पाच बंदुका, रायफल्स व काडतुसाची पिशवी घेऊन आलो ! एवढ्यात सदूभाऊ पेंढारकर, शांताराम इनामदार, रामभाऊ पवार, तांब्यांचा ग्रूप हे आले व तेथील काम संपवून सर्व परत निघालो. मी माझ्या ओगलेवाडीच्या दवाखान्यात आलो तर मा. यशवंतराव तिथे अगोदरच हजर! आम्हा सर्वांना भेटले कडकडून !! –

डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहात होत्या, ते म्हणाले. "धन्वंतरी जिवंत मला दिसाल असे वाटले नव्हते!"

निवडणुकांचे दिवस होते ! तेव्हा माण तालुक्याची जबाबदारी मी व माधवराव जाधव यांच्यावर असे ! साहेबांची सभा म्हटल्यावर तालुक्यातून तुफान गर्दी जमलेली ! जेवण आ. आण्णासाहेब जाधव यांचेकडे केले व एक अर्धातास विश्रांती घेऊन स्टेजवर – दहिवडी – यावयाचे !! तालुका पंचायतीतील गाद्या आणलेल्या. मी स्वतः सर्व तपासले व बैठका घातलेल्या ! मी सभेकडे निघून गेलो. इतक्यात कुठून विंचू आला व साहेबांना चावला ! त्यांना तर तो चढतो सर्वत्र एकदम गडबड सुरू झाली ! सर्व डॉक्टर जमा झाले ! मांत्रिक जमा झाले ! अंगारेधुपारे आले !! साहेबांनी सर्वांना सांगितले, "मला औषध घ्यावयाचे नाही ! इंजेक्शन वगैरे काही नाही ! इतक्यात मी आलो व पाहिले तर कपाळास घाम फुटलेला ! मी म्हटले, "एक विडा देऊ का?" "द्या" म्हणाले, औषध घालून विडा दिला! किंचित कमी झाले पण वेदना होत होत्या !

आत्मिक सामर्थ्य एवढे की, ते स्टेजवर बोलू लागले ! अखंड १ || तास बोलले, यांना विंचवाच्या कळा चालू आहेत हे सांगून खरे वाटणे कुणास शक्य नाही !

व्याख्यान संपल्यावर विचारले "कळा येत आहेत ? "होय!" "अरे भाई, त्याचे काम तो करतो, माझे काम मी करतोय!!" पुन्हा चेहेऱ्यावर ते हसे, तो विनोद, तो आनंद! एवढे सामर्थ्य – मनाची तयारी – येरे गबाळ्याचे काम नव्हे !!

ते संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे दिवस होते. दे. भ. शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे आदी काँग्रेसमधील नेतेसुद्धा भावनांच्या आहारी गेल्याने आपण काय करतो आहोत हे त्यांना समजेना ! आपले चुकते आहे ते उमजेना ! सर्व विरोधी पक्ष व काँग्रेस कमिटी, प्रांतिक यांची सर्वपक्षीय सभा घेऊन त्यात दे. भ. शंकरराव देवांना सर्वांनी सर्वाधिकारी नेमले ! मा. यशवंतराव हे या गोष्टीस विरोधी होते. "बाकीच्या सर्व विरोधी पक्षांच्या

पुढाऱ्यांची गोष्ट वेगळी आहे व आपली काँग्रेसजनांची गोष्ट निराळी आहे! आपल्या आंदोलनास मर्यादा आहेत ! वर आपलेच सरकार आहे ! त्याची शिस्त, बंधने आहेत ! बाकीचे सर्व पक्ष म्हणतील महाराष्ट्राची काँग्रेस मोडून टाकावी ! बरखास्त करावी. अरे, आज सुमारे ७० वर्षे सर्वस्वी त्यागाने, सेवेने, राष्ट्रीय वृत्तीने काम करते आहे तिला नष्ट करणारे आपण कोण?"

मा. यशवंतरावांचे हे म्हणणे काँग्रेसमधील लब्ध प्रतिष्ठांना पटेना ! त्यांनी असे ठरवले की, यशवंतलाच काँग्रेस कमिटीतून काढून टाकू या ! दे. भ. शंकरराव देवांना सर्व पक्षीयांच्या समितीचे अध्यक्ष नेमून त्यांना दिल्लीस वरिष्ठांच्या वाटाघाटीस पाठवून जर वरचे मानीनात तर त्यांना सांगून टाकावयाचे, "आम्ही सर्वांनी हे राजीनामे आणलेत!" — अशा तऱ्हेने यशवंतरावांचा मधला काटाच काढावयाचे ठरवले! त्यांना प्रांतिकची मीटिंग बोलवा म्हटले तर प्रांतिक मीटिंग बोलवेना — मग ताबडतोब फलटणला येऊन जिल्हा कार्यकारिणीची मीटिंग घेऊन दिल्लीस पंडितजींना तार दिली, "काँग्रेसचे म्हणणे म्हणून मांडावयास आलेल्या मंडळींच्या विचारांस आमचा विरोध आहे! संपले, दे. भ. शंकरराव देवांच्या फुग्यातील हवाच निघून गेली ! महाराष्ट्र प्रांतिकच्या कार्यकारिणीच्या मीटिंगपुढे ठराव मांडून तेथे निर्णय होईल तो सर्वांनी मानावयाचा! — वास्तविक सर्व सभासद दे. भ. देव व भाऊसाहेब हिरे, या बाजूचे परंतु ज्या वेळी यशवंतराव बोलावयास उठले त्या वेंळी जसा एखादा शूर वीर योद्धा आत्मविश्वासाने युद्ध करतो तसे अखंड दीड तास भाषण झाले. सर्व काँग्रेसच्या कामाचा आढावा घेतला व "एखाद्या कामासाठी ही संस्था नष्ट करावी ? शेकडोंचे बलीदान, त्याग, व्यर्थ घालवावा?" असे विचारले. ते भाषण काँग्रेसच्या जीवनमरणाचे शेवटच्या क्षणी अमृतासारखे अजरामर झाले. ठराव यशवंतरावांच्या बाजूने पास झाला ! विरोधी पक्षांचा काँग्रेस नाशाचा व्यूह ढासळत गेला.

प्रतापगड काय, किंवा पुण्यास ऑल इंडिया वर्किंग कमिटीची भरली सभा काय, "दोन्ही बाजूंनी आता मारामारी होऊन आपसात मुडदे पडणार काय?" असे प्रसंग आले तरी स्वतःच्या बुद्धीकौशल्याने निराळाच मार्ग काढून प्रतापगडची मारामारी साहेबांनी होऊ दिली नाही. तर पुण्याच्या वर्किंग कमिटीच्या वेळी विरोधी पक्ष मोर्चा आणणार होते. मोर्चा म्हणजे काय ? मारामारीच ! तोंडाने म्हणावयाचे शांततामय ! पण रक्ताचे दोन्ही बाजूंचे म्हणजे आपसातील रस्त्यावर सडेच की !! आम्ही, किसनवीर वगैरे, इकडे मारामारी कशी करावयाची याचे व्यूह रचत होतो तर कुणास न सांगता तिकडे एकटेच यशवंतराव टॅक्सीत बसून केसरी वाड्यात गेले ! विरोधी पक्षांतील पुढाऱ्यांशी चर्चा करून मोर्चाचा मार्ग ठरवून घेतला व मारामारी टाळली ! ठरल्या रस्त्याने मोर्चा गेला. वर्किंग कमिटीचे सभेचे काम अतिशय उत्कृष्टपणे दोन दिवस पार पडले !

यशवंतराव कसलाही प्रसंग असला तरी भावनेच्या आहारी कधी जात नसत. योग्य वेळ आल्यावर आपले मत स्पष्ट मांडत. कुणाचाही मुलाहिजा ठेवीत नसत.

तसे मोरारजीभाई अत्यंत जिद्दी व हट्टी. मुंबई महाराष्ट्रास द्यावयाची नाही. तेव्हा द्विभाषिकाचा तोडगा ! सर्व गुजराथचा यशवंतरावजींच्यावर संपूर्ण विश्वास ! पंडितजींनी दोन वर्षांकरता तो पत्करून पुन्हा निर्णय घेण्याचे ठरविले !

यशवंतरावांनी ती दोन वर्षे गुजराथ व महाराष्ट्र यांचा विश्वास संपादन करून चांगले राज्य चालवले !

सर्वांना वाटले आता यशवंतराव म्हणणार की, द्विभाषिक फार चांगले आहे !

दोन वर्ष झाल्यावर पंडितजींनी विचारले, "काय यशवंतरावजी, तुमचा निर्णय काय?" यशवंतरावांनी वस्तुस्थितीस धरून अत्यंत मार्मिक उत्तर दिले, ते म्हणाले, "पंडितजी, राज्य चांगले चाललेय ॲडमिनिस्ट्रेशनदृष्ट्या! परंतु एकात्मता निर्माण होऊ शकली नाही!"

पंडितजींनी ताबडतोब ओळखले व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा कलश महाराष्ट्राला देण्यास त्यांच्या स्वाधीन केला! मोरारजीभाई सपशेल आदळले. परंतु त्याचा विचार केला नाही. महाराष्ट्राच्या हितापुढे वैयक्तिक रागालोभाची पर्वा न करता तो महाराष्ट्राचे स्वाधीन केला!

हा सर्व भाग महाराष्ट्रातील सर्वांना माहीत असल्यामुळे स्थलसंकोचास्तव तपशीलवार दिला नाही. नाहीतर ते दिवस, क्षणाक्षणास जीवनमरणाचे होते! लोकक्षोभ- कुणी अंडी मारली, रस्त्यावर चपलांच्या माळा बांधल्या! पण त्यांच्याकडे त्यांनी वाट चुकलेले देशभक्त याच दृष्टीने बघितले! राग कुणावर धरला नाही!

"उपकारप्रधान स्यात् अपकारपरेऽपिअरौ" माणसानं आपली प्रवृत्ती उपकारप्रधान ठेवावी, प्रत्यक्ष आपल्यावर अपकार करणारा किंवा प्रत्यक्ष शत्रू असला तरी.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात आचार्य अत्र्यांनी अगदी भयंकर दाळ नासलेली! प्रत्येक काँग्रसवाल्यास तुझ्या भानगडी "मराठा" वर्तमानपत्रात छापतो म्हणून ब्लॅकमेल करावयाचे किंवा अंकात एवढेच म्हणावयाचे "उद्याच्या अंकात मंत्र्याच्या भानगडी! की मग सर्वांनी अत्रे साहेब यांच्याकडे जावयाचे व "माझ्याबद्दल काही आहे का?" असे विचारावयाचे! यशवंतरावांवर कधी हल्ला चढवणेची छाती झाली नाही! फारतर टवाळासारखा विनोद करावयाचा! 'चव्हाण, या शब्दातील च काढला तर काय राहील? कित्येक त्यांना म्हणत हे झालाच पाहिजे, केलाच पाहिजे हे काय? !! पण त्यापेक्षा त्यांचे नाव काढत नसत! त्यांच्या बुद्धीस व चारित्र्यास वचकून असत! एकदा मुंबईच्या विधानसभेस "मच्छीबाजार" असा शब्द आचार्य अत्र्यांनी वापरला! झाले. विधानसभेत त्याबद्दल गोंधळ सुरू झाला! एक यशवंतरावांनी कमिटी नेमली व या प्रकरणाचा सांगोपांग विचार करून निकाल द्यावा! असे सांगितले. या कमिटीस असे असभ्य अन् पार्लमेंटरी शब्द वापरल्यास शिक्षा करावयाचा अधिकार असतो?

मग कमिटीने निकाल दिला, एक महिना कैद व ५०० रु. दंड!! अत्र्यांना विधानसभेत बोलवून वारंट काढून निकाल त्यांचे हाती द्यावा!

आचार्य अत्र्यांना विधानसभेत हजर ठेवले व यशवंतराव मुख्यमंत्री त्यांच्या टेबलावर कमिटीने निकाल ठेवला! यशवंतरावांनी तो निकाल पाहिला. हा खरा सत्त्वपरीक्षेचा प्रसंग!

पण त्यांनी सभागृहास निकाल वाचून दाखवला व म्हणाले, “खरोखर एवढ्या मोठ्या विद्वानाने असे काही आपल्या पवित्र अशा संसदेस म्हणावयास नको होते! ठीक आपल्या सर्वांच्या भावना मी जाणतो! तेव्हा मला वाटते, जेल शिक्षा काही करू नये, फक्त दंड करावा!”

आता यशवंतरावांनी म्हटल्यावर विरुद्ध कोण बोलणार? तसा ठराव केला व दंड भरून घेतला! आचार्य अत्रे साहेब मात्र ओशाळून निघून गेले.

१९४२ चे प्रतिसरकारचे आंदोलनाने अतिशय उग्र स्वरूप धरले. रेल्वे गाड्या पडू लागल्या, सामुदायिक दंड बसू लागले! तेव्हा काही गांधीवादी व काही त्यांच्या आडून सरकारी अधिकारी म्हणू लागले की हे साताऱ्याचे काम काँग्रेसच्या ध्येय धोरणात बसते का ?

त्या वेळी मसूरच्या सभेत यशवंतरावजी बोलत होते ते म्हणाले, “सातारा काँग्रसमध्ये बसतो की नाही मला माहीत नाही, परंतु भारतात जर कुठे काँग्रेस जिवंत असेल तर ती एकट्या साताऱ्यातच आहे.”

## वि. वा. नेने
## सहकारी मित्र

यशवंतराव चव्हाण हे माझे शाळकरी मित्र होते. ते आणि मी टिळक हायस्कूल, कराड येथे एकत्र होतो. ही मैत्री शेवटपर्यंत कायम राहिली. लहानपणापासून अभ्यासू वृत्तीचे, शांत स्वभावाचे ते व्यक्तिमत्त्व होते. महात्माजींच्या चळवळीची ओढ असूनही त्यांनी शिक्षण सोडले नाही, नेतृत्वाचे काही गुण हे मुळातच त्यांच्यात असावेत. पण मोठा नेता झाला तरी त्याने कराड व कराडकर मित्र यांचा विसर कधी पडू दिला नाही.

अत्यंत संयमी पण कणखर वृत्ती, काँग्रेस संघटना व तिचे नेतृत्व याविषयी अविचल निष्ठा, अभ्यासू व विचारी वृत्ती, आतिथ्यशीलता, स्वभावात गोडवा, विरोधकांविषयी मनात कटुता नाही, काळवेळ व परिस्थिती पाहून वागण्याची कसोटी, शासनातही सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची प्रवृत्ती, राजकारणाच्या धबडग्यात राहूनही स्वतःच्या चारित्र्याला जपणारा, सुसंस्कृत मनाचा, कलांविषयी आवड असणारा, कलावंतांविषयी आदर व प्रेम बाळगणारा, पुढे जाणाराचे पाय मागे न ओढता त्यास पुढे जाण्यासाठी साहाय्य करणारा, निष्ठावान व ढोंगी यांची अचूक पारख करणारा, सत्ता हाती येऊन आपले गुण न सोडणारा व सत्तेचा ताठा न बाळगणारा असा हा नेता महाराष्ट्राचे भूषण होता, मुकुटमणी होता.

त्याच्या कर्तृत्वाला दैवाचीही उत्तम जोड मिळाली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्यां देशनिष्ठेने त्याने भाग घेतला, त्याच निष्ठेने त्याने स्वातंत्र्यानंतरचे राजकारणही केले. प्रांतहितापेक्षा देशहित महत्त्वाचे आहे, राष्ट्रनिष्ठा ही प्रांतिकतेपेक्षा श्रेष्ठ आहे हे त्यांचे ठाम मत होते. संयुक्त महाराष्ट्राचे वेळी त्यांनी हे दाखवून दिले. मग त्यासाठी लोकांची अप्रियता पत्करावी लागली तरी त्याची तयारी त्यांनी ठेवली

होती. नेतृत्वाबद्दलची निष्ठा ही त्यांची अनन्य होती. त्याहीपेक्षा संघटनेची निष्ठा जाज्वल्य होती. या संघटना की, नेतृत्व यांच्या निष्ठा जेव्हा डळमळीत व्हायची वेळ आली तेव्हा त्यांना मनाच्या कठीण अवस्थेतून जावे लागले. पण ते प्रसंगही त्यांनी निवारून नेले. स्वातंत्र्यानंतर सत्तेला सर्वस्व मानण्याची प्रवृत्ती वाढीला लागली व आजही ती बलवत्तर आहे. त्यामुळे आयुष्याची शेवटची वर्षे त्या सत्तेची वक्र दृष्टी झाल्याने त्यांना कठीण काळ आला. पण सत्ता नसली तरी यशवंतराव व्यक्ती म्हणून त्यांच्याबद्दलचा आदर कधी कमी झाला नाही. शेवटी सत्ता नसतानाही आदरणीय व्यक्तिमत्त्व ही त्यांची जनमानसातील प्रतिमा कायम राहिली.

१९३९ सालची गोष्ट! मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्यासाठी म्हणून मी कराडला टिळक हायस्कूलमध्ये इंग्रजी ७ वीत दाखल झालो होतो. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत वयाच्या सोळाव्या वर्षी भाग घेतला. तेव्हा प्रतिज्ञा केली होती की, इंग्रजांनी मान्यता दिलेल्या शाळेत जाणार नाही. त्यामुळे सगळा मार्गच वेगळा झाला. पुढे १९३७ साली कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले व म्हणून मी टिळक हायस्कूलमध्ये आलो होतो.

त्या वेळी कराडला मी सेवादलाचेही कार्य करीत होतो. आमची एक शाखा डबीर आळीच्या डबीरांच्या वाड्यात भरत असे. तेथेच यशवंताचे बिऱ्हाड होते. त्याच्या मातोश्री विठाबाई त्या वेळी तेथेच असत. तोही सेवादलाला अधूनमधून भेट देत असे. त्या वेळी मी कविताही करीत होतो. काही किर्लोस्कर इ. मासिकांतून प्रसिद्धही झाल्या होत्या. त्या कविता पाहण्यास मी यशवंताला बोलावले होते. तो अगत्याने माझ्या घरी आला व त्याने संपूर्ण कविता वाचून ‘छान’ असा अभिप्रायही दिला होता. ललित साहित्यात रस घेण्याची त्याची प्रवृत्ती तेव्हापासून होती.

१९४० साली मी मॅट्रिकच्या परीक्षेला बसलो. त्या कालात मॅट्रिक परीक्षेची महाराष्ट्रात दोन केंद्रे होती. एक पुण्यास व एक सांगलीस. मी पुण्याला बसणार होतो. त्या काळी मॅट्रिकची परीक्षा ठरल्याप्रमाणे १३

एप्रिलला सुरू होत असे. मी व यशवंता दोघांनी मिळून एप्रिल ६ ते १३ या राष्ट्रीय सप्ताहात सातारा जिल्ह्यात प्रचारदौरा करायचे ठरवले. ते साती दिवस आम्ही एकत्र प्रचार केला. एकसळ येथे साखळकर गुरुजी हा सत्त्वशील मनुष्य काँग्रेसचा कार्यकर्ता होता. तेथील कार्यक्रम मला चांगला आठवतो. सभा चांगली झाली व भाषणेही छान झाली. यशवंताचे वक्तृत्व त्याही काळात शांत पण निश्चयी, आकर्षण करून घेणारे असे होते. पुण्याला परीक्षेला बसण्यापूर्वी हा 'अभ्यास' करून मी गेलो होतो.

१९४५-४६ सालची गोष्ट असेल. श्रीरामपूर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रसची सर्वसाधारण सभा होती. त्या वेळी राष्ट्रसेवादलातर्फे कै. शंकरराव देव यांचा खासगी चिटणीस म्हणून मी काम करीत होती. राष्ट्रसेवादलाचे श्री. वि. म. हर्डीकर हे सेवादलप्रमुख होते. तेही या सभेस हजर होते. ह्या वेळपर्यंत यशवंता चव्हाण यशवंतराव चव्हाण झाला होता. महाराष्ट्रात काँग्रेसचा एक थोर कार्यकर्ता म्हणून तो गणला जाऊ लागला होता. या सर्वसाधारण सभेस मी हजर होतो. शंकरराव देव हे प्रदेश काँग्रसचे त्या वेळी अध्यक्ष होते. त्या सभेत एका वाक्याने यशवंतरावाने ही सभा जिंकलेली मला आठवते. आपल्या भाषणात तो म्हणाला होता, १९४२ मध्ये सातारा जिल्ह्यात झालेली प्रतिसरकारची चळवळ ही काँग्रेसच्या अहिंसेत बसत होती की नव्हती हे मला माहीत नाही. पण हे मी निश्चितपणे सांगू इच्छितो की सर्व महाराष्ट्रात त्या वेळी काँग्रेस जर कुठे जिवंत स्वरूपात दिसली असेल तर ती फक्त सातारा जिल्ह्यातच! १९४२ ची सातारा जिल्ह्यातील प्रति सरकारची चळवळ त्या वेळी काँग्रेस कार्यकर्त्यांत उलटसुलट चर्चेचा विषय झाला होता. त्याला उद्देशून यशवंतराव हे बोलला होता. त्या एका वाक्याला जोरदार टाळ्या पडल्या व यशवंतरावाला काँग्रेस कार्यकर्त्यांत अमाप लोकप्रियता मिळाली.

कराडचा माणूस म्हणजे यशवंतरावांना एक विशेष आपुलकी वाटे. तो माणूस कुठेही दिसला तरी त्याची वास्तपुस्त केल्याशिवाय यशवंतराव

राहायचे नाहीत. यशवंतरावांचा विलेपार्ल्याला एक कार्यक्रम होता. तेथील पार्लेश्वर सोसायटीत कारडचे श्री. वामन जंगी, श्री. बाबू आपटे व माझा थोरला भाऊ श्री. के. वा. नेने हे रहात. त्यांनाही यशवंतराव कराडचे म्हणून आपुलकी व आदर होताच. त्यांची इच्छा की यशवंतरावांनी त्यांचे घरी यावे. प्रथम डोंगरे यांच्यामार्फत खटपट केली. पण त्यांनी परस्पर कळविले की यशवंतरावांना वेळ नाही. तेव्हा हे तिघे समक्ष यशवंतरावाला भेटले व विनंती केली. तेव्हा यशवंतराव म्हणाले, "अरे, कराडची माणसे म्हटल्यावर मी त्यांचेकडे जाणार नाही हे शक्य तरी आहे का?" त्या तिघांनी डोंगऱ्यांचे उत्तर सांगितल्यावर ते म्हणाले, "अरे, त्यांना काय माहीत कराडच्या माणसांबद्दलची माझी आपुलकी? मी लक्षात ठेवून येईन." त्यानुसार विलेपार्ल्याचा कार्यक्रम आटोपून ते श्री. वामन जंगी यांच्या दोन खोल्यांच्या संसारात आले. तेथेच बाकीचे दोघेही व मीही होतो. १५-२० मिनिटे गप्पा व जुन्या आठवणींना उजाळा देऊन ते निघून गेले. यशवंतरावांची ती आपुलकी पाहून मी तर गहिवरून गेलो होतो.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत यशवंतरावांची फार ससेहोलपट झाली. मनाने ते संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने होते, पण अद्याप ते स्वप्न साकार होण्याची वेळ आली नव्हती असे त्या काळच्या परिस्थितीनुसार वाटे व ते बरोबरही होते. सं. महाराष्ट्राच्या मागणीत म. काँग्रेस बरीच पुढे गेली होती व त्यामुळे काय करावे, एक प्यादे मागे कसे घ्यावे हा विचार त्यांना सतावत होता. जनमत संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने होते. पण त्यासाठी महाराष्ट्र काँग्रेसने लढायचे ठरवले तर काँग्रेसशीच लढा करायचा असा त्याचा परिणाम दिसत होता. तेव्हा यातून बाहेर पडायचे ठरवून त्यांनी फलटण येथे 'नेहरू सांगतील ते मी मानीन' अशी घोषणा करून काँग्रेसला वाचविण्याचे मोठे धारिष्ट्याचे पाऊल टाकले यात संशय नाही. त्यानंतर अनेक घडामोडी झाल्या व त्यातच १९५७ ची निवडणूक उभी राहिली. त्यात काँग्रेसला मोठा पराभव महाराष्ट्रात

पत्करावा लागला. गुजरात विदर्भात मात्र काँग्रेस विजयी झाली होती. यशवंतरावही कराड मतदारसंघातून अवघ्या ३२६ च्या मताधिक्याने विजयी झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या निवडणुकीत भाऊसाहेब हिरे विरुद्ध यशवंतराव अशी लढत झाली व गुजरात व विदर्भातील मतांच्या जोरावर यशवंतराव विजयी झाले होते. त्या वेळी फलटण येथे यशवंतरावांनी घेतलेली भूमिका मला मान्य नव्हती. म्हणून त्यांना कसून विरोध करून भाऊसाहेब हिऱ्यांची बाजू मी घेतली. महाराष्ट्राची सर्व ११८ मते भाऊसाहेबांना पडली. यशवंतराव विजयी झाल्यावर त्यांचे अभिनंदन करावयास त्यांच्या बंगल्यावर गेलो. त्यांना भेटलो व सांगितले, "यशवंतराव, तुमच्याशी मी भांडलो. पण त्यात वैयक्तिक काहीही नव्हते. माझे अभिनंदन स्वीकारा." यशवंतरावांनी हसून म्हटले. मीही ते वैयक्तिक असे मानीत नाही. निवडणुकीबरोबरच ते संपले. आणि शेजारी बसवून घेऊन त्यांनी मला चहा पाजला.

१९३० सालापासून चळवळीत भाग घेणारा व स्वातंत्र्यानंतरही सातत्याने सार्वजनिक कार्य करीत राहणारा एक कराडचा कार्यकर्ता म्हणून त्यांना माझ्याबद्दल आपुलकी वाटे व ते अनेक वेळा मी पाहिलेली आहे. द्विभाषिकाचे व नंतर संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा मी त्यांना भेटलो, चर्चा केल्या, भांडलो,मतभेद प्रगट केले. पण मला कधी दूर केले नाही. एकदा त्यांना असाच बंगल्यावर भेटायला गेलो होतो. माझे बोलणे होत असताच इतर लोक येऊ लागले. तेव्हा मी त्यांना म्हणालो, "यशवंतराव, मी जातो आता. पुनः केव्हा तरी येईन." यशवंतराव म्हणाले, "अरे बैस रे, तुम्ही नेहमी मंत्र्यांवर टीका करता व त्यांची मजा असते असे म्हणता. जरा थांब आणि आमची मजा बघ एकदा." त्यानंतर दोन तास मी तेथेच होतो. अनेक लोक सारखे येत होते व यशवंतराव राग आवरीत त्यांना शांतपणाने समजावीत होते. जागा मागायला आलेले एक गृहस्थ काय ताठ्यात बोलत होते. ते ऐकून मलाच राग येत होता. पण यशवंतराव त्यांना समजावीत होते व शांतपणा सोडीत

नव्हते. भेटायला येणाऱ्यात त्या दिवशी शेवटी आले ते बडे गुलाम अली खाँ. स्वरांचा व ठुमरींचा तो राजा यशवंतरावांकडे जागा मागायला आला होता. 'मुसलमान मोहल्ल्यात जागा हवी ना' असे यशवंतरावांनी विचारले. बडे गुलाम अली खाँ म्हणाले "छे ! छे ! त्या मोहल्ल्यात नको. साहेब एक लक्षात ठेवा. गायकांत व वादकांत मुसलमान बरेच दिसत असले तरी सामान्य मुसलमानात शास्त्रीय संगीताचे शोकिन अत्यंत कमीच. त्यामुळे मला जागा हवी हिंदू मोहल्ल्यातच. माझ्या रियाजाला आदराने येऊन ऐकणारे लोक मला त्या समाजातच मिळतील."

बडे गुलाम अली खां गेल्यावर यशवंतराव मला म्हणाले, पाहिलंस, एक कटू सत्य या गायकाने सांगितले. मी त्याच एका विचारात गढून गेलो.

राजकारणात असणारा माणूस बहुधा रुक्ष वाटतो असा अनुभव बऱ्याच वेळा येतो. पण यशवंतराव तसे नव्हते. त्यांना साहित्यात रस होता, शिक्षणात होता, तसा गायनातही होता. शांता आपटेच्या भजनाचा कार्यक्रम त्यांच्या बंगल्यावर झाल्याचे मला आठवते. घरगुती स्वरूपाचा तो कार्यक्रम होता. मी जणू घरचा म्हणून त्या कार्यक्रमास हजर होतो. त्या कार्यक्रमात यशवंतराव जो रस घेत होते ते पाहून मी तर भारावलो.महाराष्ट्राचा हा मुख्य मंत्री.हजारो समस्या याच्या डोक्यात. तरीपण ते सर्व विसरून हा गृहस्थ शांता आपटेच्या भजनात रमून गेलेला मी पाहिला.

आणखी एक प्रसंग मला असाच आठवतो. नागपूर येथे त्यांचा दौरा होता. त्या वेळेस त्यांचेबरोबर संपूर्ण चार दिवस मी होतो. संगीतात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटायची होती व थोडे त्यांचे गायनही होते. त्या सर्व कार्यक्रमात यशवंतराव अगदी रंगून गेलेले मी पाहिले. शिवराम राजे भोसले हे त्या कार्यक्रमाचे संयोजक होते. शेवटी समारोपाच्या भाषणात यशवंतराव म्हणाले होते, "माझ्या एका आवडत्या विषयाच्या या कार्यक्रमात मी रंगून गेलो होतो. हा वेळ चांगला होता.

इतक्या सुंदर कार्यक्रमातून आता एकदम एका निराळ्या कार्यक्रमाला जायचे आहे. तेथे काय होते कुणास ठाऊक !"

आणि खरोखरच ते म्हणाले तसेच झाले. कापड मार्केटच्या इमारतीच्या उद्घाटनाच्या त्या समारंभात निदर्शने झाली व त्यामुळे कार्यक्रम आटोपता घेऊन निघून जावे लागले होते.

महाराष्ट्रातील एस्. टी. कामगारांच्या संघटनेचे काम मी पाहात होतो. रेडिओ क्लबवर एस्. टी च्या वार्षिक समारंभाचा कार्यक्रम होता व त्याच वेळी कामगारांना करारापोटी काही लाख रूपये दिल्याची घोषणा होणार होती. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव हे होते. बोनसचा कायदा त्या वेळी झालेला नव्हता. तरी त्याचे तत्त्व एस्. टी. ला मी स्वीकारायला लावले होते. पगार-भत्ते याव्यतिरिक्त कामगारांना पाच लाख सानुग्रह रक्कम द्यायचे ठरले होते. यशवंतरावांनी आपल्या भाषणात एस्. टी. बद्दल सांगितले व करारापोटी अमुक एक रक्कम द्यायचे ठरल्याचे जाहीर केले. पण सानुग्रह रकमेचा उल्लेख त्यांनी केला नाही. लगेच मी उठून त्यांचेजवळ गेलो व त्यांना याची आठवण देऊन 'ती रक्कम जाहीर करा'म्हणून विनंती केली. त्यांनी चेअरमन सरैयांना तसे जाहीर करण्यास सांगितले व त्यांनी ते केले. कौतुक याचे की, कार्यक्रम आटोपत आला असताही त्यांनी कामगारांचा प्रश्न म्हणून माझी विनंती मानली.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात चालू होती. त्याच वेळी द्विभाषिक राज्य चालविण्याची तारेवरची कसरत यशवंतरावांना करावी लागत होती. संयुक्त महाराष्ट्र त्यांनाही व्हायला हवा होता म्हणून त्यासाठी चळवळ करणारांबद्दल त्यांच्या मनात कटुता नव्हती व त्यांच्याही मनात काँग्रेसबद्दल कटुता न यावी म्हणून यशवंतराव शर्थीने प्रयत्न करीत होते. एस्. एम्. जोशी, डांगे इ. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालवणारांना त्यांच्या मुलाखतीसाठी दार प्रथम खुले व्हावयाचे. मग त्यासाठी काँग्रेस आमदारांना तिष्ठत रहावे लागले तरी तेही यशवंतराव करीत. याच काळात मजदूर सभेने एस्. टी. कामगारांत मान्यतेसाठी अर्ज केला होता

व फेडरेशन बहुमतात गेल्याने फेडरेशनची मान्यताप्राप्त युनियन एस्.टी.त होती. पण कटुता येऊ नये म्हणून यशवंतरावांनी मजदूर सभेतर्फे एस्. एम्. जोशी आले व त्यांच्याशी बोलणी करून त्यांनी एक मागणीचे मान्यतेचे अभिवचन दिले. मला ते समजताच मी त्यांच्याकडे गेलो व त्यांना सांगितले, फेडरेशन हे मान्यताप्राप्त युनियन असता तुम्ही एस्. एम्. ना मागणी मान्य म्हणून कसे सांगितलेत? हे कायदेशीर व नीतिदृष्ट्याही बरोबर झाले नाही.” त्यांनी न रागावता एस्. एम्. बरोबर झालेल्या बोलण्याची पार्श्वभूमी सांगितली व कोणत्या परिस्थितीत त्यांना होकार दिला ते समजावून सांगितले. तरीही मी त्यांना म्हटलेच, पण हे बरोबर झाले नाही. तेव्हा ते हसले व माझ्या पाठीवर थाप मारून म्हणाले,” “Noted for the future.”

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या मोरारजीभाईंच्या मंत्रिमंडळात यशवंतराव व नानासाहेब कुंटे हे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. त्या वेळेस मी धुळ्यास राहात होतो. माझी वास्तव्याची जागा अगदीच बेकार होती. तरीपण त्या जागेत मी त्यांना चहाचे आमंत्रण दिले. दोघांनी ते स्वीकारले. दोघेही माझे बालमित्र. माझ्या जागेत माडीवर येण्यासाठी त्यांना खालच्या मजल्यावरील हॉटेलातून यावे लागे. दोघांनीही संकोच मानला नाही. मलाच संकोच वाटत होता. चहापाणी झाल्यावर यशवंतराव माझ्या आईच्या पाया पडले. आईला दिसत नव्हते, म्हणून ते म्हणाले, “आई, मी यशवंता नमस्कार करतोय्.” आई नेहमीप्रमाणे ‘औक्षवंत हो’ असा आशीर्वाद देऊन पुढे म्हणाली, “अरे यशवंता आमच्या राजाला मुंबईत जागा दे की रे मिळवून तुझ्याकडे आहे ना ते खाते?” यशवंतरावाचा एकेरी उल्लेख ऐकूनही यत्किंचितही नाराज न होता यशवंतराव म्हणाले “पाहीन हं मी, मुंबईला गेल्यावर !”

ते गेल्यावर मी आईला म्हटले, “अग आई, तू त्यांना ‘यशवंता’ म्हणून एकेरी अशी हाक मारलीस?” आई म्हणाली, “तुम्हाला झाला असेल तो यशवंतराव. मला मात्र तो यशवंताच आहे.” पुढे यशवंतरावांजवळ हे

सांगितल्यावर ते म्हणाले, “तुझ्या आईचं बापू काही चुकलं नाही. तिला मी अजून यशवंताच आहे. त्यात आपुलकी आहे. उलट तिने मला यशवंतराव म्हटले असते तर मला बरे नसते वाटले.”

आणखी एका प्रसंगी मी काँग्रेस भवनमध्ये राहात असता तेथे मुख्यमंत्री असता यशवंतराव आले होते. मी तिथे राहातो म्हणताच ते आत आले व त्याही वेळी त्यांनी आईला वाकून नमस्कार केला. आईनं आशीर्वाद दिला होता, “लोकांसाठी असाच मोठा हो.” महाराष्ट्राच्या आदरास पात्र झालेला एका राज्याचा हा मुख्यमंत्री माझ्या आईला वाकून नमस्कार करताना पाहून मी भारावून गेलो होतो.

यशवंतराव व भाऊसाहेब हिरे हे दोघेही सुरुवातीस संयुक्त महाराष्ट्र व्हावा या मताचे होते. त्यासाठी सर्वपक्षीय संयुक्त महाराष्ट्र समितीतही काँग्रेसला त्यांनी सामील केले होते. पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला त्या वेळी पं. नेहरू व इतर काँग्रेस श्रेष्ठी तितकेसे अनुकूल नव्हते. त्यामुळे शेवटी यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतून अंग काढून घेतले व फलटण येथील मेळाव्यात ‘नेहरू आमचे नेते व ते सांगतील ते मी ऐकेन’ अशी घोषणा केली. भाऊसाहेब हिरे यांना ती तितकीशी पटली नाही. परंतु त्यांनी विरूद्ध जाऊन बंड केले नाही. पण मनोमनी ते त्या घोषणेच्या विरोधात होते. यशवंतरावही संयुक्त महाराष्ट्र व्हावा या मताचे होते, पण काँग्रेसश्रेष्ठींच्या मनाविरूद्ध  जाऊन व बंड करून तो मिळवावा असे त्यांना वाटत नव्हते.

या वादातून शेवटी द्विभाषिक राज्य आले. गुजरात व महाराष्ट्र एक राहिले. कर्नाटक मुंबई प्रांतातून वेगळा झाला.त्या द्विभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून हिरे यांनी निवडणूक लढवावयाचे ठरवले. त्यामुळे श्री. मोरारजी भाईंनी माघार घेतली. तेव्हा यशवंतराव उभे राहिले व गुजरात आणि विदर्भाच्या मतावर निवडून आले. तेव्हापासून चव्हाण व हिरे असे दोन विचारसरणीचे गट जणू काँग्रेसमध्ये निर्माण झाले. विशेषतः नाशिक

जिल्ह्यात वसंतराव नाईक हे भाऊसाहेबांचा द्वेष करीत अशी त्यांची वागणूक असे.

या काळातच हिरे यांच्या कन्येचे लग्न ठरले. विवाहसमारंभ मालेगावात व्हायचा होता. त्यामुळे समारंभ इतमामाने व थाटाने साजरा व्हायचा होता. या समारंभाचे आग्रहाचे आमंत्रण हिरे यांनी यशवंतरावांना दिले व यशवंतरावांनी त्या समारंभास उपस्थित राहायचे असे ठरवले. ही बातमी वसंतराव नाईक इत्यादी लोकांना कळल्याबरोबर त्यांनी ताबडतोब यशवंतरावांकडे धाव घेतली व सांगितले, “काय वाट्टेल ते झाले तरी या समारंभाला तुम्ही येऊ नका. त्याचा फायदा भाऊसाहेब आपले जिल्ह्यातील वजन वाढविण्याकरता करतील. सध्या मंत्रिमंडळात नसल्याने त्यांचे वजन बरेच कमी झाले आहे. पण आपण आल्याने ते वाढेल व आम्हाला ते परवडणार नाही.” पण हे ऐकूनही यशवंतरावांनी विवाह समारंभाला उपस्थित राहायचे नक्की केले.

त्यानुसार समारंभाला ते आले. समारंभाला खूप लोक जमले होते. यशवंतराव आल्याने सर्वांनाच बरे वाटले. भाऊसाहेबांना खूप आनंद झाला. मीही या समारंभास गेलो होतो. यशवंतरावांची भेट झाली, तेव्हा मी विचारले. “तुम्ही आलात म्हणायचे समारंभाला” यशवंतराव म्हणाले, “का? असे का म्हणतोस?” मी म्हटले, तुम्ही या समारंभास येणार नाही असा जोरात प्रचार या बाजूस चालला होता म्हणून म्हटले. यशवंतराव त्यावर म्हणाले, “हे बघ बापू, माझे व भाऊसाहेबांचे मतभेद आहेत हे खरे. पण ते राजकीय पातळीवर आहेत. वैयक्तिक त्यांचे व माझे भांडण थोडेच आहे ? विवाहसमारंभ हा खासगी समारंभ आहे. त्याला हजर राहण्याआड मी राजकीय मतभेत का आणू ? ही माझी नीती नाही . वागण्याची पद्धत नाही. त्यामुळे नाशिकच्या वसंतराव वगैरेंनी मी स्पष्ट सांगितले व मी हजर राहणारच असे स्पष्ट केले. याचा राजकीय वजन वाढविण्यासाठी भाऊसाहेब फायदा घेतील असे मला वाटत नाही.”

मी मनात म्हटले, “काय या माणसाचे थोर विचार आहेत. राजकीय मतभेद वैयक्तिक संबंधा आड येऊ देऊ नयेत हा पायंडा सर्वांनीच पाळला तर किती चांगले होईल.”

आपल्या जीवनात यशवंतरावांनी ही नीती पाळली व त्यामुळे द्विभाषिक राबवतानाही त्यांनी विरोधकांशी चांगले संबंध राखले. परस्परांत कटुता येऊ दिली नाही. आज देशातील सर्वच राजकारणी जर असे वागतील व ही नीती पाळतील तर राष्ट्रीय एकात्मतेला तो मोठा भक्कम आधार होईल असे वाटते.

## व्यंकटराव पवार
## स्मृती जयाची चैतन्य फुले!

गेल्या चार तपांचा यशवंतराव यांचा नि माझा सार्वजनिक जीवनातला कृष्णा कोयनेच्या प्रीतीसंगमासारखा, त्याच परिसरातला घनिष्ठ संबंध. स्वातंत्र्यपूर्वकालात, घराघरात कॉंग्रेसचा संदेश भिडवून, जनजागृतीत आम्ही गढलो होतो. आमच्या संबंधाविषयी, त्या भागाचे स्वातंत्र्यसैनिक श्री.पांडुरंग पुजारी, माझ्या एकसष्टीनिमित्त लिहिताना म्हणतात, "सातारा जिल्ह्याच्या जडणघडणीनं मा. यशवंतरावजी व मा. व्यंकटरावजी ही रामक्ष्मणाची जोडी स्वतःचे कर्तृत्वाने जनतेच्या हृदयसिंहासनावर आरूढ होती. दोघेही स्वातंत्र्य संग्रामात बिनीचे स्वार ठरले. दोघांच्याही प्रतिमा एवढ्या एकरूप झाल्या की, पुण्या – मुंबईचे वृत्तपत्रांतून काही वेळा व्यंकटराव चव्हाण व यशवंतराव पवार असा उल्लेख झाला !"

असे दृढ संबंधाचे सन्मित्र यशवंतराव देवाघरी गेल्याने उत्पन्न झालेली हुरहूर व विषण्णता आजही ताजी आहे.

### पंधरा वर्षाच्या तरूणाने ग्रामे चेतवली

देशात गोऱ्या साहेबाचा सुलतानी वरवंटा चालू होता. त्याविरूद्ध अनेक राष्ट्रभक्तांची स्वातंत्र्य संग्रामात आहुती पडलेली पाहून आमचा हा पंधराविशीतला मित्र अस्वस्थ झाला. त्याला राष्ट्रप्रेमाने झपाटले. दहावीस सवंगड्यांसह 'तिरंगा' खांद्यावर घेऊन, निद्रिस्त ग्रामे तो चेतवीत, पेटवीत होता. सातारा जिल्ह्यात प्रतिष्ठितजन, कूपरशाहीच्या दावणीस जुंपलेला ! बहुंजनसमाजवादी समाजप्रबोधनाच्या चळवळीचा जोर होता. कॉंग्रेस पांढरपेशांच्या छत्राखाली होती. अशा प्रतिकूल वातावरणात, प्रस्थापितांचा एकेक बुरूज कॉंग्रेस विचाराचा, कृतीचा,

सुरूंग लावून ढासळून टाकणारा हा तरुण म्हणजेच, आम्हा तरणांचे पंचप्राण "यशवंतराव!"

## तो ऐतिहासिक संवाद व परिवर्तन

संयुक्त महाराष्ट्राच्या सथापनेसाठी मी धडपडत होतो. त्यासाठी, मुंबई विधिमंडळात ठराव मांडून, सारे अडसर बाजूस नेऊन, तो संमत करून घेण्यात यश मिळवले.

दिल्लीत काँग्रेस श्रेष्ठींच्या शंका दूर करण्यात खासदारांबरोबर खटपट केली. राज्यात, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन जोरात चालू झाले. त्यात गोळीबारात अनेक हुतात्मे झाले. प्रतापगडावर शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान जवाहरलालजींनी केले. एवढे रामायण घडूनही, महाराष्ट्रावर द्विभाषिक लादल्याने मी हताश होऊन, १ ऑगस्ट १९५९ ला, काँग्रेसचा राजीनामा दिला.

त्यामुळे मुख्यमंत्री यशवंतराव अस्वस्थ झाले. कराड सांगलीस, विद्युत संदेश थडकले :

“आबांना मुंबईस घेऊन या.”

सहकारी मित्रासमवेत सह्याद्रीवर पोहोचलो. मला पाहताच “साहेबांनी” मिठीच मारली. “दिवाणखान्यात विश्रांती घ्या, विसाव्यानंतर बोलू” असे म्हणाले.

मुख्य समस्येबाबत सायंकाळच्या भेटीत झालेला संवाद असा –

यशवंतराव :- “काय, आबा, तब्येत ठीक आहे ना?”

मी :- “शारीरिक तब्येत ठीक, पण...”

यशवंतराव :- “अहो, तेच मला जाणायचे आहे”.

मी :- “हे बघा साहेब, संयुक्त महाराष्ट्राविषयीचा माझा ध्यास तुम्हाला ठाऊक आहेच.”

यशवंतराव :- “तो मला चांगला ज्ञात आहे पण मग?”

मी :- “ते स्वप्न साकार होण्याचे दृष्टिपथात नाही.”

यशवंतराव :- “एवढी विफलता, निराशा, कशाकरता?”
मी :- आमची एवढी धडपड, प्रक्षुब्ध जनमत, पण तरीही श्रेष्ठींची शंका दूर होत नाही !
यशवंतराव :- तरीही पण तिथेच दार ठोठवायला नको का? तुम्ही व आपल्या लोकांनी काँग्रेस सोडण्याने, हे कसे जमणार ?
मी :- हा कौल काँग्रेस श्रेष्ठींना कसा लागणार ?
यशवंतराव :- संयम राखा, जरूर लागेल; असे भावनाविवश होऊन गोष्टी घडत नसतात. मनातले संशयी विचार जरा झाडले पाहिजेत. या वेळी, यशवंतरावांचा चेहरा अर्थपूर्ण, बोलका भासला. त्यात दृढ आत्मविश्वासही होता. त्यांच्या या ठाम बोलण्याने, माझ्या मनात संभ्रम निर्माण केला. माझ्या मनाची चलबिचल, न्याहाळीत यशवंतराव म्हणाले,
“काय आबा, विचारभ्रमणात गुरफटलात की काय?”
मी :- “डोक्यांत काहूर भेडसावीत आहे. भूतभविष्याचे चित्र डोकावत होते. ध्येयवेडे तरुण म्हणून, स्वतःला काँग्रेसमध्ये आपण झोकून दिले. काँग्रेसची बांधिलकी निष्ठेने पाळली. स्वातंत्र्य संग्रामात उड्या टाकल्या. स्वातंत्र्यानंतरही काँग्रेस माउलीशी निष्ठावंत, पूर्णपणे सश्रद्ध राहिलो. आपली महाराष्ट्र काँग्रेसही आग्रही आहे. पण, दिल्ली दरबार काही जमतच नाही.”
यशवंतराव :- ही समस्या सुटण्याचा पर्यायी मार्ग सांगाल?
मी :- मी त्याबाबत गोंधळात आहे खरा!
यशवंतराव :- कोणतीही समस्या आस्ते कदम सुटते. काळ, काम, वेग निर्णायक होत असतो. योग्य संधीच अशा निरगाठी सोडवू शकतात. विवेक हवा, गुन्ता नको, संयम पाळा, आज-उद्या इष्ट फलप्राप्ती होईलच.”

यशवंतरावांचे हे मनीचे उस्फूर्त बोल, माझ्या अंतःकरणात भिडले. सह्याद्रीच्या-या सवाई सर्जाचा “शब्द” जणू इतिहासातील रायबाचाच वाटला. ज जागृती येऊन म्हणालो, “साहेब, हे सर्व खरं, काँग्रेसविना

पर्याय नाही. तुमची अढळ नेहरूनिष्ठा! पण,महाराष्ट्रातील जनसागर सध्या उफाळला आहे. आपण,मात्र, या झंझावाती वादळासमोर पहाडासारखे खंबीर उभे आहात. आम्ही तुमच्या पाठीशी खडे आहोत. पण, या चक्रव्यूहातून ध्येयसिद्धी कशी होणार ?"

यशवंतराव म्हणाले, "हताश होऊ नका माझा विश्वास माझ्या मार्गावर आहे, प्रयत्नावर व विचारावर ठाम आहे. एक दिवस तुम्ही सारेजण, मला धन्यवाद द्याल !"

माझी निरुत्तरता वाढली.साहेबांची मुत्सद्देगिरी,कुशलता व कर्तृत्व मी जाणत होतो. लोकमत पाठीशी घेऊन, एखादा ऐन मोका गाठून दान पदरी पाडून घेतील अशी खात्री वाटू लागली. मला धीर आला. सर्वांनी सुदाम्याच पोहे खाल्ले ! आनंद प्रकट केला. तेव्हा, प्रसन्न मनाने यशवंतराव म्हणाले,

"काय आबा, आपण उभयता कृष्णा कोयनेच्या प्रीतीसंगमावरचे. कोयना रूसून कृष्णेला व समुद्राला मिळणार नाही, असं थोडंच घडतं ?" सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद प्रकट झाला.

मी स्वगृही परतलो. "पुनश्चहरिःओम्" म्हणत काँग्रेसचे कार्य पाहू लागलो.

## अखेरची शुभकामना

यशवंतरावांचे व माझे केवळ राजकीय नाते नव्हते. त्यात बंधुभावाचा स्नेहरज्जू होता. प्रत्येक वाढदिनी, दिवाळी पाडव्याला, नूतन वर्षाच्या शुभेच्छा पाठवत असे. १२ मार्च १९८४ ला, त्यांच्या वाढदिनी 'जीवेत शरदः शतम्' अशा प्रार्थनेचा शुभसंदेश धाडला. त्याला २२ मार्च १९८४ ला नव्या दिल्लीहून प्रतिसाद मिळाला. "आपले प्रेम व सदिच्छा यांचा ठेवा मी सतत जतन करीन." हाच शेवटचा पत्रव्यवहार! १९८५ चा वाढदिन

उगवला. पोटात कालवाकालव झाली. “दीर्घायुष्य लाभो” हा सद्भाव कुठे व कसा पोहोचणार?

विचाराने ‘यशवंतराव चव्हाण अमर रहे’ हीच यापुढे त्यांना भावरूप आदरांजली. त्यांच्या स्मृतीला कोटीकोटी प्रमाण !

# नीळकंठराव कल्याणी
# मित्र, मार्गदर्शक, वडीलबंधू

"कोयना भागात पुन्हा भूकंप झाला", असे कुणी सांगितले असते तर मी जेवढा हादरलो नसतो तेवढा माझे मित्र, मार्गदर्शक स्फूर्तिस्थान आणि सर्वाधार यशवंतराव चव्हाण गेले, या वार्तेने हादरलो. मन सुन्न झाले. बुद्धी विचार करेनाशी झाली. वाटले, जणू सारे थांबले ! ठप्प झाले ! भावुक मन ही वार्ता खोटी असेल असे सांगत होते. कारण यांच्या आजाराची कल्पनाच नव्हती. एक-दोन दिवसांत ते इकडे येणार, निवडणुकीसाठी अर्ज भरणार, पुण्याला एस. एम. जोशी यांच्या गौरवार्थ बोलणार, हे सारे काही ठरलेले होते. पण नियतीने काही निराळेच ठरविले, ते कोणास कळणार ?

यशवंतरावजी गेले. महाराष्ट्राचे आणि देशाचे किती नुकसान झाले, हे लवकर कळणार नाही. भूकंपाचे परिणाम लगेच मोजता येत नाहीत. पुर्वानुभवाने अंदाज करता येतो. इतरांना ज्ञात असलेला त्यांच्या राजकीय जीवनापेक्षा अनेक क्षेत्रांची त्यांच्या जाण्याने हानी झालेली आहे. मी तर त्यांना लहानपणापासून पाहतो, ओळखतो, मानतो. त्यांच्या राजकीय लढाया ते कशा दमदारपणे लढले, त्याचा मी अलिप्त साक्षीदार आहे.

आम्हा कारखानदार-व्यापाऱ्यांना एखादे राज्य वा राष्ट्रच काय, देशपरदेशही आपले क्षेत्र वाटतात. कारखानदारांचे हात एखाद्या ऑक्टोपससाखे आम्ही सर्वत्र पसरतो. पण त्यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा लाभ आपल्या देशबांधवांना झाला पाहिजे, ही दृष्टी खऱ्या राजकारणी नेत्याची असते. ती यशवंतरावजींची होती. स्वातंत्र्य, भाषिक राज्य हे कारखानदारी वाढविण्यासाठी साधन आणि त्यामुळे उत्पन्न होणारी समृद्धी हे इतरांचे लाभ, अशी दृष्टी असणाऱ्या निवडक नेत्यांत यशवंतरावांचे स्थान फार फार वरच्या क्रमांकावर होते. प्रसिद्ध उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर त्यांना आदरांजली वाहताना म्हणाले, की त्या

परिसरात सुरू झालेल्या कारखान्यांना या द्रष्ट्या नेत्याकडून अमोल मार्गदर्शन मिळाले.

शंतनुरावजींचा हा अभिप्राय गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात वाढलेल्या सर्वच कारखानदारांनी व्यक्त करावा, असा प्रातिनिधिक आहे. "भारत फोर्ज" हे त्याच द्रष्ट्या नेत्याचे, मित्राचे स्वप्न! ते आमच्या हातून साकार झाले, एवढेच.

त्यांच्या नजरेला भारत आणि महाराष्ट्र, विशेषतः त्यांचा लाडका महाराष्ट्र, सर्वांगाने परिपूर्ण असावा, अशी त्यांची विशाल, अथांग दृष्टी होती. संघर्षाऐवजी समन्वयाने महाराष्ट्र निर्मिती साध्य केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील शेती, शिक्षण, कलाक्षेत्र, सामाजिक स्वास्थ्य या सर्व गोष्टींकडे एकदम लक्ष देण्यास सुरुवात केली. शेती मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी सहकारी क्षेत्रात सुरू करण्याने आज महाराष्ट्राचा ग्रामीण भाग उद्धरून गेला. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीशिवाय त्याच्या जवळ तारण देण्यास काहीही नाही, अशा शेतकऱ्याला "लँड मॉर्गेज" ठेवून कर्ज देणारी ही प्राथमिक सुविधा आता शेतीविकासासाठी, नव्या पिकासाठी, पाणी-पुरवठ्यासाठी, कर्ज देणारी लँड डेव्हलपमेंट बँक बनली. हे श्रेय यशवंतरावजींच्या क्षितिजाला पोहोचलेल्या विशाल नजरेला आहे. कऱ्हाड, सांगली, कोल्हापूर भागातला ऊस, गूळ, हळद खरेदी-विक्री हा तर माझ्या कुटुंबाचाच उद्योग. त्यातले चढउतार मी पाहिले आहेत. त्या उसाचा साखर कारखाना उद्योगही महाराष्ट्रालाच नव्हे, देशाला माझ्या या थोर मित्राची देणगी आहे. त्याच वेळी सांगलीच्या परिसरात साखर उद्योगात निर्माण होणारी सुबत्ता कवठेमहांकाळसारख्या बिनपाण्याच्या, दुष्काळी भागात इतर साधनांनी पोहोचली पाहिजे, हा त्यांचा प्रेमळ इशाराही ऐकावा लागतो.

महाराष्ट्राचे साहित्यक्षेत्र, नाटक, सिनेमा, लोकनाट्याचे क्षेत्र, कोल्हापुरात जपलेली कुस्तीची कला या साऱ्यांचा यशवंतरावांना केवढा अभिमान. महाराष्ट्राचे दैवत शिवराय आणि देवता तुळजाभवानी यांच्यावर

त्यांची नितांत श्रद्धा, निष्ठा. अनेक क्षेत्रात सारख्याच सहजतेने वावरणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व त्यांना लाभले होते आणि म्हणूनच हा सह्याद्रीच्या कुशीतला शिलेदार भारताच्या सीमारक्षणाला गेला. तेथेही चमकला, मान्यता पावला. पं. नेहरूंनी ज्या विश्वासाने त्यांना दिल्लीत बोलाविले तो विश्वास त्यांनी संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र अशी तोलामोलाची खाती सारख्याच यशस्वितेने सांभाळून सार्थ केला. ते भारताचे नेते ठरले. एक उत्कृष्ट प्रशासक, कर्तबगार मुत्सद्दी, अबोल शांतता संस्थापक, तयारीचा संसदपटू, संसदीय लोकशाहीचा निस्सीम निष्ठावान असा थोर राजकारणी गेला. माझ्या पिताजींच्या निधनाने झाले त्यापेक्षाही यशवंतरावजींच्या जाण्याने माझे वैयक्तिक नुकसान जास्त झाले असे मी म्हणेन. महाराष्ट्राचे तर नुकसान झालेच. पण देश एका विलक्षण अडचणीच्या अस्थिर परिस्थितीतून जात असताना झालेले त्यांचे निधन हा नियतीचा क्रूर घालाच म्हणावा लागेल. या भूकंपाचे परिणाम पूर्ण लक्षात येण्यासाठी बराच काळ लागेल.

## तात्यासाहेब कोरे
## यशवंतराव-एक जिवलग मित्र

माझे आणि यशवंतरावांचे मैत्रीचे संबंध १९३० सालापासूनचे आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीच्या चलवळीत भूमिगत असताना ते आमच्या डागमळ्यात अधूनमधून राहात असत. त्यांच्याशी माझे संबंध जिव्हाळ्याचे व कौटुंबिक स्वरूपाचे होते. त्यांच्या आचरणामध्ये देशभक्तीप्रमाणेच सामाजिक कर्तव्याची जाणीव होती. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या कार्यकर्त्यांना ते आपलेपणाने व प्रेमाने वागवीत असत. त्यांच्यासमोर कृषी औद्योगिक समाजव्यवस्थेचे भव्यदिव्य स्वप्न होते आणि म्हणून अशा प्रकारे समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी व ग्रामीण भागाचा विकास करण्याचा पाया महाराष्ट्रामध्ये प्रथम यशवंतरावांनी घातला असे जर म्हटले तर वावगे होणार नाही.

वारणा सहकारी साखर कारखान्याची उभारणी करताना तो रजिस्टर झाल्यापासून ते कारखाना उभारणीपर्यंत वेळोवेळी ज्या समस्या, अडचणी आमच्यापुढे आल्या त्या सोडविण्यासाठी यशवंतरावांची आम्हास फार मोठी मदत झाली आहे. या ठिकाणी उदाहरणादाखल एका गोष्टीचा उल्लेख करतो.

वारणा सहकारी साखर कारखान्याचे चाचणी हंगामात दि. २ फेब्रुवारी १९६० ला कारखान्याच्या मेन टर्बाइनमध्ये आकस्मिक बिघाड झाल्याने कारखाना बंद ठेवणे भाग पडले. हा बिघाड दूर करण्यासाठी जर्मन तज्ज्ञांना बोलावून टर्बाईनची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती टर्बाईनचा रोटर दुरूस्तीसाठी जर्मनीला पाठवावा लागला. हा भाग दुरुस्त होऊन परत मिळण्यास सुमारे पाच आठवड्यांचा कालावधी लागणार होता. आमच्या दृष्टीने ही परीक्षेची वेळ होती. या वेळी कारखान्यात वीजपुरवठा होणे आवश्यक होते. असा वीजपुरवठा

मिळविण्यासाठी आम्ही यशवंतरावांना भेटलो. आमची अडचण व तीव्र तळमळ पाहून यशवंतरावांनी आम्हाला "भले शाब्बास !" म्हटले आणि ज्या वेळी अश्रू ढाळण्याची पाळी आली त्या वेळी "डरो मत !" असे म्हणून थोर दिलासा दिला व महाराष्ट्र वीज बोर्डाकडून कारखाना चालू राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा केला. त्यांचे उपकार आमचा कारखाना कधीही विसरू शकत नाही.

यशवंतराव म्हणजे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. समृद्ध महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी कृषी औद्योगिक समाजरचनेचे महत्त्व त्यांनी वेळोवेळी सांगितले. वारणा सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी यशवंतराव व सौ. वेणूताई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्या वेळी त्यांनी वारणा परिसरात असा कारखाना उभा राहात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि या कारखान्याने वारणा परिसराचे भविष्य निश्चित उज्ज्वल होईल असा विश्वासही प्रकट केला. या विश्वासाबरोबरच समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या वर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी हा कारखाना सहाय्यभूत व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

यशवंतरावांच्या सार्थ अपेक्षेनुसार मी व माझे सहकारी सामाजिक कर्तव्याच्या व बांधिलकीच्या जाणिवेने आजवर समाजसेवेचे कार्य करीत राहिलो आहो. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व औद्योगिक क्षेत्रात आज वारणानगरचा व या विभागाचा नावलौकिक सर्व देशभर होऊन राहिला आहे हे नमूद करण्यास मला स्वाभिमानयुक्त आनंद वाटत आहे. तो यापुढेही राहील याबद्दल तिळमात्र शंका नाही. महाराष्ट्रातील सहकार चळवळीला मूर्त स्वरूप देण्यामध्ये यशवंतवरावांचा सिंहाचा वाटा होता. सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात व श्रमजीवी वर्गाचा जो विकास झाला आहे त्याचे श्रेय यशवंतरावांनाच आहे.

महाराष्ट्र राज्याचा जो विकास आपल्यास आज दिसत आहे तो यशवंतरावांच्या प्रेरणेने झालेला आहे. कृषी, उद्योग, सहकार व ग्रामीण

विकास या सूत्रानेच आपल्याला या देशातील दारिद्य नाहीसे करता येईल. पण याकरिता आत्मीयतेने, तळमळीने, अभ्यासयुक्त दृष्टीने व ध्येयवेडेपणाने परिश्रमपूर्वक प्रयत्न करण्याची नितांत गरज असते. अशा निष्ठेने काम करणाऱ्या. सामान्य कार्यकर्त्यांचे स्फूर्तिस्थान आमचे यशवंतराव होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या विचारांचा सतत पाठपुरावा करून कार्यरत राहणे हीच खरी आठवण ठरेल असे मी मानतो.

# वि. स. पागे
# न मातु : पर दैवतम्

"संस्कारक्षम मन असणे ही देणगी नियतीची" असे यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या "ऋणानुबंध" या आत्मचरित्रात एके ठिकाणी म्हटले आहे. परंतु ही देणगी त्यांना मुळातच लाभली होती त्यांच्या आईकडून-विठाईकडून. यशवंतरावांच्या जन्माच्या वेळी त्यांची आई बेशुद्ध झाली होती. देवराष्ट्र हे छोटेसे खेडे. औषधपाण्याची सोय नाही. विठाईच्या आईने सागरोबावर हवाला ठेवला आणि त्याला विनविले की, "अक्काला जगविण्यात मला यश दे. तुझी आठवण म्हणून त्याचे नाव 'यशवंत' ठेवीन." सागरोबाने त्यांची हाक ऐकली म्हणून मुलाचे नाव 'यशवंत' ठेवले. आपल्या आत्मचरित्रात या प्रसंगाची माहिती देऊन त्यांनी पुढे लिहिले आहे की, "आईच्या प्राणाची साक्ष म्हणून माझे नाव आहे हे मला कळल्यापासून आई हाच माझा प्राण बनला."

विठाई एकदा आजारी पडल्या. इतक्या की दुसऱ्या दिवशीची सकाळ त्या पाहतात की नाही याची खात्री देता येत नव्हती. यशवंतरावांनी मुंबईहून खास डॉक्टर आणले होते. सर्वांचे एकमत झाले की, त्यांना जर अँटीबायोटेक्सची इंजेक्शने दिली तर जगण्याची काहीतरी आशा आहे. परंतु विठाईच्या अस्थिपंजर देहाकडे पाहूनही त्यांना इंजेक्शने देण्याची आवश्यकता यशवंतरावांना पटवून देण्याचे धैर्य कोणालाही होईना. या प्रसंगी मी तेथेच होतो. तेव्हा सर्वांनी ही गोष्ट यशवंतरावांना पटवून देण्याची कामगिरी माझ्यावर सोपविली. मी यशवंतरावांना अनेक प्रकारे समजावून सांगितले, परंतु आपल्या आईच्या दुःखात आणखी इंजेक्शनच्या सुयांची भर घालण्याचे त्यांनी प्रथम नाकारले. परंतु विठाईची तब्येत आणखीच खालावली जात असल्याचे त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर मोठ्या नाइलाजाने, पहाटे एक वाजता, त्यांनी इंजेक्शने

देण्याची परवानगी दिली. डॉक्टरांनी भराभर योग्य ती इंजेक्शने दिली व थोड्याच वेळात विठाईने भिवया हलविल्या. डॉक्टरांनी मला सांगितले की, "औषधांना प्रतिसाद मिळाला." थोड्याच वेळात आई शुद्धीवर आल्या. त्या वेळी यशवंतरावांनी "आईऽऽ" म्हणून मोठ्या प्रेमाने त्यांना मिठी मारली. हे दृश्य इतके हृदय हेलावणारे होते की, तिथे जमलेल्या प्रत्येकाने आपापल्या डोळ्यांना रुमाल लावले.

असे हे यशवंतरावांचे मातृप्रेम!

## बा. म. गोगटे
## माझे स्नेही यशवंतराव

सकाळचे ११-३० वाजले होते. कराड येथील टिळक हायस्कूलमधील पाचव्या इयत्तेचे वर्गशिक्षक आपला धडा विद्यार्थ्यांना समजावून सांगत होते. तेवढ्यात हायस्कूलच्या आवरात एक मोठा जमाव आला. "महात्मा गांधी की जय" च्या घोषणा ऐकू येऊ लागल्या. खेटूनच बसलेल्या एका मुलाने हळूच चिमटा घेतला व खूण केली. "महात्मा गांधी की जय" अशा घोषणा देत तो वर्गाबाहेर गेला. खूप मोठ्याने घोषणा देऊ लागला. निमिषार्धात हायस्कूलमधील सर्व मुले वर्ग सोडून बाहेर आली. त्यांतील चिमटा घेऊन खूण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थाने समोरच्या लिंबाच्या झाडावर चपळाईने झेप घेतली व झाडाच्या शेंड्यावर राष्ट्रीय निशाण फडकाविले. सर्वांनी जयघोष केला व तेथेच मोठी सभा घेऊन आमच्या मित्राने धडाडीने उत्कृष्ट भाषण करून त्या वेळेचे वातावरण भारून टाकले. त्याचा तरुण मनावर परिणाम झाला. सर्वांच्या मनात राष्ट्रप्रेमाचा स्फुलिंग जागृत केला. त्या तरुणांनी या आमच्या मित्राला आपला नेता मानला. तो मित्र म्हणजेच यशवंतराव चव्हाण, ज्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राचा रथ समर्थपणे हाकला. केंद्रशासनात संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री म्हणून विविध पदे भूषवून आपल्या तडफदार कार्याचा ठसा तेथे उमटविला व आपल्या कार्यकुशलतेने, मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी भारतीय राजकारणात मानाचे स्थान पटकावले. त्याच सुमारास कराडला सत्यशोधक म्हणजेच ब्राम्हणेतर चळवळीचे वारे वाहात होते. आमच्या मागील गल्लीला डुबल आळी म्हणत. तेथे मान्यवर मराठा मंडळींच्या सत्यशोधक समाजाच्या बैठकी होऊन, गावात पुष्कळ ठिकाणी ब्राम्हणेतर चळवळ मोठ्या प्रमाणात फोफावणार अशी हवा निर्माण झाली होती.

आमच्या तरुण मित्राच्या मनावरही त्या चळवळीचे वारे वाहू लागतील असे वाटले होते. परंतु स्वतंत्र विचारांच्या मित्राने एवढ्या लहानपणीच महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू इत्यादी राष्ट्रीय पुढाऱ्यांची भाषणे ऐकल्यामुळे व वाचल्यामळे सत्यशोधक समाजाची चळवळ संकुचित स्वरूपाची आहे असे मनाने ठरविले व राष्ट्रीय चळवळीत सामील झाल्यास आम जनतेचा उद्धार व कायापालट होईल अशी त्याची खात्री पटली. त्याने सर्व बाजूंनी परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला व राष्ट्रीय चळवळीत जर आपला समाज धडाडीने भाग घेईल तर आपण प्रथम सातारा जिल्ह्यात व नंतर महाराष्ट्रात स्वराज्याची खंबीर चळवळ राष्ट्रीय नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारू अशी खात्री करून घेऊन त्याने राष्ट्रीय चळवळीत जोमाने झेप घेतली. "कृष्णाकाठ" या त्यांच्या आत्मचरित्रात याचा संदर्भ आलेला आहे.

दिवस जात होते. राष्ट्रीय चळवळीचा नेता म्हणून आमचा मित्र आपल्या सवंगड्यांना कार्यकर्ते बनवत होता. सातारा जिल्ह्यात व महाराष्ट्रातील राष्ट्रीय कार्य करणाऱ्या मंडळीत त्यांच्या गुणांची, धडाडीची व कुशल नेतृत्वाची चमक दिसू लागली. तो महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचा सेक्रेटरी झाला.

मुंबई इलाख्यात पहिली निवडणूक झाली. बेळगावहून जीप घेऊन आमच्या टेंभू गावात आठ दिवस मुक्काम केला. निवडणुकीत पाहिजे तेवढे मतदान मिळाले. निवडणूक जिंकल्यावर सौ. वेणूताईने "भाऊजी, तुम्ही सर्वांनी एवढ्या कळकळीने काम केलेत म्हणून हा विजय मिळाला" असे म्हटल्यावर जो हर्ष झाला त्याला तोड नाही.

थोड्याच दिवसांत आमचा मित्र पार्लमेंटरी सेक्रेटरी झाला व तेथून त्यांच्या संसदीय कारकीर्दीची सुरुवात झाली. प्रथम मंत्री, नंतर मुंबई राज्याचा मुख्यमंत्री अशा झेपी घेत घेत एक दिवस पंडितजींच्या निवडीने भारताचा संरक्षणमंत्री व काही दिवसांनी इतरही खात्यांचा मंत्री झाला.

साहित्य, कला व इतर सामाजिक क्षेत्रांत या मित्राने महाराष्ट्रातील विचारवंतांच्या मनावर आपली छाप टाकली.

एक महत्त्वाचे राष्ट्रकार्य या दृष्टीने त्याची योग्यता दिसून आली ती त्याने केलेली महाराष्ट्रातील उद्योगीकरण व अर्थकारण ही होय. स्वराज्य मिळाल्यावर पंडित नेहरूंनी भारताला Mixed Economy म्हणजे संमिश्र अर्थव्यवस्था हा मंत्र दिला. त्यामुळे राष्ट्रातील प्रत्येक घटकास आपल्या परीने राष्ट्रोन्नतीचे काम करण्याची संधी मिळाली.

महाराष्ट्रापुरते हे कार्य आमच्या मित्राने फारच कौशल्याने केले. त्याने फार विचार केला व मनाची निश्चित बैठक बसवली की, ग्रामीण भागात सुबत्ता आणल्याशिवाय या मोठ्या समाजाची उन्नती होणार नाही. म्हणून खेड्यापाड्यातील मंडळींना हे पटवून दिले की, त्यांनी जर कष्ट केले व योग्य रीतीने आपला वाटा उचलला तर स्वराज्याचे सुराज्य होईल. हे काम सहकारी क्षेत्रातूनच होणे शक्य आहे, म्हणून ग्रामीण भागात सहकार चळवळीचे लोण पसरविले.उसाची लागवड करून साखर कारखाने स्थापले व त्यायोगे ग्रामीण भागात सुबत्ता आणली. हा दृष्टीकोण महाराष्ट्रानेच प्रथम अंगीकारला व भारतात प्रथम श्रेणीचे सहकार-क्षेत्रातील स्थान संपादन केले. या आमच्या मित्राने हा नवीन दृष्टिकोण दिला.त्याचप्रमाणे जिल्हा परिषदांची स्थापना करून ग्रामीण नेतृत्त्वाला राष्ट्रीय कार्यात वाव दिला. त्यामुळे आज जे चित्र दिसते त्यात सिंहाचा वाटा आमच्या मित्राचा आहे.

मुंबईत डॉ. बावडेकरांच्या हॉस्पिटलमध्ये मी स्लीप डिस्कच्या वेदनांनी व्याकूळ होतो. हा माझा मित्र परदेशाच्या दौऱ्यावरून दिल्लीस उतरल्यावर माझ्या आजारपणाचे वृत्त त्याने सकाळच्या वर्तमानपत्रात वाचले व लगेच मुंबईत हॉस्पिटलमध्ये येऊन मला भेटला. त्या मित्रप्रेमाची महती काय सांगावी.

प्रत्येक निवडणुकीच्या वेळी मी व सौ. उषा आमच्या मित्राला सातारला भेटण्यासाठी जात असू. जाताना सोबत पूजेचा प्रसाद म्हणून शिरा व

वाटली डाळ नेत असू व भेटल्यानंतर सारेजण ती आनंदाने खात असू. तेव्हा माझा मित्र म्हणायचा, “मधू, तू व उषा माझ्यासाठी हा परमेश्वराचा प्रसादच आणता”. दिल्लीत त्या दिवशी त्याच्या बंगल्यातून हस्तांदोलन करून मी निघताना आठवण होऊन तो म्हणाला, “पुढील आठवड्यात सातारला ‘शुभप्रसाद’ तुम्ही दोघांनी घेऊन यायचं आहे.” पण ते होणेच नव्हते.

# पुरुषोत्तम पांडुरंग गोखले
## भाग्यवंत , शीलवंत, यशवंत !

महाराष्ट्राची अस्मिता भारताच्या सेवेला लावून भारताला जगद्गुरूची स्थिती प्राप्त व्हावी, म्हणून ब्रिटीश रियासतीच्या प्रारंभापासून जे जे लोकमान्य टिळक, ना. गोखले आदी महाभाग झटले त्यांची लोकसंग्रही नेतेपणाची परंपरा चालविणारे गेल्या पंचवीस वर्षांत यशवंतराव एकच पुढारी होते. हे आपल्याला सर्वप्रथम भारतीय मानीत आणि प्रत्येक महाराष्ट्रीयाने तसेच मानून, भारताला जगामध्ये अग्रेसर करावे, अशी त्यांची मनीषा व खटपट असे.

माणसे जोडणे व जोडलेली माणसे विश्वासपूर्वक सांभाळणे हा धडा यशवंतरावांनी आपल्या मातुश्रीपासून घेतला होता. त्यामुळे माणसामाणसांची पारख करून, राजकारणात व समाजकारणात कोणाचा उपयोग किती व केव्हा करून घ्यावयाचा, ही कला यशवंतरावजींना चांगली साधली होती. त्या कलेमुळेच ते अजातशत्रू राहिले. जसे अच्युतराव कोल्हटकर वृत्तपत्रीचे साहेब समजले जात; त्याच धर्तीवर यशवंतराव महाराष्ट्रजीवनाचे साहेब समजले जात. “साहेब कामासी नाही गेला तर कोण पुसे त्याच्या साहेबीला” ते व्रत यशवंतरावांनी पाळले! कऱ्हाडमध्ये इंजिनिअरिंग कॉलेजपासून जी कॉलेज शिक्षणाची सोय झाली, बडोदे संस्थान विलीन झाल्यानंतर कविवर्य यशवंतराव पेंढारकर यांचा “महाराष्ट्रकवी” म्हणून गौरव करून त्यांच्या योगक्षेमाची काळजी यशवंतरावांनी वाहिली, ही त्यांच्या साहेबी सेवेची खास उदाहरणे आहेत.

यशवंतराव मातृभक्त होते. ते वाढत्या वयाबरोबर भारतभक्तही झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबईसह महाराष्ट्र हे धेय्य होते. ते त्यांनी आपल्या धोरणबाजीने दिल्लीच्या मुत्सद्यांना हळूहळू पटवून साध्य केले व

भारतीय नकाशावर महाराष्ट्राचे नाव झळकविले. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राचे राज्य मराठ्यांचे होणार की मराठी होणार, या आशंकेला, यशवंतरावांनी महाराष्ट्राचे राज्य मराठीच होणार, अशी निःशंक ग्वाही दिली.

कारण यशवंतरावांवर त्यांच्या "विठाई" माऊलीने जसे संस्कार केले होते तसे सावरकरपंथीय कळंबे गुरुजींनीही केले होते. फार काय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी  शाहु महाराज, महात्मा फुले यांच्या कामगिरीने यशवंतरावांचे सामाजिक विचार घडले, फुलले, बहरले होते. जातीयतेचा पगडा त्यांना कधीच मान्य नव्हता. कर्मवीर पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेचे ते अनेकानेक वर्षे अध्यक्ष होते ते त्यामुळेच! परिश्रमातून शिक्षण ही कर्मवीरांची स्वाभिमानपोषक भूमिका यशवंतरावांना मान्यच होती. कारण ते अत्यंत गरीब व बिकट परिस्थीतीमध्ये वाढले होते व त्यांनी आगरकरांसारखी पुणे-वक्तृत्वसभेची वगैरे बक्षिसे पटकावून व मित्रांची सहानुभूती साभांळून आपले वकिलीपर्यंतचे शिक्षण संपादले होते.

यशवंतराव उत्तम वाक्पटू होते. त्यांचे विचार अतिशय संयमी, धीरोदात्त व मंत्रमुग्ध करणारे होते. तसे ते कुशल लेखकही होते. त्यांच्या "कृष्णाकाठ" या आत्मवृत्तावरून व त्यांनी प्रसंगोपात लिहिलेल्या लेखांवरून हे स्पष्ट होते. तसेच ते एक रसिक मर्मग्राही होते. मी लिहिलेल्या "अठराशे सत्तावन्नचा महाराष्ट्र" व "जागृत सातारा" याचे कौतुक यांनी मनमोकळेपणाने जाहीररीत्या केले, यावरून माझ्या प्रत्ययाचे आहे. स्वच्छ विचार, विचाराप्रमाणे सदैव सदाचार व यातून पुरोगामित्वाला विज्ञाननिष्ठेची जोड देऊनही त्यांनी भारतीय परंपरांचा आदर शक्य तो राखलाच. तळागाळातील व्यक्तिमत्त्वालाही त्यांची अस्मिता होती आणि सामुदायिक सहकार्याने विधायक चळवळी राष्ट्रहितैषी करणे हे त्यांना आवडीचे कर्तव्य वाटे.अगदी  भूमिगत चळवळीचे मार्गदर्शन करतानाही यशवंतरावांचा हाच दृष्टिकोण होता. त्यामुळेच आपल्या अत्याधुनिक विचाराला, वैदिक पांडित्याला,

अद्ययावत संदर्भ देणारा तत्त्वचिंतक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आपले स्नेहीसोबती केले आणि समन्वयी जीवननिष्ठांचा आदर्श म्हणून महाराष्ट्रात स्वतः आदराला पात्र झाले. या दिशेने जाताना आपली सत्तासंपत्तीची बिरुदावली झटकून, यशवंतराव केव्हाच सामान्यजनांशी समरस होत. कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून काम करताना यशवंतरावांची ही भूमिका सर्वांच्या परिचयाची झाली आहे. यशवंतरावांच्या अंगचा हा विनय परिचितांना त्यांच्या लहाणपणापासूनच प्रत्ययास आला होता. शाळेत शिक्षकाने "तुम्ही होणार कोण ?" असा प्रश्न केला असता यशवंतरावांनी "मी यशवंतराव चव्हाण होणार" हे जे उत्तर दिले होते ते एकलव्याच्या स्वतंत्र वृत्तीचे, स्वावलंबनाचे आणि स्वाभिमानाचे जसे होते तसेच त्यांच्या विनयाचे द्योतकही होते. तो प्रत्यय, त्यांनी १९४६ मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी झाल्यानंतर, त्या वेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना जी विनंती केली होती, तिच्यामध्ये सुद्धा आला होता.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर यशवंतराव महाराष्ट्राच्या व भारताच्या शासनव्यवस्थेत चढत्या-वाढत्या पदवीने वावरले. प्रथम स्थानिक स्वराज्य व पुरवठा मंत्री म्हणून काम पाहात असता महाराष्ट्रात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांनी उमटविला. त्यावर गुजरात महाराष्ट्र राज्याचे सर्वांत तरुण मुख्यमंत्री झाल्यावर दोन्ही प्रदेशांतील जनतेला एकदिलाने सांभाळून सरकारी कारभारात असा वचक बसविला की, महात्मा गांधींच्या इच्छेप्रमाणे स्वराज्य हे शेतकरी-कामकरीसुद्धा सर्वांचे असे जनतेला पटले. त्याचबरोबर भारतात येणाऱ्या परदेशी भेटभाऊंला "यशवंतरावांचे पाणी काही निराळेच आहे" हेही पटले. या सर्व कारभारकुशलतेचा परिणाम म्हणून जवाहरलालांनी यशवंतरावांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत बोलावले. त्या कारकीर्दीत कुशल प्रशासनामुळे चीन व पाकिस्तान बरोबरच्या लढाईत भारतीय सैन्याने पाकिस्तानचा नक्षाच उतरविला ! त्यामुळे भारतीय जनमानसात

यशवंतरावांना त्यांच्या लोकसंपर्काधिष्ठीत धोरणामुळे पुढे पुढे गृह, अर्थ, परराष्ट्र या खात्यांची मंत्रिपदे भूषित करण्याचा योग प्राप्त झाला. त्यायोगे त्यांचे कर्तृत्त्व आणि नेतृत्त्व असे विकसले गेले की, किंचित काळ इंदिरा गांधींशी मतभेद होऊनसुद्धा, यशवंतराव फिरून "स्वगृही" आल्यावर इंदिराजींनी आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्षपद यशवंतरावजींकडे सोपविले.

अशा चढत्या वाढत्या पदवीने यशवंतराव "कीर्ती करून" राहिले असता, ते महाराष्ट्राला व कऱ्हाडला विसरले नाहीत. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी मोलाची कामगिरी करून राष्ट्रीय एकात्मभावाचा विकासच केला. इतकेच काय यशवंतरावांनी ग्रामीण नेतृत्वास पुढे आणले व कृषि औद्योगिक; सहकार्य लोकजीवन समृद्ध व्हावे, यासाठी जागृतीने श्रम केले, कारण त्यांनी राष्ट्रीय एकात्मता परिषदेत सांगितल्याप्रमाणे "सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर केल्याखेरीज राष्ट्रीय एकात्मता साध्य होऊ शकणार नाही" याची खात्री ते बाळगून होते. महाराष्ट्राचे लोकजीवन समतेच्या तत्त्वाने पुढे जावे व न्यावे असे यशवंतरावांना वाटत असे.

साहित्य – संस्कृती संवर्धनासाठी यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्यात एक मंडळ कारभारकुशलतेचा एक भाग म्हणून निर्माण केले. त्याने नवनवीन लेखकांना उत्तेजन दिले आहे. गीतेचे अथवा ज्ञानेश्वरीचे तात्पर्य यशवंतरावांच्या मातेने त्यांना असे सांगितले होते की, मनुष्याने मीपण सोडून आपले विवेकी कर्तव्य करावे. त्याप्रमाणे यशवंतरावांनी त्यांच्या मातेचा उपदेश पाळला. स्वतःचा संसार करूनही आप्तेष्टांचा संसार चालविला व महाराष्ट्रीय गोरगरिबांना मार्गाला लावून धन्यवाद मिळविले.

"कीर्ति करून नाही गेले ते उगाच जन्मले आणि मेले" असे समर्थांनी म्हटले आहे. त्याच्याही पलीकडे जाऊन यशवंतरावांना एकाहत्तराव्या वर्षी मृत्यूने गाठले असता, ते "कीर्तिरूपे उरले आहेत." भारताच्या

स्वातंत्र्यासाठी वेळेला शिक्षणाला फाटा देऊन व कारावास भोगून स्वातंत्र्य सेनानी, संघटनाकुशल म्हणून काँग्रेस संस्था महाराष्ट्रात बलवान करणारे नेते म्हणून आणि शासनातील सत्तापदे भूषवितानासुद्धा त्या सत्तापदांचा व स्वतःच्या मिळविलेल्या संपत्तीचा सदुपयोग समाजातील गरिबांच्या कल्याणासाठी प्रामुख्याने झाला पाहिजे, हे ध्येय ठेवून आपले प्रगल्भ व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या अस्मितेसह भारताच्या सेवेस समर्पणबुद्धीने लावणारे यशवंतराव, अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांचे आधारस्तंभ होते. ते काही मानाला हपापल्यासारखे नव्हते, तर इतिहासाच्या पानापानावर आपल्या सेवासमर्पणाचा ठसा उमटवून पुढीलांना धडा वा पाऊलवाट दाखविण्यासाठी होते. म्हणूनच ते लोकप्रिय होते.

## बाबूराव घोरपडे
## आमचे मित्र यशवंतराव

१९३० साली नांदगावास सत्याग्रही शिबिर सहा महिने चालविले होते. त्या शिबिरात मार्गदर्शन करण्याकरिता नेने, नखातेकर, पाचगणीचे गाडेकर हे वरचेवर येऊन मार्गदर्शन करीत होते. त्याच वेळी जंगल सत्याग्रह केला गेला. त्यात मी, व माझे बंधू बाळकृष्ण घोरपडे, प्रामुख्याने होतो. नंतर गावातील लोक याच चळवळीत शिरू लागले. त्यात वरील दोघांचे नंतर सर्वच गाव चळवळीत उतरला. सन १९३९ साली ब्रिटिशांनी सैन्यभरतीस विरोध केला म्हणून बाबूराव घोरपडे, वामनराव कुबेर व मुराररराव जगदाळे यांचेवर खटला भरता भरता तो खटला न होता तिघांना ताकीद दिली गेली. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, त्या वेळी मोरारजी भाई यांचेवर मुख्यमंत्री व्हावे म्हणून दडपण आले आहे अशी माहिती मी स्वतः व भाऊसाहेब भावे एम. एल. सी. यांनी श्री. किसनवीरांना दिली. श्री. किसनवीर यांनी वातावरणाचा ताण तसाच टिकवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री म्हणून मोरारजी भाई हेच असावेत असा हेतू श्री. मोरारजी भाईंचे मंत्रिमंडळातील सातारचे राज्यमंत्री श्री. मालोजीराजे नाईक निंबाळकर व श्री. गणपत देवजी तपासे वगैरेंचा भर होता. श्री. मोरारजी भाईंनी सांगितले, “मला बिनविरोध निवडले तर मी उभा राहीन.” मोरारजीभाईंनी माघार घेतली व भाऊसाहेब हिरे हे मुख्यमंत्रि होण्याकरिता विरोधात उभे राहिले. त्या वेळी यशवंतराव चव्हाणांनाही मुख्यमंत्रि पदाकरिता उभे केले गेले. त्या वेळी महाराष्ट्र राज्यात एक मोठा अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला होता. या निवडणुकीत श्री. भाऊसाहेब हिरे यांना १०१ मते मिळाली व यशवंतरावांना ३०३ मते मिळाली. यात मोरारजीभाई देसाई यांनी श्री. यशवंतरावांना पाठिंबा दिला. निवडणुकीत यशवंतरावांच्या मित्रमंडळींचे प्रयत्न फळास आले.

त्यांची सरशी झाली. '१९४२ साली मुंबई येथे काँग्रेसने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली 'करा किंवा मरा' असा एक आदेश दिला. त्यानंतर सातारा जिल्ह्यात पडवानल पेटला. जिल्ह्यात गटवार 'डिक्टेटर' निवडण्याची पद्धत सुरू झाली. 'डिक्टेटर' म्हणजे म्हणजे सर्वाधिकारी. सातारा जिल्ह्याचे डिक्टेटर यशवंतराव होते. राजकारण म्हटले की वेडावाकडा मार्ग आलाच असे आपण गृहीत धरतो, परंतु यशवंतरावजींचे राजकारणास सुसंस्कृतीची झालर होती. प्रथम ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. नंतर ते मंत्री झाले व महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद त्यांना भूषविले.

साहेब मुख्यमंत्री म्हणून निवडून आल्यावर त्यांनी १०|१२ लोकांची एक सभा घेतली. यशवंतरावांनी प्रश्न केला, "आपण सर्वांनी सांगावे की मुख्यमंत्री म्हणून कसे वागावे?" आबा तेव्हा म्हणाले, "परमेश्वरा, यशवंतरावांना आपल्या मित्रापासून वाचव" "बाबूराव तुम्ही सांगा?" तेव्हा मी सांगितले, "आपली मुख्यमंत्रिपदाची शान राखण्याकरिता सर्व जातींच्या धर्मांच्या तसेच आपले पक्षाचे, विरोधी पक्षाचे लोकास हा मुख्यमंत्री आपला आहे ही भावना निर्माण करावी."

## धुळाप्पाण्णा नवले
## बेरेजेचे राजकारण करणारा मुत्सद्दी

केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात बेरजेचे राजकारण करणारा मुत्सद्दी राजकारणी म्हणून ना. यशवंतराव चव्हाण यांची ख्याती आहे. आम्ही त्या वेळच्या सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते साहेबांच्या जवळ राहिलो ते त्यांच्या मुत्सद्दीपणा आणि संघटनाकौशल्य यामुळेच.

राजकारणाच्या आयुष्यात मी साहेबांच्या सहवासात उणीपुरी ५० वर्षे काढली. सन १९३६ पासून मी साहेबांना जवळून पाहात आलो. त्यांच्या अंगातील राजकारण शब्दात वर्णन करण्यासारखे नाही. राजकारण कसे असावे याचे धडे त्या वेळेपासून आम्ही त्यांच्याकडून शिकलो. सन १९३६ ला जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी माझा आणि त्यांचा प्रथम परिचय झाला. म. गांधीजींच्या धोरणानुसार राजकारण करणारा एक धुरंधर नेता म्हणून त्याच वेळी माझ्या मनात एक प्रकारचा ठसा उमटला होता. आत्माराम बापू पाटील (बोरगाव) व साहेब सांगलीत आले की, त्या वेळी लोकल बोर्डात बसायचे. वसंतदादा, मी आणि अन्य निवडक कार्यकर्ते स्वतंत्र भारताच्या कल्पना करीत बसत असू. १९३७ मध्ये पार्लमेंटची निवडणूक झाली. त्या वेळी सातारा जिल्ह्यात काँग्रेस व कूपर पार्टी  असे दोन गट निवडणूक लढवीत होते. या निवडणुकीत साहेबांनी फार मोठे श्रम घेतले तरी देखील अगदी काठावर काँग्रेसला यश मिळाले. या यशाचे सारे श्रेय साहेबांनाच द्यावे लागेल.

याच निवडणुकीपासून माझा आणि साहेबांचा दैनंदिन संबंध वाढत गेला. दादा आणि साहेब यांच्या राजकीय मतप्रवाहात माझी मते तयार झाली. सन १९३९-४० ला वैयक्तिक सत्याग्रह करावा, असा आदेश म. गांधींनी दिला. त्यानुसार साहेब व दादा यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सत्याग्रह केला. भाऊसाहेब सोमण, साहेब व दादा यांनी प्रांतिकपासून ते जिल्ह्यापर्यंत कमिट्या नेमून त्या कमिट्या सांगतील त्या कार्यकर्त्यांनी

वैयक्तिक सत्याग्रहात भाग घ्यायचे, असे ठरले. सत्याग्रह कसा करायचा, याचे प्रशिक्षण दादा व साहेब द्यायचे. त्या वेळची त्यांची बोलायची लकब, वागण्याची पद्धत, उमदे व्यक्तिमत्त्व, यामुळे आम्ही सारे कार्यकर्ते हुरळून जायचो.

राजकारण करता करता साहेबांना पुस्तके वाचायचा नाद फार होता. मग ते कोणत्याही विषयाचे पुस्तक असो, हाती पडले की, ते वाचत राहणे हेच त्यांचे काम. या त्यांच्या वाचनाच्या छंदातूनच त्यांची प्रतिभा अधिक फुलली असे मला वाटते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शेती या विषयांवरील पुस्तकांबरोबरच वृत्तपत्रे आणि ललित साहित्यातील पुस्तके, कवितासंग्रह, यांचाही साहेबांना चांगलाच छंद होता.

कौटुंबिक आघात आणि अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले. या शिक्षणाचा उपयोग त्यांनी देशासाठी केला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मात्र साहेबांना मनस्ताप झाला. संयुक्त महाराष्ट्र हवाच ही त्यांची भूमिका होती. तथापि आपली भूमिका ते वेगळ्या पद्धतीने मांडत होते. सामोपचाराने हा प्रश्न सुटावा अशी त्यांची इच्छा होती. संयुक्त महाराष्ट्राबाबत सांगलीत एकदा त्यांनी दादांबरोबर चर्चा केली. आम्ही निवडक कार्यकर्ते त्या वेळी हजर होतो. साहेबांची भूमिका मला मनापासून पटली. परंतु विरोधक साहेबांवर भयानक आरोप करीत होते. त्या वेळी साहेबांच्या प्रत्येक जाहीर सभेत अंडी फेकणे, चप्पल फेकणे असे निंद्य प्रयत्न काहींनी केले होते. काही काळ साहेबांनी जाहीर कार्यक्रमांना जाणे बंद केले होते. त्या वेळी आम्ही साहेबांना सांगलीत आणून त्यांची जाहीर सभा घेतली. शिवाय त्यांचा सत्कार केला. या सत्काराच्या वेळी साहेबांच्या चेहऱ्यावरील समाधानाच्या छटा पाहून आम्ही सद्गदित झालो. साहेबही गहिवरून गेले होते. "माझा जिल्हा, माझी माणसे माझ्यावर जिवापाड प्रेम करतात," असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

जास्तीत जास्त कार्यकर्ते जमवायचे, सवंगड्यांशिवाय राजकारण नाही, असलेल्या सवंगड्यांना कधीही तोडायचे नाही, असे बेरजेचे राजकारण साहेबांनी केले. त्यांच्या एकूण कामाचा ठसा आम्हा कार्यकर्त्यांच्या मनावर इतका रूजला, की आम्हीही कार्यकर्ते जमवू लागलो.

१९५२ नंतरचा काळ असा होता. एक आमदार वारल्यामुळे पोटनिवडणूक होती. पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार कोण उभा करावा हे ठरविण्याकरिता मी आणि यशवंतरावजी चव्हाण दोघेही पुण्यास जावयाचे होतो. यशवंतरावांचे त्यांच्यापेक्षा थोरले बंधू गणपतराव वारल्यामुळे घरी दुःखाचे वातावरण होते. तिसरा दिवस होता. आता पुण्यास जावयाचे की नाही असा विचार पडला. एका बाजूला लोकाचार व बंधुप्रेम व दुसऱ्या बाजूला संघटनेसंबंधीचे आपले कर्तव्य! यशवंतरावांनी यासंबंधी निर्णय घेण्यास मुळीच वेळ घालविला नाही. कौटुंबिक मोहापेक्षा राजकीय कर्तव्य श्रेष्ठ असे म्हणून ते ताबडतोब पुण्यास जावयास निघाले. पुण्यास पोहोचल्यानंतर मगच त्यांनी दाढी वगैरे केली. राजकारणात जसे यशवंतराव बुध्दिपूर्वक काम करत असत तसेच कर्तव्याचा निर्णयसुद्धा ते विचाराला अनुसरूनच घेत. भावनाप्रधान असूनही ते भावनेला बळी पडत नव्हते हे विशेष ! राजकारणात दादा व साहेबांचा वाद खूपच गाजला. हा वाद मिटावा, मतभेद संपावेत म्हणून मी अनेक वेळा उभय नेत्यांशी एकेकट्यांशी चर्चा केली. माझे प्रयत्न फळाला आले तो दिवस माझ्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे.

अखेर-अखेरच्या काळात त्यांच्या शरीराला स्थूलता प्राप्त झाली होती. त्यांनाही तशी जाणीव झाली होती. त्यांनी ती जाणीव प्रगट करताच मी त्यांना व्यायाम करण्याचा अनाहूत सल्लाही दिला. “वेळ कुठे मिळतो?” असे ते म्हणाले. मी लगेच त्यांना सांगितले की, “झोपायला वेळ मिळतो, जेवायला वेळ मिळतो आणि व्यायामाला वेळ मिळत नाही ही तुमची शुद्ध

थाप आहे.” त्यांच्या मनावर त्याचा परिणाम झाला व थोडे दिवस त्यांनी व्यायाम करण्यास सुरुवात केली. पण ते सातत्याने टिकू शकले नाही.

## धोंडिराम माळी
## कौटुंबिक मार्दव

भारताच्या स्वातंत्र्याचा नुकताच सूर्योदय झाल्याचा तो काळ होता. दक्षिणी संस्थाने विलीन झाली होती. विलीनीकरण झालेल्या विभागातून मुंबई असेंब्लीवर काही प्रतिनिधींची नेमणूक केली गेली होती.

या लोकशाही विरोधी घटनेस विरोध करण्याचा कार्यक्रम समाजवादी पक्षाने निश्चित केला होता. नियुक्त केलेले आमदार मिरज रेल्वेस्टेशनवरून मुंबईला असेंब्लीसाठी मिरज-मुंबई रेल्वेने जाणार होते. त्यांच्यासमोर निदर्शने करण्यासाठी आम्ही समाजवादी कार्यकर्ते मिरज रेल्वेस्टेशनवर जमलो होतो.

हे नूतन आमदार ज्या रेल्वेने जाणार होते त्याच रेल्वेने श्री. यशवंतरावजी चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण मुंबईला निघाले होते.

सौ. वेणूताई चव्हाणांची प्रकृती बरी नव्हती. त्यांना काही दिवस मीशन हॉस्पीटल, मीरजमध्ये ॲडमीट केले होते. औषधोपचार घेऊन ते दोघे परत जात होते.

यशवंतरावजी प्लॅटफॉर्मवर उभे होते. त्यांना पाहून मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांनी माझा हात हातात घेतला. ते मला घेऊन डब्यात गेले. त्यांनी माझी सौ. वेणूताईंशी भेट घालून दिली. सौ. वेणूताईंची तब्बेत कृष झाली होती. त्यांच्या अंगी कमालीचा थकवा आला होता. त्या फिक्कट झाल्या होत्या. त्यांची प्रकृती पाहून माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. सौ. वेणूताईंच्याही डोळ्यांत पाणी तरारले. त्या दृश्याने धीरगंभीर यशवंतरावही गदगदले. आमच्या कुणाच्याही मुखातून एक अक्षरही उमटले नाही. फक्त अश्रूंच्या द्वारे मनातील व्यथेला वाट मोकळी करून दिली जात होती. मने हलकी हलकी होत होती.

देशाच्या राजकारणात सामील झालेल्यांना व्यक्तिगत दुःखावर एक कवच पांघरूनच वावरावे लागते, यात शंकाच नाही. परंतु सौ.

वेणूताईंच्या आजारपणाने यशवंतरावजींच्या मनावर चांगलाच ओरखडा काढला होता. त्या झंझावाती जीवनातील कौटुंबिक मार्दवतेने माझ्या मनात कायमचे घर केले आहे.

कऱ्हाड स्टेशनपर्यंत मी त्यांना सोबत केली.

## शांताबाई पाटील
## रात्री जागून अभ्यास

यशवंतरावांची आणि बापूंची (कै. आत्मारामबापू पाटील) जुनी मैत्री. पुण्यात ते शिकायला आले त्या वेळी आमच्या घरीच राहात. रात्री उशिरापर्यंत जागून ते अभ्यास करीत आणि सकाळी उशिरा उठत. पण अभ्यास तसा कमीच व्हायचा. कॉम्रेड चितळे वगैरे मंडळी त्यांच्याकडे यायची आणि राजकारणावर गप्पा चालायच्या. बापूंकडे क्रांतिकारकांचा आणि राजकीय माणसांचा राबता फार होता. यशवंतरावांना राजकारणाचा फार नाद असे. त्यामुळे या राबत्याचा त्यांच्यावरही परिणाम होत असे.

त्यांना जेवण-खाण्याचे सारे जिन्नस आवडत. ते चवीने खाणाऱ्यांपैकी होते, पण कधीही त्यांनी "मला अमुक हवे" किंवा "अमुक नको" असे सांगितले नाही. घरात असेल ते खात. अनेकदा शिळे खाऊन देखील ते कॉलेजात जात.

ते पास झाले पण आमच्या घरी राजकारणाची फार गडबड असल्याने त्यांचा अभ्यास होत नसे. "तुमच्याकडे अभ्यास होत नाही. मी दुसरीकडे जातो". म्हणून पुढे त्यांनी खोली घेतली. घरात असेपर्यंत घरातल्या माणसासारखी मदत करीत. सर्वांची विचारपूस करीत. दुसरीकडे राहायला गेल्यावर आणि मोठेपण मिळाल्यावर देखील त्यांनी  हा जिव्हाळा आणि अगत्य चांगले ठेवले होते.

## अनंतराव कुलकर्णी
## मैत्रीचे अतूट नाते

टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना लोकमान्य पुण्यातिथीनिमित्त शाळेने निबंधस्पर्धा ठेवली होती. यशवंतरावांनी मला या स्पर्धेत भाग घेण्यास सांगितले. लेखनासाठी त्या वेळी वैचारिक मार्गदर्शन केले. मला या स्पर्धेत बक्षीसही मिळाले, खूप कौतुक झाले. आपल्या जवळच्या मित्रांना बरोबर घेऊन यशवंतराव इंग्रजीतील कठीण भाग समजावून देत. टेनिसनसारख्या कविता ते मोठ्या कुशलतेने समजावून सांगत. स्वतः त्या वेळी वृत्तपत्रे व लेख वाचीत. वृत्तापत्राबद्दल त्यांना लहानपणापासून आकर्षण होते. या आकर्षणामुळेच त्यांनी अनेक वृत्तपत्रांना साहाय्य आणि मार्गदर्शन केले. साप्ताहिक “समर्थ” वर त्यांचे मनापासून प्रेम होते. त्यांनीच २३ नोव्हेंबर १९७४ रोजी मला पाठविलेल्या पत्रात म्हटले होते “समर्थने जिल्ह्यात केलेल्या थोर कार्याची मला तरी नित्य आठवण राहील. समर्थच्या कार्याच्या यशासाठी  जे काय सहकार्य माझ्याकडून अपेक्षित करीत असाल ते नित्य मिळत राहील असा विश्वास ठेवा.”

यशवंतरावजींची मैत्रीच अशी होती की तेथे काही अपेक्षा करावी असे मनाला कधी स्पर्शूनच गेले नाही. त्यांचेच १९ मे १९७५ चे पत्र, मैत्रीचा अर्थ सांगते. ते या पत्रात लिहितात, “पंचेचाळीस वर्षांची तुमची माझी मैत्री आहे, ती तुम्ही जिव्हाळ्याने अजून ठेवली आहे. तुम्ही आशेने काहीच केले नाही, निर्व्याज्यपणे तुम्ही फक्त मैत्रीच केली.”

“कृष्णाकाठ” मध्ये यशवंतरावजींनी माझ्या मित्रत्वाचा उल्लेख केला आहे. त्यातही त्यांच्या या मित्रप्रेमाची ग्वाही आहे.

यशवंतरावजींचा जीवनप्रवास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी-औद्योगिक क्षेत्रातील उत्तुंग कर्तृत्वाचे प्रतीक आहे. मोठेपणातही त्यांचे

मोठेपण सातत्याने प्रत्ययास आले. छोट्यामोठ्या प्रसंगांतून त्यांचा जिव्हाळा आणि आपुलकी नेहमीच संस्मरणीय ठरली आहे.

१ डिसेंबर १९८३ च्या पत्रात आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणतात, “तुमच्या जीवनात छायाप्रकाशाचे अनेक प्रसंग आले. परंतु ते तुम्ही हसतमुखाने व धीमेपणाने सहन केलेत. समर्थला सातत्य देण्याचे मोठे यश तुम्ही मिळविलेत. तुमची माझी वारंवार भेट होत नाही पण तुमची आठवण नित्य असते. मित्रांचा स्नेह लागतो तो तुम्हास अमाप आहे.”

## आप्पासाहेब देशपांडे
## यशवंतराव चव्हाण व मी

बहुजन समाजाला एकूणच समाजजीवनात महत्त्व मिळावे म्हणून यशवंतरावांनी जो अहर्निश प्रयत्न केला त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राच्या जीवनात त्यांनी अढळपद मिळविले. याची तुलना करावयाची झाली तर ती छत्रपती शिवाजीमहाराजांबरोबरच करता येईल. लोकसंग्राहक वृत्तीचा आणि दूरदृष्टीच्या सुजाणपणाचा साक्षात्कार त्यांच्यानंतर फक्त साहेबांच्याच ठिकाणी जाणवला. एवढे असूनसुद्धा एक व्यक्ती किंवा मित्र म्हणून देखील ते असेच अविस्मरणीय होते. या दृष्टीने त्यांच्याजवळच्या मित्रमंडळींमध्ये माझा समावेश झाला हे माझे थोर भाग्य. साधारणतः कराडमध्ये ते यायचे झाले की त्यांच्या कार्यक्रमांची व्यवस्था लावण्यामध्ये माझा सहभाग असे. एवढा मोठा नेता, पाठीमागे अनेक व्याप पण साहेबांचा सौजन्यशील स्वभाव कधीच बदलला नाही. नाना तऱ्हेची माणसे भेटायला येत. आपली सुखदुःखे सांगत व साहेब जमेल तसे त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करीत. दुसरे त्यांचे वैशिष्ट्य असे की, आपणासाठी जे लोक निरनिराळी कामे करीत त्यांच्याबद्दल ते सदैव कृतज्ञ असत व ते ती दाखवीतही ! मनुष्य कितीही लहान असो, तो तेथे असो अगर नसो पण ते त्याचे आभार मानीत असत. प्रवासात असले की आपले सचिव, ड्रायव्हर यांच्या स्वास्थ्याची अगदी घरच्यासारखी काळजी घेतील आणि त्यामुळे सारे नोकरचाकर त्यांच्यासाठी जीव टाकत. सुदैवाने त्यांच्या या प्रवृत्तींना मनापासून साथ देणारी सौ. वेणूताईंसारखी पत्नी पण त्यांना लाभली. घरात येणाऱ्या प्रत्येकाचे आदरातिथ्य त्या अगदी मनापासून करीत.

साहेबांना एकूणच शैक्षणिक प्रक्रियेबद्दल खूप आत्मीयता असे. खेड्यापाड्यात जन्मलेला हा यशवंता पुढे ना. यशवंतराव चव्हाण या नात्याने समाजाचे नेतृत्व करू लागला हा बदल त्यांना मिळालेल्या

सुसंस्कारित शिक्षणामुळेच झाला. शिक्षण हे केवळ शिकवणी होता उपयोगी नाही हा त्यांचा आग्रह असे. शिक्षणामुळेच सबंध बहुजन समाजाचे रूपांतर एका सुजाण विज्ञाननिष्ठ, सुसंस्कृत समाजामध्ये करता येईल असे त्यांना वाटे; आणि त्यामुळेच आपले गुरुजन, कर्मवीर अण्णा, कराडचे कै. काका करंबेळकर यांच्याशी ते अतिशय जिव्हाळ्याने बोलत. पुढील काळाची पाऊले ओळखून यासाठीच काकांबरोबरील विचारविनिमयातून कराड सायन्स कॉलेजची कल्पना साकारली. लोकशाहीमध्ये लोकशिक्षण हे लोककल्याणाचे प्रभावी साधन आहे असे ते मानीत.

साहेबांचे आणखी एक आगळेपण म्हणजे सुसंस्कृतपणा व साहित्याबद्दलची त्यांना असलेली ओढ. ग. दि. माडगूळकर, रणजित देसाई, कवी यशवंत, पु. ल. देशपांडे, ना. धों. महानोर, व्यंकटेश माडगूळकर, श्रीनिवास कुळकर्णी यांच्या सहवासासाठी ते आसुसलेले असत. "समाजाच्या मानसात जे असते तेच साहित्यात उतरते." किंवा, "सामाजिक, राजकीय व साहित्यिक मूल्यांची एकमेकांपासून फारकत करता येत नाही" असे त्यांचे विचार अशाच साहित्यिक मैफिलीत आम्ही ऐकत असू. सर्व साहित्यिकांना मग तो नव्याने पुढे आलेला लक्ष्मण माने असला तरी ते प्रेमाने अगत्याने वागवत. भाऊसाहेब खांडेकर म्हणजे त्यांच्या हृदयातील मर्मस्थान होते. भाऊसाहेबांच्या 'पांढरे ढग' व 'दोन ध्रुव' या कादंबऱ्यांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पाडला. गरिबांबद्दलची कणव यामधून एक आदर्शवादी जीवन जगण्याची प्रेरणा या कादंबऱ्यांनी त्यांना दिली. यामुळेच कराडला त्यांच्या गावी जे साहित्य समेंलन होते त्याला भाऊसाहेबांना त्यांनी मोठ्या हळुवारपणाने आणले होते. हे सर्व पाहिले की, मला वाटते साहेबांचा मूळ पिंड हा साहित्यिकाचाच होता. पण बऱ्याच जणांना हे समजले नाही. त्यांचे साहित्य व साहित्यिकांवरील प्रेम हा राजकारणाचाच एक भाग आहे असे हे लोक मानत. साहेबांना यामुळे फार क्लेष होत. शिवनेरीच्या नौबती, सह्याद्रीचे वारे, ऋणानुबंध इत्यादी

त्यांच्या पुस्तकांतून त्यांच्या साहित्यिक गुणांची केवढी तरी प्रचिती येते. शेवटी “कृष्णाकाठ” प्रसिद्ध झाले आणि सर्वांना “साहित्यिक” यशवंतरावांचा परिचय झाला. पण त्या वेळी फार उशीर झाला होता. कराडच्या साहित्य समेंलनात त्यांनी म्हणूनच सांगितले होते की, तुम्ही साहित्यिक जी सेवा लेखणीने करता ती आम्ही राजकारणी लोक वाचेने करतो.

## शांतारामबापू इनामदार
## यशवंतराव उत्कृष्ट साहित्यिक झाले असते

टिळक हायस्कूलमध्ये असताना "ग्रामसुधारणा योजना" या विषयावर आयत्या वेळी विषय देऊन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचे परीक्षक कै. तात्यासाहेब केळकर, श्री. ज. स. करंदीकर, श्री. भाटे हे होते. या वेळी श्री. यशवंतरावांनी १५ मिनिटे इतके मुद्देसूद भाषण केले की, त्यांची भाषणाची वेळ संपल्यानंतरही त्यांना १० मिनिटे वेळ वाढवून देण्यात आली. इतके परीक्षक त्यांच्या भाषणावर मोहित झाले होते. या वेळी मिळालेली सर्व बक्षिसांची रक्कम यशवंतरावांनी त्यांना जेलमध्ये झालेल्या दंडाची रक्कम म्हणून खर्च केली !

टिळकांचा जन्म स्वातंत्र्योत्तर काळात झाला असता तर ते गणितीशास्त्रज्ञ झाले असते, त्याप्रमाणे यशवंतरावांचा जन्म स्वातंत्र्योत्तर काळात झाला असता तर ते उत्कृष्ट साहित्यिक, कवी झाले असते. शालेय जीवनात कोठेही पुस्तक वही मिळाली की, यशवंतराव त्यावर कवितेच्या ओळी लिहीत. कराड गॅदरिंगच्या वेळी "शिवाजी मेळा" या मेळ्याची सर्व पदे यशवंतराव शाळेमध्ये मधल्या सुट्टीत रचून देत. श्री. परीट म्हणून एक मित्र ही पदे म्हणत. त्याला यशवंतराव विनोदाने संगीत डायरेक्टर म्हणत.

१९२७ ते १९५२ पर्यंत मी सतत त्यांच्यामागे सावलीप्रमाणे राहात असे. २४ तास एकत्र सहवास. मॅट्रिकपर्यंत आम्ही एकत्र होतो. त्यानंतर ते पुढे राजाराम कॉलेजला गेले. रात्री दिवा लावून अभ्यास करण्याची ऐपत नव्हती. आगरकरांनी जसा म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास केला तशीच त्यांची परिस्थिती एलएल.बी. ला झाली ! पुण्याला असताना ते राहतेकरांच्या खानावळीत जेवावयास जात. नेहमी अनेक मंडळी बरोबर

असावयाची. राहतेकरांना वाटे की, चव्हाण कोणीतरी सरदारच आहेत. नंतर त्यांना त्यांचे मोठेपण समजले.

शालेय व कॉलेज जीवनात शेवटच्या महिन्यात ते अभ्यास करीत. तेवढा वेळ त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी पुरेसा असे. इतर वेळी जनजागृतीच्या कामाचे आयोजन करण्यात ते नेहमी गुंतलेले असत.

१९३७ मध्ये आत्माराम पाटील यांना तिकीट मिळण्यासाठी यशवंतरावांनी सरदार वल्लभभाईमार्फत प्रयत्न केले. आत्मविश्वासाने तिकीट मिळवून प्रचंड बहुमताने त्यांना निवडून आणले. त्या वेळची एक गमतीदार हकीगत अशी : आम्ही पुण्याहून सातारा स्टॅण्डवर आलो. कांदेकरांच्या खाजगी खानावळीत जेवलो. सातारा-कराड खाजगी गाड्या, तिकीट ५० पैसे. जेवणासाठी पैसे खर्च केल्याने पैसे घेऊन येतो तेथे थांबा म्हणून जे गेले ते परत आलेच नाहीत! हरिभाऊ लाड यांनी पैसे दिल्यावर मग आम्ही कराडला गेलो अशी आर्थिक स्थिती बिकट होती.

१९३२ साली २६ जानेवारी रोजी कराड नगरपालिकेवर तिरंगी झेंडा लावण्याबद्दल श्री. यशवंतराव यांना अटक झाली. त्या दिवशी सर्व ठिकाणी तिरंगी झेंडा लावण्याचा कार्यक्रम आम्ही यशवंतरावांचे नेतृत्वाखाली घेतला होता. त्यांना अटक केल्यानंतर त्यांनी स्वतःच ती केस चालविली.

ते कोणासही घाबरत नसत. यशवंतराव जेथे गेले तेथून ते अयशस्वी परत आले आहेत असे कधीच झाले नाही. १९४२ साली भूमिगतांच्या स्त्रियांना अटक करण्यात आली. त्यामुळे सर्व भूमिगतांत असंतोष निर्माण झाला. लोक प्रक्षुब्ध झाले. आम्ही एकत्र जमलो होतो. चव्हाण अचानक मी येतो असे सांगून गेले. १५ मिनिटांत आलो नाही तर तुमचे मार्ग तुम्ही स्वीकारा असे सांगून गेले. पोलिस स्टेशनमध्ये जाऊन त्यांनी श्री. देशमुख यांची भेट घेतली. त्यांना विचारले, "स्त्रियांनी आपले काय केले आहे? जर सरकारचे असे धोरण असेल तर आम्हालाही वेगळा मार्ग

स्वीकारावा लागेल.” त्याचा परिणाम होऊन सर्व स्त्रियांना सोडण्यात आले.

त्यांना अनेक क्षेत्रांत मित्र होते. तळागाळातल्यापासून ते मोठ्या माणसांपर्यंत अनेक माणसे त्यांनी जोडली होती. सातारा-कराड येथील लोकांना तर ते त्यांची घरची नावे घेऊनच हाक मारायचे. प्रत्येक गावातील १० माणसांची नावे ते सहज सांगत, इतकेच नव्हे तर त्यांच्या मुलाबाळांचीही नावानिशी ते चौकशी करीत.

# भाई माधवराव बागल
# यशवंतराव माझे गुरू

सौ. वेणूताई अगोदर गेल्या. मागे राहण्यात आता अर्थ नाही असे समजून त्यांच्या पाठोपाठ साहेब निघून गेले.

त्यांनी आपल्या आत्मचरित्राचा पहिला भाग नुकताच लिहून पूर्ण केला होता. त्यानंतर ते मला इचलकरंजीत पालकमंत्र्यांच्या घरातील एका लग्नसमारंभाच्या वेळी भेटले होते. ते मला म्हणाले," माधवराव, माझ्या आत्मचरित्रात तुमच्याबद्दल मी पाच-दहा पाने लिहिली आहेत." त्या वेळी मी त्यांना म्हटले, "यशवंतरावजी, तुमच्यात फार मोठा दोष आहे तो म्हणजे तुम्ही कोणाचाही द्वेष करीत नाही." यशवंतरावजींनी मला मोठं केलं. पंचवार्षिक योजनेचे मला सभासद केले. शिवाजी विद्यापीठाचा श्रीगणेशा माझ्या हातून घडविला. कोल्हापुरात आले की, ते मला शाहूपुरीतील माझ्या घरी भेटल्याशिवाय राहात नसत. शाहू मिलसमोर बसवलेल्या माझ्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी यशवंतराव व मुख्यमंत्री वसंतदादा आवर्जून आले होते. घरी पाय टाकताच माझ्या दिवंगत पत्नीच्या पेंटिंगला त्यांनी हार घातला आणि मी यशवंतरावांचे पाय माझ्या अश्रूंनी धुऊन काढले.

सातारा जिल्हा परिषदेने अध्यक्ष म्हणून त्या वेळी राष्ट्रीय कॉँग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष असलेले श्री. माधवरावजी अणे यांना निमंत्रित केले होते. त्यामुळे परिषदेला कोल्हापूरच्या अ. जा. परिषदे तर्फे मला विशेष निमंत्रण देऊन बोलावून घेतले होते. त्यातल्या एका राजकीय ठरावाला मी एक उपसूचना मांडली –

राजकीय मागण्यांबरोबर आर्थिक स्वरूपाच्या मागण्याही त्यांनी सुचविल्या. मी आज जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा त्या सूचना मला तरी उपयुक्त वाटतील अशा होत्या. सावकाराने दामदुमटीपेक्षा कर्ज वसूल

करू नये. नऊ टक्क्यांपेक्षा जादा व्याज आकारू नये. शेती कसणाऱ्या कुळांना शेती कसण्याचा कायमचा हक्क द्यावा आणि या सर्व मागण्या तातडीने अंमलात आणाव्यात असा त्या उपसूचनांचा आशय होता. परिषदेसाठी आलेले आमच्या जिल्ह्यातले आणि प्रांताचे नेतेही या उपसूचना पाहून एकदम गडबडून गेले. मला त्याबद्दल आज तर आश्चर्य वाटत आहे. पण तेव्हाही मला आश्चर्य वाटले होते. या उपसूचनांबाबत तांत्रिक अडचणी उभ्या केल्या. तेव्हा त्याला विरोध करण्याकरिता जी मंडळी उभी राहिली त्यांत मीही जाणूनबुजून उभा राहिलो. मला आश्चर्य वाटत होते की, शेतकरी समाजाचे हे जिव्हाळ्याचे प्रश्न होते. त्यासंबंधाने जर ही परिषद काही बोलणार नसेल आणि काही करणार नसेल तर शेतकरी समाजाने स्वातंत्र्याच्या चळवळीत जो भाग घेतला तो फुकट जाणार काय? शहरातल्या पांढरपेशा वर्गातील कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना राजकीय स्वातंत्र्य प्रिय होते. पण त्यातून उद्भवणारे सामाजिक व आर्थिक प्रश्न त्यांना नको होते. असा अर्थ मी मनाशी काढला आणि माझे मन अतिशय कष्टी झाले.

आपल्या वक्तृत्वाने आपले विचार समजावण्याचा प्रयत्न केला पण सर्व व्यर्थ. अध्यक्षांनी सर्व उपसूचना नियमबाह्य म्हणून नामंजूर केल्या आणि विषय नियामक समितीचे काम संपले.

एक गोष्ट लिहिण्याजोगी व तुम्ही घेण्याजोगी आहे. त्या वेळी यशवंतरावजी अर्थमंत्री असावेत. ते कराडच्या विश्रामगृहामध्ये सहकुटुंब उतरत. मी भेटायला नेहमीच तेथे जात होतो.

एक म्हातारी फाटक्या लुगड्यात काही तरी गुंडाळून म्हातारपणामुळे कापत कापत यशवंतरावांच्या भेटीचा प्रयत्न करीत होती. पोलिसांनी तिला जवळ जाऊ दिलेली नाही. यशवंतरावजींनी हे पाहिले. त्यांनी तिला जवळ बोलावले व विचारले, "का आली होतीस बाई?"

"सर्व गाव यशवंताला नावाजतंय, तवा त्याला भेटून हा हार द्यावा म्हणून आलीया." तिने फाटक्या लुगड्यातून तो हार बाहेर काढला व

यशवंतरावजींना दिला. त्यांनी तो हार घेतला व तिच्या गळ्यात घालून तिच्या पाया पडले व सौ. वेणूताईंना तिला जेवू घालायला सांगितले.

अशा गोष्टी किती तरी मिळतील.

यशवंतरावजी माझ्याहून वयाने कितीतरी लहान पण मला मागे टाकून ते पुढे गेले. त्यांचे दहन जवळून पाहण्याचे दुर्भाग्य मला लाभले. आता माझा शिक्षक मला पुनः पाहायला मिळणार नाही. म्हणून त्यांनी मला दिलेली सर्व पुस्तके मी जपून ठेवली आहेत.

# वामनराव कुलकर्णी
# एक कार्यकर्ता, एक नेता

यशवंतराव चव्हाण रॉयवादी होते, आणि म्हटले तर नव्हतेही. देशपातळीवर जे जे अत्यंत उच्च नेते झाले त्यांच्यात त्यांचा समावेश होतो. ज्यांची सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विश्लेषण करण्याची जबरदस्त हातोटी होती त्यांपैकी यशवंतराव एक होते. माझा आणि यशवंतरावांचा परिचय अगदी घनिष्ठ होता. सन १९३२ पासून ते ४० सालापर्यंत आम्ही एकत्र काम केले. येरवडा जेलमध्ये आम्ही एकत्र होतो. मी तसा रॉयना मानणारा आणि रॉयवादी कार्यकर्ता होतो. यशवंतराव चव्हाण हे त्या वेळी माझ्या मते एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करीत होते. सातारा जिल्ह्यात त्या वेळी आत्मारामबापू पाटील यांचे नेतेपद निर्विवाद होते. असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळी आत्मारामबापू पाटील ३६ हजार मतांनी निवडून आले.

तिकीट कोणाला द्यायचे, हे अच्युतराव पटवर्धन, जेधे, शंकरराव देव यांनी विचारले. त्या वेळी मी त्यांना आत्मारामबापूंचे नाव सुचविले. त्या वेळच्या काँग्रेसमध्ये काँग्रेस सोशालिस्ट पार्टी असा गट होता. त्यात कम्युनिस्ट होते. रॉयिस्ट होते. यशवंतराव मात्र सोशालिस्ट, कम्युनिस्ट की रॉयिस्ट या तीनपैकी कोणत्या गटात जायचे, या संभ्रमावस्थेत होते. रॉय त्यांना समजला किंवा नाही, हा भाग वेगळा, परंतु रॉयिस्ट विचारसरणीचा गौरव यशवंतराव नंतर नंतरच्या काळात आपल्या भाषणात करीत असत. म. गांधीजींच्या आदेशाने अहिंसेद्वारा राज्य पदरात पडेल, असे मी, लालजी पेंडसे अशा मंडळींना वाटत नव्हते. १९३२ मध्ये यशवंतराव आमच्या गटात सामील झाले. सातारा जिल्ह्यात त्या वेळी मी पोलिस खात्यात नोकरीला होतो. मी ती नोकरी सोडून बाहेर पडलो. त्यामुळे जनमानसात एक उसळी तयार झाली. त्या वेळी आम्ही

बिळाशी येथे सत्याग्रह केला. या सत्याग्रहामुळे सातारा जिल्हा खडबडून जागा झाला. जुन्या कार्यकर्त्यांच्या संघटित आंदोलनामुळे तरुण कार्यकर्ते आम्हाला येऊन मिळाले. जेलमध्ये आम्ही अडकलो, त्या वेळी आमच्यावर "रॉयवादी" लेबल लागले. १९३४ मध्ये सातारा जिल्ह्यात आपले कार्यकर्ते किती आहेत, हे पाहावे म्हणून मी कऱ्हाडात मुक्काम ठोकला. जेलमध्ये भेटलेले सर्व मित्र रॉयिस्ट म्हणून ओळखले जाऊ लागले त्यामुळे कार्यकर्त्यांची चाचपणी करायची मी ठरविले.

मात्र त्या वेळी यशवंतराव चव्हाण कोणी होते का? का ते नगण्य होते? असा मी विचार केला. तर त्या वेळी ते तसे नगण्यच होते. सुमारे १२५ कार्यकर्ते आमच्या गटाकडे होते. दुसरा गट गांधीवादी होता. त्या गटाकडे २०-२५ कार्यकर्ते होते. मग मोठा गट कोणता? तर रॉयिस्ट! म्हणून यशवंतराव आमच्या प्रवाहात येऊन मिसळले. त्या वेळी सांगलीचे गौरीहर सिंहासने आमच्याबरोबर होते. असेंब्ली निवडणुकीनंतर मी, आत्माराम पाटील, गौरीहर सिंहासने, आबा फाटक आणि यशवंतराव असे बोरगावला जमलो होतो. त्या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली परंतु यशवंतरावांनी एका फुलस्केप कागदावर एक स्टेटमेंट लिहून आणले होते. कम्युनिस्ट पक्ष स्वीकारावा, असे त्यात त्यांनी म्हटले होते. गौरीहर सिंहासने यांनी तो कागद वाचला व फाडून टाकला. "तू एकटा काही निर्णय घेऊ नकोस. सर्व कार्यकर्त्यांनी मिळून निर्णय घेऊ." असे सिंहासने यांनी त्यांना सांगितले. तरी देखील यशवंतरावांची संभ्रमावस्था जाईना!

कऱ्हाडमध्ये यशवंतरावांच्या घरी मी बैठक घेतली व सातारा जिल्हा काँग्रेसची कमिटी निवडली. त्यात यशवंतराव चव्हाण व ह. रा. महाजनी यांना सेक्रेटरी म्हणून निवडले. ही पहिली व शेवटचीच बैठक ठरली. त्या बैठकीला फार माणसे नव्हती. अगदी २० ते २५ कार्यकर्ते होते. त्यानंतर काँग्रेस सोशालिस्ट पार्टीत मतभेद निर्माण झाले. समाजवादी मंडळी बाहेर पडून स्वतंत्र पार्टी करण्याच्या नादाला लागली. त्या वेळी रॉय यांनी दोन पत्रे लिहिली. ती पत्रे मी पं. नेहरूंना नेऊन दिली. लखनौ

काँग्रेसच्या अधिवेशनात ती पत्रे दिली. मला तीन दिवस नेहरूंनी पाहुणा म्हणून थांबवून घेतले. परंतु त्या पत्रातील मजकुराचा जाहीर उल्लेख अलाहाबाद काँग्रेसमध्ये करू असे सांगितले. त्या पत्रात काँग्रेस सोशालिस्ट पार्टी फुटू नये, शिवाय काँग्रेसच्या निष्ठेला तडा जाऊ नये, असे लिहिले होते. दरम्यान १९३८ सालापर्यंत काँग्रेसमधील रॉयवादी गट स्वतंत्र आकार घेऊ लागला. त्रिपुरा काँग्रेसच्या वेळी या प्रकारची दिशा स्पष्ट होऊ लागली. आता फार काळ रॉयिस्ट गट काँग्रेसमध्ये राहणार नाही असे मला वाटले. १९३९ मध्ये यशवंतराव रॉयिस्ट म्हणूनच काम करीत होते. परंतु सोशालिस्ट आणि कम्युनिस्ट याबद्दलही त्यांच्या मनात द्विधा अवस्था होती. युद्धाचे सावट पडू लागले. १९४० ला वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला. त्याच वेळी युद्धाच्या बाजूने की विरोधी असा मतप्रवाह पुढे आला. सोशालिस्ट काँग्रेसबाहेर पडले आणि रॉयिस्टही बाहेर पडले.

त्याच वेळी यशवंतराव काँग्रेसबरोबर राहिले. आम्ही अलग झालो. तथापि यशवंतरावांचे मोठेपण मी त्यांच्या जाहीर सभांतून पाहिले. "विचार कसा करावा हे मी रॉयपासून शिकलो," असे ते सांगायचे. दूरगामी परिणामाचा विचार करणारा व विचार करण्याची क्षमता असलेला हा एकमेव नेता की, ज्याचा समावेश देशपातळीवरील निवडक नेत्यांतच होतो.

## शांताराम गरगटे
## जिव्हाळ्याचे साहेब

माझ्या संगीत शिक्षकांचा मुलगा सिव्हिल इंजिनियरिंग खात्यात दुय्यम स्थानी होता. त्याच्या हातून चुकून अपयश आल्याने तो अत्यंत हवालदील झाला होता. तो याबाबत स्वतः कुणासही काही बोलला नाही. शक्य ते त्याने प्रयत्न केले. नंतर त्याचे वडील याबाबत मला बोलले. मी माझ्या जिव्हाळ्याच्या थोर व्यक्तींना भेटलो. त्यांनी सुचवल्याने त्या वेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांना भेटलो. सह्याद्री बंगल्यात गेलो. मला साहेबांनी “आधी जेवण करा नंतर बोलू” म्हणताना त्या दिवशी सोमवारचा उपवास असल्याने मी त्या दिवशी गहू तांदूळ हे धान्य सोडल्याने व आज जोंधळाही चालत नसल्याची माझी कुचंबणा मी बोललो. साहेब हसले, “माझ्या बाजरीच्या भाकरीत एक अतिथी खास मिळाल्याचा” त्यांनी आनंद व्यक्त केला.

जेवणानंतर ते शिवाजी गणेशन यांचे नाटकास जाणार होते. ते मला चलण्याबाबत बोलले. माझा नकार दिसताच ते म्हणाले, “एका नटवर्याने असे म्हणू नये!” मला गावच्या क्लबच्या नाटकाची आठवण आली! त्या आधी २५ वर्षांपूर्वीच्या नाटकातील कामाची त्यांची आठवण त्यांनी सौ. वेणूताईंना सांगितली. इतकी आठवणशीलता पाहून धन्यता वाटली. रात्री झोपलो. नाटकाहून परतल्यावर मी उघडाच पाहून पांघरूण घालून गेल्याचे दिसले. फार मला ते लागून राहिले! तरी साहेबांची ही आत्मीयता मनास काही प्रेरणाच देत होती.

सकाळी उठल्यावर माझी स्नानादी व देवपूजा आदी नित्याची कामे झाली. मी कामाबाबत विचारणा करण्याआधीच मला निरोप मिळाला, “थांबा, पुन्हा पाहू.” दुपारी जेवण झाले. रात्री भेटलो. ते म्हणाले, “तुमची पूजाअर्चा व आरतीची घंटा सह्याद्रीवर होणेसाठी निदान चार दिवस

थांबावे लागेल."  इतका जिव्हाळा पाहून मी गप्प झालो. कामाची बाब पुन्हा बोललो. त्या कामाच्या व्यक्तीस मी पुन्हा येण्यास बोललो पण ते सोईचे नसल्याने आम्ही थांबलो. कामाची माहिती घेऊन ते म्हणाले, "बापू, फार वेळ झाला आहे." मी सुन्न झालो. तो फारच दुःखी पाहून म्हणाले, "आत चला." आम्ही आत गेलो. त्यांनी कॉटवर झोपलेल्या व्यक्तीचा निर्देश करून म्हणाले, "त्यांना स्मरून मी सांगत आहे. याबद्दल माझ्या अवस्थेची तुम्ही दखल घ्या!" कॉटवर त्यांच्या मातुश्री होत्या ! माझे डोळे झरू लागले ! बाहेर आलो. ते म्हणाले, "जिद्दीने लढा द्या. नंतर मला भेटल्याविना राहू नका." सर्व व्हायचे ते झाले. पुढे भेटलो, त्यांनी माझ्या मित्रास इंग्लंडला जाणेची तयारी ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे सर्व व्यवस्था साहेबांनी करून त्यास इंग्लंडमध्ये मोठ्या पगाराची नोकरी मिळवून दिली. ती त्याने वैशिष्ट्यतेने व उच्च श्रेणीने केली. त्याचा एक मुलगा इंग्लंडमध्ये इंजिनियर आहे व दुसरा भारतात एम.डी. होऊन डॉक्टर आहे. साहेबांचे जवळ जातीयवाद नव्हता. गुणांची पारख फार मोठी होती. तो माझा मित्र इंग्लंडला असताना यशवंतराव सेंट्रल शासनातील मंत्री असताना लंडनला गेले, त्या वेळी हे माझे मित्र जोशी यांनी सर्व महाराष्ट्रीय मंडळींच्यातर्फे मोठा सत्कार केला. मराठी भाषा किती श्रेष्ठतेने बोलली जाते, याचा आदर्श सर्वांना वाटला. आता साहेबांचे आधी श्री. जोशी स्वर्गवासी झाल्याने ते साहेबांचे स्वागत करून निरंतरची जवळीक करीत असतील अशी माझी श्रद्धा आहे !

माझ्या जवळच्या संबंधातील एका व्यक्तीने शून्यातून परिश्रमपूर्वक संपत्ती मिळविली होती. अनेकविध भिन्नतेमुळे व सिनेक्षेत्र विशेष वाटल्याने त्याने त्या क्षेत्रातील मित्रांच्या ओढीमुळे सिनेनिर्माता होणेचे धाडस केले. प्रथमच्या बोलपटांत थोडेफार पैसे मिळाल्याने पुढे वाटचाल केली. कुटुंब नियोजन विषय घेऊन बोलपट काढला. ते सर्वजण दिग्दर्शक श्रेष्ठ नटीला घेऊन माझे घरी आले. त्यांच्या आग्रहामुळे माझा उपयोग यामध्ये होईल या भावनेने मला त्यांनी मा.ना. यशवंतराव यांना भेटून त्यांना

दिल्लीत हा बोलपट दाखवावा व त्यांचे आशीर्वाद सरकारी अनुदानातून मिळवावेत यासाठी त्यांनी योजना मांडली. कऱ्हाडला साहेब येणार असल्याचे ते बोलले. मी त्याप्रमाणे कऱ्हाडला माझे संबंधितांसमवेत भेटलो त्या वेळी साहेबांनी कऱ्हाडातही पाहता येईल असे सांगितले, पण या सिनेमा श्रेष्ठींनी दिल्लीचा आग्रह केल्याने दिल्लीची योजना झाली. साहेबांनी उपस्थितीस जरूर त्या लोकांची नावे सुचवून मोलाची मदत केली. या वेळी डॉ. सरोजिनी बाबर यांनीही मोठे सहकार्य केले. या बोलपटास साहेबांचेमुळे फायदा झाला. पुढे माझी भेट झाले वेळी साहेबांनी याबाबत विचारले, “बापू, तुमची आठवण त्यांना फार झाली असेल” मी म्हणालो, “माझ्या आठवणीचे काय महत्त्व ? सिनेक्षेत्र कसे असते हे माझ्या माणसाने अनुभवले आहे. मित्रांचा मोठेपणाही पाहिला आहे. आता तो निर्माता एका दुकानात नोकरी करीत आहे.” हे ऐकून साहेब अवाक् झाले व म्हणाले, “बापू, महाराष्ट्रातील काहीजणांच्या स्वभावाबाबत मला रागापेक्षा वेदनाच अधिक होतात. आम्ही स्वभावाने श्रेष्ठत्वासाठी काही विचार करणार का ? की असेच एकमेकांस संकटाचा अनुभव देणार ?” आणखीही काही बोलले, पण माझे डोळे ओघळू लागल्याने या आठवणी शब्दांकित होणेस लेखणीच थांबते ! थोरपणाच्या शिखरावर असतानाही त्यांची विस्तृत दृष्टी गरूडाची झेप घेणारी होती याचे प्रत्यंतर अनेक आठवणींनी भरून आहे !

## संभाजीराव थोरात
## माझे मित्र यशवंतराव

माझे आजोबा जुन्या पिढीतले असले तरी त्यांना राष्ट्रीय काँग्रेसबद्दल प्रेम होते. त्या काळच्या चार इयत्तापर्यंतचे शिक्षण, परंतु व्यवहारज्ञान मोठे. होमरूल चळवळीचे ते प्रथम सभासद होते. नंतर काँग्रेस पक्षाचेही सभासद होते. शेती त्यांचा आवडता व्यवसाय.

राजर्षी शाहू महाराजांच्या सत्यशोधक विचारांचे ते अनुयायी होते. कऱ्हाडच्या गोरक्षणात गांधींची सभा त्यांनी ऐकली होती. मिठाच्या सत्याग्रहातील मिठाच्या पुड्या विकताना जमलेले लोक, त्यांचे कुतूहल व पोलिसांची धावपळ, धरपकड त्यांनी पाहिली होती. अशा परंपरेत मी वाढलो. त्या वेळी यशवंतराव विद्यार्थी अवस्थेत खेडोपाडी फिरून लोकजागृतीचे कार्य करीत होते. त्या वेळी आमच्या आजोबांनाही ते भेटत असत. यशवंतराव बी. ए. ला असताना ते खेड्यामधून प्रभावीपणे भाषणे करून काँग्रेस पक्षाचे विचार लोकांपुढे मांडत असत. अशा कालखंडात आम्ही त्यांना प्रथम पाहिले.

आम्ही त्यांच्या सान्निध्यात गेली चाळीस वर्षे काढली आहेत. आमचा त्यांचा राजकीय दृष्ट्या जीवनभर संबंध आला, व तो टिकून राहिला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची व नेत्यांची अवस्था बिकट झाली होती. संपूर्ण जनमत संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने, तर काँग्रेस श्रेष्ठी चळवळीच्या विरोधात, अशा बिकट अवस्थेत यशवंतराव महाराष्ट्राचे नेतृत्व एकमेव करीत होते. महाराष्ट्र काँग्रेस पक्षातील थोर नेते व यशवंतराव यांच्या विचारात वारंवार वैचारिक भिन्नता येत असे. दिल्लीहून पक्ष श्रेष्ठीकडून नवेनवे धरसोडीचे, अव्यवहार्य पर्याय जाहीर होत असत.

खेडोपाडी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना पक्षाची ठाम भूमिका मांडता येत नसे, त्या वेळी जनमतास तोंड देणे अवघड झाले होते. काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता संभ्रमात पडला होता. अशा वेळा आम्ही काही काँग्रेस पक्षाच्या मित्रमंडळींनी आपल्या पक्षाची भूमिका काय असावी व काय असू नये यासाठी ठामपणाची भूमिका घेण्यासाठी माझे मित्र पांडुरंग पुजारी व व्यंकटराव माने यांच्या विचाराने उंब्रज येथे तालुक्यातील कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीची बातमी यशवंतराव चव्हाण यांना आमच्या राजकीय हितशत्रूंनी विकृत करून कळविली.
“संभाजीराव यांनी तुमच्या विरोधात फळी उभी करून, तुमच्या नेतृत्वाला शह देण्याचा त्यांचा विचार आहे वगैरे.” खरे म्हणजे तसे काही नव्हते. परंतु त्या वेळी महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या धोरणाची व जनमताच्या धोरणातील विसंगतीने यशवंतराव चव्हाण यांच्या वैचारिक शक्तीचा धागा क्षीण झाला होता. अशा बेचैन मनःस्थितीत कऱ्हाडला येऊन त्यांनी आम्हास बोलावून घेतले. पूर्वग्रहदूषीत मनाने त्यांनी आमच्यावर उंब्रज मीटिंगबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. आमचे मन समजावून घेण्याच्या मनःस्थितीतच ते नव्हते. ते क्रूद्ध होऊन म्हणाले, “तुम्ही मंडळी माझे राजकीय जीवन संपविण्यास निघालात काय? वास्तविक गुंतागुंतीच्या राजकीय प्रश्नाच्या काळात माझे मानसिक ताण वाढत असल्यामुळे मी माझ्या जन्मभूमीकडे धाव घेतो आणि मित्रांच्या सल्ल्याने, गाठीभेटीने माझे मानसिक सामर्थ्य आणि विचारशक्ती पुन्हा ताजीतवानी अशी निश्चित भूमिकेवर ठाम राहून त्यांच्या आशीर्वादाने मी मिळवितो. माझा जो मालक, मतदार, यांच्या माझ्यावरील प्रेमाची शिदोरी घेऊनच मी माझा राजकीय प्रवाह सुरू ठेवला आहे असे असताना तुम्ही मित्रांनी मला हे नवे आव्हान दिले आहे असे मी मानतो.”

मी माझ्या मित्राच्या वतीने यशवंतरावांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. अनेक परीने बैठकीचा उद्देश सांगण्याचाही प्रयत्न केला. परंतु त्यांची समजूत न होता, बोलण्याने बोलणे वाढले आणि दोघांची आव्हाने-

प्रतिआव्हाने झाली. तिथे जमलेली सर्व मंडळी हवालदील झाली. यशवंतरावांनी ती गोष्ट फारच मनास लावून घेतली. तिथे जमलेल्या सर्व मंडळींना असे होऊ नये असे मनापासून वाटले.

मी व माझी मित्रमंडळी, जड अंतःकरणाने यशवंतरावांच्या शुक्रवारातील जुन्या घरातून बाहेर पडलो. पाच-दहा मिनिटांचा अवधी गेला असेल नसेल तोच मागाहून यशवंतराव यांनी बोलावल्याचा निरोप परत आला.

खरे म्हणजे आम्ही यशवंतराव यांचे नेतृत्व नेहमीच मानले होते. आम्हाला त्यांचे आकर्षण होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनमताची चाहूल, पक्ष कार्यकर्त्यांच्या विचारातून घडवावी एवढा माफक विचार घेऊनच उंब्रज येथे कार्यकर्त्यांची बैठक आम्ही बोलावली होती. परंतु बैठकीच्या उद्देशाचा विपर्यास झाल्यानेच यशवंतराव चव्हाणांची व आमची आव्हाने-प्रतिआव्हाने होण्यापर्यंत मजल गेली. ते गैरसमजुतीचे फळ होते.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व व त्यांची वैचारिक उंची आणि राजकीय स्थान आम्ही जाणून होतो. त्यांच्या राजकीय विचाराला आव्हान देण्याएवढे आम्ही मोठे नव्हतो, आणि तसा इरादाही नव्हता. परंतु भावनेच्या भरात शब्दानी शब्द वाढला, ही गोष्ट मात्र खरी !

आम्ही त्यांच्या घरी परत येताच श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराचा ढळलेला समतोल काहीसा सावरला गेला असल्याचे बैठकीच्या खोलीत पाय ठेवताच दिसले. आम्हाला बघून ते म्हणाले, "संभाजीराव उंब्रजची बैठक रहित नाही का करता येणार?" मी उद्गारलो, "काय अशक्य आहे ?" मूळ विचारांचे सूत्र एकच असल्यामुळे ठरलेली उंब्रज मीटिंग रहित केल्याचे पत्रक आम्ही प्रसिद्धीस दिले आणि आम्ही सर्व मित्रमंडळी आपआपल्या घरी विचारमग्न अवस्थेत परत गेलो. आमच्या सर्व मित्रांनी दोघांमधील वादविवाद शांत झाल्याचे पाहून आनंदाचा निःश्वास टाकला.

त्यानंतर आम्ही सर्व मित्रमंडळी काही काळ संयुक्त महाराष्ट्राच्या ऐन चळवळीत शांतपणे परिस्थितीचे अवलोकन करीत होतो.

सर्व महाराष्ट्रभर त्या संदर्भातील मागणीसाठी चळवळीचा आगडोंब उसळला होता. यशवंतराव यांचे जवळचे रथी-महारथी मित्रसुद्धा द्विधा मनःस्थितीत वावरत होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षातील मतभेद पराकोटीचे वाढले होते. रोज एक नवा पर्याय दिल्लीहून यावयाचा, व महाराष्ट्रात त्याच्या प्रतिक्रिया उलटसुलट उठावयाच्या. जणू महाराष्ट्रात एक प्रकारचे कुरुक्षेत्रच घडत होते. मोर्चे प्रतिमोर्चे, निषेध, निदर्शने, जाळपोळ, गोळीबार असा धुमधडाका चालला होता.

अशी महाराष्ट्रातील आंदोलनाची संघर्षमय अवस्था चालू असतानाच श्री. यशवंतराव चव्हाण यांचे मुंबईहून आम्हा मित्रांसाठी मला उद्देशून एक पत्र आले. त्यातील मजकूर असा –

मुंबई

प्रिय संभाजीराव यांना,

परवा कऱ्हाड येथील माझ्या घरी आपली भेट झाली. खूप गरमागरम चर्चा होऊन, आव्हाने-प्रतिआव्हानेही झाली. आपणास व मलाही या गोष्टीचा मनस्ताप झाला आहे, असे मी मानतो.

या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षात खूप वैचारिक गोंधळ आहे. महाराष्ट्रात तर सं. म. मागणीच्या चळवळीने उग्र रूप धारण केले आहे. मला एका बाजूला खवळलेला अरबी समुद्र दिसतो आहे तर दुसऱ्या बाजूला पेटलेली मुंबई दिसते आहे. मला आज तरी समजत नाही की या वादळी वातावरणात माझी राजकीय जीवननौका कोठे जाईल, काय होईल. अशा अनिश्चित अवस्थेत मी उभा आहे. आपल्या कऱ्हाड भेटीत या माझ्या मानसिक अवस्थेचा परिणामही झाला असेल. मला आपणा सर्वांचे प्रेमच या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी उपयोगी पडेल. पुन्हा भेटू या.

आपला,

यशवंतराव चव्हाण

हे पत्र आजच मी जाहिरपणे उद्धृत करीत आहे. यापूर्वी हे पत्र फक्त माझ्या मित्रानांच वाचून दाखविले होते. पुढे काही काळ लोटल्यावर यशवंतराव चव्हाण विशाल द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि थोड्या दिवसांतच विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका लागल्या.. १९५७ च्या निवडणुका म्हणजे एक प्रकारचे अग्निदिव्यच होते.

आमची मित्रमंडळी राजकीय हालचालीमध्ये काहीसा थंड पवित्रा घ्यावा या विचारात होती. परंतु यशवंतरावांनी माझ्यासह काही निवडक मित्रमंडळींना मुंबईस बोलावून विश्वासात घेऊन महाराष्ट्राच्या भावी भवितव्यासंबंधी अचूक दूरदृष्टीने मार्गदर्शन केले.

१९५७ च्या विधानसभेच्या अत्यंत महत्त्वाच्या निवडणुकीमध्ये आम्ही सर्व मित्रमंडळींनी मनोभावे सक्रिय सहभाग घेतला याचा आम्हास आनंद वाटतो. १९५७ ची निवडणूक म्हणजे कऱ्हाडच्या, (तालुक्यातील ते कुरुक्षेत्रच होते) एका अर्थाने श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या, राजकीय जीवनाची सत्त्वपरीक्षा होती, नव्हे ती तर महाराष्ट्राच्या भवितव्याची नांदी ठरणार होती. कऱ्हाडच्या राष्ट्राभिमानी मतदारांनी पक्षावरील निष्ठेने, अत्यंत बाणेदारपणाने यशवंतरावांना यशस्वी केले. त्या कामी आमच्या कार्वे गावचा व माझ्या मित्रांचा सिंहाचा वाटा आहे याबद्दल आम्हास चिरंतन अभिमान वाटतो. पुढे यशवंतराव यांचे मित्रप्रेम आणि गावावरील लोभ याचे दर्शन आम्हाला अनेक वेळा झाले.

कर्मवीर भाऊराव पाटील व श्री. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सांगण्यावरून मी ५२ ची निवडणूक लढविली. निवडणूक म्हणजे जय-पराजय, झंझावाती प्रचार हे सर्व आलेच. काही मंडळींनी आम्हाला

जबरदस्त विरोध केला. निवडणूक होऊन गेली. मला राहवेना म्हणून साहेबांजवळ माझे मन मी मोकळे केले.

पुढे माझे मुलीचे लग्नात सर्वच मंडळी कार्वे येथे जमली होती. या मंगल कार्यासाठी फलटणचे मालोजीराव नाईक निंबाळकर, कर्मवीर आण्णा व साहेब असे सर्वचजण आले होते. ज्ञानाची गंगा खेडोपाडी पोहोचविणारे आण्णा व समाजप्रबोधन करून देशाला प्रभावी नेतृत्व देणारे यशवंतराव या निमित्ताने एकत्र आले होते. दोघेही आमचे घरातील माडीवर मुक्तपणे चर्चा करत होते. मला भेटीबद्दल कुतूहल होतेच. ते काय बोलतात ते जाणून घेण्याची तीव्र इच्छा होती. मी तेथेच रेंगाळत होतो. आण्णा यशवंतरावांना म्हणाले, "यशवंता, तुझे व माझे काही बाबतीत मतभेद झाले असतील पण एक लक्षात ठेव, मी हा जो एवढा अवाढव्य शिक्षणाचा प्रपंच मांडला आहे तो पुढे कोण सांभाळणार ? मी आता थकलो. या सर्व शिक्षणाचा गाडा पुढे चालविण्याची क्षमता तुझ्यातच आहे." आण्णांनी साहेबांकडून होकार मिळविला. साहेब रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले.

यशवंतरावांच्या मातोश्री विठाई यांचे वास्तव्य कराडला होते. वृद्धापकालाने त्या फारच आजारी होत्या. मी अधूनमधून शुक्रवार पेठेतील घरी जात असे. साहेब तर आईच्या भेटीसाठी दिल्लीहून देखील कामाचा प्रचंड व्याप सांभाळून येत असत. एकदा साहेब येणार अशी वार्ता माझ्या कानी आली होती. मी सायंकाळी ४ च्या सुमारास यशवंतरावांचे घरी जाऊन पोहोचलो. साहेब आईची तब्येत पाहण्यासाठी डॉ. ग्रँटना बरोबर घेऊनच आले होते. विठाई फारच थकलेल्या होत्या. डॉक्टरनी विठाईंना पाहिले. प्रकृती गंभीर होती. त्यांनी साहेबांना काही गोष्टी सुचविल्या व ते निघून गेले. मी तेथेच उभा होतो. यशवंतराव मातोश्रींशेजारी बसले होते. विठाईंनी यशवंतरावांचे हात धरले. त्यांच्या तोंडून लवकर शब्द बाहेर पडेना. अखेर त्या क्षीण आवाजात म्हणाल्या; 'यशवंता, टांग्याला पैसे कोठून रे दिलेस ?" यशवंतरावांचे डोळे अश्रूंनी दाटून आले. साराच

प्रकार गंभीर. मला काहीच कळेना. थोड्या वेळाने मी व साहेब बाहेरील बाजूस आलो. आमच्या इतर काही गप्पा सुरू होत्या. मी साहेबांना म्हणालो, “रागावणार नाहीना ? एक विचारू का ?” साहेब म्हणाले “विचार.” मी म्हणालो, “साहेब विठाई टांग्याचे पैसे इ. काय म्हणत होत्या ?” साहेब एकदम गंभीर झाले व म्हणाले, “संभाजीराव, माझ्या सर्व गोष्टी ध्यानात आहेत. मी कोल्हापूरला कॉलेजसाठी होतो. घरची अत्यंत गरिबी, कोल्हापूरहून इकडे मुद्दाम रात्री येत असे. स्टँडवर उतरल्यावर सर्व सामान डोक्यावर घेऊनच पायी घरी येत असे. एकदा जरा सामान जास्त म्हणून रात्री टांगा केला व घरी आलो. आईने विचारले, यशवंता, टांग्याला पैसे कोठून दिलेस ?” साहेब त्या आठवणीने पुन्हा गंभीर झाले. थोडे बैचेन झाले. मी तर ऐकून स्तिमितच झालो. मला वाटले यशवंतरावांचा जीवनमार्ग अनंत अडचणींनी संकटांनी व्यापलेला आहे. पण असा खडतर मार्ग यशस्वी रीतीने पार करणारे साहेब, खरेच धन्य.

# शंतनुराव किर्लोस्कर
## कृष्णाकाठचा सुपुत्र

यशवंतराव चव्हाणांचा आमच्या किर्लोस्करवाडी गावाशी फार जुना संबंध होता. यशवंतरराव कराडचे. किर्लोस्करवाडीपासून कराड तीस-बत्तीस मैलांवर. यशवंतरावांच्या ओळखीचे कितीतरी लोक आमच्या किर्लोस्करवाडीत राहात. माझा व यशवंतरावांचा व्यावसायिक संबंध मात्र सुरुवातीला फारसा नव्हता. ते लहान वयातच राजकारणात शिरले तर मी कारखानदारीत.

मी स्वतः राजकारणात शिरलो नसलो तरी आमचे किर्लोस्कर कुटुंब आणि किर्लोस्करवाडी गाव मात्र राजकारणात भाग घेई. माझी आई, कै. ममा, (राधाबाई किर्लोस्कर), माझी पत्नी सौ. यमुनाताई यांनी पुढाकार घेऊन सूतकताईचे वर्ग चालविले होते. किर्लोस्करवाडीत प्रभात फेऱ्या निघत. त्यात दोघीही पुढाकार घेत. माझे वडील कै. लक्ष्मणराव (पपा) किर्लोस्कर हे तर निष्ठेने खादी वापरीत. त्या वेळचे राजकीय पुढारी किर्लोस्करवाडीला भेट देत, प्रचार करीत, व्याख्याने देत. महात्मा गांधींनी पुरस्कारलेल्या प्रत्येक लढ्याला किर्लोस्करवाडीने प्रत्यक्ष कार्य करून सक्रिय पाठिंबा दिला. पपांनी किर्लोस्करवाडीत अस्पृश्यता पाळलीच नाही व त्यासाठी शेजारच्या कुंडल गावच्या ब्राह्मणांनी टाकलेल्या बहिष्कारालाही तोंड दिले! राजकीय दृष्टीने किर्लोस्करवाडी जागृत होती. माझे वडील पपा स्वातंत्र्य संग्रामाला पैशाची आणि इतरही खूप मदत करीत.

१९४२ सालच्या स्वातंत्र्य युद्धात किर्लोस्करवाडीला विशेष महत्त्व आले. ह्या काळात यशवंतरावांचा आणि किर्लोस्करवाडीचा संबंध वाढला. ह्या स्वातंत्र्य युद्धात किर्लोस्करवाडीचे विशेष स्थान होते. सांगली, सातारा, कराड आणि भोवतालची गावे ही हिरीरीने १९४२ च्या स्वातंत्र्य

युद्धात भाग घेत होती. त्या वेळी ही गावे ब्रिटिशांच्या हद्दीत होती तर किर्लोस्करवाडी औंध संस्थानात होती. वाडीची माणसे प्रत्यक्ष चळवळीतही होती. इस्लामपूरच्या तहसील कचेरीवर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यासाठी गेलेल्या मोर्च्यात किर्लोस्करवाडीचे एक तरुण इंजिनिअर उमाशंकर पंड्या हे डी. एस. पी. पेद्रस यांनी केलेल्या गोळीबारात ठार झाले. त्या मोर्च्यात किर्लोस्करवाडीच्या गोविंदराव खोत व इतर बऱ्याच राजकीय कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. पुढे ब्रिटिशांविरुद्ध 'चले जाव' चळवळीतले बरेच पुढारी व कार्यकर्ते 'भूमिगत' झाले. आणि वाडीला विशेष महत्त्व आले. किर्लोस्करवाडी औंध संस्थानात असल्याने राजकीय पुढाऱ्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश शासनाखाली असलेल्या पोलिसांना औंध संस्थानच्या शासनाच्या सहकार्याशिवाय वाडीला येता येत नसे. त्यास वेळ लागे व शिवाय वाडीला येऊन राहणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना आधी सूचना मिळे व ते निसटून जात. यशवंतरावही त्या वेळी 'भूमिगत' होते. त्यांच्या विशेष ओळखीचा एक तरुण किर्लोस्करवाडीला राहात असे. पुष्कळदा यशवंतराव त्यांच्या घरी येऊन राहात. वाडीच्या लोकांना हे माहीत होते. पण कोणीही बोलत नसत वा पोलिसांना पत्ता लागू देत नसत. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही काही वर्षे राजकीय पुढारी आणि कारखानदार आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी एकत्र काम करीत होते. नंतर समाजवादाचे वारे जोरात आले आणि हे दोन्ही वर्ग दूर जाऊ लागले. १९६० ते ७० ह्या दशकात ह्या दोन्ही वर्गांतले मतभेद वाढत गेले. यशवंतराव महाराष्ट्रातून केंद्रीय सरकारची धोरणे ते आपल्या प्रभावी वक्तृत्वाने मांडू लागले व त्या धोरणांचा आग्रह करू लागले. मी भारतीय उद्योग – व्यावसायिकांच्या मध्यवर्ती संघटनेचा प्रथम उपाध्यक्ष व नंतर अध्यक्ष झालो. (१९६४-६६) त्या वेळी आर्थिक धोरणात मतभेद असले तरी व्यक्तिगत संबंधात अंतर पडले नाही. यशवंतराव भारत सरकारची धोरणे मांडीत. त्या धोरणांवर मी टीका करीत असे. पण

आमच्या व्यक्तिगत संबंधात त्यामुळे काही फरक पडला नाही. जेव्हा आमच्या भेटी होत तेव्हा थट्टाविनोद होई. त्याला यशवंतरावांचा स्वभावही कारणीभूत होता. विरोधक असले तरी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून, नीट समजावून, घ्यायचा त्यांचा स्वभाव होता. कोल्हापूर ते कराड या भागात किर्लोस्कर कारखान्यामुळे झालेली प्रगती यशवंतराव अभिमानाने इतरांना सांगत. कै. पपांच्या जन्मशताब्दीच्या समारंभात आम्ही सर्वांनी पपांचा पुतळा किर्लोस्करवाडीला उभा केला. त्याच्या उद्घाटनाच्या वेळी यशवंतरावांनी केलेल्या भाषणात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "आज एखादा कारखाना उभा करायचा तर प्रथम आपण वीज, पाणी, रस्ता, फोन ही सारी आहेत का ह्याची खात्री करून घेतो. आजची तरुण पिढी सर्व सोयी असल्या तरी कारखाने काढावेत का नाही ह्याचा विचार करते. कै. लक्ष्मणरावांनी किर्लोस्करवाडीत कारखाना काढला तेव्हा कारखान्याला अनुकूल असे काहीच नव्हते. प्यायला पाणी सुद्धा नव्हते. उजाड रान होते. पण लक्ष्मणरावांचा निश्चय कडवा होता. चिकाटी दांडगी होती. आत्मविश्वास पक्का होता. त्यांनी कारखाना काढला, यशस्वी केला आणि इतरांना शिकवून स्फूर्ती देऊन, आणखी कारखाने काढण्यास मदत केली. हे कर्तृत्व असामान्य आहे." तसेच मी कारखाने वाढविले, जगभर महाराष्ट्रात तयार केलेला माल पोहोचवला ह्याचेही तोंड भरून कौतुक केले. त्या समारंभाला वसंतदादाही होते. दोघेही एकाच आपलेपणाने आले, बोलले.

मला वाटते यशवंतराव जितके मोठे झाले त्यापेक्षा आणखी कितीतरी मोठे व्हायला पाहिजे होते. मला राजकारणातल्या अंतर्गत वाटा, प्रवाह ह्यांचा अनुभव नाही. ह्या प्रवाहांचा, वाटांचा यशवंतरावांच्या आयुष्यावर जो परिणाम झाला असेल त्यामुळेही पुढे पुढे त्यांच्या मोठ्या पदाला धक्का पोचला असेल ! ते गेले तेव्हा मला वाटले यशवंतरावांच्या कर्तबगारीच्या मानाने त्यांना आणखी मानाचे स्थान मिळावयास हवे होते. कदाचित माझी ही भावना व्यक्तिगत असेल. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाले तर

कृष्णाकाठची ज्वारीची भाकरी आणि वांग्याची भाजी खाऊन वाढलेले आम्ही. आमच्यातून ते गेले तेव्हा त्यांची जागा जी रिकामी झाली ती रिकामीच राहिली !

## शांताराम गरुड
## वैचारिक नेतृत्व आणि दूरदृष्टीचे कर्तृत्व

१९६० मध्ये जनतेच्या लोकशाही आंदोलनाच्या दबावातून संयुक्त महाराष्ट्राचे जे राज्य स्थापन झाले त्याचे मुख्यमंत्रिपद यशवंतरावांना लाभले. त्याचा उपयोग संयुक्त महाराष्ट्राच्या विकासाचा मजबूत व व्यापक पाया घालण्यासाठी करण्याची दूरदर्शी भूमिका घेऊन यशवंतरावांनी महाराष्ट्रात कृषि-औद्योगिक समाजाची उभारणी करण्याचे धोरण स्वीकारले आणि ते तत्परतेने व पूर्णांशाने राबविण्यासाठी केवळ शासकीय नोकरशाही यंत्रणेवर विसंबून न राहता आजवरच्या राष्ट्रीय आंदोलनातून व सहकारी चळवळीतून पुढे आलेल्या राजकीय सामाजिक कार्यकर्त्यांच्या शक्तीला त्यांनी आवाहन केले. त्यांच्या हाती सहकाराचे आर्थिक साधन आणि पंचायत राज्याची राजकीय सत्ता दिली. महाराष्ट्रातील ज्या ज्या विभागांनी, जिल्ह्यांनी वा तालुक्यांनी या आवाहनास सक्रिय प्रतिसाद दिला; त्या विभागात, जिल्ह्यात व तालुक्यात गेल्या पंचवीस वर्षांत भोंड्या माळावरसुद्धा या हरितक्रांतीचे मळे फुलले. प्रक्रिया करणाऱ्या आधुनिक उद्योगाची उभारणी झाली. यंत्र, तंत्र आणि विज्ञान यांच्या आधारे ग्रामीण मराठमोळी मने आणि माणसे औद्योगिक क्षेत्रात सदस्य बनली, संचालक बनून नवनिर्मितीच्या पताका फडकवू लागली आणि महाराष्ट्राच्या या कायापालटात द्रष्टा म्हणून, प्रेरक म्हणून आणि कुशल प्रशासक म्हणून यशवंतरावांनी सिंहाचा वाटा उचलला. ही कृषि-औद्योगिक समाजाची उभारणी अथवा हरितक्रांती अर्थातच आजच्या भारतीय घटनेच्या व केंद्रीय नियोजनाच्या चौकटीत असल्याने आणि मिश्र अर्थव्यवस्थेच्या असमान पायावरच ती साकार होत असल्याने तिला विलक्षण मर्यादा आहेत. तिची परिणामकारकताही एकीकडे मर्यादित व दुसरीकडे विषमता निर्माण करणारी अशीच आहे,

हेही आता पंचवीस वर्षांनी स्पष्ट झाले आहे. परंतु आहे या चौकटीचे, मर्यादांचे भान ठेवून या मिश्र अर्थव्यवस्थेत ग्रामीण समाजाचा आणि शेती विभागाचा वाटा वाढवून घेऊन तिचा कस इकडे झुकवण्यात महाराष्ट्रातील कृषि-औद्योगिक समाजाच्या उभारणीचा प्रकल्प बऱ्याच अंशी यशस्वी झाला आहे. आणि त्याचे श्रेय यशवंतरावांना खास आहे आणि त्याच अर्थाने ते नवमहाराष्ट्राचे शिल्पकार आहेत.

ही एकच कामगिरी यशवंतरावांचे नाव महाराष्ट्रात व भारतात दीर्घकाळ कोरून ठेवायला पुरेशी असणारी अशी आहे. मात्र यशवंतरावांचे गेल्या अर्धशतकातील समर्पित जीवन याहूनही इतर अनेक गुणवत्तेने व कर्तृत्वाने समृद्ध असे आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात विशेषतः १९२०-३० या काळात कोरडवाहू शेतीवाडीच्या खेडुत महाराष्ट्रातील गरीब मराठा कुटुंबात शिक्षणाचा ध्यास येणारी मुले मुळात दुर्मिळ होती. यशवंतराव अशाच एका कुटुंबात जन्मले आणि शिक्षणाचा ध्यास घेऊन त्यासाठी पडतील ते कष्ट घ्यायला पुढे सरसावले हे पहिले नवल. त्यातून अशी शिकलेली बहुजन समाजातील तरुण मंडळी उच्चभ्रूंच्या वैभवी व प्रतिष्ठित जीवनाची हाव धरून त्यामागे धावण्यात दंग होती, अशा वेळी हा मुळातच फाटका असणारा तरुण आणखी फाटक्या जीवनाची वाट जाणिवेने व स्वखुषीने चालायला पुढे आला हे दुसरे नवल आणि यानंतर मग एकेका काडीने ही नवलांची साखळी साखळी वाढतच गेली.

सेवादलाचा व विद्यार्थी संघटनेचा कराडसारख्या तालुक्याच्या गावातील एख पोरसवदा तरुण आपल्या तालुक्यातील जनजागृतीच्या जनआंदोलनाची व अपवादात्मक असणारी कार्यकर्त्यांच्या मोठ्या संचांची सारी शक्ती तिच्याशी समरस होऊन आत्मसात करून घेऊन अल्पावधीत अभ्यासू व कृतिशील कार्यकर्ता बनला. कायदेभंग करून स्वतःचे पायाने तुरुंगात गेला. राजकीय कार्यकर्त्यांना करावा लागतो तसा आणि तितका या तुरुंगवासाचा उपयोग आपले राजकीय आकलन समृद्ध बनवून पुढच्या

राजकीय प्रवासासाठी चांगली भरघोस शिदोरी बरोबर घेण्यासाठी त्यांनी केला. तालुक्याच्या व जिल्ह्याच्या प्रौढ राजकीय वर्तुळात प्रौढत्व प्राप्त होण्याआधीच त्यांना स्थान मिळाले. पक्षसंघटना, निवडणूक, लढे आणि जनआंदोलने या तीनही आघाड्यांवर त्यांनी स्वतःच्या बुद्धिकौशल्याने, संघटनाचातुर्याने, मुत्सद्देगिरीने, आपली अपरिहार्यता प्रस्थापित केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अर्थातच ते सत्तेचे वाटेकरी बनले. वाढत्या श्रेणीने शासनाचे अधिकारी बनले.

ही सर्व राजकीय वाटचाल त्यांनी अत्यंत सावधचित्ताने स्वतःला सावरत सांभाळत केली. तीमधील त्यांची काही पावले चुकलीही. विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या त्यांच्या वाटचालीत त्यांच्या परीनेसुद्धा काही पावले फसली व त्यांचे परिणाम त्यांना भोगावे लागले. अखेरीच्या काही वर्षांत राजकीयदृष्ट्या ते एकाकी पडले. अनेकांशी त्यांचे मतभेद झाले, अनेकजण त्यांना व ते अनेकांना दुरावले. पण सर्वांशी स्नेह, जिव्हाळा व आपुलकी ठेवण्याच्या व्यक्तिगत गुणवत्तेमुळे ते सर्वांची मैत्री, स्नेह व आपुलकी कायम राखू शकले, आणि म्हणूनच त्यांच्या निधनाने सर्वांची मने हेलावली, व्याकुळली. महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शासकीय जीवनाला नवा आशय व आकार देणारा यशवंतरावांसारखा शिल्पकार गेल्याने पोकळी तर निर्माण झाली आहेच, पण ती भरून काढण्याचा मंत्र आणि तंत्र यांचीही ठेव मागे ठेवून जाण्यास ते विसरले नाहीत. यशवंतरावांचे खरे मोठेपण यातच आहे.

## प्र. को. भापकर
## अलौकिक प्रतिभावान

यशवंतराव अगदी लहानपणापासून काँग्रेसनिष्ठ होते. यशवंतरावांनी काँग्रेसची धुरा सतत संभाळून धरली. माझा त्यांचा प्रत्यक्ष परिचय फार उशिरा म्हणजे १९४५ – ४६ साली झाला. निवडणूक होण्यापूर्वी ते श्रीरामपूरला आले होते. आणि तेथे त्यांचे भाषण झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्री झाल्यानंतर ते आणि किसनवीर माझ्या घरी आले होते. निरोप घेऊन जावयास निघाले तर "थांबा थोडा वेळ." त्या दोघांना माझ्या पत्नी सौ. हिराबाई म्हणाल्या. मी हिराबाईकडे पाहातच राहिलो. "मुख्यमंत्र्यांचा का असा वेळ घेतेस?" मी बुचकळ्यात पडून म्हटले तर तिने दोघांच्या हातात नारळ दिले, हार घातले, दोघांनाही गहिवरून आले. "तुम्ही झगडत आहात म्हणून मला हे पद मिळाले", यशवंतराव व किसनवीर दोघेही भारावले.

मी साताऱ्यास हिंडलो होतो, तिकडची परिस्थिती चिंताजनक होती. माझे मित्र नि त्या वेळचे आमदार चंद्रोजी पाटील यांचा खून झाला होता. पुढे ४२ च्या चळवळीत डिक्टेटर असलेले आमदार के. डी पाटील यांचाही खून झाला ! सखाराम बारबटे यांस यशवंतराव भीत असत. केव्हा कुणाचा तो खून करेल याचा नेम नाही अशी त्यांना भीती वाटे ! आणि म्हणून बरेच दिवस ते साताऱ्यास जात नसत ! परंतु पुढे कुऱ्हाडीचे हे राजकारण यशवंतरावांनी बंद पाडले यातच त्यांचा मोठेपणा दिसून येतो. त्या वेळी त्यांनी मुत्सद्देगिरीने हा प्रकार थोपविला यात शंका नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, बोलण्याची हौस, माणसाला विश्वासात घेण्याची त्यांची हातोटी, माणसाची पारख, समयसूचकता, अचुकता, या सर्वांमुळे त्यांचा प्रभाव पडे. त्यामुळेच 'यशवंत' 'जयवंत' झाले.

वास्तविक मी त्यांचा टीकाकार. असेंब्लीत मी त्यांच्यावर तुटून पडत असे. परंतु केव्हाही भेटावयास गेलो की, ते हसून स्वागत करीत.

मनमोकळेपणा हा त्यांचा गुण अलौकिक समजावयास हवा. एकदा मागे कऱ्हाड कॉलेजात माझे भाषण झाले त्या वेळी माझ्या पत्नी हिराबाई माझेबरोबर होत्या. नेहमीप्रमाणे मी यशवंतरावांवर कडाडून टीका केली. पी. जी पाटील, रामभाऊ नलावडे बरोबर होते. प्रा. सौ. सुमतीबाई विद्यार्थ्यांत बसल्या होत्या. चहा पिताना हिराबाईंना राहवले नाही. मला त्या रागावल्या. "एवढी टीका करावयाची काही जरुरी होती का ?" पण संयुक्त महाराष्ट्र एकसारखा माझ्या डोक्यात होता ! आणि त्या ओघात ती टीका केली गेली ! आज मला वाटू लागले आहे की, केवळ भाषेवर भर असू नये ! यशवंतराव जरी गेले असले तरी त्यांनी केलेल्या भारताच्या सेवेमागे त्यांची निष्ठा होती. त्या निष्ठेपासून ते ढळले नाहीत. भारताच्या सेवेचे उदाहरण त्यांनी भारतीयांच्या समोर घालून दिले. त्यांच्या मातेने अपार कष्ट करून त्यांना घडविले. त्यांच्या पत्नीने त्यांना विचारीपणे, संयमाने साथ दिली. मुख्यमंत्र्यांची बायको म्हणून त्या कधीच मिरविल्या नाहीत. आज ते दोघेही नाहीत. त्या दोघांनी आपल्या निःस्वार्थी जीवनाचा व देशभक्तीचा आदर्श व वारसा आपल्यासाठी  राखून ठेवला आहे. तो आपण जतन करावयास हवा.

## नरुभाऊ लिमये
## राजकारणाच्या वादळवाऱ्यात हरवलेले यशवंतराव

महाराष्ट्रात 'यशवंतराव' हे नाव उच्चारल्याबरोबर कृष्णाकाठच्या कराडच्या यशवंतराव चव्हाणांची मूर्ती डोळ्यांसमोर येते. या नेत्याबद्दल मराठी भाषेत इतके लिहिले गेले आहे की, त्यांच्या नावाबरोबर महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणाची वीस वर्षे नजरेसमोर उभी राहतात. ते स्वतः राजकारणात गुंतले गेले आणि इतरांनी त्यांना राजकारणात बुडवून टाकले. इतके की, त्यांच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा त्या राजकीय लोंढ्यात मागमूसही राहिला नाही ! टीका, स्तुती, निंदा, आरोप, प्रत्यारोप इतके पराकोटीचे झाले आहेत की, ते सर्व सहन करण्याची ताकद किंवा सहनशीलता परमेश्वराने त्यांना किती दिली असेल याचा अचंबा वाटतो. इतरांनी टीकास्त्र सोडावे आणि चव्हाणसाहेबांनी ते हसतमुखाने सहन करावे, हे मराठी सुशिक्षित मनाला इतके अंगवळणी पडलेले आहे की, क्वचित अपवादात्मक परिस्थितीत जरी साहेबांनी कठोर प्रत्युत्तर दिले तरी लोक म्हणतात, "दुसरा काही बोलला तरी साहेबांनी रागावणे नाही बुवा पटले !"

अशा शेकडो शब्दबाणांच्या वर्षावात जणू एकाकी लढत राहिलेला हा नेता खरोखरच केवळ राजकारणापुरताच आहे का ? भारतात म. गांधी, पं. नेहरू आणि आता इंदिरा गांधी या तीन व्यक्तींवर जेवढे शब्द पडले असतील तेवढे टीका, स्तुती, निंदा, उपदेशाचे शब्द मराठी भाषेत चव्हाण साहेबांबद्दल लिहिले, उच्चारले गेले असतील ! आमच्यासारख्या साहेबांच्या पत्रकारमित्रांना तर प्रत्येक वर्षी बारा मार्च अगोदर अनेक पत्रे येतात. "साहेबांचा वाढदिवस आहे. नरूभाऊ तुम्ही लिहा, त्यांचे राजकारण समजावून सांगा. आम्हीही लिहीत आलो पण यंदा ठरविले होते की, आता हे विश्लेषण पुरे. इतके लिहिले तरी 'साहेब' समजले

नाहीत, मग कशाला उठाठेव ?" साहेबांनी या महाराष्ट्राकरता, काँग्रेसकरता आणि देशाकरता काय केले हा इतिहास बोलका आहे आणि त्यातला अबोल मुग्ध भाग आहे तो खुद्द त्यांच्याच मनोगताने व्यक्त झाला पाहिजे.

मधे एकदा कराडमार्गे सांगलीला जाताना सह्याद्रीच्या प्रतिनिधीकडून कळले, "साहेब आज कराडला जात आहेत." मी गाडी वळवली. पत्ता सहज सापडला. बंगल्याच्या दारात गाडी उभी राहिली. शामरावनी पुढे होऊन आत सांगितले "नरूभाऊ आलेत" आणि साहेब बाहेर आले, मी वर 'विरंगुळा' या बंगल्याच्या नावाकडे आणि साहेबांकडे एकदोनदा पाहिले. वाटले, वनराज आता विश्रांतीसाठी घरी आला आहे. बाहेर राजकारण उन्हाळ्यातल्या चक्रीवादळासारखे गरगरत असताना साहेब आपल्या मित्राच्यासाठी, समारंभासाठी, मुद्दाम आले आहेत. वाटले, त्यांचे मन विरंगुळा शोधते आहे. प्रकृती बरी दिसली आणि माझ्या मित्र मनाला बरे वाटले. तसेच त्यांच्या कठीण समयी शांत राहण्याच्या वृत्तीचाही शोध लागला!

विचाराला एक नवीच कलाटणी मिळाली. एखाद्याचे जीवन फक्त एकाच दिशेने पाहण्याचा सराव झाला की, तो पूर्ण पुरुष समजूनच येत नाही. इतिहासात गाजलेल्या नेपोलियनबाबत असे म्हटले जाते की, त्याने जिंकलेल्या आणि हरलेल्या लढायांच्या वर्णनांनी त्या चरित्राची इतकी पाने खर्ची पडली की, त्याचे इतर गुणदोष अव्यक्तच राहिले! नेपोलियन म्हणजे लढाई, रक्तपात तसे चव्हाण म्हणजे राजकारणी, पण विचाराच नवा किरण, त्या पैलूदार खड्यावर पडल्याबरोबर मला यशवंतराव नवे दिसू लागले. अनंत आठवणी मनात गर्दी करून पुढे येऊ लागल्या. चव्हाण साहेब "साहेब" होण्यापूर्वी आपल्या सवंगड्यांत कसे मिसळत, हसत, खेळत असत ते आठवले. सोमवार पेठेतल्या त्या मातीच्या कौलारू घरातली पडवी. मित्रांचा मेळा जमावा. अनेक विषयांवर संध्याकाळी सुरू झालेल्या गप्पा पहाटे संपाव्या आणि सर्वांनी

तिथेच फाटक्या सतरंजीवर अंग टाकावे. उशाला दुसऱ्या मित्राचे पोट! एक गोलाकार आकृती तयार व्हायची. चव्हाण साहेब झाले, पण, 'यशवंता' म्हणणारे मित्र चुकून एकेरी बोलून जातात. नुसते कराड शहराच्या गल्लीबोळातून हिंडले की, काम भागते. मराठमोळ्या शेतकरी समाजातल्या लेकी-सुना भाऊराया आला असे वाटून साहेबांला पाहतात तर त्यांची आई, आजी पाहिलेल्या वृद्धा "यशवंता, मोठा झालास, देव तुझे भले करो" म्हणून कानशिलावर बोटे मोडून माया काढतात. असे प्रसंग जेव्हा येतात तेव्हा यशवंतरावांना जिवावरचे ओझे केवढे कमी झाल्यासारखे वाटत असेल ! त्यांच्या मातृप्रेमाचे आई विठाई हे श्रद्धास्थान असल्याचे वर्णन अनेकांनी केले आहे. पण मित्र, सवंगडी, पोक्त, आप्तेष्ट, यांच्या आशीर्वादात त्यांना मिळणारा दिलासा आणि विरंगुळा सर्वांत मोठा असेल.

मित्रप्रेमाला जिथे राजकारणाचा रंग आला तेथे साहेबांइतके शिव्याशाप दुसऱ्या कुणाला मिळाले नसतील. त्यांच्याकडून सतत काही तरी मिळालेले एखाद्या वेळी नाराजी निराशेचा प्रसंग आला की, खवळून उठतात. साहेबांचा 'यशवंतराव' आणि क्वचित 'येशा' होतो, पण साहेब सहन करतात. म्हणतात, "हो, त्यांना हवे ते मी देऊ शकलो नाही !" पण हे खरे मित्र नाहीत. राजकारणाच्या मापाने साहेबांना मोजणारे चूक करतात, अन्याय करतात, असे मला वाटते. आशानिराशेच्या लाटेत मीही तसा प्रमाद केला असेल पण साहेबांचे मित्र आणि मातृप्रेम हा त्यांचा विसावा आहे. त्या असंख्या आठवणीत हा 'विरंगुळा' आहे.

साहेबांशी बोलणारी पुस्तके हा त्यांचा दुसरा विरंगुळा आहे. सामान्यपणे मंत्रिपदावर बसलेली माणसे वाचतात कमी, बोलतात जास्त, पण साहेब त्यांच्या ग्रंथालयात जेव्हा रंगतात तेव्हा त्यांना सोडून अकाली निघून गेलेल्या श्रीपाद डोंगरे यांनासुद्धा साहेबांच्या शेजारचा दिवा मालवणे अवघड जात असावे! अपवाद कधी असला तर तो सौ. वेणूताईंचाच! तेथे मात्र अपील नाही. राजकारणाच्या गुंतागुंतीत अत्यंत

गुप्त असा एक सवाल खुद्द पंडित नेहरूंनी त्यांना एकदा टाकला आणि बजावले, 'कुणाजवळ बोलू नको!' यशवंतराव म्हणाले, "एका व्यक्तीजवळ बोलावे लागेल." पंडितजींचा स्वर चढला, "कोण अशी ती व्यक्ती ?" यशवंतराव म्हणाले, "वेणूताई" आणि दिल्लीत खळखळून हसलेले पंडितजी जणू मुंबईत दिसले!

साहेब ग्रंथप्रिय, ग्रंथवेडे आहेत. आणि तो त्यांचा एक विरंगुळा आहे. वृत्तपत्रातील ग्रंथपरीक्षणे वाचणारा राजकारणी मुत्सद्दी दाखवा म्हटले तर अनेक मंत्र्यांचे चेहरे समोरून सरकवून खोडून काढावे लागतील. साहेब त्याला अपवाद आहेत. श्री. माळगावकर या प्रसिद्ध लेखकाची 'प्रिन्सेस' कादंबरी परदेशात गाजली म्हटल्याबरोबर साहेबांच्या संग्रहात तिची भर पडली आणि मी सहज विचारले तेव्हा ते म्हणाले, "आमच्या संस्थानिकांच्या लीलांचे परदेशात कुतूहल असलेले आपल्याला माहीत नाही!"

यशवंतराव 'साहेब' झाल्यावर मोठे मोठे लेखक, प्रकाशक त्यांची पुस्तके त्यांचा माग काढीत येत असतील पण त्यापूर्वी ते मरीन लाईन्सजवळच्या इमारतीत एक प्लॉटमध्ये राहात होते. पगार चार पाचशे रूपये असेल. त्या वेळीही सर विन्स्टन चर्चिलच्या युद्ध-आठवणीचे अठ्ठावीस खंड त्यांच्या संग्रहात चमकत होते. राजकारणी माणूस ग्रंथालयास कसा घडतो याची उदाहरणे मला माहीत अशी दोन तीनच. काकासाहेब गाडगीळ, आपले साहेब आणि रघुनाधराव खाडिलकर.

नाट्यकला, संगीत यांची आवड नसणे एवढेच नव्हे तर या क्षेत्राचा राग असणे म्हणजे "शुद्ध राजकारण" अशा लुंगी जमान्यात वाढलेले यशवंतराव कमालीचे रसिक आहेत. त्यांच्या एका वाढदिवसाच्या निमित्ताने मी त्यांना मानापमान, संशयकल्लोळ, स्वयंवर नाटकांची टेप्स पाठविली. वाढदिवस अभिनंदनाच्या पत्रांना छापील उत्तरे तर गेलीच पण साहेबांनी मला लिहिले, "अलीकडे अशी आवडती नाटके पाहावयास मिळत नाहीत. पण तू पाठविलेले टेप्स जुन्या स्मृती जागृत करतात. मोठा

आनंद लुटत आहे.” पुण्यात भरत नाट्य संशोधन मंदिराला त्यांनी भेट दिली आणि दिल्लीच्या नाट्य संमेलनाचे वेळी भरत नाट्य संस्थेजवळ असलेले प्रदर्शनीय साहित्य आवर्जून पाहिले.

शाहीर, कवी, लेखक हे तर त्यांचे खास मित्र. राजकारणाच्या पहिल्या प्रहरात डफावर थाप टाकून स्वातंत्र्याचा पुकार दऱ्याखोऱ्यात घुमवणारा सांगली भागातला शाहीर निकम किंवा शीघ्रकवी ग. दि. मा. अशी मंडळी साहेबांच्या मनातल्या एका खास दालनात स्थान मिळवून राहिलेली. रणजित देसाई, पु. ल. देशपांडे म्हणजे विरंगुळ्याचे साथी. साहेबांची नेहमी कुरकूर असते, “काय करावे, वेळ मिळता मिळत नाही” एखाद्या नाटकाला पूर्ण वेळ बसावं म्हणून सर्वांना चुकवून ते येतात नि पाठोपाठ कोणतातरी निरोप येतो, फोन खणखणतो, आणि मोठ्या नाखुषीने ते उठतात. राजकारणात शाहीर कवीचा उपयोगही त्यांना अचूक अंदाजता येतो. मला वाटते महाबळेश्वर शिबिराखालील गोष्ट असावी. स. म. समितीविरुद्ध काँग्रेस लढत होती. समितीला काँग्रेसचे पाठबळ होते. एक लावणी पोवाडा प्रचाराला हवा होता. साहेबांनी माडगुळकरांकडे पाहिले आणि आण्णांनी सुरूवात केली.

“आता ही पोरगी (समिती)
वाचत नाही
तिला डांग्या (भाई डांगे)
खोकला झाला ग बाई”

लावणी तयारी झाली नि हा हशा पिकला.

साहेब जन्मले सातारा जिल्ह्यात पण शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापुरात जावे लागले. बोर्डिंगचा आश्रय घ्यावा लागला. त्या कोल्हापूरच्या मातीपाण्याचे अनेक गुण त्यांना कायमचे चिकटलेले आहेत. कुस्ती हा त्यांचा आवडता छंद आहे. त्या दक्षिण महाराष्ट्रातले अनेक पैलवान साहेबांना मानतात आणि साहेब त्यांना मानतात. अशा विविध क्षेत्रांत रमणारे, विरंगुळा शोधणारे, काही दिवसांपूर्वी त्यांच्या

विरंगुळा बंगल्यात भेटले तेव्हा त्यांच्या जीवनाचे हे छंद लक्षात आले. पस्तीस वर्षे राजकारण आणि मंत्रिपदाचा बंगला उपभोगलेल्या आणि मुंबईत फ्लॅट घेऊन राहिलेल्या साहेबांनी विरंगुळा बांधला कराडात! वीस वर्षांपूर्वी घेतलेल्या एका सोसायटीतल्या प्लॉटवर ! बंगला कसला पूर्वीपेक्षा नव्या पद्धतीचे घरच दारातून आत शिरले की, बैठकीची खोली, दुसऱ्या दालनात बेडरूम, तिसरे स्वयंपाकघर आणि व्हरांडा साजेल अशा जागेत डायनिंग टेबल. बस ! झाला बंगला. मी विचारले, "माझ्यासारखा पाहुणा आला तर ?" साहेब म्हणाले, "माझे मित्र बाहेरच्या बैठकीच्या खोलीत कोचावरच झोपतील. आपल्याला हवा कशाला मोठा बंगला ?"

मला आठवण झाली तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या सोमवार पेठेतील घराची. त्या पडवीत जे मित्र येत जमत ते याच बैठकीच्या खोलीत आनंदाने झोपत. असा हा राजकारणापेक्षा निराळा नेता कोणत्या वर्गात बसेल असा विचार येतो. त्यांना छंद आहेत. छंदात आनंद आहे, पण छंदाचा नाद आणि नादाचे व्यसन नाही. त्यांच्या जीवनावर सहकारसम्राटसारखे चित्रपट निघणार नाहीत तर ज्या सात्त्विकतेने त्यांनी राजकारणासह अनेक रसिक गुणांची जोपासना केली त्या जीवनावर सात्त्विक असाच चित्रपट निघेल. मात्र त्या वेळी सर्वांगीण यशवंतराव समजले पाहिजेत.

## ना. वसंतराव नाईक
## प्रभावी नेतृत्व

यशवंतरावजींची स्वातंत्र्यपूर्व काळातील महनीय कामगिरी मी ऐकून होतो. एक झुंजार व नेकजात स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात हिरीरीने भाग घेतला होता. ते सामान्य जनतेतून वर आले होते. गरीब माणसांच्या साऱ्या वेदना त्यांना माहीत होत्या. जनसामान्यात वावरल्यामुळे जनतेच्या आशा-आकांक्षांची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळेच बेचाळीसच्या क्रांतीमध्ये कार्य केलेल्या व लहान वयात एका मोठ्या राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारलेल्या यशवंतरावजींचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोण कसा असेल याची काहीशी कल्पना मी मनाशी बाळगली होती. हा तरुण नेता पुरोगामी विचारसरणीचा, बुद्धिनिष्ठ असूनही भावनांना पारखा न झालेला, व्यवहारी दृष्टीचा व फार कर्तबगार असावा अशी माझी अटकळ होती. यशवंतरावजींबरोबर काम करू लागल्यावर ती तंतोतंत खरी असल्याचा मला पडताळा आला. पंडित जवाहरलाल नेहरू व यशवंतरावजी यांच्यामध्ये जे एक साधर्म्य आढळून येते, त्याची या ठिकाणी आठवण होते. पंडितजींचे व्यक्तिमत्त्व एखाद्या वटवृक्षासारखे होते. वाटचाल करणाऱ्या पांथस्थाला ज्याप्रमाणे वाटेवरील वडाचा आधार वाटावा तसा राजकारणात काटेरी वाटचाल करणाऱ्या कार्यकर्त्यांना पंडितजींचा मोठाच आधार वाटत असे. हीच गोष्ट यशवंतरावजींनाही लागू पडते. राष्ट्राच्या एकंदर जीवनावर पंडितजींच्या विचारांचा आणि विशाल व्यक्तिमत्त्वाचा ठसा ज्याप्रमाणे उमटलेला होता त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकीय व वैचारिक जीवनावर यशवंतराजवींच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव प्रकर्षाने पडला असल्याचे दिसून येते. यशवंतरावजींच्या नेतृत्वाचे जे आणखी वैशिष्ट्य आढळून येते ते हे की, ते

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन तर करीतच, पण लायक कार्यकर्त्याला पुढे येण्याची संधीही देत. म्हणूनच नव्या कार्यकर्त्याला यशवंतरावजी हे आपले मित्र व मार्गदर्शकच वाटतात. सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याच्या यशवंतरावजींच्या गुणामुळेच त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल आदर, प्रेम आणि आपलेपणा वाटावा हे स्वाभाविक आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. कित्येक वर्षे एकत्र राहिलेली महाराष्ट्र व गुजरात ही राज्ये अलग झाली. मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे ही जनतेची इच्छा फलद्रूप झाली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद यशवंतरावजींकडे सोपविण्यात आले. महाराष्ट्र निर्मितीच्या कार्यात खुद्द यशवंतरावजींनी किती महत्त्वाची कामगिरी बजावली होती, हे सर्वश्रुत आहे. त्या कामगिरीचे मूल्यमापन इतिहास करीलच. महाराष्ट्र व गुजरात ही दोन वेगळी राज्ये अस्तित्वात येण्यापूर्वी जी परिस्थिती निर्माण झाली होती ती यशवंतरावजींनी मोठ्या चातुर्याने व संयमाने हाताळली. कोणतीही बाब असो, ती कटुता निर्माण होऊ न देता सामोपचाराने सोडविली जावी, अशी त्यांची भूमिका असे. विरोधकांशी सौजन्याने वागण्याची व त्यांच्या मतांचा योग्य आदर करण्याची त्यांची मनोधारणा वाखाणण्यासारखी आहे. या वृत्तीमुळेच त्यांनी महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या वेळची सारी परिस्थिती कुशलतेने हाताळली. त्यांच्यातील श्रेष्ठ शासकीय कौशल्य त्या वेळी पणाला लागले होते. महत्त्वाच्या प्रत्येक बाबतीत ते आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेत असत. सहकाऱ्यांवर विश्वास टाकून आणि त्यांना वाढत्या जबाबदारीची कामे करण्याची संधी देऊन त्यांच्यातील शासकीय आत्मविश्वास वाढीला लावण्याचे त्यांचे धोरण मला तरी फार महत्त्वाचे वाटते.

आज महाराष्ट्र राज्याची भव्य प्रतिमा सर्वांच्या नजरेसमोर दिसत आहे. तिला उजाळा देण्यात यशवंतरावजींनी अशा प्रकारे फार मोलाचा हातभार लावला आहे. महाराष्ट्राच्या मातीवर, महाराष्ट्राच्या संस्कृतीवर, मराठी भाषेवर आणि मराठी जनतेवर त्यांचे अपरंपार प्रेम आहे, परंतु हे

प्रेम केवळ प्रांतीय स्वरूपाचे नाही. भारताला बलवान करावयाचे झाल्यास त्याचा विकास झाला पाहिजे, अशी त्यांची निष्ठा होती. ती निष्ठा महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही तर भारतातील प्रत्येक घटक राज्याची एकत्रित शक्ती हीच भारताची संघशक्ती, अशी त्यांची व्यापक धारणा होती. याच राष्ट्रीय दृष्टिकोणातून ते महाराष्ट्राकडेही पाहात असत.

यशवंतरावजींच्या व्यक्तित्वाची जडणघडण ही अशी एका राष्ट्रीय व तात्त्विक विचारसरणीतून झालेली आहे. प्रत्येक विषयाचा मुलभूत दृष्टिकोणातून ते विचार करतात. राजकारणात मुद्देसूद व तत्त्वनिष्ठ विचार कसा करावा, हे आपण मानवेन्द्रनाथ रॉय यांच्यापासून शिकलो, हे त्यांनी जाहिरपणे मान्य केलेले आहे. कोणत्याही प्रश्नाची उकल करताना ते व्यवहाराचे सूत्र जसे सोडीत नाहीत तशीच तत्त्वापासून फारकतही स्वीकारीत नाहीत. औद्योगिक विकास, शेतीमालाचे उत्पादन, नियोजन, सहकारी चळवळ, राष्ट्रीय एकात्मता व समाजवाद यासारखा कोणताही गुंतागुंतीचा, विषय असो, यशवंतरावजींचे त्यावर खास चिन्तन चालू असे. त्या प्रत्येक विषयाचा ते मूलभूत दृष्टीने सर्वांगीण विचार करीत असत. आपला देश संपन्न कसा होईल, त्याचे ऐक्य कसे वाढीला लागेल व देशातील सर्वसामान्य जनता कशी सुखी होईल, याचाच ते निरंतर वेध घेताना आढळत. लहान पातळीवरील संकुचित विचार त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही. त्यामुळेच यशवंतरावजींच्या प्रत्येक विचाराची, विधानाची व विश्लेषणाची दखल सर्वांना घ्यावी लागते. शब्दांच्या वारेमाप उधळपट्टीपेक्षा यशवंतरावजी कृतीला महत्त्व देत. त्यांच्या कृतीला भक्कम वैचारिक अधिष्ठान असे.

# ना. मा. सो. कन्नमवार
# यशवंतरावांच्या सहवासात आल्यानंतर

२६ फेब्रुवारी १९६१ रविवारचा दिवस. यशवंतराव अहमदाबादच्या दौऱ्यावर जायला निघताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्यांना विचारू लागले, "काय यशवंतराव, मी परवा दिलेली दोन इंग्रजी पुस्तके आपण वाचलीत ना?" "नाही हो" यशवंतराव म्हणाले, "मला वेळ मुळी मिळालाच नाही. अलीकडे कामाचा व्याप एवढा वाढला आहे की, पुस्तके वाचायला वेळ मिळतच नाही. अशीच परिस्थिती राहिल्यास मला वाटते की, सहा वर्षांनंतर मी अज्ञानी होऊन जाईन." (I may become ignorant in six years.)

यशवंतरावांची परिस्थिती आज ही आहे की, लोक झोपू देतील तेव्हा त्यांनी झोपावे, लोक जेवू देतील तेव्हा जेवावे. थोड्या दिवसांपूर्वी त्यांच्या धर्मपत्नी सौ. वेणूताई यांची प्रकृती विशेष बिघडली होती... घरीच उपचार चालू होता. रात्री ९ चा सुमार होता. साडे नऊ वाजता असेंब्लीतील काँग्रेस आमदारांची पक्षसभा व्हावयाची होती. शिवाय काही माणसे भेटावयाची राहून गेली होती. त्या वेळी त्यांना आठवण झाली आपल्या रुग्ण पत्नीची. ते लगेच मला म्हणाले, "कन्नवारजी, तुम्ही आजची ही सभा सांभाळा. मी आत्ताच घरी जातो. कारण आज दिवसभरात पाच मिनिटेदेखील माझ्या पत्नीचा कुशल समाचार घ्यायला मला वेळ मिळाला नाही. ती आता झोपेल. नऊ वाजल्यानंतर ती जागत नाही. मला गेले पाहिजे."

मी चटकन म्हणाले, "आपण आता सारी कामे बाजूला सारून ताबडतोब अवश्य घरी जा." ते लगेच गेले. पण कामाबद्दल आस्था व चिंता दाखविणारे, कर्तव्य व अंतःकरणाची ओढ या कात्रीत सापडलेले आणि "मी काम सांभाळतो, तुम्ही जा," असे म्हणताच समाधान व विश्वास

दर्शविणारे सर्व भाव त्या क्षणमात्रात त्यांच्या मुद्रेवर मला दिसून आले, ती त्या दिवशीची त्यांची मुद्रा माझ्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेली.

नागपूरचे असेंब्ली अधिवेशन संपत येऊ लागले होते. सर्व महिला आमदारांनी आपल्या निवासस्थानी यशवंतरावांना जेवावयाला बोलविले होते. हे जेवण दुपारी १२ वाजता ठेवले होते. यशवंतरावांचे काम त्या दिवशी साडेबारा वाजेपर्यंत उरकू शकले नाही. त्यांना काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे व एक महत्त्वाचे निवेदन विधानसभेत द्यावयाचे होते. मी म्हणाले, "आपण जेवण आटोपून एक वाजेपर्यंत असेंब्लीत येऊ कसे शकाल ? जेवायच्या कार्यक्रमाला न गेल्यास काय हरकत आहे?" "नाही नाही ! हा महिलांचा कार्यक्रम आहे. मला त्यांचा मान राखलाच पाहिजे, मी जातो आणि लगेच येतो वेळेवर." यशवंतराव म्हणाले. त्याप्रमाणे ते एक वाजायला तीन मिनिटे कमी अशताना विधानसभेत येऊन पोचले.तेव्हा मी त्यांना विचारले, "आपले जेवण एवढ्या लवकर आटोपले कसे?" ते म्हणाले, "मी महिलांच्या बरोबर पानावर बसलो. घाईघाईने वर वर थोडा भात घेतला आणि त्यांची क्षमा मागून लगेच येथे आलो." जेवणाच्या बाबतीत त्यांचे नेहमी असेच घडत असे. समाधानाने जेवण करणे, वेळेवर जेवणे हे त्यांना कामाच्या गर्दीमुळे जमतच नाही. अलीकडे तर ते सचिवालयात व विधानसभा अधिवेशनाच्या वेळी विधानसभा भवनातील आपल्या कार्यालयात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा जेवण करीत असतात.

मला यशवंतरावांच्या आखीव रेखीव धोरणाबद्दल फार समाधान वाटते. ते सर्वांना सांभाळून घेणारे आहेत. निभावून नेणारे आहेत. ते सर्वांना आपापले काम स्वतंत्रपणे, मोकळ्या मनाने करावयाला भरपूर वाव देतात. काम नीट चालताना कधीही कोणाच्या कामात ते हस्तक्षेप करीत नाहीत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रत्येकाला आपापले विचार निर्भयपणे खुल्या दिलाने मांडण्याची मोकळीक असते. आपसातील चर्चेनंतर जो निर्णय लागतो तो सर्वांनी प्रामाणिकपणे अंमलात आणावा,

मग मात्र "पण" "परंतु" कोणी करावयाला नको, असा त्यांचा कटाक्ष असतो. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत त्यांची एककल्ली वृत्ती नसते. तत्त्वाला व धोरणाला बाधा येऊ न देता सर्वांशी जुळवून मिळवून घेण्यात ते सदा तत्पर असतात. प्रत्येकाच्या चांगल्या कामाला त्यांचे प्रोत्साहन असते. त्यांच्या अशा स्थिर, गंभीर, विचारप्रवण, कार्यप्रवण, कार्यप्रणालीने सर्वांचे एक हृदय, एक चित्त, झाले असून मंत्रिमंडळाचे रूपांतर जणू मित्रमंडळात झाले आहे.

द्विभाषिक राज्य हे भारतातील पहिल्या प्रतीचे राज्य आहे अशी जी ख्याती झाली त्याला कारण यंशवंतरावच होते. हे राज्य चालविण्याचे कार्य अती कठीण व किचकट होते. ही तारेवरची कसरत होती. या 'द्विभाषिका' च्या मंत्रिमंडळात एकमेकांचे जमू शकले नाही. आपापसातील भांडणामुळे हे राज्य अखेरीस मोडावे लागले, असा कोणाचाही ठपका यशवंतरावांनी येऊ दिला नाही.

माझी पत्नी नागपूर विभाग काँग्रेस कमिटीची अध्यक्ष व तिच्याकडे विदर्भाच्या प्रश्नांचे नेतृत्व आणि मी मंत्रिमंडळात. महाराष्ट्रातील बऱ्याचशा मंडळींनी आमच्याबाबत साशंक होणे स्वाभाविक होते. हा केवळ दुटप्पीपणा आहे, असेही काही म्हणू लागले. मी माझी भूमिका स्पष्ट करण्याच्या दुष्टीने यशवंतरावांना एक सविस्तर पत्र लिहून कळविले होते की, माझ्या भूमिकेमुळे आपल्या अंगीकृत कार्याला अडथळा येत आहे असे आपणाला वाटताक्षणी मला मंत्रिपदाच्या कामातून मुक्त करावे. मंत्रिपद सोडल्यावरही मी विदर्भाच्या प्रश्नांबाबत अखेरपर्यंत प्रयत्न करीन व काँग्रेस श्रेष्ठी जो अखेरचा निर्णय देतील तो मी प्रामाणिकपणे पाळीन, व त्याचा प्रचार करीन. यशवंतरावांनी मला त्यानंतर घरी बोलावून घेतले आणि म्हटले, "माझे मन आपल्याविषयी मुळीच साशंकित नाही. कोणी काहीही म्हणोत, माझा आपल्या कार्यपद्धतीवर विश्वास आहे." चंदिगढ येथील ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाच्या वेळी महाराष्ट्रातील काही मंडळींनी मजविषयी शंका प्रदर्शित करताच

यशवंतरावांनी, “कन्नमवारांविषयी असा गैरसमज करून घेऊ नका.” असे स्पष्ट सांगितले. नऊ सदस्य कमिटीत मी एकटा आपला दृष्टिकोण स्पष्टपणे मांडीत होतो. तरी या बाबतीत यशवंतरावांनी मनाला कधीही लावून घेतले नाही. पंडित गोविंद वल्लभपंतांच्या निवासस्थानी ही चर्चा परस्परांच्या भावनांचा आदर ठेवून उच्च पातळीवरून व्हावयाची. नऊ जणांत मी एकटाच काय तो अलग विचारांचा होतो. तरी आमच्या परस्परांच्या प्रेमात मुळीच अंतर आले नाही व कसल्याही प्रकारची कटुता आली नाही. याला कारण यशवंतरावांचा दिलखुलास स्वभाव व विशाल अन्तःकरण.

पोटात शिरून विश्वास संपादन करून, दुसऱ्याकडून काम करवून घेण्याची कला फार कठीण असते. पण ते यशवंतरावांना साधले आहे. बाहेरची काही विघ्नसंतोषी मंडळीही कोणत्या तरी प्रश्नाबाबत मतभेदाच्या खडकांवर हे आपसातील वाटाघाटीचे तारू फुटावे आणि हा विभाजनाचा प्रश्न १९६२ च्या आम निवडणुकीनंतर विचारात घेण्यात यावा, असेच इच्छिणारी होती. पण यशवंतरावांनी असा मोका येऊच दिला नाही. साऱ्या वाटाघाटी यशस्वी केल्या.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीबाबत अनेक पक्षांचे प्रयत्न झाले आहेत. यात जनतेकडे विशेष श्रेय असले तरी यशवंतरावांसारखा कुशल, प्रसंगावधानी विचारवंत नेता नसता तर आजचे हे महाराष्ट्र राज्य एवढ्या लवकर पाहता आले असते किंवा नाही याची मला शंका आहे.

## ना. शरद पवार
## एक आदर्श व्यक्तिमत्त्व

यशवंतरावांशी माझा पहिला संबंध १९५८ सालच्या आसपास आला. संयुक्त महाराष्ट्रासाठी आग्रह धरणारी जी तरुण पिढी होती त्यांतील एक घटक म्हणून मी त्यांच्या जवळपास त्या वेळी कोठेतरी असायचो. मात्र संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना यशवंतरावांची विचारसरणी खटकत होती. कारण राजीनामा देऊन आपण महाराष्ट्राला मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून बाजूला नेऊ नये अशी त्यांची भूमिका होती. मात्र राष्ट्रीय व्यासपीठावर महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्यात यशवंतरावांचे राजकीय शहाणपण उपयोगी पडेल असे वाटत होते. एवढेच नव्हे तर पुण्याचे माझ्याबरोबर शिकणारे काही विद्यार्थीही त्यांच्याकडे आकृष्ट झाले. काँग्रेसच्या युवक विभागात काम करण्याची जबाबदारी त्यानंतर यशवंतरावांनी आमच्यावर सोपवली व त्यातूनच त्यांचे व माझे जवळिकीचे नाते निर्माण होत गोले. १९६४ मध्ये तर संपूर्ण महाराष्ट्रातील युवक काँग्रेसची जबाबदारी माझ्या खांद्यावर टाकण्यात आली व त्यातूनच आमचे दोघांचे नाते अधिक दृढमूल झाले. त्या वेळी माझ्यावर त्यांचा जो प्रभाव पडला तो वर्णन करणे शब्दातीत आहे.

तथापि माझ्या सार्वजनिक व वैयक्तित जीवनात आजवर जे काही मी मिळवले आहे त्याचे श्रेय यशवंतरावांनाच द्यावे लागले.

युवक चळवळीपासून ते विरोधी पक्षनेत्यापर्यंत माझी जी वाटचाल झाली त्यात त्यांचेच फक्त मार्गदर्शन झाले. माझ्यावर पक्षाची जबाबदारी टाकणे, विधीमंडळात मला आणणे, महाराष्ट्र पातळीवर काँग्रेस संघटनेची जबाबदारी सोपविणे, मंत्रिमंडळात घेणे वगैरेबाबत त्यांचाच मोठा वाटा आहे हे मान्य करण्यात मला मोठा अभिमान वाटतो.

हे राज्य एकसंघ व एकजिनसी व्हावे असे त्यांना वाटत होते. त्यांनी जी दिशा दाखविली होती त्या दिशेने महाराष्ट्राने वाटचाल केली असती तर आज कळत नकळत या विभागात जी काही कटुता पाहावयास मिळते ती यत्किंचितही पाहावयास मिळाली नसती. त्या दृष्टीनेच त्यांनी नागपूर करार केला व नागपूरला दुय्यम राजधानीचे स्थान देण्यात पुढाकार घेतला. तसेच औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ काढण्याचा महत्त्वाचा निर्णय घेऊन मागासलेल्या मराठवाड्याला विकासाची दारे खोलून दिली. शैक्षणिक प्रगतीशिवाय कोणताही परिसर समृद्ध होत नाही. म्हणून पश्चिम महाराष्ट्रात, कोकणात, मुंबईच्या विभिन्न भाषिकांत त्यांनी असेच विश्वासाचे वातावरण निर्माण केले.

ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी व अन्य वर्ग म्हणजेच बहुजनसमाज यांचे व दलितांचे संबंध सातत्याने सामंजस्याचे राहावे म्हणून दादासाहेब गायकवाड यांच्या रिपब्लिकन पक्षाबरोबर नेहमी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा निर्णय त्यांनी जाणीवपूर्वक घेतला. सामाजिक मन एकसंध झाले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोण होता. हल्लीच्या राज्यकर्त्यांनीही हाच दृष्टिकोण ठेवूण प्रभावीपणे काम केले पाहिजे.

कृषी औद्यागिक समाजसेवेची कल्पना मांडून त्यांनी खेड्यांमध्ये राहणाऱ्या महाराष्ट्रातील ७९ टक्के लोकांना व शेती व्यावसायिकांना महत्त्व प्राप्त करून दिले.पद्मश्री विखे पाटील व डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी कारखानदारी उभी करून शेतकऱ्यांना वाजवी किंमत देण्यासाठी जी उपाययोजना केली तिला यशवंतरावजींनी प्रोत्साहन दिले. त्यामुळेच आज महाराष्ट्रात शंभरावर सहकारी साखर कारखाने उभे आहेत. तसेच ग्रामीण महाराष्ट्रात कायापालट होऊन खेड्यातील तरुण पिढीमध्ये उद्योजक होण्याची आकांक्षा वाढीस लागली आहे.

यशवंतराव चव्हाण यांचा पिंडच मुळी कट्टर लोकशाहीवादी होता. सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याशिवाय सामान्य माणसाला प्रशासनात सहभागी असल्यासंबंधीची जाण होत नाही. त्याचप्रमाणे स्थानिक

पातळीवरच्या प्रश्नांची जाणीव झाल्याखेरीज त्यांना आपले प्रश्न सोडविण्याची कल्पनाही लक्षात येत नाही.म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे सूत्र कृतीमध्ये आणण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदांच्या संदर्भात त्यांनी ही भूमिका मांडली. त्या वेळचे महसूल मंत्री ना.वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी एक समिती नेमण्यात आली.त्यामध्ये दोन दृष्टिकोण होते, एक तर सतेचे विकेन्द्रीकरण आणि ग्रामीण भागातील नेतृत्व प्रशासनाच्या प्रक्रियेत सहभागी होऊन ते अधिक सुजाण झाले पाहिजे ही भावना म्हणून नेतृत्व तयार करण्याची ती एक शाळा झाली. तो एक महत्त्वाचा टप्पा झाला असे जर म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

यशवंतराव जन्मजात लोकशाहीवादी होते त्यामुळे लोकांच्या मनाचा अंदाज, लोकभावनांचा आदर आणि लोकांच्या मनाचा कानोसा घेण्याचे कौशल्य त्यांच्या ठायी होते आणि लोकमन वा लोकभावना लक्षात घेऊन पाऊल टाकले पाहिजे या प्रकारची भूमिकाही त्यांच्या मनात सतत असे. प्रशासनाबाबत ते सुस्पष्ट होते.कोठेतरी प्रशासनात मनाविरुद्ध निर्णय घ्यावा लागला तर त्यामध्ये राज्याची आणि समाजाच्या हिताची भूमिका त्यांच्या मनात निश्चितपणे असे. सार्वजनिक जीवनात काम केल्यानंतर विचारी तरुण रॅडिकल होतो, डावीकडे वळतो. यशवंतरावसुद्धा डाव्या विचारसरणीच्या अभ्यासवर्गाला जायचे. त्यात त्यांना मानवतावादी डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी विचारविनिमय करण्याची डॉ. रॉय मानवतावादी डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी विचारविनिमय करण्याची व डॉ.रॉय मानवतावादी व लोकशाहीची संकल्पना त्यांच्या मनावर बिंबली. पुढे पंडित नेहरुंशी संबंध आल्यावर त्यांच्या लोकशाही विचारसारणीला समाजवादाची जोड मिळाली. म्हणूनच खऱ्या अर्थानि मानवतावादी, समाजातील सर्व स्तर आणि विशेषतः उपेक्षित माणसांबद्दल एक प्रकारची आत्मीयता बाळगणारा नेता असे त्यांचे वर्णन करता येईल.

या संदर्भात अनेक राजकीय नेत्यांना जवळून पाहण्याची व काम करण्याची संधी मला मिळाली. परंतु त्यांच्याइतका सरळ मनाचा आणि चर्चेला मोकळा असणारा दुसरा नेता मी या देशात पाहिलेला नाही.

महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे केले. ही उभारणी करताना त्यांनी त्यांच्याद्वारे अनेक संस्था उभारल्या.राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्याला संस्थेचा पायाच आधारभूत असला पाहिजे; असे त्यांचे मत होते. या त्यांच्या कल्पनेमधूनच सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, क्रीडा संस्था निर्माण झाल्या. महाराष्ट्रामध्ये या सर्व संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात उभे करून या उभारणीला सतेची साथ नसेल तर या विधायक कामामध्ये फार मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होतील. ते अडथळे निर्माण झाले तर हा उभा केलेला संस्थात्मक डोलारा कोलमडेल आणि त्याचा विपरीत परिणाम तेथील कार्यकर्त्यांपेक्षा ज्या सर्वसामान्य लोकांसाठी त्या संस्थांची उभारणी केली आहे त्या सर्वसामान्यांच्या जीवनावर होईल म्हणून सत्तेच्या राजकारणापासून आपण बाजूला जाऊ नये अशा प्रकारचा त्यांचा दृष्टिकोण होता.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना ही गोष्ट आपणास जाणवली असेल किंवा विशेषतः १९५६-५७ साली राज्यामध्ये काँग्रेस पक्षाला नाममात्र बहुमत असताना आणि एका बाजूला सर्वश्री एस. एम. जोशी, उद्धवराव पाटील, आचार्य अत्रे , यांच्यासारखे धुरंधर पुढारी असताना त्यांनी ज्या पद्धतीने सदनाचे काम चालविले त्यावरून हे सिद्ध होते. त्यांनतर अतिशय कठीण काळामध्ये ते देशाचे गृहमंत्री झाले.विशेषतः त्या काळामध्ये अनेक राज्यांमध्ये वेगळ्या पक्षाची सरकारे सत्तेवर आली होती. देशात अनेक समस्या होत्या. त्याचबरोबर पूर्वेकडील राज्यांचा प्रश्न बिकट झाला होता. अरुणाचलमसारखी छोटी राज्ये निर्माण झालेली होती. त्या काळामध्ये प्रभावी संसदपटू म्हणून ते गाजले. त्यांनी देशाला स्वच्छ प्रशासन दिले.

## डी. सी. शहा
## उदार मनाचा मार्गदर्शक, प्रेमळ मित्र

नामदार यशवंतराव चव्हाण यांचा परिचय, स्नेह इ.स. १९५० नंतरच वाढत गेला. निपाणी मुंबई राज्यात असताना १९५२ ते १९५६ या काळात मी मुंबई राज्याच्या विधान परिषदेवर नगरपरिषदांचा प्रतिनिधी म्हणून काम करीत होतो. त्या काळात चव्हाणसाहेबांचा नि माझा दाट स्नेह वृद्धिंगत होत गेला. त्यांच्या प्रेमळ, लोभस, व्यक्तिमत्वाचा खोल ठसा माझ्या मनावर उमटला आहे. त्यांच्या इतका सुसंस्कृत, सहृदयी, समतोलवृत्तीचा , अजातशत्रू आणि आम जनतेशी एकरूप झालेला, इतका थोर नेता आधुनिक महाराष्ट्रात मला तरी दुसरा कोणी दिसत नाही.

१९५६ नंतर मी कर्नाटक राज्यात विधान परिषदेवर बरीच वर्षे असताना माझा व्यवसाय सांभाळून, समाजकारणात व राजकारणात भाग घेत आलो. स्वराज्यप्राप्तीनंतरच्या प्रारंभीच्या काळात, मुंबई राज्यात डॉ. जिवराज मेहता व माननीय माजी पंतप्रधान मोरारजी भाई देसाई यांच्या खालोखाल श्री.भीऊसाहेब हिरे यांचे स्थान होते राजकारणी मुत्सद्दी लोक मला हिरे गटातील मानीत होते.परंतु माझा अनुभव असा होता की, महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठी झटणाऱ्या या दोन्ही नेत्यांनी केव्हाही गटबाजीचे राजकारण केले नाही. दोघांची मनोवृती भिन्न असल्यामुळे वेगवेगळे मार्ग हाताळले गेले इतकेच. दोघांचेही ध्येय महाराष्ट्राचा अभ्युदय आणि महाराष्ट्राच्या त्यागी संस्कृतीची जपणूक व वाढ व्हावी हेच होते.

यशवंतरावांचा व माझा दाट परिचय १९५० पासूनचा. त्यापूर्वीपासून माझी व भाऊसाहेब हिरे यांची मैत्री होती. १९४० पासून मी नगरपरिषदेत काम करीत असताना नेहमीच हिरे यांचे मार्गदर्शन व मदत घेत असे. पुढे

१९५० नंतर माझा व यशवंतरावजींचा परिचय जसजसा वाढत गेला, तसतशी त्यांच्या लोकसेवेच्या तळमळीची आणि उदार मतवादाची छाप माझ्या मनावर कायमची ठसली. मुंबई राज्याच्या शासनात त्याना वरचे स्थान मिळावे असे मला वाटू लागले. भाऊसाहेब हिरे यांचेकडे मी माझ्यासाठी काहीही मागितले नाही, पण एकदा त्यांच्याशी खाजगीत गप्पा मारीत असताना मी भाऊसाहेबांना म्हणालो की, पक्षाने यशवंतरावांचा उपयोग करून घेतला पाहिजे, ते मंत्रिमंडळात आले पाहिजेत. भाऊसाहेब हसले. त्यांनीही आपले विचार सांगितले. पुढे माझ्या मनातील अपेक्षा लवकरच पूर्ण झाल्या. यशवंतरावांची पुढील यशस्वी कारकीर्द सर्वांना माहीत आहेच.

सन १९४० पासून १९६२ पर्यंत मी निपाणी नगरपरिषदेत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून काम केले. दरम्यान १९५५ मध्ये निपाणी नगरपरिषदेला शंभर वर्षे पूर्ण होत होती. तेव्हा निपाणी नगरपरिषदेच्या शतसांवत्सरिक समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून आम्ही यशवंतरावजींना बोलावले. ते माझ्या घरीच उतरले होते. त्या काळात संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न समोर दिसत होते.

देशाचे राजकारण, भाषावार प्रांतरचना, औद्योगिक विकास हे विषय बोलण्यात येत असत. पण या सर्वांपक्षा यशवंतरावांच्या मनात, महाराष्ट्राच्या विकासासाठी काही मूलभूत प्रश्न भेडसावत होते. आमच्या गप्पांच्या ओघात मी त्यांना म्हटले ,"साहेब, मी व्यवसाय चांगला केला, पैसा व नावही कमावले, नगरपरिषदेत व विधानसभेवर काम करून समाजकारण व राजकारणही करीत आहे. मी आणखी काय करू शकतो ? साहेब म्हणाले, "देवचंदभाई, या भागात शिक्षणाचा प्रसार करा, विस्तार करा, महाराष्ट्र संस्कृतीच्या वाढीसाठी शाळा-कॉलेजे काढा, लोकांना शहाणे करा. देशाच्या प्रगतीचा तो खरा मार्ग आहे. जनता शहाणी व सुसंस्कृत झाली तर देश आपोआपच प्रगत होईल.तेव्हा तुमच्या कार्याला या भागात खूपच वाव आहे." यावरून यशवंतरावजींची लोकहिताची

तळमळ व कोणाकडून कोणते काम करवून घ्यावे याची समज, या दोन्ही गोष्टी स्पष्ट होतात.

पुढे १९६१ मध्ये आम्ही कर्मवीर भाऊराव पाटलांचे प्रेरणेने निपाणी येथे कॉलेज काढण्याचे ठरविले. त्यासाठी कर्नाटक विद्यापीठाकडे चौकशी केली. त्यांच्या जाचक अटी पाहून आम्ही अर्जुननगर येथे कॉलेज काढण्याचा निर्णय घेतला. पुणे विद्यापीठाने आम्हास परवानगी दिली, संलग्न करून घेतले. या कॉलेजचे उद्घाटन यशवंतरावजींचे हस्ते झाले. त्या वेळी त्यांनी सीमा भागातील जनतेने आपल्या संस्कृतीच्या रक्षणासाठी हे कॉलेज स्थापन केले याचा अधिकारवाणीने उल्लेख केला. त्याचाच परिणाम म्हणजे सीमाभागाचा लुप्त झालेला प्रश्न पुन्हा जिवंत झाला, धसास लागला. पुढे १९६३ मध्ये शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. आम्हाला आनंद झाला. गेल्या पंचवीस वर्षांत निपाणी भागातील एक पिढी या महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडली. आमच्या कॉलेजचे शेकडो माजी विद्यार्थी आज नामवंत डॉक्टर, तंत्रज्ञ, शेतीतज्ज्ञ, प्राध्यापक, प्रशासक, उद्योजक व व्यापारी या नात्याने देशात व परदेशातही उज्ज्वल यश व नाव कमवीत आहेत.

नव्या विद्यापीठाशी आमच्या कॉलेजचे संलग्नीकरण करण्यात काही तांत्रिक अडचणी आल्या. वास्तविक सर्व व्यवहार स्वच्छ होते. नामवंत प्राध्यापकवर्ग होता,जिद्दीने सर्व आवश्यक साधनसामग्री व इमारतींची पूर्तता केलेली होती. त्या वेळी योगायोगाने कऱ्हाडला मी यशवंतरावजींना भेटलो नि सहज विषय काढला. बोलण्याच्या ओघात, सीमाभाग अद्याप संयुक्त महाराष्ट्रात नाही याची खंत यशवंतरावांना फार आहे हे जाणवले. त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले. पुढे शासकीय चक्रे कशी हलली याची मला आजही कल्पना नाही. पण कॉलेजच्या संलग्नीकरणातील अडचणी तर दूर झाल्याच पण पुढे यशवंतरावजी केंद्रसरकारात गेल्यानंतरही नामदार बाळासाहेब देसाई व नामदार वसंतरावजी नाईक यांच्याकडूनही आमच्या कॉलेजला खास सवलती मिळत गेल्या. त्या अद्यापही चालू

आहेत. यशवंतरावांचा वरदहस्त लाभलेले आमचे कॉलेजही अद्याप न सुटलेल्या सीमाप्रश्नाचे प्रतीक आणि या भागातील अस्मितेचे आणि मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक परंपरेचे केंद्र बनले आहे. या कॉलेजचा यंदा रौप्य महोत्सव आम्ही साजरा करीत आहोत. पण या मागील स्फूर्ती असलेले यशवंतरावजी आज आमच्यात नसल्याने त्यांच्या आठवणीने डोळे पाणावतात. हृदय भरून येते.

## कमलाशंकर पंड्या
## लौकिक व्यक्तिमत्वाचा मऱ्हाठमोळा माणूस

यशवंतरावांची आठवण झाली की, त्यांची अनेक रूपे आज डोळ्यांपुढे उभी राहतात. मुंबई राज्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी, द्विभाषिक मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, विरोधी पक्षनेते ही त्यांची राजकीय रूपे. या प्रत्येक रूपात वावरताना, आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा त्यांनी उमटवून ठेवलाच, पण या सर्व भूमिका वठवताना "एक संस्कारक्षम माणूस" हे त्यांचे मूळचे रूप कायम होते. राजकारणात वावरणाऱ्या माणसाला नेहमीच मनासारखे निर्णय घेता येत नाहीत. अनेकदा मनाला पटणारे निर्णय बाजूला ठेवून, सदसद्विवेकबुद्धीला प्राप्त परिस्थितीनुसार मुरड घालून निर्णय घ्यावे लागतात वा इतरांनी घेतलेले निर्णय मान्य करावे लागतात. त्याचा परिणाम म्हणून टीकेचे घावही सोसावे लागतात. यशवंतरावांच्यावर असे प्रसंग त्यांच्या राजकीय कारकीर्दित अनेकदा आले पण त्यातून धैर्याने व संयमाने त्यांनी वाट काढली. हे त्यांना शक्य झाले ते त्यांच्या संस्कारक्षम मनामुळे.

"संस्कारक्षम मन असणे ही देणगी नियतीची" असे यशवंतराव एका ठिकाणी म्हणतात. ही देणगी त्यांना मुळातच लाभली होती. कृष्णाकाठच्या निसर्गाचे, आई विठाईचे, विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या समतावादी नेत्याचे प्रत्यक्ष संस्कार त्याना कोवळ्या वयात लाभले. राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गांधी, नेहरू यांच्यासारख्या कार्यापासून यशवंतरावांनी राष्ट्रीय संस्कार घेतले. तसेच वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, तात्यासाहेब केळकर, नाट्याचार्य खाडिलकर यांच्यासारख्या साहित्यिकांकडून सांस्कृतिक अभिरुचीचे संस्कार घेतले. या सर्व

संस्कारांनी घडलेला यशवंतरावांचा पिंड, पुढच्या आयुष्यातील राजकीय धबडग्यात टिकून राहिला. देशात अगर परदेशात कोठेही गेले तरी यशवंतरावांनी आपल्या प्रासंगिक, राजकीय, जबाबदारीबरोबरच आस्था बाळगली ती तिथल्या माणसांबद्दल, त्यांच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल, ते समृद्ध करणाऱ्या निसर्गाबद्दल, यशवंतरावांनी आयुष्यात मित्र खूप मिळविले . त्यात कॉ. डांगे, आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांच्यासारखे त्यांचे राजकीय विरोधकही होते. पण यशवंतरावांची अगदी खरीखुरी मैत्री होती ती ग्रंथांशी. ललित, वैचारिक, राजकीय, शास्त्रीय, अशा कोणत्याही दालनातील ग्रंथ त्यांनी सदैव आपले मानले, मराठी साहित्य आणि साहित्यिक हा तर त्यांचा खास प्रेमाचा विषय. या प्रेमाचा यथेच्छ लाभ कित्येक जुन्या – नव्या साहित्यिकांना झाला आहे. माय मराठीचे बारसे त्यांनीच केले. या अखंड ग्रंथप्रेमानेच यशवंतरावांच्यातील 'संस्कारक्षम' माणूस अखेरपर्यंत जिवंत राहिला. या संस्कारक्षम मनामुळे राजकीय उलथापालथीत कधी यशवंतरावांना फायद्याची पाऊले टाकता आली नसतील, कधी महत्त्वाची संधी हुकलीही असेल, पण त्याची खंत त्यांनी कधी बाळगली नाही. म्हणूनच आज त्यांच्या स्मृतीला उजाळा देताना प्रत्येकाला जाणवतो आहे, तो त्यांच्या संस्कारक्षम मनाचा उमटलेला ठसा. यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्वाचे मूल्यमापन काळ काय करायचे ते करेल, पण त्यांच्यातील संस्कारक्षम माणसाचे मूल्यमापन करण्यासाठी काळाची तरी काय गरज? गरज आहे ती त्यांच्या स्मृती जपण्याची.

# एस्. एम्. जोशी
## जीवननिष्ठ यशवंतराव

यशवंतरावांचे आतापर्यंतचे जीवन सफल राहिले आहे. जीवनात चढउतार हे येतातच. राजकीय जीवनात तर विशेषच. यशवंतरावांच्या वाट्याला देखील ते आले आहेत. कित्येक वर्षे सत्तास्थानावर राहिल्यानंतर सध्या ते विरोधी पक्षात आहेत. त्यामुळे पूर्वी त्यांचा जसा बोलबाला होई तसा आज होत नाही, परंतु त्यातच माणसाची कसोटी होत असते. लोक आपल्याला किती चाहतात हेच काही जीवनाच्या यशस्वितेचे माप नव्हे.

जीवनाची यशस्विता अथवा अयशस्विता कशात आहे? अंतरात्म्याने बऱ्या वाईटाबद्दल दिलेला कौल आपण मानतो की नाही यावर माणसाच्या जीवनाचे मूल्यमापन मुख्यतः अवलंबून असते.

जीवननिष्ठेशी प्रतारणा नाही – सर्व जीवन आणि विशेषतः मानवी जीवन हे प्रत्येकाच्या ठिकाणी वास करीत असलेल्या आत्मतत्त्वाचा आविष्कार आहे. ही भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक आहे. म्हणूनच आम्ही महात्मा गांधींच्या शिकवणुकीनुसार आपली जीवने घडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. मानव समाज एकसंध आहे, जे काही बरे वाईट घडते त्याच्याशी माझा यत्किंचितही संबंध नाही असे म्हणू शकत नाही. मानवी जीवनाच्या एकसंधतेवरच आमची जीवननिष्ठा आधारलेली असावयास पाहिजे.

या दृष्टीने पाहता यशवंतरावांनी आपल्या जीवननिष्ठेशी कधी प्रतारणा केली नाही. मतभेद असू शकतात. कित्येक वेळी भल्याबुऱ्यासंबंधीचे चुकीचेही ते होऊ शकतात. कालांतराने तसे सिद्ध होऊन जाते. परंतु जो निर्णय घेतला तो अंतरात्म्याशी साक्षी ठेवून घेतलेला असला पाहिजे. म्हणूनच त्यांच्या माझ्यामध्ये सतत सामंजस्य राहिलेले आहे.

जुळलेली वेव्हलेंग्थ

निराळ्या शब्दात सांगायचे तर आमच्यामधील वेव्हलेंग्थ कधीच मोडलेली नाही. त्यांनी दिलेला शब्द कधी मोडल्याचे मला स्मरत नाही. त्यांच्याबद्दलचा माझा हा विश्वास माझ्या काही मित्रांना पसंत पडत नसे, परंतु त्यांची चूक मागाहून त्यांना कबूल करावी लागे.

त्यांच्यासंबंधी प्रेमादराची भावना जीवननिष्ठेमुळेच पोसली जाते. त्यांचे व माझे अनेक वेळा मतभेद झालेले आहेत. जनतापक्ष त्यांच्या अविश्वासाच्या ठरावामुळे जेव्हा फुटू लागला तेव्हा त्यांनी आमच्याशी सहकार्य करावे अशी आमची खटपट होती. त्यांना तसे करणे बरोबर वाटले नाही. आम्हाला त्यांच्या निर्णयामुळे वाईट वाटले. परंतु तदनंतर ज्या घटना घडल्या त्यावरून विनंती त्यांनी का अमान्य केली याचा उलगडा होऊ शकतो.

## पारिवारिक सौहार्द

स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या आम्हा स्वातंत्र्य सैनिकांच्यामध्ये आपुलकीचे विशेष संबंध निर्माण झाले आहेत. एका परिवारातील माणसे जशी नाजूक प्रेमभावनेने बांधली जातात तसाच काहीसा हा प्रकार आहे. त्यामुळे एकमेकांचे दोष माहीत असूनही आमच्यामध्ये पारिवारिक सौहार्द आहे. परस्परांच्या सुखदुःखात आम्ही सहभागी होतो. अडीअडचणीच्या वेळी साहाय्य देण्यास, मानण्यास, मनाला संकोच वाटत नाही. नव्या पिढीच्या लोकांना आमच्या या पारिवारिक संबंधाचे आकलन होऊ शकत नाही आणि त्याचे महत्त्वही समजत नाही. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्यांना हा अमूल्य वारसा मिळालेला आहे. या मार्गाने जाण्यातच जीवनाचे साफल्य आहे असे आम्ही मानतो व त्यामुळे आमच्या जीवनात वैफल्याचे सावट येऊ शकत नाही.

## नानासाहेब गोरे
## महाराष्ट्र व देशाच्या बांधणीत यशवंतरावांचा मोठा वाटा

श्री. यशवंतराव चव्हाण यांचे सगळे आत्मचरित्र जर पूर्ण होऊ शकले असते तर भारताच्या आणि खास करून महाराष्ट्राच्या इतिहासातील काही प्रकरणांवर प्रकाशझोत पडल्यासारखे झाले असते, पण त्यांच्या हातून त्यांचे कृष्णाकाठचे जीवनच शब्दांकित होऊ शकले, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सागरकाठी वसलेल्या मुंबईत आणि यमुनेच्या तीरावर वसलेल्या दिल्लीतच यशवंतरावांच्या जीवनाला बहर आला आणि तेथेच यशवंतरावांचा जो थोरपणा आपल्याला स्मरतो तो फुलला आणि फळास आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची जी महाराष्ट्राची आणि भारताची बांधणी झाली, तीत यशवंतरावजींचा फार मोठा वाटा आहे. त्याचे तपशीलवार वर्णन येथे करणे शक्य होणार नाही, परंतु त्यांच्या पुढारीपणामुळे ज्या दोन घटना घडल्या, पहिली महाराष्ट्रात आणि दुसरी देशात, त्यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

पहिली घटना महाराष्ट्रात घडली. ती यशवंतरावजींच्या विचारावर समाजवादाची जी छाप पडलेली होती, त्याची निदर्शक समजली पाहिजे. आज जे नाव सर्व देशभराच्या सहकारी क्षेत्रात गाजत आहे, ते प्रामुख्याने महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे. परंतु अनेकांचे त्यात ज्या एका गोष्टीकडे दुर्लक्ष होण्याचा संभव आहे, असे मला वाटते, ती गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातल्या त्या वेळच्या खासगी साखर कंपन्यांकडे असलेली जवळजवळ ८०,००० एकर जमीन त्यांच्याकडून घेऊन तिचे रूपांतर शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विशाल कृषिक्षेत्रात करणे. ही हजारो एकर जमीन शासनाने नेमलेल्या मंडळाच्या हाती सोपवावयाची आणि तिथे प्रचंड प्रमाणावर उसाचे उत्पादन करून तो ऊस सहकारी

साखर कारखान्यांना पुरवावयाचा, अशी ती भव्य योजना होती. शासननियंत्रित शेती महामंडळाचा हा भक्कम आधार जर पाठीशी नसता, तर महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने एवढ्या मोठ्या प्रमाणात उभे राहिले असते की नाही, यात शंका आहे. हे शेती महामंडळ आपण आर्थिक समाजवादाच्या दिशेने राज्याची वाटचाल व्हावी म्हणून निर्माण करीत आहोत, याची जाणीव त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या यशवंतरावजींच्या ठिकाणी होती आणि त्यांनी ती समाजवादाच्या दिशेने टाकलेले एक पाऊल अशा शब्दात बोलूनही दाखविली होती.

आजचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांना यशवंतरावांच्या या भव्य स्वप्नाचे भान आहे असे दिसत नाही. नाहीतर या जमिनीपैकी हजारो एकर जमीन पुन्हा मूळ मालकांना देण्याची योजना त्यांनी मनाशी आखलीच नसती.

यशवंतरावजींची दुसरी एक श्रेष्ठ कामगिरी म्हणजे भारतीय सेनादलाची फेरबांधणी. कै. कृष्ण मेनन यांच्या चुकीच्या धोरणामुळे भारतीय सैन्याची किती दुर्दशा झाली होती, ते १९६२ मध्ये चीनने पाहता पाहता हिमालयाच्या खिंडीतून आसाममध्ये तेजपूरपर्यंत जी मुसंडी मारली त्या वेळी लक्षात आले. त्या वेळी जनरल अँडरसन यांच्या नेतृत्वाखाली सैन्याच्या या पराभवाचे व दुर्दशेचे कारण खोलवर जाऊन शोधण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. तिने जो अहवाल सादर केला, तो शासनाने कधीच उजेडात येऊ दिला नाही. त्या वेळी कृष्ण मेनन यांच्या जागी पं.जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावजींची नेमणूक संरक्षणमंत्री म्हणून केली. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला, हे शब्द त्या घटनेला उद्देशून रूढ झाले आहेत. अँडरसन अहवाल जरी जनतेसमोर कधी आला नसला तरी तो यशवंतरावजींसमोर आला आणि यशवंतरावजींनी त्यापासून योग्य तो बोध घेतला हे उघड आहे. त्यानंतर अहवलातील सूचना ध्यानात घेऊन भारतीय सेनादलाची जी आखणी झाली, तिला डागडुजी म्हणता येणार नाही. भारतीय सेनादलाचा तो

पुनर्जन्मच म्हणावा लागेल.यशवंतरावजींनी ही कामगिरी किती चोखपणाने पार पाडली याचे प्रत्यंतर पुढे चार वर्षांनी झालेल्या भारत-पाक युद्धात आणि त्यानंतर बांगला देशच्या निमित्ताने झालेल्या दुसऱ्या युद्धात दिसून आले.

कै. कृष्ण मेनन जितके बडबडे, तितके यशवंतरावजी मितभाषी, अजिबात गाजावाजा न करता त्यांनी आपल्या सेनादलाची फेररचना केली. उणिवा दूर केल्या. दारूगोळ्याचे कारखाने, कै. मेनन यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे विजेच्या किटल्या आणि गॅसच्या चुली अशासारख्या फालतू गोष्टी न करता दारूगोळाच तयार करतील यावर यशवंतरावजींनी भर दिला.

सेनादलाच्या पुनर्रचनेचा जो भक्कम पाया त्या वेळी यशवंतरावांनी घातला, त्यावरच आजच्या आपल्या सामर्थ्यवान सेनादलाची इमारत उभी आहे, याचा विसर आपणास पडता कामा नये.

एवढी राष्ट्राची भरीव कामगिरी ज्या यशवंतरावजींनी केली, त्यांच्याकडे पुढेपुढे दुर्लक्ष झाले आणि त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाचा आणि अनुभवसंपन्न बुद्धीचा जो लाभ शासनकर्त्या पक्षाला आणि विरोधी पक्षाला मिळायला हवा होता, तो मिळू शकला नाही, याचे मात्र वाईट वाटते.

## बाबूराव पारखे
## संस्कारसंपन्न सौजन्यशीलता

मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना मी त्यांना प्रथम भेटलो. एक छोटासा कारखानदार फार मोठ्या प्रकल्पात उडी घेणार होता. आत्मविश्वास हेच माझे भांडवल होते. यशवंतरावजींना तेच पुरेसे वाटले असावे आणि एका मोठ्या कारखानदाराला डावलून त्यांनी मलाच प्रोत्साहन द्यावयाचे ठरविले. आमच्या सोनगड (गुजरात) च्या कारखान्याच्या उभारणीचे असे श्रेय यशवंतरावजींना आहे. एक राज्यकर्ता म्हणून मी त्यांना प्रथम भेटलो पण त्यातून आमचा स्नेह निर्माण झाला तो अगदी शेवटपर्यंत. मी दिल्लीला गेलो असता वृत्तपत्रात वाचले की, यशवंतरावजी बडोद्याला जाणार आहेत. त्या वेळी ते अर्थमंत्री होते. सहज वाटले की, विचारावे बडोद्यापून सोनगडला भेट देणार का ? जाण्या-येण्याचा तीनशे मैलांचा प्रवास, कितपत हो म्हणतील असे वाटत होते. पण यशवंतरावजींनी अनुमती दिली आणि त्याप्रमाणे आलेही.

यशवंतरावजींचा जसा स्नेह वाढत गेला तसतसा त्यांच्या विशाल कर्तृत्वाचा परिचय होत गेला. माझ्या आयुष्यात अनेक कर्तृत्ववान मंडळी भेटली, पण यशवंतरावांचा माझ्या मनावर उमटलेला ठसा काही आगळा आहे. त्यांच्या कर्तृत्वाला संस्कारशीलतेची जी झलक होती ती त्यांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. राजकारणात अशी माणसे विरळा होत चालली आहेत. हिमालयाच्या संरक्षणासाठी ते धावून गेले, पण कृषणाबाईचा संथपणा बरोबर घेऊन. जनसामान्यातून ते वर आले आणि स्वतःच स्वतःला घडवीत असताना स्वतःतील असामान्यत दाखवून दिले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद असो किंवा देशाचे संरक्षण असो, परराष्ट्र धोरण असो वा अर्थसंचलन असो, त्या प्रत्येकात यशवंतरावजींचे वैशिष्ट्य प्रत्ययाला आलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राची जी जडणघडण झाली आहे तिचे फार मोठे श्रेय यशवंतरावजींनाच द्यावयाला हवे. नावाप्रमाणेच महाराष्ट्र "महा-राष्ट्र" व्हावयाला हवे, त्याच्यातील गरिबीचा न्यूनगंड त्यांना घालवावयाचा होता. त्याची अस्मिता जागृत करावयाची होती. एकीकडे शिवछत्रपतींचे आदर्श कार्य सारखे दुमदुमत राहील हे पाहिले तर दुसरीकडे लोकशाहीत जनसामान्यांचाच खरा आधार म्हणून त्यांच्यातील नेतृत्व उदयाला येईल हे आवर्जून पाहिले.

त्यासाठी कृषी-उद्योग या नव्या प्रयोगाला त्यांनी खतपाणी दिले. ज्या सहकार क्षेत्राला यशवंतरावजींनी योजनापूर्वक वाव दिला त्यातील गुणदोषांचे विश्लेषण अधूनमधून वाचावयाला मिळते. त्याची सत्यता थोडीफार मान्य करूनही असे कबूल करावे लागेल की योग्य संधी न लाभल्याने ज्या सुप्त शक्ती वाया जात होत्या त्यांना वाव मिळाला. ग्रामीण भागात त्यांचे कर्तृत्व उदयाला येत गेले.

यशवंतरावजींना परिचय झाला की, संधी मिळताच त्यांना भेटावे, त्यांचे प्रसन्न हास्य जवळून न्याहाळावे आणि त्यांच्या तोंडून एखादा मौलिक विचार ऐकावा, असे कोणालाही वाटेल अशा प्रकारचा विलोभनीय, सौजन्यशील आणि संस्कारसंपन्न स्वभाव त्यांचा होता. ते मुरब्बी राजनीतिज्ञ असल्याने बेताने बोलावयाचे. या स्वातंत्र्याच्या लढ्यात पडले आणि त्यातून राजकारणी बनले, पण त्यांचा आणखी एक पैलू उपजत साहित्यिकाचा होता. प्रचंड कार्यबाहुल्यातूनही वाचन-लेखनाला ते वेळ काढू शकत. त्यांना कामाचा उरकही तसाच दांडगा होता. घरी अगर कचेरीत टेबलावर फायलींचा ढीग पडला आहे, असे क्वचितच दिसे. जे खाते त्यांच्या अखत्यारीत असावयाचे त्याचा पूर्ण आवाका असल्याशिवाय असे काम उरकले जाणे कसे शक्य आहे? तसे म्हटले तर यशवंतरावजी महाराष्ट्रात होते तेव्हा किंवा केंद्रात गेले तेव्हाही कोणाचीही योग्य असणारी कामे केलेलीच आहेत. ते त्याबद्दल फारसे बोलत नसत. पण मुकाट्याने रास्त काम करण्याकडे त्यांची प्रवृत्ती

असावयाची. ते अधिकारावर होते तेव्हा आणि अधिकारावर नव्हते तेव्हाही त्यांना भेटावे आणि त्यांचा पोक्त सल्ला घ्यावा, असेच त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व होते.

यशवंतरावजींना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून सर्वजण गौरवितात ते खरे आहेच, पण अनेकांची जीवने त्यांनी घडविली आहेत. नामनिर्देश न करता एक दलित प्राध्यापक मला अकस्मात भेटले होते. त्यांची आणि यशवंतरावजींची भेटही झालेली नव्हती व त्या गृहस्थांनी बालवयात शिक्षणासाठी मदतीची विनंती केली आणि त्यांचे सारे शिक्षण पुरे होईपर्यंतची व्यवस्था त्यांनी परस्पर करून दिली होती !

एक निस्सीम मातृभक्त, एक संस्कारसंपन्न राजकीय नेता, एक चतुरस्त्र कर्तृत्व असलेला प्रशासक, चेहऱ्यावरून न दाखविणारा पण तितकाच मनाने हळवा असलेला स्नेही आज आपणातून निघून गेला असला तरी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उठवून.

## कुलगुरू दत्ताजीराव साळुंखे
## माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय व्यक्ती

तसा मी स्वतःला मोठा भाग्यवान समजतो. कारण लहानपणापासून मला बऱ्याच थोर व्यक्तींचा सहवास लाभला. कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, साहेब ऊर्फ यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई आणि सध्याचे राजस्थानचे राज्यपाल माननीय श्री. वसंतदादा पाटील यांनी माझ्या आयुष्याला वेगळेच वळण दिले. इतकेच नव्हे तर माझ्या व्यक्तिमत्वावरही त्यांच्या विचारसरणीचा फार मोठा ठसा उमटलेला आहे.

लहानपणी स्वातंत्र्याच्या लढ्यात मी आणि माझे काही मित्र त्या वेळी भूमिगत असलेल्या यशवंतराव चव्हाण आणि श्री. वसंतदादा यांना मदत करीत असू. निरोप देणे, माहिती काढून आणणे, जेवणाचे डबे देणे, इत्यादी कामे मोठ्या हुरूपाने करीत असू. त्या वेळी "देशाला स्वतंत्र करायचे" ह्या भावनेचा एवढा मोठा पगडा आमच्या मनावर असे की, कित्येकदा शाळेला बुट्ट्या मारून आमचे हे देशकार्य नियमितपणे चालायचे. हे जेव्हा यशवंतराव चव्हाण ऊर्फ साहेब यांच्या कानावर येऊ लागले तेव्हा त्यांनी मला बाजूला नेऊन "शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे" यावर चांगलेच भाषण सुनावले. त्यांचे म्हणणे खूप जरी पटले तरी स्वातंत्र्याच्या लढ्यात हिरीरीने भाग घेण्याच्या कल्पनेने भारावलेल्या माझ्या मनाला काही पटेना. तेव्हा एक ठरवले की, साहेबांच्या आणि माझ्या वडिलांच्या नकळत तरी आपले कार्य चालू ठेवायचेच! पण दुर्दैवाने मी आणि माझा मात्र पकडलो गेलो. आम्हाला पोलिस चौकीवर नेण्यात आले. पोलिस म्हणताच आम्ही चांगलेच हादरलो. कारण साहेब आणि माझे वडील यांच्या कानावर हे जाणार आणि आमची चांगलीच चटणी होणार, हे भवितव्य डोळ्यासमोर येऊ लागले.

पोलिसांनी खूप माहिती काढण्याचा प्रयत्न केला, पण आम्ही त्यांना दाद लागू दिली नाही. तेव्हा त्यांनी आम्हाला तुरुंगात डांबून ठेवले. माझ्या वडिलांनी स्पष्टपणे सांगितले की, “अभ्यास सोडून उनाडक्या करतोय तेव्हा त्याला जितके दिवस ठेवता येईल तितके दिवस तिथेच ठेवा.” झाले! वडिलांनी असा निर्णय घेतल्यावर काय करावं तेच सुचेना. आम्ही स्वातंत्र्यवीर जरी होतो तरी खूपच छोटे वीर होतो. त्यामुळे आम्हाला दम देणे किंवा कित्येकदा आमची टर उडवण्याखेरीज दुसरे काहीच होईना. हळूहळू पश्चात्ताप होऊ लागला आणि आठवू लागले की, वडील आणि साहेब यांचे सांगणे किती हिताचे होते ते...

अंदाजे दहा ते पंधरा दिवसांनंतर एक पोलिस अधिकारी तेथे आले. त्यांनी आम्हांला बोलावून घेतले आणि खूप दम देऊन सोडून दिले. जाताना तेही म्हणाले की, “शाळा शिकून मोठं व्हा आणि मग देश सांभाळा, नाहीतर परत तुरुंगातून सोडणार नाही.” त्यांच्या उपदेशाला मान तुकवीत आम्ही जे पळालो ते थेट घरी आलो. घरी वडिलांच्या जवळ साहेब बसले होते. त्यांना पाहताच धडकीच भरली. परंतु साहेबांनी “दत्ता, इकडे ये, माझ्याजवळ बैस”, म्हणून शांतपणे बोलावल्यावर मी त्यांच्या जवळ जात म्हटले की “साहेब रागवू नका, मी चुकलो, तुमचे ऐकले नाही. मलाही स्वतांत्र्याच्या लढ्यात भाग घ्यायचा होता म्हणून मी तुमच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केले.” साहेबांनी मला जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवीत एवढेच सांगितले की, “दत्ता, उत्तम शिक्षण घेऊन आपल्या देशातल्या लोकांना साक्षर करणं, मोठमोठे शोध लावून देशाचे नाव उज्ज्वल करणं हा देखील एक प्रकारे स्वातंत्र्याचा लढाच आहे. त्या लढ्यात तू उतर, तुझ्यासारख्यांची गरज त्या लढ्यात आहे.” मला पोटाशी जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवीत साहेब बोलत होते. माझ्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते. साहेबांचे शब्द अजूनही माझ्या अंतःकरणात कोरले गेलेले आहेत. माझ्या हातून काहीही संशोधन, पेपर्स प्रसिद्ध झाले किंवा पुस्तके प्रसिद्ध झाली की, मी न चुकता साहेबांना

कळवीत असे. अत्यंत अभिमानाने साहेबही मला उत्तेजन देत असत. केव्हाही भारतात मी आलो तरी साहेबांची गाठ घेतल्याशिवाय कधीही परत फिरलो नाही.

बऱ्याच वर्षांनी मला माझ्या देशाची सेवा करण्याची संधी मिळाली. साहेबांनी इकडे येण्यास उत्तेजन दिले, आणि मी राहुरीची कृषी विद्यापीठाची सूत्रे साहेबांच्या आशीर्वादाने हातात घेतली. मध्यंतरी सौ. वेणूताई ऊर्फ वहिनींचे निधन झाले. त्याचा फारसा परिणाम साहेबांच्यावर झाला. त्यांची प्रकृती नीट राहात नव्हती, आणि आम्ही जेव्हा भेटत असू तेव्हा सौ. वहिनींच्या आठवणीने साहेब खूप व्याकूळ होत असत. मी त्यांच्या मुलासारखाच होतो, त्यामुळे ते मोकळेपणे आपली व्यथा माझ्याजवळ सांगत असत. गेल्या वर्षी त्यांचा अचानक भेटण्यास येत असल्याचा निरोप आला. माझ्या पत्नीला त्यांनी सांगितले की, भरपूर थालिपिठे तयार ठेवा, कारण पुष्कळ दिवसांनी मी थालिपीठ खाणार आहे. त्या दिवशी साहेबांनी आमच्या बरोबर बराच वेळ घालवायचा असे ठरविले होते. त्या दिवशी साहेबांच्या बरोबर आमच्या आक्का ऊर्फ डॉ. सरोजिनी बाबरही आल्या होत्या, त्यामुळे आठवणी, गप्पागोष्टींत वेळ कसा गेला तेच समजले नाही. त्या वेळी साहेबांना आम्ही आमच्याकडे राहण्याचा खूप आग्रह केला. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांना दिल्लीला जायचे होते म्हणून राहू शकले नाहीत. जाताना मला पोटाशी घेऊन एवढंच म्हणाले, "दत्ता, तुझा मला खूप अभिमान वाटतो." मी देखील अश्रू पुसत त्यांच्या चरणांवर माथा ठेवीत म्हटले, "हे सारे तुमच्या शिकवणीचं व मार्गदर्शनाचं फळ आहे साहेब."

साहेब दिल्लीला गेले. त्यांची प्रकृती बरी नव्हती तेव्हा फोनवरून बरेच वेळा चौकशी केली, आणि अचानकच एके दिवशी रात्री फोन आला की, साहेब दवाखान्यात असून खूप सीरियस आहेत. खूप प्रयत्न केला परंतु फोन काही लागेना. ईश्वराजवळ प्रार्थना करीत होतो की साहेबांची तब्येत ठीक होऊ देत. मला वाटते की, परमेश्वराला देखील वाटले असेल की

साहेबांनी खूप कष्ट काढले आहेत. खूप सोसले आहे. त्यांना खऱ्या विश्रांतीची गरज आहे. साहेब गेले. पण त्यांनी माझ्यावर केलेले प्रेम आयुष्यभर माझी राखण करणार आहे आणि मला मार्गदर्शन देणार आहे. खरेच या बाबतीत मी खूप भाग्यवान आहे.

## टी. एस्. शृंगारे
## प्रेमळ साहेब

एखादा कार्यकर्ता त्यांच्या सान्निध्यात येऊन गेला की, तो कदापिही साहेबांपासून दूर जाऊ शकत नसे, हे त्यांच्या प्रेमळ स्वभावाचे लक्षण आहे. कार्यकर्त्यांच्या जीवनातील सुखदुःख व त्यापाठीमागच्या प्रेरणा, यातना, वेदना समजावून घेतल्या की, संघटनेतील कार्यकर्त्यांमध्ये स्नेहाचे जाळे ते विणीत असत. असे अनेक कार्यकर्ते खालपासून वरपर्यंत त्यांनी निर्माण केले. काही विश्वासाची माणसे सांभाळली आणि त्यासाठी असंख्यांच्या मनाची विचारांची जपणूक केली.

राजकारणात कोणतीही गोष्ट सरळ आणि सहजरीत्या करता येत नसते. कार्यकर्ते हे पक्षांचे भांडवल असते, म्हणून परस्परात कसलाही वैचारिक दुरावा न होईल याची त्यांनी काळजी घेतली. त्याचाच परिणाम महाराष्ट्रात असंख्य कार्यकर्त्यांचे मोहोळ ग्रामीण आणि शहरी विभागात निर्माण झाले. काँग्रेस संघटनेची बांधणी यशस्वीरीत्या होऊ लागली.

चव्हाण साहेबांच्या बालमनावर बऱ्यावाईट अनुभवांचे संस्कार झालेले आहेत. पण त्यांची आई खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारी होती. अशा परिस्थितीतून जो मनुष्य जातो तोच खऱ्या अर्थाने देशाची सेवा करू शकतो. विद्यार्थिदशेत असतानाच अवांतर पुस्तके वाचण्याची व त्यावर विचारमंथन करण्याची सवय त्यांना होती. त्यामुळे त्यांच्या मनावर चांगले संस्कार झाले आहेत. त्याशिवाय या देशातील समाजसुधारक कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, टिळक, फुले, आंबेडकर इत्यादींच्या विचारांचा यशवंतरावांच्या जीवनावर परिणाम झाला आहे. त्यांच्याकडून त्यांना सतत स्फूर्ती व प्रेरणा मिळालेली आहे. त्या अनुरोधानेच त्यांच्या मनाची बांधणी झालेली आहे. प्रत्यक्ष राजकारणात

उतरल्यानंतर सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेचा मनात विसर पडू न देता ते साध्य करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात धोरणात्मक बदल केले.

चव्हाण साहेबांनी सर्व जाति-जमातींच्या कार्यकर्त्यांच्या गुणवत्तेचा विचार करून, मानाच्या व सत्तेच्या जागी नेमणुका करून, सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू केली. या प्रक्रियेत उपेक्षित व पिढ्यान् पिढ्या दुर्लक्षित समाजाला विशेष प्राधान्य दिले व त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढविली.

शिवाय दलित, बौद्ध, आदिवासी व भटक्या विमुक्त जातिजमातींना शैक्षणिक, आर्थिक व सरकारी नोकरीसंबंधी विशेष सवलती उपलब्ध करून देऊन कायदेशीर तरतुदीही करून दिल्या.

चव्हाण साहेबांनी अंगीकारलेले कोणतेही कार्य असो ते निश्चयाने व संयमाने त्यांनी पुढे नेले आहे. अन्यायापुढे कधी त्यांनी मान तुकविली नाही. राजकीय बऱ्यावाईट प्रसंगांना संयमाने तोंड दिले. त्यांचे राजकीय जीवन ही एक खडतर तपश्चर्याच आहे. मनाने कोमल असूनही अन्यायाशी कठोरपणे प्रतिकार करण्याच्या स्वाभिमानी माणसाचे दर्शन त्यांच्या जीवनात आढळते.

सत्तेची पदे हे मोराचे पंख असतात. हे केव्हा गळून पडतात त्याचा नेम नाही. पण आपल्याला मिळालेली सत्ता ही जनतेची असून ती जनतेच्या हितासाठी व उद्धारासाठी, उन्नतीसाठीच वापरली पाहिजे असा साहेबांचा आग्रह होता. त्यांचे ध्येयवादी कुशल नेतृत्व व विधायक मार्गदर्शन आम्हा सर्वांना प्रेरणा देणारे स्फूर्तिस्थान आहे.

## ग. नी. जोगळेकर
## साहेबांना माणुसकीची पारख होती

मला वाटतं चव्हाणसाहेबांना माणसाची पारख करण्याची विलक्षण हातोटी होती. एखाद्यावर ते इतके प्रेम करीत, इतका विश्वास टाकीत की तो माणूस त्या ओझ्याखाली राहण्यात धन्यता माने.

जनतेच्या हृदयात मानाने विराजमान झालेला, सुसंस्कृत मनाचा एक अखिल भारतीय स्तरावरील नेता आपल्यावर प्रेम करतो ही कल्पनाच मोठी सुखद असे. संघाचे गुरुजी गेले आणि माझे मानसमंदिर सुनेसुने झाले. चव्हाणसाहेबांची ओळख झाली आणि त्याच क्षणी पुन्हा मानसमंदिर भरून गेले.

गेली बारा-तेरा वर्षे मी नियमितपणे वर्षातून एकदा चव्हाणसाहेबांकडे त्यांच्या कामासाठी दिल्लीला जाऊ लागलो. त्या प्रचंड चौकात सफदरजंग रोड, अकबर रोड, राजाजी रोड, त्रिमूर्ती रोड आणि रेसकोर्स रोड असे सारे रस्ते एकत्र येतात. त्यातील एक रेसकोर्स रोड चव्हाणसाब की कोठी-हे माझे उतरण्याचे ठिकाण. रस्त्यापासून चांगला फर्लांगभर आत जाणारा जरासा तिरका रस्ता, त्या कडेने प्रचंड वृक्ष, आत कार्यालयासाठी असलेली एक बैठी चार मोठ्या खोल्यांची इमारत, शेजारी राहण्यासाठीची इमारत. भोवती हिरवळीची विस्तृत मैदाने, त्यातच डवरलेल्या तुळशीचा संभार घेतलेले तुळशी वृंदावन, कंपौंडच्या कडेने सेवकवर्गासाठी असलेली बैठी घरे, अशाच एक घरात डोंगरे राहात असत. ते होते तोपर्यंत मी त्यांच्याच घरात राहात होतो. गेली सात वर्षे मी साहेबांच्या घरात त्यांचा पाहुणा म्हणून उतरत असे.

मला न्यायला विमानतळावर गाडी घेऊन माणूस यायचा. पाहुण्यांसाठी खोली नीटनेटकी केलेली असे. जाऊन पोचलो की, मग साहेब आणि वेणूताई दोघेही माझ्या खोलीत येत चहा-कॉफीच्या वेळा

विचारत. जेवणाच्या वेळा आणि पथ्य विचारत. मी असेपर्यंत स्वयंपाकघरातून कांदा-लसूण यांची हकालपट्टी असे.

घरच्या माणसांची विचारपूस करीत आणि मग सर्व मुक्कामात तिथली गडी-माणसे जागरुकतेने लक्ष ठेवीत, हवं-नको विचारत. मध्येच गंगा नावाचा सेवक येऊन विचारे, "साब विचारतात, मोकळे असताल तर गप्पा मारायला येऊ का?"

जेवताना गप्पांना मोठा रंग भरायचा. एकदा आम्ही तिघे असेच जेवत होतो. मी गोष्ट सांगू लागलो, "मी संघाचा विचारक म्हणून पंढरपूरच्या करकम गावी गेलो होतो. एका स्वयंसेवकाकडे जेवायला जात असे. सोलापूर बाजू म्हणजे भयंकर तिखट खाणारी. आमटीचा एक झुरका मारला आणि डोळ्यातून पाणी वाहू लागले. स्वयंपाक करणाऱ्या त्याच्या आईने ते पाहिले. ती मला समजुतीच्या स्वरात म्हणाली, "समाजाच्या कामासाठी बाहेर पडलं तरी अशी घरची आठवण केव्हा तरी यायचीच." साहेब आणि मी हसलो. वेणूताई खाली मान घालून घास घेता घेता म्हणाल्या, "आज आमटी कशी काय आहे?" आणि त्यांच्या प्रश्नाचा रोख ओळखून आम्ही तिघेही हसू ओठात दाबत राहिलो. नंतरही केव्हा त्याची आठवण झाली तर साहेब जेवताना म्हणायचे, "वासू, आमटीला तिखट बेताचे आहे ना?" वासूही अनभिज्ञपणे म्हणे, "बाईसाहेबांनी सांगूनच ठेवलंय ना?"

राजकारण-समाजकारण-अध्यात्म-साहित्य-संगीत या विविध विषयांवर गप्पा रंगत. साहेब अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत बोलत, पण शब्दांची निवड अचूक असे. त्यांची पत्रे येत ती सुद्धा मनाचा ठाव घेत. मला पत्राचे उत्तर द्यायचा फार कंटाळा. त्यांच्या पत्रात असे, "मी तुमच्या पत्राची वाट पाहात आहे" आणि मग मला उत्तर तातडीने लिहावेच लागे. जुलै १९८३ मध्ये म्हणजे वेणूताई गेल्यापासून महिना सव्वा महिन्यांनी त्यांनी स्वतःच्या अक्षरात मला पाठवलेले पत्रच वाचा म्हणजे वाचणाऱ्याच्या मनाची उलघाल आपल्यालाही अनुभवण्यास मिळेल.

प्रिय श्री. जोगळेकर यांस

स. न. वि. वि.

येथे आल्यापासून तुम्हाला पत्र लिहावे असे सारखे वाटत होते. तरुण भारत मधील सौ. वेणूताईंवरील तुमचा लेख वाचला. तुम्ही तिला चांगले समजून घेतले होते असा त्याचा अर्थ आहे. आभारी आहे. हे औपचारिक नव्हे.

जून अखेर ऐवजी आता अर्ज करून मुदत नोव्हेंबर अखेरपर्यंत मिळवली आहे. तुम्हास यावयास कोणता महिना सोयीचा, ते कळविले म्हणजे मी माझे येथे ओळीने हजर असणारे दिवस तुम्हास कळवीन. कमिशनचे दौरे सुरू आहेत. या कामात काही वेळ जातो म्हणून बरे. एकटा असलो की आठवणींनी माझे सगळे जागेपणाचे जग भरून जाते. तुम्ही चार-दोन दिवस आलात म्हणजे तेवढेच माझे दिवस बरे जातील. रिटर्न खेरीज माझे दुसरे अनेक खाजगी प्रश्न तुमच्याशी बोलायचे आहेत. सवडीने उत्तर द्या. कळावे.

आ.

यशवंतराव चव्हाण.

नंतर एकदा मी रविवार १६ सप्टेंबरच्या संध्याकाळच्या विमानाने दिल्लीस गेलो. जेवण आटोपून साहेब माझी वाट पाहात बसले होते. मी त्यांना घोडके हलवाईचा एक पेढ्याचा पुडा दिला आणि दुसरा बर्फीचा दिला. त्यांनी प्रश्नार्थक चेहरा करून पाहिले. मी म्हणालो, "एक आपला नेहमीचा आणि दुसरा आपल्या "कृष्णाकाठला" केळकर पारितोषिक मिळाल्याचा". तोपर्यंत हा निकास त्यांना माहितच नव्हता. जरासा विचार करीत ते म्हणाले, "पारितोषिक म्हणजे जरा शाळकरी मुलांसारखे वाटतं नाही!" मी म्हणालो, "तो खऱ्या अर्थाने पुरस्कार आहे. आणि पारितोषिक

साहित्य सम्राटांच्या नावाने आहे.” पुन्हा क्षणभर विचार करून म्हणाले, “खरंच आहे. आता मला दुसऱ्या भागाकडे झपाट्याने जायला हंव.”

परवाच्या मुक्कामात साहेबांचे मन मुंबई आणि दिल्ली या दोन्ही मुक्कामांतील आठवणी साठवण्यात व्यग्र दिसले आणि अशा आठवणी सांगता सांगता मध्येच वेणूताईंची आठवण येई. गळा दाटून येई. शब्द माघारी जात.

एक दिवस मी माझी कामे आटोपून संध्याकाळी बंगल्यावर परत आलो. गाडीतून उतरलो तो हॉलमध्ये साहेब एकटेच बसलेले होते. त्यांना एकटे बसलेले पाहून मन गलबलले. पण तोंडावर उसने हसू आणतच मी आत जाऊन त्यांच्या शेजारच्या कोचावर बसलो. त्या हॉलमधल्या साऱ्या रिकाम्या खुर्च्या, टेबले आणि सोफा यांकडे नजर फिरवत साहेब म्हणाले, “जोगळेकर, गेली वीस वर्षे मी विचार करीत असे की, मला सरकारी फर्निचर असताना माझी बायको दरवर्षी थोडे थोडे फर्निचर विकत घेऊन सरकारी फर्निचर परत का धाडते ? तो तिचा छंद असावा असे वाटे. पण आता वाटतं की, तिला हे उमजतच असेल की, एक दिवस ह्यांना सरकारी फर्निचर परत करावे लागेल. तेव्हा सारी जागा भकास दिसेल, म्हणून तिने ...” आणि मग अक्षरशः अश्रुधारा सुरू झाल्या. मी मनातल्या मनात फार हेलावलो. वाटले हे म्हणतात की आता मी त्या धक्क्यातून सावरलो. पण ते खरे नाही. हे दुःख हळव्या मनाला कुरतडून छळत राहणार. छळणार अगदी अखेरपर्यंत.

## डॉ. आर. डी. शिंगटे
## यशंवतराव, एक उत्कृष्ट प्रशासक

वर्तमानपत्रातून आलेला यशवंतरावांचा फोटो दृष्टीस पडला की, जुन्या आठवणींच्या उजळणीला आमच्या मातोश्रींना संधी मिळायची. यशवंतराव तिच्या मैत्रिणीचे सुपुत्र. साहिजकच तिलाही त्यात गौरव वाटायचा. यशवंतरावांचे वडील बेलिफ, माझेही वडील बलिफ. दोघेही विट्यासारख्या लहानशा गावात एकाच ठिकाणी, एकाच हुद्यावर काम करायचे. मैत्रीला यापेक्षा अधिक जवळच्या कारणाची काय आवश्यकता ? यशवंतराव लहान असतानाच त्यांचे वडील निवर्तले व त्यांच्यासह त्यांच्या मातोश्री कराडात स्थायिक झाल्या. पुढे माझा मोठा भाऊ कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकू लगला. त्यावेळी विद्यार्थी वसतीगृहे नसल्याने कुणाच्यातरी घरी राहणे आवश्यक होते. जुन्या परिचयामुळे घरच्या लोकांनी यशवंतरावांचे घर पसंत केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर यशवंतराव राजकरणात पडले, माझा भाऊ नोकरी करू लागला. आमच्या दोन घरांचा परिचय इथेच थांबला.

१९५६ साली यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यामंत्री झाले. १९५७ ला मला जर्मनीत शिकण्याकरता भारत सरकारची शिष्यवृती मिळाली. जर्मनीतील राहण्याचा व शिक्षणाचा खर्च भागवण्याइतकी शिष्यवृत्तीची रक्कम पुरेशी असल्याचे मला सांगण्यात आले. प्रश्न होता तो भारतात राहणाऱ्या पत्नीचा व दोन मुलांचा. अभ्यास रजा मंजूर झाल्यास मिळणाऱ्या पगारात त्यांच्या खर्चाची सोय झाली असती म्हणून शिक्षण संचालकाकडे तसा अर्ज केला. त्या वेळी मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये व्याख्याता होतो. तुमच्या शिक्षण शिष्यवृत्तीचा आम्ही पुरस्कार केला नसल्याने आपण मागितलेली अभ्यास रजा आपणास देता येत नाही हे उत्तर मिळाल्यावर शिष्यवृत्ती नाकारण्याशिवाय मला अन्य पर्याय

नव्हता. तसा निर्णयही घेतला. फक्त दिल्लीला कळवायचे शिल्लक होते. दरम्यान यशवंतराव सातारला भेट देणार होते. अशा वेळी आजूबाजूचे सर्व पुढारी तिथे जातात त्या वेळी इस्मामपूरचे नगराध्यक्ष, एम. डी. पवार, स्नेही या नात्याने सातारला गेले, त्यांना मी जर्मनीला जायचे रहीत करीत आहे याची कल्पना होती. बोलता बोलता ही गोष्ट त्यांनी त्यांच्या कानावर घातली, त्या वेळी ते म्हणाले, "अजब आहे म्हणायचे माझे सरकार ? एखाद्याने स्वतःच्या गुणवत्तेवर कुणाच्या शिफारशीशिवाय शिष्यवृत्ती मिळविली हा काय गुन्हा झाला ?"

ह्या भेटीनंतर चैथ्या दिवशी अनपेक्षितपणे मला एक शिक्षण संचालकाकडून पत्र आले. त्यात त्यांनी पाठविलेले पहिले पत्र रद्द करून माझी नामंजूर केलेली अभ्यास रजा मंजूर केल्याचा मजकूर होता. या पत्राने माझा आंनद गगनात मावेना हे लिहायला नको. आता ही कृती यशवंतरानंनी आमचा जुना परिचय लक्षात घेऊन केली असे इतरांच्याप्रमाणे मीही समजलो. पण त्यांच्या कुशल शासनाचा अवमान होता हे कळायला काही काळ जावा लागला.

दुसरा प्रसंग मुंबईहून कोल्हापूरला एका प्राध्यापकाची बदली झाली. त्यांना अस्थम्याचा आजार होता. कोल्हापूरचे हवामान त्यांना अगदीच मानवेना. औषधोपचार करूनही ते प्रकृतीकडून बेजार झाले. परत बदलीचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने चांगले हताश झाले होते. माझ्याबाबतीत यशवंतरावांनी स्वतः लक्ष घालून मला न्याय दिल्याचे त्यांना माहीत होते. परिचय नसताना एका सरकारी कॉलजच्या प्राध्यापकाने मुख्यमंत्र्यांना भेटणे धाडसाचे होते पण ते त्यांनी अगदी जिकिरीला आल्याने केले. तेही कुठल्यातरी समारंभात. यशवंतरावांनी त्या वेळी त्यांना कसलेही आश्वासन दिले नाही, पण त्यांचे नाव लक्षात ठेवून शिक्षणसंचालकांना अडचण योग्य वाटल्यास तिचा सहानभूतीने विचार व्हावा ही सूचना केली. थोड्याच दिवसांत त्या प्राध्यापकाला हवी असणारी बदली मिळाली. जो शासनप्रमुख लहानमोठा असा भेद न करता

सर्वांची सुखदुःखे सहानुभूतीने समजून त्यांच्याकडून जास्तीत जास्त काम करून घेतो, तो यशस्वी असे मी समजतो.

मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या कारकीर्दीची आठवण आजही सर्व थरांतील लोकांना सुखावते. त्यांच्या कारकीर्दीत जातीयवाद, प्रांतीय वाद यांचे भाडवल न करता सर्वांना आपापले काम समाधानाने करता येते याचा अनुभव मिळत होता.सर्वच क्षेत्रात जिव्हाळा व जवळीक साधण्याची अवघड कला त्यांच्याजवळ होती, साहित्याची त्यांना मनापासून आवड होती, त्यामुळे साहित्यिकांची बूज राखीत असत म्हणून ते खूष होते, पण सिनेमावाल्यांनाही त्यांच्याशिवाय चैन पडत नसे याची मला गम्मत वाटायची. राजकीय विरोधक त्यांचा उल्लेख मनापासून आदराने करीत.

जर्मनीतील अभ्यासक्रम पुरा करून परतल्यानंतर पाच वर्षे मला कराडातील यशवंतरावांच्या सायन्स कॉलजचे प्राचार्यपद लाभले. या काळात त्यांच्या स्वभावातील अनेक पैलूंचे जवळून दर्शन झाले. व्याख्यान देण्याच्या त्यांच्या शैलीने मी त्या काळात भारावून गेलो होतो. एकदा तर कोल्हापुरातील त्यांच्या दोन दिवसांच्या दौऱ्यातील सर्व व्याख्यानांना हजर राहिलो.त्यांच्या बोलण्यात संथपणा असायचा,आवाजातील चढउताराची आवश्यकता नव्हती, अभिनय नाही, विचारांची वा विनोदाची पुनरावृत्ती नाही. थोडेसे स्वगत, थोडेसे हितगूज करीत दिलेले व्याख्यान कधीच लांबायचे नाही. त्यामुळे ही व्याख्याने मला खूप आवडायची.

प्रत्येक गोष्टीत त्यांची स्वतःची खास शैली असायची. कॉलेजवर एखाद्या पाहुण्यास घेऊन यायचे. माझी प्राचार्य म्हणून, ओळख करून दिल्यावर मला पाहुण्यांना कॉलेज दाखवायला सांगून स्वतः त्या ठिकाणी जमलेल्या अनेक मंडळींच्या बरोबर कॉलेजच्या प्रांगणात बोलत राहायचे. अन्य ठिकाणी अशा वेळी चालकमंडळी प्राचार्याला गुंडाळून ठेवून आलेल्या पाहुण्याला आपणच कॉलेज चालवितो अशा आविर्भावात समजावून देतात, या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर असे कॉलेज चालविण्याची जबाबदारी आपल्याला लाभली याबद्दल धन्यता वाटायची . आणखी एक

अविस्मरणीय आठवण. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसादनी कॉलेजच्या नव्या इमारतीचे उद्धाटन करण्याचे मान्य केले त्या वेळची.

करडला राष्ट्रपतींची पहिली भेट, त्यामुळे प्रचंड जनसमुदाय येणार, त्यांच्या बसण्याची व्यवस्था, राष्ट्रपतींच्या भेटीचा रिवाज (Protocol) सांभाळणे, एवढ्या लोकांना राष्ट्रपतींचे भाषण नीट ऐकण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय अशा अनेक गोष्टींच्या पूर्ततेकरता सर्व कॉलेज रात्रंदिवस झटून तयारी करीत होते. कॉलेज समारंभानंतर प्राचार्यांच्या ताब्यात सुपूर्त होते अशा भावनेने प्रत्यक्ष समारंभात चालकांनी प्राचार्यांचा समावेश केलेला नव्हता. मला ते माहीत होते. मला किंवा प्राध्यापकांना त्याचे बिलकुल वैषम्य वाटले नाही, कारण चालकांच्यात व आमच्यात अत्यंत सलोख्याचे संबंध असल्याने मुद्दाम काही केले असणार ही शंका येत नसे. समारंभाच्या आदल्या दिवशी यशवंतराव मुंबईहून आले. सायंकाळी कॉलेजवर येऊन सर्व व्यवस्था तपशीलवार तपासून ठीक आहे याची खात्री करून घेऊन सर्किटहौसवर गेले. आमंत्रणपत्रिकेवर नजर टाकल्यावर त्यात प्राचार्यांचा समावेश नाही हे पाहून ती गोष्ट त्यांना खटकली. संस्था चालकांनी याबाबत आपली विचारसरणी सांगितली, पण ती त्यांना पसंत पडली नाही. रात्री ११ वाजता एक व्यक्ती माझ्याकडे साहेबांचा निरोप घेऊन आली. निरोप होता उद्याच्या समारंभात मी पाच मिनिटे प्रास्ताविक भाषण करावे. या वेळी मला काय वाटले असेल याची कल्पना करा. प्रत्येकाला तुला मानाचे स्थान आहे याची जाणीव प्रत्यक्ष कृतीने देण्याची त्यांची शासनपद्धती होती, त्यामुळे सुपूर्त केलेली जबाबदारी जीव तोडून पुर्ण करण्यापलीकडे दुसरा पर्याय त्या व्यक्तीजवळ राहतच नसे.

वर्षातून शिक्षणमंडळाच्या एक दोन बैठकी त्यांच्या अध्यक्षतेखाली होत असत. या बैठकीत तास दोन तास अत्यंत गांभीर्याने लहान मोठ्या कॉलेजशी निगडित विषयांचा ऊहापोह होत असे. त्यामुळे आम्ही या बैठकांची चातकासारखी वाट पाहात असू. नुसती चर्चा व त्यावर ठराव

यावर त्यांचा विश्वास नसे. गेल्या बैठकीतील ठरावांची काटेकोर पूर्तता झाली की नाही याची कसून पाहणी करीत नसल्यास संबंधिताला त्याचा जाब द्यावा लागत असे. समस्या वाजवी असल्यास त्यावर तोडगा काढलाच पाहिजे हा आग्रह. अशाच एका बैठकीत गावाकडून येणारे मुलांचे जेवणाचे डबे एस.टी.तून वेळेवर येत नसल्याने मुलांचे हाल होतात असे ऐकल्यावर स्वतःच उठले. फोन उचलला व एस. टी. प्रमुखाला "ऐकले ते खरे आहे का ?" हे विचारून, त्यांची अडचण काय याची विचारणा अत्यंत सौम्य शब्दात विचारली. ते काय अडचण सांगणार ? दुसऱ्या दिवसापासून सर्व डबे वेळेवर येऊ लागले. मुले प्राचार्यांवर खूष. प्राचार्य साहेबांवर खूष!

प्रगतिशील व उदार विचार हे त्यांचे वैशिष्ट्य. कराडसारख्या लहान गावी इंजिनिअरिंग कॉलेज, सायन्स कॉलेजसारख्या शिक्षण संस्था उत्तम स्थितीत चालवायच्या असल्यास सर्व पथ्ये पाळली पाहिजेत याची जाणीव व आग्रह त्यांच्याजवळ होता. "आपल्याला उत्तम प्राध्यापकवर्ग मिळाल्याशिवाय मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही. चांगला प्राध्यापक नुसत्या चांगल्या पगारावर कराडला येणार नाही." त्यांची राहण्याची अपेक्षा सध्याचे कराड पुरे करू शकणार नाही याची त्यांना जाणीव होती. कराड अर्बन बँकेच्या चालकांना नवीन पद्धतीची घरे प्राध्यापकांच्या करता बांधण्यायाची सूचना त्यांनी दिली व त्याप्रमाणे बऱ्याच प्राध्यापकांच्या निवासाची सोय केली. औषधोपचारकरता कॉटेज हॉस्पिटल सुरू केले. कुशल व कल्पक व्यवस्थापन कशाला म्हणायचे याचे अनेक धडे माझ्याप्रमाणे त्यांच्याबरोबर काम केलेल्यांना शिकायला मिळाले असणार !

## चांदमल कटारिया
## व्यवहाराला चोख

साहेबांच्या संबंधितांपैकी एक लग्नसमारंभ होता. लग्न लागण्याची वेळ जवळ येत होती. इतक्यात वेणूताईंनी मला हाक मारली आणि म्हणाल्या, “चांदमलशेठ, मुलीच्या अंगावर दागिने दिसत नाहीत. कुठून तरी घेऊन या.” वेळ साधण्याच्या दृष्टीने त्यांनी लाल दिव्याची गाडी दिली. मी घाईघाईने दत्तात्रेय अष्टेकर सराफांकडे गेलो.तिथे तयार असणारे काही दागिने घेतले आणि लग्नमंडपात आलो. नवरी मुलगी लग्नाला उभी राहिली त्यावेळी तिच्या अंगाखांद्यावर दागिने होते.

हा प्रकार साहेबांच्या कानावर जाताच त्यांनी मला बाजूला घेतले आणि म्हणाले, “आजचा काय व्यवहार आहे तो पूर्ण झाला पाहिजे. सर्व हिशेब चुकते झाले पाहिजेत.” ते व्यवहाराला अतिशय चोख होते. त्यांनी त्याच दिवशी हिशेब पूर्ण केले.

तीस वर्षांची आमची ओळख होती. पण मी कधीही कसलीही मागणी त्यांच्याकडे केली नव्हती. त्यांचा माझ्यावर उदंड विश्वास होता. पण कितीही जवळीक असली तरी त्यांना सार्वजनिक दृष्टीचे सतत भान असे. कुणाचीही त्यांना गळ पडत नसे. सेवासदन संस्थेच्या समारंभासाठी पंडित नेहरूंना आणावे म्हणून मी मालोजीराजे निंबाळकरांबरोबर त्यांच्याकडे गेलो होतो. “मी थाळी भर रूपये देणगी देऊ इच्छितो. नेहरूंच्या हस्ते संस्थेला देणगी द्यावी.” असे मी सुचविले. पण साहेबांनी ऐकले नाही. ते म्हणाले, “लाखो रूपये देणग्या देणारे देखील असे म्हणत नाहीत. तुमची अपेक्षा बरोबर नाही. असा प्रकार होणार नाही.” त्यांचा माझा खटका उडाला पण आग्रहाला ते बळी पडले नाहीत.

## मृणालिनी चितळे
## द्रौपदीचा बंधू

यशवंतराव मराठी माणसाला मिळालेले एक वरदान, त्यांचे ते चांदणे फुलल्यागत सामोरे येणारे हास्य, ती स्नेहशील दृष्टी, प्रसंगाला धावून येतील असा विश्वास उत्पन्न करणारे व्यक्तिमत्त्व, काय काय , आणि किती सांगावे ?

माझ्या जन्मानंतर भाऊ झाला, तो गेला. वडिलांनी संन्यास घेतला. घरच नाही मग माहेर कुठले ? पण, मी भाग्यवान, रक्ताचे नसूनही भावापलीकडे धीर देणारे भाऊ भेटले. ५०, ५१ साली अचानक दुसऱ्या एका भावाबरोबर यशवंतराव आमच्या घरी पहिल्या प्रथम आले. आमच्या शेजारी एक कट्टे हिंदुमहासभेचे अभिमानी राहात असत. यशवंतरावांना पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे यशवंतराव पत्री सरकारचे अध्वर्यू . त्यांनी अनंत लोकांना पैशासाठी छळले, त्यांच्या पायाला पत्र्या ठोकल्या इत्यादी . अशा व्यक्तीचे आम्ही आमच्या घरी स्वागत केल्याने आम्ही असल्या कृत्याला आमची मान्यताच दिल्यासारखे. पण आमच्यावर त्यानंतर काँग्रेसचा छाप जो उठला तो न पुसला जाणाऱ्या शाईचा.

अर्थात माझे झालेले शिक्षण, संस्कार, सारेच राष्ट्रीय वातावरणात झाल्याने मला त्याचा अभिमानच वाटतो. मतदानाची खूण जशी शाईच्या ठिपक्याने सिद्ध होते तसेच.

अर्थात याच्याही आधी म्हणजे मंत्री, मुख्यमंत्री होण्याचेही आधी त्यांचे टॉन्सिलाटिसचे ऑपरेशन झाल्याचे कळल्याने त्यांच्या बंगल्यावर त्यांच्या समाचाराला मी जाऊन आलेली होते. त्या वेळचे ते करूण जोडपे, ते सस्नेह स्वागत, आजही डोळ्यांपुढे येते. त्या वेळच्या घरातील वातावरणात विशेष डामडौल, '(अर्थात तो पुढेही कधी दिसला नाही.)'

फार मोठा इतमाम जरी नसला, तरी एका अगत्यशील घरात आपण आलो आहो याची जाणीव होण्याला पुरेसा होता. त्यानंतर मान, सन्मान चढत्या भाजणीच्या रूपाने त्या कुटुंबात आलेले पाहण्याचे भाग्यही मला लाभले. पण हे आजूबाजूचे झालेले फेरबदल त्यांच्या असलेल्या व्यक्तिगत नात्याचे आड कधीही आलेले नाहीत.

एका राखी पौर्णिमेला यशवंतरावजींचा मुक्काम पुणे येथे सर्किट हाऊसवर होता. अचानक दुपारी मनात आले की, यशवंतरावांचे हातात जाऊन राखी बांधावी. नारळी पौर्णिमा असल्याने, आमच्या येथे ओल्या नारळाच्या करंज्यांचा बेत होता. त्या करता करता हे मनात आल्याबरोबर माझ्या मुलीच्या शाळेत नेण्याचा छोटासा डबा होता, त्यात दोन करंज्या घातल्या, राखी घेतली व तडक रिक्षा करून सर्किट हाऊस गाठले. खाली त्यांच्या भेटीसाठी पंढरी फुलली होती. त्यांचे भ्रातृतुल्य वैयक्तिक चिटणीस श्री. डोंगरे यांनी मला पाहताच त्या गर्दीतून पुढे येऊन सांगितले की, “तुम्ही वर जाऊन बसा, थोड्या वेळानी यशवंतराव येतील” त्या प्रमाणे मी वर गेले. तेथे एका खोलीत श्री. बाळासाहेब देसाई हे बसलेले होते, त्यांच्याशी माझा परिचय असल्याने मला एकदम संकोचल्यासारखे झाले. कारण, मी एकच राखी आणि दोनच करंज्या घेऊन गेलेली. अर्थात त्या वेळी या विचारांचा काहीही उपयोग नव्हता, म्हणून, थोडा वेळ त्यांच्याशी बोलून मी बाहेरच्या वऱ्हांड्यात खुर्चीवर बसून राहिले. थोड्या वेळाने यशवंतरावही वर आले. जिन्या समोरच त्यांना मी बसलेली दिसताच हसून माझ्या येण्याबद्दल विचारणा गेली. मी म्हटले, “आज काय आहे ते विसरलात का ?” ते म्हणाले “काय आहे बुवा?” तेव्हा मी म्हटले, “आज राखी पौर्णिमा नाही का ? भावाच्या हातात राखी बांधावयाची असते आज.” नेहमीच्या पद्धतीने मोकळेपणाने हसून म्हणाले, “अरे खरंच की ? माझ्या लक्षातच नाही.” असे म्हणून राखी बांधून घेण्यासाठी त्यांनी हात पुढे केला. मी म्हटले, “आधी तोंड गोड केल्याशिवाय का राखी बांधावयाची असते ?” आणि असे म्हणत करंजीचा

डबा त्यांचे पुढे केला व त्यांनीही मोठ्या प्रेमानी त्यांतील करंजी उचलून तोंडात घालणार इतक्यात श्री. बाळासाहेब देसाई आतल्या खोलीतून बाहेर आले. यशवंतरावजींनी क्षणभर माझ्याकडे पाह्यले त्याचा अर्थ मीही उमजले व दुसरी करंजी बाळासाहेबांचे पुढे केली तेव्हा त्यांनी विचारले हे काय ? तेव्हा मी म्हणाले, "काही नाही. आज राखी पौर्णिमा आहे तेव्हा भावाचे तोंड गोड करावे," पण श्री. बाळासाहेबांना कदाचित हा प्रकार अपरिचित वाटल्याने ते थोडा वेळ थबकले, पण मग यशवंतरावांनी त्यांना सांगितले "घ्या हो," आणि मग साहजिकच दोघांनी आपआपले तोंड गोड केले. अशा रीतीने या मानीव नात्यावर शिक्कामोर्तब झाला. तो पुढे दिल्लीला गेल्यानंतरही टिकला. दर वर्षी राखी पौर्णिमेला त्यांच्याकडे राखी व पेढ्याचे पार्सल बरीच वर्षे श्री. घोडके पेढेवाले, केव्हा केव्हा चितळे मिठाईवाले यांचेतर्फे न चुकता रवाना होत असे.

पुण्याला काँग्रेसचे अधिवेशन झाले त्या वेळी त्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी असावे. यशवंतरावजी पुण्याला आले असताना स्त्री कार्यकर्त्यांच्या भेटीला ते काँग्रेस हाऊसच्या वरच्या मजल्यावरील हॉलमध्ये बसलेले होते. मी त्या वेळी काँग्रेसची क्रियाशील सभासद झालेली होते आणि म्हणूनच कार्यकर्ती या स्वरूपात मी तेथे गेले होते. त्या वेळी मी त्यांना पेढे नेऊन दिले. त्यांनी विचारले, "हे कशाचे' मी म्हटले, "हे, बाळ बी. ए. ची परीक्षा पास झाला त्याचे ! त्यावर म्हणाले, "अरे वा ! हो का ?" .. मग आता पुढे काय करायचा बेत आहे ?" मी म्हटले "आय. ए. एस. व्हावं अशी इच्छा आहे. पण त्याला एकवीस वर्षांची मर्यादा असल्याने व त्यासाठी दोन वर्षे थांबावे लागणार असल्या कारणाने त्याने एम्. ए. व्हावे अशी इच्छा आहे. आपले काय मत आहे ?" ते म्हणाले "उत्तम ! होऊ दे ना ! आय्. ए. एस्. मुलं, आम्हाला हवीच आहेत !"

त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्य मंत्री म्हणूनही यशवंतरावांच्या कारकीर्दीत पुण्याला त्यांचे वारंवार येणे घडत असे. पानशेत धरणाची, पुण्यावर ओढवलेल्या संकटाची बातमी मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता

श्री. बर्वे हे एकमेव अधिकारीच असा प्रसंग निभावून नेऊ शकतील या हेतूने त्यांना ताबडतोब पूरग्रस्त लोकांच्या मदतीला धावण्यासाठी सर्व सूत्रे त्यांच्या हाती सोपवून विमानाने धाडले. ही एकच गोष्ट मनुष्याच्या कर्तृत्वाची योग्यता ओळखण्याची हातोटी व अशा प्रसंगात एक एक क्षणसुद्धा किती महत्त्वाचा आहे आणि त्या क्षणात काय काय करायला हवं त्याचा अंदाज घेऊन क्षणात त्याची अंमलबजावणीही करण्यासाठी ज्या पद्धतीने पाऊले उचलली, स्वतः 'आंखो देखा हाल' पाहण्यासाठी विमानातून सबंध नगराचे निरीक्षण केले व ज्या, ज्या, प्रकारची गरज व ज्या, ज्या, मार्गांनी मदत देता येईल ते ते करण्यात पापणीची उघडझाप व्हावी इतक्या अवधीत हे सारे कार्यान्वित केले. हा सारा धावता आढावा म्हणजे डोळ्यापुढून सरकणारा चलच्चित्रपटच माझ्या डोळ्यापुढे आजही उभा आहे.

नंतर एकदा चि. बाळचा अमेरिकेला जाण्याचा त्याचा हट्ट त्यांचे कानांवर घालून त्यांचा सल्ला विचारला असता म्हणाले, "अहो जातो तर नाही काय म्हणता ? तिकडे ॲडमिशन मिळणे इतके कठीण असताना आणि तीही त्याला घेण्यासाठी यु. एस्. आय. युसीसचे लोक आग्रह करताहेत आणि तुम्ही अष्टग्रहीची सबब काढताय ? जाऊन येऊ दे त्याला." असे म्हणून आशीर्वादासहित त्याच्या शिक्षणाची दिशा निश्चित केली व यशस्वी होऊन परत आल्यावर भेटायला येण्याचे आमंत्रण देऊन ठेवले. त्याचे लग्न ठरल्यावर सून दाखविण्यास नेली असता, सती वेणूताईंनीही कौतुकाने तिचा स्वीकार केला आणि लग्नानंतर दोघे पाया पडायला गेले, तर इतकी सुंदर चंदेरी साडी ओटी भरून दिली की, तितकी सुंदर साडी सबंध भरलेल्या कपाटात एकही नाही ! अतिशय प्रेमाने, अगत्याने, जिव्हाळ्यांने, आत्मीयतेने केलेल्या कौतुकाचे मोल का कधी करता येते ? मधल्या काळात ही आत्मीयता वाढतच गेली...

## रा. ना ऊर्फ बन्याबापू गोडबोले
## माझे जिवलग मित्र, श्री. यशवंतराव चव्हाण

दक्षिण सदर्न मराठा रेल्वे. आंमचा प्रवास चालला होता. गाडीचा वेग यथातथाच. वेगापेक्षा गाडीच्या धुराचा अन् कोळशाच्या बारीक कणांचाच जास्त त्रास. एकोणीसशे चाळीसचा सुमार. तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास चाललेला. आम्ही सर्व काँग्रेसचे कार्यकर्ते किर्लोस्करवाडी येथे भरणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीस निघालो होतो. प्रवासाचा शीण सर्वांनाच जाणवत होता. आमच्यातील एक तरुण सर्वांचे लक्ष वेधून राहिलेला. सर्वांशीच तो हसतमुखाने चर्चा करीत होता. ते होते यशवंतरावजी.

चर्चेचा ओघ संपला. ते माझ्याजवळ आले. "बन्याबापू, भूक लागली आहे. जेवायला पाहिजे बुवा" . मी एका फडक्यात दोन चार भाकरी आणि कोरडी उसळ आणली होती. बाकड्यावरच फडके अंथरले. दोघांमध्ये ती भाकरी ठेवली. अन् गप्पाटप्पा करत भाकरीचा फन्ना उडवला. पुढच्या स्टेशनवर उतरून नळाचे पाणी प्यालो. तृष्णा अन् क्षुधा शमली. गर्दीतच बाकड्याच्या एका कोपऱ्यात बसून वाडी येईपर्यंत यशवंतरावांनी थोडी डुलकी पण घेतली. याच फडक्यातील भाकरीने जवळिक साधलेले स्नेहसंबंध चव्वेचाळीस वर्षे अखंड राहिले. सुखदुःखाच्या भरती ओहोटीत अधिकच दृढ झाले.

### खिंडीतील गणपती

डिसेंबर १९८४ महिना. सगळीकडे धामधूम चाललेली. गुलाबी थंडीचे वातावरणात उत्साह शिगेस पोहोचलेला. लोकसभेच्या निवडणुकीस सारा देश तयार झालेला. कार्यकर्त्यांचा उसळता उत्साह. यशवंतरावजी सातारा मतदारसंघातून उभे राहणार हे जाहीर झालेले. एक दोन

दिवसांत ते उमेदवारीचा अर्ज भरण्यास दिल्लीहून येणार हे ठरलेले. आमची सर्वांची गडबड उडालेली. निवडणुकीस मोर्चे बांधणी करावयाची तर कंबर कसली पाहिजे. आम्ही सर्वजण तयारीत अन् वाट पाहात बसलेलो.

यशवंतरावजींना सातारा येथील खिंडीतील गणपतीचे विलक्षण आकर्षण अन् ओढ. श्रद्धा अन् भक्ती या दोन्हींचा समसमासंयोग त्या गजाननाच्या ठायी झालेला. निवडणूक अर्ज भरण्याअगोदर एकदा त्या एकदंताची आळवणी करावयाची, आशीर्वाद मागावयाचे ही यशवंतरावजींची प्रथा. सहज उत्सुकता म्हणून अस्मादिकांनी एकदा पृच्छा केली, "यशवंतराव, या गजाननाच्या भेटीचा एवढा अट्टाहास का ?" स्मितवदनाने आपल्या अंतरीचे भाव त्यांनी शब्दरूप केले, "मला काही मागायचे नाही. जनताजनार्दनाचे असीम प्रेम मला लाभले. या प्रेमाला अन् आदराला असेच कायम राहण्याचे भाग्य मला लाभावे. तेवढी साधनसुचिता शेवटपर्यंत राहावी. हीच त्या वरदाला प्रार्थना करणेची आहे." पण या निवडणुकीच्या अगोदर ही भेट झालीच नाही. अर्ज दाखल करण्यास यशवंतराव आलेच नाहीत. त्यांच्या स्वर्गवासाची बातमी मात्र ऐकावयास मिळाली. खिंडीतील गजाननाची भेट अपुरी राहिली.

## सौ. वेणूताई

यशवंतरावजींचा अन् माझा स्नेह जमला. यात कौटुंबिक स्नेहाचें बंध दृढ केव्हा झाले, हे कळूनसुद्धा आले नाही. भारताच्या उपपंतप्रधानपदापर्यंत ज्यांनी अनेक पदे भूषविली त्या यशवंतरावांच्या पत्नी, म्हणजे एका निगर्वी गृहिणीचे मूर्तिमंत रूप, सभेच्या स्थानी व्यासपीठावर बसावे, मिरवावे, लोकांकडून कौतुक करवून घ्यावे, ही इच्छाच नाही. विचारले तर आपल्या समाधानी अन् शांत तृप्त नजरेत तिकडच्याबद्दलची अपूर्वाई दडवीत त्या उद्गारत, "माझी बसण्याची जागा

ही इथेच बरी दिसते. ते वर व्यासपीठावर अन् मी खाली प्रेक्षकवर्गात, फार फार आनंद होतोय मला. यासारखा दुसरा आनंद नाही."

आमच्या घरी जेवण्यास आलेल्या. आम्हीच भांबावून गेलेलो. आदरातिथ्य करावयाचे कसे, थोरामोठ्या माणसाची पत्नी. शिष्टाचारात काही कमी पडले तर, थोडी धाकधूक वाटत होती. "मी इथेच स्वयंपाकगृहात पाटावर बसूनच जेवणार" हे त्यांचे शब्द ऐकले अन् एकदम शिरावरचा भार कमी झाला अन् एका आगळ्या अन् वेगळ्या स्त्रीच्या दर्शनाने मन स्तंभित झाले.

दिल्लीला स्टेशनवरून फोन केला. फोनवरून वेणूताईंचा आवाज ऐकला. "साहेब घरी नाहीत. दौऱ्याववर आहेत. अन् हे पाहा, ते नसले म्हणून आमच्या घरी यावयाचे नाही असे नाही हं ?"

## गाढ पत्नीप्रेम

सौ. वेणूताईंचे आकस्मिक निधन झाले. संसासामधील अनेक दुः खे सहन केलेले यशवंतरावजी या वर्मी बसलेल्या घावाने हळवे बनले. संसाररूपी रथाचे एक चक्र निखळले. मुंबईस रिव्हेरा या त्यांच्या निवासस्थानी बैठक जमली होती. आम्ही फक्त दोघेच होतो. बोलण्याचा ओघ वेणूताईंच्यावरच होता. यशवंतरावांचा चेहरा कधी नव्हे एवढा शोकाकुल झाला होता. मलाही अवघडल्यासारखे वाटत होते. भावनेने रूद्ध झालेल्या त्यांच्या कंठातून शब्द कसेबसे बाहेर पडत होते. बन्याबापू, माझ्या जीवनातील ही पोकळी मला सर्वांगाने वेढून टाकत आहे. उभ्या आयुष्यात कशाचीच मागणी न करणारी माझी पत्नीब मला सोडून गेली. मी पोरका झालो आहे. आयुष्याच्या चढउतारावर तिने माझी फक्त सेवाच केली. सावलीप्रमाणे माझ्या समवेत ती नेहमी राहिली. माझे आयुष्य तिनेच घडवले. आपत्काली मला तिने सावरून धरले.तिच्याविना माझी ही जीवननौका भरकटू लागलीय.लवकरच ती भोवऱ्यात सापडणार अन् संपणार."

असा हा माझा स्नेही, माणूसवेडा, एखाद्यावर भरभरून स्नेह करणारा. त्याला त्या वर्षावात चिंब भिजविणारा. हवाहवासा वाटणारा. नुसत्या आठवणीने गहिवर आणणारा.

# आनंदीबाई शिर्के
## भावासारखे यशवंतराव

१९२४ साल होते की १९२५ आठवत नाही. ऋतू हिवाळा होता की उन्हाळा होता तोही आठवत नाही. पावसाळा मात्र नव्हता. जिकडे तिकडे नवी पालवी फुटलेली दिसे. सुंदर फुले वाऱ्याने डोलून सुवास पसरवीत होती. सारे कसे आल्हाददायक छान दिसे. अशा सुंदरस्थळी सातारला अंजिक्यतारा डोंगराच्या पायथ्याशी आम्ही नुकतेच राहायला आलो होतो. यांची बदली साताऱ्यास झाली होती. आठ दिवस साताऱ्यास मुक्काम व ऑफिसात काम व आठ दिवस फिरती असे त्या नोकरीचे स्वरूप होते. शेजारपाजार होता. भोसलेबाई नामक एक वृद्धा विचारपूस करी. कामात मदत करी. घर मोठे होते. दोन मुलांसह मला राहावे लागत असे. बाजारहाट सारे दूर. मला जाणे शक्य नव्हते. मुलांना ठेवून जाणार कधी ? घरात सारे भरपूर भरलेले होते. खेड्यातून एक दूधवाली दूध घालून जाई. एक बाई आंबे आणून देई. एक आण्याला आठ आंबे. शेवग्याच्या झाडावर शेंगा, फुले, पाने असत. त्यांची भाजी करता येई. शिवाय मूठभर मेथी हातभर जागेत पेरली तर तीन दिवसांनी दोन पानी भाजी मिळे. मुलांना तर भाजी नकोच, पण मलाही फारशी गरज लागत नसे. असे आमचे सुरळीत चाले. एके दिवशी हे ऑफिसात गेले असता एक गृहस्थ येऊन म्हणाले, "दोन भाकरी व चटणीचा गोळा तयार ठेवा. एक माणूस येईल त्याला द्या."

"म्हणजे जेवायला कोणी येणार आहे?"

"नाही, भूमिगतासाठी भाकरी व चटणी द्यावी लागते. आज तुमची पाळी."

कोण येणार त्याचे नाव विचारून ठेवले. हे दुपारी आल्यावर त्यांना सांगितले. त्यांना काही बरे वाईट वाटले नाही. म्हणाले, "माणूस

आल्यावर चटणी भाकरी द्या. चटणी जरा अधिक द्या. माणसाचं नाव काय ?"

"लवंगामिरे, असं कायसं सांगितलं ?"

"लवंगमिरे नाही लवंगरे असेल."

"असेल, असेच काही गांवोगावी नवं नाव."

"हो, खानदेशात नाही का, दगडू, धोंडू, कचरू, शेणफडू अशी नावं ठेवतात. पुढे हा शेणफडू हुद्देदार झाला तर त्याची त्यालाच लाज वाटते. आईबापांना तो दोष देतो.

"बरं पण मला सांगा, हा भूमिगत कोण ? त्याचं आपलं नातं काय ? त्याला भाकरी का द्यायच्या ? भूमिगत म्हणजे दरोडेखोर ना ? वाटसरूला लुबाडतात, मारहाण करून त्यांचा पैसाअडका घेतात ते ?"

"छे, छे! असं नाही. हे लोक शिकलेले असतात. ते गरिबांच्या हक्कासाठी सरकारशी तक्रार करतात. मागासलेल्या लोकांना माणसासारखं वागवा असं सांगतात. अधिकाऱ्यांना ते आवडत नाही, म्हणून हे भूमिगत."

मला फारशी वर्तमानपत्रे वाचायला मिळत नव्हती. एके दिवशी एक हातात पडले. त्यात एका शिकलेल्या पुरुषाचे नाव दिसले. ते नाव यशवंतरावाचे होते. मला नवल वाटले, "घरचा सुखी माणूस, त्याला काय ही दुर्बुद्धी आठवली भूमिगत होण्याची, आणि गरिबासाठी त्रास सोसण्याची ?"

मी यांना म्हटले, "यशवंतराव भूमिगत आहेत, भूमिगत कसे असतात ते मला पाहायचं आहे."

एके दिवशी यांनी मला सांगितलं; "चव्हाण तुम्हाला भेटू इच्छितात."

मी संमती दिली. एका ओढ्याच्या काठी ही भेट झाली. आणि काय आश्चर्य ? हेच ते जेवून गेलेले गृहस्थ ! अंगावर जुने आणि खादीचे कपडे. खांद्यावर कांबळे. मुद्रा हसरी. त्यांनी नमस्कार केला. कुशल पुसले. आश्चर्य म्हणजे ते गृहस्थ माझ्या गोष्टींची नावे घेऊन आपली आवडनिवड

सांगू लागले ! 'बांडगूळ', "बांगड्यावर बहिष्कार" इतकेच नव्हे तर माझी एक जुनी गोष्ट "अमृता मोकिंदा" ही विद्यार्थ्यांना का आवडत असे हेही सांगितले. चटणीभाकरी खाऊन भूमिगत राहून हे गृहस्थ गोष्टीही वाचतात ! माझ्या गोष्टी इथपर्यंत पोचल्या याचे मला बरे वाटले की संकोच ? मी आभार मानले की गप्प राहिले ? मला सांगता येणार नाही. पण मनाचा गोंधळ उडाला होता. हीच यशवंतरावांची व माझी पहिली भेट.

त्यानंतर काही काळ लोटला. यशवंतराव आता मोकळेपणी वावरत होते. मोठ्या हुद्द्यावर होते. त्यांचे लग्न झाले. वेणूताई कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. यशवंतराव सुखी होते. सभा संमेलनांचे अध्यक्ष होत होते. वसंतरावदादा त्यांचे परमस्नेही. त्यांना ते फार मानीत.

माझे जावई दिलीपसिंह घाटे मध्यप्रदेशात डी. आय. जी. होते. पुणे मुक्कामी ते अचानक वारले. तेव्हा यशवंतराव चव्हाण भावासारखे धावून आले. त्या वेळी त्यांचा पहिला प्रश्न होता "आनंदीबाई कुठे आहेत ?"...

## कविवर्य ग. दि. माडगूळकर

## काबिल आदमी

विटे, कराड, कृष्णाकोयनासंगम, सातारा, सांगली, कुंडल यांपैकी कशाचाही काही कारणाने संदर्भ आली की, मला हटकून यशवंतरावांची आठवण होते. आम्ही दोघे एका परिसरात जन्मलो, एका परिसरात वाढलो, हेच कदाचित त्यांच्या माझ्यातील अकृत्रिम स्नेहाचे प्रथम कारण असेल.

यशवंतराव वयाने माझ्यापेक्षा वडील आहेत. बालपणात त्यांच्या माझ्या भेटीचा योग आला नाही. यशवंतरावांचे शिक्षण कोल्हापूरला झाले. ते ग्रॅज्युएट होऊन पुढच्या शिक्षणासाठी पुण्याकडे गेले, आणि नंतर मी कोल्हापुरात आलो. तिथेही ओळखदेख झाली नाही.

बेचाळीस सालचा लढा सुरू झाला आणि "यशवंतायना" चा अध्याय सुरू झाला. मी कोल्हापुरातच होतो. माझ्या दोन खोल्यांच्या टाचक्या बिऱ्हाडात साताऱ्याकडचे भूमिगत कार्यकर्ते हमखास आसऱ्यासाठी जमत. त्यांच्या तोंडून मी यशवंतरावांविषयी ऐकले. खूप ऐकले.

शाहीर निकम हा चळवळ्या मुलगा आम्हा दोघांतला स्नेह दुवा. एका रात्री त्याने मला यशवंतरावांनी रचलेली एक राष्ट्रीय 'कव्वाली 'साभिनय म्हणून दाखवली. तिचे शब्द आता मुळीच आठवत नाहीत. मुखड्याची ओळ तेवढी स्मरणात आहे ..

"पर्वा न आम्हाला कैदखान्याची.."

त्या तीन – चार वर्षांत मी कितीदा निकमाला म्हटले असेल, निक्क्या, लेका आमची एकदा ओळख तरी करून दे तुझ्या या यशवंतरावांशी ?"

निकम हज्जारदा "हो" म्हणाला, पण माझ्या आणि यशवंतरावांच्या भेटीचा योग आला नाही तो नाहीच. ऐन धरपकडीच्या दिवसांत मी निकमच्या लग्नासाठी कुंडलला गेलो.

प्रतिसरकारचे सारे वैभव पाहिले. नाना पाटलांना उराउरी भेटलो. पण यशवंतराव दृष्टीसदेखील पडले नाहीत. स्वातंत्र्य मिळाले. लढा संपला. भूमिगत प्रकट झाले. मंतरलेले दिवस संपून गेले. मी पोटाच्या उद्योगाला लागलो. खादीच्या कपड्यापुरतीही देशभक्तीची खूण अंगावर राहिली नाही. यशवंतराव राज्यकर्ते होण्याच्या रस्त्याने निघाले.

पोटासाठी भटकता-भटकता मी पुण्याला आलो. सुरूवातीला पंताच्या गोटात राहात होतो. एके दिवशी तिथे अचानकपणे एक असामी उपटला. दलसंघटक राघु अण्णा लिमये भारी रसाळ माणूस. ते मसूरचे. यशवंतरावांचे दोस्त.

"आमचा यशवंता" या विषयावर त्यांनी मला किती ऐकवले असेल ? .... निकम नुसती मधाची बोटे चाटवीत होता. राघुअण्णांनी मधाचे

द्रोणच्या द्रोण पाजले. त्या घडीपर्यंतचे यशवंतरावांचे चरित्र मला पूर्ण ज्ञात झाले.

गावात दोन आकण्याचे घर आणि रानात दोन बिघे शेती ही छोट्या यशवंतरावांच्या घरची आर्थिक स्थिती. वडील विट्याला बेलिफ होते. यशवंतराव नकळते आहेत तोवरच ते हे जग सोडून चालते झाले. आई खंबीर. एका विटकरीवर अठ्ठावीस युगे उभी राहील अशी. तिचे नावच विठाबाई. थोरले दोन भाऊ. दोघांनी तिसऱ्याला शहाणा करायचा विडा उचलला. यशवंतराव जात्या बुद्धिमान, अभ्यासू. ते बी. ए. झाले. एल्.एल्.बी. झाले.; यशस्वी वकील ठरले. पण त्यांचे मन मात्र वकिलीत रमले नाही. त्यांनी राजकारणात उडी घेतली. देश स्वतंत्र झाला पाहिजे, यासाठी ते निकडीचे प्रयत्न करू लागले. शिणेचे सैंगडी त्यांच्या भोवती जमा झाले.

बेचाळीसच्या युद्धात साताऱ्याने अजब उठाव केला. त्या लढ्याच्या वेळी यशवंतराव आपोआपच आघाडीवर आले.

त्यांचा तो लढा स्वयंभू होता. त्यांचे नेतृत्वही तसेच "स्वयंभू" स्वरूपाचे उत्पन्न झाले.

राघु अण्णा त्या सर्व सातारकरांबरोबर वावरलेले होते. त्यांना उत्तम कथनशैली अवगत होती. "चले जाव" चळवळीतले अनेक प्रसंग त्यांनी माझ्या डोळ्यासमोर उभे केले. त्यातल्या अनेक प्रसंगांचे नायक होते श्री. यशवंतराव चव्हाण.

यशवंतराव म्हणजे एक समर्थ नेतृत्व, अशी राघुअण्णांची बालंबाल खात्री होती. एखादा मावळा शिवाजीराजाबद्दल बोलला असेल तसे ते यशवंतरावांबद्दल बोलत. मला गुंगवून टाकत. शाहीर निककम आणि राघुअण्णा लिमये यांनी यशवंतरावांविषयी माझ्या मनात एक आगळा आदरभाव निर्माण करून ठेवला. यशवंतरावांची एकदा प्रत्यक्ष भेट व्हावी असे मला सारखे वाटत राहिले. मी वावरत होतो चित्रपटात, साहित्यात, पण मनाचे धागेदोरे राजकारणापासून सर्वस्वी तुटू शकत नव्हते.

तुरूंगवास भोगलेले मित्र राज्यकर्ते झालेले पाहण्याची तहान डोळ्यांना होतीच.

भेटीचा योग आला तेव्हा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झालेले होते. त्यांचा फार मोठा सत्कारसमारंभ साजरा होत होता. मुंबई महानगरातील शेकडो संस्था त्यांना पुष्पहार अर्पण करायला उत्सुक होत्या. त्या सर्व संस्थांचे प्रतिनिधी हातात पुष्पमाला घेऊन उभे होते. सर्वांत शेवटी माझा क्रमांक होता. मराठी चित्रपटव्यवसायाचा प्रतिनिधी एवढाच माझा अधिकार होता. मोजता येणार नाही इतका जनसमुदाय लोटला होता. त्या अगणित डोळ्यांच्या साक्षीने हा सत्कार चालला होता. माझ्या डोळ्यांच्या कडा पाणावत होत्या.

माझी पाळी आली. आम्ही दोघे एकमेकांसमोर आलो. मीच काय, अवघा भारत आता यशवंतरावांना ओळखत होता. माझी ओळख, सत्कार करणाऱ्यांची नावे पुकारणाऱ्या गृहस्थाकडून आपोआपच झाली. दूरध्वनिक्षेपकातून आवाज आला. “श्री. ग. दि. माडगूळकर.... मराठी चित्रपटव्यवसायाच्या वतीने !”

मी पुढे सरलो. माझ्या जिल्ह्यातला, शिवघडी खेळलेला, गरिबीत वाढलेला, एक सामान्य शेतकऱ्याचा मुलगा माझ्यासमोर, उभ्या महाराष्ट्राचा लोकनियुक्त मुख्यमंत्री म्हणून आपादमस्तक उभा होता. नखशिखान्त शुभ्र खादीचा पेहराव. आर्जवी-आनंदी मुद्रा. सह्याद्रीच्या शिलाखंडासारखा देह. विलक्षण बोलके डोळे. त्या डोळ्यांनी ओळख दिली. मी हार घातला. तेवढ्यानं समाधान झालं नाही. माझ्या मनातल्या भाबड्या खेडुताने बाहु पसरले. समोरच्या खेडुताला कडकडून आलिंगन दिले. मी आणि यशवंतराव एकमेकांना कडकडून भेटलो. शब्द उमटलेच नाहीत !

मुंबईच्या नागर संस्कृतीला कदाचित ते चमत्कारिक वाटले असेल, रूचले नसेल. मुख्यमंत्र्यांचे सचिव, अंगरक्षक, जागच्या जागी चुळबुळले

असतील. आम्ही एकमेकांना भेटलो. कडकडून भेटलो. बस्स ! ही माझी आणि यशवंतरावांची पहिली प्रत्यक्ष भेट.

संघर्षापेक्षा सामंजस्याकडे यशवंतरावांचा अधिक कल आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरून त्यांनी केलेली काही कार्ये बोलकी आहेत. गांधीहत्येच्या गदारोळात कैक ब्राह्मण कुटुंबांचा आसरा गेला होता. हुल्लडीच्या भरात मुळीच होऊ नये ते होऊन गेले होते. नामशेष होत आलेला एक द्वेष पुन्हा उसळण्याच्या बेतात होता. घरे पुन्हा उभी करण्यासाठी ब्राह्मणांना दिलेली कर्जे यशवंतरावांनी माफ करून टाकली. ब्राह्मण आणि बहुजन यांच्यातील द्वेषाची कीड दृष्टोत्पत्तीस येताच एका फवाऱ्याने ती मारून टाकली. धर्मांतर केलेल्या पूर्वास्पृश्यांना ते स्वतःला "बौद्ध" म्हणवू लागले तरी हरिजनत्वाच्या साऱ्या सवलती त्यांनी देऊ केल्या. बाराशे रूपयांच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण मोफत मिळेल, असे उभे केले. मराठी रंगभूमी करमणूककरातून मुक्त केली. साहित्यिक, कलाकार, गायक, नट-तमासगीर, कुस्तीगीर, शाहीर या सर्वांसाठी त्यांनी अनुदाने सुरू केली.

उभ्या महाराष्ट्रात त्यांनी एक चैतन्य भरले. "कृष्यौद्योगिक समाज" ही शब्दसंहिता यशवंतरावांचीच. शेती सुधारावी, उद्योग वाढावे, विज्ञानाचे वरदान समाजाला लाभावे, शिक्षण जीवनोपयोगी व्हावे, यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

दिल्लीचे बोलावणे आले तेव्हा इथले काम इथल्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन करून यशवंतराव दिल्लीला गेले. मला आठवतं यशवंतराव दिल्लीला जायला निघाले, त्या वेळी मी विधानपरिषदेचा सदस्य होतो. त्यांना निरोप देणारी अतिशय उत्तम भाषणे अनेक माननीय सदस्यांनी केली. माझ्यावर पाळी आली. भारावल्यासारखा मीही काही बोललो. म्हणालो, "यशवंतरावांनी राजकारण काय केलं, ते सांगण्याचा माझा अधिकार नाही. या महाराष्ट्रदेशात कलासाहित्याला शासनाकडून जी

प्रतिष्ठा मिळाली ती यशवंतरावांमुळे. यशवंतराव मनानं रसिक आहेत, साहित्यिक आहेत.”

यशवंतराव सभागृहात उपस्थित होते. शेवटी त्यांना उद्देशून मी दोन काव्यपंक्ती उच्चारल्या — अगदी उत्स्फूर्त. राजकीय भाषणात कविताबिविता आणणे व्यक्तिशः मला मुळीच आवडत नाही. पण त्या दिवशी त्या दोन ओळी आल्या. अंतरीचे ते स्वभावे बाहेरी प्रकटले. मी म्हणालो, “यशवंतराव, जा सुखेनैव जा.

उभा देश आहे तुझा पाठिराखा.

तुझी कीर्त वाढो जशी चंद्ररेखा”

या उत्स्फूर्त पंक्तीच्या रचनेवर छत्रपती शिवाजीमहाराजांच्या राजमुद्रेची उघड छाप आहे. “प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णु” चाच अनुवाद तिच्यात उमटला आहे. पण ते साहजिकच नव्हे का ? शिवाजीनंतर, शिवाजीच्या लोकसंग्राहकवृत्तीचा आणि दूरदृष्टी सुजाणपणाचा साक्षात्कार यशवंतराव याच राज्यकर्त्याच्या ठिकाणी जाणवला. स्वतः यशवंतरावांना त्यांना कुणी शिवाजीची-लोकमान्यांची पदवी दिलेली आवडत नाही. नम्रता हाही एक दुर्मिळ सद्गुण त्यांच्या ठायी आहे.

एका जन्मात यशवंतरावांनी खूप कमाई केली. इकडची दुनिया तिकडे करून टाकली.

दादा कन्नमवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्या काळातली घटना. मी माझ्या खेड्याकडे निघालो होतो. एस. टी. बसने निघालो होतो. गाडी विटे गावातून जाणार होती. गावाबाहेर गर्दी दिसली. तोरणे उभारलेली दिसली. गाड्या लागलेल्या दिसल्या.

“काय आहे ?” मी चौकशी केली.

“समारंभ.”

“कसला ?”

“कॉलेजचं उद्घाटन आहे.”

कॉलेज-आणि आमच्या विट्याला ? माझा आनंद उरी मावेना. गर्दीमुळे थांबलेल्या एस. टी. गाडीतून मी माझी बॅग घेऊन उतरलो. निमंत्रणावाचूनच त्या समारंभात सामील होण्यात मला संतोष होता. प्रथमदर्शनीच सोनेरी रंगात लिहिलेले कॉलेजचे अभिधान वाचले – "बळवंतराव चव्हाण कॉलेज."

वा : ! पुत्र व्हावा ऐसा गुंडा !

ज्याचा तिन्ही लोकी झेंडा !

बिचाऱ्या बळवंतरावांच्या पदरी पाच-सात बुके तरी पडली होती की नाही, कुणास ठाऊक. आपल्या मुलांना कसे शिकवावे या चिंतेने त्यांना भाकर गोड लागली नसेल. आज एका महाविद्यालयाला त्यांचे नाव दिले जात होते. मुलाच्या कर्तृत्वामुळे कुणा कोट्याधीशांच्या नावांनी महाविद्यालये ओळखली जात असतील, पण गरीब शेतकऱ्याचे नाव मिरवणारे हे पहिलेच कॉलेज असेल.

यशवंतरावांच्या मातुःश्रींच्या नावानेही काही संस्था ओळखल्या जातात. ही केवढी कमाई ? मी कमाई म्हणतो ही मंत्रिपदे आणि अधिकाराच्या जागा लाभलेल्या महाभागांनी आणखी काही कमावले. धन मिळवले, दौलत मिळवली. यशवंतरावांनी मिळवले ते फार थोड्यांना मिळवता आले, व्यक्तिगत चारित्र्याचा बडिवार आजकाल बड्याबड्यांना राहिलेला नाही. तळे राखणारा पाणी चाखणारच, हा लोकोक्तीतील सिद्धान्त आता सर्वसामान्य झाला आहे. यशवंतराव मात्र या वाटांना वळले नाहीत. आज साऱ्या देशाची संपत्ती हाताळणाऱ्या या माणसाचे कराड येथील निवासस्थान कुणी आवर्जून जाऊन पाहावे. इंग्रजांच्या जमान्यातील मामलतदारदेखील याहून चांगली बंगली बांधता !

राजकारणाच्या धकाधकीत त्यांचा वाचनाचा व्यासंग सुटलेला नाही. ते केव्हा वाचतात, देव जाणे. गाठीभेटीत संदर्भ निघतात तेव्हा नवल वाटते ते त्यांच्या वाचनाचे आणि स्मरणशक्तीचे.

आपल्या सहकाऱ्यांविषयी तर त्यांच्या मनी प्रेम आहेच, पण माझ्यासारख्या अनेक साहित्यिकांचा सहवास त्यांना फार प्रिय वाटतो. उत्तम चित्र, उत्तम कविता, उत्तम नाटक यांचा रसास्वाद घेताना अजूनही त्यांना वेळेचा विसर पडतो.

गेली अकरा वर्षे मी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचा सभासद आहे. पण माझी त्यांची भेट झाली की, ते पहिला प्रश्न विचारतील, "नवीन काय लिहिताय ?" मी माझ्या मनातल्या कल्पना, योजना सांगतो. ते लवकरलवकर लिहिण्याचा आग्रह करतात. मग आम्हा दोघांचेही मित्र असे काही साहित्यिक आहेत, त्यांची चौकशी सुरू होते. मराठीतल्या कुण्या लेखकाचे आपण काय वाचले त्याचा ऊहापोह होतो. अन्य भाषेतला कुठला ग्रंथ नव्याने वाचला, त्याचे नवनीत मला आवर्जून दिले जाते. केवळ साहित्य आणि कला यांच्यासंबंधीची आमची बोलणी इतकी रंगत जातात की, त्यांच्या कुणीतरी सचिवाला येऊन आठवण करावी लागते. "साहेब, वेळ झाला. आपल्याला कार्यक्रम आहे !" मग यशवंतराव उठतात. फार प्रसन्नपणाने हसतात. अगदी मनापासून म्हणतात, "अण्णा, दिल्लीला या."

"जरूर !" मी उत्तर देतो.

त्यांनी म्हणावे, आपण होकार द्यावा. ठीक आहे. पण एकदा खराच योग आला. मुलीला "स्थळ" शोधण्यासाठी मी सहकुटुंब दिल्लीला गेलो. त्याच वेळी मला "पद्मश्री" पदकही घ्यायचे होते. पदकग्रहणाचा समारंभ झाला. दुसऱ्या दिवशी यशवंतरावांचे आमंत्रण. साऱ्या महाराष्ट्रीय पारितोषिक विजेत्यांचा त्यांनी सत्कार केला. या समारंभाला माझी पत्नी आणि मुलगी याही हजर होत्या. यशवंतरावांशी त्यांची ओळख झाली. सौ. वेणूताईंशी परिचय झाला. आम्हाला तिघानाच मग त्यांनी भोजनासाठी बोलावले. अगदी साधा बेत. भारताच्या कोणा श्रेष्ठ नेत्यासमोर आम्ही बसलो आहोत असे आम्हाला वाटलेच नाही. यशवंतराव आणि वेणूताई

दोघांच्याही वागण्यातील जिव्हाळा खरोखरीच अविस्मरणीय होता. त्या दिवशी पोटभर जेवलो. पोटभर बोललो.

यशवंतराव शूर आहेत, तितकेच हळवे आहेत. आई आणि पत्नी यांच्याविषयी त्यांच्या मनात कमालीचा प्रेमभाव आहे. आईला तर ते फार मानीत असत. एका लोक-साहित्यविषयक परिसंवादात त्यांनी आपल्या आईने रचलेल्या दोन ओव्या म्हणून दाखवल्या. त्यांचा साद गहिवरलेला वाटला. मुंबईला "सह्याद्री "बंगल्यात त्यांच्या मातोश्री आजारी होत्या. थोर-थोर मंडळी मुद्दाम त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी येत-जात होती. यशवंतराव एकटेच गॅलरीत एका वेताच्या खुर्चीवर बसले होते. मी गेलो.

"या अण्णा. बसा." यशवंतराव म्हणाले.

"कसं आहे आईचं ?" — — मी.

"बरं आहे, पण तो वेडा कुंभार काय करील ते खरं." ते खिन्नपणे उद्गारले.

माझ्या त्वरित लक्षातच आले नाही, पण "वेडा कुंभार" हा शब्द त्यांनी "परमेश्वर" या अर्थाने वापरला होता. त्या शब्दाचा संदर्भ माझ्याच एका गीताशी होता. ते गीत त्यांच्या लक्षात राहिलेले होते. यशवंतराव देवभोळे नाहीत, पण नास्तिक निश्चित नाहीत. विज्ञानाइतकाच त्यांना अध्यात्माविषयीही आदर आहे. मात्र ज्योतिषा-बितिषाचे थोतांड त्यांना मुळीच आवडत नसावे. एकदा असेच आम्ही काही साहित्यिक मध्यरात्रीनंतरही त्यांच्याशी चर्चा करण्यात रमून गेलो. एक वाजला तसे सर्वांचे भान जागे झाले.

"चलू या आता" कुणीतरी म्हणाले.

"जाणार कसे अण्णा ?" यशवंतरावांनी मला विचारले.

मी म्हणालो, "सवालच आहे. माझी मोटार नाही. आमच्या कुंडलीत वाहनयोग नाही."

"तुम्ही असं करा," यशवंतराव गंभीरपणे म्हणाले, "एक वाहन घ्या आणि कुंडली त्यात लावून ठेवा. कुंडलीत वाहन नाही तर वाहनात कुंडली !" आम्ही सर्वजण खळाळून हसलो.

माझा आणि त्यांचा स्नेह ही एक भाग्याची गोष्ट आहे. १९४२ च्या काळात त्यांनी माझे पवाडे ऐकले असतील. निकमाच्या तोंडूनही काही ऐकले असतील. आपल्या शेजारचा लेखक म्हणून त्यांना माझ्या बद्दल कुतूहल असेल.

सत्कार समारंभातल्या त्या भेटीने आम्ही एकमेकांच्या फार जवळ आलो. मग भेटीवर भेटी झाल्या. त्यांनी मला आग्रहाने कविता वाचायला लावल्या, कथा सांगायला लावल्या. आम्ही खूप खूप बोललो. १९६२ साली त्यांनी सांगितले म्हणून मी निवडणूक प्रचाराची गाणी लिहिली. थोडी कुचेष्टा झाली. ती होतच असते. ती निवडणूक अत्यंत यशस्वी झाल्यावर माझ्या कामाची शाबासकी स्पष्ट शब्दात व्यक्त करायला यशवंतराव विसरले नाहीत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी वाङ्मय, कला, संस्कृती यांच्यासाठी पुष्कळ काही केले. आज त्यांचा वारसा सांगतच महाराष्ट्राचे राज्य पुढे चालले आहे. मराठी विश्वकोशाच्या महावृक्षाचे बी यशवंतरावांनीच पेरलेले आहे.

कर्तव्यदक्ष प्रशासक, त्यागी देशभक्त, दिग्विजयी नेता, जिव्हाळ्याचा मित्र, मातृभक्त पुत्र आणि नीतिसंपन्न गृहस्थ अशी यशवंतरावांची अनेक रूपे आहेत. माझ्या मते समतोल विचार हे त्यांच्या यशाचे रहस्य आहे. ते कधीही एकान्तिक भूमिका घेत नाहीत.

यशवंतरावांना साठ वर्षे पूर्ण झाली हे खरे वाटत नाही. साऱ्या साऱ्या गोष्टी काल परवा घडल्यासारख्या वाटतात. बेचाळीसचा लढा.. स्वातंत्र्यलाभ.. संयुक्त महाराष्ट्र दिवस.. प्रतापगड... शिवनेरी.. चीनशी युद्ध... पाकिस्तानी युद्ध.. बांगलादेश.. आमच्या भेटी.. नागपूरमधल्या.. महाबळेश्वरच्या.. खुल्ताबाद... पुणे.. दिल्ली.. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

झाले, तेव्हा यशवंतरावांचा उल्लेख "सर्वांत तरुण मुख्यमंत्री" म्हणून केला जात होता. आज त्यांनी साठी ओलांडली !

मार्ग तरुणांनीच चालायचा असतो, पण...

मार्गदर्शन अनुभवसंपन्नांनीच करावे लागते.

लढ्याचा सेनानी, प्रांताचा मुख्यमंत्री, देशाचा संरक्षणमंत्री या सर्व भूमिका सारख्याच यशस्वी रीतीने पेलणारी "काबिल" माणसे क्वचित जन्माला येत असतात. भारतासारख्या अर्धविकसित आणि खंडतुल्य देशात शासन आणि संघटना या दोन्हीतही अतिरेकी भूमिका घेऊन निभत नाही. यशवंतरावांनी हे जाणले आहे. म्हणूनच ते विराजमान होतील, ते पद प्रतिष्ठा पावते.

## प्रा. वामनराव चोरघडे
## तैसे उजू अंतर

चालत्या बुद्धीला फाटे फोडले तरच विद्वत्ता दिसते, अशी एक चाल पडली आहे. मूळची बुद्धी सरळच असते. अहंकाराने तिला फाटे फुटतात.

सरळ शब्दावरून उगीच आठवण झाली. "सरळ" शब्दाचा अर्थ फार सोपा आहे, असे आजवर वाटत आले. आता वाटत नाही. सरळपणाचे विवेचन श्रीमद् भगवद्गीतेमध्ये तीन ठिकाणी आलेले आहे.

अध्याय तेरावा – श्लोक सात, अध्याय सोळा – श्लोक एक, अध्याय सतरा श्लोक चौदा ! या तीन ठिकाणी आर्जव शब्द आला आहे. शब्दाचा अर्थ सरळ नाही, ते तेव्हाच ध्यानात आले. तेराव्या अध्यायात आर्जवाच्या अगोदर चार गुणांचे कथन आहे. सोळाव्या अध्यायात "अभया" पासून सुरू होऊन "तपा" पर्यंत गेल्यानंतरच आर्जवाचा उल्लेख आहे. सतराव्यात आर्जवाच्या अगोदर दोनच गुणांची साधना अभिप्रेत आहे. म्हणजे इतके गुण अंगी बाणल्याशिवाय "आर्जवाची" बात करणे, हा अहंकारच ! कारण त्या गुणांसाठी जन्म अपुरा पडायचा ! पडो !! त्यामुळे निदान पुढच्या जन्माचे कर्म निश्चित होईल.

हे सर्व आठवण्याचे कारण, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री आणि उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांना जाऊन परवा एक वर्ष लोटले. त्यांचे "असणे" आणि त्यांचे "नसणे" याचा भिन्नभिन्न मनावर काय परिणाम झाला, हा जिज्ञासेचा विषय होऊ शकेल, पण त्यात "आर्जव" असेलच असे नाही.

शब्दावर जशी माझी श्रद्धा आहे तशीच साहेबांवर होती, आहे ! त्यांच्या असण्याने माझा काही फायदा होता व नसण्याने क्षती झाली, असे सुतराम नव्हते. "पत्री" सरकारच्या काळापासून त्यांना मोह जडला तो अगदी निरपेक्ष आणि सततचा, म्हणून तो टिकलाही असेल. साध्याही माणसाच्या

आयुष्यात असे काही क्षण येतात की, त्या वेळी तो हतबुद्ध होतो. तेव्हा कुणाची तरी त्याला आठवण येते. अर्जुनाला श्रीकृष्ण सखा भेटला. कारण तो अर्जुन होता.

आम्ही केवळ कण, अणू रेणू पण या अणुरेणूंनाही कधीतरी कोणीतरी हवेच असते. आई जिवंत असेतो काहीच वाटत नाही. ती नसली म्हणजे मग कोणीतरी डोळ्यासमोर असावे असे वाटते.

माझ्या क्षणाक्षणाच्या जीवनातले असे एक स्थान मी साहेबांना देऊन टाकले होते. त्या निमित्तच एखादी आठवण सांगण्याचा प्रयत्न, अपयश माझे, यश साहेबांचे-देवाचे!

पुसद येथे माहे दिसंबर १९६४ साली विदर्भ साहित्य संघाचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन भरले. उद्धाटक "साहेब" होते. साहेबांच्या सोईसाठीच अधिवेशनाच्या तारखा पुढे पुढे सरकत होत्या. पुसद हे मुख्यमंत्र्यांचे गाव. सगळी हाल व सगळी चाल मुख्यमंत्री वसंतरावांची. थाट तोलामोलाचा. एखादे पर्व साजरे व्हावे तसे हे अधिवेशन झाले. अधिवेशनाचा पहिला दिवस सकाळी दहा वाजता सुरू झाला. बड्या मंडळींना बघायला वीस हजाराचा श्रोतुसमुदाय जमला. लेखक साहित्यिकांत आचार्य अत्रे, ह. रा. महाजनीपासून त्या वेळची सर्वच मंडळी जमली होती. यजमान म्हणून वसंतरावजी तासभर स्वागतपर बोलले. शुभेच्छासाठी तास अर्धा तास गेला. साहेबांनी नेटके, प्रसंगोचित, प्रामाणिक, असे रसपूर्ण भाषण केले. आणि बिचाऱ्या संमेलनाध्यक्षाच्या वाट्याला दुपारी टळटळीत दोन वाजता श्रोतृसमुदाय आला. तो बिचारा अध्यक्ष मी ! अध्यक्षाच्या अगोदर साहित्याचा जो तोलमोल उचलला, सांभाळला गेला त्याने अध्यक्षालाही झिंग चढली. लिखित भाषण बाजूला ठेवले व स्वतःचा व इतरांचा आब– राब सांभाळीत तास दीड तासानंतर तोही खाली बसला. बाबुराव अत्रे जागचे उठून धावले आणि त्यांनी मला कवेत घेतले. वेणूताई चव्हाण यांच्या डोळ्यांना रूमाल लागलेला

दिसला. साहेब गोरेमोरे झाले. वसंतराव नाईक तृप्तीने आणि अचंब्याने बघत होते.

मला काहीच कळेना. साहेब गोरेमोरे का झाले ? शेजारी ह. रा. महाजनींना चपापून मी प्रश्न केला. त्यांनी मला "आभाराचे भाषण ऐक", अशी खूण केली.

वेणूताई आणि साहेब उभयतांना माझ्या भाषणाचा असा परिणाम भोगावा लागला या विस्मयात मी चूर झालो. कुणाला विचारावे तर कुणी सांगेना ! आणि मी काय बोललो ते मलाच आठवेना !

टळटळीत दुपारी पुसदपासून जवळच असलेल्या वसंतरावजींच्या गहुली येथील बागेत सन्मान्य पाहुण्यांचा भोजनसमारंभ होता. सामिष आणि निरामिष या भोजनाची सोय होती. टेबलाच्या एका बाजूला सामिष आणि दुसऱ्या बाजूला निरामिष पंगत बसली. खाण्यात मन घालता येईल इतके माझे मन ठिकाणावर नव्हते.

अगदी समोरच्याच पंगतीत माझ्यासमोर वेणूताई आणि साहेब बसले आणि मी पोचताच दोघांनीही हसून माझे स्वागत केले. हा दुसरा धक्का ! स्टेजवर गोरेमोरे होण्यात काही मुत्सद्देगिरी असेल काय, अशी क्षुद्र शंका ! पण तिचा परिणाम माझ्या मनावर होण्याअगोदर साहेब व वेणूताई वसंतरावांना उद्देशून म्हणाले, "वामनरावांचे गोष्टी सांगण्याचे सामर्थ्य अद्भुत आहे ! तुला तर त्यांनी रडविलेच पण माझीही पंचाईत होऊन बसली ! वामनराव, त्या वेळी मी तुमच्याशी हात मिळवणार होतो, ते जमले नाही. आता मात्र हात मिळवतो आणि शाब्बास म्हणतो !"

वसंतराव अभिमानाने म्हणाले, "दुपारी दोन वाजता उपाशी श्रोत्यांना पकडून खिळवून ठेवणे गंमत नव्हे ?"

आणि मग मात्र अशी भूक भडकली की, मला किती वाढले अन् मी किती खाल्ले, हा हिशेब उरला नाही.

हे अद्भुत सामर्थ्य कोणते हे मला आठवेना. कारण सभेत बोलताना किस्सेबाजी ही माझी फार जुनी खोड. शब्दापेक्षा चित्र जिवाला अधिक

भिडते ही श्रद्धा. माझ्या आईबद्दल मी बोललो. त्याच गोष्टीने साहेब गहिवरले असावेत ! कारण त्यांची मातृभक्ती मला ठाऊक होती. ते सगळे चित्र माझ्या डोळ्यासमोर तरंगत राहिले. ते शब्दात मांडण्याचा हा प्रयत्न.

अध्यक्षीय भाषणाचा माझा विषय "मराठीचा वाचक दिवसेंदिवस कमी होत आहे" हा होता. त्याच्या अनेक कारणांपैकी मराठी भाषेचे आणि जीवनाचे कौतुकापोटी झालेले इंग्रजीकरण, हे होते. त्यामुळे सामान्य मराठी समाज कसा बुचकळ्यात पडला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी माझ्या आईचा दृष्टान्त मी दिला.

माझ्या घरची अशीच एक दुपार... पत्नी कामावर गेलेली, मुले-मुली शाळा- कॉलेजात. घरी मी एकटा अन् माझी आई ! आई आमच्यात खातपीत नसे. तिची सगळी व्यवस्था तिच्या सोवळ्यानिशी वेगळी होती. तिची देवपूजा, दीडबुटलीचा स्वयंपाक आणि जेवणही आटोपले होते. जेवणाच्या टेबलावर ताटात सगळे पदार्थ वाढून मी जेवत होतो. मी कसा जेवतो, जेवतो की नाही हे पाहण्याची आईची खोड ! ती अशी यायची, हसत हसत उभी राहायची. एखाद दुसरा शब्द टाकून आपल्या कामाला लागायची.

आणि पंचवीस-तीस वर्षांपूर्वीची अशीच एक नेहमीसारखी कामसू दुपार... मी चार-दोन घास घेतले होते. आई आली. माझ्याकडे तिने बघितले. मीही हसून तिच्याकडे पाहिले. परतताना ती आपल्या खोलीकडे न जाता समोर दारी गेली. घरी कोणी आहे की काय, असा कानोसा तिने घेतला. मी नवल करीत असतानाच ती माझ्याजवळ येऊन उभी राहिली.

"का गे आई, तुझं जेवण अजून झालं नाही ? माझ्याशी काही काम आहे का ?'

"नाही रे, येरीच उभी आहे मी".

"नाही आई, असं तू कधी करीत नाहीस. तुला काहीतरी बोलायचं आहे, काहीतरी सांगायचं आहे. तू बाहेरचा कानोसा घेऊन आलीस. घरी

कुणीच नाही. आई, तू आणि मी दोघेच. हाच तुझा "माणकोजी बोधला !" काही बिनसलं आहे का ?"

"कुठे काय ?... काहीच नाही रे ! पण बापू, मी तुला आपली येरीच विचारते असं वाटतं की मी रांडल्याक दिवसेंदिवस "बह्याड" होत चालली आहे !

माझ्या हाताचा घास आपोआप ताटात पडला. खरकट्या हातानेच मी आईला बिलगलो. तिला जवळ घेत म्हणालो, "आई, तुला बह्याड म्हणणारा अजून जन्मालाच यायचा आहे. तू बह्याड झालीस तर तुझा देवही बह्याड होईल ! काय झालं ते मला सरळ सांग. इथे फक्त तू आणि तुझ्या पोटचा पोरच आहे !"

"तसं काही झालं नाही रे ?... बह्याड म्हणजे असं की, तुझ्या या टोंगळ्या एवढ्या टोच्या... (माझ्या तीन मुली ) आजकाल जे बोललेत तु सुद्धा मला समजत नाही."

मी गप्प बसलो. खरकटा हात आडवा करून कसे तरी डोळ्यांतले खारट पाणी टिपले.

सायंकाळी आई मुरलीधराच्या देवळात गेल्यानंतर सर्व गोष्टींचा खुलासा झाला. सुनेशी आईचे काहीच बिनसले नव्हते. उलट सूनच अचंब्यात पडली होती. त्यामुळे मी भांड्यात पडलो, आईच्या बह्याडपणाचे कारण माझ्या तीन मुली !

या तीन मुलींना घरी सर्व स्वातंत्र्य होते. त्यांच्या स्वखर्चासाठी त्यांची आई त्यांना नियमित पैसे देत असे. खाण्यापिण्याच्या गरजांबाबतही एक दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची चाल आमच्याकडे नव्हती. मुलांना एकदाच मी सांगितले, "हे बघा, तुम्ही कसं वागता, कसं राहता, हा माझा विषय नव्हे. मीही एक तुमच्यासारखा धडपडणारा माणूस. पण आपल्या घरात एक रीत मी रूजवली. मी कॉलेजात जातो तेव्हा रोजच आईला सांगतो की, "आई मी निघालो." तुमची आई देखील रोजच सांगते, 'मोठी आई, मी जाऊन येते', तीच चाल तुम्ही पाळावी. तुम्हाला कोठेही

जाण्याची मनाई नाही. पण जाताना मोठ्या आईला मोठेपणा द्या. मायेचे कढ तुम्हाला अजून समजायचे आहेत. सध्या त्याची गरज नाही.”

माझी मुलेही चाल पाळू लागली. आईच्या त्या ‘बह्याड’ दिवशी दोन कॉलेजात जाणाऱ्या आणि एक हायस्कूलमध्ये असणाऱ्या मुलींमध्ये जो संवाद झाला तो येणेप्रमाणे…

“अय्या, सुमाताई, अगे, आज पंचशीलमध्ये बघ ‘जागते रहो’ पिक्चर लागलं आहे. चलायचं ? अनायासे तिघीही आपण मोकळ्या आहोत.”

“अगे, कुंदे, अडचण काही नाही… पैसे आहेत आपल्याजवळ. पण आता शो सुरू व्हायला आहे अर्धा तास आणि या प्रभाचा नट्टापट्टा आटोपून आपण पोहोचणार केव्हा ?”

“मी दम देते प्रभाला, सांगते की जायचं असेल तर ये, नाहीतर उडत जा.”

आता ह्या मॉर्डन मुलींची तयारी म्हणजे काय असते, हे आई-बाप झाल्याशिवाय कळणे अशक्य. तशा माझ्या मुली पराक्रमीच. त्यांनी तशी दहा मिनिटात तयारी केली. दोघींनी जामानिमा चढविला. धाकटी प्रभा सॅन्डल्स नावाचे एक अद्भुत पादत्राण चढवायला लागली आणि सुमाताई किंचाळली…

“अय्या, मोठ्या आईला सांगायचं राह्यलंच ! जा गे प्रभे, मोठ्या आईला सांगून ये !”

लेखकाची मुलगी ! नकटं व्हावं पण धाकटं होऊ नये, असं म्हणत म्हणत ती मोठ्या आईजवळ जाऊन थडकली. झाला तो संवाद असा ..

“मोठी आई, आम्ही जातो.”

“कुठं वो ? तुमची माय नाही, तुमचा बाप नाही.”

“माहित आहे गे ! पण आम्ही पिक्चरला चाललो !”

“कोठं ?”

“काय मोठी आई ! तुला समजत तर काही नाही. पण सांगावं मात्र लागतं,.... अगे, पंचशील मध्ये ‘पिक्चर’ लागलं आहे. आत्ता अडीच

वाजता 'मॅटिनी' सुरू व्हायचा आहे. आमच्या जवळ पैसे आहेत. बाबांनी सांगितलं म्हणून तुला सांगून जातो."

संवाद संपला, मुली सिनेमाला गेल्या. आणि 'पिक्चर', 'मॅटिनी', 'शो' हे तीन शब्द न समजल्यामुळे अर्थ "बह्याड" ठरून तिच्या पोटच्या पोराला आपली आत्मग्लानी सांगू लागली.

पुसदच्या माझ्या अध्यक्षीय भाषणात कसल्यातरी धुंदीत गोष्ट सांगून झाल्यावर ऊर्ध्व बाहू करून मी आवेशात आलो

"बाबांनो, भारतात उपलब्ध होणाऱ्या सर्व पदव्या मिळविलेल्या माझ्यासारख्या लेखकाची ही आई ! गेली चार हजार वर्षे ऋषी शेतीपासून तो साधी शेती करणारा कष्टाळू शेतकरी, त्याला मदत करणारी त्याची कष्टाळू बायकामुले,...

या देशातल्या राबणाऱ्या आया-बहिणी, इथले कामगार, इथले अलुतेबलुते सर्वच या विसाव्या शतकाच्या मध्यावर "बह्याड" ठरली आहेत का ? तर त्यांना 'पिक्चर', 'मॅटिनी', 'शो' असले भुक्कड इंग्रजी शब्द येत नाही म्हणून ! व्यासांपासून तर विनोबांपर्यंत सगळे हरले आणि जीत झाली कुणाची ? तर कवडीमोलाच्या ह्या तीन शब्दांची ! यापुढे मला सांगा, तुमची मराठी भाषा बोलेल कोण आणि वाचेल कोण ?

"नवल असे की, भूमितीच्या प्रमाणाने इंग्रजीची प्रमादी प्रतिष्ठा वाढतच आहे. सोय, व्यवहार म्हणून अधिकाधिक "बह्याड" एकाचे दोन, दोनाचे दहा होत आहेत. अन् वर तेच "मराठी असे आमुची मायबोली !" कर्म !

इथेच मी थांबलो होतो. इथेच यशवंतराव गहिवरले होते, वेणूताईंच्या डोळ्याला पदर होता. अन् दोन सहज खाऱ्या थेंबांनी मी जो चिंब झालो तो अजून आजतागायत तसाच !... तोच !....

चांगल्याला वाईट म्हणणे या चालीचे अनुसरणे करायला अहंकाराशिवाय इतर भांडवल नको असते. शिवाय या भांडवलावर माणूस विद्वान ठरतो. चांगल्याला चांगले म्हणायचे, एवढेच नव्हे तर त्याचे कौतुक करायचे ! याला जी शक्ती लागते त्या शक्तीचे पोषण फक्त ऋजुत्व

करू शकते, पण त्यासाठी अगोदरचे तपादी गुण मिळवावे लागतात, त्याची दाद घ्यायची तर अशाच एका मूर्तिमंत ऋजुत्वाची आठवण करावी लागते.

प्रत्येक माणसाला आई असतेच. देवाला आई असते की नाही, मला माहीत नाही, पण माणसाला आई असणे हे माणसाचे देवपण ! देवाचे "आई नसणे" हे त्याचे माणूसपण. त्यातले खरे काय अन् खोटे काय, ह्यासाठी हवे असलेले आर्जव हाच खरा साधनामार्ग आहे !

## सुधांशु
## आठवणीतील यशवंतराव

मला जीवनात ज्या मोठ्या माणसांचा स्नेह लाभला त्यात प्रमुख यशवंतरावजी चव्हाण. त्यांची किती वेळा भेट झाली, किती काळ आम्ही सुखदुःखे बोललो, किती रात्री जागवल्या, याला किती महत्त्व ! जेव्हा भेटलो तेव्हा जिव्हाळ्याचे भेटलो; आणि अंतःकरणातले बोललो हे महत्त्वाचे. तसे मी त्यांना १९३९ सालीच प्रथम पाहिले. तासगाव येथे भरलेल्या काँग्रेसच्या राजकीय परिषदेच्या वेळी मानवेंद्रनाथ रॉय अध्यक्ष होते. रॉयवादाकडे सातारा काँग्रेसची काही मंडळी झुकत होती. विचारांचा संघर्ष वाढत होता. मीही रोज वर्तमानपत्रे वाचत होतो. माझ्या गावचे धुळाप्पा आण्णा नवले, तात्या सूर्यवंशी या कार्यकर्त्यांशी बोलत होतो. या परिषदेलाही मी गेलो होतो. राजाराम मास्तर, दत्ता पाटील अशी मित्रमंडळी बरोबर होती. सभेत सुरूवातीपासूनच संघर्षाचे वातावरण दिसले. शेवटी सभा उधळलीच गेली. निराशा आणि व्यथा घेऊन आम्ही परतलो. पण त्या वेळेला काही कार्यकर्ते नेते मंडळी पाहायला मिळाली. हा फार मोठा लाभ. या वेळी मी यशवंतरावांना प्रथम पाहिले. तरतरीत खादीधारी तरुण कार्यकर्ता म्हणून मला त्यांचे आकर्षण वाटले. हा तरुण कार्यकर्ता उद्या महाराष्ट्राचाच नव्हे तर भारताचा नेता होणार आहे याची त्या वेळेला कल्पना आली नाही, पण त्यांचे व्यक्तित्व मला आकर्षक वाटले एवढे खरे !

मध्यंतरी खूप वादळे, खूप वणवे निघाले. पण अंधारातून उषा उजळली. भारताच्या क्षितिजावर स्वातंत्र्याचा सूर्य उगवला आणि शेवटी १९५० साली प्रजासत्ताकाची ध्वजा फडकली. महाराष्ट्राचे नवे मंत्रिमंडळ आले, त्यात यशवंतराव चव्हाण पुरवठा मंत्री झाले. १९५२ साली निमणी येथे तासगाव तालुका शेतकरी परिषद होती. त्यासाठी यशवंतरावजी

येणार होते. मीही परिषदेस गेलो होतो. तेथे यशवंतरावांची भेट झाली. त्या छोट्याशा तंबूत मी त्यांच्याशी पाचदहा मिनिटे बोललो. त्यांनी माझ्या नवीन कवितेसंबंधी विचारले. मी माझा दुसरा कविता संग्रह 'विजयिनी' त्याना भेट दिला. त्यांनी तेथेच त्यातील काही कविता आधाशासारख्या वाचून काढल्या आणि म्हटले, "तुमची भेट झाली बरे झाले. ही कवितांची भेटही छान मिळाली. मला साहित्याची आवड आहे. आणखी काव्यात काय प्रगती ?" मी सांगितले, "मुंबई आकाशवाणीने मला अधिकृत कवी म्हणून नुकतीच मान्यता दिली आहे. लवकरच कविता येऊ लागतील." त्यांना फारच आनंद झाला. ते म्हणाले, "मग आता तुम्ही मला वरचेवर भेटालच आकाशवाणीवर." त्यांनी हस्तांदोलन करून माझे अभिनंदन केले. तो माझ्या दृष्टीने सोन्याचा क्षण !

पुढे मुंबईस गेल्यावर त्यांनी नभोवाणीकडे माझी कविता केव्हा लागेल याची चौकशी केली. आकाशवाणीने कळविल्याप्रमाणे त्यानी 'दत्त दिगंबर दैवत माझे' ही कविता ऐकली. आकाशवाणीला कविता फार आवडल्याचे कळविले आणि मलाही पत्र पाठवून माझे अभिनंदन केले. यशवंतरावांच्या या दक्षतेने, प्रेमाने माझे अंतःकरण भरून आले.

पुढे १९५४ साली आम्हीच यशवंतरावजींना औदुंबरी आणले.

अंकलखोप विकास मंडळातर्फे औदुंबरी एक सुंदर धर्मशाळा ( गेस्ट हाऊस ) बांधली. त्याचे उद्घाटन कोणाच्या हस्ते करायचे यासाठी मीटिंग होती. ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष धुळाप्पा आण्णा नवले होते. मी या मंडळाचा सेक्रेटरी होतो. मी यशवंतरावजींचे नाव सुचविले. धुळाप्पा आण्णा यांनी जोरदार पाठिंबा दिला व सर्वानुमते यशवंतरावजींना निमंत्रण देण्याचे ठरले. यशवंतरावांनीही येण्याचे मान्य केले.

हा समारंभ मोठ्या उत्साहात साजरा झाला. यशवंतरावजींची त्या वेळी अगदी जवळून भेट झाली. माझ्या 'विजयिनी' तील कवितांबद्दल ते विस्ताराने बोलले. समारंभानंतर माझ्या घरी चहासाठीही आले. त्यांच्या साहित्यिकांच्याबद्दलच्या प्रेमाचा हा अनोखा अनुभव होता.

मधूनमधून यशवंतरावांचे कवितेबद्दल पत्र येतच होते. १९५८ साली माझा ‘जलवंती’ हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. तोही मी त्यांना पाठविला. त्यांना त्यातील कविता फार आवडल्या. त्यासंबंधीची एक आठवण, - अंतःकरणाला भिडणारी. त्या वेळी ते मुंबईला मुख्यमंत्री होते. त्यांना भेटायला डॉ. सरोजिनी बाबर गेल्या होत्या. सरोजिनीताई त्यांच्या भेटीच्या हॉलमध्ये गेल्या. त्या वेळी ते छोटेसे पुस्तक वाचत होते. सरोजिनीबाईंनी त्या आल्याची कल्पना दिली. ‘ताई बसा’ म्हणाले, आणि पुस्तक वाचनात गढून गेले. सरोजिनीबाईना कळेना, एवढे काय वाचतायत् ! साहेब वाचत होते, थांबत होते, काही खुणा करीत होते. मधून मधून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य, कारूण्य, प्रसन्नता यांच्या लाटा उमटत होत्या. त्यांनी पुस्तक वाचून संपवले आणि म्हणाले, “आता बोला !” सरोजिनीबाई म्हणाल्या, “आपण काय वाचत होता ते आधी सांगा.” यशवंतराव म्हणाले, “आहे तुमच्याच कवींचे पुस्तक ! कवी सुधांशूंच्या कवितांचे पुस्तक वाचत होतो. फारच सुंदर कविता आहेत. मला फार आवडल्या. त्यांच्या आईसंबंधीच्या कविता अंतःकरणास भिडणाऱ्या आहेत. त्या वाचून मला माझ्या आईची आठवण होते.” आणि ते नकळत भारावल्यासारखे झाले.

यशवंतरावजी मुख्यमंत्री असताना मुंबईचे गायक आर्. एन्. पराडकर यांच्या गायनाचा कार्यक्रम त्यांच्या बंगल्यावर झाला. पराडकरांनी प्रथम दोनतीन गाणी म्हटली, परंतु ती माझी नव्हती. यशवंतराव म्हणाले, “पराडकर, आपण सुधांशूंची गीते म्हणता ना ?” पराडकर म्हणाले, “हो ! मी सुधांशूंची खूप गीते म्हणतो.” मग यशवंतरावांनी सांगितले, “मला फक्त सुधांशूंचीच गीते ऐकावयाची आहेत.” आणि मग पराडकरांनी तास दीड तास माझीच गीते गायली. यशवंतरावांनी आणि सौ. वेणूताईंनी माझी ती गाणी मोठ्या प्रेमाने ऐकली.

ही हकीगत दोन दिवसांनी स्वतः पराडकरांनी मला कळविली आणि लिहिले की, "मुख्यमंत्र्यांना किती आवड आहे आपल्या कवितांची ! त्यांना काय माहीत माझ्यासंबंधीचा त्यांचा जिव्हाळा आणि त्यांची रसिकता !"

एकदा मी आकाशवाणीच्या काही कामानिमित्त मुंबईस गेलो होतो. याच वेळी मी यशवंतरावांना भेटायला त्यांच्या बंगल्यावर गेलो. मंत्र्यांच्या बंगल्यावर जाण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग ! त्यामुळे मी थोडा बावरलो होतो. मी दाराशी गेल्यावर आत माझ्या नावाचे कार्ड पाठविले आणि काय आश्चर्य ! स्वतः यशवंतरावच स्वागतासाठी दाराशी हजर ! मी खूप संकोचलो. मला आपल्या शेजारील कोचावर बसविले आणि आत जाऊन सौ. वेणूताईंना मी आल्याचे सांगितले. वेणूताईही बाहेर आल्या आणि मला पाहताच "वा ! दत्तदिगंबरच आले की ?" असे म्हणून नम्रतेने मला नमस्कार केला. मला 'दत्त दिगंबर' या शब्दाचे अजूनही आश्चर्य वाटते. मी औदुंबरचा म्हणून दत्तदिगंबर की त्यांना माझे "दत्तदिगंबर दैवत माझे" हे गाणे आवडते म्हणून दत्त दिगंबर, हे मला कळेचना ! खरे म्हणजे दोन्हीही खरेच होते.

वेणूताई पूर्वी एकदा औदुंबरी आमच्या घरी आल्या होत्या. माझ्या पत्नी त्या वेळी औदुंबरी महिला मंडळ चालवीत होत्या. त्यांनी आपल्या महिला मंडळातील स्त्रियांची वेणूताईंना ओळख करून दिली होती. त्यांनी शेरे बुकात त्यांचा अभिप्रायही घेतला होता. सौ. प्रमिलाबाई अजूनही मोठ्या अभिमामाने वेणूताईचा तो शेरा सर्वांना दाखवितात.

याच सुमारची गोष्ट. आमच्या भागातील दुधगावचे शिक्षक हिंदुराव पाटील मधून मधून काही लिहीत असत व लिहिलेले मला दाखवीत असत. त्या वेळी त्यांनी महाराष्ट्रातील काही प्रख्यात कर्मवीरांच्या कथा लिहिल्या होत्या. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, समाजसेवक-गोपाळराव आगरकर, महर्षि आण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव आण्णा, डॉ. आंबेडकर यांच्या कथा मला फार आवडल्या. मी त्यांना त्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे सुचविले. या पुस्तकाला यशवंतरावांची प्रस्तावना

लाभावी अशी त्यांची इच्छा होती. यशवंतराव त्या वेळी जसे मुख्यमंत्री होते तसे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षही होते. हिंदुराव पाटील रयत शिक्षण संस्थेचे शिक्षक होते, म्हणून यशवंतरावांची प्रस्तावना असावी अशी त्यांची इच्छा ! तशी पत्रे पाठवून त्यांनी यशवंतरावांना विनंती केली. आणखी एकदोघांकडून सांगून पाहिले. पण मुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीमुळे त्यांना लिहिणे शक्य झाले नाही. हिंदुराव फार निराश झाले व मलाच आग्रह करू लागले. तुम्हीच लिहा आता प्रस्तावना. मी म्हटले, "तुम्हाला यशवंतरावांनी प्रस्तावना लिहावी अशी इच्छा आहे तर मीच यशवंतरावांची प्रस्तावना मिळेल असा प्रयत्न करतो." माझ्या या बोलण्याने ते साशंक दिसले. मग मी त्यांचे देखत यशवंतरावांना पत्र लिहून, हे लेख मला फार आवडले आहेत व आपण त्यांच्या पुस्तकास चार शब्द प्रस्तावना लिहावी असे कळविले.

आठ दिवसांतच त्यांचे पत्र आले. मी प्रस्तावना लिहितोय. लेखन पाठवा. ते पत्र पाहून हिंदुरावांना फार आश्चर्य व आनंदही वाटला.

यशवंतरावांनी त्या पुस्तकाला छोटी पण सुंदर प्रस्तावना लिहिली.

पुढे भेट झाल्यावर मी त्यांना म्हटले, "तुम्ही कर्मवीर पुस्तकास फार छान प्रस्तावना लिहिलीत. काही वाक्ये अगदी काव्यमय आहेत." ते म्हणाले, "अहो, तुमच्या कविता वाचूनच मी काव्यमय लिहू लागलो." आणि मग विनोदाने हसत म्हणाले, "तुमच्या कवितासंग्रहास लिहावयाची आहे का प्रस्तावना ? मी कशी लिहितो पाहा." आणि पुढे माझ्या 'स्वर' कवितासंग्रहास प्रस्तावना लिहावयास मी त्यांना विनंती केली आणि त्यांनी ती सुंदर लिहिलीही.

अलीकडेच कराडला त्यांच्या विरंगुळा बंगल्यावर त्यांना भेटायला गेलो. श्रीनिवास कुलकर्णी माझे बरोबर होते. कराड तालुक्यातील लेखक बजरंग शेलार यांचे पुस्तक प्रकाशन त्यांचे हस्ते, त्यांच्याच बंगल्यात अनौपचारिकरित्या होणार होते. मोजकीच माणसे उपस्थित होती. माझ्या येण्याने यशवंतरावांना फार आनंद झाला. ते म्हणाले, "कविराज आलेत,

त्यांचे हस्तेच आता प्रकाशन होऊ दे.” मी यशवंतरावांना म्हटले, “लेखकाच्या इच्छेस मान देऊ.” आणि मग यशवंतरावांनी प्रकाशन जाहीर केले. मीही दोन शब्द बोललो व चहापानानंतर हा छोटा घरगुती समारंभ संपला.

प्रकाशनास जमलेली माणसे गेल्यानंतर यशवंतराव मला म्हणाले, “तुमच्या औदुंबरला संमेलनास यंदा कोण येणार आहे ? आपले संमेलन ही एक अपूर्व गोष्ट आहे.” मी शांता शेळके येणार असल्याचे सांगितले व सहज विचारले, “आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होता. आता दिल्लीस मंत्री आहात. आपल्या देशात, एखाद्या लहान गावात अशा प्रकारचा साहित्य सोहळा आपण कोठे पाहिला आहे का ?” यशवंतराव म्हणाले, “मी तुम्हाला हेच सांगणार होतो की, आपल्या देशात असा सोहळा भरवणारे एकही गाव नाही आणि आपल्या छोट्या गावात ग्रामीण परिसरातील लोकांसाठी साहित्यिकाचे दर्शन घडविणारा, त्यांची भाषणे ऐकविण्यासाठी धडपडणारा तुमच्यासारखा साहित्यिकही मला कोठे भेटला नाही.” हे त्यांचे शब्द ऐकून मला मोठी धन्यता वाटली.

## शिवाजी सावंत
## पडत्या काळातील प्रतिनिधी

राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या अशा थोड्याच व्यक्ती आहेत की त्यांच्याबाबत "अनेक आंधळे व प्रशस्त हत्ती" यांची गाजलेली बोधकथा आठवावी. खा. यशवंतरावजी या थोड्यांपैकी आघाडीचे एक आहेत. आजही भारताचे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, महाराष्ट्राचे सुयशी मुख्यमंत्री अशा राजकीय कारणांनी म. फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, लो. टिळक, आगरकर अशा पट्टीच्या समाजसुधारकांच्या वैचारिक वारश्याचे पाईक या अर्थाने, मराठी नाटक सार्थ चवीने 'सह 'येऊन दिल्लीसारख्या ठिकाणी बघणारे नाट्यरसिक म्हणून ग. दि. माडगूळकर, रणजित देसाई, ना. धों. महानोर एवढेच काय धनगर समाजातील नवोदित कवी तांदल यांच्याशी काव्यशास्त्र विनोदेन असा, 'अभिजात साहित्य वेडा' म्हणून रमून बोलणारे या अर्थाने. युगांतर, ऋणानुबंध, भूमिका ही वैचारिकांबरोबर खऱ्या अर्थाने ललितरम्य पुस्तकं स्वतःच सिद्ध करणारे एक साहित्यिक म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात आणि भारताबाहेरही हटकून ज्यांच्याबद्दल हररोज काही ना काही बोलले जातेच, असे खा. यशवंतराव चव्हाण एक आहेत.

माणसाच्या बहुश्रुतपणाची व मोठेपणाची एक आंग्लच व्याख्या आहे. बराच विचार केला तर पटेल की, ती किती योग्य व अचूक व्याख्या आहे. "मोठा कोण ? तर त्याच्याबद्दल खूपशा दंतकथा पसरलेल्या असतात तो !" ही ती विख्यात व्याख्या आहे. यशवंतराव या व्याख्येच्या अर्थाने तर नक्कीच मोठे ठरतात, अगदी आपोआप.

यशवंतरावांच्या राजकीय व सामाजिक विचारांच्या बैठकीची मुहूर्तमेढ त्यांच्या बालपणी घडलेल्या एका अत्यंत अर्थपूर्ण घटनेत रोवली गेली

असावी असे मला एक ललित लेखक म्हणून वाटते. या वाटण्याला आधुनिक मानसशास्त्राचा सिद्धान्तही आहे. ती घटना लक्ष्यवेधी आहे. ती अशी –

त्या वेळी ते प्राथमिक शिक्षण घेत होते. कोवळ्या वयात ते खाकी हाफपॅण्ट व पांढरा हाफशर्ट, खांद्याला वह्या पुस्तकांची पिशवी, अशा वेषात देवराष्ट्र या आपल्या जन्मगावापासून शाळेसाठी कऱ्हाडला जात. हा काळ देशाच्या दृष्टीने फार धामधुमीचा होता. त्या वेळी जतींद्रनाथ दास या बंगाली क्रांतिकारक कैद्याने ब्रिटिशांच्या अन्यायी वागणुकीबद्दल तुरूंगात उपोषण मांडले होते. ब्रिटिश सरकार कैद्यांना विशेषतः राजकीय कैद्यांना चांगली वागणूक देत नव्हते. अन्न, वैद्यकीय मदत याबाबत सरकारचे पूर्ण दुर्लक्ष होते. त्याविरूद्ध दासांनी ते उपोषण मांडले होते. संपूर्ण देशाची सहानुभूती जशी भगतसिंगांच्या मागे होती तशी दासांच्या मागे होती. त्या काळी कराडमध्ये दासांच्या प्रकृतीची बारकाव्यानिशी माहिती देणारी पत्रके गुपचूप रोज वाटली जात होती. अडगर वयाचा छोटा यशवंत रोज त्यातील पत्रक हस्तगत करून शाळा सुटल्यावर गावाकडच्या परतीच्या वाटेवर असलेल्या मुलांसह ते वाचीत असे. त्याला वाटे, काहीही घडावे पण दासांनी आपले उपोषण सोडावे. प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही. सातव्या दिवशी संपूर्ण देशाला शोकार्णवात टाकून उपाशी दास तुरूंगात निधन पावले ! उभा देश हळहळला !

त्या दिवशी देवराष्ट्र्याचा छोटा यशवंत आपल्या परतीच्या वाटेवर एकटाच ओक्साबोक्सी रडत होता. रडता रडता चालत होता. चालणे भागच आहे म्हणून चालत होता नि रडत होता एका बंगाली कार्यकर्त्यासाठी ! यशवंतरावांच्या जीवनातील नांदीची ही घटना, तिच्यातील बारकाव्यानिशी ज्यांना कळली त्यांना हिमनगासारखे पाण्याबाहेर असलेले यशवंतराव कळतील. जीभ आहे म्हणून पटकन उचलून ती टाळ्याला लावणाऱ्या त्यांच्या कडव्या विरोधकांनीही प्रत्यक्ष

आपल्या आयुष्याची गोधडी चांगली दोन चार वेळा झटकून तिला असा एखादा प्रसंग चिकटवलेला मिळतो का हे गुपचूपपणे पाहावे !

या घटनेतच जागोजागी यशवंतरावांनी भोवतालच्यांना ‘कोड्यात टाकले असे वाटावे’ असे का वागले याचे उत्तर आहे. बागलाण प्रांतातून थेट दिल्लीला गेलेल्या शेतकरी बाईला आपल्या बंगल्यातच दोन दिवस ठेवून घेऊन तिला चोळीलुगडे देऊन तिच्या परतीचे तिकीट काढले जाते आणि तिच्यावरच्या अन्यायासाठी जेव्हा दिल्लीहून नासिक बागलाणच्या कलेक्टरला थेट फोनवर सूचना केंद्रीय मंत्री ना. यशवंतरावांच्याकडून मिळतात तेव्हा. इतरेजनांना आश्चर्य वाटते, जाणत्यांना नाही. मराठवाड्यात दौऱ्यागवर असताना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या गाडीला एक गावरान वृद्धा हात करून थांबविते. मुख्यमंत्री थांबतो, तिची विचारपूस करतो. सण तोंडावर आहे म्हणून तिच्या नातवंडांना खाऊसाठी पैसे देतो. हे साकारते तेही आश्चर्याचे वाटत नाही.

कोल्हापूरच्या रोखाने भरधाव गाडी धावत असते. रस्त्याच्या कडेला रस्त्यावर मैलकुली माती पसरण्याचे काम करीत असतात. त्यांच्यावर देखरेख करीत उभट फरटोपी घालून एक मुकादम उभा असतो. त्याला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री धावत्या गाडीतून ओझरता पाहतो. ‘अरे, गाडी मागे ने, वीर माने वाटतो ?” असा ड्रायव्हरशी मोजका संवाद होतो. धावती गाडी थांबते. मागे येते. जतींद्रनाथ दासांचा चाहता गाडीतून बाहेर येतो. दोघे मित्र मोजक्याच दोन-तीन लोकांच्यासमोर त्या निर्मनुष्य रस्त्यावर एकमेकांना कडकडून भेटतात. या उरभेटीला कारणीभूत असतो १९४२ चा काळ. दोघांही मित्रांनी एकाच बेडीत ब्रिटिशांच्या तुरूगांत काही दिवस काढलेले असतात, ही त्यामागील घटना. दोघेही आपआपल्या स्थानावर संतुष्ट असतात. एक मैलकुल्यांवरचा मुकादम तर एक महाराष्ट्राचा मुख्यमंत्री !

पुण्यात वृद्ध महिलेचा सत्कार असतो. एका वृद्धेला बालगंधर्व स्टेजच्या पायऱ्या चढणे शक्य होत नाही, ज्यांच्या हस्ते हा सत्कार होत

असतो तो प्रमुख पाहुणाच स्टेजच्या पायऱ्या स्वतः उतरून वृद्धेला हार घालतो.

हे असे कितीतरी प्रसंग अक्षरशः असंख्य ज्या माणसाच्या दैनंदिन जीवनात घडत असतात त्याचे नाव असते यशवंतराव चव्हाण !

पुण्यात म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या समवेत कार्यक्रमाचा फोटो आदल्याच दिवशी वर्तमानपत्रात पाहावा आणि दुसऱ्याच दिवशी माधवराव बागल यांच्या समवेत त्याच माणसाच्या कार्यक्रमाचा फोटो कोल्हापुरात यावा ही किमाया यशवंतरावच करू जाणे.

प्रत्यक्ष पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी फोनवरून अट घालून सवाल विचारला असताना की, 'मुझे सिर्फ हाँ या ना इन दोही शब्दोंमें जबाब देना ! मैने आपकी भारतके रक्षामंत्री के नाते दिल्ली लेनेका निर्णय तय किया है ! जबाब दीजिये हाँ या ना !"
या प्रश्नाला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री जबाब देतो, "लेकिन पंडितजी हाँ या ना मैं भी जबाब देनेसे पहिले मुझे कमसे कम एक व्यक्तीसे पूछनाही होगा !" पंडितजी गोंधळून दिल्लीहून विचारतात, "ऐंसी कौनसी महनीय व्यक्ती है जिसकी राय तुम्हे पूछनीही होगी !" या प्रश्नाला अभिजात साहित्यिकाचा मिस्किलपणाने जबाब जातो, "मेरी धर्मपत्नी !" पंडितजी दिल्लीहून फोनवर हे उत्तर ऐकताना खळखळून हसतात.

अशा अनेक हृद्य प्रसंगांनी, व्यक्तिविशेषांच्या सहवासांनी आणि सर्वांहून अधिक आपणच, आपणहूनच अनुभवसंपन्न, विवेकसमृद्ध झालेले असे यशवंतरावांचे जीवन आहे.

त्यांच्या इंग्लिलशमधील चरित्राला हात घालणाऱ्या एका लेखकाने फार पूर्वीच त्यांच्याबद्दल लिहून ठेवले "Chavan is a man of crisis." पडत्या काळाचे प्रतिनिधी म्हणूनच चव्हाणांचे मूल्यमापन करता येईल.

जेव्हा यशवंतराव स्वातंत्र्यपूर्वकाळात राजकारणात पडले तेव्हा देशाचा पडता काळ होता. त्यापुढील १९४२ च्या चळवळीचा काळ हा त्या काळचे नंबर एकचे नेतृत्व सरकारने गजाआड केले होते. म्हणून तोही

पडता काळ होता. स्वातंत्र्यानंतर व्यक्तिशः यशवंतरावांच्या जीवनातील पडता काळ आला तो संयुक्त महाराष्ट्राच्या वेळचा ! त्यानंतर आला तो १९६२ साली. देशाने चीनकडून सणसणीत सैनिकी मार खाल्ला त्या वेळचा पडता काळ ! आणीबाणीचा काळ ! ती संपतानाचा काळ ! जनता पक्षाचा कालखंड ! नंतर आज देशभर सर्वांगीण समस्यांनी उग्र रूप धारण केले आहे तो पडत्याचा काळ ! या सर्वांना अमाप धैर्याने तोंड देत व समर्थ रामदासांनी वर्णन केलेल्या शब्दात, "सावधपर्णेसि केले राजकारण" असे वागत महाराष्ट्राचे हे नेतृत्व चालले आहे.

## बा. ह. कल्याणकार
## महाराष्ट्रातील लोककर्तृत्वाचा सोनहिरा !

खऱ्या अर्थानं यशवंतरावजी चव्हाण हे सामान्य जनतेचे पहिले मुख्यमंत्री होते. सामान्य जनतेतून वाढलेले सामान्यांचे मित्र होते. शिवाजी महाराजांनंतर महाराष्ट्रात जोतीराव फुले आणि राजर्षी शाहू महाराजांएवढी कर्तृत्ववान माणसं महाराष्ट्रात झाली. यशवंतरावजी चव्हाण यांनी फुले, शाहू आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांतील नेमका भाग घेऊन आपली सत्ता त्या दिशेनं राबविली. महाराष्ट्रातल्या सर्व स्तरांतील आणि क्षेत्रातील माणसांपर्यंत यशवंतराव चव्हाण पोचलेले नेते होते. त्यांचं नेतृत्व वरून आलेलं नेतृत्व नव्हतं, ते लोकांतून वाढलेलं नेतृत्व होतं. त्यामुळं यशवंतरावांच्या राजकीय कृतीला लोकांचं भान सतत जागतं होतं. महाराष्ट्रातील लोककर्तृत्त्वाचं ते एक सुसंस्कृत नेतृत्व होतं.

माझा आणि यशवंतरावजी यांचा संबंध खूपच अलीकडचा. मी पाचवीला असताना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ खूपच जोरात होती. आमचा कंधार तालुका म्हणजे शेतकरी कामगार पक्षाच्या चळवळीचा बालेकिल्ला. या वादळी चळवळीच्या महापुरात मीसुद्धा सहभागी होत गेलो. यशवंतराव चव्हाण त्या वेळी द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते आपली आग्रही भूमिका लोकांसमोर ठेवत होते. यशवंतरावजी चव्हाण आणि नेहरू हे त्यांच्या टीकेचे लक्ष्य असायचे. माझ्या या कोवळ्या वयावर ही चळवळ संस्कार करीत होती. यशवंतराव चव्हाण हे संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने का नाहीत ? नेहरूंच्या बाजूने आपली भूमिका काय म्हणून घेऊन आहेत ? संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांची भूमिका मनाला पटत होती. आणि मी पाचवीत असताना मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना एक पत्र लिहून ते संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीविरूद्ध का आहेत हे विचारलं. माझ्या या पत्राला त्यांचे सेक्रेटरी डोंगरे यांची सही असलेलं उत्तर आलं. त्यांनी कळवलं, 'तुमचं मत मुख्यमंत्र्यांना सादर केलं आहे.' मला त्यांच्या या उत्तरानं खूपच आनंद झाला. यशवंतराव चव्हाणांचं पत्र आल्याचा हा आनंद मला संयुक्त महाराष्ट्र मिळाल्यासारखाच होता. त्या वेळी ते पत्र मी माझ्या खिशात कितीतरी दिवस बाळगून होतो आणि अनेक मित्रांना ते पत्र दाखवत होतो.

यशवंतरावजी चव्हाण यांची पहिली सभा मी ऐकली नांदेडला ऑगस्ट १९६९ ला. मी त्या वेळी पदवीपूर्व वर्गात नांदेडच्या यशवंत कॉलेजमध्ये शिकत होतो. १९ जुलै १९६९ ला बंगलोर येथे काँग्रेस पक्षाच्या बैठकीत एक वादळ उभे राहिले होते. प्रारंभी यशवंतराव चव्हाण श्री. संजीव रेड्डी यांच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीला पाठिंबा देऊन होते. हे वादळ बैठकीपुरतं थांबलं नाही, तर या वादळानं एकसंध काँग्रेस पक्षाचे दोन तुकडे केले. सिंडिकेट विरूद्ध इंडिकेट या दोन गटांत काँग्रेस पक्ष विभागला गेला. यशवंतराव चव्हाण पुढच्या घडामोडीत सिंडिकेट बरोबर न जाता इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाला भक्कम पाठिंबा देत भूमिका मांडू लागले. इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे इ. पावले उचलून आपल्या सत्तेला पुरोगामी वळण दिले होते. नांदेडच्या जुन्या मोंढा मैदानावर यशवंतराव यांची काँग्रेस पक्षाची ही नवी भूमिका प्रतिपादन करणारी प्रचंड जाहिर सभा झाली. सभेला सारं नांदेड शहर लोटलं होतं आणि यशवंतरावजी चव्हाण यांना फॉर्म गवसला होता.

यशवंतरावजींची इतकी मोठी आणि इतकी चांगली सभा त्यानंतर कधीच मी ऐकली नाही. लोकशाही जीवन, समाजवादी विचारप्रणाली, काँग्रेस पक्ष, जन आंदोलन, सामान्य जनतेच्या जीवनात लोकशाही राजकारणाबद्दलचा विश्वास इ. विषयांवर यशवंतरावजींचं प्रतिभाशाली, वक्तृत्वपूर्ण आणि समाजवादी कृतींचा गतिमान आवाका असलेलं भाषण मी त्या दिवशी ऐकलं. त्यांना मी अगदी पहिल्यांदाच पाहात होतो. अगदी

जवळून त्यांना मला पाहायचं होतं, ऐकायचं होतं. एक सुवर्णसंधी त्या दिवशी मी अनुभवली. कंधार हा माझा तालुका. कंधारचं शिवाजी कॉलेज हे शेतकरी कामगार पक्षाच्या संचालनाखाली चालणारं. १९६०-६१ च्या दरम्यान हे महाविद्यालय बंद पडतं की काय अशी परिस्थिती. यशवंतरावजी या महाविद्यालयात पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून आले आणि या महाविद्यालयाचं जीवन पुन्हा ताजं झालं. संस्था कोणत्या पक्षाच्या नसतात त्या जनतेच्या असतात आणि म्हणून यशवंतरावजींनी महाराष्ट्रभर ज्या ज्या संस्था समाजाच्या जवळच्या संस्था आहेत त्या सर्व संस्था आपल्या घरच्या बागेला पाणी दिल्यासारख्या सांभाळल्या, जोपासल्या. त्यांची अंतःकरणापासून पाठराखण केली. महाराष्ट्रातील आजच्या राजकारणानं आणि महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यशवंतरावजींकडून एवढी बाब जरी आत्मसात केली तरी महाराष्ट्राचं लोकजीवन फुलायला वेळ लागणार नाही.

खरं म्हणजे मी यशवंतरावजींच्या सहवासात फार उशिरा आलो. त्यांच्या उशिरा सहवासात येण्याचं कारण माझं वय हे जसं होतं तसंच दिल्लीला ते असल्यामुळं विद्यार्थी जीवनात तिथंपर्यंत मला पोंचण कठीण होतं. मात्र यशवंतरावांचं कार्य, त्यांचे विचार, त्यांची मृदुता ही माझ्या मनापर्यंत कधीच पोंचली होती. यशवंतरावांसारखा शेतकऱ्याचा मुलगा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आजपर्यंत तरी झाला नाही. पुढचं कोणी बोलावं ?

मी मराठवाडा विकास आंदोलनातला एक आघाडीचा विद्यार्थी नेता. १९७२ च्या आसपास यशवंतराव केव्हातरी मराठवाड्यात आले आणि एका सभेत त्यांनी सांगितलं की, आणखी पाच वर्षे वसंतराव नाईक हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहतील. मराठवाड्याला महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद मिळालं पाहिजे ही मागणी ऐरणीवर आली होती. वातावरण तयार झालं होतं. आणि यशवंतरावांनी ऐन दुष्काळी वातावरणात मराठवाड्याच्या मागणीवर पाणी फिरवलं होत. या पार्श्वभूमीवर औरंगाबादच्या शासकीय

ज्ञान-विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनाला यशवंतराव चव्हाण येणार हे पक्कं झालं. त्याच्या पाच-सहा दिवस अगोदर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी संघटनेची जाहीर सभा गुलमंडीवर भरली होती. त्या सभेत मी सहज बोलून गेलो, “यशवंतरावजी चव्हाण यांच्याकडून मराठवाड्याच्या मोठ्या अपेक्षा होत्या, त्या अपेक्षांचा यशवंतरावजींनी चुराडा केला आहे. यशवंतरावजी तुम्ही लवकरच मराठवाड्याच्या दौऱ्यावर येत आहात त्या वेळी आम्ही तुमचं स्वागत निषेध म्हणून मराठवाडा बंद ठेवून करणार आहोत.” विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या पावसात मी भाषण संपवलं आणि यशवंतरावांनी आपला दौराच रद्द केला ! कटुता कशी टाळावी याचं भान त्यांना पूर्ण होतं.

मराठवाडा विद्यापीठानं यशवंतरावजींना डी. लीट्. देऊन त्यांचा बहुमान जसा केला तसाच तो विद्यापीठाचाही बहुमान होता. यशवंतरावजींच्या पुढाकारानंच मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली होती. या सभेत यशवंतरावजींसोबत स्वामी रामानंद तीर्थ यांनाही डी. लीट्. हा बहुमान देण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थांनी या सभेत मराठवाड्याचं गाऱ्हाणं मांडलं. “आम्ही महाराष्ट्रात अटी न घालता सामील झालो. आमचा विकास होत नाही. आमचं मागासलेपण दूर झालं पाहिजे” अशा आशयाचे विचार त्यांनी मांडले. त्यानंतर यशवंतरावजी बोलायला उठले आणि त्यांच्या नेहमीच्या सहजसुंदर विचारशैलीनं सबंध सभा त्यांनी जिंकलीच पण मराठवाड्याच्या लोकमनालाही जिंकून घेतलं. त्यांनी सांगितलं, “आपण विनाअट महाराष्ट्रात सामील झालात हे खरं आहे. मराठवाडा म्हणजे मराठी संस्कृतीचं माहेर, उगमस्थान. खूप दिवसांनी आसुसलेला महाराष्ट्र आपल्या संस्कृतीच्या माहेरात सामील झाला.” महाराष्ट्र मराठी संस्कृतीचं माहेर असलेल्या मराठवाड्यात सामील झाला, हे त्यांचं विधान राजकाणासाठी नव्हतं. मराठी संस्कृतीच्या ओढीतून फुटलेलं ते सत्य होतं.

पुण्याच्या अशाच एका सभेत मराठवाड्यातल्या युवक कार्यकर्त्यांचा एक गट यशवंतरावांना मराठवाड्याला मुख्यमंत्रिपद पाहिजे या मागणीचं निवेदन देण्यासाठी गेला.निवेदन घेत यशवंतराव या कार्यकर्त्यांना अगदी सहजपणे बोलून गेले, "मराठवाडा, प. महाराष्ट्र, विदर्भ ही भाषा बाळांनो आमच्या पिढीपुरतीच संपू द्या ! तुमच्या पिढीच्या मुखात ही भाषा नको. मराठवाड्याचा मुख्यमंत्री पाहिजे असं कशाला मागता ? मराठवाड्याचं नाही महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद मागा. आपले हे प्रादेशिक भेद तुमच्या पिढीनं विसरले पाहिजेत." यशवंतराव चव्हाण यांचं संभाषण त्यांच्या अंतःकरणाच्या तळवटातून फुटत असे. खऱ्या अर्थाने हा नेता कृष्णाकाठानं दिलेला महाराष्ट्राच्या सुसंस्कृततेचा सोनहिरा होता. हेच खरं.

मी प्राध्यापक झाल्यावर त्यांच्याशी माझा पत्रव्यवहार झाला. मी बीडला असताना राजर्षी शाहू व्याख्यानमाला चालवत होतो. त्या व्याख्यानमालेत यशवंतरावजींनी यावं ही माझी इच्छा. मी त्यांना १० जानेवारी १९७९ ला लिहिलेल्या पत्रात त्यांना व्याख्यानमालेचं निमंत्रण तर दिलंच शिवाय सध्याच्या राजकीय परिस्थितीवर आपण परखड बोलण्याची गरज आहे हे लिहिलं. युगकर्ता मासिक याच दरम्यान सुरू केलं होतं आणि या मासिकासाठी मुलाखत देण्याची विनंती केली होती. यशवंतरावजींचं १८ जानेवारी १९७९ चं पत्र आलं. त्यांनी लिहिलं, "तुमची दोन्ही पत्रं मला मिळाली. बीडला तुमच्या व्याख्यानमालेस येण्यास होकार देऊनही मी अद्याप येऊ शकलेलो नाही. युगकर्ता अजून माझ्या हाती यायचा आहे. आल्यानंतर तो जरूर पाहीन. हल्लीच्या अस्वस्थ व अस्थिर राजकीय वातावरणात जाहीर बोलण्याची गरज आहे. परंतु तूर्त मला ते टाळले पाहिजे म्हणून निश्चित तारीख मी आपणाला देत नाही." जून ७९ च्या दरम्यान यशवंतरावजींना एक पत्र लिहून माझे साहित्यिक मित्र श्री. शिवाजी सावंत यांच्या प्रकृतीविषयी आणि त्यांना करावयाच्या मदतीसंबंधी विनंती केली. ७ जून १९७९ चं त्यांचं पत्र तात्काळ आलं.

त्यांनी लिहिलं, “श्री. शिवाजीराव सावंत यांच्यासंबंधी लिहिलेले तुमचे पत्र मिळाले. परवा २९ मेला शिवाजीरावांची प्रतापगडावर भेट झाली. ‘छावा’ माझ्या हस्ते भवानी मातेच्या चरणी अर्पण करावा म्हणून मुद्दाम आले होते. मला त्यांचा प्रश्न माहीत आहे. तुम्ही कळविलेल्या कामात किंवा त्यांच्या इतर दुसऱ्या कामात माझा उपयोग झाला तर मला आनंद वाटेल.” मी या पत्रांचा उल्लेख जाणीवपूर्वक यासाठी करीत आहे की, यशवंतरावजी आपला राजकीय आणि प्रशासकीय व्याप सांभाळून सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि वैयक्तिक जीवनात सर्वांसोबत राहायला ते विसरत नव्हते. त्यांच्याकडून घेण्यासारखा हा त्यांचा अतिशय सुंदर असा हा गुण आहे असं मला वाटतं.

दरम्यान बीडहून माझी बदली औरंगाबादच्या देवगिरी महाविद्यालयात झाली. मार्च १९८० चं राजकारण खूप उलटंपालटं झालं होतं. यशवंतरावजींचे अनेक सहकारी त्यांना सोडून गेले. २९ मार्च ८० च्या त्यांच्या मला उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं, “तुमचे १७ मार्चचे पत्र मिळाले. राजकारणातील अस्थिर परिस्थिती आणि माणसे यासंबंधी तुम्ही लिहिलेले विचार वाचले. तुमच्या सद् भावनाबद्दल मी आभारी आहे. पत्रासोबत पुस्तक पाठविले असल्याचे तुम्ही लिहिले आहे. पण ते मला मिळाले नाही. कदाचित पोस्टातून अजूनही मिळेल. पुस्तक पाहिल्यानंतर प्रतिक्रिया जरूर कळवीन. लगेच ९ एप्रिल १९८० ला माझं पुस्तक त्यांना मिळाल्यावर लिहिलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं, “तुमचे पत्र व ‘उठाव’ पुस्तक मिळाले. आपुलकीने तुमचे नवे पुस्तक पाठविल्याबद्दल आभारी आहे. १०—१२ दिवसांच्या प्रवासाकरिता मी महाराष्ट्रात जाणार आहे. पुस्तक वाचण्यासाठी बरोबर घेत आहे. कधी प्रत्यक्ष भेटीचा योग आला तर बोलता येईल.” माझ्या ‘उठाव’ या कवितासंग्रहाला यशवंतरावजी चव्हाण यांनी वाचल्यानंतर ३ जून १९८० च्या पत्रात मला लिहिलं. “‘उठाव’ निवडणूकीच्या दौऱ्यात वाचला. मला अतिशय आवडला. अभिनंदन.” आपलं राजकारण, आपली कामे सांभाळून

यशवंतरावजी माझ्यासारख्या तरुण साहित्यिकाचे पुस्तक वाचायला आणि वाचून पुस्तकासंबंधी प्रतिक्रिया कळवायला विसरत नाहीत हा त्यांचा गुण आमच्या मराठी या विषयाच्याच नाहीतर सर्व विषयाच्या प्राध्यापकांनी का घेऊ नये ? दरम्यान मराठवाड्यातील आम्ही काही साहित्यिकांनी 'मराठी साहित्य सभा' स्थापन करण्याचा आणि साहित्य सभेच्या उद्घाटनाला यशवंतरावजी चव्हाण यांना बोलविण्याचा निर्णय घेतला. १५ जून १९८१ च्या पत्रात माझ्या निमंत्रणाला यशवंतरावजींनी उत्तर दिले. "आपले १० जूनचे पत्र मिळाले. आभारी आहे. एका नवीन राजकीय वादळात सध्या मी आहे. ते काहीसे आटोक्यात आल्यानंतर मग बाकीचे उद्योग. त्यामुळे जून अखेरीस मी येऊ शकेन असे दिसत नाही." यशवंतरावजी या दरम्यान आय. काँग्रेसमध्ये दाखल होऊ इच्छित होते पण प्रवेश दिला जात नव्हता. या त्यांच्या मनःस्थितीची छाया वरील पत्रात स्पष्ट उमटली आहे. अखेर माझ्या पाठपुराव्यानंतर त्यांनी साहित्य सभेच्या उद्घाटनासाठी २९ नोव्हेंबर १९८१ तारीख दिली. आणि त्याच्या सहा दिवस अगोदर २३ नोव्हेंबर १९८१ ला यशवंतरावजी आय. काँग्रेसमध्ये दाखल झाले.

साहित्य सभेच्या उद्घाटनाचं सुंदर भाषण त्यांनी केलं. या भाषणात त्यांनी सांगितलं. "माणसांनी भाषा निर्माण केली आता भाषेला माणसे निर्माण करावी लागणार आहेत." याच भाषणाच्या वेळी त्यांनी नागपूरच्या दलित कवीची कविता म्हणून दाखविली.

"चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो
कुणी फिरकलं नाही
सोनं पांघरून चिंध्या विकल्या
गर्दी हटली नाही."

सायंकाळी आम्ही त्यांचं देवगिरी व्याख्यानमालेत 'भारत समाजवादापासून अजून किती दूर ?' या विषयावर व्याख्यान ठेवलं होतं. पन्नास मिनिटे त्यांनी या विषयावर आपले मौलिक विचार मांडले.

म्हणाले, "कल्याणकरांनी मला हा विषय जेव्हा दिला तेव्हा मी कोणत्याच राजकीय पक्षात नव्हतो, आता एका राजकीय पक्षात आहे." प्रचंड हशा या वेळी पिकला. कारण नुकतेच यशवंतरावजी आय. काँग्रेसमध्ये आले होते. त्यामुळं त्यांचे भाषण ऐकण्याची प्रचंड उत्सुकता औरंगाबादकरांना लागलेली होती. गर्दी तर अफाट होती. यशवंतराव बोलत होते, "आता कल्याणकरांनी जे सुरूवातीला सांगितलं त्याचा उल्लेख मला करायला पाहिजे आहे. त्यांनी सांगितलं की मी एक विचारवंत म्हणून या विषयावर बोलणं अवघड आहे. कारण मी Practical politics ज्याला म्हणतात, असा एक व्यावहारिक राजकारणी म्हणून गेली ५० वर्षे काम केलेलं आहे." यापुढचे विचार मांडताना यशवंतरावजींनी त्यांच्या मंत्रिमंडळाने महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांबद्दल आर्थिक सवलतीचा जो निर्णय घेतला त्या संदर्भातला एक प्रसंग सांगितला. म्हणाले, "ज्यांचं उत्पन्न ९०० च्या आत आहे त्यांच्या मुलांना विद्यापीठीय शिक्षण मोफत केलं जावं असा आम्ही निर्णय घेतला. त्या दरम्यान पुण्याला शिक्षण तज्ज्ञांचं एक Seminar होता. मी पुण्यात होतो. संयोजकांनी मला Seminar मध्ये १० मिनिटांसाठी येण्याची विनंती केली. मी तिथं गेलो. एक चांगले शिक्षणतज्ज्ञ मला प्रश्न करीत होते. ज्यांचं उत्पन्न रू. १२०० च्या आत आहे त्यांच्या मुलांना युनिव्हर्सिटीपर्यंतचे शिक्षण मोफत करून काय संकट निर्माण करीत आहात याची जाणीव आहे का ? प्रश्न मला विचारून उत्तर त्यांनीच दिलं. शिक्षणाचे असले निर्णय घेऊन तुम्ही शिक्षित आणि प्रशिक्षित लोकांचं सैन्य निर्माण करीत आहात. हे शिक्षित लोक उद्या बंड करून उठतील याचा काही विचार केला का आपल्या मनाशी ? मला विचार करायला वेळ थोडा होता, पण माझे विचार पक्के होते. मी त्यांना सांगितलं की, "मी जरूर याचा विचार केलाय. माझं असं मत आहे की, ही अशिक्षित सेना राहण्यापेक्षा शिक्षित सेना जर झाली आणि स्वतःचे आणि देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी बंड केलं तर माझ्या कामाचा हेतू सफल झाला असं मी मानेन."

यशवंतरावजींनी हा विचार सांगितला आणि जमलेल्या १० हजार श्रोत्यांनी टाळ्यांचा पाऊस त्यांच्या या वक्तव्यावर पाडला. यशवंतरावजींनी ज्ञानाची लोकशाही निर्माण करण्याचं किती मोठं काम केलं याची जाणीव त्यांच्या या निर्णयामुळं येते. ॲटम बॉम्बनी क्रांती होणार नाही इतकी मोठी क्रांती शिक्षण झोपडीतल्या समाजापर्यंत त्यांनी पोचवून केली आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांचे ते राजकारणातील खरे वारस होते असे मला वाटते. यशवंतरावजी चव्हाण यांची मी युगकर्ताच्या दिवाळी अंकासाठी मुलाखत घेतली होती. पंजाबचा प्रश्न फार नाजूकपणे सोडवला पाहिजे असे ते म्हणाले होते.

दरम्यान माझा 'जागल' हा कवितासंग्रह मी त्यांच्याकडे पाठविला. १ एप्रिल १९८२ च्या पत्रात त्यांनी या माझ्या पुस्तकांसंबंधी खूपच सुंदर अभिप्राय पाठविला तो मला कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा वाटतो. 'तुमचा जागल' वाचला. ज्या ग्रामीण जीवनात तुम्ही वाढलात त्याचे इतके वास्तव आणि भावनाशील काव्यात झालेले व्यक्तीकरण मी प्रथमच पाहिले. कविता पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटल्या. पुन्हा वाचल्या म्हणजे अर्थ लक्षात येतो. कवितांचे जे समीक्षक आहेत त्यांनी तुमच्या कवितांचे समीक्षण केले की नाही माहीत नाही. त्या समीक्षकांची सर्व परिमाणे थिटी आहेत. कृष्णाकांठचं लिखाण गतीने नाही तर संथ गतीने चालले आहे" मराठी संस्कृतीच्या राजाने इतका मनापासून आणि इतका मनस्वी अभिप्राय माझ्या कवितांना दिला. माझी पुढची कविता फुलायला, बहरायला त्यांचा आशीर्वाद मला सतत प्रोत्साहित करीत असतो.

१९८३ च्या दरम्यान माझा 'दिशा आणि दृष्टी.' हा वैचारिक लेखांचा संग्रह प्रकाशित झाला. या पुस्तकाला मी यशवंतरावजींची प्रस्तावना मागितली. त्यांनी पुस्तकाची मुद्रणप्रत पाठवा, प्रस्तावना देतो असं सुचवलं. पुस्तकाची मुद्रणप्रत पाठविल्यानंतर त्यांनी ती वाचली आणि प्रस्तावना नाकारली. १५ एप्रिल १९८३ च्या त्यांच्या पत्रात प्रस्तावनेसंबंधी

नकार जसा होता तसाच त्यांचा माझ्यासंबंधीचा स्नेह त्या पत्रात चिंब भिजलेला होता. त्यांनी लिहिलं,

"तुमचे दि. ९ एप्रिलचे पत्र आणि 'दिशा आणि दृष्टी' या पुस्तकाची मुद्रणप्रत मिळाली. मी हाती येताच ती वाचून काढली.

शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्याबद्दलचे तुमचे लेख निरपवाद व उत्तम आहेत. परंतु चालू राजकीय परिस्थिती आणि त्यावरील तुमची निदाने हे वाचल्यानंतर माझ्या हे लक्षात आले की, तुमच्या पुस्तकावर मी प्रस्तावना लिहिणे हे अशक्य आहे. प्रस्तावना लिहायची म्हटले म्हणजे तुमच्या विचारावर सपाटून टीका करावी लागेल आणि अशी प्रस्तावना लिहिण्याची माझी इच्छा नाही. कारण मला तुमच्याबद्दल लोभ आहे व तुमच्या साहित्य गुणाबद्दल कौतुक आहे. स्पष्ट लिहिल्याबद्दल राग मानू नका. असेच प्रेम असू द्यावे."

यशवंतरावजी चव्हाण हा माणूस किती मोठा नेता होता हे पाहण्यापेक्षा हा माणूस मनाने किती मोठा माणूस होता हे पाहणे मला अधिक रास्त वाटते. तरच त्यांना न्याय देता येईल. त्यांच्या सहवासात मी आलो. त्यांचा स्नेह, जिव्हाळा आणि मायेची ऊब मला जी मिळाली ती व्यावहारिक लाभापेक्षा मला लाख मोलाची वाटते. 'दिशा आणि दृष्टी' या पुस्तकाला त्यांची प्रस्तावना लाभली नाही. ते भाग्य माझ्या 'सूर्यपंख' या पुस्तकाला लाभले. त्यांच्या निधनाच्या अगदी एक – दोन महिने अगोदर त्यांनी ही प्रस्तावना लिहिली. त्यांचे अखेरचे साहित्यिक व वैचारिक लेखन माझ्या पुस्तकाला प्रस्तावना देण्याच्या निमित्ताने झाले. ५ नोव्हेंबर १९८४ ला त्यांच्याशी फोनवर बोललो. दिवाळी अंकाला मुलाखत मागितली. प्रश्न पाठवा, मुलाखत लिहून पाठवतो म्हणाले. २५ नोव्हेंबर उजाडला आणि महाराष्ट्रासोबत मीही कृष्णा – गोदेच्या आसवांनी मनसोक्त रडलो. माझा घरचा माणूस गेला इतका रडलो.

## शंकर खंडू पाटील
## साहेबांचे मोठेपण

एकोणिसशे साठ एकसष्ठ साल असावे. इस्लामपूर येथील काँग्रेस कमिटी समोर कै. राजारामबापू यांच्या सत्काराची टोलेजंग सभा भरली होती. त्या सभेमध्ये बऱ्याच लोकांनी काँग्रेस प्रवेश केला. सांगलीचे श्री. कडलास्कर एक गांधी टोपी घेऊन आले आणि म्हणाले, "मी काँग्रेस प्रवेश करीत आहे. साहेबांनी मला टोपी घालावी." त्या वेळी साहेब म्हणाले, "मी कधीच कुणाला टोपी घातली नाही." त्यामुळे सर्व सभा हास्यात बुडून गेली.

पुण्याच्या कस्तुरबा मंगल कार्यालयामध्ये साहेबांच्या साडूच्या – दादासाहेब जगतापांच्या मुलीचे – विद्याचे लग्न होते. लग्न समारंभ आटोपला. मुलगा – मुलगी मिरजेला जावयास निघाले. प्रवेशदाराजवळ मोटार उभी होती. चव्हाण साहेबांनी आणि सौ. वेणूताईंनी कन्यादान केले होते. आम्ही सर्वजण मोटारीजवळ उभे होतो. साहेब मोटारीजवळ आले नि मुलाचे वडील मामा साळुंखे यांना म्हणाले, "मुलीला आई नाही. तुम्ही सांभाळा."

प्रसंग गंभीर. साहेबांचा दाटलेला कंठ. त्यावर मामा म्हणाले, "काळजी करू नका. ही माझी मुलगीच आहे." असे म्हटल्यावर त्यांच्या डोळ्यात पाणी आले. साहेबांनी ते पाहिले आणि त्यांनी सौ. वेणूताईंकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यातून गंगा – यमुना वाहात होत्या. साहेब सद्गदित झाले नि त्यांनी भावनातिरेकाने मामांना मिठी मारली. आम्हा साऱ्यांचे डोळे पाणावले.

कोल्हापूरच्या शिवाजी पेठेतील नगर सेवक भिकूशेठ पाटील यांनी कोल्हापूरची मोठी माणसे या पुस्तकाचे प्रकाशन केले. त्या पुस्तकाला त्यांची प्रस्तावना आहे. त्या वेळी बोलताना यशवंतरावजी म्हणाले,

“शिक्षणाच्या निमित्ताने मी कोल्हापूरला चार वर्षे काढली. पुण्यालाही राहिलो. आता अधूनमधून पुण्याला जातो, तसाच कोल्हापूरला येतो. पण कोल्हापूरला आलो की, मला माहेरला आल्यासारखे वाटते.” हे वाक्य ऐकताच लोकांनी भारावल्या अंतःकरणाने टाळ्यांचा कडकडाट केला.

मिरजेचे सरकारी गेस्ट हाऊस, साहेब, श्रीमती शालिनीबाई पाटलांच्या प्रचाराला आले होते. शालिनीताई पाटील यांनी साताऱ्याची लोकसभेची निवडणूक लढविली होती. त्या वेळी त्यांचेवर अनर्गल टीका केली होती. तेव्हा एका कार्यकर्त्याने विचारले,

“साहेब, तुम्ही यांच्या प्रचाराला का आला ?”

“महाराष्ट्रासाठी. दादांसाठी.”

दोनच शब्द ऐकल्यावर सारे अवाक् झाले.

## बाळ कोल्हटकर
## राजा रसिकांचा

यशवंतराव हे एक थोर पुरुष होते हे देवच बोलून चुकला ! म्हणूनच त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातल्या एकूण एक माणसांचा कंठ दाटून आला. एवढेच नव्हे तर सह्याद्रीतल्या पत्थरापत्थराला पाझर फुटला. यशवंतरावांची आणि माझी शेवटची भेट जेमतेम महिना-सव्वा महिन्यापूर्वी त्यांच्या 'रिव्हिएरा' या निवासस्थानी झाली होती. इतर अनेक ठिकाणी माझे त्यांच्याबरोबर फोटो निघाले असतील. पण त्यांच्या घरी त्यांच्याबरोबर निघालेला हा पहिला आणि शेवटचाच फोटो. जन्मभर आठवण राहावी म्हणून तर नियतीनं हा योग जुळवून आणला नसेल ना ? एरवी ते एवढ्या लवकर जातील याचे पुसट सुद्धा चिन्ह त्यांच्या प्रकृतीवर दिसत नव्हते ! दिसले नव्हते !

सौ. वेणूताईंची एक व्हिडिओ टेप वेणूताईंच्या भावाच्या मुलीनं, श्री. मोरे यांच्या मुलीनं केलेली होती. सौ. शेवाळे यांनी त्या टेपच्या मागे मी निवेदन द्यावे यासाठी मला यशवंतरावांच्याकडे बोलावून घेतले होते. "बाळ माझ्या घरच्या ट्रस्टसाठी ही टेप मी फक्त बाळगणार आहे. मला याचं कुठही जाहीर प्रदर्शन करायचं नाही. पण तुमचा आवाज माझ्या घरात असावा अशी माझी इच्छा होती. म्हणून मुद्दाम तुम्हाला बोलावून घेतलं." बोलणारा इथेच राहिला. ऐकणारा निघून गेला. ते पुढे म्हणाले, "राजसंन्यास हे नाटक तुम्ही पुरं करता आहात असं ऐकलं. पण त्यांच्या भाषेचा बाज तुम्हाला जमेल का?" त्यावर मी त्यांना एक प्रवेश वाचून दाखविला. पाठीवर थाप मारून "शाब्बास ! छान जमलंय !" असे त्यांचे उद्गार ऐकल्यावर "२५ तारखेला मुंबईत प्रयोग आहे, नाटकाला याल का ?" असे नेहेमीप्रमाणे मी त्यांना विचारले. "२५ तारखेला निवडणुकीच्या दौऱ्यावर मी सातारला जाणार आहे, त्या वेळी अवश्य प्रयत्न करीन." पण

यशवंतराव, तुम्ही चक्क खोटं की हो बोललात ? नाटकाला आला नसता तरी चाललं असतं. पण या नको त्या दौऱ्यावर तुम्ही जायला नको होतं. निजधामी म्हणजे कराडला असं मला वाटलं होतं. पण निजधाम म्हणजे परलोक हा अर्थ जाता जाता तुम्ही मला शिकवून गेलात !"

आठवणी दाटून येतात. कंठ आणि डोळे दोन्ही भरून येतात. फार मोठा माणूस. लहानाबरोबर ज्याला लहान होता येतं त्यालाच मोठा माणूस म्हणायचं असतं. एरवी माझ्यासारख्या सामान्य माणसाबरोबर एवढे जिव्हाळ्याचे संबंध त्यांना जोडताच आले नसते ! माझी त्यांची पहिली भेट नागपूर येथे झाली. श्री. भालचंद्र पेंढारकरांच्या ललितकलादर्श या संस्थेच्या दुरितांचा तिमिर जावो, या नाटकाचा प्रयोग धनवटे रंग मंदिरात चालू होता. सासुरवाडीला मुक्काम असल्यामुळे त्या दिवशी माझेच नाटक असलेमुळे साहजिकच मी स्टेजच्या मागच्या बाजूला पेंढारकरांशी बोलत उभा होतो. पहिला अंक संपला, आणि अत्यंत भारावलेल्या अवस्थेत महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव आत आले. "कुणी लिहिलंय हे नाटक ?" हा पहिला प्रश्न त्यांनी पेंढारकरांना विचारला. मला वाटतं पिंडानं ते साहित्यिकच असावेत. "कृष्णाकाठ" हे पुस्तक ही त्यांच्या आयुष्यातली शेवटची कर्तबगारी. जन्मभर पुढारी म्हणून जगले, आणि जाताना साहित्यिक म्हणून गेले. असो तर पेंढारकरांनी त्यांना "बाळ कोल्हटकर" असे नाव सांगितले. त्यांच्या समजुतीनं मोठ्या मिश्या असलेला पगडी घातलेला कुणीतरी माणूस लेखक असावा. त्यांचा पुढचा प्रश्न. "कुठं असतात ते ?" त्यावर पेंढारकरांचं उत्तर, "हे काय लेखक माझ्या शेजारी उभे आहेत !" त्या वेळची माझी मूर्ती, उंची, वय लक्षात घेऊन "यांनी लिहिलंय नाटक ?" असा प्रति प्रश्न विचारताना, असा काही चमत्कारिक, कुतूहलदर्शक, तरीही कौतुक करणारा चेहरा त्यांनी केला होता, की त्याही अवस्थेत आम्हाला विशेषतः मला दाखवलं नसलं तरी हसू आवरत नव्हतं. पुढे त्यांनी विचारलं, "कुठले राहणारे आपण ?" मी म्हटलं, "सातारचा."

यशवंतराव म्हणाले, “सातारचा ? लेका हिकडं ये !” म्हणून त्यांनी मला जवळ ओढलं. ते राहणारे कराडचे. मी सातारचा. भेटीचं स्थळ नागपूर. आपल्या गावचं कुत्रं जरी परक्या ठिकाणी भेटलं तरी माणसाला आपुलकीचं भरतं येतं. तशा दृष्टीने नागपूर हे स्थळ आम्हाला परकं नसलं तरी दारचंच ! पण त्या ठिकाणी जन्माला आलेली आपुलकी, ते इथून जाईपर्यंत त्यांनी सांभाळलेली होती. किती म्हणून आठवणी सांगू ? मी अपुरा पडेन ! कागद अपुरे पडतील ! आयुष्य अपुरे पडेल ! प्रोत्साहन देऊन नाटककार म्हणून माझं आयुष्य घडवायलाच जणू त्या दिवशी यशवंतरावांनीच सुरूवात केली.

त्यानंतर सातारला “न्यू इंग्लिश स्कूल” या माझ्या शाळेच्या हीरक महोत्सवाला ते अध्यक्ष म्हणून आले होते. शाळेतली माझी त्यांची औपचारिक भेट आटोपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सर्किट हाऊसवर गप्पा मारण्यासाठी त्यांनी मला बोलावलं. त्या वेळच्या माझ्या मूर्खपणाचा आणि दादांच्या मोठेपणाचा किस्सा सांगतो, मी कधी त्यांना “साहेब” म्हणे तर कधी “दादा” म्हणे. तर बोलण्याच्या ओघात ज्ञानेश्वरीत सांगितलेला “हिंसा- अहिंसा-विवेक” मी त्यांना समजून सांगत होतो. आणि “आपण कधीही ज्ञानेश्वरी वाचलेली नाही” असा आविर्भाव करून एखाद्या भाविकाप्रमाणे माझ्यासारख्या पोराचं प्रवचन त्या थोरानं पोराहून पोर होऊन ऐकलं होतं. हे मला आजही आठवतं. त्यांचा ज्ञानेश्वरीचा चांगला व्यासंग होता. हे जेव्हा पुढं मला कळलं तेव्हा मी मनातल्या मनात दोन-तीन तोंडात मारून घेतल्या. पण हेच यशवंतरावांचं मोठेपण होतं. नेता हा अभिनेता असावा लागतो. असं नुकतेच एक मंत्रिमहोदय माझ्याजवळ बोलले होते. पण नाही, नेता हा रसिकही असावा लागतो. प्रत्येक अभिनेता रसिक असतोच असं नाही. यशवंतराव अभिनेते होते. रसिक होते, त्याचबरोबर धुरंधर राजकारणी होते. म्हणूनच मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्र राज्यावर आल्याबरोबर मराठी माणसाचे राजकारणानंतर दुसरे प्रेम नाटकावर असते हे ओळखून प्रथम त्यांनी मराठी रंगभूमीवरचा कर

माफ केला आणि मराठी माणसांच्या हृदयसिंहासनावर स्वतःची जागा त्यांनी संपूर्ण आयुष्यासाठी कायम केली ! त्याचे मूळ कारण एकच. ते उदार हृदयी रसिक होते. "माणूस लेखक होऊ शकतो. अभिनेता होऊ शकतो. पण रसिक होता येत नाही. तो असावा लागतो." हे त्यांच्यामुळे ध्यानात येते.

ज्ञानेश्वरी म्हणते, "वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व । कारण रसिकत्वि परतत्त्व स्पर्शु जैसा. परतत्त्व स्पर्श म्हणजे दुसऱ्यामध्ये स्वतःला सामावून घेण्याची शक्ती असणे. त्यामुळे तो तर माझा होतोच, पण मी ही त्याचा होतो ! ही शक्ती यशवंतरावांजवळ होती. त्यांनी मला आपले केले. इतकेच नव्हे तर मलाही त्यांना आपले करायला लावले.

माझ्या वडिलांचा पंचाहत्तरावा वाढदिवस "वेगळं व्हायचं मला" या नाटकाच्या शंभराव्या प्रयोगाच्या वेळी बिर्ला मातोश्री सभागृहात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते पार पडला. माझ्या वडिलांच्या गळ्यात मुख्यमंत्र्यांनी हार घालावा, हे माझं भाग्य का यशवंतरावांचं मोठेपण ! माझा धाकटा मुलगा चि. राजू नऊ वर्षांचा असताना या जगातून गेला. एक महिन्यापूर्वी त्याच्या मुंजीच्या निमित्तानं दादांचा शुभसंदेश आला होता. पण वरील घटनेनंतर काही दिवसांनी त्यांची आणि माझी "रिव्हिएरा" वर गाठ पडली. त्याच्या आदल्या दिवशीच त्यांचं एक चांगलं व्याख्यान मुंबईत झालं होतं. जिन्यावरून उतरता उतरता "कालचं तुमचं व्याख्यान चांगलं झालं ! बाकी मी काय तुम्हाला चांगलं म्हणायचं म्हणा ?" असं मी म्हणालो. त्यावर "असं का म्हणतोस बाबा ? हे तरी मला सांगायला कोण येणार आहे ?" असं म्हणून लगेच.. "तुझा धाकटा मुलगा ना रे ?" माझ्या पाठीवर हात टाकून लगेच "मोठा मुलगा आहे ना ?" देन बकअप" असं म्हणणारं मोठं माणूस आता मला राहिलं नाही. यापुढचं नाटक लिहून झाल्यानंतर "यशवंतराव नाटकाला येणार का ?" हा प्रश्न आता मी कुणाला विचारू ?" "राजसंन्यास" पृथ्वीवरच राहिला आणि

आम्हा सर्व कलावंतांना पोरकं करून रसिकांच्या हृदयसिंहासनावरचा मराठ्यांचा राजा आयुष्याचा संन्यास करून जगातूनच निघून गेला ! ...

## रणजित देसाई
## रेसकोर्स नंबर एक

मला जेव्हा साहित्य अकादमी अवार्ड मिळाले तेव्हा मी साहेबांना फोन केला. त्या वेळी ते गृहमंत्री होते. साहेबांचे खास सचिव डोंगरे यांनी कळविले, "तुम्ही सायंकाळी सात वाजता साहेबांना भेटायला या असं साहेबांनी सांगितलंय."

तसं पाहिलं तर साहेब आणि मी अनेक वेळा एका व्यासपीठावर येऊन गेलेलो होतो. आमचा परिचय झाला होता. मी माझ्या आयुष्यात दोनच वक्त्यांची भीती बाळगलेली आहे. एक जगजीवनराम बाबू आणि दुसरे साहेब. व्यासपीठावर यांपैकी कोणी असत तेव्हा मी माझ्या भाषणाची काळजीपूर्वक तयारी करीत असे. वाटत असे, की आज आपण हा गड जिंकावा. दोघे वयानं मोठे. मी तरुण. ही जिद्द माझ्या मनात असे. पण माझे भाषण संपताच जेव्हा साहेब असोत किंवा जगजीवनरामबाबू असोत, ते साऱ्या वातावरणाला असं वेगळं वळण लावत, की त्यामध्ये मी कुठे तरी पार कोपऱ्यात पडलेला असे. भाषण करताना साहेबांचा समतोलपणा, संयम, त्या विषयाचा अभ्यास इतका गाढा असे की त्यामध्ये विचारवंतांनी हरवून जावं. हे साहेबांचं विचारसामर्थ्य होतं. शब्दसामर्थ्य होतं.

तर मी सांगत होतो काय ? मला ॲकॅडमी ॲवार्ड मिळालं आणि ठरल्या वेळी मी साहेबांच्या बंगल्यावर गेलो, पोर्चमध्ये माझी टॅक्सी उभी राहिली. उजव्या बाजूच्या इमारतीत श्री. डोंगरे उभे होते. आतल्या हॉलमध्ये कसली तरी मीटिंग चालू होती. डोंगरे मला म्हणाले, "तुम्ही आत बंगल्यात चला." साहेबांच्या मुख्य बंगल्यात मी जाऊन बसलो. माझ्या हातात "स्वामी"ची कॉपी होती. पाठोपाठ चहा घेऊन एक सेवक आला. त्यानं चहा माझ्यासमोर ठेवला. मी मनातून बेचैन झालो होतो. चहा घेत होतो आणि त्याच वेळेला साहेब आत आले. मी साहेबांना उठून

वाकून नमस्कार केला. आपल्या हास्य वदनानं जणू काही जुना मित्र असावा, अशा थाटात त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला आणि माझ्या हातातील “स्वामी” कादंबरी मी त्यांना दिली. त्यांनी ती घेतली. ते हसले. माझ्या समोरच ठेवलेल्या चहाच्या ट्रेजवळ त्यांनी ते पुस्तक ठेवलं आणि म्हणाले, “जरा थांबा हं, मी आलो” आणि आपल्या शय्यागृहात ते निघून गेले. मी त्यांची वाट पाहात होतो. काही क्षणात ते जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांच्या हातात स्वामीची दुसरी प्रत होती ! ती प्रत माझ्या हाती देत ते म्हणाले, “देसाई, तुमची “स्वामी” मी वाचलेली आहे. आज तुम्हाला ॲकॅडमी ॲवॉर्ड मिळालेलं आहे याचा मला अत्यानंद आहे. या कामाच्या व्यापातून मी समारंभाला येऊ शकलो नाही. याबद्दल गैरसमज करून घेऊ नका.” साहेब शांतपणे आपल्या समोरच्या खुर्चीवर बसले. माझ्याकडे हसून पाहात म्हणाले, “देसाई, ॲकॅडमी ॲवॉर्ड मिळालं, याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?” मी म्हणालो, “साहेब समाधान वाटलं, यशाचं नव्हे, पण घेतलेल्या कष्टाचं.” ते हसले. मला म्हणाले, “देसाई, मी दिल्लीत असेन, माझं हृदय महाराष्ट्रात गुंतलेलं असतं. तुम्ही मिळविलेल्या यशाचं मला कौतुक आहे. पण त्या यशानं हुरळून जाऊ नका. एखादा मनुष्य टेकडी चढतो, डोंगर चढतो आणि त्याला वाटतं, की आपण हिमालयाचं शिखर गाठलं. ते खरं नसतं. तुम्ही केव्हाही या यशावर तृप्त राहू नका. तुम्ही यापेक्षाही मोठं कार्य करावं असं मला वाटतं. लहान वयात यश मिळालं की, कित्येक वेळेला माणूस वाया जातो हे मी पाहात आलेलो आहे. तुम्ही त्याला बळी पडू नका.” साहेब उठले. “गंगाऽऽ” म्हणून त्यांनी हाक मारली. साहेबांचा एक निष्ठावान सेवक गंगा एक तबक घेऊन पुढे आला. त्यामध्ये एक हार, मला आजही आठवतो. तो मोगरीचा हार आणि एक पुष्पगुच्छ होता. तो पाहताच मी भारावून उठलो. साहेबांनी तो उचलला आणि माझ्या गळ्यात घालण्यासाठी हात पुढे केले. मी तो हार मध्येच पकडला आणि साहेबांचे चरणस्पर्श करीत मी म्हणालो, “साहेब, या औपचारासाठी मी इथे आलेलो नाही.” साहेब

नेहमीच्या हास्यवदनानं म्हणाले, “देसाई, तुमचा जेव्हा फोन आला तेव्हा मी सातची वेळ दिली. याचं कारण एकच आहे. माझ्या घरामध्ये तुम्हाला बोलवावं, तुमचं कौतुक करायला मिळावं असं मला वाटलं. पण या राज्यकारभारामध्ये सातपर्यंत मला उसंतच नव्हती.” साहेबांना वंदन करून मी तिथून निघून आलो.

ती भेट आमची जवळीक ठरली. मग आमचा अनेक वेळेला अनेक ठिकाणी परिचय वाढत गेला. “स्वामी” नंतर “श्रीमान योगी” मी लिहिलं. बाळासाहेब देसाई ही “श्रीमान योगी” च्या पाठीमागची प्रेरणा होती. बाळासाहेबांच्या आग्रहास्तव यशवंतरावांनी माझ्या हाती सोन्याचं कडं घातलं. समारंभ संपला आणि यशवंतराव म्हणाले, “देसाई, आज तुमचा मोठा सन्मान झालाय. पण या सन्मानानं विचलित होऊन जाऊ नका. तुम्हाला पुष्कळ मोठं व्हावयाचं आहे.” ज्या ज्या वेळेला मला यश मिळत असे त्या वेळी माझी पावलं जमिनीशी खिळवून ठेवायला साहेब कारणीभूत होत असत. ही वृत्ती सांगण्यापुरतीच नव्हती, ती त्यांच्या आचरणातही होती.

इचलकरंजीला साहित्य संमेलन भरलं होतं. मी त्याचा स्वागताध्यक्ष होतो. अध्यक्ष होते पु. ल. देशपांडे. त्यांनी अट घातली होती की, “साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर कुठलाही मंत्री मला चालणार नाही.” इचलकरंजीमध्ये यशवंतरावांना अतिशय मान्यता. या संकटातून बाहेर कसं पडावं, याची आम्हाला चिंता लागली होती. अध्यक्षांनी सांगितलेले कोणी तुमचे मंत्री येवोत अथवा न येवोत संमेलन साडेचार वाजता सुरू होणार. तीही मनात धास्ती. या सर्व नियमांमुळे स्वागताध्यक्ष या नात्यानं माझ्यावर पुष्कळ दडपण आलं होतं. आयको स्पिनिंग मिलचा पायाभरणी समारंभ करून यशवंतरावजी डेक्कन स्पिनिंग मिलवरती येणार होते. मी हार घेऊन डेक्कन स्पिनिंग मीलच्या दाराशी उभा होतो. साहेब दीड वाजता आले. मी पुढे आलो आणि म्हणालो, “स्वागताध्यक्ष या नात्यानं मी हार आपल्याला घालत आहे.” साहेबांनी हार स्वीकारला. ते

आपल्या नेहमीच्या हास्यवदनानं मला म्हणाले, “रणजित, मला सर्व ठाऊक आहे. मी इथं आलो ते साहित्याचा प्रेमी म्हणून, तुम्हा गुणीजनांचा गौरव पाहावा म्हणून, तेव्हा मी कुठं बसतो याची चिंता तुम्ही करू नका.” स्वागताध्यक्ष या नात्यानं माझ्या माथ्यावरचा सारा भार उतरला होता. तरीही एक पाल चुकचुकत होती. मी सांगितलं, “साहेब, एक विनंती आहे. साडेचारला संमेलन सुरू होतंयं, त्या आधी तुम्ही यावं असं मला वाटतं.” ते म्हणाले, “काही काळजी करू नका, मी सर्व गोष्टी पाळीन” आणि काय आश्चर्य? बरोबर सव्वाचार वाजतां यशवंतरावजी साहित्य संमेलनाच्या मांडवामध्ये हजर होते. कार्यक्रम सुरू होण्याआधी ते मला म्हणाले, “रणजित, असा सुखसोहळा पाहण्याचं भाग्य कोण सोडेल ? ते मी डोळे भरून पाहीन. पण मला असं वाटतं की तुम्ही सर्व साहित्यिकांनी हा कार्यक्रम झाल्यानंतर माझ्याकडं यावं.” मी त्यांना “हो” म्हणालो. साहित्य संमेलनाचं उद्घाटन झालं. सोहळा पार पडला. मी सर्व साहित्यिकांना यशवंतरावांचं आमंत्रण दिलं होतं. आमच्या जाण्याची व्यवस्था केली होती आणि त्यानुसार सारे साहित्यिक डेक्कन स्पिनिंग मिलवर गोळा झाले. साहेबांच्या बरोबर जेवण झालं. नंतर मी साहेबांना म्हणालो, “साहेब, आता आपली बैठक खाली मांडू या.” साहेबांनी त्याला होकार दिला. तातडीने पलीकडच्या हॉलमध्ये जमखाने मांडले गेले. लोड आणला गेला आणि आम्ही सारे तिथं गेलो. आमच्या बैठकीत कवी बा. भ. बोरकर, पाडगावकर, महानोर इत्यादी सारे साहित्यिक होते. कवी अनिल हेही त्यात होते. कोणी कविता वाचत होतं. कोणी कविता म्हणत होतं. गप्पांची मैफल, काव्याची मैफल रंगत होती. यशवंतराव हे कोणी मंत्री आहेत, याचंही भान आम्हाला राहिलेलं नव्हतं. तेही त्यामध्ये संपूर्ण सहभागी झालेले होते. अध्यक्षपदाची कामं ओटापून श्री. पु.ल. देशपांडे आणि सुनीताताई बाराच्या सुमारास येथे आल्या. सोन्याला सुगंध यावा तसं त्यांचं आगमन झालं. आम्ही सर्वांनी भाईंना (पु.ल. देशपांडे) यांना काहीतरी म्हणण्याचा आग्रह केला. पु.ल. देशपांड्यांनी “जोहार

मायबाप” हा अभंग म्हटला आणि त्या बैठकीची सांगता झाली. काही न बोलता यशवंतरावांनी आम्हा सर्वांचा निरोप घेतला.

**ना.धों. महानोर**

## तुझी साद तुझे आशीर्वाद

शब्दाशब्दांच्या श्रुतीला, समेला
साक्षात्काराचे उजळण दिलेस
आणि प्रत्येक प्रेरणेच्या पाठी
ब्रह्माएवढे बळ दिलेस
युगायुगांच्या समर्थ शक्तीला
तुझेच उदंड सामर्थ्य दिलेस
तुझी साद तुझे आशीर्वाद
प्राणांचे डोळे मिळवीत गेले
तुझी साद तुझे आशीर्वाद
घरभर दिवे लावून गेले

## दिलीप जामदार
## महाराष्ट्राच्या भाळीचा टिळा

यशवंतरावजी साहित्यिक होते, राजकारणपटू होते, रसिक होते. गरिबांसाठी त्यांच्या ठायी माणुसकीचा गहिवर होता. त्यांची वाणी मधाळ होती. पण त्याहीपेक्षा त्यांचे डोळे स्नेहाळ होते. यशवंतरावांचा हात पाठीवर पडला की, त्यांच्या अनुयायांत उत्साहाचं वारं संचारत असे, तर विरोधकांचा विरोध विरघळत असे.

राजर्षी शाहू महाराज हे यशवंतरावजींचं एक श्रद्धास्थान होतं. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापुरात झालं. कोल्हापूरच्या वातावरणात सत्यशोधक समाज, दलित समाजाबद्दलची कणव, समाजसुधारणेची दूरदृष्टी, शिक्षणाची जागरुकता, हे संस्कार घेऊन त्यांचं व्यक्तिमत्त्व आकारू लागलं. त्यांचा वाचनाचा व्यासंग वाढत होता. राजकारणाची गोडी त्यांना लागली होती. सळसळत्या रक्ताला झपाटून टाकणारं ४२ सालचं क्रांतियुद्ध सुरू झालं आणि यशवंतराव बावनकशी सोन्याप्रमाणं त्यातून तावून सुलाखून बाहेर पडले. विशाल मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर जेव्हा ते आरूढ झाले तेव्हा त्यांच्या म्हाताऱ्या आईच्या आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या विराट जनतेच्या डोळ्याचं पारणं फिटलं.

तारीख आठवत नाही परंतु वर्ष होतं १९५६. आजच्या महाराष्ट्राचे समर्थ मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील हे मला घेऊन यशवंतरावजींच्याकडे गेले. त्या वेळी मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान होते. ‘सह्याद्री’ बंगला. मुख्यमंत्र्यांच्या बसल्या जागेवरून अरबी समुद्र दिसायचा. मलबार हिलवरील हिरवळीबरोबर गुलमोहरांच्या तांबड्या डहाळ्या चवऱ्या ढाळायच्या. यशवंतरावजींबरोबर बोलणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यात षड्यं त्र फिरत असलं तरी “साहेबांची” दृष्टी आणि विचार, विशाल सागर आणि गुलमोहर यांच्या समन्वयाचे असत. माननीय दादांनी

माझी ओळख करून दिली, मी रेखाटलेली काही जलरंगातली चित्रं त्यांना दाखवली. "साहेबांनी" एकवार मला न्याहाळलं. माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. हा प्रसंग मी लागलीच "यशवंतराव चव्हाणांच्या सहवासातला एक क्षण" या शीर्षकाखाली कोल्हापूरच्या 'सत्यवादी' पत्रात लिहिला होता... आश्चर्याची गोष्ट अशी की, पुढे चार-पाच महिन्यांनी खास साहेबांच्या शिफारशीनं माझी जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे नेमणूक झाल्याचा आदेश मला मिळाला. नोकरीवर रूजू होऊन दोन महिने होतात न होतात तोच भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी विभागातील चित्रपट विभागात डेप्युटी डायरेक्टर म्हणून निवड झाली. साहेबांचा निरोप घ्यायला गेलो. तोच प्रेमळ हात पाठीवर, तीच ती विजेरी थाप आणि आशीर्वाद 'गो अहेड".

## प्राचार्य मधुकर अष्टीकर
## यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यशास्त्र

यशवंतराव चव्हाणांनी पोरकेपणाचे चटके अनुभवले. बालवयातच शिक्षणासाठी माया दूर सारून त्यांना एकाकी राहावे लागले. दूरच्या वस्तीत अनोळखी विश्वात. हा वनवास भकासपणा असतो, पण त्यातूनच घडते दर्शन समाजाचे आणि जीवनाचे. वाटू लागले मग की नको नको ह्या यातना मानवाच्या नशिबी ! वाटते व्हावे युगांतर आणि मानवाचे मतांतर, त्याच्यातल्या दुहीची बीजे भर्जित होऊन, आणि जातिपातींची व उच्चनीचतेची जाळी जळमटी खाक होऊन जावी. पण त्यासाठी हवे असते विचारांचे आणि आचारांचे घडणात्मक स्वातंत्र्य. जावे लागते त्यासाठी शरीराचे आणि मनाचेही पारतंत्र्य. बहुजनाला पोरके, दुर्बल आणि आधिव्याधिग्रस्त ठेवणारी सत्ता आपली म्हणविता येणार नाही, मग ती जन्माने आणि जातीने आपलीच असली काय आणि नसली काय. दारिद्र्य, दैन्य आणि वैफल्य माथी मारणारे शासन सदा परकीयच ठरणार. म्हणून सत्तेचा वापर योग्य व्हायला हवा. त्यासाठी सत्ता योग्य हाती जायला हवी. मग क्वचित ती आपल्या हाती घ्यावी लागली तरी हरकत नसावी आणि ह्याच भूमिकेतून यशवंतरावांनी सत्तेसाठी निवडणुका लढविल्या आणि जिंकल्याही. "सत्तेपासून दूर राहावे" हा विनोबांचा संकल्प यशवंतरावांनी नम्रपणे अव्हेरिला तो ह्याचसाठी. समष्टीच्या सकलांग स्वातंत्र्यासाठी त्यांनी "राजकारण" स्वीकारले. "पहिले ते राजकारण" हा रामदासी मंत्र त्यांना मानवला.

यशवंतराव चव्हाण सदैव साहित्यिकांशी संधान साधून असत. पण म्हणून ते साहित्यिकांच्या उगीचच आहारीही जात नसत. त्यांनी हैदराबादच्या मराठी साहित्य संमेलनात सरळच सांगून टाकले होते की, "कधी साहित्यिक राजकारण्यांना मार्गदर्शन करतात तर कधी राजकारणी साहित्यिकांना मार्गदर्शन करतात, असे हे सर्वत्र चालत

आलेले आहे.” साहित्याचा समाजजीवनाशी आणि विशेषेकरून राष्ट्रीय जीवनाशी अविनाभाव संबंध असल्याचे अत्यंत मौलिक सूत्र यशवंतरावांनी निःसंदिग्धपणे अनेकदा मांडलेले आहे. त्यांनी साहित्यिकांना सांगितलंय की, “केवळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्याप्रमाणे चालण्याचा काळ संपलेला आहे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कुणी घालू शकेल असे मला वाटत नाही.” राष्ट्रीय जीवनाशी साहित्यिकाचे अतूट नाते सांधताना ते म्हणतात, “भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी जे विविधत्व आहे त्याच्याशी आपण संपर्क जोडला पाहिजे, आणि त्याच्यातून अनुस्यूत असलेल्या एका भारतीयत्वाचा आपण अनुभव घेतला पाहिजे. हा अनुभव आमच्या साहित्याद्वारे लोकांपर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे.” राजकीय स्थित्यंतरांच्या प्रेरणा अनेकदा साहित्यातून निर्माण होतात हे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीने दाखवून दिल्याचे ते नेहमी म्हणत.

“साहित्य हे एक सामर्थ्य आहे कारण ते विचार देणारे आहे. बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही हे सामर्थ्य . विचारातून येते, संस्कारातून येते आणि हे काम साहित्यामार्फत घडते.” म्हणून यशवंतराव साहित्याचे मोल शस्त्रास्त्रापेक्षाही जास्त मानीत असत.

भारताचे सामर्थ्य, एकरूपता व अखंडता राहावी ह्याची यशवंतरावांना सतत चिंता आणि तळमळ असे. भाषा, संस्कृती, जात वा धर्म या पायी भारतात फुटिरता आणि विभक्ततेची भावना बळावू नये म्हणून ते अहर्निश झटत असत. ह्या कळकळीच्या ऊर्मीपोटी ते साहित्यिकांना हेच आवाहन करीत की, भारताच्या अखंडतेसाठी, एकात्मतेसाठी आणि बलवत्तेसाठी साहित्याचे प्रभावी माध्यम अखंड वापरा. ते म्हणत, “साहित्यिकाचा अनुभव देशव्यापक झाला पाहिजे. आमचे काही दूराभिमान असतील ते आम्ही सोडले पाहिजेत. आमचे जे काही आग्रह असतील ते आम्ही

बाजूला ठेवले पाहिजेत आणि इतरांचे प्रश्न समजावून घेतले पाहिजेत. हे काम साहित्यिकांनी केले पाहिजे आणि त्यातून राजकारण्यांना प्रेरणा दिली पाहिजे."

यशवंतराव नेहमी जुने नवे एकत्र साधून भविष्याचा अचूक वेध घेणारे समन्वयवादी द्रष्टे ऋषी होते. ते म्हणत, "प्रत्येक नवी गोष्ट केव्हा ना केव्हा तरी जुनी होणारच असते. जुन्या गोष्टी पाहिलेल्या माणसाला त्या गेल्याबद्दल हळहळ वाटणे स्वाभाविक आहे. पण आपण आपली दुर्बिण मागच्याच काळाकडे लावून बसलो तर पुढून येणारे किंवा आपल्या जवळ येऊन पोहोचलेले नवे आपल्याला कधीच नीट दिसणार नाही. तेव्हा जुन्यातले चांगले वेचायचे, गाठी बांधायचे आणि नव्याच्या स्वागतास पुढे यावयाचे हीच आपली वृत्ती असली पाहिजे. क्षेत्र कुठलेही असो, दोन पिढ्यांत अंतर आणि प्रसंगी संघर्ष हे येणारच. त्यातूनच प्रगती होत असते"

रंगभूमीबद्दल बोलताना देखील यशवंतरावांची जीवननिष्ठा कधी ढळली नाही."जीवनावर प्रेम करा" हा साहित्यिकांना दिलेला उपदेश नाटकाबद्दल बोलतानाही ते आवर्जून देत आणि साहित्याप्रमाणेच नाटकही लोकाभिमुख झाले तरच ते टिकणार आहे असे ते स्पष्ट सांगत. ते नांदेडच्या नाट्य संमेलनात म्हणाले होते की, "प्रत्यक्ष जीवनाच्या अधिक जवळ आलेली नाटके लोकप्रिय होतात, यशस्वी होतात. नाटक जीवनाचा जितका खोल वेध घेईल, आम्हाला त्रस्त करणाऱ्या प्रश्नांना जितक्या जिव्हाळ्याने हात घालील तितके ते तुम्हा आम्हाला जवळचे वाटणार आहे. ही दिशा अपरिहार्य आहे." जशी साहित्याची व्याख्या यशवंतरावांनी केली तशीच नाट्याचीही अचूकपणे केली आहे. "जीवन आणि समाज ह्यांच्यातले जिवंत नाट्य लोकाभिमुखतेने पकडणारी कलाकृती हेच नाट्य." नाटककार, नट आणि प्रेक्षक हे रंगभूमीचे तीन मूलभूत घटक होत. यातील एक जरी लंगडा पडला तरी नाटक पडते ही यशवंतरावांची सुजाण कल्पना मर्मग्राही आहे.

यशवंतरावांनी तारुण्यालाच "काव्य" म्हटले आहे. ही व्याख्या चपखल आहे. तारुण्याचे सगळे गुणदोष काव्य स्वभावाला आणि शैलीला लागू पडतात. "हुरहूर" ही काव्याची प्रेरणा आणि तडफ व उतावळेपणाने पदविन्यास करण्याची लकब ही काव्याची धारणा होय. धगधगते विचार, अन्याय आणि दुःख ह्याबाबतची असहिष्णुता आणि उगाच चिंता चिवडीत, मनाचे मुटकुळे करीत न बसण्याची बेफिकिरी हे काव्यानेच वर्णन नव्हे काय ? यशवंतरावांचे वेळी कवीचे क्लब, "हुरहुर" क्लब ह्या नावाने ओळखले जात होते. ते ह्याचेच प्रतीक समजायला नको का ?

कवीला आपल्यापेक्षाही दुसऱ्याचे मन, समाजाचे मन अधिक चांगले कळले पाहिजे, आकळले पाहिजे, प्रत्येक वाचकाला वाटले पाहिजे की, कवी माझेच दुखणे रस्त्यावर मांडतो आहे, आणि मग तो वाचक मनाशी म्हणतो, माझी कहाणी कुणी जाऊन सांगितली बरे याला ? असा असतो यशवंतरावांच्या कल्पनेतला कवी. काव्यात गेयता अवश्य असावी आणि ती जितकी अधिक तितकी भावनेची किंमत भरभक्कम जाणवते असे यशवंतरावांना वाटत होते.

कवीने जीवनातले भव्य, दिव्य आणि उपाय असे शोधावे आणि बोधावे. इतिहासातल्या महान चरित्राची पदचिन्हे आणि पायवाटा शब्दाने साकार कराव्यात आणि गावीत त्यांची महन्मंगल स्तोत्रे की जी घडवितील महान राष्ट्रे, असे यशवंतराव भरल्या कंठाने आणि ओलावलेल्या शब्दाने सांगत.

यशवंतरावांना काव्य आवडे कारण तो लोकभाषेतून येईल. बोलताना किंवा लिहिताना परकीय भाषा आली तरी ओठांवर फुटणारे अभंग किंवा ओवी मायभाषेतूनच आकार घेई. यशवंतरावांना म्हणूनच मायभाषेचे, लोकभाषेचे खूप वेड असे. पण म्हणून ते इतर भाषांचा कधी अव्हेर करायला सांगत नसत. उलट व्यावहारिक विचार करून विवेकाने सांगत की, "हिंदी आणि इंग्रजी" ही असू द्या अभ्यासात. पण ज्ञान मिळते ते ज्ञान म्हणून, भाषा म्हणून नव्हे. पण ते सहजतेने घेता येते ते मात्र भाषेतूनच, आणि ती भाषा असावी लागते मातृभाषाच, लोकभाषाच. यशवंतराव

म्हणत मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे, पण संकुचित अर्थाने भाषेचा अभिमानी नाही, पण ज्ञानासाठी मातृभाषा पाहिजे. ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही. उन्नत होत नाही, विकसित होत नाही असे ते सोमय्या कॉलेजच्या पायाभरणी समारंभात, कोपरगावला म्हणाले होते.

मराठी भाषा ही जिवंत भाषा आहे. ती उसासारखी वाढली पाहिजे, असे यशवंतराव म्हणत. जमिनीतली सत्त्वे आणि शक्ती शोषून ऊस वाढतो तसे मनातले सत्त्व आणि विचारातली शक्ती खेचून भाषा जोम पावते.

यशवंतरावांनी आपली मराठी अशीच जोपासली होती, वाढविली होती. त्यांचे बोलणे सतत ऐकत राहावे असे वाटे, झरा वाहात राहावा झुळझुळ असे वाटते ना तसेच! ते भाषेला उगीचच नटवीत नसत. पण उत्तराला प्रत्युत्तर देण्यात अडतही नसत. एकदा एका व्यापाऱ्यासोबत ते जेवत होते. व्यापारी शाकाहारी निघाला. जेवण मांसाहारी होते. त्यामुळे योजकांची थोडी धावपळ झाली. जेवताना व्यापारी म्हणाला, “जगातील सर्व शक्तिमान प्राणी शाकाहारी आहेत.” यशवंतरावांनी पुष्टी जोडली, “होय, जगातील सर्व उपयुक्त प्राणी शाकाहारी आहेत.” टेबलावर हशा पिकला. व्यापारी पुनः म्हणाला, “हे सर्व प्राणी शक्तिमान आहेत कारण ते शाकाहारी आहेत.” तेव्हा हेका न सोडणाऱ्या त्या व्यापाऱ्यावर लीलया मात करीत यशवंतराव म्हणाले, “म्हणूनच त्यांच्यावर स्वार होणे सोपे आहे.” यशवंतराव बोलण्यात आपल्यावर केव्हाच स्वार होऊन बसलेत हे त्या स्वारीच्या ध्यानात येताच तो लाजला हे सांगणे न लगे.

यशवंतरावांच्या ज्वलंत आणि अनुभवी विचारांचे वाहन झालेली मायबोली कशी सरळ पण प्रभावशाली होती ह्याचे हे काही नमुने पाहावेत. “आपल्याला कदाचित कल्पना असेल की, कामाची व्याप्ती जितकी जास्त तितकी त्याची खोली कमी असते. निसर्गाचाच नियम आहे हा.” भावनांना व्यक्तीच्या जीवनात जितके महत्त्व असते तितके ते संस्थेच्या जीवनातही असते असे मात्र नाही. संस्थेच्या जीवनात भावनेपेक्षा कार्यालाच अधिक

महत्त्व असते. “वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे सतत चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर आवश्यकता नसेल तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही.” “कोणाही कार्यकर्त्याने आंधळे असू नये, आंधळा दुनियेत हिंडू शकेल पण आंधळ्यांच्या मागे दुनिया जाऊ शकत नाही.”

तेव्हा दिसेल की, यशवंतरावांच्या भाषेला तोल आणि ताल आहे, विचारांची जाण आणि अभिव्यक्तीचा जोम आहे. समाजहिताची सम सतत साधीत ती अखंड भारत आणि एकरूप भारताची बलशाली ध्रुपद सदा आळवीत आहे. तिच्यात केवळ नादमाधुर्य नाही, केवळ शब्दलालित्य नाही, तर त्या आपोआप जुळणाऱ्या मधुर शब्दामागे एकेक नवा सामर्थ्यवान संदेश देणारे मन आणि विचार आहे आणि म्हणूनच यशवंतराव हे पिंडाने कवी आहेत. कारण त्यांनी कवीची ही अशीच व्याख्या केलेली आहे. त्या “कवीला” माझे शतशः प्रणाम.

## पंडित भीमसेन जोशी
## रसिकश्रेष्ठ

यशवंतरावांचा आणि माझा जिव्हाळा ही गोष्ट वर्णन करता येण्यासारखी नाही. वर्णनाच्या पलीकडची आहे. नाते मात्र सांगता येईल. ते श्रेष्ठ दर्जाचे रसिक आणि मी एक कलावंत. हे खरे नाते.

महाराष्ट्रात सरकारी संगीत महोत्सव सुरू केला तो यशवंतरावांनी. त्यांची आणि माझी ओळख आधी झाली होती, पण हा उत्सव सुरू झाल्यानंतर जास्ती चांगली ओळख झाली आणि ती वाढत गेली.

यशवंतराव मुख्यमंत्री झाले त्यानंतर आमची भेट वरचेवर होऊ लागली. कोणत्या ना कोणत्या विमानतळावर आमची नेहमी भेट होत असे. केव्हाही भेट झाली की, ते मला "काय गायक ?" असे विचारीत मिठी मारत असत. खांद्यावर हात टाकून जवळ घेत, आणि खुशाली विचारत. घरातल्या वडीलधाऱ्या माणसाने करावी तशी खऱ्या कळकळीने, अगत्याने चौकशी करत.

एकदा काय झाले, यशवंतराव तेव्हा संरक्षणमंत्री होते. कलकत्त्याहून गोहत्तीला चालले होते. डमडम विमानतळावर त्यांचे विमान सज्ज होते. मंत्र्याने रवाना होण्यापूर्वीचे सगळे सोपस्कार चालले होते. त्यांचं विमान उड्डाण करून जाईपर्यंत बाकीच्यांच्या जाण्याचा विचारही होणार नव्हता. मी त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर गर्दीत उभा राहून तंबाखू चोळत वाट पाहात होतो... एवढ्यात त्यांचे लक्ष माझ्याकडे गेलं. त्यांची नजर घारीसारखी असायची. एवढ्या गडबडीत आणि गर्दीतही त्यांची नजर माझ्याकडे गेली. लगेच सुमारे पाचसहाशे फुटांचं अंतर पायी चालत ते माझ्याकडे आले. नेहमीप्रमाणे प्रेमाने मिठी मारली, खुशाली विचारली आणि म्हणाले, "किती सुखी माणूस आहात तुम्ही ? तुमचे तुम्ही स्वतंत्र आहात. नाही तर आमचे पाहा.... तुम्ही सर्वांना मोठा आनंद देता."

तेव्हा मी म्हटले, “आमचे इलेक्शन एकदाच जन्माला येताना ‘वरून ‘झालेले. तुमच्यासारखे पाच पाच वर्षांनी होत नाही.” यावर ते दिलखुलासपणे हसले.

ते रसिक होते. साहित्याची, इतर कलांची, गाण्यांची त्यांना खूप आवड. कलाकारांबद्दल त्यांना मनापासून प्रेम वाटायचे. कलावंतांच्या कलांना प्रोत्साहन मिळावे, त्यांची कुचंबणा होऊ नये, त्यांना कसलाही त्रास होऊ नये ही त्यांची तळमळ असायची. कोणाला कोणत्याही प्रकारे मदत हवी असली, तर नुसते ऐकून ते गप्प बसत नव्हते तर ते त्या प्रश्नात लक्ष घालायचे. पार टोकापर्यंत, मुळापर्यंत लक्ष घालून चौकशी करून शक्य ती सर्व मदत करायचे. जिव्हाळ्याचा वडिलधारा माणूस म्हणून ते हवे होतेच, पण कलाकारांच्या दृष्टीने देखील ते अजून काही काळ तरी जगायला हवे होते...

यशवंतरावांना गाणे गाण्यासाठी गाणाऱ्याला आणि ते ऐकण्यासाठी ऐकणाऱ्याला कोणत्या प्रकारची मनःस्थिती लागते, वातावरण लागते, शिस्त लागते, याची चांगली जाणीव होती.

नागपूरला झालेल्या सरकारी संगीत महोत्सवाच्या वेळी केसरबाईसारखे थोर कलावंत आलेले होते. यशवंतरावांना कुठल्याही परिस्थितीत माझे संपूर्ण गाणे ऐकायचे होते. त्यापूर्वी महत्त्वाची कामे हातावेगळी करायची होती. त्यामुळे त्यांनी संयोजकांना सांगून ठेवले होते की, “मी येईपर्यंत भीमसेनचे गाणे सुरू करायचे नाही ... मी येण्यापूर्वी इतर कलाकारांचे कार्यक्रम होऊ देत.” त्याप्रमाणे माझा कार्यक्रम नंतर करण्यासाठी राखून ठेवण्यात आला. आपली सर्व कामे आटोपून यशवंतराव आले तेव्हा प्रेक्षकांची काय स्थिती होती ? कोण चक्क झोपलेला, कोण लोळतोय, लोळता लोळता संगीत श्रवण करतोय...ही अस्ताव्यस्त स्थिती दाखवून मी त्यांना म्हणालो, “तुमच्या या सवंगड्यांना उठवून शिस्तीत बसवा. नाहीतर मी गात नाही.” हे ऐकल्यावर स्वतः यशवंतरावांनी या लोकांना उठवून, त्यासाठी गरजेनुसार कोल्हापुरी

खाक्याही दाखवून, सर्वांना शिस्तीत बसायला लावले आणि त्या नंतर माझे गाणे झाले.

एकदा सोहन लाल, एम.पी. यांनी एक कार्यक्रम केला होता. कार्यक्रमासाठी अत्यंत वेचक, निवडक प्रेक्षक, श्रोते यांना त्यांनी बोलावलेले होते. पहिल्यांदा यामिनी कृष्णमूर्ती यांचा कार्यक्रम होता. त्या नंतर मध्यंतर. तो झाल्यावर माझे गाणे ठेवले होते. यशवंतरावांना पहाटे ४ वाजता विमानाने दौऱ्यावर जायचे होते. पण त्यांना माझे रंगलेले गाणे संपूर्ण ऐकायचे होते. तेव्हा त्यांनी आपल्या सेक्रेटरीला सांगितले, 'आपण सकाळी १० वाजता निघू या '... चारी कोपऱ्यात ठेवलेल्या समयांच्या मंद प्रकाशाने उजळलेल्या त्या हॉलमधली ती मैफल चांगलीच रंगली.

माझ्याही आणि त्यांच्याही कायम ध्यानात राहिली.

एकदा मी दिल्लीला गेलो होतो. मी साहेबांना फोन करून विचारले, "काय करताय?"

तर ते म्हणाले, "कामं चालली आहेत."

"गाणं ऐकायचं का ?"

"नको ! आज वेळ नाही !" त्यांचे ताडकन् उत्तर आले. ते पुढे म्हणाले, "भीमसेनचे गाणे ही जाता जाता ऐकण्याची गोष्ट नाही. त्यासाठी तीन चार तासांची सवड हवी."

यशवंतराव आणि वेणूताई या दोघांनाही गाण्याची आवड होती. साहेबांना वेळ नसला, की वेणूताई यायच्या. साहेब दिल्लीला आणि वेणूताई मुंबईत असा काही काळ गेला. या काळात त्या एकट्याच यायच्या. त्यांनी संतवाणी कितीतरी वेळा ऐकली.

वेणूताई गेल्यानंतर एकदा साहेबांची आणि माझी भेट झाली. त्या वेळी त्यांनी संतवाणी ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या बाबतीत बिदागीचा किंवा माझ्या सवडीचा प्रश्नच नव्हता. मी त्यांना विचारले, "केव्हा ऐकता ?"

तेव्हा असे ठरले की, वेणूताईंच्या पहिल्या पुण्यतिथीला कराडला, 'विरंगुळ्यावर' हा कार्यक्रम करायचा. त्याप्रमाणे मी माझ्या साथीदारांना घेऊन गेलो. यशवंतराव तेव्हा काहीसे खचलेले होते. तब्येत ठीक नव्हती. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, "माझी तब्येत ठीक नाही. खाली बसायला त्रास होतो. मी खुर्चीवर बसून ऐकतो." त्याप्रमाणे त्यांनी माझ्यासमोर खुर्चीवर बसून संतवाणी पहिल्यांदा ऐकली.

आमचे जिव्हाळ्याचे संबंध. आम्ही बोलायला लागलो की त्यांनी नेहमीच आपला सरकारी ताफा दूर ठेवलेला असायचा. केव्हाही भेटले की, मिठी मारून जिव्हाळ्याच्या गोष्टी बोलायचे. वडीलधाऱ्या जबाबदार माणसाप्रमाणे सांगायचे, "दारू पिणं कमी कर म्हणून. त्याच वेळी सगळी व्यवस्था इथे बरी केली आहे ना ?" म्हणूनही चौकशी करायचे.

आम्हाला एकमेकांबद्दल प्रेमादर वाटायचा. साहजिकच मला नेहमी वाटायचे की, त्यांनी आपल्या घरी यावे. त्याप्रमाणे मी त्यांना नेहमी 'माझ्या घरी केव्हा येता ?' म्हणून विचारायचा. ते मला म्हणायचे, 'तुझं स्वतंत्र घर होईल तेव्हाच येईन.' आणि हा योग आला. मी माझे घर बांधल्यानंतर ते माझ्याकडे आले. तुम्हाला काय खायला करू म्हणून विचारले तर फोडणीचे पोहे मला फार आवडतात म्हणाले. पोहे केले. आंब्याचे दिवस होते. तेव्हा पोहे आणि आंबे मोठ्या आवडीने खाऊन, गप्पागोष्टी करून ते गेले.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी ते अगदी आकस्मिकपणे इहलोक सोडून गेले. या गोष्टीचा जिव्हाळ्याचा माणूस म्हणून आणि कलाकार म्हणून फार मोठा धक्का बसला. इतका मोठा रसिक श्रेष्ठ गेल्यावर आम्हा कलाकारांच्या जीवनात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून तरी केव्हा येणार ?

## दिनकर साक्रीकर
## यशवंतराव - एक ललित व्यक्तिमत्त्व

साहित्याचे बाळकडूच घेऊन ते या काव्यरम्य प्रदेशात वावरले. जोतिबा फुल्यांच्या चरित्रापासूनच त्यांनी वाचनाला सुरुवात केली. त्यातून घेतलेला सामाजिक परिवर्तनाचा संदेश ते कधीच विसरले नाहीत. त्यांनी कवी गोविंद आणि कवी गोविंदाग्रजांच्या कविता वाचल्या. गडकऱ्यांची नाटके वाचून ते इतके भारावून जात की, राजसंन्यासमधील कित्येक संवाद मुखोद्गत झाले होते. येरवड्याच्या तुरुंगात असताना त्यांची आचार्य भागवतांशी गाठ पडली. या गांधीवादी आचार्यांनी त्यांना कालिदास तर सांगितलाच, पण सावरकरांचे राजकारण काहीही असले तरी त्यांची कविता वाचली आणि त्यांना जाणवले की, गोविंद काय, गोविंदाग्रज काय, किंवा सावरकर काय, हे सर्व मराठी कवी ज्वलंत देशभक्तीची संधीच जणू देत आहेत.

### कृष्णा खोऱ्यातील निसर्गात

गोविंद-गोविंदाग्रजांच्या काव्याने यशवंतरावांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व घडवले, एवढेच नव्हे तर त्यांना साहित्यिक प्रेमांची जन्मभर पुरून उरणारी देणगी दिली. दिल्लीला गेल्यानंतरही त्यांचे या जमिनीशी, साहित्याशी असलेले नाते तुटले नाही अथवा दुरावलेले नाही.

भेटायला जाणाऱ्या माणसाला त्यांच्या टेबलावर मराठीतील अगदी नवनवीन ग्रंथ दिसत. मराठीतील जवळजवळ सर्व प्रतिभाशाली साहित्यिक अभिमानाने त्यांना मित्र मानीत. अनंत काणेकर असोत वा पु. ल. देशपांडे असोत, माडगूळकर असोत वा महानोर असोत सर्वांना त्यांचा सहवास प्रिय असे. मराठी माणसाचे नाटकाचे वेडही त्यांच्या ठायी होतेच.

शालेय दिवसांत जसे त्यांनी गडकरी वाचले तसेच महाराष्ट्राच्या लोककलांचीही त्यांनी अत्यंत प्रेमाने ओळख करून घेतली. पोवाडे, भजन, तमाशा यांच्या कार्यक्रमासाठी ते मित्रांबरोबर लांबलांब जात असत.

महाराष्ट्राच्या शहरी रंगभूमी आणि महाराष्ट्राच्या शास्त्रीय गायकांइतकेच शाहीर व लावणी गायकही त्यांना प्रिय होते. महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण संस्कृतीचा जणू उदात्त संगमच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता.

संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश त्यांनी आणला की आणखी कोणी आणला याबद्दल कदाचित वाद होऊ शकेल, पण महाराष्ट्र राज्याला मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण लाभले, हे या नवीन राज्याचे एक महत् भाग्य होते, याबद्दल कुणाला वाद घालता येणार नाही.

मराठी भाषा व मराठी साहित्य याबद्दल त्यांचे जे अफाट प्रेम होते, जो अभिमान होता, त्याचमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील सर्व व्यक्तींच्या आदरास ते पात्र झाले होते. वास्तविक संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आचार्य अत्रे हे त्यांच्या विरोधातील प्रमुख. पण आचार्य अत्र्यांना त्यांच्याबद्दल शेवटपर्यंत अतिशय प्रेमादर होता.

केवळ त्यांचे साहित्यप्रेमच सांगून भागणार नाही, त्यांनी केलेले प्रत्यक्ष लेखन हे सुद्धा साहित्यगुणांनी युक्त असे आहे. या संदर्भात त्यांच्या आत्मचरित्राचा उल्लेख अपरिहार्य होतो. मराठी साहित्यात कायमचे स्थान मिळवून देईल, असा हा लेखनप्रपंच त्यांनी केला आहे.

१९६४ साली त्यांना पहिला साहित्यिक सन्मान मिळाला. त्या वर्षीच्या विदर्भ साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक होते आणि १९७५ साली म्हणजे आणीबाणीच्या प्रक्षुब्ध वातावरणात कराडच्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. या संमेलनाच्या अध्यक्षा होत्या दुर्गाबाई भागवत. वादळाचे गर्द ढग गोळा झालेले, संमेलन कसे पार पडते याची सर्वांना चिंता, पण अखेर कोणताही गैरप्रकार न घडता संमेलन यशस्वीरीत्या

संपन्न झाले. श्रेय होते यशवंतरावांचेच. साहित्याच्या मांडवात आपण मंत्री नसून एक रसिक आहोत ही त्यांची भूमिका. म्हणूनच "मंत्री संमेलनात नकोत" या वादाचा त्यांना उपद्रव कधीच झाला नाही. इचलकरंजीच्या संमेलनात हा प्रश्न उपस्थित होईल असे वाटले होते, परंतु यशवंतरावांनी श्रोत्यांच्या रांगेत स्थान घेऊन पु.लं. चे अध्यक्षीय भाषण शांत चित्ताने ऐकले व साहित्यसंमेलनात साहित्यिकांचे अग्रस्थान एक प्रकारे मान्य केले.

राजकारण व साहित्य दोघांचेही माध्यम शब्द आहे. म्हणून राजकारणी हे साहित्यिकांचे शब्दबंधु असतात असे ते एका भाषणात म्हणाले होते. साहित्यिकांना शब्दबंधु म्हणणाऱ्या यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व हे ललित व्यक्तिमत्त्व होते ते असे.

त्यांच्या आत्मचरित्राच्या पहिल्याच खंडाला "न.चिं. केळकर पारितोषिक" मिळाले आहे. त्याचे तिन्ही खंड प्रसिद्ध होतील तेव्हा महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय इतिहासच प्रत्यक्ष तो घडवणाऱ्याकडूनच लिहिलेला, असा उपलब्ध होईल. पण दुर्दैवाने तसे घडले नाही तथापि. "मराठी साहित्यात घातलेली मोलाची भर" असेच या आत्मचरित्रांबद्दल म्हणावे लागेल. सर्जनशील साहित्य निर्माण करण्याची प्रतिभा त्यांचे ठायी होती हे मान्य करावे लागेल.

इतिहास घडविणारा साहित्यिक असे यशवंतरावांचे अनन्यसाधारण स्थान महाराष्ट्रात आहे व ते तसेच यापुढेही राहील.

## अनंत माने
## अगत्याचा माणूस

मा. नामदार यशवंतरावजी चव्हाण यांची अमर स्मृती. १९५९ सालची गोष्ट आहे. माझा 'सांगते ऐका' चित्रपट फारच गाजला होता. त्याच्या शतक महोत्सवी समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. यशवंतरावजींना बोलवावे असे ठरले. योगायोगाने श्री. यशवंतरावजी त्या वेळी पुण्यात आले होते. श्री. बाबूराव सणस यांचे ओळखीने श्री. यशवंतरावजींना भेटणेस गेलो. वेळ रात्रीची होती तरी त्यांचे भोवती लोकांचा गराडा फारच मोठा पडला होता. मी श्री. बाबूराव सणसांचे बरोबर कसातरी श्री. यशवंतरावजींजवळ पोहोचलो व श्री. यशवंतरावजींना 'सांगते ऐका'चे बुकलेट दिले. आणि मोठ्या उत्साहाने विनंती केली की, 'या चित्रपटाचे शतक महोत्सवी प्रमुख पाहुणे म्हणून आपण यावे'. पण त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात सांगितले की, "मला कामाच्या येवढ्या सगळ्या रगाड्यात तुमच्या सिनेमा समारंभ वगैरेंना हजर राहता येणे शक्य नाही." हे ऐकताच माझ्या साऱ्या उत्साहावर, आनंदावर विरजण पडले. मी हताश मनाने, जड पावलाने, बाहेर पडलो. माझ्या मनात नकळत श्री. यशवंतरावजींचे विषयी अढी बसली. पण तिकडे श्री. यशवंतरावजींना त्या सर्व कामाच्या रगाड्यातही मनात कुठेतरी खुपले असावे की, आपण आज एका मराठी माणसाला त्याच्या आमंत्रणाला नकार देऊन निराश केलं, दुखवले ! याची त्यांना खंत लागली असावी, असे आज मला वाटते. कारण की, त्याचे असे झाले. मी काही कारणांसाठी श्री. ग. दि. माडगूळकर यांचेकडे गेलो होतो. तिथे काँग्रेसचे त्या वेळचे पदाधिकारी श्री. रंगराव पाटील यांची भेट झाली. श्री. यशवंतरावजींच्या विषयीच्या माझ्या मनातील संवेदना मी त्यांना बोलून दाखवल्या. आणि म्हणालो, "सांगतो ऐका 'सारख्या शतक महोत्सवी मराठी चित्रपटाचे आमंत्रण त्यांनी स्पष्ट शब्दात

नाकारले. त्या अर्थी त्यांच्या मनात मराठी माणसाविषयी काहीच अस्मिता दिसत नाही." त्यावर ते जास्त काही बोलले नाहीत. पण त्यांना मनोमन असे वाटत असावे की, श्री. यशवंतरावजी तसे नाहीत. श्री यशवंतरावजींनी मराठी माणसासाठी आपला देह झिजवला आहे. पण मला त्या वेळी जास्त काही न बोलता त्यांनी हसत हसत वेळ मारून नेली. आणि मला वाटते या दरम्यान श्री. यशवंतरावजींची त्यांची भेट झाली असावी व त्यांनी माझी खंत श्री. यशवंतरावजींना सांगितली असली पाहिजे. पुढे ७-८ वर्षांचा काळ लोटला. मी १९६७ साली दिल्लीला गेलो होतो. माझेसमवेत लेखक श्री. शंकर पाटी, नेमाडे, दामले, सामंत वगैरे मंडळी होती. आम्ही यशवंतरावजींची भेट घ्यायचे ठरवले. आणि त्यांनी आवर्जून आम्हाला भेटायला बोलावले . वेळ रात्री ९ ची ठरली. आम्ही सर्व भेटायला गेलो. श्री. यशवंतरावजी आमचे स्वागत करीत मला अगत्त्यानी आणि आपुलकीने म्हणाले, "या, या, या अनंतराव" असे म्हणत प्रेमाने माझ्या खांद्यावर हात ठेवून मला जवळ बसवून घेत म्हणाले, "अनंतराव तुमचा आमच्यावर राग आहे." मी गोंधळलो. मला काहीच कळेना. कारण मागील प्रकरण ८-९ वर्षात मी पार विसरून गेलो होतो. ते म्हणाले, "तुमचं सांगते ऐकाच्या शतक महोत्सवी आमंत्रण मी नाकारले होते म्हणून तुम्ही रागावला होता, पण खरोखरीच त्या वेळी कामाच्या रगाड्यात मला येणे अवघड होते. पण तुमची निराशा केल्याबद्दलची खंत मनात राहून गेली होती. म्हणून वेळात वेळ काढून कराडच्या मुक्कामात मी कुणालाही न कळवता ते चित्र पाहिले. मला आवडले येवढेच नव्हे तर प्रत्यक्ष खेडेगाव, त्यातील समस्या, बारकावे यांचा साक्षात्कार एका मराठी दिग्दर्शकांनी दिल्याबद्दल अभिमान वाटला" असे म्हणून त्यांनी पुन्हा खांदा थोपटला. मला गहिवरून डोळे पाण्याने डबडबले. मी पटकन् त्यांचे पाय धरले. येवढ्या विशाल अंतःकरणाच्या माणसाकडून प्रशंसा ऐकून कृतार्थ वाटले, आणि ८-९ वर्षे झालेल्या माझ्या गैरसमजाचा डोळ्यातील अश्रूंनी निचरा झाला.

# म. द. हातकणंगलेकर
# सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व

यशवंतराव चव्हाण हे गेल्या अर्ध्या शतकात प्रकाशमान झालेले महाराष्ट्रातील अत्यंत लक्षणीय असे राजकीय आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व होय. आमच्या पिढीच्या अगोदरच्या कालखंडात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची जडणघडण झाली. त्यामुळे समवयस्क म्हणून त्यांचा संबंध येणे शक्यच नव्हते. ते माझ्या मामांचे समकालिन आणि परिचित असल्याने आमच्या घरी त्यांचे नाव अनेक वेळा कानावर पडत असे. सांगलीला ते आमच्या, म्हणजे मामांच्या घरी येऊन गेल्याचेही मला अंधुकपणे आठवते. त्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द अधिक ठळक आणि तेजस्वी बनत गेली. ते महाराष्ट्राचे आणि भारताचे नेते झाले. पूर्वीच्या सर्वसाधारण परिचितापासून त्यांचे अंतर साहजिकपणे वाढत गेले. तरीदेखील दौऱ्यावर असताना त्यांच्या घरगुती गाठीभेटी होत असतच ! त्यांच्या राजकीय कर्तृत्वापेक्षा त्यांचे साहित्यातील आणि सांस्कृतिक क्षेत्रातील भारदस्त अस्तित्व हा माझ्या दृष्टीने अत्यंत कुतूहलाचा आणि समाधानाचा विषय होता. त्यांची माझी प्रत्यक्ष भेट होईल असे मात्र मला कधी वाटले नव्हते. तो योग अकल्पितपणे आला.

यशवंतरावांच्या साहित्यप्रेमामुळे त्यांच्या जन्मभूमीत कराडला साहित्यसंमेलन अतिशय नाजूक राजकीय परिस्थितीत पार पडले. त्या संमेलनासाठी जो निधी जमा झाला त्यातील शिल्लक राहिलेल्या पैशातून कराड साहित्य पुरस्काराची योजना तयार झाली. मराठीतील होतकरू, तरूण लेखकाल पुढच्या लेखनासाठी उमेद वाटेल असा रोख रकमेचा भरीव पुरस्कार देण्याची ही योजना होती. दिल्लीच्या साहित्य अकादमीच्या पारितोषिकाच्या रकमेइतकीच या पारितोषिकाची रक्कम ठेवण्यात आली. या पुरस्काराला अकादमी पुरस्काराची प्रतिष्ठा लाभावी

अशी कल्पना होती. पुरस्कारासाठी वाङ्मयप्रकारानुसार दरवर्षी एका लेखकाची निवड करण्यासाठी एक परीक्षक समिती नेमण्यात आली. या समितीवर काम करण्याची संधी मला मिळाली.

१९८१ सालचा कराड पुरस्कार ललित गद्य या वाङ्मय प्रकारासाठी डॉ. अनिल अवचट यांच्या 'माणसं 'या पुस्तकाला दिला गेला. हा पुरस्कार मार्च महिन्यात एका समारंभात डॉ. अवचट यांना देण्यात आला. या समारंभासाठी यशवंतराव स्वतः उपस्थित होते. ते समारंभाचे अध्यक्षच होते. परीक्षकांच्यावतीने 'माणसं 'या पुस्तकावर मी थोडा वेळ बोललो. लालित्याचे स्वरूप आज केवळ भाषिक राहिलेले नाही. जीवनाच्या विविध अंगाबद्दलची जिवंत आस्था ही लालित्याचे नवे रूप दाखवू शकते असा माझा मुद्दा होता. तो त्यांना आवडला होता. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी त्याचा संयतपणे उल्लेख केला. यशवंतरावांच्या वागण्यात, अनुकूल अगर प्रतिकूल असे एक दुर्मिळ प्रकारचे सौजन्य आणि दर्जा होता. त्यामुळे त्यांचे अबोल अगर मितभाषी कौतुक देखील लोकांना अपूर्वाईचे वाटत असे. याचसाठी त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा मला खोलवर आनंद वाटला. दुसऱ्या दिवशी मला लौकर निघायचे होते म्हणून मी पहाटे उठून तयारी करू लागलो तर मला अधिकाधिक अस्वस्थ वाटू लागले. उजव्या बाजूस मूत्राशयाच्या जागी कळा येऊ लागल्या. सकाळची वेळ असूनही खूप घाम येऊ लागला. आम्ही तसेच बस स्टँडपर्यंत चालत गेलो. गो.म. पवार, सप्रे बरोबर होते. बसला वेळ असल्याने बाकावर बसलो. कळा वाढल्या आणि असह्य होऊ लागल्या. तेव्हा आम्ही शेजारी दिसणाऱ्या हॉस्पिटलमध्ये गेलो. थोड्या वेळात डॉक्टर, कराडमधील स्नेही त्वरेने आले. डॉक्टरांनी 'समर कॉलिक 'असे निदान केले. उपचार सुरू केले. झोपेचे इंजेक्शन दिले. त्रास थोडा कमी झाला, पण स्वस्थता नव्हती. झोप नीट लागत नव्हती. थोडी ग्लानी असेल. तोच माझे मित्र सांगत आले की यशवंतराव हॉस्पिटलकडे येत आहेत. त्यांना कुणीतरी मी आजारी झाल्याची बातमी दिली होती आणि ते

समाचाराला आले होते ! मी एकदम सावध झालो. यशवंतरावांना जिने चढायचा त्रास होतो हे मला आठवले आणि मीच एक जिना उतरून खाली आलो. ‘अरे तुम्ही कशाला खाली आलात? पेशंटला पाहायला आलो तर पेशंटच भेटायला खाली आला.’ असे मंद हसत म्हणाले. माझ्या आजाराची त्यांनी आस्थेवाईकपणे चौकशी केली. हा त्रास मूत्राशयातील खड्याचा आहे असे सांगितले. आणखीही माहिती दिली, “मलाही हा खडा आहे, मोठा आहे पण नीट बसलेला आहे. डॉक्टराचे म्हणणे असे की जोपर्यंत फार त्रास होत नाही तोपर्यंत शस्त्रक्रियेचा विचार करण्याचे कारण नाही. पथ्यपाणी मात्र थोडेफार असावे.” असे त्यांनी सांगितले. काळजी घेण्याची सूचना करून ते सावकाश निघून गेले. माणसे जोडण्याची त्यांची ही कला माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आली आणि माझ्या मनातले त्यांच्याबद्दलचे अगत्य वाढले.

त्यांचे ‘कृष्णाकाठ’ हे प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांच्या कलासक्त, गंभीर वृत्तीचे अनेक पुरावे सापडले. या पुस्तकाबद्दल मी मनःपूर्वक लिहिले आणि आकाशवाणीवर बोललो. ही गोष्ट त्यांच्यापर्यंत पोहोचली. त्याबद्दल स्वतःच्या अक्षरात त्यांचे पत्र आले.

१ रेसकोर्स रोड
नवी दिल्ली ११००११
२२-९-८४

श्री. हातकणंगलेकर यांसी,
स.न.वि.वि.

तुमचे पत्र व ‘कृष्णाकाठ’ चे तुमच्या परीक्षणाचे, (कोल्हापूर सकाळमध्ये प्रसिद्ध झाले ते) कात्रण मिळाले. कोणा एका रसिक मित्राने मला ते यापूर्वीच पाठवून दिले होते. त्यामुळे मी ते आधीच वाचलेले आहे.

मी तुमच्या रसग्रहणाबद्दल आभारी आहे. अनेक परीक्षणे प्रसिद्ध झाली आहेत. सर्वच तशी छान आहेत. तुमचे परीक्षण अधिक दर्जेदार आहे

म्हणून मला त्याचे महत्त्व आहे. आपण कधी भेटलो तर अधिक बोलता येईल. पुनश्च आभार!

आपला

यशवंतराव चव्हाण

त्यानंतर यशवंतराव दोन वेळा सांगली, कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले. मी गाठ घेण्याचा प्रयत्न केला पण गाठ पडली नाही. एकदा ते वाटेवर गौरिहर सिंहासने यांच्याकडे थोडा वेळ थांबले होते. तिथून त्यांनी मला निरोप पाठविला. त्या वेळा मी नेमका परगावी होतो. परत आल्यावर, मला ही गोष्ट जेव्हा समजली, तेव्हा फार हळहळ वाटली. अखेर त्यांची भेट झालीच नाही.

## ग. प्र. प्रधान
## यशवंतराव काँग्रेस (इंदिरा) मध्ये परत का गेले ?

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी १९८० मध्ये इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर, काही दिवसांनी ते मुंबईस आले असताना मी त्यांना भेटलो. त्या वेळी मी म्हणालो, "आपण इंदिरा काँग्रेसमध्ये कोणत्याही अपेक्षेने गेला नाहीत ही माझी खात्री आहे. परंतु श्रीमती गांधींनी आणीबाणी जाहीर करावयास नको होती असे आपले मतअसताना आपण पुन्हा त्यांच्या पक्षात का गेलात?" यशवंतराव हसले व म्हणाले, "तुम्ही माझ्या हेतूबद्दल शंका घेणार नाही ही मला खात्री आहे. थोडे स्पष्टच सांगतो. इंदिरा काँग्रेस हाच राष्ट्रीय जीवनाचा मुख्य प्रवाह आहे. या प्रवाहापासून बहुजनसमाजानेच दूर राहू नये हे सांगणे व सांगण्या आधी स्वतः ते करणे हे माझे कर्तव्य होते. बहुजन समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून मी हे केले. माझ्या वैयक्तिक मानापमानापेक्षा मला बहुजन समाजाचे हित महत्त्वाचे वाटते." यावर मी म्हणालो, "सत्ता म्हणजे राष्ट्रीय जीवनाचा मुख्य प्रवाह असे आपण मानता का?"

यावर यशवंतराव म्हणाले, "हो. समाजाची सुधारणा, समाजात बदल करण्याचे प्रमुख साधन सत्ता हेच आहे. बहुजन समाजाची अद्याप खूप सुधारणा व्हायची आहे. यासाठी हे साधन बहुजन समाजाने प्रभावीपणे वापरले पाहिजे. त्या साधनावर बळकट पकड ठेवली पाहिजे." यावर मी विचारले, "मग एस्.एम्.,गोरे, डांगे, हे जन्मभर विरोधी पक्षात राहिले. माझ्यासारखे अनेकजण त्यांच्या मागोमाग वाटचाल करीत राहिले हे चुकले का?"

यशवंतराव म्हणाले, "हे तुम्हीच अंतर्मुख होऊन तपासले पाहिजे. परंतु विरोधी पक्षातील कामास मी कमी लेखत नाही. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे हे लोकशाहीत आवश्यक आहे."

यावर थोडा रागावून मी म्हणालो, “आपले म्हणणे असे की, बहुजनसमाजाने सत्तेवर पकड ठेवावी आणि आम्ही विरोधी पक्षातच राहावे? मला हे मान्य नाही.”

यशवंतराव म्हणाले, “मी असे का म्हणतो ते समजून घ्या. पांढरपेशा समाजाला १९ व्या शतकापासून शिकायला मिळाले. त्यामुळे त्या समाजातील माणसांना एक शक्ती मिळाली आहे. त्यांना सत्तेचा पाठिंबा नसला तरी ते आपला विकास करून घेऊ शकतात. पांढरपेशा समाजाच्या संस्था व पांढरपेशी समाजातील तरूणांचे कर्तृत्व हे एस्.एम्.अगर गोरे यांच्या पाठिंब्यावर अवलंबून नाही. बहुजन समाजाचे तसे नाही. आमच्या संस्था व आमची तरूण पिढी यांना आधाराची जरूर आहे. अनेक वर्षे ज्ञानापासून वंचित राहिलेल्या शेतकरी समाजाची अद्याप सुधारणा व्हायची आहे. सत्तेचा आधार दिला तर आमच्या संस्था उत्तम काम करतील व आतल्या मुलांचे कर्तृत्व वाढेल. अद्याप निदान ५० वर्षे तरी सत्तेच्या साह्यानेच प्रगतीला खरी गती येईल. कर्मवीर अण्णांचा अपवाद वगळता, अन्य कोणी केवळ स्व सामर्थ्यावर संस्था उभारू शकला नाही. मी बहुजन समाजाचे सामर्थ्य काय आहे ते जाणतो. पण बहुजन समाजाच्या कर्तृत्वाला सत्तेची जोड आणखी काही वर्षे मिळालीच पाहिजे, हे ही मी जाणतो, आणि ते बहुजन समाजाला स्पष्टपणे सांगणे हे मी माझे कर्तव्य मानतो. प्रत्येक समाजाची काही ऐतिहासिक गरज असते. ती ओळखून मी वागतो. मग ते कोणाला पटो वा न पटो.”

# चित्रकार ग.ना.जाधव
# चौफेर दृष्टीचा नेता

पंडित जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्राचा पोलादी पुरूष, राजकारणपटू मुसद्दी मा. यशवंतराव चव्हाण यांची संरक्षण मंत्री म्हणून नेमणूक केली. त्या निमित्ताने महाराष्ट्रात सगळीकडे सत्कार सभा चालू होत्या. त्याच सुमारास महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक प्रा.ना.सी.फडके यांच्या घरी साहित्यिकांच्या गप्पागोष्टी ऐकण्यात मी रमून गेलो होतो. त्या गप्पांचा विषय होता : “ना.यशवंतराव चव्हाण.” नागपूरच्या जवळपासच्याच गावी एका कारखान्याची रौप्य महोत्सवी सभा भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष म्हणून नामदार यशवंतराव चव्हाण आले होते. त्या सभेत मोठमोठ्या साहित्यिकांची भाषणे झाली. ती साहित्याची खैरातच होती. शेवटी अध्यक्षीय भाषणास यशवंतराव बोलायला उभे राहिले. सर्वांना वाटले, एवढे मोठमोठे साहित्यिक बोलले तेव्हा यशवंतराव काय बोलणार? या काहीशा भ्रमात प्रेक्षक असतानाच यशवंतराव वेगवेगळे मुद्दे घेऊन बोलू लागले आणि त्या कारखान्याची शास्त्रीय माहिती जी सर्वसामान्यांनाही ठाऊक नव्हती ती आपल्या भाषणात करून दिली. तेव्हा प्रेक्षकांनी आणि साहित्यिकांनीही टाळ्या पिटल्या. सर्व लोक यशवंतरावांचे भाषण ऐकून मंत्रमुग्ध झाले होते. अशा तऱ्हेने ती साहित्यिकांची सभा यशवंतरावांनी जिंकली होती. या मागील रहस्य कोणते असावे? तर यशवंतराव कुठेही प्रवासात निघाले की, त्यांच्याबरोबर त्यांची अशी एका गाडीत पुस्तकांची लायब्ररी असायची. बाजारात एखादे चांगले पुस्तक आले की, ते लगेच विकत घेऊन आपल्या लायब्ररीत ठेवीत असत. अशा त्या दिवशी फडके माडखोलकर यांच्या गप्पागोष्टी ऐकत असताना त्या झंझावाती ४२ च्या आंदोलनातील रोमांचकारी घटना आणि त्यांचे राजकारण डोळ्यापुढे साकार होत

होत्या. तेव्हा मनात एक गोष्ट येऊन गेली की, यशवंतरावांनी नुसत्या साहित्याचीच सेवा केली असती, तर त्यांनी ज्ञानपीठ पारितोषिक नक्की मिळविले असते.

४२ च्या आंदोलनातील हुतात्मा स्मारकाचे उद्घाटन १७ ऑगस्ट १९५७ ला ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व्हावयाचे होते. त्यासाठी मला श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनी दोन पोर्ट्रेट्स करायला सांगितली होती. ती पूर्ण करून, त्या स्तंभाच्या पायथ्याशी ती दोन पोर्ट्रेट्स ठेवली होती. किर्लोस्कर कारखान्यातील अगदी तरूण इंजिनियरची जोडा, म्हणजे तुमचे आमचे सर्वांचेच मित्र हुतात्मा पंड्या व पेंढारकर होते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तरूण रक्त सळसळत होते. अनेक क्रांत्या झाल्या. त्यात तालुक्याच्या ठिकाणी मामलेदार कचेरीवर झेंडे लावणे, राज्यसत्ता खिळखिळी करणे, वगैरे कार्यक्रम आखले होते. आम्हा तरूणांची घालमेल चालू होती. एक मोर्चा इस्लामपूरला व दुसरा तासगावला ठरला होता. तासगावला जाणाऱ्या मोर्चात सेवादल मित्रांच्या बरोबर मीही जाणार होतो. परंतु आदल्या दिवशी मला थोडा ताप आल्याने, जाता आले नाही. दुसऱ्या दिवशी एक दुःखद वार्ता किर्लोस्करवाडीत आली, की इस्लामपूरच्या मोर्चात आमचे मित्र पंड्या यांना गोळी लागून खलास झाले. आम्हा सर्वांची अंतःकरणे फाटून गेली. कारण याच हुतात्म्याला पहिलाच मुलगा झाला होता. म्हणून तो सांगलीला पेढे आणायला जाणार होता. पण हे कसे काय झाले? म्हणून सर्वांची मने गोठून गेली होती. अतिशय गोड स्वभावाचा माणूस, सदा हसतमुख, सर्व खेळांची आवड असणारा हा पंड्या हुतात्मा झाला. दुसरे श्री.पेंढारकर. मा. यशवंतरावांचे मित्र, तेही किर्लोस्करवाडीत इंजिनियर होते. ते हीलव्हूवर (ब्रम्हचारी आश्रमात) राहात होते. त्यांच्याकडे यशवंतराव वरचेवर येत असत. तेथे क्रांतीतील रात्र रात्र खलबते चालत असत. ती स्फूर्ती घेऊन श्री. पेंढारकरांनी शेणोली ते रहिमतपूर स्टेशनच्या दरम्यान खजिना-रेल्वे पगाराचा डबा लुटला. त्यातच ते सापडले गेले आणि

त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात त्यांचे फार हाल केले. त्यातच त्यांचा अंत झाला. तेव्हा अशा या दोन क्रांतीत कामी आलेल्या हुतात्म्यांच्या स्मारकाची सभा जमली होती. सर्वजण दुःखी अंतःकरणाने बसले होते. ठरल्या वेळी यशवंतराव आले. समारंभ सुरू होण्यापूर्वी यशवंतरावांनी या थोर हुतात्म्यांच्या चित्रांना पुष्पहार घातले. पेंटिंग्ज पाहून “कुणी केलीत चित्रे?” म्हणून शंकरराव किर्लोस्करांना त्यांनी विचारले. तेव्हा शंकररावांनी या आमच्या चित्रकार ग.ना.जाधवनी केलीत म्हणून माझा परिचय करून दिला. “जाधव, छान केलीत चित्रे.” म्हणून माझ्या पाठीवर हात ठेवला. पण पुढे मात्र त्यांना बोलवेना. ... ते स्टेजवर जाऊन बसले. इतके ते हळवे होते.

२२ मार्च १९५७ ला भारत कृषक समाज संस्थेची प्रथमच कॉन्फरन्स दिल्लीत व्हायची होती. मी या संस्थेचा लाईफ मेंबर झालो होतो आणि शेती या विषयावर रूरल लाईफवर मी एक चित्रप्रदर्शन (वन मॅन शो) दिल्लीत भरविणार होतो. त्यासाठी मला दिल्लीतील महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या ओळखपत्रांची गरज होती. मार्चमध्येच ना. यशवंतराव कराड मतदारसंघातून उभे होते, व उंब्रजला त्या दिवशी त्यांची जाहीर प्रचारसभा होती. तिथे त्यांना पलुसचे राजाराम पाटील व मी जाऊन भेटलो. त्यांना दिल्लीत चित्र प्रदर्शन भरविणार असल्याचे सांगितले व मला चारदोन लोकांच्या ओळखपत्रांची गरज असल्याचे सांगताच त्यांना ती कल्पना आवडली व तशाही गडबडीत त्यांनी चार दोन पत्रे दिली व त्यांना भेटा म्हणजे तुम्हाला काही अडचण येणार नाही म्हणून सांगीतले. त्याचप्रमाणे खरोखरच मला त्या पत्रांचा खूप उपयोग झाला. त्या वेळचे राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांना भेटता आले. त्यांना मी केलेले कल्याणचा खजिना या विषयीचे चित्र महाराष्ट्राचे प्रतीक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील उत्कट प्रसंगाचे चित्र भेट म्हणून त्यांना दिले. ते राष्ट्रपती भवनात लागले आहे. आणि एक चित्र पंडित नेहरू, इंदिरा गांधी व राजीव गांधी हे स्त्री मासिकावर प्रसिद्ध झालेले ते चित्र

पंडितजींना आवडले होते, ते त्यांना दिले. त्यांच्याशी संभाषण करायला मिळाले. हस्तांदोलन करता आले. तो माझ्या दृष्टीने सुवर्ण क्षणच म्हणावा लागेल. हा प्रसंग आठवला की आजही मा. यशवंतरावांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

पुणे युनिव्हर्सिटीत लावण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पेंटिंगची ऑर्डर उद्योगपती राहुल कुमार बजाज यांचेकडून मला मिळाली होती. त्या पेंटिंगचे अनावरण ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व्हावयाचे होते. त्या निमित्ताने मी एक यशवंतरावांचे चित्र केले होते. ते थोडे प्रतिकात्मक केले होते. संरक्षणमंत्री होते सह्याद्री म्हणजे महाराष्ट्राची ढालच. अशा सह्याद्रीच्या बॅक ग्राऊंडवर यशवंतराव संरक्षणात्मक जवानांना मार्गदर्शन करतात असे ते चित्र होते. कणखर देशा दगडांच्या देशा महाराष्ट्र देशा, अशा या खंबीर नेतृत्वाच्या मा. यशवंतरावांच्या बॅकग्राऊंडला सह्याद्री टाकून ते संरक्षणात्मक जवानांना काहीतरी मार्गदर्शन करतात, एक हात पुढे करून काट्याकुट्यांनी भरलेल्या जंगलामागे दीपस्तंभासारखा सह्याद्रीचा काळा फत्तर संरक्षण म्हणजे खंबीर नेतृत्व सिंहासारखे व्यक्तिमत्त्व असे ते चित्र त्यांना भेट म्हणून दिले. ते त्यांना एवढे आवडले की, त्यांना यापूर्वी इतके हसताना मी कधी पाहिले नव्हते. त्या समारंभास समाजवादी नेते श्री. एस्.एम्.जोशी आले होते. त्यांनाही ते चित्र फार आवडले होते. तीनशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्राला गोब्राह्मणप्रतिपालककर्ता शूर वीर म्हणून नाव लौकिकता मिळविली त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून जनतेचे प्रेम त्यांनी संपादन केले. तीच जनता त्यांना प्रतिशिवाजी मानू लागली.

मा. यशवंतरावजींना ४२ च्या आंदोलनात पाहिले. त्यांचे कार्य पाहिले. त्यांची लीडरशीप पाहिली. खंबीर नेतृत्व व मुख्यमंत्री म्हणून विचार केल्यास विरोधकानाही यशवंतराव आपलेच वाटत असत. त्यांनी राष्ट्राचे संरक्षणपद सांभाळले, अर्थखाते सांभाळले, आदर्श अशी त्यांची कारकीर्द

गाजवली. अशा या अष्टपैलू महापुरूषाची महाराष्ट्राला देशाला नितांत गरज होती. याच वेळी काळाने झडप घालावी ही फार मोठी हानी महाराष्ट्राची, देशाची म्हणावी लागेल. कारण असा अभ्यासू चौफेर दृष्टीचा नेता आजतरी पाहण्यात नाही.

## आशा मुंडले
## चार क्षणचित्रे
### -१-

मी प्रथम त्यांना पाहिले तेव्हा हेच ते यशवंतराव चव्हाण हे मला माहीत नव्हते. ४२ च्या चळवळीत गाजलेला, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी लोकांची नाराजी सोसणारा आणि मुख्यमंत्री म्हणून संधी मिळाल्यावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा कायाकल्प करणारा हा माणूस मी प्रत्यक्ष कधीच पाहिला नव्हता.

त्यामुळे भलतीच गंमत झाली. पण त्यातून मनावर ठसलेले ते त्यांचे सौजन्य. माझा प्रियकर बाळ मुंडले लग्ना आधी मला पुण्याला भेटायला यायचा. आमच्या घरीच उतरायचा. मग पुणे-बंगलोर रेल्वेने परत जायचा. त्याला निरोप द्यायला मी नेहमीप्रमाणे स्टेशनवर गेले. डब्याच्या दारात तो उभा राहिला आणि मी प्लॅटफॉर्मवरून बोलत राहिले. मी कधी डब्यात चढत नसे. गाडी सुटली तर मला उडी मारता येणार नाही म्हणून. आम्ही एकमेकात असे गर्क झालेले त्या वेळी की अवतीभोवतीचं भानच नाही. परंतु अचानकच जाणवले की, एक सुरक्षा अधिकारी माझे लक्ष वेधून घ्यायचा प्रयत्न करतोय. मी "काय बुवा कटकट" अशा चेहऱ्याने तिकडे पाहिले तर काय? माझ्या आजूबाजूचा प्लॅटफॉर्म पूर्ण रिकामा. शेजारी फर्स्टक्लासच्या डब्यातल्या कूपेकडे पांढराशुभ्र पोषाख केलेले महोदय संथ पावले टाकत जाताहेत. आजूबाजूला सुरक्षा अधिकारी आणि त्यातला एत प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या एकुलत्या एक मला दूर व्हायला सांगतोय. बाळ म्हणाला, त्याच्या नेहमीच्या स्टाईलमध्ये, "कोणी व्हीआयपी दिसतोय" आणि डोळ्यानेच निरोप घेऊन माझा हात पटकन सोडून दिला त्याने. मला व्यत्यय आल्यासारखे वाटले पण मी 'सॉरी' असे पुटपुटत तिथून दूर होणार होते. इतक्यात 'साहेब' शेजारच्या डब्यात चढून दारातच उभे राहिले आणि हसून माझ्याकडे

आणि त्या अधिकाऱ्याकडे पाहात म्हणाले, “नेव्हर माईंड. थांबा तुम्ही इथेच.” दोन तरूण माणसांना आपलीसुद्धा आठवण नव्हती याची खुषी होती त्यांच्या चेहऱ्यावर. बाळने परत माझा हात पकडला. यथावकाश गाडी हलली. तेव्हा मी यशवंतरांना हसून नमस्कार केला. आणि तोपर्यंत लक्षात आलं की हे कोण असावेत ते.

पुढे जेव्हा भेटलो तेव्हा ह्या आठवणींने हसलो होतो मनापासून.

-२-

‘किती दिवस तुमची गाठ घ्यायला धडपडतोय, पत्ता कुठेय तुमचा? ऑफिसातही नव्हतात.’ त्रासिक चेहऱ्याने पण टिपिकल सरकारी हसऱ्या आवाजात प्रभाकरपंत नातू विचारीत होते. ‘मुलगा आजारी होता. मी रजेवर होते.’ मी म्हणाले.

‘बरं, आता ताबडतोब चला. साहेबांचे काम आहे तुमच्याकडे. डोंगरे आणि मी तुम्हाला ऑफिसात कळवणार होतो. पण तुम्ही घरी.’ घरही धड कुणाला माहीत नाही. ‘काय काम आहे?’ ‘सांगतो गाडीत.’या वेळी यशवंतराव अर्थमंत्री होते. आम्ही नवी दिल्लीत त्यांच्या घरी गेलो. प्रथमदर्शनीच एक तलवार. ही प्रत्यक्ष शिवाजी महाराजांची आहे असे एकाने सांगितले. पण मला ते खरे वाटले नाही.टेलिप्रिंटर धडधडत होता. व्हरांड्यातच अवघडून बसलो. मग नातू निघून गेले. काही वेळाने साहेब आले. सौम्य व्यक्तिमत्वाचे, अजिबात आक्रमक न वाटणारे, आर्जवी आवाजाचे. दिल्लीतल्या एकूण “नबाबी” शी विसंगत असे.

‘वेणूताईंना इंग्रजी शिकवायला हवं. संभाषणापुरतं. त्यांचं नडतं. माझ्याबरोबर कुठं आल्या की.’

मानधन देऊ असे आधीच डोंगऱ्यांनी नातूंना सांगितले होते. मी निमसरकारी नोकरीत. तेव्हा माझा होकार गृहीतच धरला गेला होता.

पण मी स्वभावाप्रमाणे स्पष्ट सांगितले की, “बाईंना भेटून नंतर कळवते.”

साहेब गेले. मग आतल्या दालनात वेणूताईंची गाठ झाली. चहा आला. आम्ही दोघीच होतो. त्या मला अतिशयच शालीन, घरंदाज वाटल्या. आम्ही मोकळेपणे बोललो. माझ्या लक्षात आले की, या वयात ‘ग,म,भ,न’ ह्या बाईंना नको आहे. आणि मोटिव्हेशनशिवाय प्रौढ माणूस नवी भाषा बोलायला शिकणार म्हणजे मारून मुटकून वैद्यबुवा! माझ्या कौशल्याचे पाणि पालथ्या घड्यावर घालायला मन घेईना.

मग मी थोडा विचार केला. आणि सौ. वेणूताईंना अडचणीत न टाकता नकार कसा द्यायचा ते मनाशी जुळवलं. “साहेब, तुम्ही मुंबईला होता आणि १९६२ मुळे तुम्हाला दिल्लीला बोलावले तेव्हाच आपली प्रतिमा आता फक्त ‘मराठी’ न राहता आंतरराष्ट्रीय होणार याचा विचार करून वेणूताईंना शिकवणी का नाही ठेवली ? आता झटपट रंगारी पद्धतीने काही केलं तर त्यांना ते सहज जमणार नाही आणि मलाही यशच मिळवायचे झाले तर जिद्दीने सारा दिवस तेच करावे लागेल. ११ ते ५ नोकरी, मुलांची जबाबदारी, मला एवढा वेळ काढता येणार नाही. मी दिलगीर आहे.

आणि इतके दिवस त्यांची तुम्हाला उत्तम सोबत झाली ती इंग्रजीत न बोलताच ना?”

त्यांना पटले असावे. कारण पुन्हा तो विषय माझ्यापर्यंत तरी पोचला नाही. “ह्यांची इच्छा आहे तर या तुम्ही बाई. पण मला कामचलाऊ इंग्रजी समजतं.परक्या कुणाबरोबर इंग्रजीतून फाडफाड बोलायची माझी आवडच नाही. माझ्या माणसांशी बोलायला मराठी-हिंदी पुरतं.” असे सांगणाऱ्या डोळ्यांमध्ये कारूण्य असलेल्या प्रौढ वेणूताईंची मास्तरीणबाई होण्याचे मी नाकारले तरी त्याचा दंश साहेबांनी मनात ठेवला नाही.

## -३-

दिल्लीमधल्या महाराष्ट्रीय मंडळींनी खटपट करून भरवलेले मुलांच्या पुस्तकांचे प्रदर्शन उद्धाटक यशवंतराव चव्हाण. मोजकेच आणि समोर मुले आहेत हे भान ठेवून झालेले त्यांचे भाषण. चहापानाच्या वेळी मोजकीच मंडळी तळघरात पोचलेली. आपण नजरेच्या टप्प्यात राहावे, आपल्याकडे बघून ते हसतायत असे वाटण्याइतके जवळ पोचावे, उगीच मोठ्याने 'मार्मिक' बोलून आपण 'वर्तुळातले' आहोत असे दाखवावे आणि स्थळकाळप्रसंगाचा विवेक न करता अकारण नटवा पोषाख करावा हे कसब राजधानीमध्ये अनेकांच्या अंगात आहे. याचा विराग वाटून सरळ कडेकडेने पुस्तके पाहात राहणारीही माझ्यासारखी काही होती.

टेबलाच्या एका कोपऱ्याला साहेब उभे होते. त्यांच्या अगदी जवळ कोणीच नव्हते. नुकताच परदेशातून आलेला माझा धिटुकला छोटा मुलगा छोट्याशा बहिणीचे बोट धरून बूट वाजवीत तिथे पोचला आणि त्यांच्याच बशीतून वेफर्स खाऊ लागला. त्यांच्याशी इंग्रजीत बोलूही लागला. ते पण कौतुकाने रमले होते. खाऊन झाल्यावर मुले त्यांना 'बायबाय' म्हणाली. ही कुणाची मलं असावीत असे कुतूहल आता बऱ्याच जणांना वाटत होते. गर्दीतून नेमकी मुलं माझ्यापर्यंत आली. म्हणाली, "ममी, दॅट नाइस मॅन हॅड अन अनक्राऊडेड टेबल. द ओनली वन. व्हाय?"

"ते आजचे मुख्य पाहुणे आहेत बाळा." "ओ, गुड आय गेव्ह हिम कंपनी." मुले ओरडली. आता मात्र मलाही हसू आवरेना आणि मुलांच्या डोक्यावरून माझ्याकडे पाहणाऱ्या साहेबांनाही ! कृत्रिम शिष्टाचाराच्या जगातही अंगभूत सौजन्य न सोडणारे आणि तरीही राजकारणी असे लोक दुर्मिळच. यशवंतराव त्यापैकी एक. माणसं जोडायचं त्यांना व्यसन होते म्हटले तरी चालेल.

## -४-

त्यांना शेवटून दिल्लीत पाहिले ते भैरवीसारखं. पावसाळी दिवस होता. मी २-४ दिवसांपुरती पुण्याहून दिल्लीला गेलेली. ना.धों.महानोरांचे काव्यगायन साहेबांच्या घरी होते. मोजकी मराठी मंडळी. श्री.माधव पटवर्धन माझे मावसभाऊ. त्यांच्याबरोबर मी तिथे गेले. वातावरण पावसाचे कुंद. सत्तेवर नसलेले, चेहऱ्यावर मनस्तापाच्या खुणा वागवणारे यशवंतराव, आग्रहाने सर्वांना पाठवलेली कॉफी. टोपी काढून निवांतपणे साहेब कविता ऐकत होते. उदास होते. फारसे कुणाशीच बोलले नाहीत. एकटे वाटले. वेणूताई गेल्यानंतर साहेबांचा चेहरा पुन्हा कधी उमललाच नाही मनापासून.

## डॉ. प्र. चिं. शेजवलकर
## यशवंतराव यांच्या सहवासात

ना. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे सर्वांत लोकप्रिय नेते होऊ शकले ह्याचे कारण ते अगदी सर्वसामान्य माणसांशी देखील खरोखरीच आपुलकीने बोलत. त्यांची स्मरणशक्ती जास्तच तीव्र असली पाहिजे, कारण तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसाने त्यांच्या सहवासाचा एखादा जुना प्रसंग पुनः त्यांना भेटल्यानंतर डोळ्यापुढे उभा केल्यास त्या जुन्या प्रसंगातील काही तपशील ते आपणहून सांगू शकत ! त्यांच्या ह्या लोकसंग्रही स्वभावाचे खरे रहस्य हेच की, त्यांना आपल्या अनभिषिक्त लोकप्रियतेचा आणि मिळालेल्या औपचारिक सत्तेचा कधीही अहंकार झाला नाही. आपल्याला मिळालेले मोठेपण लोकांच्या पाठिंब्यावरच आहे ह्याची त्यांना जाण होती. आणि म्हणून त्यांच्या घरी येणाऱ्या प्रत्येकाचे ते आणि सौ. वेणूताई मनापासून आदरतिथ्य करीत.

यशवंतराव दिल्ली येथे १९६२ नंतरच्या लगेचच्या काळात संरक्षणमंत्री म्हणून कृष्ण मेनन ह्यांच्या जागी गेल्यानंतरचा काळ त्यांच्या बाबतीत माझ्या विशेष लक्षात आहे. अध्यापनाच्या काही कामानिमित्ताने १९६३ मध्ये मी महिना दीड महिना दिल्ली येथे मुक्कामास होतो. महाराष्ट्राच्या आपल्या लाडक्या नेत्यास एकदा खरोखरच भेटावयास जाऊन बघावे असे साहजिकच वाटले. त्यांचे त्या काळचे सचिव, तितकेच लोकप्रिय, श्री. डोंगरे ह्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधल्यावर सायंकाळची त्यांच्या घरी भेटण्याची वेळ मिळाली. कचेरीत येण्याऐवजी घरीच जरूर या असे साहेब म्हणाल्याचे श्री. डोंगरे यांनी सांगितले. त्यांच्या घरी जवळजवळ दीड ते दोन तास वेळ केवळ मला एकट्याला त्यांच्याशी बोलता आले ! वेणूताईंनीही आदरातिथ्य केले. दिल्लीतील राजकीय परिस्थितीबाबत त्यांनी चर्चा केली. परंतु माझ्या कुतूहलापोटी आलेल्या

अनेक प्रश्नांबाबतही त्यांनी फार सुंदर विवेचन केले. महाराष्ट्राच्या राजकारणाविषयी त्यांनी केलेली चिकित्सा अतिशय तर्कशुद्ध आणि यथार्थदर्शन असलेली होती. मी त्या आधी दोन-तीन वेळा आमच्या महाविद्यालयाच्या व्याख्यानासाठी निमंत्रण करण्याकरिता म्हणून त्यांना पुण्यातील सर्किट हाऊसवर बोलावावयास गेलो होतो. त्या वेळी मी विचारलेल्या काही प्रश्नांबाबत आणि त्या वेळी त्यांनी दिलेल्या उत्तरांबाबत त्यांनी आठवण सांगितली. ह्या गोष्टीचे मला कमालीचे आश्चर्य वाटले.

त्यानंतरच्या माझ्या दिल्लीच्या मुक्कामात दोन-तीन वेळा विशेष आगाऊ मुलाखतीची वेळ न ठरवता मी जाण्याचे धाडस केले. त्या वेळचा त्यांचा संरक्षणमंत्री म्हणून असलेला दर्जा आणि घाईगर्दीचा काळ ह्यासारख्या गोष्टी डोळ्यापुढे येऊनही ते आलेल्या प्रत्येकाशी जणू काही तो आलेला फार जुना मित्र आहे अशा आपुलकीने बोलू शकत व त्यासाठी वेळ देत. हा त्यांचा मोठेपणाचा ठसा माझ्या मनावर कायमचा उमटला. यशवंतरावांच्याकडे गोरगरीब आणि सर्वसामान्य लोक तर जातच परंतु सर्वांकडून अतिशय बुद्धिवान आणि म्हणून अहंकारी समजले जाणारे लोकही यशवंतरावांचा नम्र, आर्जवी, स्वभाव पाहून स्तिमित होत. यशवंतरावांच्या निधनाच्या आधीच्या चार-पाच वर्षांच्या काळात ते ज्या ज्या वेळी काही सभासमारंभाच्या निमित्ताने पुण्यात अनेक वेळा येत, त्या त्या सर्व वेळी एरवी एखाद्या राष्ट्रीय स्तरावरील मोठ्या कीर्तिमान नेत्यांच्या वागण्यात दिसून येणारा अलिप्तपणा मला यशवंतरावांच्या चेहऱ्यावर कधीही दिसला नाही. असा व इतका लोकप्रिय नेता, सर्वांना हवाहवासा वाटणारा, विरोधकांच्या मनातही आपुलकी निर्माण करणारा यशवंतरावांनंतर महाराष्ट्रात वसंतदादा पाटील सोडल्यास दुसरा कोणीही अद्याप झाला नाही.

# भालचंद्र फडके
## गुणग्राहक आणि रसिक माणूस

१६ जून १९६२ ची गोष्ट. त्या दिवशी ना. यशवंतराव चव्हाण अकोल्याला आले होते. कृषी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे त्यांच्या हस्ते उद्घाटन होते. मला या महाविद्यालयात दोन वर्षांपुरते शासनाने मराठीचा प्राध्यापक म्हणून पाठवले होते. मराठीचे अध्यापन आठवड्यातून तीन तास करावे लागे व बाकीच्या अभ्यासेतर उपक्रमांच्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागत. या वास्तव्यात कृषिविषयक माहिती पुस्तिका सोप्या मराठी भाषेत मी तयार केल्या होत्या.

मुख्यमंत्र्यांचे स्वागत थाटामाटाने व्हायचे होते म्हणून माझ्याकडे स्वागतपर पद्य रचण्याची जबाबदारी आली. माझे श्वशुर डॉ. कदम कृषिखात्याचे सहसंचालक व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वैज्ञानिक. यशवंतरावांना त्यांच्याबद्दल विलक्षण अभिमान व आदर. यशवंतराव आले. सुरूवातीच्या परिचयात माझी 'कदमसाहेबांचे जावई' अशी ओळख करून देण्यात आली. ते म्हणाले, "म्हणजे आमचेच जावई"

स्वागतपद्य सुरू झाले. त्याच्या काही ओळी आज आठवतात. त्या अशा

नमने वाहुन, स्तवने उधळू गाऊ मंगल नाम
महाराष्ट्राच्या प्रेमळ नेत्या तुजला लक्ष प्रणाम
या सोन्याच्या दिनी भेटली मोर्णेला कृष्णा
या ज्ञानाच्या मंदिरी करतो स्वागत यशवंता
सह्याद्रीच्या दऱ्यात घुमती तुझे किर्ती-घोष
वऱ्हाडच्या मातीत जागतो तुझाच आवेश
घराघरातुन आज वाहतो हर्षाचा गंध
तुझिया स्पर्शे तेवत राहिल इथे ज्ञानज्योत

लोक सुखी तर देश सुखी हा अमुचा मंत्र
एकमुखाने गर्जत राहू अमुचा महाराष्ट्र

या पद्यातील 'लोक सुखी तर देश सुखी' ही ओळ उद्धृत करून त्यांनी तासभर भाषण केले. समारंभानंतर मी व माझ्या पत्नीची त्यांनी आस्थेने विचारपूस केली. लग्न होऊन नुकतेच पंधरा दिवस झाले होते. त्यांनी सहज विचारलं, "कुठं राहता?" मी म्हटलं, "घर मिळालं नाही. सध्या कुठल्या तरी अडगळीच्या खोलीत मुक्काम आहे." शेजारी अकोल्याचे कलेक्टर शिंदे साहेब बसले होते. यशवंतराव म्हणाले, "काय हो शिंदे आमच्या जावयाला घर द्यायला पाहिजेल." शिंद्यांनी चटकन उत्तर दिले, "मुलगी दिली कदमसाहेबांनी, आम्ही घर देऊ." आणि दुसरेच दिवशी अकोल्यात चांगला ब्लॉक मिळाला.

एकदा श्री. यशवंतराव मिलिन्द महाविद्यालयात आले होते. डॉ. आंबेडकरांच्या संबंधी त्यांच्या मनात खूप आदर होता. त्यांच्या भाषणातले एक वाक्य आठवते. ते म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांड पंडित होते, त्यांच्याजवळ महात्मा बुद्धांची प्रज्ञा आणि करूणा होती."

श्री. यशवंतराव रसिक वाचक होते. सामाजिक चळवळीसंबंधी कुणी काही लिहिले की ते मुक्तकंठाने कौतुक करीत. माझ्या धाकट्या बंधूंची 'शोध बाळगोपाळांचा', 'केशवराव जेधे', 'शोध सावरकरांचा', इत्यादी पुस्तके त्यांनी रसिक व चिकित्सक वृत्तीने वाचली होती.

यशवंतराव दिल्लीच्या विमानतळावर एकदा भेटले. सभोवताली अधिकारपदावर नसल्यामुळे माणसांचा गराडा नव्हता, एकटेच बसले होते.काहीतरी वाचीत होते. वाङ्मयातील नव्या प्रवाहांचे ते स्वागत करीत. त्यांच्या वाचनात माझी 'दलित साहित्या' वरील पुस्तके आली होती. दलित साहित्याच्या सामर्थ्याबद्दल ते मत मांडीत होते. त्यांची गुणग्राहकता विलक्षण होती व आपल्या म्हणून मानलेल्या माणसांबद्दलचा जिव्हाळा अपूर्व होता. कराडचे साहित्यसम्मेलन अत्यंत तणावयुक्त वातावरणात भरलेले. आदल्या दिवशी सम्मेलनाची व्यवस्था पाहात ते

हिंडत होते. पण काम करणाऱ्या प्रत्येक माणसाची आस्थेनं चौकशी करीत होते. भोजनव्यवस्थेत एकजणाला त्यांनी म्हटले, 'अहो, तुमचा मुलगा अमेरिकेत भेटला. चांगलं चाललंय' कृतज्ञतेने त्याचे डोळे भरून आले.

यशवंतरावांच्या स्वरातच एक प्रकारचे आर्जव आणि मार्दव असते. त्यामुळे त्यांच्या प्रोत्साहनपर, जिव्हाळ्याच्या शब्दाने कार्यकर्त्यांचा शीण नाहीसा होई. त्यांना वाटे की आपलं म्हणावं असं कुणीतरी आहे. सत्तेवर असणारी माणसे आपल्याच कार्यकर्त्यांशी तुसडेपणाने वागताना मी पाहिली आहेत. यशवंतराव सत्तेवर होते तेव्हा आणि सत्तेवरून उतरल्यानंतरही त्यांच्या वागण्यात तोच जिव्हाळा, तीच गुणग्राहकता होती. पुणे विद्यापीठाने त्यांच्या कर्तृत्वाचा ते सत्तेवर नसताना सन्माननीय 'डी. लिट्.' पदवी देऊन गौरव केला हे मला विशेष वाटले. कर्तृत्ववान माणसासंबंधी त्यांनी किती विनम्र भाषेत विचार मांडले आहेत. ते म्हणतात. "कुठल्याही समाजातील कर्तृत्ववान माणूस हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. नवनीत म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतो ते दुधातून येते. दूध नसेल तर लोणी नाही, समाजजीवन जेव्हा खळखळलेले असते, तेव्हा त्यामध्ये काहीतरी साचत असते. नवनीत निर्मिणाऱ्या दुधाप्रमाणे त्यात एक शक्ती असते. नवनीताला स्वतंत्र अस्तित्व असते ही खोटी गोष्ट आहे. तीच गोष्ट कुठल्याही कर्तृत्ववान माणसाच्या जीवनासंबंधीही खरी आहे." म्हणजे एका अर्थाने यशवंतरावांचे जीवन हा मराठी जनतेच्या जीवनाचा प्रसाद कण आहे.

# सूर्यकांत ग. देशपांडे
# महाराष्ट्राचा वेणूनाद

यशवंतराव चव्हाण इतिहासाचे एक पान काळाच्या आड दडले गेले. कलावंताच्या कलेचा रसिकतेने आस्वाद घेणारे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व लोभस होते. जीवनाच्या प्रारंभापासूनच संघर्ष करीत ते घडत गेले, आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणेच 'यशवंतराव चव्हाण' हे स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व साकार करून घेतले. कृष्णेकाठच्या मनोहारी जीवनाचा सोनहार स्पर्श लेवून, सागरतीरावरील विशाल जीवनाची खोली घेऊन, यमुनेच्या शांत मुग्धतेत रममाण झालेला यशवंतराव हा महाराष्ट्राचा एक 'वेणूनाद' होता.

मराठी मनाला मोहविणारे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व हे कवी अनिलांनी रचलेल्या आणि वसंतरावजी देशपांडे यांनी गायिलेल्या "वाटेवरी काटे वेचीत चाललो ! वाटले जसा फुलांफुलांत चालतो" या भावगीतातील भावनांचे मूर्तिमंत रूप होते. यशवंतराव फार मोठे रसिक होते. त्याच रसिकतेतून त्यांच्या जीवनाचे हे काव्यात्मक निरीक्षण कुणालाही खुलविणारेच ठरले.

वास्तविक कवी अनिलांनी फार पूर्वी लिहिलेले हे भावगीत बऱ्याच कालावधीपासून वसंतरावजींच्या पहाडी आवाजात मराठी रसिक ऐकत आले आहेत. परंतु त्याचा भावनात्मक आविष्कार यशवंतरावजींच्या जीवनात झालेला दिसून येणारा आहे. सदैव माणसांच्या मेळ्यात रमणारे यशवंराव-

"आदीचा प्रसाद घेत, पुढची ऐकीत साद
नादातच शीळ, वाजवीत चालतो"

अशी वाट चालत राहिले. ऐतिहासिक परंपरेचा वारसा घेऊन मोठमोठी पदे ते भूषवीत राहिले. नवविचारांचा कानोसा घेत घेत देशाचे

आणि महाराष्ट्राचे नाव मोठे करीत राहिले. त्या नादात त्यांची चाल ज्या वेळी चुकली त्या वेळी-

"चुकली नादात चाल, लागला जिवास बोल
ढळलेला तोल सावरित चाललो"

असे गुणगुणत यशवंतराव स्वगृही परतले नसतील कशावरून,

राजकारणात यशवंतराव विरोधकांशी लढतच राहिले. परंतु आपले म्हणणाऱ्या त्यांच्या माणसांनीही ज्या ज्या वेळी त्यांचे विरूद्ध पवित्रा घेतला तो विरोधही पत्करून ते आपल्या मार्गावरून चालत राहिले. ग. दि. मां. चा तो डौलदार गजराज धीमेपणाने चालत राहिला. त्या वाटेवरील काटे तुडवितांनाही वैचारिक पुष्पाचा सुगंध उधळविण्याची त्यांची रसज्ञ वृत्तीही दिसून यायची.

निखळ राजकारण करीत करीत जीवनाचे सर्वथैव व्यापताना त्यांच्या व्यक्तिमत्वात एक आगळाच आत्मा आविष्कारलेला दिसून यायचा तो आत्मा आता अमरत्वात विलीन झाला. त्या वेळी एकाकी यशवंतरावजींच्या त्या मृदूलतर मनाने "सुखदुःखाने भारावलेले खांद्यावरील ओझे फेकून देऊन आता परत चाललो," असे कदाचित म्हटले नसेल का?

"सह्याद्रीचे वारे" वहावेत तसे त्यांचे जीवन झंझावाती होते आणि झुळझुळतेही 'सगळ्यात असूनही नसणारे', यशवंतराव आज खरोखरच नाहीत. ही कल्पना खटकणारी आणि दुःख देणारी आहे. चंद्रभागेच्या घाटावरून मोठेपणी आईशिवाय चालतांना यशवंतरावांना ज्याप्रमाणे त्यांचे बोट सुटे सुटे वाटायचे आणि आईच्या आठवणीने नजर ओलावयाची तीच नजर आज महाराष्ट्राच्या लोचनी पाणावली आहे. कारण त्याच्या दऱ्याखोऱ्यातील एक 'वेणूनाद' लुप्त झाला आहे. सहकाराचा हात, कलावंताच्या पाठीवरील थाप, मंत्रमुग्ध करणारे वक्तृत्व, प्रोत्साहित करणारे नेतृत्व, हे सगळे काही विरून गेले. फक्त राहिले त्या वेणुनादाचे स्मृती कवडसे आणि ते कवटाळणारे रसिक.

## डॉ. सविता जाजोदिया
## स्मरणपत्र

ना. यशवंतरावजी चव्हाणांकडे पहिल्यांदा मी गेले ती आक्का (डॉ. सरोजिनी बाबर) राज्यसभेच्या सदस्या म्हणून दिल्लीत असताना. थोडा वेळ झालेली ती आपुलकीची मुलाखत. पण त्यानंतर दिल्लीतील कुठल्याही कार्यक्रमात यशवंतरावजी भेटले की आदरपूर्वक मी केलेल्या नमस्काराला प्रसन्न हास्याने प्रत्युत्तर देऊन ओळख दर्शवित असत. वास्तविक असंख्य लोकांशी त्यांचा सतत संपर्क. कुणाकुणाला कसे लक्षात ठेवायचे? पण प्रत्येक व्यक्ती त्यांच्या अचूक लक्षात राहात असे.

त्यानंतर आमचा नॅशनल बुक ट्रस्टच्या राष्ट्रीय चरित्रमालेसाठी आम्ही त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक संक्षिप्त चरित्र लिहून द्यावयाची विनंती केली. त्यांनी ती आनंदाने मान्यही केली. त्या संदर्भात मी व आमचे एक सहकारी डॉ. सैय्यद असद अली त्यांना भेटायला त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो. भेटीची वेळ सकाळी साडे दहाची ठरली होती आणी साडे दहाच्या ठोक्याला यशवंतरावजी भेटावयाच्या खोलीत बाहेर आले. आपल्या नेहमीच्या प्रसन्न मुद्रेने त्यांनी आमचे स्वागत केले, आणि आपल्या जबाबदारीच्या राजकीय व्यापातून वेळ काढून पुस्तकाविषयी आमच्याशी मनमोकळेपणाने चर्चा केली. वरकरणी ते हसतमुख दिसत होते, पण त्या हास्या आड वेणूताई गेल्याचे दुःख लपलेले जाणवत होते. आतून मोडल्यासारखे ते वाटत होते. त्यांच्या जीवनाचा गाभाच जणू हरवला होता. त्यांनी फायनान्स कमिशनच्या कामातून मुक्त झाल्यावर पुस्तक लिहून द्यावयाचे कबूल केले.

चार महिन्यांनंतर, आता त्यांना लेखनासाठी सवड झाली असेल या कल्पनेने २३ नोव्हेंबरला मी त्यांना एक स्मरणपत्र पाठवले. त्या वेळी हे पत्र त्यांना कधीच पोचणार नाही अशी पुसटशी आशंकाही मनात ली

नव्हती. २५ नोव्हेंबरला जेव्हा त्यांच्या निधनाची दुःखद वार्ता समजली तेव्हा मन विषण्ण होऊन गेले. त्यांच्या मृत्यूनंतर ते स्मरणपत्र त्यांच्या घरी पोचावं हा केवढा दैवदुर्विलास !

## सौ. इंदिरा कुलकर्णी
## असा मुख्यमंत्री पुन्हा नाही होणे

आदरणीय यशवंतभाऊ आमच्या कराडचे, आमचे त्यांचे बहीणभावासारखे घनिष्ठ संबंध, अशी व्यक्ती महाराष्ट्राची झाली ही शुभ घटना आम्हा कराडकरांना मनापासून आनंद वाटावा अशीच. हे अत्युच्च पद भूषविणारा (आमच्या कराडच्या) एका गरीब शेचकऱ्याचा मुलगा. ही केव्हाही अतिशय अभिमान वाटावा अशीच गोष्ट.

त्या वेळी आम्ही अमरावतीत होतो, मंत्रिमहाशय अमुक तारखेस अमरावतीस येणार असल्याची वार्ता कानी आली नि मी कराडकर भगिनी भावाची भेट होणार ह्या हर्षाने फुलून गेले. ह्या त्यांच्या मुक्कामात आपण त्यांना भेटायचे नि भावपूर्ण, मनापासून अभिनंदन करायचे हेही मनाशी पक्के ठरवून टाकले.

मुख्यमंत्र्यांना भेटीची वेळ वगैरे आधी न ठरविता भेट घेणे ही गोष्ट महादुर्लभ याची जाणीव नव्हती असे नाही. पण हे महानपद भूषविणाऱ्या आपल्या यशवंतभाऊंना कसेही करून भेटायसाठी मन उत्सुक झाले होते.

भाऊ अमरावतीस येणार हे कळाल्यापासून त्यांच्या मोठेपणा सांगणाऱ्या अनेक गोष्टी, अनेक प्रसंग डोळ्यासमोरून सरकू लागले. अनेक गाठीभेटीचे प्रसंग ताजे झाले. तो त्यांचा टवटवीत, हसरा चेहरा, ते विनोद, तो मिस्कील भाव सारे सारे आठवले.

मी अधूनमधून कविता रचते. आता तर काय माझ्या काव्यगुणांना एक आवडीचाच विषय मिळाला. अन् क्षणार्धात ओळी पुढे ओळी तयार होऊ लागल्या. हां हां म्हणता एक यशवंताचेसाठी गुणगौरवपर काव्य तयारही झाले.

आज यशवंतरावजी येणार, नेहरू मैदानात सभा व्हायची. मैदान एवढे मोठ्ठे पण सर्व बाजूंनी सुरेख सजविले होते. भव्य, उंच व्यासपीठ मुद्दाम केले होते.

आम्ही दोघे सभेच्या बराच वेळ आधी चांगली जरा जवळची जागी मिळावी म्हणजे भेट घेणे जरा सुलभ होईल ह्या हेतूने गेलो. पण पाहतो तो काय? सारे मैदान नुसते माणसांनी फुलून गेले होते. तिळभर जागा रिकामी नव्हती. तशाच गर्दीत मी हातात हाराची परडी, पेढ्याचा पुडा आणि कवितेची घडी सावरत जरा जरा पुढे घुसले नी बरी जागा मिळविली. मनाशी एक धाडशी विचारही केला. भाऊ आले की, धडक व्यासपीठावर जायचे, गाठ घ्यायची.

ठरलेल्या वेळेपेक्षा बऱ्याच उशिरा मंत्रिमहाशय येत असल्याचे लाऊडस्पीकर सांगू लागला. मग प्रत्येकजण उत्सुकता डोळ्यात साठवून मुख्यमंत्र्यांना पाहण्यासाठी सज्ज झाला. तेवढ्यात सर्वांचे नमस्कार स्वीकारत साऱ्यांना अभिवादन करीत, यशवंतरावांची आनंदी, हसतमुख स्वारी तडफेने चालत व्यासपीठाकडे निघाली. सर्वच्या सर्व श्रोते आधी न उठण्याची ताकीद दिलेली असूनही उभे राहून आपल्या लाडक्या नेत्याचे माना उंचावून डोळे भरून दर्शन घेऊ लागले.

मुख्यमंत्री स्थानापन्न झाल्यावर गावचे पुढारी स्वागतगीत झाल्यावर प्रास्ताविक भाषण करू लागले, अन् तो क्षण मी पकडला, मला कुठून धाडस आले कोण जाणे. सपासप वाट काढीत मी व्यासपीठावर चढले. भाऊंना हार घातला, पेढे दिले. त्यांनाही मला पाहून खूप आनंद झाला. एवढ्या गडबडीतही त्यांनी माझी, माझ्या पतींची विशेष म्हणजे त्यांचा मित्र असलेला माझा भाऊ त्याचीही चौकशी केली. मी धन्य झाले. भरून पावले. भाऊंच्या हाती कागदाची घडी देत मी म्हटले,

'भाऊ, मी एक तुमच्यावर कविता केलीय ती स्वीकारावी. त्यांनी कविता हातात घेतली नि म्हणाले,

'ताई स्वीकारावी वगैरे भाषा बहिणीने करायची नसते हं ! तुमच्या भेटीने मला खूप आनंद झाला. ही कवितेची सप्रेम भेट मला फार मोलाची वाटते. ही माझ्या मायेची भेट आहे. मात्र ताई, मी ती नागपुरास गेल्यावर स्वस्थपणे वाचून मग कळवीन हं !"

"बरं बरं !' म्हणत मी पुन्हा नमस्कार केला आणि विजेच्या चपळाईने खाली उतरले. कारण लोक हा प्रकार तोंडात बोट घालून पाहातच होते. आता मला त्याची लाज वाटली. पण मनासारखे घडल्याच्या आनंदात मी मात्र सचैल डुंबत होते.

नंतर मी तसे पत्राचे वगैरे इतर व्यापात विसरलेच होते पण एक दिवस माझ्या नावे मंत्रालयाचा शिक्का असलेला एक सरकारी लखोटा पोस्टमनने आणून दिला. प्रथम मला काहीच उमजेना! लखोटा जरा उलटसुलट केल्यावर 'मुख्यमंत्र्याकडून' असे वाचले नि माझा आनंद गगनात मावेना! मी नुसती पाहातच राहिलेली दिसताच माझ्या पतींनी तो घेऊन फोडला आणि म्हणाले, बाईसाहेब, तुमच्या बंधुराजांचे यशवंतरावजींचे तुम्हास पत्र आलेय, वाचता वाचताच ते मनाशी वा, वा करू लागले. मग मी म्हटले,

'अहो, असं काय करता वाचा की मोठ्ठ्यानी?'

'ऐक, मुख्यमंत्री म्हणताहेत, ताई तुमची कविता अतिशय आवडली. कवितेतील, भावाचा केलेला एवढा गौरव वाचून अक्षरशः मन भारावून गेले. मायेच्या माणसाच्या शाबासकीचे मोल करताच येणार नाही. पुन्हा कधीतरी निवांत भेटू वगैरे वगैरे. नागपूरला आल्यास बंगल्यावर या. मला व तुमच्या वहिनी सौ. वेणूताईंना खूप आनंद होईल.

हा सारा मजकूर असलेले ते मौल्यवान पत्र मी एखाद्या रत्नजडीत दागिना जपावा तसे अद्याप जपून ठेवले आहे.

त्यांना आवडलेली त्या वेळची ही कविता :-

## मुख्यमंत्री यशवंताचे यशोगान

यशवंता तव यशगानाने पुनित धरा होई
शिवरायाच्या वारसदारा प्रणाम हा घेई
धन्य धन्य ती वीरप्रसवा महान भाग्याची
माय माउली तुझी जशी रे जिजाऊ शिवबाची
अनेक वर्षाने ये उदया नवा महाराष्ट्र
मुख्यमंत्रि तू आम्हा लाभला, सद्गुणी अन् श्रेष्ठ
तूच पुढारी रक्षणकर्ता तूच योग्य नेता
तूच दाखवी मार्ग आम्हाला विजयाचा आता
कुणी नसावे असंतोषी अन् उच्च नीच येथे
रामराज्य जणु पुन्हा अनुभवा यावे आम्हाते
शारदेचिये दरबारातिल साहित्यिक नाना
तुझ्या स्वराज्यी योग्य प्रतिष्ठा, लाभावी त्यांना
शीलवतींच्या शीलासाठी संरक्षक व्हावे
तुझ्या मंदिरी सती देवता यांना आदरावे
हवा हवासा व्हावे आपुल्या प्रिय राष्ट्रालागी
तन मन वेचुनि सेवा करूनी कीर्ती मिळवावी
भूउद्धारा म्हीही अर्पितो आहुती प्राणांची
हे वीरांगणा तुझ्या पाठिशी शक्ती लाखांची
प्रचंड स्वागत गावोगावी थाटाने होई
यशवंता तव भाग्य पाहुनी गहिवर मनि येई!!

## चित्तरंजन कोल्हटकर
## कलावंताची कदर करणारा रसिक

श्रेष्ठ सत्ताधारी राजकारणी एरवी हळव्या मनाचा 'माणूस' ही असू शकतो यावर सहसा कोणी विश्वास ठेवीत नाहीत. सत्ताधारी हा आपल्या इतमामात राहणारा, वागणारा असू शकतो, लोकांकडून नम्रतेची अपेक्षा बाळगणारा असतो हा आपला नेहमीचा अनुभव. सत्तेचा म्हणून काही विशेष तोरा त्याच्या अंगात मुरलेला असतो. परंतु अशा वागणुकीला अपवाद ठरणारा एक श्रेष्ठ सत्ताधारी तुमच्या-आमच्यात होता तो म्हणजे यशवंतराव चव्हाण! माझे हे अनुभवाचे बोल आहेत. त्यांच असं झालं- आमचा म्हणजे आमच्या नाटक चमूचा मुक्काम तेव्हा नागपूरला होता. 'दुरितांचे तिमिर जावो' या नाटकाच्या प्रयोगासाठी आम्ही नागपूरला मुक्काम करून होतो. प्रयोग जाहीर झाला. सर्वत्र फलक झळकले. नाटक हाऊसफुल्ल जाणार याची खात्री होती. योगायोग असा की, त्याच दिवशी यशवंतराव चव्हाण यांचा नागपूर येथे मुक्काम होता. त्या वेळी ते संरक्षण मंत्री होते.

यशवंतराव हे मराठी नाटकाचे, संगीताचे शोकिन. मुंबईत किंवा दिल्लीत असतील तर चांगले मराठी नाटक किंवा संगीताची मैफल चुकवायची नाही हा त्यांचा कटाक्ष. आमच्या प्रयोगाच्या दिवशी ते नागपुरात होते, परंतु रात्री तेथे त्यांचा मुक्काम होणार आहे की नाही, शासकीय कामात ते किती व्यग्र आहेत याची आम्हा मंडळींना सुतराम कल्पना नव्हती. त्यामुळे नाटकाच्या प्रयोगाला त्यांना आवर्जून बोलविण्याच्या फंदात कोणी पडले नाही. परंतु घडले ते उलटेच ! यशवंतरावांचाच निरोप आला-'मी नाटकाला येणार आहे !' आमची धावपळ उडाली. दोन खुर्च्या राखून ठेवाव्या लागणार होत्या.

व्यवस्थापकांनी ती व्यवस्था केली खरी परंतु माझ्यासमोर भलताच पेचप्रसंग उभा राहिला. पेच कसला संकटच उभं राहिलं !

घोटाळा असा झाला होता की त्याच दिवशी चुकून माझा पाय खड्ड्यात गेल्यामुळे दुखवला होता. डॉक्टरांनी पायावर चक्क प्लॅस्टर चढवले होते. प्रश्न असा निर्माण झाला की, प्लॅस्टरने जाडजूड बनलेला पाय घेऊन मी स्टेजवर जाणार कसा? यशवंतरावांसारखा रसिक प्रेक्षक समोर असताना, तशा बंदिस्त पायानं भूमिका वठविणं मनाला प्रशस्त वाटेना. मनाचा निर्णय होत नव्हता. नाट्यप्रयोग तर जाहीर झालेला होता आणि प्रेक्षक तुडुंब भरले होते. यशवंतरावही दाखल झाले होते.

नाटकाचा अंक सुरू झाला. प्लॅस्टरनं बांधलेला पाय घेऊन मी विंगेत उभा होतो. माझ्या प्रवेशाला अजून अवकाश होता. रंगदेवतेनं एकाएकी प्रेरणा दिली असावी. मी खुर्चीवर बसलो आणि पायांचं प्लॅस्टर काढून टाकलं. परिणामाची फिकीर केली नाही. अन् स्टेजवर प्रवेश केला.

अर्ध्या तासाचा प्रवेश होता. व्यवस्थित पार पडला. प्रेक्षकांकडून वाहवा झाली. परंतु प्रवेश संपवून विंगेकडे निघालो तो काय, पायावर टरटरून सूज चढली होती. चप्पल पायाच्या बाहेरच राहात होती. अर्धा तास अखंड उभे राहिल्यानं आणि प्लॅस्टर नसल्यानं सूज चढली.

त्या अंकानंतर मध्यंतर होता त्यामुळं थोडा वेळ मिळाला होता. म्हणून तिथेच एका कोपऱ्यात बसून विजेच्या बल्बने पाय शेकण्याचा उपक्रम सुरू केला. पायाला शेक देण्याच्या नादात मी होतो तेवढ्यात स्वतः यशवंतराव समोर येऊन उभे राहिले. संयोजकांनी मध्यंतराच्या चहासाठी त्यांना बोलाविलं होतं. चहाची व्यवस्था थिएटरमध्ये दुसऱ्या मजल्यावर करण्यात आली होती. मी निवांत जागा म्हणून, माडीवर जाण्याच्या जिन्याच्या खाली पाय शेकत बसलो होतो. कसे काय कुणास ठाऊक, यशवंतरावांनी मला पाहिलं आणि जिना चढून न जाता माझ्यापर्यंत पोहोचले.

‘काय गाववाले, काय चाललंय?’ – यशवंतराव. मी सारा किस्सा सांगितला. त्यासरशी माझ्या बकोटीला धरून त्यांनी मला उचलले आणि तसेच कवेत धरून, जिना चढून चहासाठी मला घेऊन गेले ! मी तर पुरता शरमिंदा बनून गेलो. देशाच्या संरक्षणमंत्र्याची अशी आपुलकी मला नवीन होती.

तशाच दुखऱ्या पायानं मी नाटक पूर्ण केलं. नाटक संपवून यशवंतराव परत जायला निघाले तेव्हा पुन्हा रंगपटापर्यंत आले. मला बजावलं की, “नाटक संपलंय, असाच हॉस्पिटलमध्ये जा आणि पायाचं प्लॅस्टर पूर्ववत करून घे. प्लॅस्टर बसवून झालंय हे मला समजलं पाहिजे. जबाबदारी लक्षात ठेवा. मघाशी पाय पाहिला त्याच वेळी, खरं म्हणजे मी तुला हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं होतं ? प्रेक्षकांसाठी तू स्वतः यातना सहन करतोस याचा अभिमान वाटतो.”

यशवंतरावांमधील माणुसपणाचं त्या रात्री मला वेगळंच दर्शन घडलं. दुरितांचं तिमिर जाण्यासाठी मनापासून झटणाऱ्या या माणसाची त्या रात्रीची आठवण माझ्या मनात बिंबून राहिली.

दिल्लीतल्या मुक्कामातील अनुभव तर थक्क करून सोडणारा आहे. ‘पंडितरराज जगन्नाथ’ या नाटकाचा दिल्लीत प्रयोग होता. यशवंतराव नाटकाला येणार असं आम्ही गृहीत धरलं होतं. परंतु त्यांनी आम्हाला त्या दिवशी वेगळाच धक्का दिला. पं. जवाहरलाल नेहरूंसमवेत नाटकाला येणार असल्याचा त्यांचा निरोप मिळताच आनंदाला पारावार उरला नाही.

नियोजित वेळेला पंतप्रधानांसह यशवंतराव दाखल झाले. नाट्यप्रयोग सुरू झाला. कलागुण दाखविण्याची त्या रात्री जणू काही आमच्यात चढाओढ लागून राहिली. प्रयोग अप्रतिम रंगला.

पंतप्रधान पं. नेहरूंची उपस्थिती लाभलेली असल्यानं त्यांच्यासाठी चहापानाची चोख व्यवस्था थिएटरमध्ये अन्यत्र करून ठेवली होती. मध्यंतरात एका विशिष्ट दरवाजाने पं. नेहरू आणि यशवंतराव यांनी प्रवेश

करायचे संयोजकांनी ठरविले होते आणि त्यांच्या स्वागतासाठी भालचंद्र पेंढारकर आणि मंडळी त्या दरवाजाशी थांबली होती. खुर्च्यांची मांडामांड व्यवस्थित झालेली आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी मी आत थांबलो होतो आणि खुर्च्या लावून घेत होतो.

मी पाठमोरा होतो अन् आश्चर्य असे की पं. नेहरूंच्या समवेत यशवंतराव तिथं पोहोचले होते. 'अरे चित्तरंजन, काय करत आहेस, पंडितजी आलेत' यशवंतरावांच्या तोंडून मी हे ऐकलं आणि सर्दच झालो. त्यांचं स्वागत करून त्यांना आत घेऊन येणारी मंडळी अजून दारावरच उभी होती. हे दोघे ज्येष्ठ चहाच्या टेबलापर्यंत पोहोचले होते. भांबावलेल्या मनानं मी तिथूनच ओरडलो, 'अरे इकडे आत या, पंडितजी इथं आले आहेत.'

घडलं ते असं की, दोघेही त्या दरवाज्याकडे गेलेच नाहीत. प्रेक्षागृहातून उठले ते सरळ स्टेजचा पडदा बाजूला करून मधल्या फटीतून स्टेजवर आले आणि तेथून थेट चहाच्या ठिकाणी !

'असं कसं झालं?'- कुणीतरी यशवंतरावांना विचारलं.

"अरे हे नटराजाचं क्षेत्र आहे. रंगमंदिर आहे. स्वागत करायचं ते त्याचं इथं कसला आलाय मानपान ?"

- यशवंतराव मोकळेपणानं हसले.

कलेची कदर करणारी ही आठवण मनात कोरून ठेवली आहे. कलेची आणि कलावंताची कदर म्हणून जी म्हणतात ती काही वेगळी असू शकते काय असा प्रश्न नेहमीच माझ्यासमोर उभा राहतो!

# पोपटलाल शहा
# प्रेमळ माणूस

महाराष्ट्राच्या इतिहासात आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या  नवराष्ट्रनिर्मितीच्या कार्यात गेल्या साठ वर्षांचा काळ अनेक दृष्टींनी संस्मरणीय असा आहे. या काळात महाराष्ट्राचे व भारताचे नेतृत्व करणारे श्रेष्ठ नेते म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण हे अग्रगण्य ठरतील. मी १९१४ सालापासून राष्ट्रीय चळवळीमध्ये भाग घेणारा काँग्रेस कार्यकर्ता असल्यामुळे यशवंतरावांचा आणि माझा घनिष्ठ संबंध होता. त्यामुळे त्यांच्या अनेक आठवणी माझ्या मनात येतात. १९४६ ते १९५६ ह्या काळात मी मुंबई विधानसभेतील काँग्रेसपक्षीय सभासद असल्यामुळे तर त्यांचा व माझा फारच जवळचा संबंध आला.

अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात ग्रामीण भागात जन्मलेले यशवंतराव अगदी लहानपणीच पोरके झाले. वडिलांच्या निधनानंतर त्यांची परिस्थिती किती बिकट झाली असेल ह्याची कल्पनाच करता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये सोळा-सतरा वर्षांच्या अल्प वयातच त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली व आयुष्यभर राष्ट्रकार्य करून यशस्वी नेता म्हणून देशाच्या प्रगतीसाठी बहुमोल कामगिरी केली. प्रतिकूल परिस्थिती योग्य रीतीने हाताळून त्यांनी मार्गक्रमण केले. आपला निर्णय झाल्यावर ते आपली भूमिका व आपला विचार यशस्वी करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत. समाजातील विविध घटकांशी व कार्यकर्त्यांशी लोकसंग्रहाच्या भूमिकेने दृढ संबंध ते ठेवीत व लोकांचा पाठिंबा मिळवीत.

१९५६ साली विशाल द्विभाषिक मुंबई राज्यांची निर्मिती झाली आणि या राज्याचे मुख्यमंत्रिपद कोणाकडं सोपवावयाचे हा प्रश्न विधिमंडळ काँग्रेसपक्षापुढे आला. त्या वेळी यशवंतराव हे बहुमताने नेते म्हणून निवडले गेले. मराठी भाषेच्या संपूर्ण प्रदेशाचे मुंबईसह महाराष्ट्र राज्य

स्थापन व्हावे यासाठी मोठी चळवळ चालू होती. त्या परिस्थितीमध्ये साधक-बाधक विचार करून त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या निर्णयानुसार द्विभाषिक राज्याची योजना राबविण्याचा स्वतःचा विचार पक्का केला व नेतृत्वाची निवडणूक लढविण्याचे ठरविले. ते काम त्या वेळी अतिशय अवघड होते. पण ते त्यांनी स्वीकारले. निवडणुकीमध्ये बहुमताने यशस्वी झाल्यानंतर ते माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, 'आता आपणाला फार काम करावे लागणार आहे.' हे म्हणत असताना त्यांच्या चेहऱ्यावर जे भाव उमटले होते ते इतक्या वर्षांनंतरही आज मला स्पष्टपणे आठवतात. त्या अवघड परिस्थितीमध्ये काँग्रेसपक्षाच्या निर्णयानुसार जबाबदारी घेण्याची धीरगंभीर वृत्ती आणि माझ्यासारख्या सहकाऱ्याकडून त्यासाठी हक्काने व विश्वासाने कामाचे सहकार्य मागण्याची वृत्ती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसली.

मुंबई राज्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रिमंडळात ज्येष्ठ मंत्री याप्रमाणे यशवंतराव दीर्घकाळ सत्ताधारी होते. पण राजकारण व सत्ता यांच्याव्यतिरिक्त समाजजीवनांतील इतर घडामोडींमध्येही ते आपुलकीने लक्ष घालीत असत. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या एका समारंभासाठी आले असता, 'काय पोपटलाल, काय म्हणतंय तुमचं इतिहास संशोधक मंडळ?' असा प्रश्न विचारून त्यांनी मंडळाच्या कार्याबद्दल आस्थेवाईकपणे विचारपूस केली. मंडळाबद्दलची आपुलकी त्यांच्या बोलण्यातून सर्वांना प्रतीत झाली.

कराड तालुक्यातील चरेगाव-उंब्रज येथील समाजप्रेमी डॉक्टर श्री. माणेकलाल गुलाबचंद शाह यांच्या एकसष्टीपूर्तीनिमित्त १९८३ सालाच्या सुरूवातीला त्यांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव उपस्थित राहणार होते. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मी गेलो होतो. कार्यक्रम सुरू होण्याच्या अगोदर मला त्यांनी पाहिले आणि जवळ येऊन क्षणार्धात त्यांनी मला

कडकडून मिठी मारली. १९५६ साली विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव निवडले गेले त्या वेळची परिस्थिती व १९८३ साली डॉक्टर माणेकलाल शाह यांच्या गौरव समारंभाच्या वेळची परिस्थिती यांत मोठा बदल झाला होता. आता यशवंतराव मंत्री नव्हते. पण माझ्यासारख्या दीर्घकाल राष्ट्रकार्य करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्याबद्दल १९५६ साली किंवा त्यापूर्वीही त्यांनी जे प्रेम बाळगले तेच प्रेम १९८३ साली कडकडून मारलेल्या त्या मिठीमध्येही होतेच. यशवंतरावांच्या चाहत्यांनी ते दृश्य डोळे भरून पाहिले. त्यांची व माझी ही शेवटचीच भेट. आता उरल्या आहेत फक्त पस्तीस-चाळीस वर्षांतील विविध आठवणी.

## धों. म. मोहिते
## शिवथडीचे साहेब

साहेब आमच्या शिवधडीचे. देवराष्ट्रयाचे. त्यांचे माझे जन्मगाव देवराष्ट्रेच. साहेबांना आमचे वडील सुपरिचित होते. वडिलांचेबाबत ते मनापासून आदर बाळगून होते. शिवाय दुसरे म्हणजे त्याच्या थोडे अगोदर आमच्या शेजारच्या चिंचणी (अंबक) येथील सुप्रसिद्ध खुनी दरोडेखोर पिऱ्या मांग याच्यावर मी "किर्लोस्कर" च्या दिवाळी अंकात "मी माणसात कसा आलो?" हा लेख लिहिला होता. तो चव्हाण साहेबांचे वाचनात आला असून त्यांना खूपच आवडला असल्याचे एका कार्यकर्त्याने मला सांगितले होते. तेव्हा येणेप्रमाणे धागा पकडून व साहेबांना निमंत्रित करायचे असे ठरवून एकदा मी कराड गाठले.

"तुम्हीच का ते धों. म. मोहिते?" माझी भेट होताच साहेब म्हणाले, छान लिहिलात पिऱ्या मांगावर लेख. मी वाचलाय. जबरदस्त लेखणी आहे तुमची. लिहा .. खूप लिहा..." त्यांच्या या मनमोकळ्या बोलण्याने मला खूपच धीर चढला. मी येण्याचे कारण सांगितले आणि माझ्या मूळ स्वभावधर्माला अनुसरून एकदम बोलून गेलो, "तुमच्या या दौऱ्यात नेमकं आमचंच तेवढं गाव तुमच्या टग्यांनी वगळलं बघा." "टगे" हा शब्द ऐकून साहेब खळखळून हसले. "ठिक आहे. दौरा सकाळी नऊला कडेगावपासून सुरू होतोय. त्या आधी तासभर लवकर सकाळी आठलाच तुमच्या गावात मी हजर आहे." आणि मिस्किलपणे हसत ते पुढे म्हणाले, "मग तर हे "टगे" आडवे येणार नाहीत ना?"

कोणत्याही काँग्रेसवाल्या गावाला न जाता साहेब केवळ आपल्याच भागात खास भेट देताहेत म्हटल्यावर गावकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आले. आमच्या गावापासून अंबकपर्यंत "जीपबल" रस्ता ताबडतोब करण्यात आला. मुकुंदरावांनी तर आधल्याच दिवशी किर्लोस्करवाडीहून

आचाऱ्यासकट चहाफराळाचे साहित्य, कपबश्या, डिशेश, बैठकीसाठी गाद्या, तक्के असे सामान बैलगाडीतून पाठवून दिले. ते स्वतः कार्यक्रमाचे दिवशी सकाळी लवकर सात-आठ मैलांचे अंतर तोडून सायकलवरून गावात दाखल झाले. प्रांतसाहेब, फौजदारसाहेब हेही बैलगाडी, सायकलने, गावात पोचले.

ठरल्याप्रमाणे सकाळी ठीक आठ वाजता चव्हाण साहेब श्रमदानाचे ठिकाणी हजर झाले. बँड तुतारीच्या निनादात आणि हातातील टिकाव, फावडे उंचावून गावकऱ्यानी त्यांचे भव्य स्वागत केले. साहेबांनी नव्या सडकेवर थोडा फेरफटका मारला. तेथेच रस्त्याच्या कडेला आमराईच्या गर्द छायेत खुर्च्या टेबले मांडून मोकळ्या रानातच आम्ही सभेची आखणी केली होती. ही कल्पना साहेबांना फार आवडली. सभेला बायकामुलांसह उभा गाव लोटला होता.

सभेत साहेब बोलायला उठल्यावर प्रथम त्यांनी या कामाबद्दल आम्हा कार्यकर्त्यांची आणि गावकऱ्यांची पाठ थोपटली आणि म्हणाले "आमचे कार्यकर्ते काय करू शकतात, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही सडक होय. कशाला इंजिनियरची वाट बघायची ? होईल थोडी वाकडी तिडकी सडक. म्हणून काय बिघडणार आहे?" आणि त्यांनी कार्यकर्ते, गावकरी आणि स्वतःच्या गावाचा विकास यावर सुमारे अर्धा तास व्याख्यान दिले. आपल्या भाषणात त्यांनी काँग्रेस पक्ष आणि त्या पक्षाचा दोष दाखविणे कटाक्षाने टाळले. चुकूनसुध्दा त्यांनी हे शब्द भाषणात येऊ दिले नाहीत. आम्ही आणि आमचे गाव "कसले" आहोत हे त्यांना पक्के ठाऊक होते.

आमच्या गावची साहेबांची ही भेट मला स्वतःला माझ्या यापुढील सार्वजनिक कार्यात फार मोठी मार्गदर्शक आणि मोलाची ठरून गेली. सार्वजनिक कार्य आणि साहित्याचे क्षेत्र यात त्यांचा माझा सूर चांगलाच जुळला.

सार्वजनिक कार्यासाठी त्यांच्या बंगल्याचा आणि कार्यालयाचा दरवाजा माझ्यासाठी सदैव खुला होता. एखादं काम घेऊन मी मुंबईला

गेलोय नि साहेबांचे भेटीसाठी दोन-तीन दिवस थांबून राहिलोय किंवा साहेब मुंबईत असूनही त्यांची भेट न होता हात हलवीत परत आलोय, असे कधी म्हणजे कधीच घडले नाही. पी. ए. मंडळी माझी आणि साहेबांची भेट लगेच घालून देत. साहेबांनी त्यांना माझ्यापुरत्या तशा सूचना देऊन ठेवल्या होत्या. मी त्यांच्याकडे माझे स्वतःचे कसलेही काम घेऊन कधीही गेलो नाही. जायचे ते सार्वजनिक काम घेऊनच. लहान, मोठे, क्लिष्ट कसलेही काम असो साहेबांना ते पटले की लगेच त्या कामाला गती मिळे आणि ते काम झटक्यात होऊन जाई. आम्ही आमच्या गावाचा सर्वांगीण विकास केला त्या प्रत्येक गोष्टीला साहेबांचे पर्यंत पोहचवून आम्हाला ते काम करून घ्यावे लागले आहे. मी ती गोष्ट म्हणजे गावाला एस. टी. सुरू करण्यासारखी मामुली बाब असो अगर हायस्कूल वा दवाखान्यासारखे महत्त्वाचे काम असो, साहेब आमच्या पाठीशी उभे.

अलीकडे मी आमच्या भागात जे सागरेश्वर अभयारण्य उभे केले, ही केवळ अशक्यप्राय कोटीतील गोष्ट होय. ही म्हणजे अतिशयोक्ती नव्हे अगर सांगोवांगी कथा कल्पना नव्हे. प्रत्यक्षच आणि चक्क सागरेश्वर अभयारण्य उभे राहिले आहे. झाडतोडीमुळे झालेला एक उघडा बोडका डोंगर, त्यात चालू असलेल्या पन्नास साठ हातभट्ट्या, फराऱ्यांचे अड्डे, गुरे चारणारे, जळण तोडणारे तसेच केवळ विरोधासाठी विरोध करणारे यांचा आणि भाले, कुऱ्हाडी, बंदुकीसकट सारा अती कडवट विरोध पचवून सागरेश्वर अभयारण्य आज चक्क उभे राहिले आहे. स्वप्नसृष्टी सत्यात अवतरली आहे. दरसाल हजारो पर्यटक त्याचा लाभ घेत आहेत. आनंदित होऊन घरी परतताहेत. हे अघटित घडले कसे? केवळ साहेब माझ्या पाठीशी ठोसपणे उभे राहिले म्हणूनच ! सागरेश्वर अभयारण्य निर्मितीचा इतिहास म्हणजे एक भला मोठा ग्रंथ तयार होईल.

कार्यकर्त्यांचे सार्वजनिक काम, ते करण्याची त्यांची पद्धत, त्यामागील त्या कार्यकर्त्याचा स्वार्थ, परमार्थ, हे जाणून घेण्याची ताकद साहेबांकडे होती. गुणी कार्यकर्त्याला ते बरोबर हेरून काढीत. मग तो कोणत्या

पक्षाचा आहे याचे सोयरसुतक त्यांना नसे. साहेबांचे विश्वासाला मी पूर्णपणे उतरलो होतो. अर्थात साहेबांनी मला आपण होऊन कधी सार्वजनिक काम सांगितले नाही. मात्र मी घेऊन गेलेले काम त्यांनी कधी नाकारले नाही.

साहेब मला एकदा म्हणाले, "तुम्ही कसले लेखक ? मी जर राजकारणात पडलो नसतो तर फार मोठा लेखक झालो असतो !" आणि त्यांनी ते "कृष्णाकाठ" या पुस्तकाने रसिक वाचकांना दाखवूनही दिले आहे. माझी एखादी कथा अगर लेख प्रकाशित झाला की ते अवश्य वाचीत आणि आपल्यामागील कामांच्या अनंत व्यापातून सवड काढून ते मला त्या साहित्याबद्दल आपला मार्मिक अभिप्राय आवर्जून कळवीत. "भली खोड मोडली" म्हणून "किर्लोस्कर" मध्ये मी एक कथा लिहिली होती. भिवानाना नावाचा एक गावगुंड एका गरीब शेतकऱ्याचे काम एका पोलिसाचे सहकार्य घेऊन करतो. पोलिसही एक चांगले काम म्हणून कसलीही अभिलाषा न धरता सद्सद्विवेकबुद्धीने ते करून टाकतो. त्याचा गैरफायदा उठवून तो गुंड त्या शेतकऱ्यापासून शंभर रुपये वसूल करतो. ही गोष्ट त्या पोलिसाला कळते. त्याला ते चांगलेच खटकते. वेगळ्या मार्गाने त्या गुंडाला "अटक" करून त्याच्याकडून तो तीनशे रूपये काढतो. त्याला पोलिसठाण्यात घेऊन जातो. फौजदाराचे कानावर खरी वस्तुस्थिती घालून ते तीनशे रूपये फौजदारांकडे देतो. फौजदार भिवानानाला हाग्यादम भरून "सोडून" देतो. ते तीनशे रुपये परत पोलिसाकडे देऊन सांगतो, "ह्यापैकी शंभर रुपये त्या गरीब शेतकऱ्याचे परत कर आणि बाकीचे दोनशे तिथल्या शाळेला भिवानानाचे नावे देणगी देऊन टाक" अशी ही कथा. त्या वेळी फार गाजलेली. तिचे इंग्रजी, हिंदी आणि गुजराथी भाषांतून भाषांतर झाले. साहेबांचे या कथेबद्दल पत्र आले. सुंदर कथा लिहिल्याबद्दल सुरुवातीला माझे अभिनंदन करून ते लिहितात, "तुमची कथा आदर्शवादी आहे पण वास्तववादी वाटत नाही"

मी लिहिलेल्या “मुलाखतीच्या मैदानातून” या पुस्तकाला त्यांची सुंदर आणि मार्मिक प्रस्तावना लाभली आहे.

अशा तऱ्हेने सार्वजनिक कार्य आणि साहित्य यामध्ये त्यांचा माझा सूर चांगलाच जुळला होता.

# डॉ. शरच्चंद्र गोखले
# लोकोत्तर नेतृत्व

यशवंतराव चव्हाण यांचे मला लाभलेले नेतृत्व हे अनेक अर्थाने लोकोत्तर स्वरूपाचे आहे असेच मानले जाते. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्रातील जातीयवादाला मूठमाती मिळाली. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या विकासाला नवीन नवीन दिशा फुटू लागल्या. यशवंतरावजींच्यामुळे महाराष्ट्राला भारतीय नेतृत्व मंडळात मानाचे पान मिळाले.

बेचाळीसच्या चळवळीच्या वेळी मी शाळेत होतो. परंतु चळवळीत असलेले यशवंतराव यांच्याविषयी माझे वडील ती. दा. वि. गोखले यांच्याकडून ऐकत होतो. त्याच काळात भूमिगत असलेले श्री अच्युतराव पटवर्धन यांच्याकडूनही यशवंतरावांच्या बाबत ऐकले. पुढे मी मुंबईस सरकारमध्ये उपसंचालक झाल्यानंतर यशवंतरावांचा थोडाफार सहवास मिळण्याचे भाग्य मला लाभले. त्या वेळीच त्यांच्या बोलण्यात असे आले की, आमच्या कोल्हापूरच्या घरात जे नंतर जप्त झाले व जे पुढे विद्यापीठ व हायस्कूल म्हणून सुरू झाले त्या जागेत यशवंतराव विद्यार्थी असताना राहात असत. महाराष्ट्रात मुख्यमंत्री झाल्यानंतर त्या काळात मला युनायटेड नेशन्सने पुढील संशोधनाकरिता निवडले. जाण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांना भेटावे म्हणून गेल्यावर त्यांनी सर्वप्रथम घरची चौकशी केली व त्यांनतर परदेशातून काय शिकता येईल, महाराष्ट्राचे शासन जर विकासान्मुख करावयाचे असेल तर परदेशी प्रशासनविद्येमधील कोणते विचार घेता येतील याबद्दल ते बोलत होते. इतकेच नव्हे तर त्या काळात प्रसिद्ध झालेल्या गव्हर्नमेंट मॅनेजमेंट या एका नव्या पुस्तकाचा संदर्भही त्यांनी सांगितला. यशवंतरावांचे वाचन दांडगे होते आणि त्यांची आठवण फार चांगली होती. त्याच वेळी बोलताना त्यांनी मला बाबूराव यांच्या

कराडमधील भाषणाची आठवण करून दिली. यशवंतराव म्हणाले की, “बाबूरावांच्या भाषणात काँग्रेस ही संस्था नाही तर ती लोकांची चळवळ आहे.” हा विचार मी प्रथम ऐकला.

त्यानंतर यशवंतराव दिल्लीला गेले. ते परराष्ट्रमंत्री असताना युनायटेड नेशन्सचा समाजकल्याण सल्लागार म्हणून माझी निवड झाली. त्या वेळी त्यांचे आशीर्वाद घेण्याकरिता दिल्लीला जेव्हा भेट झाली त्या वेळी मी खोलीत गेल्याबरोबर माझ्या हातात दोन टपोरी फुले देऊन त्यांनी माझे अभिनंदन केले. अगदी लहानातल्या लहान कार्यकर्त्यांबाबत त्यांना वाटणारा जिव्हाळा आणि आपुलकी, यातून सामुदायिक सामर्थ्य कसे निर्माण होते याचे यशवंतराव हे उत्तम उदाहरण होते. “तू परदेशात सल्लागार म्हणून जातोस त्या वेळी तू ज्या कल्पना परदेशात सांगणार त्या कल्पनांचा अंमल भारतात होतो की नाही ? होत नसेल तर त्याबाबत तुझी नैतिक जबाबदारी काय ?” असा मोठा मार्मिक प्रश्न त्यांनी मला विचारला. “जगात कितीही मोठे काम करत राहिले तरी ज्या मातीत आपले पाय रोवले आहेत त्या मातीशी इमान राखून त्या मायभूमीचे पांग फेडण्यासाठी काहीना काही कार्य करण्याचे, भारतातील गरिबांच्यासाठी, मुलांसाठी तू सदैव करत राहावे तरच आंतरराष्ट्रीय कामाची सार्थकता होईल.” असे ते म्हणत.

जयंतराव टिळकांच्या सत्काराकरिता त्यांना एकदा बोलवावयाला गेलो त्या वेळी त्यांनी “अशी ही दिल्ली” म्हणून एक गोष्ट सांगितली. ती पुढे जयंतरावांच्या सत्कारातही त्यांनी सांगितली. ते म्हणाले, “दिल्लीचा एक नबाब राज्यावर होता. त्या वेळी त्यांचे कुत्रे आजारी पडले. तेव्हा त्या कुत्र्याचा समाचार घेण्याकरिता दिल्लीतल्या लोकांनी त्याच्या वाड्याबाहेर रांग लावली होती. पुढे राज्य गेले आणि नबाब स्वतः आजारी पडला तेव्हा त्याच्या समाचाराला त्याचे स्वतःचे कुत्रेसुद्धा आले नाही.” अशा तऱ्हेचे भेदक विश्लेषण ते सहजपणाने करून जात. त्यांच्या मरणापूर्वी सुमारे दोन महिने असतील, त्यांना भेटायला गेलो त्या वेळी त्या प्रचंड

रेसकोर्सवरच्या घरात वेणूताई वारल्यानंतर आलेले उदासपण गोठून राहिल्यासारखे वाटत होते. त्या मोठ्या दिवाणखान्यात साहेब आणि मी तास-सव्वातास बसलो. त्यांनी खूप सांगितले. पण त्या सांगण्यामागे कुठेतरी एक बोच आहे हे जाणवल्यावाचून राहिले नाही. झालेल्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेताना ते म्हणाले, “मी सदैव देशच प्रमुखस्थानी मानला. पुष्कळदा आपण रान पार करत असताना एखादी वाट आपली वाटते. पण एकदा का वळण चुकले की, पुन्हा मूळ वाटेला वनवासातून जावे लागते.” त्या उदास संध्याकाळी आम्ही जे जे बोलतो त्याचे टिपण करून त्यांना पाठवले आणि त्याचेच लेख नंतर छापले. पण अजूनही त्यांनी वापरलेला तो शब्दप्रयोग “एक वळण चुकले की” ते मनातून जात नाही. इतके मात्र खरे की, महाराष्ट्राच्या विकासाची इतकी धारदार दृष्टी असणारा, साऱ्या महाराष्ट्राला एकत्रित बांधण्याची शक्ती असणारा, असा एकच नेता आणि तो म्हणजे यशवंतराव चव्हाण !

## सुमतीबाई शहा
## यशवंतरावांचा संस्थेबद्दलचा जिव्हाळा

नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे महान नेते होते. यशवंतरावांनी शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वराज्य मिळविण्यापासून ते सुराज्य निर्मितीपर्यंत आपले आयुष्य देशाच्या उन्नतीसाठी चंदनासारखे झिजविले. यशवंतरावांच्या जीवनाचे पैलू पाहात असताना एक वैशिष्ट्य मनात भरते की, असामान्य व्यक्तिमत्त्व असलेला हा नेता सामान्यांच्या मनाशी सुसंवाद साधून काळाच्या आव्हानावर मात करून सामाजिक व राष्ट्रीय प्रगती घडवून आणणारा होता. राजकीय क्षेत्रात काम करता करता त्यांनी समतोलता राखली. शेतकऱ्यांच्या हातात देशाच्या प्रगतीचे चक्र सहजपणे येईल असा कायापालटही त्यांनी केला. महाराष्ट्र घडविला तो "दोन वसंतांनी व एका यशवंतानी" हे वाक्य यथार्थ आहे.

अशा या महान नेत्याच्या अंतःकरणात शैक्षणिक क्षेत्राबद्दल आदर होता, जिव्हाळा होता व शैक्षणिक संस्थाच देशाचे भवितव्य घडवतील हा दूरदृष्टिपणाही होता. म्हणूनच माझ्या या आश्रमावर त्यांनी जिवापाड प्रेम केले. महिलाकार्येच देशाला घडवू शकतील ही जाणीव त्यांनी सदोदित आपल्या अंतःकरणात ठेवून आमच्या आश्रमाबद्दल बोलताना ते म्हणत, "तुमचा आश्रम शिक्षणासोबत सुसंस्कार देत आहे आणि संस्कृतीचा वसा भावी पिढीला देत आहे. असा आश्रम, ही शैक्षणिक संस्था भारतात एकमेव आहे." यशवंतरावांनी या आश्रमाच्या कार्यातून बंधुभाव जतन केला व भाऊबीज म्हणून आर्थिक मदतीपेक्षा महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना संस्थेला भेट देण्याचा आदेश दिला.

प.पू. आचार्य श्री. एलाचार्य महाराजांच्या प्रवचनाला ते उपस्थित असतानाचा दिल्लीतील एक प्रसंग. तेव्हा ते संरक्षणमंत्री होते.

प्रवचनानंतर आम्ही त्यांच्याच मोटारीतून त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो. तेथे वसंतराव नाईक व वसंतरावदादा पाटील हे उपस्थित होते. यशवंतरावांनी त्यांना विचारले, "सुमतीबाईंचे संस्कार तुम्ही पाहिले का ? ते अवश्य पाहा." ही आज्ञा मिळताच वसंतराव नाईक यांनी ते मुख्यमंत्री असताना सोलापूर भेटीत आमच्या संस्थेला स्वतःहून खास भेट दिली. आणि हे कार्य पाहून मुख्यमंत्री निधीतून रु.११,०००/- (अकरा हजार) ची भाऊबीज ओवाळणी दिली. यशवंतरावांची कार्य करण्याची ही पद्धती अजोड होती. दूरदृष्टीपणा ठेवून अशा विधायक कार्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे हातभार लावणे हा त्यांच्या थोर मनाचा एक महान गुणधर्म होता. सौ. वेणूताई यांचाही आमच्याशी स्नेहसंबंध जवळचा होता. त्यांनी महाराष्ट्रावर पुत्रवत प्रेम केले. यशवंतरावांच्या यशामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहेच. एका थोर नेत्याची सहचारिणी म्हणून त्यांनी खचितच आपली भूमिका पार पाडलेली आहे.

कृष्णाकाठच्या मातीत वाढलेला एका शेतकरी कुटुंबातील बळवंतांचा हा यशवंत आंतरराष्ट्रीय पातळीवर कीर्ती मिळवू शकला तो अंगी असलेल्या निःस्वार्थी, निःस्पृह व जाज्वल्य देशप्रेमातून, त्यांची लढाऊ वृत्ती अन्यायावर मात करून प्रगतीचे नवे दालन निर्माण करणाऱ्या महान क्रांतिकारकाची होती. ही वृत्ती पाहून देशाचे महान पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी देशाचे हात बळकट करण्यासाठी त्यांची सेवा केंद्रीय मंत्रिमंडळात रुजू करण्याचे सांगितले आणि यशवंतरावांनी "सह्याद्री" प्रमाणे ताठ राहून हिमालयाच्या हाकेला साद घालीत संरक्षणमंत्र्याची भूमिका आपल्या अलौकिक कामगिरीतून यशस्वीपणे राबवून परकीयांचे आक्रमण परतवून लावले. अशा या महान भारतपुत्राला माझी श्रद्धांजली!

## श्रीमती अनुताई वाघ
## यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस वंदन

श्री. यशवंतरावजी म्हणजे महाराष्ट्राचे शिल्पकार. भारतामध्ये महाराष्ट्राची शान उंचावण्यामध्ये त्यांचाच सिंहाचा वाटा आहे. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी पुढे आणले. अनेक योजनांना चालना दिली. महाराष्ट्राची यशोदुदुंभी अटकेपार गरजली.

१९४५ पासून मी बोर्डी येथे काही सामाजिक कामास सुरुवात केली. प्रसंगाप्रसंगाने त्यांच्या व आमच्या भेटीगाठी होत असत. या जरी थोडक्या असल्या तरी कायम स्मृतिपटलावर राहिल्या आहेत. पत्रव्यवहाराने पुष्कळच भेटी झाल्या आहेत. विचारविनिमय झाला आहे. कारण आमच्या संस्थेच्या प्रयोगाचा शुभारंभ होता त्या वेळी श्री. यशवंतरावजींसारख्या समर्थ व अधिकारी व्यक्तीचा पाठिंबा अवश्य होता. त्यांनी आमच्या कामाला भरपूर पाठिंबा दिला. प्रोत्साहन दिले. मार्ग दाखविले त्यासाठी आमची ग्राम-बाल-शिक्षा-केंद्र ही संस्था, पू. ताराबाई मोडकांसह सर्व सहकारी, मी स्वतः साहेबांचे आजन्म ऋणी आहोत.

काही विशेष व्यक्तिगत आठवणी सांगाव्याशा वाटतात त्या अशा -

पुणे येथील शासकीय मुलींच्या ट्रेनिंग कॉलेजची मी विद्यार्थिनी. संस्थेच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त काही माजी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. सन मला नक्की आठवत नाही. मी एक सत्कारार्थी होते.

समारंभ पुण्यालाच झाला. साहेबांनी माझ्या पाठीवर शाल घातली. मला खूप आनंद झाला.

सध्या मला वारंवार शाली मिळत आहेत. पण माझ्या नित्य उपयोगात साहेबांच्या हातून मला सर्वप्रथम मिळालेली शाल आहे. ती आता जुनी झाली आहे. मंडळी सांगतात, "इतक्या नव्या शाली आहेत. आता ही

बाजूला ठेवा ना ?" मी स्पष्ट नकार देते. ही शाल म्हणजे प्रथम मिळालेला मान. साहेबांची स्मृती.

१९६२ साली पू. ताईंना पद्मभूषण किताब मिळाला. त्यांना ७१ वे वर्ष चालू होते. सर्वांनी मिळून त्यांच्या कामाला आर्थिक चणचण पडू नये यासाठी एक लाख रु. गोळा केले होते. ती थैली अर्पण करण्याचा समारंभ मुंबई येथे चर्नीरोड चौपाटीवर आयोजित केला होता. साहेबांच्या हस्ते ताईंना श्रीफळ, शाल व थैली अर्पण करण्यात आली.

सभेसाठी प्रचंड लोकसमुदाय उपस्थित होता. वेळ संध्याकाळची, हळूहळू अंधार पडत जाणारच होता. व्यासपीठावर साहेब, पू. ताराबाई मोडक, श्रीमती सरलादेवी साराभाई व अन्य मान्यवर व्यक्ती होत्या. ईशस्तवन, स्वागतानंतर, सर्व प्रशिक्षणार्थी बंधुभगिनींनी साहेबांना मानवंदना दिली. पू. ताईंचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांच्या भाषणानंतर साहेबांचे ओघवते मार्गदर्शक, व परखड भाषेतील सुमारे पाऊण तास व्याख्यान झाले. सभा स्तब्ध आणि मुग्ध होऊन ऐकत होती. खालच्या थरापर्यंत शिक्षण पोचविणे आवश्यक आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे, या दोन गोष्टींवर त्यांच्या व्याख्यानाचा भर होता. सर्व शिक्षकशिक्षिकांचे त्यांनी मनःपूर्वक कौतुक केले.

ही अपूर्व सभा आज ३७ वर्षांनंतरही जशीच्या तशीच डोळ्यासमोर येत आहे.

बोर्डीला सागराच्या स्वच्छ आणि शांत मैदानावर अशीच एक प्रचंड सभा भरली होती. सर्वोदय संमेलन होते. सन मला आठवत नाही, ही एक मोठीच उणीव आहे. सभेचे आयोजन पूज्य श्री. भिसे गुरुजींनी केले होते, तेव्हा तेथील टापटीप, सुशोभन व व्यवस्था याविषयी काही बोलायलाच नको.

मुख्य वक्ते साहेबच होते.

स्वातंत्र्यानंतर तेवढ्याच जिद्दीने, निःस्वार्थी वृत्तीने सुतंत्र करण्यासाठी आपण कटिबद्ध राहिले पाहजे. ही गोष्ट त्यांनी आवर्जून सांगितली. जोमदार भाषेच्या प्रभावाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. ही सभाही सायंकाळीच झाली होती.

बोर्डीहून आम्ही कोसबाडला आलो. पू. ताईंच्या सर्वच कामाचे साहेबांना कौतुक होते. वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांनी नवे काम सुरू केले, या तरुणास लाजवणाऱ्या त्यांच्या धडाडीबद्दल त्यांना अभिमान वाटत असे.

आणि म्हणूनच एका वार्षिक समारंभाच्या निमित्ताने कोसबाडला येण्याचे आमंत्रण त्यांनी अगदी आनंदाने स्वीकारले. त्यांना वेळ थोडा होता. म्हणून एका दृष्टिक्षेपात संस्थेचे सर्व विभाग दाखवता यावे, अशी रचना करण्यात आम्ही आमचे कौशल्य पणाला लावले होते. त्याचे त्यांना खूप कौतुक वाटले. आदिवासी भागात शिक्षणाचे लोण पोचविण्याचे पवित्र काम हाती घेतल्याबद्दल त्यांनी ताईंची पाठ थोपटली. अर्थात आम्हा कार्यकर्त्यांनाही ती शाबासकीच होती.

कामानिमित्त पू. ताईंच्याबरोबर साहेबांच्या घरी भेटीला जाण्याचे एकदोन प्रसंग आठवतात. अत्यंत प्रेमाने स्वागत होई. सौ. वेणूताई हसतमुखाने सामोऱ्या येत. एखाद्या मुख्यमंत्र्याच्या अगर संरक्षणमंत्र्याच्या घरी आपण आलो आहोत, असे मुळीच वाटत नसे. प्रेमळ पाठीराख्या मित्राच्या घरी आलो आहोत, अशीच मनोमन छाप पडत असे. हे प्रसन्न, प्रेमळ, सुखी घर बघून आनंद वाटत असे.

साहेब महाराष्ट्रातून दिल्लीला गेले. भारताच्या संरक्षणाची महत्त्वपूर्ण धुरा उचलली. उपपंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळली. त्यांचे कर्तृत्व, त्यांची धिमी पण विचारपूर्वक पडणारी पावले, त्यांचे प्रभावशाली वक्तृत्व सर्वांचीच वर्तमानपत्र, रेडियोव्दारा भेट होत असे. आनंद वाटायचा.

त्यांच्या स्मृतीस वंदन.

# बॅ. पी. जी. पाटील
# प्रभावी वक्ते यशवंतराव

कराड येथे विद्यार्थीदशेपासून त्यांनी आपली वक्तृत्व कला विकसित केली. कुमार वयात पुणे येथे वक्तृत्वकलेतील प्रशंसनीय केळकर पारितोषिक त्यांनी मिळविले होते. जाहीर सभांना उपस्थित राहून ते भाषणांच्या टिपण्या लिहून घेत. खोलवर केलेले चिंतन आणि खडतर सराव याचा त्यांना खूप फायदा झाला.

त्यांची भाषणे संक्षिप्त, मुद्याला धरुन, परिणामकारक आणि प्रसंग डोळ्यापुढे उभी करणारी असत. विषयांवर त्यांचे प्रभुत्व असे. तसेच अस्खलित भाषण करण्याची त्यांची शैलीही प्रभावी होती. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठात डिसेंबर १९७४ मध्ये अनावरण करताना ते म्हणाले, "शिवाजीमहाराजांनी अनेक डोंगरी किल्ले बांधले, परंतु यापेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांनी निष्टावन्त अनुयायांचे पथक निर्माण केले. प्रत्येक अनुयायी म्हणजे मजबूत, अभेद्य आणि त्यामुळेच बलाढ्य औरंगजेबाविरुद्ध वीस वर्षे ते लढू शकले."

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सचिवालयातील समारंभात पहिले सार्वजनिक भाषण करताना ते म्हणाले, "काही लोक नवे राज्य मराठी राज्य असेल की मराठा राज्य असेल ? अशी नाहक चिंता व्यक्त करीत आहेत. त्यांच्यासाठी मी निःसंदिग्धपणे असे जाहीर करु इच्छितो की, हे मराठी राज्य असेल." त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी एका जाहीर सभेत ते म्हणाले, "अमुक एका गुरुकडून मी माझे धडे घेतले असे मी सांगू शकत नाही. गांधीजी, पंडितजी, एम्. एन्. रॉय आणि राजकारणातील माझ्या कनिष्ठ सहकाऱ्यांकडूनही मी अनेक गोष्टी शिकलो. शिकण्याची ही अखंड प्रक्रिया असते." ते पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी

स्थापना केलेल्या रयत शिक्षण संस्था सातारा या संस्थेचे २४ वर्षे अध्यक्ष होते. ते दरवर्षी ८ मे रोजी कर्मवीरांच्या पुण्यतिथीला धार्मिक निष्ठेने उपस्थित राहात. कर्मवीरांच्या कार्याचा आढावा घेताना ते म्हणत, "अण्णांनी ग्रामीण भागात शेकडो शाळा-कॉलेजे सुरु केली. ही खरोखर मोठी कामगिरी आहे यात संशय नाही. परंतु त्यांनी सामुदायिक शिक्षणाची मोठी चळवळ सुरु केली ही गोष्ट आपण विसरता कामा नये. परंतु कर्मवीरांच्या शाळा आणि महाविद्यालये महाराष्ट्रात सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतर घडवून आणणाऱ्या खऱ्याखुऱ्या प्रयोगशाळा आहेत. त्यांचे अनुयायी या उच्च ध्येयाने प्रेरित झालेले प्रचारक आहेत."

परंतु श्री. भाऊसाहेब खांडेकर यांचे त्यांच्या ७५ व्या वाढदिवशी अभिनंदन करण्यासाठी कोल्हापुरातील खासबागेत आयोजित केलेल्या समारंभप्रसंगी यशवंतरावांनी जे वक्तृत्वपूर्ण भाषण केले त्याची आम्हास खास करून आजही आठवण होते. त्या दिवशी संध्याकाळी तेथे प्रचंड जनसमुदाय जमला होता. यशवंतरावांनी शेवटी भाषण केले. कोल्हापूर येथे महाविद्यालयात असताना आपण खांडेकरांचे चाहते कसे झालो हे त्यांनी सविस्तरपणे सांगितले. खांडेकरांच्या कादंबरीतील अनेक प्रसंग वर्णन करून त्यांनी त्यातील काही प्रसंगांचे यथायोग्य मूल्यमापन केले. एकदा पावसाळ्यात संध्याकाळच्या वेळी अंधुक प्रकाशात आपण खांडेकराची एक नवी कादंबरी कशी वाचली याचा किस्सा त्यांनी सांगितला. त्या कादंबरीच्या कातडी बांधणीचा मधुर वास अजुनही आपल्या नाकात घुमत असल्याचे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट भाषणाचा तो एक नमुना होता आणि त्याबद्दल मराठीच्या प्राध्यापकांनीही " शाबास, यशवंतराव" असे उद्गार काढले.

ते केवळ प्रभावी वक्ते, होते असे नव्हे तर एक बुध्दिवान संसदपटूही होते. लोकसभेत वित्तआयोगाच्या अहवालांची त्यांनी केलेल्या प्रशंसेमुळे श्रीमती इंदिरा गांधी अतिशय खूष झाल्या आणि त्यांनी खाजगी

टिप्पणीद्वारे आपली त्या अहवालाला मान्यता असल्याचे कळविले असे समजते.

राजकारणी लोक हे सामान्यतः साहित्यिक नसतात. आपल्या देशात विद्वान राजकारण्यांचे दिवस संपले आहेत. बर्क, पिट, चर्चिल, क्रिप्स किंवा बेव्हन यांच्यासारखे विद्वान राजकारणी आज आपणाला भारतात कोठे आढळतील ?. नेहरु, राधाकृष्णन, सप्रू, शास्त्री, जयकर यांची जागा कोण घेणार ? यशवंतरावांचे वाचन दांडगे होते. ते सुंदर मराठी लिहित. त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला भाग. "कृष्णाकाठ" हा वरवर जरी चाळला तरी आपणास माझ्या म्हणण्याची प्रचीती येईल. त्यांना मराठी गद्याची फार आवड होती. त्यांची भाषाशैली प्रसन्न, निर्मळ, प्रासादिक, स्पष्ट, ओघवती आणि ओजस्वी होती. ती माणसाच्या हृदयाला जाऊन भिडे. आपल्या आईने दारुण दारिद्र्याशी दिलेल्या झुंजीचे रेखीव वर्णन, प्रतिकूल परिस्थितीशी त्यांनी केलेला मुकाबला, त्यांच्या संस्कारक्षम तरुण मनावर उमटलेला खोल ठसा आणि आपल्या तुरुंगातील जीवनाचे तितकेच रोमहर्षक वर्णन ही सर्व आपल्या मनाची आणि हृदयाची पकड घेतात. आपले आईवडील, भाऊ, तरुण स्वातंत्र्य सैनिक यांची जिवन्त शब्दचित्रे सुरेख आहेत. त्यांची वीर सावरकरांबरोबरची रत्नागिरी येथील पहिली भेट आणि तेथील सागराचे त्यांना घडलेले प्रथम दर्शन ह्या त्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना होत्या. त्यांचे आत्मचरित्र कादंबरीइतके हृद्य आहे. बाकीचे दोन भाग पूर्ण होऊ शकले नाहीत हे दुर्दैव होय, कारण काळाने त्यांच्यावर अचानक झडप घातली. "ऋणानुबंध" मधील परिच्छेदात एक विशेष लय आणि सौंदर्य आहे. या बाबतीत यशवंतरावांनी रशियाला टॉलस्टॉयच्या घराला दिलेल्या भेटीचा उल्लेख करता येईल. त्या प्रसंगी यशवंतरावांनी आपल्या भावनांचे जे चित्रण केले आहे ते अप्रतिम आहे. हे वर्णन अलंकारिक भाषेने नटलेले आहे. या परिच्छेदातील भारुन टाकणारे सौंदर्य माधुरी आणि लय ही अव्वल दर्जाची आहे. कोणी अशी कल्पना करील की जर यशवंतराव राजकारणी

झाले नसते तर ते मराठीतील एक महान शैलीदार लेखक झाले असते. परंतु तसे होणार नव्हते.

त्यांना चांगल्या मराठी आणि इंग्रजी पुस्तकांची आवड होती आणि परदेश दौऱ्यावर असताना भरगच्च कार्यक्रमातून वेळात वेळ काढून ते इंग्लंड व अमेरिकेतील प्रसिद्ध पुस्तकांच्या दुकानांना भेटी देत. त्यांचे पुस्तकांनी भरलेले ग्रंथालय हे याचा पुरावा आहे. ते संगीताचे भोक्ते होते. तसेच अनेक प्रसिद्ध मराठी आणि इंग्रजी नाटकांच्या प्रयोगाला ते आवर्जून हजर राहात. मराठी काव्यातील अनेक काव्यपंक्ती त्यांना मुखोद्गत होत्या. औरंगाबाद येथे मुक्कामास असताना मराठीतील प्रसिद्ध कवी. श्री. ना. धों. महानोर यांच्यासह ते पहाटेपर्यंत बैठकीत बसून होते आणि त्या वेळी ग्रामीण जीवनावरील त्यांच्या अनेक कविता त्यांनी म्हणून दाखवून उपस्थितांना आश्चर्यचकित केले !

## टी. जी. देशमुख
## यशवंतराव, जाण्याची अशी
## उगाच का घाई केली ?

यशवंतराव आपण आताशा गळून गेला होता, वेणूताई गेल्यापासून जग जणू रितं झालं होतं तुम्हाला ! "ते खायला येण्यापूर्वी मी त्या विराटरुपात आपणहून जाईन, असे तुम्ही पुटपुटला", तेव्हा ते यशवंतराव नव्हते, असं मला वाटू लागलं !

दिल्लीत आलं म्हणजे आता कोणाजवळ अडचण सांगून टाकावी ? दुःख सांगून हलके व्हावे ? तुम्हाला गाणे ऐकण्याचा शौक होता म्हणे. आम्ही तर आपले रडगाणे ऐकविण्यासाठी येत असू ! आता दिल्लीच नाही तर दिल्लीचं तख्त पण तुम्ही नसल्यानं रितं वाटू लागलं आहे ! परवाच तेथे गेलो, केवळ दोन – तीन तासांसाठी.. काँग्रेस श्रेष्ठींच्या कानावर टाकावे व परत यावे म्हणून ! बोलणं झालं, टॅक्सीला तडक वन रेस कोर्सवर चालविले. रात्रीची कडाक्याची थंडी होती. खूपच दाट धुक पडलं होतं.. "यशवंतराव चव्हाण" अशी चक्क पाटी वाचली. "अब साहाब यहाँ नही है." ! साहेब कोणी असले नसले तरी इथंच राहायचे. "शान असो, मान असो वा अवमान असो.." "या टी. जी.. आता काय घेऊन आलात ?" असा हसत स्वागताचा उच्चार व्हायचा ! आम्ही त्यांना एखाद्या आजोबासारखे समजून केवढे अडचणीचे प्रश्न विचारायचो.. राजकारणातला धुरंधर, साहित्यातला थोर पुरुष, चतुर शहाणे नेतृत्व आमच्यासमोर उभे आहे, हे आमच्या गावी नसायचे !

यशवंतराव इंदिरा काँग्रेसमध्ये आले अन् उंबरठ्यावर तिष्ठत बसले, असे म्हणतात. "म्हणू देत तुमच्यासारखे निष्ठावान" पण म्हणतात. या देहातले रक्त जवाहरलाल नेहरुंचे आहे. वाजपेयींच्या शेजारी बसून त्या रक्ताच्या विरोधात कसा जाऊ ? माझ्या विरोधात बोलणारे आजचे उद्या

माझ्याबरोबर येतील. "उद्या मला ठाऊक आहे म्हणून तर या राष्ट्रीय प्रवाहात ३५ आमदारांसह मी स्वतःस झोकून दिले आहे. उंबरठ्यावर उभा आहे म्हणता ना मी, तर राष्ट्रीय देवालयाच्या पायरीवर उभा राहण्यासाठी आलो.."

चोखोबाच्या पायरीची पूजा होते, आजूबाजूच्या कळसांची नव्हे तेथे कोणाचा हातही पोहोचत नसतो. येथे सर्वांचे पाय उभे राहतात ! ३५ आमदारांसह राष्ट्रीय सेनेत सामील होणारे कसलीही अपेक्षा नसणारे, "निष्ठावान" नाहीत का ? हरदिनी आपले कसे होईल याची चिंता ठेवणारे तेवढे निष्ठावान का ? अन्य वर्णन तुम्ही केलेच आहे. निष्ठावान पुढाऱ्यांनीच निष्ठावान कार्यकर्ते निवडले नाही, असे तुम्हीच म्हटले आहे. मग सोयीच्या राजकारणांचे डाग इतरांना का लावता ?"

यशवंतराव, वसंतराव नाईकांनी शेतकी विद्यापीठ आमच्या विदर्भात देण्याचे नाकारले आहे. अमरावतीत तरुण शेतकऱ्यांची मुले पोलिसांच्या गोळ्यांना मृत्युमुखी पडली.. शासन बदनाम झाले आहे. मी रस्त्यावर जाऊन विरोध करणार आहे. नागपूर विद्यापीठात शहीद झालेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहणारा ठराव मी मांडला तो एकमताने संमत झाला. विदर्भाचे राज्यच आम्ही मागत होते ते उगीच नाही. आज दहा खासदार.. आम्ही एकत्रित येऊन कृषी विद्यापीठ विदर्भात झाले पाहिजे असे निवेदन देणार आहोत. आम्हाला ठाऊक आहे तुम्ही काही एक शब्द बोलणार नाही !

"टी. जी. रागात असले म्हणजे तुमच्या वाणीला बहर येतो. पण इतरांना बोलण्याची संधी द्याल की नाही ?.."

"तुम्ही हेच म्हणणार ना की, काँग्रेसची शिस्त पाळली पाहिजे अन् महाराष्ट्राची महान परंपरा जपली पाहिजे.."

"टी. जी. जरा दम खा. माझं उत्तर तुम्ही देऊ नका. विदर्भात कृषी विद्यापीठ झाले पाहिजे असे तुम्ही निवेदन काढणार आहात ना मग त्याचे शेवटी लिहा, यशवंतराव चव्हाणांचा आम्हांला पाठिंबा आहे." हे ऐकताच

आमचे अंतःकरण भरुन आले. आम्ही गोंधळलो. लगेच निवेदनाचे शेवटी ओळ टाकली. “आमच्या या मागणीस अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांचा आशीर्वाद आहे.” त्यांनी ते पाहिले, लगेच म्हणाले, “अच्छा नमस्कार !”

यशवंतराव, तुमचे भाषण आज पार्लमेंटमध्ये ऐकले. इंदिरा गांधींच्या डोळ्यांच्या कडा भिजल्या होत्या. खूपच छान बोललात.”

“काय टी. जी. ? केव्हा आलात ? माझे भाषण ऐकले किंवा वाचले तरी तुम्ही असे काहीतरी बोलताच, नाहीतरी लिहिण्याची खोडच आहे तुम्हाला !”

“अगदी खरे सांगतो... मला निंदा करण्याची खोड आहे. प्रशंसा सहसा करण्याची नाही.”

“तुम्ही खरे बोलत नाही असे मी कधी म्हणायचो नाही. बघा इंदिराजींनीही भाषणाने “मी कशी मूव्ह झाले” हे यात लिहिले आहे. विश्वनेताही त्यांच्या भाषणाने हादरुन जातो ते वाचून मला तेव्हा खूप अभिमान वाटला.

परवा आमचे हेलिकॉप्टर कृष्णाकाठी लहानपणी प्रारंभ करून तिथेच विसावा घेणाऱ्या यशवंतरावांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी .. भरधाव पळत होते. रसिकभाई म्हणाले, “यशवंतरावांच्या तुम्ही एवढ्या आठवणी सांगता. ओठावर आलेली आठवण सांगा बघू ? साळवे, गायकवाड, किंमतकर, तिडके हे कान टवकारून बघू लागले.

“अशीच आमची बैठक संपली होती. उगाच रेंगाळत आमचा जथ्था बसला होता. कविवर्य माडगूळकर होते. त्यांना नुकतीच तयार केलेली लावणी म्हणण्यासाठी वैराळेंनी हट्ट धरला. यशवंतरावांनी आग्रह केला. गारुड्याने नागाला डोलविले नसेल तेवढे आम्ही मंत्रमुग्ध झालो. श्रृंगाराची लज्जत तर होतीच पण त्यांच्या काव्यातले सारे लावण्य जणू मूर्तिमंत अंगप्रत्यंगात सळसळून गेले. यशवंतरावांनी कविवर्यांच्या समोरचा माईक घेतला व म्हणाले, “असली लावणी पूर्वीच्या राजाने ऐकली असती तर या थोर शाहिराच्या पायात सोन्याचा तोडा आपल्या

हातांनी घातला असता !" रसिकभाई, त्या वेळी यशवंतराव हे या महाराष्ट्राचे अनभिषिक्त राजाच होते !

पार्थिव चितेकडे जात होते. कृष्णाकाठावर प्रथमच जनसागराच्या एकापेक्षा एक मोठ्या लाटा उसळत होत्या. सर्वत्र हुंदक्यांचा आवाज घुमत होता. लोकमान्यांच्या निधनानंतर असाच जनसागर उसळल्याचे आम्ही वाचले होते.

लोकमान्य टिळक जसे स्वातंत्र्यपूर्व काळात असंतोषाचे जनक होते तसेच यशवंतराव स्वातंत्र्योत्तर काळामधले संतोषाचे, प्रसन्नतेचे स्थिरस्थावरतेच्या क्षात्रतेजाचे जनक होते. जेव्हा राष्ट्र मरगळते तेव्हा पंडित नेहरुंनी महाराष्ट्राच्या म्यानातून चिनी सैन्याशी मुकाबला करण्यासाठी समशेर बाहेर उपसली होती या "समशेरी" चे नाव होते "यशवंतराव चव्हाण !" कृतान्ताने ही समशेर म्यान करून कृष्णाकाठावर आज टाकली होती.

यशवंतराव इंदिराला तुम्ही आपली बहीण मानत होता. त्यांची हत्या होताच तुम्ही केवढे हळहळला ! आम्ही पाहिले त्या तेजोगोलाच्या क्षात्रतेजाचा हा अंश आपणाला जपायचा आहे यात राष्ट्राची आशा आहे. भविष्य आहे. सर्वस्व आहे तो आपल्या मातेच्या रक्तांकित धगधगत्या होमकुंडाकडे जात आहे – सत्तास्थानाकडे नव्हे.

आपणास त्याला जोपासायचे आहे. टी.जी विदर्भ तुम्ही उभा करा, लहान मोठी शक्ती कामाला लावा, असे म्हणतात.

तर मग यशवंतराव आपण एवढी जाण्याची घाई का केली ? धकाधकीच्या संकटकाळात तुम्ही नेहमीच सह्याद्रीच्या वज्राप्रमाणे दिमाखाने उभे राहिलात, अन् आता आपल्या भाच्याला – राजीव गांधीला एकटेच सोडून ही घाई करणे तुम्हाला शोभले काय ?

जाताना थोडे तर विचारायचे असते, बोलायचे असते ? पंडित नेहरुंनी "संरक्षणमंत्र्यांची वस्त्रे तुम्हाला सांभाळायची आहेत, उद्या दिल्लीत येऊ

शकाल का ?" असे विचारले असता आपण म्हणालात, "थोडा वेळ द्या, मला विचारु तर द्या."

"तुम्हाला कोण आहे तेथे की, त्याची परवानगी घ्यावी लागणार आहे" तुमचे उत्तर ऐकून पंडित नेहरु गदागदा हसले. तुम्ही उत्तर दिले होते की, "माझ्या सौभाग्यवती वेणूला !"

यशवंतराव, तुम्ही जाण्याची घाई केली.. कारण तुम्हाला आता विचारणारे कोणी उरले नव्हते ना ! घाई केली कारण कोणाला तुम्हाला ना पुसायचे होते, ना विचारावयाचे होते ! खरं ना ?

## विनायकराव पाटील
## यशवंतरावांचे बोलणे

साहेबांची भाषणे मी ते मुख्यमंत्री असल्यापासून ऐकत आलो आहे. पाचपन्नास मैलांच्या परिसरात कोठेही भाषण असले तरी मी हजर राहात आलो आहे. चांगले शब्द कानावरून जात. चांगले शब्द मला नेहमीच आकर्षित करीत आले आहेत. साहेब हे शब्दांचे जादूगार. त्यांनी केलेली भाषणे लक्षात राहात, व प्रयत्नपूर्वक मी ती ध्यानात ठेवीतही असे. ज्या ज्या वेळी मित्रमंडळी जमत असत त्या त्या वेळी त्यांच्या हावभावांची व उच्चारांची नक्कल मी करून दाखवी. त्याची पावती मित्रांकडून मिळत गेली. पुढे पुढे सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते 'साहेबांची नक्कल करून दाखव' म्हणून कोठेही आग्रह करू लागले तर नक्कल हुबेहूब होते असे ते म्हणत असत, व मी सुखावत असे! त्याच त्या वाक्यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून नवीन वाक्यांच्या शोधात त्यांची भाषणे आवाजाच्या चढउतारांसह व लकबींसह मी तल्लीनतेने ऐकू लागलो. नंतर नक्कल हमखास होई. कार्यकर्ते, मित्र व मलाही प्रसिद्धी ! संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या वेळी त्यांच्या भाषणाला प्रचंड गर्दी जमत असे. आजतागायत त्यात खंड नाही. त्या माणसाने बोलावे आणि लोकांनी ते आवडीने ऐकावे. त्या प्रचंड गर्दीतील एक श्रोता एवढीच माझी भूमिका.

सुरुवातीच्या चार-पाच वाक्यांतच श्रोत्यांना ताब्यात घेणारा हा जबरदस्त वक्ता आहे. करंजवणे धरणाच्या पायाभरणीचा समारंभ मला आठवतो. पायाभरणीनंतर भाषण होते. त्याच जागेवर धरणग्रस्तांपुढे आपले सर्वस्व पाण्यात बुडवून उठणाऱ्या ग्रामस्थांपुढे ! प्रसंग बाका होता. धरणग्रस्त प्रचंड संख्येने जमले होते. निषेधाच्या घोषणेपासून तो दंगलीपर्यंत काहीही घडणे शक्य होते.

साहेबांनी सुरुवात केली, “पिढ्यान् पिढ्या आपण राहात असलेली गावे सोडून जात असताना आपली कुलदैवते, वास्तू, आपण लावलेली झाडे, त्याभोवतालच्या वातावरणात रमलेले आपले मन काय म्हणत असेल? याचा विचार केला की, मन कष्टी होते. आपल्याला नवीन जागा मिळतील, जमिनी मिळतील, घरांची भरपाई मिळेल, परंतु पिढ्यान् पिढ्यांच्या सहवासानंतर होणार दुरावा मोठा बेचैन करणारा असतो.” वातावरण भावविवश झाले. म्हाताऱ्या कोताऱ्या शेतकऱ्यांनी उपकरण्यांनी डोळे पुसले. साहेब बोलत होते. स्वतःचाच गाव सोडून, आपल्यालाच दुसरीकडे जाण्याची वेळ यावी या संवेदनेतून ते बोलत होते. त्यात ते धरणग्रस्तांच्या दुःखात सहभागी झाले होते. पण नकळत त्यांना आश्वासनही देत होते की, “तुम्हाला आम्ही नवीन घर देणार आहोत, नवीन शेतजमीन देणार आहोत, तुमचे पुनर्वसन करणे ही आमची जबाबदारी आहे व ती पुरी होईलच. कुणी राज्यकर्ता आपल्यावर आश्वासनांची खैरात करतो. असे न वाटता हा माझाच कुणीतरी सांत्वन करतोय असे शेतकऱ्यांना वाटत होते. सभेत गोंधळ करण्याच्या तयारीने आलेले लोक या माणसाच्या राज्यात आपले वाईट होणार नाही या आत्मविश्वासाने परत गेले होते!

प्रसंगानुरूप आणि औचित्यपूर्ण हे त्यांच्या भाषणातील वैशिष्ट्य मला नेहमीच जाणवले आहे. त्यांची पाच मिनिटांत संपणाऱ्या भाषणापासून ते तासभरापर्यंतची भाषणे मी ऐकली आहेत. साहेबांचा आवाज आर्जवी आहे. सातारच्या मातीतून आलेले काही आघात सोडले तर पुणेरी उच्चारात साहेब बोलतात. हो, बोलतात हेच खरे. कारण त्यांचे भाषण हे भाषणापेक्षाही हितगूजच वाटते. त्यांच्या गेल्या अनेक वर्षांच्या व्याख्यानांचा परिणाम म्हणून त्यांच्यासारखेच बोलण्याचा अनेक कार्यकर्ते प्रयत्न करू लागलेत. नेहमी ऐकणाऱ्यांच्या हे लक्षात येत असे. अशाच एका वक्त्याच्या भाषणानंतर, “काय कसे काय झाले भाषण?” या खाजगीतल्या प्रश्नाला “गायकीत घराणी तशी भाषणात असती तर आपण

चव्हाण घराण्यात बोलतात!” या उत्तराने मी त्यांचा राग ओढवून घेतला होता. त्यांच्या शैलीचा स्वतःचे घराणे निर्माण करण्याइतका महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांवर परिणाम झाला आहे.

एक प्रसंग मला आठवतो. ते मुंबईस आहेत असे समजल्याने मी भेटीसाठी गेलो. ते बाहेर पडण्याच्या तयारीत होते. मी नमस्कार करून बाजूला उभा राहिलो. त्यांनी चला म्हटल्यावर गाडीत बसलो. नंतर मला समजले की, पुणे जिल्ह्यात तळेगाव येथे कार्यक्रम हे. मी मनात म्हणालो, “चला, तीन तास हक्काचे मिळाले.” प्रवासात मी त्यांना व्हिएटनाम युद्धावर लिहिल्या गेलेल्या दोन हिंदी कविता व काही शेर सांगितले. तळेगावला पोहोचल्यावर सभा सुरू झाली. भाषणात संदर्भ देतांना त्यांनी प्रवासात ऐकलेल्या अमीर खुश्रूच्या काव्यपंक्ती -

“एक कडी तो जंजीर नही
एक नुक्ता तो तसबीर नहीं
तकदीर कौमोंकी होती है
एक शख्सकी तकदीर
तो तकदीर नही’
“एक कडी तो जंजीर नही
एक नुक्ता तो तसबीर नहीं
तकदीर कौमोंकी होती है
एक शख्सकी तकदीर
तो तकदीर नही”

या जशाच्या तशा म्हणून दाखवल्या. एकदा सहज ऐकल्यावर काव्यपंक्ती लक्षात ठेवणाऱ्या या त्यांच्या स्मरणशक्तीला मी मनातल्या मनात सलाम करतो!

त्यांच्या संभाषणचातुर्याचा आणखी एक प्रसंग आठवतो. गोहत्ती येथील काँग्रेस अधिवेशनात त्यांनी काही लोकांना रात्री त्यांच्या बंगल्यावर जेवायला बोलावले होते. सोबत श्री. वसंतराव नाईक, काश्मीरचे त्या

वेळचे मंत्री ठाकूर रणधीरसिंग आणि कलकत्त्याचे एक व्यापारी होते. ते व्यापारी शाकाहारी आहेत हे जेवायला बसल्यावर समजले. साहजिकच ऐनवेळी थोडी धावपळ झाली. जेवणाचे टेबल लावले गेले. जेवताना ते व्यापारी म्हणाले, “जगातील सर्व शक्तिमान प्राणी शाकाहारी आहेत,” साहेबांनी पुष्टी जोडली, “होय, जगातील सर्व उपयुक्त प्राणी शाकाहारी आहेत.” टेबलावर हशा पिकला. व्यापारी पुन्हा म्हणाले, “हे सर्व प्राणी शक्तिमान आहेत. कारण ते शाकाहारी आहेत.” साहेब म्हणाले, “ आणि म्हणूनच त्यांच्यावर स्वार होणे सोपे आहे.” बोलण्याच्या ओघात कोठेही त्या शाकाहारी माणसाला न दुखवता साहेबांनी आपला मुद्दा सोडला नाही. क्षणाचाही विलंब न लावता ते उत्तर देत होते. बोलताना आणि ऐकताना त्यांचा चेहरा बोलका होत होता. आपण उच्चारलेल्या प्रत्येक शब्दागणिक त्यांच्या चेहऱ्यावर प्रतिक्रिया व्यक्त होत असत! सहमत असल्याचा, नसल्याच्या, रागाच्या, आनंदाच्या नि मिस्किलपणाच्या! म्हणूनच हा माणूस फार मोठा वाटतो नि तो तसा होताही!

## मोहन धारिया
## यशवंतरावजी

राजकीय क्षेत्रात नेतृत्व गाजवणाऱ्या व्यक्तींचे राजकीय दर्शन त्या व्यक्तीचे आचार, विचार, विविध प्रकरणांत घेतलेले निर्णय आणि कृती तसेच सहकारी, कार्यकर्ते व सर्वसामान्याबरोबर वागण्याची पद्धत यामधून नेहमी होत असते. वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन आदी माध्यमांच्या द्वारा ती व्यक्ती समाजासमोर जाते आणि जनमानसात या व्यक्तीची विशिष्ट प्रतिमा तयार होते. यशवंतरावजी त्याला अपवाद नव्हते. मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांचे नाव गेले आणि चीनच्या आक्रमणानंतर यशवंतरावजी संरक्षणमंत्री झाले तेव्हापासून त्यांच्या कीर्तीचा सुगंध सर्व देशभर दरवळण्यास सुरुवात झाली. अशा प्रकारे जनतेसमोर जाणारी प्रतिमा मोठ्या प्रमाणात बरोबर असली तरी त्या अर्थाने ते बाह्य दर्शनच असते. निकटच्या परिचयातून एखाद्या व्यक्तीचे अंतर्बाह्य स्वरूप आपल्याला समजू शकते. खूप काळ तुरूंगामध्ये असलो तर एखाद्या व्यक्तीचे जे खरे स्वरूप आपण पाहू शकतो तसे दर्शन कित्येक वर्षांच्या बाहेरील सान्निध्यात राहूनही मिळू शकत नाही. यशवंतरावजींबरोबर तुरूंगात एकत्र राहण्याचा योग कधी आला नाही, परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा सरचिटणीस, खासदार व मध्यवर्ती शासनातील मंत्री म्हणून खूप काळ त्यांच्या सान्निध्यात जवळून काम करण्याची संधी मला मिळाली. मी यशवंतरावजींचा चाहता असलो तरी त्यांचा स्तुतिपाठक नव्हतो. कित्येकदा आमचे गंभीर स्वरुपाचे मतभेदही झाले. यातूनच आम्ही एकत्र आलो आणि आमचे मित्रत्वाचे संबंध सातत्याने वाढत गेले. त्या पंचवीस वर्षांच्या कालावधीत यशवंतरावजींच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन मी जवळून घेऊ शकलो आणि त्यांच्याविषयी वाटणारा आदर अधिकच वृद्धिंगत झाला.

यशवंतरावजी जाऊन एक वर्ष होऊन गेले. त्यांच्या सान्निध्यात काम करीत असताना घडलेल्या कित्येक घटना व स्मृती अधूनमधून नजरेसमोर येतात आणि कळत नकळत डोळे तरळून जातात.

१९६२ साली भाई भाई म्हणणाऱ्या चीनने भारतावर आक्रमण केले आणि देशभर एकच हाहाकार उडाला. त्या वेळी कृष्ण मेनन हे भारताचे संरक्षण मंत्री होते. त्यांच्याच गलथानपणामुळे भारतावर पराभव पत्करण्याची अपमानकारक पाळी आली आणि हजारो चौरस मैल क्षेत्र देशाला गमवावे लागले. संरक्षणमंत्री पदावरून कृष्ण मेननना काढण्याची मागणी देशभर सुरू झाली. तसे करण्यास पंतप्रधान नेहरू सुरुवातीस तयार नव्हते. परंतु महावीर त्यागीसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी "इंद्राय स्वाहा। तक्षकाय स्वाहा" करणे क्रमप्राप्त ठरेल असा रोखठोक इशारा पंडितजींना दिला आणि संरक्षणमंत्री पदावरून कृष्ण मेननना त्यांना दूर करावे लागले. त्या वेळी संसदेमध्ये नावाजलेले काँग्रेसचे काही नेते होते. परंतु खचलेल्या भारतीय जनतेच्या आणि सेनेच्या मनात नवा विश्वास निर्माण करणारी व्यक्तीच संरक्षणमंत्री असली पाहिजे असा सर्वांचा आग्रह होता. त्या वेळी महाराष्ट्राचे यशस्वी मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावजींचे नाव देशभर झालेले होते. त्यातच १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये काँग्रेसला दैदिप्यमान यश मिळाले होते. शिवाय महाराष्ट्राने देशाच्या कठीण काळात शिवछत्रपतींच्या काळात घडविलेला इतिहास सुप्तपणे कोठेतरी वावरत असावा. पंतप्रधानांसह सर्वांचेच लक्ष यशवंतरावजींकडे गेले. पंतप्रधानांनी संरक्षणमंत्रिपदावर यशवंतरावजींची अचूक निवड केली. त्या आव्हानात्मक निर्णयाचा यशवंतरावजींनीही तितक्याच तत्परतेने व आत्मविश्वासाने स्वीकार केला.

यशवंतरावजींचे संरक्षणमंत्री म्हणून नाव जाहीर होताच मरगळलेल्या भारतीय सेनेमध्ये आणि पराभूत भारतामध्ये नवा विश्वास निर्माण झाला. भारताच्या साहाय्यासाठी धावून जाणाऱ्या सह्याद्रीचे सर्वत्र स्वागत झाले. सर्व महाराष्ट्रातही त्यांचे मनापासून कौतुक झाले. कारण तो केवळ

यशवंतरावजींचा बहुमान नव्हता तर उभ्या महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्राच्या तेजस्वी ऐतिहासिक परंपरेचा तो बहुमान होता. अर्थात देशाने केलेले स्वागत आणि महाराष्ट्राने केलेले कौतुक यामध्ये फार मोठे अंतर होते.

यशवंतरावजींच्या निवडीमुळे देशाला कर्तृत्ववान संरक्षणमंत्री लाभला. परंतु महाराष्ट्रावर लोकप्रिय, यशस्वी आणि कर्तबगार मुख्यमंत्री गमावण्याचा प्रसंग गुदरला होता. १९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर काही महिन्यांच्या कालावधीतच यशवंतरावजींनी सर्व महाराष्ट्रावर पूर्ण पकड घेतली. सर्व क्षेत्रातील व स्तरांतील जनतेचा विश्वास त्यांनी संपादन केला आणि विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई यांचे पूर्वी केव्हाही नव्हते असे भावनात्मक ऐक्य घडवून आणले. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वावर महाराष्ट्रातील जनतेने अपूर्व विश्वास व्यक्त केला आणि नवा महाराष्ट्र घडविण्यासाठी त्यांच्या हाती स्वराज्याची सर्व सत्ता सुपूर्त केली. महाराष्ट्राच्या भावी प्रगतीचे चित्र रात्रंदिवस विचारविनिमय करून यशवंतरावजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले होते. समानतेवर आधारित कृषी औद्योगिक समाजरचना निर्माण करण्याचा आणि त्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करून सहकारावर भर देण्याचा संकल्प काँग्रेस पक्षाने व्यक्त केला होता. १९६२ च्या निवडणुकांसाठी तयार केलेला जाहीरनामा त्या संकल्पनेचेच प्रतीक होते. सत्ता हाती येताच महाराष्ट्राचे शासन व काँग्रेसचे संघटन यांनी एकत्रितपणे जनतेला दिलेल्या वचनांची पूतर्ता करण्यास सुरुवात केली. १९६२ च्या ऑगस्ट महिन्यातच जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची स्थापना झाली. पुढील प्रगतीची वेगवान वाटचाल सुरू असतानाच चीनचे आक्रमण झाले आणि महाराष्ट्र संघाच्या मुख्य कप्तानावरच आपला संघ सोडून दिल्लीला जाण्याचा प्रसंग ओढवला. त्यामुळेच महाराष्ट्रातील जनतेच्या एका

डोळ्यात आनंदाचे तर दुसऱ्या डोळ्यात चिंतेचे अश्रू मी जवळून पाहात होतो.

नोव्हेंबर १९६२ मध्ये ज्या दिवशी यशवंतरावजींनी दिल्लीकडे प्रस्थान केले तो संस्मरणीय दिवस मी केव्हाही विसरू शकत नाही. दादर येथील टिळकभवनामध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्यालय होते आणि तेथेच मी राहात असे. त्या दिवशी वसंतरावदादा, मी व इतर जवळचे सहकारी सकाळपासून सह्याद्रीवर यशवंतरावजींच्या घरी जमलो होतो. त्यांना निरोप देण्यासाठी जनतेची रीघ लागली होती. उभ्या महाराष्ट्रातून ठिकठिकाणचे कार्यकर्ते व हितचिंतक आले होते. मुंबई शहरातील, आणि आजूबाजूच्या परिसरातील शेकडो नागरिक भेटण्यासाठी व आवडत्या नेत्याला अभिवादन करण्यासाठी येत होते. त्यामध्ये कामगार, शेतकरी, हरिजन, गिरिजन, नवबुद्ध, पत्रकार, कलाकार, ज्येष्ठ साहित्यिक, व्यापारी, उद्योगपती, शासकीय अधिकारी आदी सर्वांचाच समावेश होता. निरनिराळ्या संस्थांचे, विविध पक्षांचे, तसेच अल्पसंख्य समाजाचे नेतेही तेथे आवर्जून उपस्थित होते. सर्व समाजाला बरोबर घेऊन उमेदीने प्रगतीकडे घोडदौड करणाऱ्या महाराष्ट्राचे काय होणार ही चिंता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. भेटीसाठी येणाऱ्या असंख्य चाहत्यांना व मित्रांना पाहात होतो, त्यांच्या बरोबर बोलत होतो, मनातून निरीक्षण करीत होतो. यशवंतरावजींना आणि वेणूताईंना अभिवादन करीत असताना, त्या सर्वांचे बोलके भाव एकच भावना व्यक्त करीत होते. ती भावना होती – "सर्व समाजावर प्रेम करणारा, खऱ्या अर्थाने महाराष्ट्र एकसंघ करणारा, समर्थ व स्थिर शासन देणारा आणि सर्व सत्ता हाती असतानाही विनयशील राहून समंजसपणे सामाजिक न्याय देणारा आवडता नेता आणि लोकमान्य मुख्यमंत्री आता दूर जात आहे. अशा तोलामोलाचा नेता परत कसा मिळणार?"

सायंकाळी विमानतळावर निरोप देईपर्यंत मी यशवंतरावजींबरोबर होतो. विमानतळावर विविध क्षेत्रांतील नेते उपस्थित होते. सकाळपासून

सायंकाळपर्यंत दिवसभर पाहिलेले ते भावपूर्ण वातावरण पाहून प्रत्यक्ष भावनेला सुद्धा कढ येत होते. अखेरचे अभिवादन स्वीकारताना यशवंतरावजींनाही राहवले नाही. साश्रुपूर्ण नयनांनी त्या अलोट प्रेमाची पोहोच त्यांनी दिली. काही मिनिटांतच त्यांच्या विमानाने आकाशात झेप घेतली आणि आमच्या गाड्याही शहराकडे परत निघाल्या. ते दिवसभराचे हृदयस्पर्शी चित्र मला एकच ग्वाही देत होते. छत्रपती शिवाजीमहाराजांनंतर सर्व महाराष्ट्राचे, इतक्या प्रभावीपणे नेतृत्व करणारा लोकप्रिय नेता आजपर्यंत झाला नाही आणि यापुढे होणे नाही!

## सौ. कमलाबाई अजमेरा
## महाराष्ट्राची मैदानी तोफ

यशवंतरावजी चव्हाण हे महाराष्ट्राचे भूषण होते, आणि ते भारताला ललामभूत ठरले. मी त्यांच्या संपर्कात सुमारे तीस वर्षांपूर्वी आले. ज्या वेळी धुळे जिल्ह्यातून पार्लमेंटसाठी श्रीमान् शाळीग्रामजी भारतीया उभे होते, त्या वेळी त्यांच्या निवडणूक प्रचारासाठी यशवंतरावजी तीन दिवस जिल्ह्यात होते. मीदेखील त्यांच्याबरोबर प्रचारार्थ होते. त्या काळात सार्वजनिक क्षेत्रात महिला फारशा पुढे आल्या नव्हत्या. त्यामुळे प्रचारसभेच्या आरंभी माझेच भाषण होत असे.

त्यावेळी "प्रचार कराल खेडा-खेडावर बाईबी फिरस, आपल्या गावलेबी उनी, चला चला बाईसव्हन, सभामा जाऊत. ती काय सांगस ते ऐकूत." असे वातावरण तयार होई आणि सभेत प्रचंड गर्दी जमत असे. मग यशवंतरावजी म्हणायचे, 'कमलाबाई लावा तुमची प्लेट.' माझे भाषण संपल्यानंतर यशवंतराव चव्हाणांचे ओजस्वी व प्रभावपूर्ण भाषण होत असे. त्यामुळे सभा जिंकण्याचे कसब मला आढळून आले. ते आपले मुद्दे इतक्या सहजतेने मांडीत की, ऐकणारे मंत्रमुग्ध होत असत. विरोधी पक्षाचा तर ते धुव्वा उडवून टाकीत. म्हणूनच विरोधी पक्ष त्यांना 'महाराष्ट्राची मैदानी तोफ' म्हणत असत.

योगायोग असा की, या महाराष्ट्राच्या तोफेला संकटकाळी स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताच्या रक्षणार्थ दिल्लीस बोलावून त्यांना संरक्षणमंत्रिपद बहाल केले. सह्याद्री हिमालयाच्या मदतीस धावून गेला. ही लोकोक्ती ऐकून सर्व महाराष्ट्रीयांची मान उंचावली आणि सर्वांची छाती सार्थ अभिमानाने फुगून गेली.

यशवंतरावजींचे स्त्रियांसंबंधीचे विचार वेगळे होते. ते म्हणत, "स्त्रियांनी राजकारणात पडू नये." या प्रश्नावर त्यांचेशी माझे वाद-विवाद

होत असत. खडाजंगीही होई. शेवटी मी एक रामबाण सोडत असे की, ‘जी आई तुम्हाला जन्म देते, ती एक स्त्रीच असते ना! तीच आई तुमचे लालनपालन करून सुसंस्कारित करते ना? मग तीच स्त्री पुढे आलेली तुम्हास चालू नये काय? तिला तुम्ही अबला म्हणून दूर ठेवणार काय?’ या युक्तीवादाचे त्यांचेजवळ उत्तर नसे. ते गप्प बसत.

निवडणूक म्हटली की तिकीट वाटप आले. आणि तिकीट वाटपात कुणीतरी आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागण्यासाठी दिल्लीला अपील करत असे. महाराष्ट्रातून असे कुणी दिल्लीला अपिलात जाणे यशवंतरावांना पसंत पडत नसे. सन १९५७ सालची घटना. मला त्यांनी असेंब्लीचे तिकीट दिले, परंतु स्थानिक राजकारणामुळे ते बदलले गेले. मी त्यांचा स्वभाव जाणून शिस्तशीर शांत राहून तिकटी दिलेल्या उमेदवारास पाठिंबा देऊन त्याचाच प्रचार केला.

सन १९६२ साली मी माझ्या न्याय्य हक्कासाठी दिल्लीकडे अपील केले. त्यानुसार मी स्वतः व माझे यजमान श्री. छगनलालजी अजमेरा दिल्लीस गेलो. यशवंतरावजीं माननीय मोरारजीभाईंकडे उतरले होते. आम्ही उभयता त्यांना भेटावयास गेलो. ते त्यांना पसंत पडले नाही म्हणून ते रागाने म्हणाले, ‘काय अजमेराबाई! दिल्लीवर स्वारी का?’ मी अत्यंत नम्रपणे म्हटले, ‘नाही साहेब, न्याय मागण्यासाठी आले आहे. गेल्या वेळेस आपण मला मदत केली होती, आताही योग्य ते साहाय्य करा.’ ते तसेच रागाने निघून गेले. आम्ही तसेच बसून राहिलो. ते जेव्हा दुपारच्या मीटिंगला जाण्यासाठी निघाले तेव्हा ते म्हणाले, ‘तुम्ही अजून बसलेलेच आहात?’ मी म्हणाले, ‘साहेब! मी दिल्लीस आल्यामुळे तुम्ही रागावला, आपण म्हणाल तर मी परत धुळ्यास जाते.’ यावर साहेब हसून म्हणाले, ‘आता आला आहात तर सर्वांना भेटा. इंदिराजींनाही भेटा.’ पडत्या फळाची आज्ञा समजून आम्ही सर्वांना भेटण्यास निघालो. १९६२ मध्ये M. L. A. चे नाही पण M. L. C.चे माझे त्याच वेळी नक्की झाले.

निवडून आल्यावर त्यांनी माझा परिचय करून देताना ‘ॲक्टिव’ असे विशेषण लावून परिचय करून दिला.

त्यांची शेवटची भेट आदरणीय इंदिराजी स्वर्गवासी झाल्यानंतर पार्लमेंटचे इलेक्शन लागलेले असताना झाली. मी चिंतातूर होऊन यशवंतरावजींशी बोलत होते, त्याच वेळी त्यांनी सांगितले की, ‘अजमेराताई, आपण जुन्या जमान्यातले झालो आहोत. आता राजीवजी सर्व काही व्यवस्थित हाताळतील. आपण आहोतच त्यांच्या पाठीशी.’ आमची मने हेलावली. ते दूर झाले. पण इतक्या लवकर ते कायमचे दूर होतील असे वाटले नव्हते.

# डॉ. जयंत पाटील
# विधायक कार्याला प्रेरणा देणारे यशवंतराव

१९७५ सालचा जानेवारी महिना. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या बोर्डी येथील शिबिराला उपस्थित राहून यशवंतराव मुंबईस परत जाताना वाटेत कोसबाड येथील कृषिसंस्थेत थांबले होते. आम्ही त्यांना रघ्या करबट नावाच्या आदिवासीची शेती पाहण्यास घेऊन गेलो. रघ्याने त्याच्या शेतीवर गहू पिकविला होता व त्याचे पीक फार सुंदर आले होते. कोकणात गहू पिकू शकतो व तोही एक आदिवासी शेतकरी पिकवू शकतो हे पाहून यशवंतरावजींना केवढा आनंद झाला! रघ्याने आपली शेती त्यांना दाखविली. मध्येच थांबून यशवंतरावजींनी त्याला विचारले, “तुम्ही हे सर्व कसे केले?” त्यावर रघ्याने सांगितले, “साहेब मी मजूर होतो. शेजारच्या एका धनिक बागवानाकडे मी मजुरी करून पोट भरत असे. परंतु  कोसबाडच्या कृषिसंस्थेतील कार्यकर्त्यांनी मला विहीर खणण्यास व पंप बसविण्यास मदत केली. मला त्यांनी चिकू, आंब्याची कलमे दिली, चांगल्या जातीच्या भाताचे व गव्हाचे बी दिले व मला शेतीचे शिक्षण दिले. त्यामुळे मी आता मजुरीला जात नाही. माझ्या शेतीवरच मी, माझी बायको व मुले वर्षभर काम करतो. पूर्वी मला पोटभर भात पिकत नसे. वर्षातून तीन-चार महिने आम्हास भाताची पेज अगर नागलीची आंबील प्यावी लागे. आता भात व गहू असल्याने आम्हास पोटभर अन्न मिळते. पूर्वी आम्ही भाजीपाला खात नसू, परंतु आता आम्ही वांगी, टोमॅटो, वांगी भाजी करतो. आमच्या मुलांना आता पोटभर अन्न मिळाल्याने ती शाळेत जातात. माझी बायको रोज भाजीपाला विकण्यास डहाणूस जाते व त्या विक्रीतून आम्हास ८ ते १० रूपये मिळतात. त्यातून आम्ही तेल, मिरची, मसाला विकत आणतो.”

यशवंतरावजी हे अगदी मन लावून ऐकत होते. महाराष्ट्रातील एक तळागाळातील आदिवासी त्याच्या विकासाची कथा त्यांना सांगत होता. ज्यांनी महाराष्ट्र घडवला त्या यशवंतरावांना केवढे समाधान मिळत असावे! त्यांच्या स्वप्नाची पूर्ती रघ्याच्या सांगण्यातून त्यांना मिळत होती ना?

यशवंतराव मजकडे वळून मला म्हणाले, "जयंतराव, हेच राष्ट्रउभारणीचे खरेखुरे कार्य आहे. तुम्ही गरीब आदिवासींच्या सेवेला जे वाहून घेतले त्यात तुम्हाला जे समाधान लाभेल ते शासनातल्या मोठ्या जागेवर राहून मिळणार नाही."

विधायक कार्यकर्त्यांनी शासनातील जागेची अपेक्षा न ठेवता आपले सेवाकार्य हेच महत्त्वाचे आहे हे समजले पाहिजे हेच यशवंतरावांच्या उद्गारांचे सार होते. तद्नंतर यशवंतराव मला जेव्हा जेव्हा भेटत तेव्हा तेव्हा आदिवासींतील शेतीच्या कामाबद्दल विचारत असत. माझ्यासारखे महाराष्ट्रातील जे विधायक कार्यकर्ते असत त्यांना यशवंतराव हे आशास्थान होते! त्यांच्यापासून आम्हास सतत प्रेरणा मिळे.

## कमलाबाई काळे
## मोठ्या दिलाचा माणूस

मी १९५० साली कोल्हापुरास राहात होते. मला सर्व गोष्टींची आवड असल्यामुळे त्या वेळी स्थापन झालेल्या रेशनिंग सल्लागार समितीवर माझी महिला मंडळातून निवड झाली. आमच्या कमिटीचे काम चांगले झाल्यामुळे आमच्या कमिटीस कलेक्टरनी जादा अधिकार दिले होते. दर आठवड्याला आम्ही रेशनिंगची दुकाने पाहावयास जात होतो. एके दिवशी आम्हला एक आजव्याच्या जिरग्या तांदळाचे पोते एका व्यक्तीकडे गेले आहे असे समजले. आम्ही त्याच्या सर्व दिवसभर छडा लावला व ते पोते शोधून काढले! त्या वेळी ना. यशवंतराव चव्हाण पुरवठामंत्री होते. गावात सगळीकडे आरडाओरडा झाला. नंतर स्वतः मिनिस्टर रात्री कोल्हापुरास आले. सर्व आमदार, खासदार, कार्यकर्ते यांची मीटिंग बोलावली. मला बोलावण्यासाठी गाडी घरी आली. मी त्या दिवशी प्रथम काँग्रेस कमिटी पाहिली!

मी आल्यानंतर त्यांनी माझे नाव विचारले व मला म्हणाले "तुम्ही फारच छान काम करता असे माझ्या कानावर आले आहे. त्याबद्दल मी तुम्हाला शाब्दिक शाबासकी देतो व सर्व आमदार व खासदार यांच्या वतीने तुमचे अभिनंदन करतो."

तेवढे बोलून चतुराईने विषय बदलत ते रत्नाप्पा आण्णांना म्हणाले, "काय आण्णा, एवढ्या, हुशार बाई तुमच्या कोल्हापुरात असताना त्यांना तुम्ही अजून काँग्रेसचे सभासद करून घेतले नाही का?" एवढे बोलून त्यांनी आपल्या कोटाच्या खिशातून चार आण्याचे नाणे काढले व पुन्हा म्हणाले, "ही घ्या ह्यांची सभासद वर्गणी! कमलाबाईंना सभासद करून घ्या?" त्यांच्या चार आण्यांनी मी काँग्रेसची सभासद झाले.

१९५६ साली मी मुंबईला जाऊन कापडी बाहुल्यांचा कोर्स पूर्ण करून आले. तोपर्यंत ना. यशवंतराव मुख्यमंत्री झाले होते. म्हणून त्यांची उघड्या गाडीतून पुण्यात मिरवणूक काढली. मी खडकवासल्यास जाण्यासाठी बस स्टॉपवर उभी होते. इतक्या गर्दीतून त्यांनी मला ओळखले व हात हालवला. तो पाहून मला इतका आनंद झाला की, मी दुसऱ्या दिवशी त्यांना भेटण्यासाठी पुण्याच्या सर्कीट हाऊसवर गेले. आत चिठ्ठी पाठविली, “दहा मिनिटांनी बोलावतो, बसा” असा निरोप आला. तेथे आलेल्या अनेक स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनी मला सांगितले की, “मुख्यमंत्री अशी सर्वांची भेट घेत नाहीत. तुमचे काय काम आहे सांगा?” ते लोक मला फक्त पोट भरण्यासाठी आलेली खडकवासल्याची बाहुल्यांची शिक्षिका म्हणून ओळखत होते. साहेबांनी मला आत बोलावले व म्हणाले, “तुम्ही इथे कशा?” परवा मी तुम्हाला बसस्टॉपवर पाहिले.” मी म्हटले, “साहेब, आपण एवढे मोठे झाल्यावर सुद्धा माझ्यासारख्या एका क्षुल्लक महिलेची ओळख ठेवता याचा मला खूप आनंद झाला. आणि केवळ तो व्यक्त करण्यासाठी मी आले आहे. आम्ही खडकवासल्याला ग्रामीण महिलांसाठी बाहुल्यांचे शिक्षण केंद्र काढले आहे. त्याला आपला आशीर्वाद हवा आहे. उद्या पानशेतहून येताना खडकवासल्याला भेट द्यावी एवढीच इच्छा आहे.” ते म्हणाले, “म्हणजे? तुम्ही राजकारण सोडून बाहुल्या खेळायला लागलात का? मी जरूर येतो.”

दुसऱ्या दिवशी ते आले. खूप जनसमुदाय जमला होता. तिथल्या कार्यकर्त्यांनी माझी स्तुती करून सांगितले, “तुमच्या नशिबाने चुकून राजकारणातील बाई तुमच्या गावाला आल्या आहेत. त्या आपल्याच आहेत. त्यांचा नीट फायदा करून घ्या. व त्यांना खेड्यात संरक्षण द्या.” दोनच शब्द पण किती समर्पक! त्या दिवसापासून त्या भागाचे लोक मला आपले मानू लागले. दिलाचा मोठा माणूस हाच खरा मोठा माणूस!

# डॉ. शां. ब. मुजुमदार
# सिंबायोसिसमध्ये साहेब

सिंबायोसिस संस्थेमुळे माझा आणि कै. यशवंतराव चव्हाण यांचा संबंध आला. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्राचे उद्घाटन १९७६ मध्ये त्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते भारताचे परराष्ट्रमंत्री होते. आपल्या भाषणात भारतातील व परदेशी विद्यार्थ्यांना आपुलकीने वागविण्याने भारताची प्रतिमा उजळण्यास कशी मदत होते आणि त्या दृष्टीने सिंबायोसिसचे कार्य किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. आरंभी त्यांनी उद्घाटनासाठी वेगळी तारीख दिली होती. नंतर त्यांनी ३१ जुलै ही तारीख दिली. माझी जन्मतारीखही तीच! यशवंतरावांना कुणीतरी हा योगायोग त्यांच्या कानात सांगितला. लगेच त्यांनी हार मागवून घेतला आणि तो माझ्या गळ्यात घालून आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या. माझ्या खांद्यावर हात ठेवून ते मला म्हणाले, " तुझे काम फार महत्त्वाचे आहे. जिद्दीने ते पुढे चालव", माझ्या अंगावर शहारे आले. प्रेक्षक टाळ्या वाजवीत होते आणि मी यशवंतरावांच्या पाया पडण्यासाठी मलाही न कळत वाकलो. एक आगळी धन्यता आणि आनंद यांचा आलेला अनुभव मी अजूनही विसरू शकत नाही.

१९८१ च्या जानेवारी मध्ये कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पवित्र अस्थिकलश, त्यांना ज्यावर मृत्यू आला तो पलंग, त्यांच्या दैनंदिन व्यवहारातील वापराच्या वस्तू इत्यादी गोष्टी त्यांच्या पत्नी श्रीमती माईसाहेब आंबेडकर यांनी सिंबायोसिसला भेट म्हणून दिल्या. त्या निमित्ताने एक जाहीर समारंभ आयोजित केला होता. कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अस्थिकलश संस्थेच्या वतीने साहेबांनी स्वीकारावा अशी माझी मनापासूनची इच्छा. मी त्यांना आमंत्रण दिले. पण ज्या तारखा संस्थेला सोईच्या होत्या त्या त्यांना सोईच्या नव्हत्या. त्यांनी मला अन्य

कोणा व्यक्तीस बोलावून समारंभ साजरा करण्याचे सुचविले. मी त्यांना पत्रात लिहिलेले वाक्य अजूनही आठवते, "Nothing of any importance and significance in Maharashtra is likely to succeed without your blessings". त्यांच्या सोईच्या तारखेलाच आम्ही हा समारंभ साजरा केला.

ज्या जागेवर सिंबायोसिसला डॉ. आंबेडकर स्मारकाची इमारत बांधायची होती ती हनुमानटेकडीच्या पायथ्याशी असलेली जागा जंगल खात्याने निर्वनीकरण करून संस्थेच्या ताब्यात देण्याचे ठरविले. पण काही पुणेकरांचे वैशिष्ट्य असे की कोणतीही नवीन गोष्ट पुण्यात होऊ घातली की अनेक मुद्यांचा जाहीर कीस पाडून वर्तमानपत्रातून विरोध करायचा आणि चांगल्या कार्याला अकारण विरोध करायचा. खरे म्हणजे ज्या जंगलखात्याच्या जागेवर सिंबायोसिसला डॉ. आंबेडकर स्मारकाची इमारत बांधावयाची तिथे संपूर्ण कातळ आहे आणि त्यावर झाडे लावणे केवळ अशक्य आहे. पण "सिंबायोसिसने तिथे झाडेच लावली पाहिजेत", "सिंबायोसिस टेकडीवर इमारतींचे जंगल उभारणार आहे", "आंबेडकरांचे नवे कैवारी" "हनुमान टेकडीवर अतिक्रमण" इत्यादी शीर्षकाच्या ठळक व भडक बातम्या, बातमीपत्रे आणि अग्रलेख पुण्यामुंबईच्या अनेक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले. मी भांबावून गेलो. सिंबायोसिसचे खुलासे अग्रलेख आणि बातमीपत्रांपुढे फिके पडू लागले. वैतागलेल्या मनःस्थितीत मी यशवंतरावांना पत्र लिहिले. त्यातील एक वाक्य असे होते, "वैचारिक नैराश्य आणि चांगल्या कामासाठीसुद्धा सामाजिक हेटाळणीमुळे येणारी हतबद्धता यामुळे मार्ग दिसेनासा झाला आहे. आपण याबाबतीत मार्गदर्शनपर विचार कळविल्यास त्यांना बरोबर घेऊन मी कदाचित मार्ग शोधू शकेल." या पत्राला साहेबांनी लगेच उत्तर पाठविले. त्यात त्यांनी जो मला उपदेश केला तो सामाजिक कार्य करणाऱ्या अनेकांना उपयोगी ठरेल. पत्रात त्यांनी लिहिले की, "सरकारची जागा मिळणे अवघड काम असते व अनंत अडचणी असतात.

त्यामुळे निराश होऊन चालणार नाही". आणि खरोखरच निराश न होता मी संस्थेची बाजू शासनातील अधिकाऱ्यांना व संबंधित मंत्र्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. शेवटी संस्थेला यश आले व हनुमान टेकडीवरील ज्या जागेवरून वृत्तपत्रांमधून गहजब झाला ती जागा सिंबायोसिस संस्थेस डॉ. आंबेडकर स्मारकासाठी देण्याचा अंतिम निर्णय शासनाने घेतला! विरोधकांच्या सेनापतीने पत्र पाठवून माझे अभिनंदन केले आणि संयोजनाबद्दल कौतुक केले. ही बातमी साहेबांना सांगण्यासाठी मी धडपडत होतो, उतावीळ झालो होतो पण तसे घडून आले नाही हे माझे दुर्दैव होय!

## बंडोपंत सरपोतदार
## यशवंतराव, आम्हा कार्यकर्त्यांचे एक प्रेरणास्थान!

यशवंतरावांबरोबर माझा प्रथम परिचय १९४६ साली ते त्या वेळच्या मुंबई प्रांतिक कायदेमंडळावर (लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) निवडून आले तेव्हापासूनचा ! त्या वेळी आमच्या पूना गेस्ट हाऊसकडे असेंब्लीचे पावसाळी अधिवेशनाचे पुण्याचे काम होते. कै. यशवंतराव त्या वेळी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम पाहात असत. त्यांच्याकडे गृहखाते असलेमुळे त्यांना भोजन-चहा-फराळ यासाठी वेळच मिळत नव्हता. अशा वेळी दोघांचे एक परिचित व त्या काळी आमदार झालेले कै. वसंतराव नाईक(नाशिक) ह्यांनी हा परिचय करून दिला व ही अडचण मला सांगितली. अर्थात मी त्यांच्यासाठी  भोजन-चहा-फराळ यासाठी एका नोकराची खास नेमणूक करून ही अडचण निवारली, पण त्या काळी यशवंतराव प्रतिदिनी जवळजवळ १६ ते १८ तास सतत कार्यमग्न असत. त्यात पुन्हा श्री. मा. मोरारजी भाई देसाई यांचे संसदीय सचीव असल्यामुळे सारखे दौरेही करावे लागत असत, परंतु यशवंतराव कधीही दमले भागलेले वगैरे वाटत नसत. वास्तविक त्या आधी त्यांनी १९४२ च्या लढ्यात भाग घेऊन 'भूमिगत' राहून जवळजवळ चार वर्षे वनवास, उपास, पळापळ असे कष्टाचे आयुष्य काढले होते. त्यांना शासकीय कामाची माहितीही नव्हती पण जिद्दीने त्यांनी त्या कामाचा अभ्यास व्हावा, अनुभव मिळावा याच उद्देशाने ते काम स्वीकारले होते. त्यानंतर १९५० साली प्रथम मंत्री झाले. पुढे १९५२ साली प्रांताचे मुख्यमंत्रीही झाले.

पुढे १९६२ साली ते भारताचे संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस आल्यावर मग माझा त्यांचेशी पुन्हा संबंध आला.

पहिली काही वर्षे ते खूप कामात असल्यामुळे आमच्या गाठीभेटी फारशा होत नसत पण १९६४ नंतर मात्र त्यांच्याकडे सल्ल्यासाठी

विचारविनिमयासाठी मी  सतत जात असे. दरवेळी ते मला दिल्लीतील मराठी मंडळींच्या कार्यक्रमांविषयी माहिती विचारत असत. तसेच घरी आलेल्या मराठी मंडळींचा माझा परिचय करून देत असत. याच वेळी एकदा महाराष्ट्राला दिल्लीविषयी निरनिराळी माहिती करून देण्यासाठी एखाद्या वृत्तपत्राची कल्पना निघाली. मी त्यांना एका मासिक पत्रिकेची माझी कल्पना सांगितली. त्यांनी त्वरित ती काढण्याबद्दल मला सर्व बाबतीत मदत देऊ केली आणि त्यातूनच आमची  'दिल्ली दरवाजा' मासिकपत्रिकेचा जन्म झाला.

पुढे १९६८ साली आम्ही 'श्रीगणपती महोत्सव' दिल्लीत अभिनव पद्धतीने साजरा करण्याचे ठरवले व तसाच तो मोठ्या धडाक्याने साजराही केला. त्याबाबतचे प्रमुख पाठबळ यशवंतराव यांच्या आश्वासक साहाय्याचे असे.

माझ्या दिल्लीतील सर्व कार्याचे (सिनेमा महोत्सव, संगीत-नाटक महोत्सव) प्रमुख-केंद्र यशवंतरावांचे वडिलधारे प्रेरक-आशास्थान असे. त्यांनी एकदा आपली कल्पना व कार्यक्रम मान्य केला की निश्चित तो यशस्वी होणार याची आम्हाला खात्री असे. त्याबाबत आमच्याशी ते इतक्या सूक्ष्म चर्चा करीत की त्यातून जो कार्यक्रम ठरे तो यशस्वी होईलच असे त्यांनाही वाटत असणारच.

१९८३ साली सौ. वेणूताईंच्या निधनानंतर मात्र ते अत्यंत दुःखी, उदास झाले. त्यानंतरच्या त्यांच्या भेटी उदासवाण्या भासू लागल्या. शेवटी दि. २८ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांच्या अकस्मित मृत्यूने आमचा हा दीर्घ सहवास संपला. यशवंतराव हे आम्हा कार्यकर्त्यांना नेहमीच एक वडिलधारे आशास्थान वाटत आहे.

यशवंतराव चव्हाण केवळ आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकारच नव्हते तर त्यांनी लोकशाही समाजवादाने भारताला लोकशाही व समाजवादाचा योग्य मार्ग दाखविला. मार्क्स, लेनिन, मानवेंद्रनाथ रॉय, बारट्रॅन्ड रसेल, महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांचे विचार, व्यक्तिमत्त्व व

कार्य यातून यशवंतरावांच्या विचारांना दिशा मिळाली. परंतु त्यांचा समाजवाद भारताचा ग्रामीण भागातील लाखो लोकांच्या दारिद्य व दुःखातून उदयास आला आणि ते स्वतःही अशाच सामान्य कुटुंबात जन्मले व वाढले.

यशवंतरावांनी आपल्या भारत देशाचे एक सुंदर व संपन्न असे स्वप्न उराशी बाळगले होते. आर्थिक व राजकीय दृष्ट्या स्थैर्य लाभलेला ज्यामध्ये सामाजिक विषमतेला मुळीच थारा नाही, स्वराज्याचे व सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यात समर्थ असलेला व जेथे सर्व क्षेत्रातील जनतेच्या प्रगती व विकासास सतत वाव मिळेल अशा भारताचे स्वप्न ते बघत होते. त्यांच्या स्वप्नातील भारताचा भविष्य काळ उज्ज्वल होता. त्यांच्या मनातील लोकशाही भारताचा समाजवादी व शांतताप्रिय राष्ट्र म्हणून सुलौकिक होता. जागतिक शांततेचे कार्य भारत करू शकेल व त्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा अशी त्यांची मनोमन इच्छा होती.

ग्रामीण भागाच्या आधुनिकीकरणाचे महत्त्व त्यांना पटले होते. ग्रामीण भागाच्या विकासासाठी कृषि औद्योगिक समाज स्थापन करण्यासाठी झटणारे यशवंतराव कदाचित एकमेव नेते असावेत. त्यांनी सहकारी चळवळीची महाराष्ट्रामध्ये मुहूर्तमेढ रोवली व हीच चळवळ आज संपूर्ण देशभर भूषणावह ठरली आहे. सर्वत्र राबविली जात आहे. या सहकारातून समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. ह्याशिवाय यशवंतराव यांनी लोकशाहीचे विकेंद्रीकरण करून जिल्हा परिषद, बँकेचे राष्ट्रीयीकरण व संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याच्या कामी त्यांनी घेतलेला पुढाकार, यावरून त्यांच्या दूरदर्शीपणाची कल्पना येते.

यशवंतराव हे अतिशय मुरब्बी व कुशल प्रशासक होते. त्यांनी ज्या ज्या म्हणून जबाबदारींच्या जागी काम केले त्या त्या प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. स्वातंत्र्य सैनिक, पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री, विविध खात्यांचे केंद्रीय मंत्री व उप-पंतप्रधान अशी त्यांची चढत्या क्रमाने वाटचाल झाली व त्यांनी प्रत्येक वेळी आपल्या

बुद्धिमत्तेचा व लोकप्रियतेचा प्रत्यय आणून दिला. ते कोणत्याही पदावर असोत त्यांची इच्छा अशी होती की, गरिबातल्या गरीब तळातील लोकांना विकासाची फळे चाखता यावीत. ते जेथे गेले ते आपल्या कर्तृत्वाने जनतेच्या मनात दृढ विश्वास व श्रद्धा निर्माण करण्यात यशस्वी झाले. त्यांच्या राजकीय व सामाजिक सावधगिरीचा, त्यांच्या शांत, संयमी व खंबीर नेतृत्वाचा लाभ केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशांतील जनतेच्या मनात त्यांच्याविषयी आदर, आत्मियता, प्रतिष्ठा होती.

भारत चीन युद्धानंतर १९६२ साली यशवंतराव चव्हाण केंद्रीय रक्षामंत्री म्हणून दिल्लीला आले. त्यांचा पिंड समाजसेवकाचा असल्यामुळे दिल्लीच्या महाराष्ट्रीय समाजाच्या शैक्षणिक सांस्कृतिक चळवळीशी ते समरस झाले. एप्रिल १९६५ मध्ये ते आमच्या संस्थेचे अध्यक्ष निवडले गेले. नूतन मराठी विद्यालयाच्या कार्यकारिणीचेही ते सभापती होते. त्यांच्या समर्थ नेतृत्वामुळे शाळेची प्रगतिपथावर सतत वाटचाल होत राहिली. ते स्वतः एक उत्कृष्ट लेखक तर होतेच पण साहित्य, संगीत नाट्य ह्याची त्यांना अप्रतिम जाण होती. ह्या सर्व कलांना उत्तेजन देण्यासाठी महाराष्ट्र रंगायन हे प्रेक्षागृह उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या अशा बहुरंगी व्यक्तिमत्वाची उणीव आम्हांस नेहमीच भासेल.

## नलिनीबाई शिंदे
## माननीय साहेब

तसं पाहिलं तर मा. साहेबांची ओळख खूप जुनी, ते मुख्यमंत्री होते त्याचे आधीची. पण मी एक कार्यकर्ती म्हणून त्यांचे डोळ्यासमोर, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीची बरीच वर्षे महिला संघटक मी होते. या नाही त्या कारणाने, सत्कार वगैरे व्हायचे, मीटिंग्ज असायच्या, त्या वेळी महिला संघटनेतर्फे सत्कार करण्याचा मान मला मिळायचा. त्यांचा हसतमुख चेहरा पाहिला की, मनाची भीड चेपायची, 'हं, कसं काय?' साहेबांनी विचारावं, मी 'ठीक' म्हणून बाजूला वळावं.

मनात यायचं "येवढा मोठ्ठा माणूस आवर्जून चौकशी करतो," सामान्य कार्यकर्त्यांत मिळूनमिसळून वागण्याची पद्धत ही त्यांची हातोटी. एकदा काँग्रेसभवनवरती त्यांचं कार्यकर्त्यांच्यासमोर भाषण झालं. त्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून केलेले भाषण अजूनही आठवणीत आहे. ते म्हणाले, "कार्यकर्त्यांनी शब्दांचे प्रहार झेलत अनंत विरोधाला न जुमानता सद्सद्विवेकबुद्धीने प्रामाणिकपणे, जनतेच्या समोर जाऊन आपले विचार पटवून दिले पाहिजेत, जशी युद्धाच्या आघाडीवर असणाऱ्या सैनिकांनी, जखमांची तयारी ठेवावी लागते. युद्ध काही आपल्याला रणांगणावरच जाऊन लढावं लागत नाही तर जनतेसमोर जाऊन त्यांचेशी एकरूप होऊन त्यांच्या अडीअडचणींचा, त्यांच्या दारिद्र्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करूनच लढाई जिंकावी लागते. विरोधकांचे प्रहार झेलण्यातच खरी कसोटी आहे." ते अगदी प्रभावीपणे बोलत होते. त्यांचे शब्द अंतःकरणाला भिडत होते. काँग्रेसभवनचा हॉल गच्च भरला होता. बाहेर पटांगणात अतिशय गर्दी होती.

संयुक्त महाराष्ट्राचे वेळी शिवाजीनगर मतदारसंघातून मला तिकीट मिळालं. अशीच सभेच्या ठिकाणी गाठ पडली. मला म्हणाले, "तिकीट

मिळालं खरं, पण अवघड आहे. वारं आहे संयुक्त महाराष्ट्राचं एका महिलेला तिकीट देऊन काँग्रेस कमिटीने आपलं कर्तव्य केलंय, तुमच्या पाठीशी मामासाहेब देवगिरीकर, बाबासाहेब घोरपडे या बड्या बातब्बर मंडळींचा पाठिंबा आहे," अन् घटकाभर थांबून पुन्हा म्हणाले, "नलिनीबाई, तुमचं माहेर कुठलं ?" अगदी आपलेपणानं केलेल्या चौकशीनी मी मोहरून गेले. मी म्हणाले, "अंकलखोप," त्यासरशी ते म्हणाले, व्वा, कृष्णाकाठची जिद्द तुमच्यात आहे. म्हणूनच तुम्ही होकार दिलेला दिसतोय, "प्रयत्न आपल्या हाती आहेत." हे त्यांच बोलणं, अजूनही आठवणीत आहे. त्या वेळचं वारंच वेगळं होतं. ज्या वेळी आपण प्रचंड विरोधाची तयारी करतो त्या वेळी विरोधाला तोंड देण्याची मनाची तयारी करावी लागते. निकाल संयुक्त महाराष्ट्राचे बाजूने लागला, नागपूरला मीटिंगच्या ठिकाणी त्यांची भेट झाली, म्हणाले, "नलिनीबाई अभिनंदन !" मला काही कळेना. मी पडले नि साहेब अभिनंदन करतात ?

"अहो, बहुतेकांची डिपॉझिट जप्त झालीत पण तुमचे नाही, नाराज होऊ नका पण तुमच्यावर अन्याय झालाय हे मात्र कबूल करायला हवंय. कार्यकर्त्यांनी नाराज न होता दुप्पट कामाला लागलं पाहिजे," मी मनात म्हणाले,

"बस्त! आयुष्य माणसाला नेहमी चकवीत असतं हेच खरं."

आमच्या काँग्रेस महिला संघटनेची सहल एकदा कोयना, पोकळी, चिपळूणला गेली होती. ४५ भगिनी होत्या. वाटेत कृष्णा-कोयना संगम पाहिला, नंतर आम्ही ठरवलं मा. साहेबांच्या आईंना शुभेच्छा भेट द्यायची. आमची बस त्यांच्या दारात थांबली. अचानकच गेल्यामुळे भोवती शेजारच्या बायकामुलांचा गराडा, त्या वेळी त्यांच्या आई झोपूनच होत्या. घरात त्यांच्या पुतण्याची बायको असावी. आम्ही आईंना सांगितलं, "आम्ही पुण्याच्या, काँग्रेसच्या भगिनी आपणास भेटू इच्छितात." त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसलं. त्यांना फुलांचा गुच्छ देऊन त्यांचा आशीर्वाद

घेऊन जायला निघालो, पण त्या माऊलीने आम्हाला तसंच सोडलं नाही. "चहा घेतल्याबिगर मी जाऊ देणार नाही." असं म्हणाल्या. आम्ही सांगितलं ४५ भगिनी आहोत. एवढ्यांचा चहा, अन् भलत्या वेळी आलोय? नको. तेव्हा त्या म्हणाल्या, "मी तशी सोडणार नाही. सरबत तरी घ्यायला पाहिजेच." त्यांनी घरात मोंठ्ठ पातेलं द्यायला सांगितलं. सरबताची बाटली दिली. अन् म्हणतात कशा, "आता तुम्हीच करून घ्या बायांनो," आम्ही सरबत करून घेतलं तेव्हा त्या माऊलीला किती आनंद झाला, आम्हांलाही समाधान वाटलं. त्यांचा निरोप घेतला.

ही गोष्ट एकदा मी साहेबांच्या कानावर घातली. नेहमीचंच हसू त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं, हसत हसत म्हणाले, "माझी आई म्हणजे खरी देवता आहे."

## वसंत थोरात
## पुणेकरांना हे आवडणार नाही

१९७५ मध्ये टिळक पुण्यतिथीनिमित्त टिळक स्मारक मंदिरात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे व्याख्यान होते. अध्यक्ष होते यशवंतराव चव्हाण. मी त्या वर्षी महापौर होतो म्हणून माझी खुर्ची साहेबांच्या शेजारी मांडली होती. अध्यक्ष असूनही साहेबांनी आधी भाषण केले. ते म्हणाले, "आपण सर्वजण तर्कतीर्थांचे भाषण ऐकण्यासाठी जमलेलो आहोत. त्यांचा मोठेपणा लक्षात घेऊन मी माझे भाषण आधी करतो." भाषण ऐकताना साहेबांनी आपले बूट काढून ठेवले होते. भाषण संपवून ते अनवाणीच खुर्चीपाशी आले. ही गोष्ट लक्षात येताच मी माईकजवळ जाऊन त्यांचे बूट आणून दिले. समारंभ संपवून गाडीत बसल्यावर ते मला म्हणाले, "वसंतराव, तुझे-माझे संबंध काहीही असले तरी बूट उचलायला नको होते. असे करता कामा नये."

मी म्हणालो, "साहेब तुमच्याबद्दल आम्हाला इतका आदर आहे की तुमचे बूट उचलण्यात मला कमीपणा वाटत नाही. उलट आदर वाटतो."

ते म्हणाले, "तरीही मला हे आवडलेले नाही. तू महापौर आहेस, लोकांच्या समोर असे वागायला नको होते. आपला महापौर मंत्र्यांचे बूट उचलतो हे पुणेकरांना मुळीच आवडणार नाही. सार्वजनिक जीवनात या गोष्टींचे भान राखत जा."

## डॉ. सतीश देसाई
## आधी दाढी कर

इंदिरा गांधींची हत्या झाली. त्याच्या दुसऱ्या दिवशी मी दिल्लीत गेलो. त्या वेळी मी यशवंतरावांना जाऊन भेटलो. इंदिरा गांधींच्या हत्येने ते फार अस्वस्थ झाले होते. अक्षरशः ते रडले. “सत्तेचे प्रचंड वलय असताना इंदिरा गांधींना प्रचंड मानसिक अशांती होती,” असे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला होता.

मी काही त्यांच्या फारसा जवळचा कार्यकर्ता नव्हतो. फारशा भेटी-गाठी देखील झालेल्या नव्हत्या. तरीही त्यांनी त्या अवस्थेत देखील कुठे उतरलात, जेवायची व्यवस्था झाली की नाही याची विचारपूस केली. माझी सर्व व्यवस्था आहे याची खात्री करून घेतली. मी परत जायला निघालो त्या वेळी ते म्हणाले, “अरे तू दाढी वाढविलेली आहेस. सध्या दिल्लीत जमाव अनावर झालेला आहे. काहीही घडू शकते, दाढी असताना तू बाहेर पडू नकोस. इथेच दाढी कर आणि मग जा.” त्यांनी लगेच एका माणसाला मला दाढीचे सामान आणून देण्याच्या सूचना दिल्या. मी तिथेच दाढी उरकली आणि गुळगुळीत चेहऱ्याने त्यांच्यापुढे उभा राहिलो तेव्हा ते म्हणाले, “आता जायला हरकत नाही. आता तुला बाहेर पडलास तरी धास्ती नाही.”

## आ. सौ. निर्मला ठोकळ
## यशवंतराव- एक नेक आदमी

वेणूताई गेल्या, आणि हिमालयाच्या मदतीला सह्याद्री निघाला असा ज्यांचा आम्ही एकेकाळी उल्लेख केला असे यशवंतराव चव्हाण मनाने, शरीराने खचून गेले.

त्यांच्या बोलण्यातील उभारी, मिश्कील विनोद, राजकारणाबद्दलची आस्था, मनमोकळ्या गप्पा हे पूर्वीचे सारे लुप्त झाले होते.

'देवराष्ट्रे' या एका लहानशा गावात छोट्या शेतकरी कुटुंबात जन्मलेला एक मुलगा स्वकर्तृत्वाने देशाच्या उपपंतप्रधानपदापर्यंत जाताना त्यांची झेप पाहिल्यानंतर, त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या कालातील मनाची अवस्था पाहिल्यावर, अंतःकरणात कुठेतरी खोल जखम होत आहे असे वाटते.

स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणूनच यशवंतरावांचा इतिहासाला उल्लेख करावा लागेल.

१९५२ पासून महाराष्ट्र घडवायला त्यांनी जी सुरुवात केली होती ती, त्यांनी जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत चालूच ठेवली होती. त्यापैकी १९४९ पासून १९५७ पर्यंत पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री म्हणून ते असतील, पण महाराष्ट्रात बहुजन समाजाचे कार्य काही लोकांनी जोरात सुरू केल्यानंतर, त्यांनी महाराष्ट्र शासन जनताभिमुख करण्याचा प्रयत्न केला आणि म्हणूनच ते १९५७ ला द्विभाषिकासारख्या मोठ्या प्रांताचे वयाने सर्वांत लहान असलेले मुख्यमंत्री झाले आणि पुरोगामी महाराष्ट्र घडविण्याला त्यांनी प्रत्यक्ष सुरुवात केली.

'कसेल त्याची जमीन' सहकार चळवळ, सहकारी साखर कारखाने, ग्रामीण कारखानदारी काढण्यास कार्यकर्त्यांना उत्तेजन, १२०० रुपयांच्या आतील वार्षिक उत्पन्नाच्या पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण योजना,

उजनी, कोयना, जायकवाडी, पानशेत अशा कितीतरी यशवंतरावांनी अचूक निर्णय घेतले की, ज्यामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू लागला. पुणे, मुंबई, नासिक, ठाणे या परिसरातील खाजगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देऊन तो सारा पट्टा औद्योगीकरणाखाली आणून इतिहास व भूगोल बदलविला.

नुसत्या मोफत शिक्षणाची घोषणा करून चालणार नव्हते तर त्या त्या भागातील मुलामुलींना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी, शिक्षणाचे दरवाजे खुले करून देण्यासाठी खाजगी संस्थांना उत्तेजन देऊन खेड्यापाड्यांतून शाळा, हायस्कूल्स, कॉलेजेस यांना परवानगीही त्यांनी दिली. साहाय्य केले. त्यामुळेच आज महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतीत आघाडीवर असल्याचे चित्र दिसते आहे. "एस.टी. सारखे एक वाहन" सामान्यांचे खेडुतांचे एक हातातले वाहन करून टाकले. ग्रामीण भाग शहारांशी जोडण्याचे महान काम यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात घडवून आणले. अशाप्रकारे मुख्यमंत्रिपदाच्या काळात संपूर्णतः महाराष्ट्राचे स्वरूप, चेहरामोहरा बदलण्याचे काम त्यांनी सुरू केले आणि त्याचेच मूर्त स्वरूप आज आपण पाहातो आहोत. आज महाराष्ट्र हा देशाच्या नकाशात एक पुरोगामी महाराष्ट्र, सहकारी चळवळीतील अग्रेसर महाराष्ट्र, म्हणून उभा आहे.

महाराष्ट्रघडणीचे काम चालू असतानाच १९६२ साली अचानक चीनने भारतावर हल्ला केला. यशवंतरावांना साह्याद्रीच्या छातीचा कोट करून, महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी हिमालयाचे, देशाचे संरक्षण करण्यासाठी त्या वेळचे पंतप्रधान ना. जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहाने दिल्लीस जावे लागले.

१९६२ साली यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री म्हणून मुंबईचा सागरतळ सोडून यमुनातटी गेले. देशाच्या राजधानीत राहावयास गेले. देशाच्या, हिमालयाच्या संरक्षणासाठी गेले. चीनने हल्ला केला होता. कृष्ण मेननसारख्या एका संरक्षणमंत्र्याला अनेक उठावातून बाजूला केले गेले

होते, आणि अशा युद्धजन्य परिस्थितीत यशवंतरावांवर खुर्चीवर बसावावयाचे होते, साऱ्या देशाचेच नव्हे तर साऱ्या जगाचे डोळे त्यांच्याकडे लागले होते. चीन पुढे-पुढे सरकत होता. आपली संरक्षणफळी फारच अपुरी होती. संरक्षण सोयीत कमतरता होती. देश हवालदील झालेला आणि नवीन जबाबदारी पेलायची होती. महाराष्ट्राचे पाश तोडायचे होते. या साऱ्या कठीण मनःस्थितीतून यशवंतराव जात होते. आणि पहिल्याच पार्लमेंटमध्ये त्यांनी सभागृहाचे मन जिंकले. संरक्षण फळी भक्कम केली. पंतप्रधानांच्या विश्वासास पात्र ठरले, आणि दिल्लीत महाराष्ट्रातील एक नेक आदमी म्हणून नाव मिळविले. पंतप्रधानांचे पाचारण, वेणूताईंचा होकार, महाराष्ट्राचा निरोप हे सारे यशस्वी झाले.

त्यापूर्वी त्या वेळच्या पक्षाध्यक्षा इंदिराजी गांधींच्या मदतीने संयुक्त महाराष्ट्राचा कलश महाराष्ट्रात आणण्याचे मंगलकार्य त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे काम होते. महाराष्ट्राचे मंत्री, मुख्यमंत्री आणि देशाचे यशस्वी संरक्षणमंत्री ही त्यांच्या जीवनाची यशाची मालिका कोणालाही हेवा वाटण्यासारखीच होती. पण त्याचबरोबर ती महाराष्ट्राच्या मातीला अभिमान वाटण्यासारखी होती. १९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले. तरी ते क्षणभरही महाराष्ट्राला विसरले नाहीत. जणू ते महाराष्ट्रातच आहेत असा भास होत होता, असे नव्हे तर ते येथेच आहेत असे वातावरण त्यांनी टिकविले. कै. कन्नमवार यांना व त्यानंतर लगेत कै. वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्री केले. त्यांच्याशिवाय महाराष्ट्राच्या राजकारणात, प्रशासनात, पक्षात, कार्यकर्त्यांत पान हलत नव्हते. एवढी त्यांनी स्वतःची पकड ठेवली होती. अर्थात याचा गैरफायदा त्यांनी कधीच दाखविला नाही. त्यांच्या सल्ल्याने महाराष्ट्र चालत होता. त्यांच्याशिवाय निर्णय होत नव्हते. एखाद्या खेड्यातील कार्यकर्त्यांस मी सरपंच व्हावे असे वाटत असेल व ते साहेबांना पसंत असेल तर तोच सरपंच होणार. कै. वसंतराव नाईक ११ वर्षे मुख्यमंत्री होते, तरी

यशवंतरावांच्या शब्दाला पूर्वी जी किंमत होती तीच शेवटपर्यंत होती. त्यांनी सांगावे आणि नाईकसाहेबांनी ते डावलावे असे कधीच घडले नाही आणि याउलट मुख्यमंत्री यांचा निर्णय फिरविण्याचे पातकही कधी यशवंतरावांचे हातून घडले नाही. म्हणजेच मुख्यमंत्र्याचे निर्णय त्यांच्या पूर्वसल्ल्यानेच घेतले जात असतील हे राजकीय सुज्ञांना सांगावयास नकोच.

यशवंतरावांनी जेवढे प्रेम महाराष्ट्राला दिले, आणि महाराष्ट्रातील जनतेने त्यांच्यावर जेवढे अलोट प्रेम केले तेवढे कोणत्याही नेत्याच्या वाट्याला आले नसेल. यशवंतराव म्हणजे आपल्या घरातीलच एक असे प्रत्येक कार्यकर्त्यास वाटे. ते आमच्या घरातील सर्वांशी सलोख्याने वागत. आमच्या घरातीलच ते एक आहेत असे वातावरण तयार झाले होते. प्रत्येक कार्यकर्त्याची आपुलकीने चौकशी करण्याचा त्यांचा स्वाभावविशेष होता. कार्यकर्त्यास मोठे करावयाचे, त्यास संरक्षण द्यावयाचे, वेळप्रसंग आला तर त्या कार्यकर्त्याच्या मागे त्याचे कुटुंबाला रांकेला लावून द्यावयाचे हा जिव्हाळा, प्रेम महाराष्ट्रात त्यांनीच दिले. प्रत्येक कार्यकर्त्यास साहेब आमचे वाट होते. तसे महाराष्ट्रातील साहित्यिकांना, शिक्षकांना, शेतकऱ्यांना, कर्मचाऱ्यांना, पोलिसांना वाटत होते. सर्वांनाच त्यांनी प्रेम आपुलकी दिली. मुख्यमंत्री झाल्यावर प्रथम त्यांनी पोलिसांच्याबद्दल जे उद्गार काढले त्यामुळे महाराष्ट्रातील पोलिस गहिवरून गेला होता. राजकीय लोकांचे वावडे असणाऱ्या साहित्यिकांना त्यांनी केव्हा जिंकले ते कोणासही कळले नाही. ते स्वतःही उत्तम साहित्यिक होते, याची जाण त्यांनी आपल्या साहित्यातून दिली. उत्तम वक्ता असल्याचे आपल्या वक्तृत्वाने सिद्ध केले. कर्मचाऱ्यांचे प्रेम त्यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करीत असताना मिळविले. त्यामुळे त्यांना कर्मचाऱ्यांच्या संपाचा त्रास झाला नाही. याउलट महाराष्ट्रात त्यांच्या नंतर काही प्रश्न उपस्थित झाले तर ते एक सल्ल्याचे ठिकाण ठरले होते. राजकीय जीवनाच्या काही काळात इंदिराजींचे व त्यांचे काही मतभेद

असले तरी शेवटच्या काळात त्यांनी त्यांचे नेतृत्व मान्य केले. जीवनातील सुवर्ण क्षण यशवंतरावांनी अनुभवले तसेच काही अपमानास्पद क्षणही अनुभवले, पण हे सारे क्षण त्यांनी सारख्याच संयमाने पचविले.

स्वातंत्र्यचळवळीतील एक मंतरलेला तरुण, जिल्ह्यातील प्रमुख आमदार, पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान अशा अनेक जागा त्यांनी जीवनात भूषविल्या. सामान्यातले म्हणून जगले. सामान्यातले होऊन राहिले. सामान्य माणसासाठी ग्रामीण तळागाळातील माणसासाठी जे करता आले ते केले. महाराष्ट्रात त्यांच्या शब्दात बेरजेचे राजकारण त्यांनी केले. विरोध वाढू दिला नाही. राजकीय खेळी म्हणून विरोध पक्षातील अनेकांना काँग्रेसमध्ये आणून विरोधक संपविले. पक्ष वाढविला व स्वतःचे शत्रू कमी केले. अशा यशवंतराव चव्हाणांच्या जीवनातील शेवटचा राजकीय काळ तसा शांत व समाधानकारक गेला असे म्हणता येणार नाही. त्यांच्या मनाला क्लेशकारक घटना नंतर घडत गेल्या. इंदिरा काँग्रेस बाहेर आणि नंतर आत येण्याचा निर्णय, शिष्यांनी तो निर्णय नाकारणे, लवकर प्रवेश न मिळणे या त्यांना मानसिक क्लेश देणाऱ्या घटना, पण त्यांचा त्यांनी कधीही त्रागा केला नाही. तेही विष त्यांनी पचविले. पण सौ. वेणूताईंचा सहवास संपणे हे त्यांना पचणारे नव्हते. त्यातून नवीन नेतृत्व मान्य करून आपण राजकारणात फारसा भाग घेऊ अशी उमेदही त्यांच्यात उरली नाही असे भेटी अंती मला वाटले.

त्यामुळे जोपर्यंत जगण्यासारखे काही आहे तोपर्यंतच मरण्यात मजा आहे असे गडकऱ्यांच्या उक्तीप्रमाणे त्यांनी आपले जीवन संपविले असेच म्हणावे लागेल. जीवनात करता येईल तेवढे केल्यानंतर महाराष्ट्र घडविल्यानंतर, देशाला मोठे केल्यानंतर, 'एक नेक आदमी' म्हणूनच यशवंतराव जगले असेच म्हणावे लागेल. त्यांच्या कर्तृत्वाचे ठसे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावलोपावली उमटले आहेत. त्यांनी देशास

खूप काही दिले आहे त्याचे जतन करून गुण जोपासणे हेच आपले कर्तव्य आहे.

## आर. एस्. चोपडे
## मोठ्या मनाचे साहेब

आमच्या महाराष्ट्रात शिवाजी-बाजीच्या पराक्रमाची परंपरा आहे. टाकलेली जबाबदारी यशस्वी पूर्ण करणार नाही तो मराठी माणूस कसला ? मराठी माणसाला तुम्ही मोठे केलेत साहेब ! ६२ च्या चीन युद्धाने भारतास मोठा धडा मिळाला. आपल्या कुशल नेतृत्वाने तुम्ही संरक्षक संरक्षणयंत्रणा उभी केलीत व त्याचेच प्रत्यंतर पुढे पाकिस्तानशी यशस्वी झुंज देण्यात दाखविले. तीन वर्षांत केलेले हे परिवर्तन तुमच्याच कर्तृत्वाचे फळ होते. पंडितजींच्या आकस्मिक मृत्यूमुळे सारा भारत तुमच्याकडे एक आशास्थान म्हणून पाहात होता. एक मुरब्बी राजनीतितज्ज्ञ असा आपला नावलौकिक होता. "प्रतिशिवाजी" च्या रूपात महाराष्ट्र तुम्हास पाहात होता.

पण साहेब, कृष्णाकाठी वाढलेल्या तुमच्या सुसंस्कृत मनात कधी "कपटनीती" व सत्तस्पर्धेचे राजकारण शिरले नाही. स्वकर्तृत्वावर तुमचा विश्वास होता. म्हणूनच तुम्ही स्वामिनिष्ठा ठेवून दिल्लीत राजकारण केले. कित्येक वेळा अवहेलना झाली, पण तुमच्या हिमालयाएवढ्या मोठ्या मनास असले ओरखडे काय करणार तुम्ही मनाचा तोल कधी सोडला नाही हेच तुमच्या विशाल मनाचे द्योतक होते. तुमच्या या विशाल व खंबीर मनाची मशागत ज्या कृष्णाकाठास झाली त्या कृष्णेलासुद्धा तिच्या पुत्राचा रास्त अभिमान वाटला. एका सामान्य कुटुंबात जन्म घेऊन तुम्ही भारताच्या उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचलात, महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचे जणू एक मोहोळ उभे केलेत !

भारताच्या स्वातंत्र्यपर्वात सांगली-सातारच्या रांगड्या सेनेचे नेतृत्व तुम्ही केलेत. भूमिगत राहून प्रतिसरकारचा हिसका तुम्ही इंग्रजी राजसत्तेस दाखविलात, महाराष्ट्रात शिवाजीचे स्मरण करून दिलेत,

शिवाजीने अनेक पराक्रमी मावळ्यांना कार्याची दिशा दिली, त्यांना मोठे केले, तुम्हीसुद्धा अनेक कार्यकर्त्यांना दिशा दाखवली. संधी दिली, त्यांना मोठे केले पण .... शिवाजीच्या जिवाला जीव देणारे जसे बाजी भेटले ते भाग्य मात्र अभावानेच तुम्हाला लाभले ! माणसाच्या पडत्या काळाच त्याची खरी कसोटी लागते. स्वार्थासाठी अनेकांनी तुमच्यावर टीकेचे प्रहार केले !

तुमच्या प्रेरणेने उभी राहिलेली अनेक स्वार्थलोलुप माणसे संधी येताच तुमच्यापासून दूर झाली पण तुमचे विशाल मन यामुळेसुद्धा कधी दोलायमान झाले नाही. अजोड संयमी मनाचे प्रत्यंतर तुम्ही अनेक वेळा दाखविलेत. तुमच्या धीरगंभीर व शांत व्यक्तिमत्त्वाने असे झंझावाती तडाखे अनेक वेळा हसतखेळत स्वीकारले, पण त्याने तुमचा संयमाचा बांध कधी फुटला नाही. तो बांध नव्हताच ! हिमालय होता.

साहेब, तुमची मधुरवाणी अनेकांना दिपावून गेली, तुमच्या तोंडून कधी जळफळाट, द्वेष, राग हा ऐकलाच नाही. एका सभेचा प्रसंग आठवतो. तुमच्या विरोधकाने आपल्या बेताल बोलण्याचे प्रात्यक्षिक त्या ठिकाणी घडविले. तुमची कुचेष्टा केली, वाटेल ते आरोप करून तुमची मानखंडना केली. हजारो मनांस दुखविले, दुसरे दिवशी तुमची सभा होती. तुमच्या एका तापट कार्यकर्त्याने रागात येऊन तुम्हास सुनावले, "आजच्या सभेत याचे उत्तर द्या. चांगले उत्तर द्या. टोलस प्रतिटोला हाणा!" पण साहेब, हसत हसत तुम्ही सांगितले, "गांधी-नेहरूंच्या काँग्रेसने शिव्या देण्यास मला शिकविले नाही." आणि त्या सभेक धीरंगभीरपणे भारतापुढच्या समस्या तुम्ही मांडल्यात ! वैयक्तिक टीकेचा एका अक्षराने उल्लेख केला नाहीत. उलट विरोधी उमेदवाराबद्दल आदराने बोललात ! केवढ्या मोठ्या मनाचे दिग्दर्शन तुम्ही केलेत !

साहेब, महाराष्ट्राच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा तुमचा आहे. महाराष्ट्रास सहकाराची दिशा तुम्ही दिलीत, पंचायत राज्याची नेहरूंची कल्पना ग्रामपातळीपर्यंत राबवून सामान्य माणसास प्रशासनयंत्रणेचा

घटक बनण्याची संधी तुम्ही दिलीत, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संवर्धनात तुमच्याइतके अजोड कार्य कोणत्याही सत्ताधाऱ्याने केले नाही. अनेक कलांना व गुणांना आपण वाव दिलात. त्यांच्या कल्याणासाठी अनेकविध योजना प्रत्यक्षात आणल्यात.

आपण एक अजोड साहित्यिक होता. एकाने म्हटले आहे, "चव्हाणांनी राजकारणात भाग घेतल्यामुळे महाराष्ट्र एका चांगल्या साहित्यकास मुकला !" आपला "कृष्णाकाठ" याची साक्ष देतोच ! आपण कराड येथेच साहित्य-संमेलनास उपस्थित होता. सरस्वतीचा पाईक म्हणून आपण सभागृहात बसला होता. स्टेजवर साहित्यिक होते. आपण आपल्या साहित्यपूजेचे प्रत्यंतर त्या ठिकाणी दिलेत.

## राम खांडेकर
## माणुसकीचे मूर्तिमंत रूप म्हणजेच यशवंतराव

"साहेबांना लोक देवासारखे मानत होते." तसेच "साहेब" ही देवाला मानत होते. "साहेब" प्रवासात असताना मुक्कामाच्या आजूबाजूला एखादे प्रसिद्ध देवस्थान असले तर तेथे गेल्याशिवाय राहात नसत, सातारा जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील देवस्थानात तर ते सौ. वेणूताईंबरोबर अनेकदा गेले आहेत. परंतु त्याचबरोबर काशीचे विश्वनाथ मंदिर व हरिद्वारची "हरी की पावडी" ही त्यांनी कधी चुकविली नाही. परराष्ट्रमंत्री असताना उत्तर काशी येथील माउंटनिंग शाळेच्या कार्यक्रमासाठी गेले असताना तेथून ७०-८० किलोमीटरवर असलेल्या "गंगोत्री" येथे जाऊन गंगेची व शंकराची पूजा करण्यास ते चुकले नाहीत. "साहेबां" ची श्रद्धा केवळ हिंदूंच्या देवांवरच नव्हती, तर इतर धर्मावर देखील त्यांची नितांत श्रद्धा होतीही. अजमेर व निजामुद्दीन (दिल्ली) येथील दर्ग्यावरही ते कधी कधी जात. १९७७ च्या निवडणुकीनंतर जनता राज्य आले. त्यामुळे "साहेब" संसद सदस्य म्हणून होते. एके दिवशी सायंकाळी ते विचारमग्न असताना त्यांना काय वाटले कुणास ठाऊक ते सौ. वेणूताईंना म्हणाले, "आपण आग्र्यास जाऊ." सौ. वेणूताईंना याचा अर्थबोध होईना. तेव्हा ते म्हणाले की, आग्र्याजवळील फत्तेपूर शिक्री येथील सलीम ख्रिस्तीच्या समाधीचे दर्शन घेण्याची इच्छा आहे. ताबडतोब दर्ग्यावरील मखमली चादर, पुजेचे साहित्य आणण्यास माणूस गेला. दुसऱ्या दिवशीच सकाळी साहेब सौ. वेणूताई, मी असे आम्ही फत्तेपूर शिक्रीस गेलो. १५-२० मिनिटे समाधी (दर्गा)चे दर्शन घेतले आणि परत दिल्लीस आलो. केवळ १५-२० मिनिटांच्या दर्शनासाठी साहेबांनी सौ. वेणूताईंनी ९-१० मीटरचा प्रवास प्रकृतीला झेपणे अशक्य असतानाही केला. पण श्रद्धेपुढे त्यांना याचे महत्त्व नसते. सकाळी साहेब घरातील साईबाबांच्या मूर्तीसमोर व

देवासमोर ५-१० मिनिटे नतमस्तक होऊन उभे राहिल्याशिवाय आपल्या खोलीच्या बाहेर पडत नसत.

देव-देवतांवर त्यांची जशी श्रद्धा होती तसाच आदर व जिव्हाळा त्यांचे ठायी वेगवेगळ्या कलाकरांबद्दलही होता. दिल्लीत भरणारी पेंटिंगची प्रदर्शने ते जरूर पाहात व कलाकरांचे कौतुक करीत. आवडलेले चित्र ते हमखास विकत घेत. साहेबांच्या बंगल्यात अनेकांच्या चित्रकृती आजही पाहण्यास सापडतात. त्या वेळी दिल्लीत असलेले चित्रकार श्री. व सौ. साठे, वाघ वगैरे कलाकारांकरिता साहेबांचा बंगला आदराचे स्थान होते. ते वारंवार साहेबांना भेटत असत. मुख्यमंत्री असताना त्यांनी कलाकारांच्या भावनांना ते फार हळुवारपणे जपत असत. नाटक असो वा संगीत पहिल्या शब्दापासून शेवटच्या शब्दापर्यंत बसू शकत असतील तरच ते शक्यतो त्या कार्यक्रमास जात. मधून उठूण जाणे हा ते कलाकाराचा अपमान समजत व तो आपल्या हातून होऊ नये याची काळजी घेत. संगीत आणि नाटक यांची आवड हा साहेबांच्या जीवनातील महत्त्वाचा विरंगुळा. ते दिल्लीतील कार्यक्रम सहसा सोडत नसत. साहेब केंद्रीय गृहमंत्री असतानाची गोष्ट आहे. पार्लमेंट चालू होते. दुसऱ्या दिवशी पार्लमेंटचे खूप काम होते. परंतु किशोरी आमोणकरांचे गाणे कमानी ऑडिटोरियमला आहे हे कळल्यावर साहेब बेचैन झाले. गाणे रात्री १०-३०-११ ला सुरू होणार होते. गाण्याला गेले तर कामासाठी रात्रभर जागावे लागेल. म्हणून विचार चालू होता. शेवटी सौ. वेणूताईंनी मध्य मार्ग काढला. एक राग ऐकून निघून यायचं ठरलं आणि आम्ही गेलो. पहिला राग १२ च्या सुमारास संपला. आम्ही तिघेही उठून मोटारीत बसलो. आयोजकांचा निरोप घेत असतानाच साहेब म्हणाले, “तुम्ही असं करा” तुम्ही घरी जाऊन गाडी पाठवून द्या. मी पूर्ण गाणे संपल्यानंतर येईन आणि साहेब १-३० च्या सुमारास आले आणि रात्रभर ऑफिसचे काम करीत बसले !

"श्री. यशवंतराव राजकारणात गेल्यामुळे महाराष्ट्र एका मोठ्या साहित्यिकास मुकला." असे अनेकदा म्हटले जाते. साहेबांच्या जीवनात त्यांना सर्वांत प्रिय वस्तू म्हणजे पुस्तक होते. कोणी १०००, ५०० ची वस्तू देण्यापेक्षा पुस्तक भेट म्हणून दिले तर त्यांना अधिक आनंद व्हायचा. पण पंचाईत ही व्हायची की, बहुतेक ते पुस्तक त्यांच्याकडे अगोदरच आलेले असायचे. ते इंग्रजी, मराठी नियतकालिकांतील पुस्तक-परीक्षणाचा कॉलम हमखास पाहावयाचे आणि त्यातील निवडक पुस्तके आणायला सांगायचे. इथे मिळाली नाहीत तर मुंबईहून मागवावयाचे. दर महिन्यात त्यांचा पुस्तकसंग्रह वाढत होता. साहेबांचे पुस्तक वाचण्याचे एक मोठे वैशिष्ट्य होते, ते एका वेळी निरनिराळ्या विषयांवरील ६-७ पुस्तके वाचायला घ्यायचे आणि रोज प्रत्येकातील काही पाने वाचायचे. हँडबॅगेत २-३ पुस्तके नक्कीच असायची. प्रवासात ते वाचन करीत. दिल्लीत असले की, रात्री १२-१ नंतर काम संपल्यावर ते वाचन करीत. पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या साहेबांना "साहित्यिका" बद्दल नितांत आदर होता. त्यांच्याशी गप्पा मारणे हा त्यांच्या जीवनातील मोठा विरंगुळा होता.

एकदा वेळेअभावी श्रीमती इंदुमती शेवडे यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ साहेबांच्या निवासस्थानी झाला. महाराष्ट्रातील त्या वेळी काही साहित्यिक आले होते. साहेबांना ऑफिसच्या फाईल्स पाहावयाच्या असल्यामुळे कार्यक्रम लवकरच आटोपता घेतला. कार्यक्रम संपताच साहेब घरात जाण्यास निघाले आणि निरोप घेण्यासाठी ३-४ साहित्यिक मंडळीत गेले. गप्पा सुरू झाल्या आणि तब्बल ४५ मिनिटे या गप्पा हास्यविनोदात उभ्या उभ्या चालू होत्या ! आपण उभे आहोत याचे भानही कुणाला नव्हते !

साहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वापैकी महत्त्वाचे पैलू म्हणजे मित्र भाव, माणुसकी व जिव्हाळा. साहेबांचे सर्व जीवन राजकीय असले तरी त्यांचा इतर क्षेत्रांतील मित्रपरिवार मोठा होता. दिल्लीतील महाराष्ट्रीय मंडळीत असे असंख्य लोक आहेत की ते अधूनमधून साहेबांना भेटत असत.

दिल्लीतील बहुतेक मराठी, बिगरमराठी पत्रकार साहेबांचे चांगले मित्र होते. ही मंडळी सर्वच पक्षाची होती. पण साहेब त्यांच्याशी बऱ्याच वेळा मनमोकळे बोलत. दोघांतही एकमेकांबद्दल आत्मविश्वास होता. अंडरस्टँडिंग होते. या मित्रांच्या शब्दाला साहेब काही वेळा दुष्परिणामाची जाणीव असूनही मान द्यायचे. साहेबांची मैत्री अतूट असायची. साहेबांनी आपणहून मैत्री सोडली असं कधीच झालं नाही, दुसरा पक्ष मैत्री तोडण्याचा विचार करीत असेल तर ती तुटू न देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. म्हणून त्यांच्या विरोधात जाणारे बरेच लोक साहेबांना त्याची कल्पना व कारणमीमांसा अगोदर द्यायचे. मित्रांशी सुखदुःखे ते आपली समजायचे. त्यांच्या अडी-अडचणीसाठी धावून जायचे. मृत्यूपूर्वी १५-२० दिवस अगोदरच त्यांनी आपल्या सातारा भागातील एका मित्रास त्याच्या घरासाठी रु. १,००० देण्याचे मान्य करणारे पत्र लिहिले होते व साताररच्या भेटीत ही रक्कम ते त्यांना देणारे होते. मित्रवियोगाचे दुःखही ते सहन करू शकत नव्हते. या निवडणुकीच्या धामधुमीत काळाने साहेबांचा घास उचलला तसाच मागील सार्वत्रिक निवडणुकीत त्यांचे जीवश्च कंठाच मित्र श्री. किसन वीर यांना देवाज्ञा झाली. त्यांचा फोटो आजही दिल्लीत साहेबांच्या बंगल्यातील देवघरात आहे.

माणुसकीचे मूर्तिमंत रूप म्हणजेच साहेब. ही माणुसकी त्यांनी कधीच ढळू दिली नाही. कोणाचेही नुकसान व्हावे असे त्यांनी स्वप्नातही चिंतले नाही. कोणाकडूनही होण्याची शक्यता वाटत असेल तर त्याला सावध करत. कोणी जर गैरसमज केला तर त्यांना मनापासून वाईट वाटायचे. त्यांच्या माणुसकीला जिव्हाळ्याची सुंदर झालर होती. या दोन गुणांमुळे त्यांनी आपल्या कर्मचारी वर्गास घरगुती वागणूक दिली. त्यांना ते नेहमी आदराने वागवावयचे, कोणाचे नुकसान त्यांनी कधी केले नाही किंवा स्वार्थापायी कोणाच्या हिताच्या, प्रगतीच्या आड ते आले नाहीत. यासंबंधी एक गोष्ट आठवते. ते गृहमंत्री असताना त्यांना पोलिस गार्ड मिळाले होते. आवारात मोसंबीने लदबदलेले झाड होते. या गार्डचा सब-इन्स्पेक्टर

रोज रात्री या झाडावरील मोसंबी नेत असे. माळ्याच्या हे लक्षात आले व त्यांनी सौ. वेणूताईंना सांगितले. त्यांनी या चोरीबद्दल साहेबांना सांगितले. साहेबांनी मला बोलावून हळूच सांगितले की, त्याला एकट्याला बाजूला बोलावून हळूच मोसंबी न नेण्याबद्दल सांगा आणि तशी कुठेही तक्रार करू नका किंवा होणार नाही याची खबरदारी घ्या. मी जेव्हा याचे कारण त्याच्याशी बोलल्यानंतर साहेबांना सांगितले की, त्याचा मुलगा आजारी आहे, तेव्हा त्यांनी सौ. वेणूताईंना त्याच्यासाठी बाजारातून एक डझन मोसंबी आणण्यास सांगितले. साहेबांनी माझ्या आईच्या आजारपणातही केवळ त्या वेळी माझा एक वर्षाचाच संबंध असताना मी काही एक न सांगता सर्व व्यवस्था केली होती. आईच्या निधनानंतर मला बोलावून माझे सांत्वन केल्यानंतर घरच्या अडीअडचणीबद्दल विचारले, त्या वेळी त्यांना कळले की, आई गेल्यानंतर नागपूरच्या माझ्या घरात वडिलांना आधार देणारा मोठा भाऊ, भावजय इंदूरला आहेत. तेव्हा मी न सांगताच त्यांनी मुख्य सचिवांना माझ्या मोठ्या भावाची बदली नागपूरला करून घेण्याबाबत आदेश दिले व स्वतः पाठपुरावा केला.

## मधुसूदन कोल्टटकर
## आठवणीतील यशवंतराव

कराडमध्ये अनेक निःस्वार्थी समाजसेवक निर्माण झाले. त्यांपैकी काही १९२० सालात एकत्र आले आणि त्यांनी लोकमान्य टिळकांच्या नावाने विद्यालय काढले. यशवंतरावजी याच शाळेचे विद्यार्थी आणि मीही याच शाळेतला. "सर्वहि तपस्या साध्यम्" हे मनूचे वचन आमच्या या शाळेचे ध्येयवाक्य होते. तपस्येने प्रत्येत गोष्ट साध्य होते, असा याचा अर्थ त्या काळच्या तरुण पिढीत आणि त्यांच्या मार्गदर्शकांत आजच्या तरुणांतील सर्व काही तुच्छ लेखण्याच्या प्रवृत्तीचा प्रादुर्भाव झाला नव्हता. कराडच्या या टिळक हायस्कूलचे विद्यार्थी आणि शिक्षक, शैक्षणिक पार्श्वभूमी आणि साधनं यांच्याबाबतीत, पुण्याचे नूतन मराठी विद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूल किंवा मुंबईचे बालमोहन विद्यामंदिर आणि चिकित्सक समूह हायस्कूलच्या तोडीचे नव्हते. पण तो काळ अगदी गतिशील होता, आदर्शवादाचं ते युग त्या काळात, या शाळेतील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली, त्यामुळे या शाळेचे काही विद्यार्थी तरी माध्यमिक शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत येऊ शकले. त्या वेळच्या मुंबई राज्याचे मंत्री, श्री. यशवंतरावजी चव्हाण व ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते कुस्तीगीर श्री. खाशाबा जाधव हे या शाळेचा अभिमान विषय बनले होते. एस.एस.सी. परीक्षेत पहिलं येणं ही गोष्ट महाराष्ट्रात अगदी अलौकिक नसेल पण काहीशी अपूर्व स्वरूपाचीच मानली जात असे. काहीही असो, पण कराडच्या टिळक हायस्कूलचा विद्यार्थी म्हणून मला जून १९३५ मध्ये शालान्त परीक्षेत पहिला येण्याचा बहुमान मिळाला होता. माझ्या किंवा माझ्या कुटुंबाच्या दृष्टीनेच नव्हे तर संपूर्ण कराड नगरीच्या दृष्टीनेही माझं यश हे अभूतपूर्व असंच होतं. अभिनंदनाच्या संदेशांचा अक्षरशः ओघ वाहिला. या सर्व संदेशात, मला

अत्यंत अमूल्य संदेश वाटला तो यशवंतरावजींचा. स्वतः मंत्रिपदाच्या जबाबदारीत अत्यंत व्यग्र असूनही त्यांनी मला अभिनंदनाची तार केली होती.

पुण्यास एम. ए. चा. अभ्यास करीत असताना मी केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या आय.ए.एस.च्या परीक्षेला बसलो. १९६० मध्ये मी जेव्हा आय.ए.एस. झालो त्या वेळी माझ्या वडलांनी (त्यांचे आणि यशवंतरावांचे निकटचे संबंध होते) मसुरी येथील राष्ट्रीय प्रशासन अकादमीत प्रशिक्षणाला जाण्यापूर्वी मी यशवंतरावजींची भेट घ्यावी, असा आग्रह केला. १९६० सालच्या मे महिन्यातील तो पहिला पंधरवडा होता आणि दिनांक १ मे १९६० रोजी नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यामुळे यशवंतरावजी यशाच्या शिखरावर होते. साहजिकच ते कामात व्यग्र असत त्यामुळे अगदी अल्प सूचनेने त्यांची भेट घेणे मला कठिणच वाटले. पण जेव्हा त्यांना कळले की, मला फार प्रतीक्षा करावी लागत आहे, तेव्हा त्यांनी त्वरित आपले सचिव श्री. राम प्रधान (जे आतापर्यंत महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव मुख्य सचिव होते) यांना मला भेटायला पाठविण्याची सूचना दिली व वडिलांसमवेत मी यशवंतरावजींकडे गेलो. माझ्या यशामुळे यशवंतरावजींना खूपच आनंद झाला होता. त्यांनी माझे शुभचिंतन केले.

## भु. आ. कुलकर्णी
## मी पाहिलेला महापुरुष

द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाल्याबरोबर एक महिन्याच्या आत साहेब जालन्यास व औरंगाबादेस फिरतीवर आले. माझ्या स्वतःच्या नावागावाबद्दल वैयक्तिक विचारपूस करून झाल्यावर लगेच म्हणाले की उद्याला माझ्यासाठी एक काम करा. मराठवाड्याचा भूगोल मला समजून सांगा. दुसऱ्या दिवशी औरंगाबादेस आल्यावर अर्धा तास समोर नकाशा ठेवून विचारीत राहिले. भूगोलाबरोबर इतिहासाचीही उजळणी सहजच झाली. मराठावाड्याच्या विकासाची आखणी मनोमनी करीत असावेत असे त्यांच्या प्रश्नावरून तेव्हा वाटत राहिले.

याच मुक्कामात सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी मार्गदर्शन करावे म्हणून टाऊनहॉलमध्ये बोलावली होती. वाक्यावाक्यातून प्रशासनावर त्यांची पकड मजबूत आहे असे प्रतीत होत असे. प्रशासनासंबंधी नव्यात नवी पुस्तके त्यांच्या वाचनात असल्याचेही दिसून येई. भाषणाच्या ओघात दोन तीन बीजतत्त्वे त्यांनी सांगितली होती. त्यांचा आमच्यापैकी अनेकांच्या मनावर कायम परिणाम होऊन गेला. ‘हे करू का ते करू’ असा जेव्हा केव्हा तुमच्या मनात संभ्रम निर्माण होईल तेव्हा तेव्हा तुम्ही fundamentals चा मूल तत्त्वांचा व त्यासाठी स्वतःच्या भूमिकेचा विचार करावा म्हणजे संभ्रम नाहीसा होऊन तुमचे कर्तव्य तुम्हाला स्पष्ट दिसायला लागेल असे त्यांनी तेथे सांगितले. अधिकाऱ्यांच्या व राजकीय कार्यकर्त्यांच्या भूमिकांसंबंधी या बैठकीतच ते म्हणाले की त्यांना सारखे असे वाटते की, राजकीय कार्यकर्त्यांनी आजच्यापेक्षा अधिक नाही म्हणायला शिकले पाहिजे आणि अधिकाऱ्यांनी आजच्यापेक्षा अधिक हो म्हणायला शिकले पाहिजे.

एका मुक्कामात साहेबांनी जेवायला आमच्या घरी येण्याचे कबूल केले. चारपाच मंत्री व वीसपंचवीस इतर लोक जेवायला होते. खूप उशीरापर्यंत बोलणी वगैरे झाल्यावर परत जाण्यासाठी गाडीत बसलेले उतरून पायऱ्या चढून वर आले व तुमच्या पत्नीचे आभार न मानताच मी असा कसा परत निघालो होतो असे म्हणत त्यांचे आभार मानून गेले ! अशी केवढी जीवाची धावपळ त्यांची सतत होत असे पण शिष्टाचार न सोडण्याची व लोकसंग्रह वाढवत राहण्याची त्यांची जिद्दही तशीच मोठी होती.

साहेबांच्या वागणुकीत व्यक्तिगत जिव्हाळा अनेकांना लाभला. जमेल तेव्हा ते अधिकाऱ्यांची किंवा कार्यकर्त्यांची वैयक्तिक व कौटुंबिक पातळीवर विचारपूस करायचे. त्या वेळी पोलिस अधीक्षक असलेले आमचे मित्र श्री. त्रिंबकराव पातूरकर एकदा जिन्यावरून पडले. हातास फ्रॅक्चर झाल्यामुळे ती आठवड्यांची रजा घेतली. ती मान्यतेसाठी साहेबांकडे गेली असावी. पुढे दोन महिन्यांनी त्यांची भेट झाली तेव्हा आठवणीने "तुमचा हात दाखवा पूर्ण बरा झाला आहे ना ?" असे विचारीत राहिले.

१९५७ च्या निवडणुकीत हिंगोलीहून आमचे मित्र नारायणराव गोरेगावकर निवडून आले. निवडणुकीच्या धामधुमीचे जमत नाही, कारण पोटाचा विकार आहे असे ते सहज साहेबांकडे बोलले होते. स्वतः नारायणराव ते बोलणे विसरलेही असावेत पण साहेब मात्र विसरले नव्हते. विधानसभेच्या बैठकीच्या पहिल्याच दिवशी साहेबांनी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये त्यांच्या तपासणीची सोय केली होती आणि त्यांना तेथे घेऊन जाण्यासाठी श्री. डोंगऱ्यांना पाठविले होते ! त्या ऑपरेशनचा व शुश्रूषेचा खर्च पण आमदारांना साहेबांनी पडू दिला नाही ! अशा गोष्टी ऐकल्या की, साहजिकच अशा थोर अन् प्रेमळ नेत्यावरून जीव ओवाळून टाकावा असे ऐकणाऱ्यांना वाटायचे.

१९५७ सालची सार्वत्रिक निवडणूक जवळ होती व प्रचारासाठी पंडितजींच्या विराट सभा जालन्यास व औरंगाबादेस झाल्या होत्या.

पंडितजींबरोबर लेडी माउंट ब्याटनही आल्या होत्या. सर्वजण केलास लेणी बघत असता साहेबांनी मला बोलावून सुचविले की, त्यांना जरा बरे नसल्याने ते औरंगाबादेस जरा आधी परतू इच्छिताहेत अशी त्यांच्यासाठी पंडितजींची परवानगी मी घ्यावी. पंडितजींनी हो म्हटलेच पण मलाही डॉक्टर वगैरे बोलावण्यासाठी त्यांच्याबरोबर जा म्हणून सांगितले. त्या परतीच्या प्रवासात गाडीत साहेबांनी जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या कार्याबद्दल अनेक प्रश्न विचारले व मी दिलेली निर्भीड उत्तरे त्यांनाही आवडली असावीत असे मला त्या वेळी तरी वाटले होते.

त्याच दिवशी संध्याकाळच्या विराट सभेत पंडितजींनी पुढे 'औरंगाबादची घोषणा' म्हणून प्रसिद्ध झाले ते भाषण केले. प्रकृती बरी नसल्याने साहेब त्या सभेत नव्हते पण दुसरे दिवशी सकाळीच संभाषणाची टेप आम्ही त्यांना ऐकवली. 'मराठी लोकांना महाराष्ट्र राज्य व्हावे असे खरेच वाटत असेल तर महाराष्ट्र होईलही' अशी पडिंतजींनी त्या सभेत घोषणा केली होती. ते ऐकून मात्र साहेब एकदम प्रसन्न चित्त झाल्याचे दिसले व पडल्यापडल्याच आता तुम्ही तुमच्या महाराष्ट्राच्या संदर्भात कामाची आखणी करायला लागा असे आम्हा सर्वांना सांगू लागले. महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यास त्यानंतर तब्बल तीन वर्षे लागली पण ती घटना लवकरच घडेल असे आशावादी वातावरण मात्र औरंगबादच्या या घोषणेनंतर निर्माण होत गेले हे खरे आहे.

ग्रामीण विकासासाठी जिल्ह्यात एक सरकार नियुक्त मंडळ बनवायचे होते त्यासाठी आम्ही काही प्रस्ताव पाठविले होते. त्यासंबंधी एका भेटीत आपणहून म्हणाले की, सर्व प्रस्ताव चांगले आहेत व सरकार ते जसेच्या तसे मंजूर करणार आहे. उपाध्यक्षांच्या बाबतीत मात्र दैनंदिन येणाऱ्या कारभाराच्या अडचणीचा तुम्ही विचार केलेला दिसत नाही म्हणून तो प्रस्ताव मात्र सरकार स्वीकारणार नाही. एवढे स्पष्टीकरण साहेब स्वतः माझ्यासारख्या एका ज्युनियर अधिकाऱ्यास देत आहेत याचे मला तेव्हा फार हायसे वाटले.

ग्रामीण विकासासाठीही एक विभागीय मंडळ बनवले होते व श्री. बाबासाहेब सावतेकरांची त्या मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक झाली होती. त्या वेळी ते मराठावाडा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षही होते. त्या मंडळाच्या कार्याच्या उद्घाटनासाठी श्री. यशवंतरावजी आले होते. मराठवाड्यासाठी स्वतःची हाडे उगाळून लावली तर त्याची दखलही कुणी घेणार नाही असे साहेब कुणाजवळ तरी बोलल्याचे मी ऐकले होते. असे साहेबांना वाटणे योग्य होणार नाही असे मी आदले दिवशी श्री. सावतेकरांकडे बोललो होतो. त्यानाही त्या वेळी तसेच वाटले असावे, म्हणून समारंभाच्या स्वागताच्या भाषणात त्यांनी साहेबांच्या कर्तृत्वाची व थोड्या काळात केलेल्या भरीव कार्याची तोंड भरून स्तुती केली. समारंभ संपवून सुभेदारीस परत जाताना साहेबांनी विचारले की, आज बाबासाहेबांनी कधी नव्हे असा नवाच सूर कसा लावला होता ? मी म्हणालो की, साहेब, आता परभणी सोडून औरंगाबादला आले आहेत. एवढे एकून साहेब मात्र मोकळेपणाने हासत राहिले. परस्परांच्या मनात काय आहे ते आम्हा दोघांनाही कळले होते. अन् लहानसे का असेना चांगले काम कुणी केले तर त्याचे कौतुक करायचेच असे साहेबांचे नेहमीचेच वागणे होते.

१९५८ साली मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले तेव्हा मराठवाड्यात केवळ पाच सहाच महाविद्यालये होती. नवे विद्यापीठ स्थापन करायला द्विभाषिक राज्याचे शिक्षण मंत्री व अन्य काही मंत्र्यांचा विरोध होता, पण श्री. यशवंतरावजींनी मराठवाड्यातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ आवश्यक असल्याचे आग्रहाने सांगितले व विद्यापीठ कायम केले. नव्या विद्यापीठासाठी आम्ही स्थानिक अधिकाऱ्यांनी ५।६ शे एकर जागा निवडली होती ती (मी औरंगाबादेस तेव्हा जिल्हाधिकारी होतो) त्यांना बघावीशी वाटली म्हणून त्या परिसरात हिंडत असताना मी त्यांना विचारले की या विद्यापीठाचे जन्मदाते व सांभाळकर्ते असे आपले नित्याचे स्थान आहे असे मराठवाड्यातील लोक

म्हणतात ते आपल्या कानावर असेलच, तर ते म्हणाले की हे बघा, मला या विद्यापीठाचा खरा मित्र म्हणून समजलात तरी पुरे आहे.

याच भेटीत पुढे बोलता बोलता राजकारणातील अस्थिरतेबद्दल बोलणे झाले, त्यात 'कुणी कधीही साथ सोडली तरी माझी आई व माझी शाळा मात्र मला कधीही अंतर देणार नाहीत असे ते म्हणाले. त्या काळात एवढी उद्विग्नता त्यांना का होती ते मात्र मला त्या वेळी समजले नाही. तसेच ज्या शाळेचा ते उल्लेख करीत होते ती कराडची एखादी संस्था असावी असे मला वाटले.

१९६०-६१ साली महाराष्ट्राची पहिली पंच वार्षिक योजना तयार केली तीत महाराष्ट्रातील मागास विभागाबाबत साहेबांची जी मते होती ती स्पष्ट झाली आहेत. तुलनेने अविकसित अशी विदर्भ व मराठवाडा या विभागासाठी जादा भांडवली तरतुदी करून त्यांच्या विकासातील अनुशेष दूर करण्याचे तत्त्व प्रथमच या पंचवार्षिक योजनेच्या दस्तैवजात मांडले गेले आहे. साहेब दिल्लीस गेल्यावर या धोरणाचा पाठपुरावा नीटसा झाला नाही व उलट त्या धोरणाशी किंवा त्यांच्या मुळाशी असलेल्या नागपूर कराराशी मांधिलकी नसल्यासारखाच कारभार होत राहिला. त्याचा परिणाम म्हणून दांडेकर समिती व पुढे वैधानिक विकासमंडळाच्या मागण्यांना जोर चढला. साहेबांचे मुख्यमंत्रिपद नव्या महाराष्ट्राला १९६२ नंतर आणखी दहा वर्षे लाभले असते तर विकासात असमतोल कधीही आला नसता आणि महाराष्ट्राची एकात्मता आजच्याहून कितीतरी अधिक दृढ झाली असती. ते दिल्लीस गेल्याने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले हे तर खरेच, पण त्यातही महाराष्ट्रातील मागास विभागांचे व तेथील गरीब जनतेचे फार फार नुकसान झाले व त्यांचे पाऊल विकासाच्या वाटेवर निदान एका पिढीसाठी कायमचे मागे पडले असे मला वाटते.

साहेब दिल्लीस गेल्यावरही ते महाराष्ट्रात व विशेषतः पुण्यास आले तर मी भेटत असे. गंधर्व रंगमंदिर व मंडईच्या नव्या वास्तूंची उद्घाटनेही साहेबांच्याच हाताने झाली होती. साहेबांचा वैयक्तिक जिव्हाळा कायम

होता. भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून अमेरिकेत ह्युस्टनला गेले होते तेथे माझा मुलगा त्यांना भेटला तेव्हा सर्वजण अमेरिकेत निघून आलात की भावंडांपैकी कुणीतरी आईवडिलांजवळ आहे म्हणून आमची चौकशी केली. कै. उद्धवराव पाटलांचा सत्कार साहेबांच्या हाती औरंगबादेस झाला त्या भेटीतही अशीच आस्थापूर्वक चौकशी त्यांनी केली. माझ्या दुर्दैवाने त्यानंतर साहेबांची भेट झाली नाही.

आयुष्यात या महापुरुषाची दर्शने अधूनमधून होत गेली व त्यांच्या मार्गदर्शनात जीवनातील काही वाट चालून झाली त्यामुळे मनाला धन्यता वाटत असते. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रात एवढा थोर प्रभावी नेता कुणी झालाच नाही असे मनोमनी वाटते. पुढचे काय सांगावे ?

## डी. डी. साठे
## यशवंतराव, एक मुरब्बी व निर्णयकुशल प्रशासक

गेली तब्बल ३६ वर्षे मला श्री. यशवंतरावजींचा माझे स्नेही, मार्गदर्शक, तत्त्वज्ञानी आणि प्रेरक म्हणून सहवास लाभला. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांनी मला त्या वेळी मद्रासहून मुंबईत आणले. मद्रासमध्ये मी अवघ्या एका वर्षात संपूर्ण नागरी परिवहनाचे राष्ट्रीयीकरण केले. राज्य परिवहन अधिकारी आणि मोटार वाहतूक नियंत्रक या नात्याने मी विभागीय परिवहन कार्यालयाचा प्रमुख होतो. पेट्रोल व सुट्या भागांचे वितरण इत्यादीवर माझे नियंत्रण होते. त्याशिवाय, मी प्रवासी रस्ते, परिवहन आणि बेस्ट (बी.इ.एस.टी) यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचीही योजना आखली. १ जून १९४८ रोजी ही योजना कार्यान्वित करण्यात आली व १९५३ च्या सुमारास संपूर्ण प्रवासी परिवहनाचे राष्ट्रीयीकरण झाले.

या काळात, यशवंतरावजी मुख्यमंत्र्याचे संसदीय सचिव होते. या योजनेला बऱ्याचजणांकडून विरोध झाला. बस मालकांकडून तसेच राजकीय पुढाऱ्यांकडून विरोध होऊ लागला. त्यामुळे मला श्री. मोरारजी देसाई आणि श्री. बाळासाहेब खेर यांच्याकडून अनेक बाबींसंबंधी सल्ला घ्यावा लागला. या काळात संबंधित बाबींवर मी श्री. यशवंतरावजींशी चर्चा करीत असे. त्या वेळी मी ३० वर्षांचा होतो. सामाजिक तत्त्वज्ञानावरील समान विचारसरणीमुळे आम्ही दोघे एकत्र आलो होतो. त्यांचा उद्देश व्यावहारिक असे. माझ्या राष्ट्रीयीकरणाच्या पद्धतीचे त्या वेळी ते समर्थन करीत.

काही ऑपरेटर्स आमदारांच्या किंवा मंत्र्यांच्या संमतीने काही ठरावीक मार्ग घेऊ नयेत किंवा ते लांबणीवर टाकावेत अशा प्रकारचे अर्ज घेऊन श्री. बाळासाहेब खेरांना भेटले. त्या वेळी मी ते मार्ग का निवडले त्याचे

स्पष्टीकरण त्यांना दिले. त्या वेळी यशवंतरावजींनी आपल्या विनोदी शैलीत मला पाठिंबा देऊन सांगितले की, आपण दुसरे मार्ग निवडले असते तरीही ऑपरेटर्सनी विरोधच केला असता. कारण विरोधाला अंत नसतो.

१९५४ मध्ये माझी धारवाडचे जिल्हाधिकारी म्हणून बदली झाली. १९५६ मध्ये द्विभाषिक राज्याची स्थापना झाली व यशवंतरावजी त्या विशाल राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी माझी विभागीय अधिकारी आणि अहमदाबाद विभागाचे आयुक्त म्हणून नेमणूक केली. ३० नोव्हेंबरला धारवाडहून निघताना मी त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. त्या वेळी महागुजराथ चळवळ जोरात होती. मी त्यांना १९५४ साली माझी राज्य परिवहनमध्ये बदली झाली तेव्हा तेथील महाराष्ट्रीयन लोकांनी मी अती महाराष्ट्रीयनवादी असल्याबद्दल तक्रारी केल्या होत्या या घटनेचे स्मरण करून दिले. असे असतानाही मला अहमदाबादला का नेमले ? अशी पृच्छा केली. तेव्हा यशवंतरावजींनी आपले नेहमीचे स्मित हास्य करून मला सर्व समजावून सांगितले. या कठीण परिस्थितीत माझी खास नेमणूक मुद्दामच केल्याचे विशद केले आणि माझ्या प्रत्येक निर्णयाला आपला पाठिंबा दिला. नंतर आम्हा दोघांनाही हे जाणवले की, महिन्याची ८ तारीख ही हुतात्मादिन म्हणून मानण्यात येत असे. सतत होणारा गोळीबार व हत्या यामुळे हुतात्म्यांची संख्या वाढत होती. त्या वेळी गोळीबार करण्यास माझा विरोध असल्याचे मी माझ्या स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर कळविले. मला आठवते की, ज्या वेळी परिस्थिती तंग होती तेव्हा यशवंतरावजी दगडफेकीची पर्वा न करता गाडी घेऊन मला न्यायला आले. आणि परिस्थिती आटोक्यात आल्यानंतर म्हणाले की, "जोखीम पत्करल्याविना कुठलीही चांगली गोष्ट होऊ शकत नाही." ते कुठल्याही संकटाला नेहमी हसतमुखाने व सामंजस्याने सामोरे जात. यावरूनच ते फक्त राजकारणीच नव्हते तर मुरब्बी प्रशासकही होते, हेच सिद्ध होते.

**साखर कारखान्याची स्थापना :**

साखर कारखान्यांची उभारणी हा यशवंतरावजींचा दुसरा महत्त्वपूर्ण निर्णय. केंद्र शासनाने अधिक (लायसेन्स) परवाने देण्याचे आपले धोरण जाहीर केले होते. त्या वेळी मुंबई राज्यात फार थोडे सहकारी साखर कारखाने होते. मुख्यमंत्र्यांच्या समवेत चर्चा केल्यानंतर, केंद्र शासनाने खाजगी व्यक्तींना नवीन कारखान्यासाठी वा अस्तित्वात असलेल्या कारखान्यांचा विस्तार करण्यासाठी परवाने देऊ नयेत असे केंद्र शासनाला सुचविण्याचे ठरले. परवाने किती द्यायचे हे केंद्र शासन ठरवू शकते. राज्य सरकार उसाची उपलब्धता व इतर बाबींचा विचार करून परवाने कोणाला द्यायचे हे ठरविते. त्यामुळे काही विशिष्ट हितसंबंधीयांकडून विरोध होऊ लागला. ह्या हितसंबंधीयांचा त्यांच्या क्षेत्रात तसेच राजकारणातही प्रभाव होता. यशवंतरावजींनी अतिशय शांतपणे व गोड भाषेत आपल्या सहकाऱ्यांना वस्तुस्थिती समजावून सांगितली व नव्या धोरणामुळे ग्रामीण जनतेचा कसा अधिक लाभ होईल हे त्यांना पटवून दिले. गुजरातसह मुंबई राज्याने फक्त या धोरणाचा अवलंब केला. केंद्र शासनालाही हे फारसे पसंत पडले नाही. परंतु यशवंतरावजींनी या धोरणाचा  पाठपुरावा करून ते संमत करून घेतले आणि त्यामुळे अनेक खेड्यांना संपन्नता लाभली.

## श्रीधर प्रधान
## अशाच काही आठवणी

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दलची माझी पहिली आठवण संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात असताना त्यांनी फलटणहून संयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेविरुद्ध पत्रक काढले होते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते त्यांच्यावर नाराज होते.

याच सुमारास पुणे महानगरपालिकेने यशवंतरावांना बालगंधर्व नाट्यगृहाचे उद्घाटन करण्यासाठी बोलाविले होते. श्री. ए. एस. नाईक महानगरपालिकेचे आयुक्त होते. नाईकसाहेबांना हा समारंभ कसा काय पार पडतो याची चिंता लागली होती. त्या वेळी मी पुण्यास सहायक पोलिस महानिरीक्षकाचे काम करीत होतो. नाईकसाहेबांनी मला या समारंभाचे निमंत्रण दिले.

मला यशवंतरावांबद्दल आदरमिश्रित कुतूहल होते. पत्री सरकारचा प्रमुख कार्यकर्ता, मुंबई मंत्रिमंडळातील एक मंत्री व संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणारा एक पुढारी असलेल्या यशवंतरावांच्या कार्यक्रमाला या कुतूहलापोटी मी पत्नीसमवेत हजर राहिलो.

नाट्यगृहाबाहेर संयुक्त महाराष्ट्र समितीची निदर्शने चालू होती. आतल्या व्यासपीठावर वर पाहुण्यांबरोबर यशवंतराव बसले होते. निमंत्रितांत महानगरपालिकेचे सभासद व माझ्यासारखे थोडे निमंत्रित हजर होते. कमिशनर नाईक यांनी उद्घाटनाचे भाषण करून प्रमुख पाहुण्यांना नाट्यगृहाचे उद्घाटन करण्याची विनंती केली.

यशवंतराव उठून उभे राहिले. त्यांनी बोलण्यास सुरुवात केली, तोच प्रेक्षकगृहामध्ये आरडाओरडा सुरू झाली. महानगरपालिकेच्या एक सदस्या श्रीमती भीमाबाई दांगट धावत स्टेजवर गेल्या. यशवंतरावांना

बांगड्या देऊ करून त्या ओरडल्या, "सूर्याजी पिसाळ, चालता हो !" सभेच्या जागी एकच गोंधळ उडाला. सभागृहाबाहेर पोलिस संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्वयंसेवकांना आवरण्याचा प्रयत्न करीत होते. आत हा गोंधळ चालला होता. कोणी डी.एस.पींना बोलावून आणले. त्यांनी भीमाबाई व त्यांच्या सहकाऱ्यांना बाहेर नेले व सभागृहात पुन्हा एकदा शांतता प्रस्थापित झाली. यशवंतराव उद्घाटनाचे भाषण करण्यास उभे राहिले. हसत हसत पहिलेच वाक्य उच्चारून त्यांनी सर्वांची मने जिंकली. ते म्हणाले, "इतक्या नाट्यपूर्ण पार्श्वभूमीवर जगातल्या कोणत्याही नाट्यगृहाचे उद्घाटन झाले नसेल."

यथावकाश समारंभ संपला, पण यशवंतरावांच्या धीरगंभीर वृत्तीने, समयसूचकतेचे व वक्तृत्वकुशलतेने मी अगदी भारावून गेलो. यानंतर माझा त्यांच्याबरोबर संबंध आला तो, यशवंतराव औरंगाबादला द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री या नात्याने आले त्या वेळेस. तेव्हा मी औरंगाबादला उपमहानिरीक्षक होतो. कोणत्याही प्रश्नाच्या मूळ कारणाकडे जाण्याची त्यांची वृत्ती, तसेच हाताखालील अधिकाऱ्यांवर विश्वास टाकून त्यांच्याकडून आपल्याला पाहिजे त्या प्रकारे काम करून घेण्याची त्यांची हातोटी मी अनुभवली.

मराठवाड्यातील पुढारी मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी औरंगाबादला आले. त्यांनी मराठवाड्यातील पोलिसांविरुद्ध तक्रारी केल्या. दिवसभर स्थानिक पुढाऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्यावर संध्याकाळी मला यशवंतरावांनी सुभेदारी गेस्ट हाऊसवर बोलाविले. लोकांच्या पोलिसांविरूद्ध फार तक्रारी आहेत असे सांगितले.

"लोकांच्या तक्रारी खऱ्या असून मराठवाडा पोलिसांची कार्यक्षमता फार खालच्या दर्जाची आहे," असे मी म्हणालो. सर्वसाधारणपणे "हे तुम्ही सुधारले पाहिजे", असे काहीतरी मुख्यमंत्री म्हणतील असा माझा अंदाज होता. पण तसे न म्हणता कोठल्या तरी पोलिस ठाण्याला भेट देण्याची इच्छा यशवंतरावांनी व्यक्त केली. यावर "उद्या सकाळी आपणास वाटेल

त्या पोलिस ठाण्याला आपण जाऊ व कोठे जावयाचे, ते उद्याच ठरवू," असे मी म्हणालो.

ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास डिव्हिजनल कमिशनर यार्दी व मी सुभेदारी गेस्ट हाऊसवर गेलो व मुख्यमंत्र्यांसह अजिंठा रस्त्याने फुलंब्री पोलिस ठाण्याकडे निघालो. फुलंब्री पोलिस ठाण्यात आपणास काय पहावयास मिळेल अशी विचारणा यशवंतरावांनी केली. "पोलिस ठाणे बंद करून मंडळी घरोघर झोपावयास गेली नसली म्हणजे मिळवली. पोलिस ठाण्यात पोलिस झोपलेले सापडण्याची शक्यता जास्त आहे." मी म्हणालो. आम्ही फुलंब्रीला पोहोचलो त्या वेळी पोलिस ठाण्यातील पोलिस नुकतेच उठले होते व पोलिस ठाणे अतिशय गलिच्छ स्थितीत होते. आम्हाला पाहून पोलिसांची धावपळ झाली. पोलिस ठाण्यातील रोकड रक्कम व महत्त्वाची रजिस्टर्स तपासून आम्ही औरंगाबादला परतलो. परत येताना "मराठवाड्यात अशी परिस्थिती का आहे? "असा प्रश्न यशवंतरावांनी केला. मी त्यांना सांगितले की, "रझाकार चळवळीपासून जी राजकीय अस्थिरता मराठवाड्यात होती, तिचा हा परिणाम असावा." यावर उपाय काय असा दुसरा प्रश्न त्यांनी केल्यावर मी त्यांना सांगितले की, "मराठवाड्यातील पोलिस अधिकाऱ्यांना जुन्या मुंबई राज्यातील पोलिस ठाण्यात कामकाज कसे चालते ते पाहण्याची संधी मिळाली तर इथले पोलिस अधिकारी फार थोड्या अवधीत कामाची पद्धत आत्मसात करतील. कारण ही मंडळी मूळची हुशार आहेत."

यावर यशवंतराव म्हणाले, "प्रधान, नव्या द्विभाषिक राज्याचे अनेक प्रश्न माझ्यासमोर आहेत. हा प्रश्न तुम्ही जर कोणत्याही प्रकारे बिकट न करता हाताळलात तर तुमच्या म्हणण्याप्रमाणे प्रयोग करून पाहण्यास मी तयार आहे. पण माझ्यापुढील प्रश्नांमध्ये आणखी एकाची भर मला नको."

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार हा प्रश्न यशस्वीपणे मी सोडवू शकलो, पण हे कसे काय केले हे सविस्तरपणे सांगण्याचे हे स्थळ नव्हे. पोलिस

अधिकाऱ्यावर दडपण आणण्याकरिता खोटे आरोप केले जातात. असाच एक प्रकार मी औरंगाबादला असताना झाला. या प्रकरणी तपास करून खरा प्रकार यशवंतरावांना कळल्यावर त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्याला दोन शब्द सुनावण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्यामुळे या मुख्यमंत्र्याला सत्याची चाड आहे व योग्य तऱ्हेने काम केल्यास आपणास पूर्ण संरक्षण मिळेल, अशी सर्व पोलिस कर्मचाऱ्यांची खात्री झाली.

त्याचे असे झाले :- एका सकाळी मला मुंबईहून यशवंतरावांचा टेलिफोन आला, "अमुक एका आमदाराची तक्रार आहे की, त्यांनी एका बाईचा हात धरून विनयभंग केल्याची खोटी तक्रार घेऊन त्यांच्याविरूद्ध त्यांच्या गावच्या फौजदाराने खोटा गुन्हा नोंदविला आहे. हा फौजदार सदरहू आमदाराच्या राजकीय प्रतिस्पर्ध्याच्या सल्ल्याने चालत आहे, तरी खरा प्रकार काय आहे ते कळवावे."

या बाबतीत वेळ न गमविता माझ्या रीडर इन्स्पेक्टरबरोबर मी त्या पोलिस ठाण्यास गेलो. हे पोलिस ठाणे औरंगाबादहून शंभर सव्वाशे मैल लांब होते. आम्ही पोलिस ठाण्यात पोहोचलो तेव्हा कार्यालयाच्या मुख्य खोलीत एक सुस्वरूप तरूण स्त्री व तिचा नवरा बसले होते व आतल्या खोलीत सब-इन्स्पेक्टर गावातील दोन-तीन प्रतिष्ठित इसमांबरोबर काही वाटाघाटी करत होते.

हा प्रकार काय आहे, याविषयी चौकशी करताना कळले की, सुमारे तीन-चार दिवसांपूर्वी आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी सदरहू आमदार दारू पिऊन (त्या वेळेस मराठवाड्यातील जिल्ह्यास दारूबंदी कायदा लागू झाला नव्हता) आठवडे बाजारात हिंडत असताना त्यांनी ह्या बाईला पाहिले. तिचा हात धरून ते तिला आपल्या घराकडे घेऊन जाऊ लागले. ही तरुण स्त्री त्या आमदाराची मैत्रीण होती. त्यांचा जुना प्रेमसंबंध होता. परंतु भर बाजारात हात धरल्याने त्या बाईने बोंबाबोंब केली. नवरा फिर्याद करण्यास तयार नसताना तिने त्याला फिर्याद करण्यास भाग पाडले. फौजदाराला आमदाराचे व बाईचे प्रेमसंबंध माहीत असल्याने व सदरहू

आमदार राज्यकर्त्या पक्षातील एक प्रमुख आमदार असल्याने तो आमदाराविरूद्ध फिर्याद घेण्यास नाखूष होता. त्या वेळी त्या बाईने रडून रडून ओरडून सगळे पोलिस ठाणे डोक्यावर घेतले होते.

मी पोलिस ठाण्यात गेलो त्यावेळी गावातील दोन-तीन प्रतिष्ठित गृहस्थ आणि फौजदार त्या बाईची समजूत कशी घालायची याचा विचार करीत होते. ह्या सर्व भानगडीचा तपास पूर्ण करून दोन दिवसात मी औरंगाबादला परतलो. दोन-तीन दिवसांतच मला दुसऱ्या कामासाठी मुंबईस जावयाचे होते, म्हणून तयार केलेला अहवाल पोस्टाने न पाठविता मी बरोबर घेऊन गेलो.

मुंबईस गेल्यावर मी मुख्यमंत्र्यांना भेटलो. इतर बाबींबरोबर टेलिफोनवर सांगितलेल्या तक्रारीचे काय झाले असे त्यांनी मला विचारले. सदरची तक्रार खोटी असल्याचे मी मुख्यमंत्र्यांना सांगितले व म्हणालो "ज्या इन्स्पेक्टरविरुद्ध ही तक्रार केली होती, त्याच्या वागणुकीतील दोष काढावयाचा झाला तर इतकाच की हा अधिकारी फिर्यादी बाईने फिर्याद देऊ नये अगर आमदाराविरूद्ध फिर्याद तिने काढून घ्यावी याबाबत तिचे मन वळवू शकला नाही."

"ही चौकशी कोणी केली ?" असे मुख्यमंत्र्यांनी विचारले. मी स्वतःच चौकशी केली आहे, असे सांगून माझा अहवाल मी त्यांच्या हातात दिला. त्या वेळी विधानसभेचे अधिवेशन चालूच होते. मुख्यमंत्र्यांनी त्या आमदारास बोलावून घेतले. त्यांनी माझ्या समक्ष त्या आमदाराला सब इन्स्पेक्टरविरुद्ध खोटी तक्रार केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांची माफी मागितली !

विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होण्याअगोदर जिल्हा पातळीवरील सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांची एक परिषद मुंबईत भरली होती, त्या परिषदेत नव्यानेच सुरू होणाऱ्या जिल्हा परिषदांसंबंधी, तसेच विकास योजनांविषयी चर्चा झाली. ह्या परिषदेत जिल्हा पातळीवरील कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. तो

म्हणजे जिल्हा कलेक्टर जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांचा मुख्य नसून जिल्हा पातळीवरील समान दर्जाच्या अधिकाऱ्यात पहिला आहे. (Not the head of the district, but number one of the team of equals) हा महत्त्वाचा निर्णय यशवंतरावांनी घेतला. या निर्णयामुळे जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांत व जिल्हा कलेक्टरमध्ये "मोठा कोण ?" या मुद्यांवर ज्या कुरबुरी चालत त्यांना बराच आळा बसला व जिल्हा पातळीवरील कामात बरीच सुधारणा झाली.

पोलिस अधिकाऱ्यांना बऱ्याच वेळा तात्कालिक निर्णय घ्यावे लागतात. यापैकी सर्वच निर्णय बिनचूक असू शकत नाहीत. तसेच चांगल्या तऱ्हेने काम करणाऱ्या अधिकाऱ्याकडूनही अभावितपणे काही चुका होतात. अशा वेळी पोलिस अधिकाऱ्यांना शिक्षा केली तर त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो. अशा वेळी यशवंतराव क्षमाशील वृत्ती धारण करीत आणि चुकलेल्या अधिकाऱ्याला कठोर शिक्षा करीत नसत.

मुंबई राज्याच्या गुप्तचर विभागाचा प्रमुख म्हणून मी कामकाज पाहू लागलो, त्या वेळी द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होण्याचे नक्की झाले होते. महाराष्ट्र व गुजरात या नव्याने होणाऱ्या राज्यांच्या सरहद्दीवरील प्रदेशात संयुक्त महाराष्ट्र समिती व महागुजरात समितीतर्फे प्रचाराचा गदारोळ उठला होता. धुळे जिल्ह्यातील काही गावे गुजरातमध्ये सामील करण्यात यावी या दृष्टीने महागुजरात समिती प्रचार करीत होती, तर डांग महाराष्ट्रात राहिला पाहिजे यावर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रचाराचा जोर होता. जनमानसाचा कानोसा घेण्यासाठी गुप्तचर विभागाचे अधिकारी या भागात रात्रंदिवस फिरत होते.

या दिवसांत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मला बोलाविले व गुजराती समजते किंवा नाही याबद्दल चौकशी केली. मला गुजरातीचे ज्ञान बऱ्यापैकी आहे असे मी सांगितल्यावर त्यांनी गुजरातीत लिहिलेले एक पत्र मला वाचावयास दिले व "वाचा" असे ते म्हणाले.

ते पत्र सुरतेच्या एका मान्यवर पुढाऱ्याने लिहिले होते. त्यात पुढील आशयाचा मजकूर होता :

"द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन माझ्यासारख्या महात्माजींच्या अनुयायांना पसंत नसेल तर ते आमा अटळ आहे असे दिसते. दोन्ही बाजूंना प्रचाराचा गदारोळ उठला आहे. राजकीय प्रचाराच्या वेळी वाटेल ते हत्यार वापरणे जरी उचित असले, तरी माणुसकीची पातळी निदान शासनाच्या अधिकाऱ्यांनी सांभळली पाहिजे, असे मला वाटते. महाराष्ट्रीयन पोलिसांनी व त्यातल्या त्यात सी.आय्.डीच्या अधिकाऱ्यांनी तर लाजलज्ञा गुंडाळून ठेवली आहे, असे दिसते. सोबतच्या काही जुन्या कार्यकर्त्यांची पत्रे पाहा. त्यात लिहिले आहे, की अहवा येथे भरलेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभेसाठी मुंबईच्या सी.आय्.डीं.नी कम्युनिस्ट कार्यकर्त्या श्रीमती गोदावरीबाई परुळेकर यांना सरकारी जीपमधून थेट सभेच्या जागी पोहोचविण्याचा विक्रम केला आहे. पूर्वी अटकेच्या वेळी, कोर्टात नेताना अगर परत आणताना कम्युनिस्ट कार्यकर्ते पोलिसांच्या सरकारी वाहनातून जाताना दिसत. आता पोलिस अधिकारी त्यांना सभेच्या जागेपर्यंत घेऊन जातात व ते सुद्धा गृहखात्याची सूत्रे आपल्या (यशवंतरावांच्या) हातात असताना याचे आश्चर्य वाटते. योग्य वाटल्यास खुलासा व्हावा."

या पत्रासोबत अशाच अर्थाची दोन- तीन कार्यकर्त्यांची पत्रे होती. उल्लेख केलेले पत्रलेखक संयमी कार्यकर्ते म्हणून नावाजलेले होते.

ही सर्व पत्रे वाचून मी सर्दच झालो व चौकशी करण्यासाठी तीन-चार दिवसांची मुदत मागून घेतली. माझ्या कार्यालगत आल्यावर अहवा, नवापून व डांग विभागात कोणाची नेमणूक केली आहे, याची चौकशी केल्यावर कळले की, सदरचे अधिकारी दौऱ्यावर आहेत. दौऱ्यावरून परत आल्यावर मला भेटण्यासाठी त्यांना कळविण्यास सांगितले.

दोन दिवसांनी दौऱ्यावरून परत आल्यावर ते अधिकारी मला भेटले. त्यांच्याकडे चौकशी करता त्यांनी सभेच्या ठिकाणापर्यंत पोलिस

वाहनातून श्रीमती गोदावरीबाई परुळेकर यांना नेल्याचे कबूल केले. हे करण्याचे कारण विचारता ते अधिकारी म्हणाले, "गोदावरीबाईंची सभा अहवा येथे होती. अहवापासून २५-३० मैलांवर जंगलात गोदावरीबाई ज्या मोटारीतून प्रवास करीत होत्या, ती गाडी बंद पडली असल्याचे दिसले. बंद गाडीच्या ड्रायव्हरला तसेच पोलिस जीपच्या ड्रायव्हरला बंद गाडी सुरू करता येईना. हे होईपर्यंत संध्याकाळ होऊन गेली. गोदावरीबाईंच्याकडे अहवापर्यंत जाण्याचे कोणतेच साधन नव्हते. रात्र पडू लागल्यावर "मला जंगलात सोडून जाऊ नका तुमच्याबरोबर न्या " अशी गोदावरीबाईंनी विनंती केली. एकट्या स्त्रीला जंगलात सोडून जाणे योग्य वाटेना, म्हणून मी गोदावरीबाईंना अहवाल घेऊन गेलो." त्या अधिकाऱ्यांनी त्यांची बाजू मांडली.

"बाईंना तुम्ही थेट सभेच्या जागेपर्यंत घेऊन का गेलात ? गावाजवळ का सोडले नाहीत ?"

"साहेब आपण विचारलेल्या प्रश्नाला योग्य उत्तर नाही. गोदावरीबाईंना थेट सभेच्या ठिकाणापर्यंत घेऊन जाणे योग्य नव्हते. ही चूक झाली आहे." ते अधिकारी म्हणाले.

या सर्व चौकशीचा अहवाल मी यशवंतरावांना दिला व सांगितले, की या अधिकाऱ्याकडून नकळत चूक झाली. त्यांचे रेकॉर्ड फार चांगले आहे. शिवाय ते अधिकारी हरिजन आहेत. नकळत झालेल्या चुकीकडे दयार्द्र दृष्टीने ताकदीशिवाय कोणतीही शिक्षा करू नये.

यशवंतरावांनी या अधिकाऱ्याला क्षमा केली. या अधिकाऱ्याचे काम चांगले होते. सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांना अधीक्षकाची पदोन्नती मिळाली. यशवंतरावांच्या या क्षमाशील वृत्तीमुळे महाराष्ट्र शासनातील लहानमोठे अधिकारी स्वतःच्या जबाबदारीवर मोठमोठी कामे करू लागले.

पोलिसांचे काम कसे सुधारता येईल, याबद्दल यशवंतराव मौलिक सूचना करीत. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतरावांनी मला बोलाविले. त्या वेळेस मी गुप्तचर विभागाचा प्रमुख म्हणून काम

करीत होतो. यशवंतरावांनी माझ्याबरोबर गुप्तचर विभागाच्या कामाच्या पद्धतीविषयी चर्चा केली, ते म्हणाले, "एखादी गोष्ट झाल्यावर ती कशी झाली व का झाली, याबद्दल अहवाल पाठविण्याची गुप्तचर विभागाची आजवरची रीत आहे. हे सगळे अहवाल तुम्ही नेहमीप्रमाणे शासनाच्या सचिवांकडे पाठवा. मला मात्र उद्या काय होणार आहे, याची बातमी तुम्ही आज दिली पाहिजे आणि ब्रिजमधील पिन्नेसप्रमाणे आगाऊ दिलेल्या बातम्या कमीतकमी पन्नास टक्के तरी बरोबर आल्या पाहिजेत. या माझ्या सूचनेचे पालन कसे करावयाचे ते तुमचे तुम्हीच ठरवा."

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार दर पंधरा दिवसांनी महाराष्ट्र राज्यात कोणत्या राजकीय घडामोडी होणार आहेत. त्याबद्दलचे एक पत्र मी मुख्यमंत्र्यांना पाठवू लागलो. पुढे होणाऱ्या राजकीय घडामोडींची आगाऊ बातमी काढण्याच्या प्रयत्नामुळे गुप्तचर विभागाच्या कामाचा दर्जा व अहवालांची उंची वाढली. त्यामुळे गुप्तचर विभागाला ज्या गोष्टी अशक्य वाटत असत, त्या शक्य होऊ लागल्या. एके दिवशी मला यशवंतरावांनी त्यांच्या कार्यालयात बोलाविले आणि विचारले, की "अमुक पक्षाच्या अमुक कार्यकर्त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटत आहेत. त्यांना जर शासनाने अटक करण्याचे ठरविले तर तुम्हाला त्यांना अटक करण्यास किती वेळ लागेल ?" "साधारण चार ते पाच तास", "ठीक आहे. मी तुम्हाला योग्य वेळी सांगेन." दोन दिवसांनी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास याबाबतीत कारवाई करण्याचा हुकूम शासनाकडून आला व आम्ही या सर्व मंडळींना पहाटे पाच वाजेपर्यंत अटक करू शकलो.

तसेच एकदा अमुक एका शहरात अमुक वेळी जातीय दंगा होण्याचा संभव आहे, असा अंदाज इतका बिनचूक बरोबर आला की माझ्याजवळ खात्रीलायक बातमीदार आहेत, अशीच सगळ्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची व शासनाची समजूत झाली. वास्तविक ही सगळी किमया यशवंतरावांच्या मार्गदर्शनामुळे झाली होती.

१९६२ च्या युद्धाच्या वेळी यशवंतराव भारताचे संरक्षणमंत्री झाले व त्यांचा व माझा शासकीय संबंध सुटला. तरी पण आमचे वैयक्तिक संबंध तसेच कायम राहिले.

पुढे १९६४ मध्ये माझी दिल्लीत केन्द्रीय गुप्तचर विभागात नेमणूक झाली. त्या वेळी जुन्या संबंधामुळे त्यांच्या बंगल्यावर मला केव्हाही जाता येत असे.

यशवंतरावांमध्ये त्यांच्या मंत्रिपदाच्या मोठेपणाची भावना बिलकूल नव्हती. त्यांना शास्त्रीजींच्या बरोबर ताश्कंदला जावयाचे होते. एका मोठ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची तयारी करावयाची होती, तरी वेळात वेळ काढून यशवंतराव दिल्लीच्या महाराष्ट्र मंडळाच्या मेजवानीस हजर राहिले. इतकेच नव्हे तर जमलेल्या सर्व मंडळींना भेटले, सर्वांच्याबरोबर त्यांनी तास-दीड तास गप्पा मारल्या.

माझ्या मुलाच्या लग्नाचे आमंत्रण मी त्यांना दिल्यावर मुद्दाम दिल्लीहून येऊन यशवंतराव लग्नाच्या स्वागत-समारंभास हजर राहिले.

२६ नोव्हेंबरच्या संध्याकाळी दूरदर्शनवरील कार्यक्रम बघताना यशवंतरावांच्या निधनाची बातमी मी ऐकली व गेल्या जवळजवळ तीस वर्षांच्या विविध आठवणींचा चित्रपट माझ्या डोळ्यांसमोरून गेला.

वाईट इतकेच वाटते की, ह्या चतुरस्त्र बुद्धीच्या राज्यकार्यधुरंधर पुरुषाचा देशाला पाहिजे तेवढा फायदा करून घेता आला नाही.

## विनोदराव
## मला उमजलेले यशवंतराव

प्रशासनाची सूत्रे हाती घेतल्यावर अगदी प्रारंभापासूनच शासन हे सर्वसामान्य जनतेचे हित साधणारे, कल्याण करणारे साधन आहे अशी भूमिका चव्हाण यांनी स्वीकारली होती. प्रशासनातील गुणवत्ता म्हणजेच प्रजाजनाचे कल्याण आणि सुख असे समीकरण त्यांनी मनाशी पक्के केले होते. त्या काळात प्रशासनयंत्रणेत आय.सी.एस. अधिकाऱ्यांचा मोठाच दबदबा होता. या वर्गात त्या वेळी एक प्रकारचा अहंकार असे. परस्परांना चिकटून राहणे हा त्यांचा स्थायिभाव होता. नियमांच्या चाकोरीत राहून निर्णय घेण्याची या वर्गाची वृत्ती असल्याने पूर्वापार चालत आलेल्या प्रशासन पद्धतीत बदल घडवून आणणे तसे फार जिकिरीचे होते. त्यामुळेच मुख्यमंत्री म्हणून नव्याने सूत्रे हाती घेतलेल्या श्री. चव्हाण यांना मोठ्या सावधपणे पावले टाकावी लागली. हे करीत असताना मात्र त्यांनी मनाशी निग्रह केलेला होता. कारण प्रशासनकार्यात सामाजिक जाणीव असल्याशिवाय कोणतेही शासन लोकप्रिय होऊ शकत नाही, हे त्यांनी पुरेपूर ओळखले होते. लोकप्रिय प्रशासन प्रस्थापित करायचे असेल तर मग प्रशासनातील पूर्वापार चालत आलेली विचारपद्धती आणि पूर्वग्रह, तसेच सत्तेचा वापर विशिष्ट मर्यादित राहून करण्याच्या सवयीमुळे आलेली स्थितिप्रियता ही वैगुण्ये प्रयत्नपूर्वक दूर करणे आवश्यक आहे हे त्यांना पटले होते.

श्री यशवंतराव प्रशासनातील भाषेला विशेष महत्त्व देत असत. भाषावार प्रांतरचनेच्या सूत्रानुसार राज्यांची पुनर्रचना झालेली असली तरीही भाषा हा केवळ राज्यांच्या सीमा निर्धारित करणारा घटक नसून भाषेला या पलीकडेही फार मोठे महत्त्व आहे, अशी त्यांची धारणा होती आणि हा विचार पटवून देण्याचा ते सतत प्रयत्न करीत असत. या

गोष्टींचा त्यांना कधीच कंटाळा येत नसे. नव्याने निर्माण झालेल्या प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यात प्रचलित असलेली आणि प्रसारात असलेली भाषा राज्यभाषा म्हणून स्वीकारली हे जरी खरे असले तरीही प्रशासनकार्यात ती भाषा केवळ तोंडाने बोलून चालणार नाही. या भाषेचा प्रशासनात वापर करताना त्यामागे संवेदनशील ह्रदयाची भाषा असायला हवी असे त्यांचे आग्रही प्रतिपादन असे. हा परिणाम जर घडवून आणायचा असेल तर प्रशासनाची कार्य करणारी जी यंत्रणा आहे तिच्या मागे जे मानवी ह्रदय आहे  त्यातही इष्ट ते परिवर्तन घडवून आणायला पाहिजे, असा त्यांचा युक्तिवाद असे. विशेष म्हणजे हा युक्तिवाद त्या काळात वास्तववादी वाटला आणि त्याचा स्वीकार होऊन प्रशासनयंत्रणेतील व्यक्तींना लोकाभिमुख धोरण अंगीकारण्याची अपरिहार्यता पटू लागली.

श्री. चव्हाण यांचे विचार नेहमी मोठे असायचे,परंतु त्यात वादळीपण नसायचा. त्यांची कल्पनाशक्ती उदंड असली तरीही ती हिंसक नसायची. त्यांच्या कल्पनेला व्यवहाराची किनार असायची तर त्यांच्या विचारात आणि आचारात मात्र कल्पकता आणि योजकता असायची. नेहरूंच्या जवळ असलेली स्वप्न पाहण्याची कल्पकता त्यांच्याजवळ निश्चित नव्हती. नेहरूंची कल्पकता ही परतत्त्वाने भारलेली असल्याने ती पृथ्वीवर आकारूच शकत नसे, तर ती अंतराळातच जमिनीपासून वर धुमारत असे. पण यशवंतरावांच्या बाबतीत परिस्थिती अगदी उलट होती. त्यांच्याजवळ कल्पकता असली तरीही त्यांचे पाय मातीत घट्ट रूतले होते, आणि या पायांची पकड अशी घट्ट होती की इतर सर्वसामान्य माणसांच्या पायापेक्षा त्यांच्या पाऊलखुणा वेगळ्या उमटत गेल्या. मातीशी नातं सांगण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व इतरेजनांपेक्षा उंच गेलं होतं. नभाला झाकळून टाकणारं हे व्यक्तिमत्त्व नसले ते ज्या ज्या क्षेत्रात वावरले त्या त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्यानं सर्वांना स्तंभित केले होते. महाराष्ट्राचे नेतृत्व करीत असताना त्यांचा सहवास लाभलेली जी अनेक माणसे आहेत त्यांपैकी मी एक आहे. या सर्व माणसांना यशवंतरावांचा

सहवास आणि त्यांच्याबरोबर केलेले जे कार्य होते त्यापासून निश्चितपणे एक आगळा आनंद मिळाला होता. त्यामुळेच त्यांच्याबद्दल आम्हा सर्व मंडळींना नेहमी कृतज्ञताच वाटत आली.

जेव्हा जेव्हा सामाजिक हिताचा निर्णय घ्यायचा असेल किंवा सामाजिक मोल असलेला एखादा उपक्रम हाती घ्यायचा असेल तेव्हा तेव्हा यशवंतराव नेहमी सनदी अधिकाऱ्यांनाच नव्हे तर तंत्रज्ञ-विशेषज्ञांपेक्षांही फार दूरचा विचार करीत असत. शासनव्यवस्थेला राजकारणाचा रंग येऊ देण्यापेक्षा ही व्यवस्था शुद्ध आणि निखळ व्यवसाय म्हणून राबविणारे जे काही मोजके राजकारणी होऊन गेलेत त्या दुर्मिळ पठडीतील यशवंतराव हे एक प्रखर राजकारणी होते. कोयना प्रकल्पाचा आराखडा तयार होत असतानाच्या काळातील गोष्ट आहे, या प्रकल्पाच्या बाबतीत यशवंतरावांची दृष्टी इंजिनियर्सपेक्षाही फार वेगळं चित्र पाहात होती, कारण त्यांना नजिकच्या भविष्यापेक्षाही, दूरच्या भविष्याची काळजी होती. या प्रकल्पाचे फायदे उद्याच्या पिढीला कसे मिळतील या गोष्टीचा ध्यास त्यांना लागलेला होता.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा जो सोहळा संपन्नल झाला तो विविध भावनांचा एक संमिश्र आनंद सोहळा होता. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वीकारून नवीन राज्यांची जडणघडण करण्यापूर्वी या प्रश्नापवर राष्ट्रीय पातळीवर फार मोठी साधकबाधक चर्चा सुरू होती. या तत्वाचा अनेक मान्यवरांनी अतिशय हिरिरीने पुरस्कार केला होता. परंतु यशवंतरावांनी या संदर्भात फारसा गाजावाजा केला नाही किंवा जाहीर गवगवाही केला नाही. कारण त्यांचा स्वाभाविक कल एकसंधतेकडे होता. एकसंधतेवर त्यांची श्रद्धा होती. परंतु लोकांना काय हवं आहे हे जेव्हा सुस्पष्ट झाले तेव्हा मात्र त्यांनी या प्रश्नाबद्दलची आपली वैयक्तिक मते आणि विचार पूर्णतया बाजूला सारले. कर्तव्यभावनेने ते लोकेच्छेला सामोरे गेले आणि ती लोकेच्छा पूर्ण शक्तीनिशी आणि समर्पणाच्या भावनेतून त्यांनी सफळ संपूर्ण केली.

नव्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे सर्व लोकांनी उत्स्फूर्त आणि शानदार स्वागत केले. रोषणाई पताका थोड्याफार प्रमाणात दारूकाम झाले. परंतु हा समारंभ म्हणजे जणू एखाद्या सणाचा सोहळा असल्याने हे सर्व काही प्रसंगोचितच झाले. या सर्व आनंदसोहळ्यात एक गोष्ट माझ्या मनात कायमची कोरली गेली आहे. मी म्हणजे सर्वधर्मप्रार्थना. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, जैन, ज्यू आदी सर्व जातिधर्मांच्या लोकांनी महाराष्ट्रनिर्मितीचा आनंद सर्वधर्म प्रार्थना म्हणून व्यात केला. या प्रार्थना सोहळ्यात कमालीचे पावित्र्य होते, मनःपूर्वकता होती, आश्वासन होते आणि मानवी जीवनास उन्नत करणारी जी समान मूल्ये असतात, ज्या समान श्रद्धा असतात तयांच्या या सोहळ्यात स्वाभाविक आविष्कार झाला होता. जणू सर्व धर्मांतील ही नीतिमूल्ये नव्याने उदयास येणाऱ्या राज्यात सुरक्षित आहेत, अबाधित आहेत असे अभिवचन या प्रार्थनेतून पुढील पिढ्यांना दिले जात होते. हा भावपूर्ण समारंभ म्हणजे राज्यातील सर्व जातिधर्मांच्या लोकांनी मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांच्या ठायी असलेली न्यायनिष्ठा आणि निःपक्षापातीपणा याबद्दल व्यक्त केलेला विश्वासच होता. यशवंतराव या दोन्ही गोष्टी प्रत्यक्ष प्रशासनकार्यात आणतील याबद्दल व्यक्त केलेला विश्वासच होता. यशवंतराव या दोन्ही गोष्टी प्रत्यक्ष प्रशासनकार्यात आणतील याबद्दल असलेला दृढविश्वासच जणू या प्रार्थनेतून व्यक्त  झाला होता.

१९६१ मध्ये पानशेत धरण फुटले. ही घटनाच अशी काही जीवघेणी होती की अगदी कर्तव्यकठोर माणसाच्या डोळ्यांतही पाणी यावे. या घटनेने यशवंतरावसुद्धा अनावर व्यथित झाले. पानशेतच्या आकांताने त्यांच्याही हृदयाचा बांध फुटला. पानशेत धरणातील पाणलोटाने पुण्याचे, एतिहासिक सौंदर्यच पूर्ण विद्रुप करून टाकले होते. महाराष्ट्राची अस्मिता आणि आनंद याचे माहेर असलेले हे शहर पूर्ण उद्ध्वस्त झाले होते. सर्वत्र भितीचे सावट पसरले होते. साऱ्या शहराला एक प्रकारे स्मशानकळा आली होती. यशवंतराव अस्वस्थतेने शहरातील रस्तारस्ता अथकपणे

फिरत होते. जेवण नाही, तहान नाही की विश्रांती नाही. संकटग्रस्तांचे जातीने सांत्वन करीत होते. त्यांच्या करूण कहाण्या ऐकत होते. त्यांच्याशी समरस होऊन त्यांचे दुःख हलके करीत होते. घरातील वडीलधाऱ्या माणसासारखा धीर देत होते आणि संकटाला सामोरे जाण्यासाठी, पुन्हा सावरण्यासाठी, त्यांना चेतना देत वणवण फिरत होते. हे भावनिक व्यवहार सुरू असतानाच दुसरीकडे कर्तव्यकठोर होऊन तात्काळ विमोचन कार्याबद्दल ते सूचनाही देत होते आणि नंतरच्या काळात करावयाच्या पुनर्वसन कार्यासाठी शासनयंत्रणेला युद्धपातळीवर राबवीत होते. म्हणूनच पानशेतची घटना दोन गोष्टींमुळे चिरंतन स्मरणात राहील. एक म्हणजे या घटनेमुळे अनुभवायला आलेला अपरिमित विश्वास आणि दुसरी म्हणजे या अस्मानी सुलतानीच्या वेळी प्रत्ययास आलेली स्वाभाविक आणि आत्यंतिक मानवता.

यशवंतरावांना सर्जनशील लोकांचा सहवास नेहमीच प्रिय असे. कलावंत, कलाकार आणि प्रतिभावंत यांच्या ठायी असलेल्या गुणांची ते नेहमीच कदर करीत असत. समाजातील या मंडळींच्या सुखासाठी ते नेहमी झटत असत. त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत असत. ते राजकारणी होते, कुशल प्रशासक होते, प्रज्ञावंत होते, देशभक्त होते. लोकशाहीवर त्यांची अटळ श्रद्धा होती आणि त्यांच्या वृती धर्मातीत होत्या. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व या आणि अशा अनेक गुणांनी संपन्न होते. यशवंतरावांचे बाह्यरूप वेगळे होते तरीही अंतःकरणाने ते अतिशय प्रेमळ होते, भावनाशील होते. विशेष म्हणजे त्यांच्याजवळ तरल विनोदबुद्धी होती.

## कृ. पां मेढेकर
## एक आगळे सुसंस्कृत, संवेदनशील व्यक्तिमत्त्व

मी यशवंतरावांना १९५० साली प्रथम पाहिले. त्यांचे व्यक्तिमत्त्व मला अतिशय प्रसन्न वाटले. त्यांच्या रेखीव तरूण चेहऱ्यावर सदैव स्मिताची अस्फुट रेखा असावयाची. त्या दिवसापासून त्यांच्या पाणीदार व्यक्तिमत्त्वाची, कुशाग्र बुद्धीची, प्रेमळ व आपलेसे करून घेणाऱ्या संवेदनाशील स्वभावाची माझ्या मनावर बरीच छाप पडली. १९५६ साली ते मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा मी बृहन्मुंबईमध्ये डेप्युटी पोलिस कमिशनर होतो. थोड्याच महिन्यात भारत सरकारच्या इंटेलिजन्स ब्यूरोमध्ये डेप्युटेशनवर माझी बदली झाली. दिल्लीस रवाना होण्यापूर्वी मी मुख्यमंत्र्यांना भेटण्यास गेलो. तेव्हा ते म्हणाले,– (त्यांचा शब्दन् शब्द मला अजून आठवतो) " मेढेकर, तुम्ही दिल्लीस जाण्यास तयार झालात हे बरेच झाले. महाराष्ट्रातले फारच थोडे अधिकारी मध्यवर्ती सरकारात आहेत, नाही का? गुड लक् टू यू. वेळ मिळेल तेव्हा जरूर भेटत जा." त्यानंतर पुष्कळ वेळा त्यांना आणि त्यांच्या सौभाग्यवतींना-वेणूताईंना मी मुंबईला अगर पुढे त्यांच्या दिल्लीमधील निवासस्थानी भेटत असे. त्यांचे खाजगी सचिव श्री. डोंगरे पुढे येऊन माझे स्वागत करीत.

१९६२ साली यशवंतराव भारताचे संरक्षणमंत्री झाले. काळ कठीण होता, देशावर आलेल्या एका मोठ्या संकटवेळी व सैन्याचे धैर्य खचलेले असताना फारच मोठी जबाबदारी त्यांनी शिरावर घेण्याचे कबूल केले आणि मोठ्या यशस्वीरीत्या ती पार पाडली. ते संरक्षणमंत्री असतानाच्या आठवणी सांगताना महाराष्ट्राचे राज्यपाल एअर चीफ मार्शल श्री. लतीफ परवा म्हणाले, "चव्हाण तज्ज्ञांच्या सल्ल्यास फार महत्त्व देत, मान देत." श्री लतीफ इंग्लंडमध्ये भारताच्या उच्च आयुक्ताच्या कचेरीत एअर ॲटॅची असताना यशवंतराव ब्रिटिश सरकारशी चर्चा करण्यासाठी एक शिष्टमंडळ

घेऊन लंडनला आले होते. अमुक एक ब्रिटिश मेकचे लढाऊ विमान घ्यावे असा त्या परदेशी सरकारचा व काही भारतीय प्रतिष्ठित मंडळींचा जोरदार आग्रह होता. पण भारताच्या संरक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांना व तज्ज्ञांना ते लढाऊ विमान तेवढेसे पसंत नव्हते. विवंचनेत पडलेल्या सल्लागारांना यशवंतरावांनी सांगितले, "तुमचा पूर्ण सल्ला घेतल्याशिवाय मी कोणताही निर्णय घेणार नाही. तुम्हाला ते विमान वापरावयाचे आहे, मला नाही." त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांना मनमोकळेपणाने विचार करता येई व सरकारी दरबारी आपले विचार निर्भयपणे स्पष्ट मांडता येत. एवढा आत्मविश्वास ते आपल्या सहकाऱ्यांत निर्माण करू शकत असत.

आम्हा सरकारी नोकरांना त्यांचे मार्गदर्शन व विचार फारच उद्बोधक व पोषक ठरले. आजच्या महाराष्ट्रातल्या उत्तम व शिस्तबद्ध शासनाचा पाया खऱ्याखुऱ्या अर्थाने यशवंतरावांनीच घातला, सर्वश्री वसंत नगरकर, राम प्रधान, रूसी कांगा, शरद केळकर, श्रीधर प्रधान, एम. जी. वाघ, एम. जी. मुगवे इत्यादी मुलकी व पोलिस अधिकारी यांच्या अनेक आठवणी सांगतात. शासनाच्या सर्व अंगात त्यांना रस होता. कोणत्याही कठीण समस्येबद्दल बोलताना लोकांचे हित कोठे व कशात आहे व शासनातल्या अधिकाऱ्याची भूमिका कोणती असावी व ती तशी का असावी ह्यांचे विवरण ते नेहमीच फारच सुंदररीत्या करीत.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासंबंधी यशवंतरावांचे विचार निर्भय व खंबीर होते. लोकहिताची, भाषणस्वातंत्र्याची, चाड त्यांना असूनसुद्धा पोलिसांना त्यांचे अवघड व लोकांना अप्रिय पण अपरिहार्य असे कार्य करताना संरक्षण मिळावे म्हणून त्यांनी पुष्कळ वेळा आपल्याला न पटणारे राजकीय सुद्धा निर्णय घेतले व निर्भय धोरण पत्करले. राज्याच्या व लोकसभेच्या लोकप्रतिनिधींपुढे विधानगृहात अगर लोकसभेत बोलताना त्यांनी पोलिसांची बाजू तितक्याच धिटाईने व समर्पक रीतीने मांडली. पोलिसांचे नीतिधैर्य खचू दिले नाही. कधीही घाईघाईने अगर प्रखर टीकेच्या आहारी जाऊन फुकाची आश्वासने देऊन ते मोकळे झाले नाहीत.

आम्हाला त्यांचा केवढा आधार वाटायचा, परंतु वेळ पडल्यास उच्च पोलिस अगर मुलकी अधिकाऱ्यास सुद्धा ते खाजगीरीत्या चांगलीच तंबी देत व त्यांचे कुठे चुकते आहे हे दाखवून देत. पण त्यांनी कोठली गोष्ट आकसाने केल्याचे आठवत नाही. पोलिसांच्या प्रशिक्षणात त्यांनी मन घातले व अनेक उत्तम सूचना केल्या. ते भारत सरकारचे गृहमंत्री असताना मी केंद्रीय गुप्तहेर विभागात सी. आय. बी. मध्ये होतो. गृहखात्यातील उच्च अधिकाऱ्यांस ते नियमाने सकाळी भेटत व त्यांचे म्हणणे ऐकून घेत, फार उद्बोधक असे प्रश्न विचारीत व सल्ला देत.

ते समाजवादी विचारांचे होते. पंडितजींचे संमिश्र अर्थव्यवस्थेचे स्वप्न त्यांनी महाराष्ट्रात साकार केले. सहकारातून समाजवाद फोफावला व उद्योगधंदे खेडोपाडी गेले ते यशवंतरावांमुळेच.

यशवंतरावांना वाचनाचा व सखोल अभ्यासाचा नाद होता. कठीण, दुर्मिळ पुस्तके ते प्रवासात सुद्धा भराभर वाचत आणि आत्मसात करीत. समाजवादाचा त्यांच्या तरुण मनावर बराच पगडा होता. हे अगोदर म्हटलेच आहे. पण ते तेवढेच उदारमतवादी होते. त्यांच्या सुसंस्कृत मनाला धर्मवेडाचा अगर जातीयवादाचा व त्यातून जन्मास येणाऱ्या हेव्यादाव्यांचा कधीच स्पर्श झाला नाही. ते पूर्णतया देशाभिमानी होते. म्हणून संकुचित ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादात त्यांची भूमिका स्पष्ट, निर्भीड व उदारमतवादी होती. सत्यशोधक चलवळीबद्दलचे त्यांचे विचार सुप्रसिद्धच आहेत. लोकमान्य टिळक, आगरकर, गोखले, केळकर ह्या पुढाऱ्यांबद्दल त्यांना नितांत आदर होता. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, गोगटे ह्यांसारखे अनेक विद्वान त्यांच्या खाजगी जीवनात मित्र व चाहते होते. त्यांच्यासारखा निर्भय दूरदृष्टीचा व समंजस नेता त्या वेळी जर महाराष्ट्रात नसता, तर महाराष्ट्रातले जीवन जातीयवादाने दूषित झाले असते. जाति द्वेषाच्या रोगाची भयंकर कीड लागून महाराष्ट्राचा “मद्रास” झाला असता. ते समंजस तर होतेच, पण खास करून संभाषणचतुर व उत्तम वक्ते होते. म्हणूनच त्यांची ती सौजन्यमूर्ती माणसे जोडत असे, तोडत नसे. त्यांच्या

आत्मदर्शनात व शहरात ह्याबाबत शोचनीय कटुता आहे तेवढी तेव्हा नव्हती. "माणसे हेरून त्यांना आपलीशी करून ठेवण्याची यशवंतरावांची हातोटी होती." असे प्रसिद्ध पत्रकार श्री. त्र्यं. वि. पर्वते आपल्या स्वानुभवावरून लिहितात. त्यांनी यशवंतरावांची तुलना दुसऱ्या एका महान व्यक्तीबरोबर केली आहे. (न. चिं. केळकर आणि तुलना दुसऱ्या एका महान व्यक्तीबरोबर केली आहे.) साहित्यसम्राट न. चिं. केळकर आणि यशवंतराव चव्हाण ह्या दोघांमधील साम्य दाखवताना ते म्हणतात, "माझ्या मनासमोर तात्यासाहेब केळकरांची मूर्ती उभी राहते. द्वेष न करता वागणे, होईल तितके आपल्या शक्तीप्रमाणे दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हे गुण केळकर व चव्हाण यांमध्ये मला सारखेच दिसून येतात. काव्य, शास्त्र, विनोद, साहित्यप्रेम हे गुण देखील दोघांमध्ये सारखेच दिसून येतात."

कुठल्या कुठल्या क्षेत्रांत त्यांना रस होता म्हणून सांगावे ? पत्रकारांचे ते खरेखुरे हितचिंतक, सन्मित्र व सल्लागार होते. लोकसत्तेचे प्रसिद्ध संपादक श्री. माधव गडकरी म्हणतात, "राजकारणात जर पत्रकारांना कोणी खरीखुरी मदत केली असेल तर ती यशवंतरावांनी." निर्भीड पत्रकारांना त्यांनी संरक्षण दिले. विचार व लेखन स्वातंत्र्याचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांच्यामध्ये सहिष्णुता हा फार मोठा गुण होता आणि त्यांचे पडसाद त्यांच्या अनेक क्षेत्रांतील वास्तव्यात उमटत.

यशवंतरावांचा मूळचा पिंड एका उपजत व नैसर्गिक हळव्या रसिकाचा, उत्तम सखोल अभ्यासूचा, नियतीवर नितांत विश्वास असणाऱ्या एका संवेदनशील मानवाचा होता. पुष्कळांना कदाचित माहीत नसेल, श्री. व्ही. एस. पागे एक गुपित फोडून सांगतात की यशवंतराव एक भावनाप्रधान कवी पण होते. त्यांनी आपले सारे आयुष्य राजकारणात वेचले नसते तर ते आज एक विख्यात समाजवादी, विचारवंत, लेखक, कवी, वा अग्रगण्य समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध झाले असते.

## एक निवृत्त सेवक
## सोफ्याचे भाग्य

यशवंतराव मुख्यमंत्री झाले तेव्हा मी कराडला पी.डब्ल्यू. डी. मध्ये हेडक्लार्क होतो. कराड हे त्यांचेच गाव असल्यामुळे तेथे ते वारंवार येत. एका भेटीत, तिथल्या सरकारी विश्रामगृहातला सोफा चांगला आहे असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांना सोफा आवडला म्हटल्यावर ते जवळपासच्या जिल्ह्यात ज्या ज्या गावी जातील त्या त्या ठिकाणी आवडता सोफा नेण्याचे खात्याने ठरविले. हे काम खात्याने माझ्याकडे सोपविल्यामुळे त्यांचा दौरा असे त्या ठिकाणी सोफा वेळेवर पोहोचेल हे पाहावे लागे.

एका मुक्कामात साहेब आत विश्रांती घेत होते. तिथे असलेले कर्मचारी झाडाखाली डबा खात होते. मी एकटाच जेवत नव्हतो. इतक्यात साहेब बाहेर आले आणि खूण करून मला बोलावीत म्हणाले, “अहो आजची वर्तमानपत्रे पाहायला मिळालेली नाहीत. मिळतील का ?” मी लगेच जाऊन सर्व वर्तमानपत्रे आणून दिली. त्यांनी कुठल्या खात्यात आहात, काय करता याची विचारपूस केली. मी हेडक्लार्क आहे. हे समजल्यावर ते म्हणाले, “अरे माफ करा हं. मग स्वतः कशाला गेलात ? शिपायाला पाठवायचे किंवा दुसऱ्या कुणाला पाठवा म्हणायचे.” मुख्यमंत्र्यांची ही भूमिका पाहून मी थक्क झालो. तेव्हापासून साहेब मला नावाने ओळखू लागले. पुढे कुठल्याही दौऱ्यात भेटल्यावर “काय सोफा ड्यूटीवर का ? “एवढे तरी ते विचारीत.

## ले. ज. शंकरराव थोरात (निवृत्त)
## यशवंतरावांचे प्रशासकीय सामर्थ्य

हा रूढ पद्धतीचा लेख नसून श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दलच्या केवळ काही आठवणी आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही पैलूंचे आंतरिक आकलन करून देणाऱ्या अशा.

यशवंतराव सत्तेवर येण्याच्या आधी थोड्या प्रसंगी त्यांना मी भेटलो असलो तरी त्यांचा खरा परिचय झाला तो १९४६ मध्ये मी ब्रह्मदेशातील युद्धावरून परतल्यावर. कोल्हापुरात माझ्या सत्कारासाठी आयोजित केलेल्या समारंभाचे ते अध्यक्ष होते. समारंभ संपल्यावर त्यांनी मला आपल्याकडे चहाला बोलाविले. मी गेलो. ते सर्किट हाऊसवर उतरले होते. मी तेथे गेलो आणि पाहिले. लोकांची भली मोठी गर्दी त्यांची वाट पाहात थांबली होती.तेव्हा चहा आटोपल्याबरोबर मी जाण्यासाठी उठलो. ते म्हणाले, "थांबा". मी त्यांना सांगितले की, "फार लोक आपल्याला भेटण्यासाठी थांबलेले आहेत." त्यावर ते हसले व म्हणाले, "हे आम्हा राजकारण्यांना काही नवीन नाही. हे लोक जे थांबलेले आहेत ते मला भेटण्यासाठी नाही, तर माझ्याकडून काही मिळविण्यासाठी थांबलेले आहेत. तुमच्या बाबत नेमकं उलटं आहे. तुमच्याकडून मला काही मिळवायचं आहे. तेव्हा आणखी थोडंसं थांबा." मी थांबलो, आणि जवळजवळ अर्धा तास आम्ही जपानी युद्धावर बोललो. त्यांच्या चौकसपणाने मी प्रभावित झालो. माझ्या हेही ध्यानात आले की त्यांच्या सर्व प्रश्नांतून त्यांचे स्वतःचे जागतिक घडामोडीचे सखोल ज्ञान प्रकट होत होते. नेहमी आढळते तसे ते उथळ नव्हते. त्यांचे ज्ञान सखोल व तपशीलवार होते. आणि विशेष म्हणजे बहुतेक बाबींसंबंधी त्यांची स्वतःची अशी मते होती. बहुविध गोष्टींची चर्चा करताना आपली विद्वत्ता दाखवून छाप पाडण्याचा त्यांचा प्रयत्न  नव्हता, की आपली मते मजवर

लादण्याचाही प्रयत्न नव्हता, हेही मला जाणवले व चांगले वाटले. मी जायला निघालो तेव्हा मला पोचविण्यासाठी मजबरोबर ते मोटारीपर्यंत चालत आले. सत्तेवर असणाऱ्या राजकारणी व्यक्तीबाबत ही गोष्ट वेगळी वाटावी अशी होती.

अशाच प्रकारची आमची दुसरी बैठक झाली ती मी कोरियाहून परतल्यावर. त्याही वेळी पूर्वीप्रमाणेच कोरियन युद्धाबाबत तसेच युनोमध्ये युद्धाच्या पूर्वी, युद्धकाळात आणि त्यानंतर घडलेल्या राजकीय कारवायांबाबत त्यांचे ज्ञानभांडार प्रकट झाले.

१९६१ मध्ये मी सैन्यातून निवृत्त होऊन स्थायिक होण्यासाठी कोल्हापुरास आलो. एक-दोन महिन्यांच्या अवधीत काही कामानिमित्त यशवंतरावांचे इथे आगमन झाले. त्यांनी मला संध्याकाळी भेटण्यासंबंधी निरोप पाविला. निरोपात 'आपल्याला थोडा वेळ असेल तर' असा शब्दप्रयोग होता. मी गेलो. त्यांनी महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनचे अध्यक्षपद मला देऊ केले आणि आश्चर्याचा प्रचंड धक्का दिला. मी त्यांना सांगितले की, "मी आनंदाने स्वीकारीन." मात्र त्यांना हीही जाणीव करून दिली, की मला हे पद देऊन आपण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंची इतराजी ओढवून घेण्याची शक्यता आहे. कारण माझे आणि कृष्ण मेनन यांचे संबंध ताणले गेले होते व त्याच कारणाने पंतप्रधानांचेही संबंध ताणले जाण्याचे कारण, चीनने हिमालयावर हल्लास केला तर उत्तरेचे आणि नेफा प्रदेशाचे संरक्षण कोणत्या प्रकारे करावे याबाबत माझे व त्यांचे मतभेद होते. प्रत्यक्ष मॅक्मॅहोन रेषेवरच मी संरक्षण फळी उभी करावी असे त्यांचे म्हणणे होते; तर ते धोरण आत्मघातकीपणाचे ठरेल असे माझे मत होते; कारण रस्त्यांचा अभाव, प्रतिकूल हवामान यामुळे सैन्य इतक्या पुढे रेटून सांभाळणे मला कठीण वाटत होते. हे सगळे सांगून यशवंतरावांना मी म्हटले, "राज्यातील एवढे महत्त्वाचे पद मला दिल्यामुळे पंतप्रधानांच्या व आपल्या संबंधात पेच निर्माण व्हावा हे मला नको आहे." त्यावर ते हसले आणि म्हणाले," मला ते सारं माहीत आहे.

संरक्षणमंत्र्यालाच आव्हान देऊन कमांडर-इन-चीफ होण्याची संधी आपण घालविली हेही मला माहीत आहे. ते काही असो, पंतप्रधानांच्या बाबत आपण निर्धास्त राहा. माझ्याबद्दल विरोधभावना निर्माण व्हावी इतक्या संकुचित मनाचे ते नाहीत. शिवाय, माझ्या राज्याच्या दृष्टीने चांगलं काय हे अखेरीस मीच ठरविणार. माझी खात्री आहे, की आपण महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनवर आल्यानं; कमिशन हे अधिक निर्धास्तपणानं आणि निःपक्षपातीपणानं काम करील असा दृढ विश्वास महाराष्ट्रातील जनतेच्या मनामध्ये निर्माण होईल. "अखेरीस मी विचारले, "मी माझे कर्तव्य पार पाडीत असता कोणाचा हस्तक्षेप होइल काय?"

"यत्किंचितही नाही." त्यांनी ठासून सांगितले," मी तुम्हाला आश्वासन देतो, की मी, माझे मंत्री अथवा अधिकारी यांच्याकडून तुमच्यावर कधीही दडपण येणार नाही." मला ते पुरेसे होते आणि मी मान्यता दिली.

संपूर्ण पाच वर्षे मी कमिशनचा अध्यक्ष राहिलो आणि यशवंतरावांनी आणि त्यांच्यानंतरच्या मुख्यमंत्र्यांनी मला दिलेला शब्द पाळला, हे सांगताना मला आनंद वाटतो. कोणत्याही राज्याला अभिमान वाटावा अशी ही वस्तुस्थिती आहे.

उमेदवाराच्या नेमणुकीबाबत शासनाकडून अथवा व्यक्तिशः मंत्र्यांकडून कधीही दडपण आले नसले तरी कमिशन आणि शासन यांत मतभेद निर्माण होण्याचे काही प्रसंग घडले. हे मतभेद, नियमांचा अर्थ काय करायचा याबद्दल अथवा कार्यपद्धतीबाबत असायचे व यांपैकी निदान काही प्रकरणे मुख्यमंत्र्यांकडे पाठवावी लागत. अशा एकूणएक प्रकरणी यशवंतरावांनी दिलेला निर्णय निःपक्षपाती आणि न्याय्य होता ही गोष्ट नमूद करणे मला अगत्याचे वाटते.

१९६६ मध्ये कमिशनमधून मी निवृत्त झाल्यानंतर काँग्रेसच्या तिकिटावर लोकसभेच्या जागा लढविणे मला आवडेल का, असे यशवंतरावांनी विचारले. ह्या सूचनेने मी अजिबात सुखावलो नसलो तरी यशवंतरावांच्या आणि श्रीमती इंदिरा गांधींच्या आग्रहामुळे मी तयार

झालो. मात्र मी त्यांना विचारले,"मला काँग्रेसचे तिकीट का देऊ करण्यात आले?" "मी यशस्वी झालो तर लोकसभा आणि सैन्यदल यांमधील मी 'पूल' ठरू शकेन," असे त्यांचे उत्तर होते. निवडणुकीत मी पराभूत झालो, पण यशवंतरावांचे प्रयत्न कमी पडले म्हणून नव्हे. खरे तर, माझ्या पराभवाचे दुःख माझ्यापेक्षा त्यांनाच जास्त झाले.

यशवंतरावांनी संरक्षण, गृह आणि अर्थ खात्यासकट बहुतेक महत्त्वाच्या केंद्रीय खात्यांची धुरा सांभाळली. त्यांच्या कारकीर्दीतील शेवटची जबाबदारी म्हणजे भारताचे उपपंतप्रधानपद. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी आपल्या प्रशासकीय सामर्थ्याचा, चोख व्यवहाराचा आणि आपल्या सगळ्या सहकाऱ्यांना आनंदाने एकत्र ठेवण्याच्या प्रचंड क्षमतेचा खोल ठसा उमटविला. ते ज्या वेळी संरक्षणमंत्री होते तेव्हा, सैनिकापेक्षा आपल्याला युद्धातले जास्त कळते असा दावा त्यांनी कधी केला नाही. ते कधीही आक्रमक अथवा असहिष्णू नव्हते. राजकीय आकलनातील कुशाग्र बुद्धिमत्ता आणि प्रशासकीय नैपुण्य, व विद्वत्ता आणि सुसंस्कृतपणा यांचा दुर्मिळ मिलाफ यांच्या ठिकाणी झालेला होता. महाराष्ट्र त्यांचे फार देणे लागतो.

## श्री. प. मराठे
## एक अगत्यशील प्रशासक

श्री. यशवंतराव चव्हाण हे मला चांगले ओळखीत होते आणि मीही त्यांना चांगला ओळखीत होतो. पण ही ओळख राजकारणी मुत्सद्यांमधील नव्हे किंवा घरगुती स्वरूपाचीही नव्हे. तर श्री. यशवंतराव एक मंत्री व मी एक सनदी नोकर यांमधील ती ओळख होती. तरीही त्यांच्या स्वभावाचे निरनिराळे पैलू स्पष्ट होतील असे थोडेफार प्रसंग आमच्या एकूण पंधरा सतरा वर्षांच्या ओळखीत घडलेले आहेत.

सन १९६४ मी सांगलीला सुपरिंटेण्डेण्ट ऑफ पोलिस (S.P.) असतांची गोष्ट आहे. यशवंतराव त्या वेळी गृहमंत्री किंवा मुख्यमंत्री नव्हते. ते सकाळी सांगलीस आल्यावेळी त्यांच्या स्वागताकरिता प्रोटीकोलप्रमाणे मी हजर होतो. परत आल्यावर सुमारे तास दीड तासाने मला त्यांचेकडून बोलावणे आले. मी गेलो. त्यांनी मला एका वेगळ्या खोलीत बोलावून घेतले व आपले म्हणणे सांगितले.

यशवंतराव : अहो त्या XXX एम्. एल्. ए. वरील अफरातफरीची फिर्याद काढता येईल का?

मी — : हे सद्गृहस्थ हरिजन असून एका मल्टिपरपज सोसायटीचे चेअरमन आहेत. ते सेशनमध्ये असताच्या काळातल्या हिशेबांवर त्यांनी सह्या केल्या आहेत व त्या काळातील तारखांचे सांगली मुक्कामाचे चेकही दिले आहेत. अकाऊंटन्ट पैसे खाऊन गायब झाला आहे. सदर M.L.A. नी पैसे खाल्लेले नाहीत. पण सकृतदर्शनी ते दोषी आहेत. त्यांना आरोपी न केल्यास अकाऊंटटचा बचाव असा राहील की चेअरमनने पैसे खाल्ले आणि माझा बळी जात आहे. शिवाय कोर्ट पोलिस ताशेरे झाडण्याचाही संभव आहे. मी कागदपत्र स्वतः वाचले आहेत.

मी इतकेच करू शकतो की, कोर्टाने त्या M.L.A. ना डिस्चार्ज केल्यास सरकारी वकील हरकत घेणार नाही. त्याची हमी मी घेतो. या उपरही त्यांचेवरील फिर्याद काढून घ्यावी असे आपले म्हणणे असेल तर सरकारी लेखी आदेश असणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री यशवंतराव : — अन्याय्य आदेश सरकार कसा देईल ?

म्हणजे त्या प्रकरणावर पडदा पडला. मंत्री असतानाही त्यांची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होती, नाही का ?

सन १९६४ सालीच दिवाळीचे दिवसांत त्यांना मी फराळाचे आमंत्रण दिले व श्री वसंतदादा पाटील यांनी त्यांना वेळात वेळ काढून आमचेकडे आणावे असे ठरले. त्याप्रमाणे एका सायंकाळी ते हजर झाले. माझा मोठा मुलगा मनोहर हा उत्तम कविता करीत असे. वयाचे आठवे वर्षापासून त्याचा हा छंद होता त्याचा "फुलोरा" नावाचा संग्रह प्रसिद्ध झाला होता. तो त्यांना चाळण्यासाठी मी दिला. यशवंतरावांनी आधी फराळ न करता तो कवितासंग्रह चाळला व आपला अभिप्राय दिला. तो खालील प्रमाणे:—

चि. मनोहर मराठे यास अनेक आशीर्वाद.

तुझ्या कविता आज चाळून पाहिल्या. कवी जन्मावा लागतो असे जे म्हणतात ते तुझे वय व तुझ्या कविता वाचल्यानंतर खरे वाटू लागते. जन्मजात प्रतिभेला व्यासंगाची जोड मिळाली तर तुझ्या हातून (classic) अक्षर-वाङ्मय निर्माण होईल असा विश्वास वाटतो. तुझ्या भोवतालच्या जगाकडे सहानुभूतीने पाहून तू तुझे जीवन अनुभूतीने समृद्ध करशील, तर भारताला हवी असलेली जिवत वाणी तुझ्या कवितेतून ऐकावयास मिळेल यात मुळीच शंका नाही.

माझ्या सर्व शुभेच्छा !

सांगली यशवंतराव

चव्हाण

अभिप्राय लिहिल्यानंतर त्यांनी फराळ केला. यावरून त्यांच्या रसिक मनाची कल्पना नक्कीच येते !

हा माझा मुलगा कॅनडामध्ये पंचवीस वर्षांचा असता मोटर अपघातात जागचे जागी दिवंगत झाला. त्याची यशवंतरावांना कल्पना नव्हती. निवृत्त होण्यापूर्वी पुण्याच्या सर्किट हाऊसवर त्यांना भेटून निरोप घेण्यासाठी मी गेलो होतो. अगत्याने त्यांनी 'आपला कवी मुलगा काय करतो ?' म्हणून चौकशी केली. त्यांना मी दुःखद हकिगत सांगताच दिलगिरी व्यक्त करून आपणास दुखविण्याचा माझा इरादा नव्हता. परंतु माहित नसल्यामुळे मी चौकशी केली असे उद्गार काढले.

त्यांचे टासीव अगत्य, तसेच मनाचा हळुवारपणा, या घटनेने स्पष्ट होतो.

## एन्. आर. खालावडेकर
## नाते जिव्हाळ्याचे

श्री यशवंतराव चव्हाण यांच्या सुरक्षा व्यवस्थेमुळे १९४८ सालापासून त्यांच्याशी मला जवळीक लाभली व त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू पाडता आले. हवालदार असल्यापासून पोलिस इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त होईपर्यंत मला हा योग लाभला.

१९४८ !

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा कालखंड. कॉंग्रेस पक्षाची मंत्रिमंडळे अस्तित्वात आली होती. त्या वेळच्या सातारा जिल्ह्यातील काही घडामोडींमुळे त्या जिल्ह्यातील काही नेत्यांच्या संरक्षणाकडे खास लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरातल्या भेटीच्या वेळी त्यांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. त्या वेळी मी सातारा पोलिस स्टेशनमध्ये हवालदार म्हणून काम करीत होतो. परंतु हे काम अत्यंत जबाबदारीचे आणि गुप्ततेचे असल्यामुळे मला माझ्या पोलिस खात्यातल्या नोकरीचा सुगावा लागू न देता चोवीस तास "साहेबां"च्या सान्निध्यात राहावे लागे ! मला कोणी ओळखू नये, यासाठी मी अशा वेळी एखाद्या सर्वसामान्य कार्यकर्त्याची भूमिका वठवित असे. संपूर्ण खादीधारी वेशात त्यांच्याबरोबर राहणे सर्वच दृष्टीने सोयीचे होते.

त्या वेळी विट्यापासून जवळच असलेल्या हनुमंतवाडी या खेडेगावातील आपल्या एका वृद्ध नातेवाईक स्त्रीच्या घरी साहेब गेले होते. सोबत लहानमोठे कार्यकर्ते आणि अधिकारी होतेच. त्या घरी जाताना त्या वृद्ध बाई त्यांना पाहून बाहेर आल्या. यशवंतरावांना पाहून त्यांना गहिवर आला. त्यांनी त्यांच्या कानशिलावरून बोटे फिरविली आणि म्हणाल्या, "कौन, येशा हाये व्हय ? लोक म्हनत्यात तू राजा

झालास म्हून ?” इतक्यात त्या घरातील एक लहानसा सहा-सात वर्षांचा मुलगा धावत धावत बाहेर आला. मळक्या कपड्यातल्या, शेंबूड आलेल्या त्या पोराने मिठी मारल्यामुळे श्री चव्हाणांचे परीट घडीचे कपडे मळले.” ते पाहून त्या वृद्ध स्त्रीने “द्वाड कुठलं ! त्याचं धडुतं वाईट करतोस व्हय?” असे म्हणून त्याला दोन चार धपाटे घातले. साहेब कळवळले आणि त्यांनी भोकाड पसरणाऱ्या त्या मुलाला उचलून घेतले.

आपले कपडे खराब होतील याची पर्वा न करता ते म्हणाले “मावशी का मारतेस त्याला? खरं म्हणजे माझंच चुकलं ! मीच येताना काहीतरी खाऊ आणायला पाहिजे होता. देवराष्ट्रात असताना मी का कमी घाण करत होतो ? त्या वेळी तुम्ही मला अंगाखांद्यावर घेऊन खेळवीत होताच ना ? त्या वेळचा मी तुमच्या समजुतीप्रमाणे राजा झालो आहे. हा तर स्वातंत्र्यात जन्माला आलेला आहे. आज तो कसाही वागला तरी उद्या छत्रपती का होणार नाही ?” असे बोलून त्यांनी मला ताबडतोब खाऊ आणावयास पाठवून दिले.

साहेबांच्या केवळ कनवाळू वृत्तीचाच नव्हे तर स्वातंत्र्य काळातील मुलांना मिळणाऱ्या अनेक गोष्टींचा त्यांच्या नजरेसमोरचा आलेखही या प्रसंगातून जाणवत राहतो.

साहेबांची १९४८ च्या सुमाराचीच ही आणखी एक आठवण. कऱ्हाड येथील मामलेदारांच्या कार्यालयाला भेट देण्यासाठी निघाले होते. त्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारापाशीच ते स्तब्ध उभे राहिले. काय झाले ते क्षणभर कोणालाच कळले नाही. नंतर त्यांच्या बोलण्यावरून त्या गोष्टीचा उलगडा आम्हा सर्वांना झाला.

तेथे उभे असताना साहेबांच्या दृष्टीसमोर क्षणभर गतेतिहास जिवंत झाला होता. जेथे स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांना व त्यांच्या सवंगड्यांना काही वेळा स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते, तीच ही जागा होती. या आंदोलकांच्या घरची मंडळी त्या वेळी त्यांच्यासाठी जेवणखाण घेऊन आली, की त्यांना बंद फाटकाबाहेरच थांबावे लागे. इतकेच नव्हे तर त्या

वेळचे फौजदार या सर्व लोकांना जरब बसावी म्हणून आंदोलकांना हंटरने मारत व आरडाओरडा करून सर्व नातेवाईकांना घाबरून सोडत. त्या वेळची मनःस्थिती अतिशय अस्वस्थ करून टाकणारी असे आणि त्याच ठिकाणी ते वेगळ्या परिस्थितीत आले होते !..... परिस्थितीत केवढे अंतर पडले होते?....

१९४८-४९ चा सुमार होता. मध्यंतरी सौ. वेणूताई खूपच आजारी असल्यामुळे त्यांना मिरज येथील इस्पितळात ठेवण्यात आले होते. शक्य होईल त्या त्या वेळी साहेब इस्पितळात येऊन जात असत. बऱ्याच दिवसांच्या औषधोपचारानंतर त्यांची प्रकृती पूर्ण बरी झाली. त्याप्रमाणे साहेबांना कळविण्यात आले. साहेबांच्या इस्पितळातील या भेटीच्या वेळीही नेहमीप्रमाणे मी सावलीप्रमाणे त्यांच्याबरोबर होतोच.

साहेबांच्या भेटीच्या वेळी डॉक्टरांनी त्यांना वेणूताई आजारातून पूर्णपणे बऱ्या झाल्याची खात्री दिली. पण त्याचबरोबर शरीर संबंध टाळण्याचीही सूचना दिली. शरीर संबंध वर्ज्य न केल्यास तो जीवितालाच अपात्र ठरण्याचीही शक्यता सांगितली. डॉक्टरांच्या या सूचनेनंतर क्षणभर दोघेही अवाक् बनले. त्यातून प्रथम सावरल्या त्या वेणुताई. अश्रुपूर्ण नेत्रांनी त्या साहेबांना म्हणाल्या, "डॉक्टरसाहेब काय म्हणालेत ते एकलंत ना? आपल्या कुलाला कुलदीपक हवाच. पण मला ते शक्य नाही. आपण आता दुसरं लग्न केलंच पाहिजे. हीच माझी इच्छा आहे." त्यांचे हे मनोगत एकणारे साहेब गहिवरले आणि सद्गदित शब्दांनी त्यांच्या दोन्ही दंडांना धरून म्हणाले, "वेणू माझ्या आयुष्यात तुझ्याशिवाय दुसरी स्त्री येणेच शक्य नाही. मला कुलदीपक नसला तरी चालेल,पण तुझ्याशिवाय माझ्या जीवनाला अर्थ राहणार नाही. माझ्या अखेरच्या क्षणापर्यंत तूच माझी जीवनसाथी राहशील. दुसरं लग्न मी कदापिही करणार नाही."

उत्कट भावनेने ओथंबलेले साहेबांचे ते शब्द एकून वेणूताईही उत्कटतेने अश्रू दाटू लागल्या.त्या दोघांच्या आयुष्यातला तो भावनोत्कट

क्षण पाहून मी अक्षरशः भारावून गेलो. आपले वचन साहेबांनी अखेरपर्यंत अत्यंत निष्ठेने पाळले!

साहेबांच्या बरोबर वावरण्याची मला संधी मिळाली, त्यांच्या जिव्हाळापूर्ण वागणुकीचा अनुभव अनेकदा मला घेता आला. माझ्यासारख्या एक सामान्य माणसाला त्यांनी अगदी घरगुती जिव्हाळ्याने वागविले. केवळ त्यांच्याबरोबर "ड्युटी" असतानाच नव्हे, तर नंतरही त्यांनी अगदी अगत्यपूर्वक आठवण ठेवून विचारपूस केल्याचा अनुभवही मला घेता आला. हा जिव्हाळा, ही एकरूपता फार कमी ठिकाणी आणि फार कमी वेळेला अनुभवता येते.

## शंकरराव साळवी
## भारतीय खेळांचा त्राता : यशवंतराव चव्हाण

भारतीय खेळाडू खुद्द भारतातही उपेक्षिलेले. कुठे संघटना कमी पडते, तर कुठे शासकीय पाठिंबा तोकडा पडतो. यातून खेळाडूंचा उत्साह कमी होत जातो. या पार्श्वभूमीवर या खेळांच्या विकासासाठी, वाढीसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना उत्साह देणारे, नवीन कल्पनांना पुढे नेणारे, भूमिकानिष्ठ आणि रसिक नेतृत्व म्हणजे ना. यशवंतराव चव्हाण. यांच्या नेतृत्वाची जाण आमच्या धडपडणाऱ्या संघटनांना कार्यक्षम ठेवण्यात नेहमीच उपयोगी ठरली आहे. कबड्डी, खोखो, कुस्ती, आट्यापाट्या या सर्वही खेळांबद्दल यांना कळकळ होती. ज्या संघटनांच्या संचालकांनी त्यांची साथ घेतली त्यात अखिल भारतीय स्वरूपात चांगला बदल झालेला दिसतो. यशवंतराव त्या संघटनांमागील खंबीर नेतृत्व होते.

कबड्डी हाच खेळ घ्याना ! आज आपल्याला हे कबड्डीचे पीक देशाच्या कानाकोपऱ्यात वाढलेले दिसते आहे. कबडीचा दम देशाच्या प्रत्येक भागातून घुमताना दिसतो आहे. एवढेच नव्हे तर श्रीलंका, नेपाळ, पाकिस्तान, मलेशिया, सिंगापूर, जपान, यासारख्या महत्त्वाच्या आशियायी देशांतही या संघटना नव्याने पसरल्या आहेत. वर्षाकाठी आज भारतात जवळजवळ २५०-३०० कबड्डी सामने सहज होतात. "गल्ली ते दिल्ली" असा या खेळाचा प्रसार. या सर्व गौरवाचे मागे असलेल्या कष्टांना महत्त्वाचा आधार यशवंतरावांचाच; त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि प्रत्यक्ष सहभागाचा, निखळ उत्साहाचा. म्हणूनच कबड्डीच्या संबंधित सर्वांनी याबद्दल त्यांचे ऋणी राहिले पाहिजे.

भारताच्या वेगवेगळ्या भागात चित्रविचित्र नावानी ओळखला जाणारा हा खेळ. महाराष्ट्रात हुतुतू, कर्नाटकात चिटुगुडू, प. बंगालमध्ये हाडुडुड.

त्यांच्या नियमावलीही वेगळ्या. थोडक्यात प्रश्न होता तो या बहुगुणी वेगवान खेळाला एका नियम संस्थेच्या नियंत्रणाखाली आणून अखिल भारतीय स्वरूप देण्याचा उत्साही व आर्थिक बळासाठी यशवंतरावांनी आपल्या आपुलकीने जवळ केले. आमच्या प्रत्येक नवीन कल्पनेला त्यांनी मान्यता दिली. आणि ती प्रत्यक्षात येण्यासाठी प्रयत्नही केले. "एक खेळ, एक संघटना" याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे यशवंतराव मुख्यमंत्री असताना १९६९ साली मुंबईत आयोजित झालेली पहिली कबड्डीची राष्ट्रीय स्पर्धा. स्थळ होते सेंट झेविअर्स कॉलेजचे क्रीडांगण. प्रथमच झालेल्या या कबड्डीच्या सोहळ्यात व धुराळ्यात प्रेक्षक अक्षरशः हरवून गेले. पण हरवून गेले ते स्वतः यशवंतराव ! त्यातूनच दरवर्षी "आंतरभारती" द्वारे अशा सामन्यात महाराष्ट्राने रंगून जावे या यशवंतरावांच्या प्रेरणेतूनच "आश्विनकुमार भोईर सूवर्णचषक" स्पर्धेचा जन्म झाला. मी हट्ट धरला. सामन्यांच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हवेत म्हणून. यशवंतरावांनी तात्काळ ते मान्य करून उद्घाटनासाठी खरोखरच पंडितजींना पाचारण केले. गर्दी आणि उत्साह खूपच वाढला. "भोईर चषक" महाराष्ट्रात कित्येक स्थानांवर आजपर्यंत उत्साहाने साजरा होत आला आहे.

खेळाडूंना त्यांच्या खेळाकडे पूर्ण लक्ष पुरविण्यासाठी आर्थिक संरक्षण मिळणे आवश्यक असतेच. विशेषतः देशी खेळाद्वारे ते स्थैर्य फारसे मिळू शकत नाही. म्हणूनच यशवंतराव खेळाडूंना क्रीडांगण गाजवल्यानंतर गौरवचिन्हे देऊनच थांबले नाहीत, तर त्यांना बँक व सरकारी कचेऱ्या यांतही अशा खेळाडूंसाठी नोकरीच्या सोयी करून देण्याचा विचार केला. या योजना कार्यान्वित श्री. शरद पवारांनी केल्या. तरी मूळ उगम यशवंतरावांकडूनच झालेला आहे. पायाशुद्ध कृतींची सवय असल्यामुळे यशवंतरावांना कला, साहित्य, क्रीडा यांच्या स्वतंत्र हेतू असलेल्या संस्था अस्तित्वात असाव्यात असे फार वाटायचे.

यशवंतरावांनी फक्त प्रेक्षकांचा आणि खेळाडूंचाच विचार केला नाही तर त्याहूनही आपुलकीने त्यांचे कार्यकर्त्यांच्या सोयीकडे बारकाईने लक्ष असे. माझ्या रशिया, इंग्लंड, रोम, पॅरिस अशा परदेशी दौऱ्यांची त्यांनी नेहमीच पडद्याआडून काळजी घेतली. कुठेही वाच्यता न करता सहानुभूती म्हणूनच त्यांनी अशा वैयक्तिक गोष्टींकडे लक्ष पुरवले. एखादा विश्वासाचा वा भरंवशाचा माणूस मिळाला की त्याच्यामागे यशवंतराव पूर्ण उभे राहात असत. ते सर्व वैयक्तिक व शासकीय पाठिंबा देऊन !

मुंबईत मिलकामगारांचे वार्षिक कबड्डी सामने चालू होते. त्याचा बक्षीस समारंभ मात्र भाड्याच्या स्टेडियमवर. मी यशवंतरावांना म्हटलं, "हे एवढे गिरण्याचे नवकोटनारायण. त्यांच्या कामगारांच्या सामन्यांचे पारितोषिक समारंभ भाड्याच्या स्टेडियमवर व्हावेत ?" हा एवढा प्रश्न त्यांना नवीन संकल्प सोडण्यासाठी पुरला. त्याच दिवशी संध्याकाळी समारंभात यशवंतरावांनी कामगारांसाठी खास स्टेडियम उभारण्याची घोषणा केली आणि म्हटले, "आर्थिक काळजी करू नका. गिरण्यात पडून असलेल्या व कामगारांनी न घेतलेल्या पगार बाकी फंडाची सरकार यासाठी मदत करेल." मुंबईतील सेनापती बापट रोडवरील कामगार स्टेडियमची सुरूवात ही अशी झाली.

## अनंतराव जाधव
## स्पष्टवक्ते साहेब

ही कथा सन १९५९-६० सालातील आहे. त्या वर्षी श्री. वासुदेव बळवंत गोगटे हे पुणे महानगरपालिकेचे महापौर होते. त्याच वर्षी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची सभा आणि काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा पुण्यात भरली होती. त्यानिमित्ताने अखिल भारतातून नामवंत कीर्तीचे पुढारी पुण्यात आले होते. या सर्वांना भोजनासाठी व सत्कारासाठी पुणे महानगरपालिकेने तिच्या मुख्य कार्यालयाच्या नवीन इमारतीत आमंत्रित केले होते. दुर्दैवाने स्थानिक काँग्रेस सभासदांनी या समारंभात भाग घेण्याचे नाकारले होते.

या समारंभासाठी इमारतीच्या दक्षिण बाजूकडील मोकळ्या पटांगणात एक सुंदर शामियाना उभारला होता. या शामियानाचे दोन भाग केले होते. एक व्यासपीठाचा व दुसरा बैठकीचा. दोन्ही ठिकाणी भोजनाची व हात धुण्याची व्यवस्था होती. व्यासपीठावर व्ही.आय.पी.साठी खास व्यवस्था होती. शिवाय विजेचे रंगी-बेरंगी दिवे लावून भरपूर शोभा आणली होती. भोजनासाठी महाराष्ट्रीय पद्धत होती. ताट, वाट्या वगैरे.

समारंभाच्या वेळी म्हणजे सायंकाळी ठीक ८ वाजता पंडित जवाहरलाल नेहरू यांची मोटर पोर्चमध्ये येऊन थडकली. त्या वेळी पाच-सहा मंडळीच उपस्थित होती. सुदैवाने महापौर गोगटे उपस्थित होते. पंडितजी दिसताच महापौरांची धांदल उडाली. महापौरांनी पंडितजींना एकदम तिसऱ्या मजल्यावर नेले. तेथील सभेचा हॉल, महापौर कार्यालय व समिती-कार्यालये दाखविली. कॉर्पोरेशन सभेचा हॉल व तेथील फर्निचरची मांडणी पाहून पंडितजी एकदम म्हणाले, “Here Corporators Will be fulled to sleep.”

इमारतीचा काही भाग दाखविल्यानंतर महापौर हे पंडितजी यांच्या समवेत तळमजल्यावरील शामियानांत आले. तोपर्यंत आमंत्रित पाहुणे मंडळी आली होती. व्ही.आय.पीं.ना व्यासपीठावर बसविले. इतरेजन शामियान्यात स्थानापन्न झाले. भाषणे व पुष्पहार-अर्पणाचा कार्यक्रम संपल्यानंतर भोजनाची त्याच ठिकाणी तयारी केली होती. भोजन महाराष्ट्रीय पद्धतीचे व संपूर्ण शाकाहारी होते. बुंदीचे लाडू, वरण-भात, आळूची भाजी, कोशिंबिऱ्या, पापड, लोणची, चटण्या वगैरे. व्यासपीठावर वाढण्याची व्यवस्था स्वतः डिंगणकर आचारी पाहात होते. ते स्वतः लाडू आग्रहाने वाढत होते. पंडितजींच्या शेजारी एका बाजूला महापौर व दुसऱ्या बाजूला चीफ मिनिस्टर ना. यशवंतराव चव्हाण बसले होते. पंडितजींच्या ताटात एकदम दोन लाडू टाकले व इतरांना एक एक वाढला. तेव्हा पंडितजी यशवंतरावांना म्हणाले, “Why I should have two and you should have one only?” असे म्हणून त्यांनी आपल्या हातांनी आपल्या ताटातला एक लाडू उचलला, आणि तो यशवंतरावांच्या ताटात टाकला! यशवंतराव त्यावर हसले. भोजनास त्यानंतर सुरुवात झाली. थोड्या वेळाने पंडितजींनी वाटीकडे बोट दाखवून “What is this green curry?” असे यशवंतरावांना विचारले. त्यावर यशवंतराव म्हणाले, “It is आळूची भाजी. It is very testy and very popular in Maharashtra.” पंडितजींनी दोन बोटे वाटीत बुचकळून एक भुरका मारला. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले.

या पुणे शहराची प्रसिद्धी महाराष्ट्रात अनेक कारणामुळे व अनेक प्रकारची आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रांत तर पुण्याने लौकिक यापूर्वीच मिळविला आहे. पण क्रीडाक्षेत्रात या पुण्यात इतक्या संस्था असतानाही ते फारच मागे राहिले होते. पुणे महानगरपालिकेने या पुण्यात जवाहरलाल स्टेडियम बांधण्यापूर्वी एकही स्टेडियम नव्हते. यामुळे या शहरात स्टेडियम नसणे ही गोष्ट लांछनास्पद आहे, ती उणीव लौकरच भरून काढावयास पाहिजे, अशी तक्रार व

मागणी येथील क्रिकेट शोकीन व संस्था कधी वृत्तपत्रांतून तर कधी जाहीर सभांतून करीत होते. शहराच्या या मागणीला पुणे महानगरपालिकेने सक्रिय पाठिंबा प्रथम देऊ केला. पण पुढे ती काही काळ गप्प बसली. मात्र येथील महाराष्ट्र क्लब व महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन या दोन्ही संस्थांनी या तक्रारीचा व मागणीचा पाठपुरावा चालू ठेवला होता. ह्या बाबतीत झालेला गाजावाजा व प्रचार राज्य सरकारच्याही लक्षात आणून दिल्यावर त्यांनी पुणे महानगरपालिका स्टेडियम बांधण्यासाठी जेवढा खर्च करील तेवढी रक्कम राज्य सरकार आर्थिक मदत म्हणून देईल असे जाहीर केले होते.

त्यानंतर सरकारी घोषणा होऊनही दोन-तीन वर्षे होऊन गेली. सन १९५९-६० साल उजाडले त्यावर्षी महापौर श्रीयुत वासुदेव बळवंत गोगटे हे झाले होते. त्यापुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना त्यात रु. १० (दहा लाख) लाखाची तरतूद करण्यात आली. ह्या बजेट तरतुदीचा आधार घेऊन श्री. गोगटे यांनी संधी साधून माननीय यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री हे पुण्यात आले असताना त्यांची सर्किट हाऊसवर भेट घेतली. भेटीच्या वेळी मी त्यांच्याबरोबर होतो. भेट सकाळी ११ चे सुमारास झाली. भेटीच्या वेळी अंदाजपत्रक ना. यशवंतराव यांना दाखविले व का भेटीस आलो याचे कारणही सांगितले. मागे दोन-तीन वर्षांपूर्वी केलेल्या सरकारी घोषणेचाही उल्लेख करून आठवण करून दिली. त्यावर मुख्यमंत्री हसले व म्हणाले “अहो गोगटे साहेब,काय म्हणावे तुम्हाला व तुमच्या महानगरपालिकेला ? अहो ते आश्वासन दोन-तीन वर्षांपूर्वीचे आहे. आता काळ बदलला आहे. तुम्हाला माहीत आहे की, महाराष्ट्र-गुजराथ यांचे फाळणीचे काम सुरू झाले आहे !

काही आयोग नेमून त्यांचे कार्य सुरू झाले आहे. निरनिराळ्या विषयांच्या फाईल्स काढल्या असून त्यांचीही फाळणी करण्याचे काम चालू आहे. शिवाय फायनान्स हे खाते आज ना. जीवराज मेहता यांच्या हाती आहे. अशा परिस्थितीत तुमच्या स्टेडियमसाठी जी रक्कम द्यावयाची ती

कोण देणार ? आम्ही सर्व जण फाळणीमध्ये गुंतून राहिलो आहोत. शिवाय दुसरी एक अडचण पुढे आली आहे. अशा तऱ्हेची आर्थिक मदत (ग्रँट) एकट्या पुणे शहराला सरकारने का म्हणून द्यावयाची असाही प्रश्न पुढे आला आहे. त्याबरोबर राज्यातील इतर शहरांचाही विचार करावयास पाहिजे. अशा वातावरणात तुमचा प्रश्न कोण होती घेईल! आपण इतके वर्षे जसे थांबलात तसेच आणखी दोन-तीन वर्षे थांबा. त्यानंतर ही परिस्थिती निवळेल आणि त्यानंतर सरकार याबद्दल विचार करील."

ना. यशवंतरावांचा हा उपदेश ऐकून घेतल्यावर महापौर उठले व आम्ही दोघेही शून्य मनाने बाहेर पडलो.

# ज. बा. कुलकर्णी
# प्रागतिक विचारांचे व कनवाळू वृत्तीचे यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होताच मंत्रालयातील वातावरण पार पालटले. पूर्वीची कुंद हवा नाहीशी झाली. सर्वत्र चैतन्य सळसळू लागले. आपल्यातील मुख्यमंत्री झाला ह्या भावनेने सर्वांच्या आशा पल्लवित झाल्या. आपली गाऱ्हाणी दूर होतील असे गोर-गरिबांना वाटू लागले आणि त्यांची मंत्रालयात ये-जा सुरू झाली. थोडक्यात मंत्रालयात एक प्रकारचे निर्भयतेचे वातावरण निर्माण झाले आणि सर्वत्र उत्साह संचारला. या परिस्थितीचा फायदा घेण्याचे आम्ही मंत्रालयातील कर्मचारी संघटनेच्या मंडळींनी ठरविले व यशवंतरावांच्याकडे युनियनसाठी मंत्रालयात जागा देण्याची आग्रहाची विनंती केली.

मंत्रालयात कर्मचारी संघटना नुकतीच कोठे स्थापन झाली होती. संघटनेला कार्यालयासाठी जागा नसल्यामुळे अडचण भासत होती. यशवंतरावांच्या प्रागतिक विचारांची आम्हाला कल्पना असल्यामुळे आम्ही ती मागणी मांडली होती. वास्तविक त्या वेळेस मंत्रालयाच्या इमारती नुकत्याच पूर्ण झाल्या होत्या. जुन्या मंत्रालयातून हलविण्यात आलेल्या विविध खात्यांची दप्तरे येऊन पडली होती. या खात्यांना खोल्यांचे वाटप चालू होते. अशा वेळेस ही विनंती करण्यात आली होती.

याला उत्तर काय देणार याबद्दल आमची द्विधा मनःस्थिती झाली होती. परंतु यशवंतराव नकार देणार नाहीत अशी श्रद्धा होती. याच वेळेस आम्ही मंत्रालयाच्या पटांगणात कार्यक्रम आयोजित केला. यशवंतरावांना या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलाविले. त्यांनी उपस्थित राहण्याचे मान्य केले. उद्घाटनाच्या भाषणात संघटनेने जागेसाठी केलेल्या मागणीचा उल्लेख केला आणि संघटनेच्या कार्यालयासाठी मंत्रालयात चांगली जागा

दिली असल्याचे घोषित केले. टाळ्यांचा कडकडाट झाला आणि आमची काळजी कायमची दूर झाली. त्या काळी मंत्रालयात संघटनेसाठी जागा देणारे महाराष्ट्र हे भारतात एकमेव राज्य होते. ही गोष्ट केवळ यशवंतरावांच्या युनियन्सबद्दल असणाऱ्या आस्थेमुळेच होऊ शकली.

यशवंतरावांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे ग्रंथप्रेम. उत्कृष्ट ग्रंथांचा संग्रह करणे ही एक त्यांची खास आवड होती. त्यांच्या मलबार हीलवरील निवासस्थानी अशा उत्तमोत्तम निवडक ग्रंथांचे एक ग्रंथालय होते. आमचे एक मित्र त्यांचे हे ग्रंथालय लावण्यास वेळोवेळी जात. आणि मग ते यशवंतरावांच्या ह्या विलक्षण छंदाचे अनेक किस्से आम्हाला ऐकवित.

कित्येक वेळा असे होई की, अनेक चांगल्या ग्रंथांच्या वरती एक छोटा कागद लाविलेला असे आणि त्यावर स्वहस्ताक्षरात लिहिलेले असे "सोबतचे पुस्तक मी संपूर्ण वाचले आहे. चांगले आहे. आपणही वाचावे." ही शिफारस मंत्रिमंडळातील त्यांच्या एखाद्या सहकाऱ्याला केलेली असे. यशवंतराव एवढ्या कामाच्या तुफान गर्दीत ग्रंथांचे वाचन तरी कधी करतात याचे सर्वांना आश्चर्य वाटे.

यशवंतरावांचे सामान्यांवर अपार प्रेम होते. त्यात कृत्रिमपणा नव्हता. ढोंगीपणा तर मुळीच नव्हता. याचे कारण ते त्या ग्रामीण भागातून जन्माला आले होते त्या मातीची त्यांना शेवटपर्यंत जाण होती. मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांना हजारो लोक भेटायला येत. या लोकांची अनेक प्रकारची गाऱ्हाणी असत. पक्ष कार्यापासून ते तहत वैयक्तिक दुःखापर्यंत ! परंतु ते न रागवता त्या सर्वांची गाऱ्हाणी शांत चित्ताने ऐकत व आपल्या परीने शक्य ती मदत करीत.

एकदा आम्ही संघटनेचे कार्यकर्ते चर्चेसाठी यशवंतरावांच्याकडे गेलो होतो. बोलण्याच्या ओघात ते सहजरीत्या म्हणाले, "हे पाहा, मंत्रालयाची इमारत म्हणजे हॉस्पिटल आहे. येथे जो येतो तो रोगी असतो. ज्याचा रोग कोठेच बरा होत नाही, तो या ठिकाणी येतो. यास्तव आपण सर्वांनी त्यांचा

रोग जाणला पाहिजे. त्यांचे दुःख सर्वांनी सहानुभूतिपूर्वक ऐकून घेऊन ते दूर करण्याचे आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत."

या अंतःकरणात नकळत दडून बसलेल्या कनवाळू वृत्तीमुळे यशवंतरावांच्याकडे आलेल्या बहुतेक सर्वांना त्यांची भेट मिळे. यासाठी त्यांनी एक प्रथा पाडली होती की, ज्यांना सबंध दिवसात भेट मिळाली नाही त्या सर्वांना सायंकाळी पाचनंतर शिपायाने आत खोलीत सोडायचे. आम्ही त्याला गंमतीने यशवंतरावांचा दरबार म्हणायचो. या दरबारात यशवंतराव प्रत्येकाला खुर्चीजवळ बोलावून त्याच्या खांद्यावर हात ठेवायचे आणि एकदोन मिनिटांत त्याचे म्हणणे ऐकून त्याला मार्गस्थ करायचे. कोण आपल्याला जमीन मिळाली नाही म्हणून, तर कोण आपण बेकार असल्याचे गाऱ्हाणे मांडायचा. त्यांच्याकडे अर्ज असल्यास त्यावर तेथेच टिपणी करून किंवा पत्ता घेऊन त्यावर आदेश देऊन ते कार्यालयात कागद रवाना करायचे. या उपस्थितीत अनेकजण निमंत्रण पत्रिका घेऊन आपल्या घरातील मंगल कार्यासाठी आशीर्वाद मागायला आलेले असायचे. ते सर्वजण परिचित असायचे अशातला भाग नव्हता. उलट बहुसंख्य अपरिचित असायचे. परंतु यशवंतरावांवरील असीम प्रेमाने ते यायचे आणि यशवंतरावही त्यांना मोकळ्या मनाने आशीर्वाद द्यायचे.

## आचार्य अत्रे
## यशवंतराव : रक्तात समाजवाद मुरलेला नेता

केंद्रीय गृहमंत्री आणि संरक्षणमंत्री अशी महत्त्वाची खाती एकापाठोपाठ एक सांभाळण्याचा मान मिळालेले यशवंतराव हे एकमेव महाराष्ट्रीय आहेत. वयाची पंचावन्न वर्षे उलटण्यापूर्वीच ही महत्पदे यशवंतरावांनी हस्तगत केली हेही लक्षात घेतले पाहिजे. यशवंतरावांना पिढीजात श्रीमंती, नामांकित घराणे, वडिलोपार्जित नावलौकिक, विनासायास शिक्षण अथवा एखाद्या श्रेष्ठ नि वजनदार नेत्याची प्रथमपासून मेहेरनजर यांपैकी कशाचेही पाठबळ नव्हते.

सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या खेड्यातील एका सामान्य माणसाचा यशवंतराव हा मुलगा. एका अशिक्षित, गरीब नि खेडवळ कुटुंबातला मुलगा,जेमतेम शाळेच्या काही इयत्ता ओलांडण्याऐवजी कॉलेजमध्ये जाऊन वकिलीची परीक्षा पदवी उत्तीर्ण झाला. हाच विशेषतः त्या काळात मोठा पराक्रम मानला जायचा. पण केवळ तेवढ्यावर समाधान न मानता राजकारणात शिरुन नि १९४२ मधील प्रतिसरकारच्या लढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावून, यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यात स्वतःचे नाव गाजविले आणि पुढे मुंबई राज्याच्या विधिमंडळात आमदार म्हणून ते निवडून आले. पण तेवढ्यावरही न थांबता प्रथम त्या राज्याच्या मंत्रिमंडळाचे संसदीय चिटणीस, मग त्या राज्याचे एक मंत्री नंतर द्विभाषिकाचे आणि त्यामागून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, त्यानंतर भारताचे संरक्षणमंत्री आणि त्या पाठोपाठ भारताचे गृहमंत्री अशा एकाहून एक मोठ्या यशाच्या पायऱ्या यशवंतराव भराभर चढत जे गेले ते निव्वळ प्रखर बुद्धिमत्तेच्या, असामान्य कर्तबगारीच्या, लवचिक मुत्सद्देगिरीच्या नि कणखर चिकाटीच्या बळावर होय, यात मात्र तिळमात्र शंका नाही.

यशवंतरावांसंबंधी आम्ही नेहमीच अनेक चांगल्या गोष्टींची अपेक्षा करतो. यशवंतरावांच्या अंगी असलेल्या गुणांची आम्हाला ओळख असल्यामुळेच नि त्यांच्याबद्दल आदर असल्यामुळे या अपेक्षा आमच्या असतात. यशवंतरावजींच्या रक्तात समाजवाद मुरलेला आहे. त्यांनी राजे लोकांच्या तनख्याबाबत जे पुरोगामी धोरण पत्करले त्यावरून ते स्पष्ट झाले आहे. यशवंतरावांशी आमचे कितीही राजकीय नि पक्षीय मतभेद असले तरी व्यक्तिशः आम्ही त्यांना आमचे मित्र मानतो आणि त्यांनीही आमच्याशी सदैव वर्तन ठेवले आहे.

यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेचा पल्ला केवळ राजकारणापुरताच मर्यादित नाही. ते एक साहित्यप्रेमी, कलाप्रेमी नि नाट्यप्रेमी रसिक आहेत. संभाषण चतुर आहेत. शिष्टाचारात निपुण आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न आहे. म्हणूनच त्यांच्याविषयी आम्हाला आपुलकी वाटते. राष्ट्राचे आणि महाराष्ट्राचे हित  साधण्याचे कार्य त्यांच्याकडून व्हावयाचे आहे.

## बाळासाहेब पाटील
## खंबीर नेते – यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे एक खंबीर नेते म्हणून यशवंतरावांनी महाराष्ट्रात भरीव कामगिरी केली व देशात महाराष्ट्राची प्रतिष्ठा वाढवून ठेवली. यशवंतराव चव्हाण हे आमचे जिव्हाळ्याचे मित्र होते. 'दैनिक सत्यवादी'च्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त ते महनीय अध्यक्ष म्हणून खास उपस्थित होते. हा ३६ वा वर्धापन दिन कोल्हापूर येथील केशवराव भोसले नाट्यगृहात अपूर्व थाटाने साजरा झाला होता. आम्ही त्यांना आमच्या वतनगावी, कोथहीलाडीला नेले होते व बैलगाडीला शंभर बैलजोड्या जुंपून त्यांची गावातून शाही मिरवणूक काढली होती. त्यांच्या मार्गावर वाटेत असंख्य कमानी उभ्या केल्या होत्या. मिरवणुकीच्या वेळी वाटेच सुवासिनी त्यांना पंचारतीने ओवाळीत होत्या व भक्तिभावाने त्यांच्या पायावर पाणी घालत होत्या. या भव्य मिरवणुकीचे चावडीजवळ भव्य सभेत रुपांतर झाले. ती सकाळची वेळ असताना देखील त्या सभेस पंचवीस हजारावर स्त्री-पुरुष उपस्थित होते. कोथळीतील ती सभा पाहून यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, "बाळासाहेब, कोथळीची ही सभा पाहून मला कराड येथील जाहीर सभेची आठवण झाली, इतकी ही सभा भव्य आहे." यशवंतराव चव्हाण केंद्रीय मंत्रिमंडळात अनेक महत्त्वाच्या जागा भूषविल्या.

१९७९ मध्ये त्यांना श्री. चरणसिंग मंत्रिमंडळात उपपंतप्रधानपद मिळाले. पण हे मंत्रिमंडळ अल्पजीवी ठरले. यानंतर लोकसभा विसर्जित झाली व लोकसभेच्या नव्या निवडणुका लागल्या. त्यात इंदिरा काँग्रेसचे बहुमत प्रस्थापित झाले. पण श्रीमती इंदिरा गांधी यांनी यशवंतरावांच्याकडे कधी असूयेने पाहिले नाही. त्यांच्या कर्तृत्वाला श्रीमती इंदिरा गांधी मानीत असत. देशाच्या विकासासाठी त्यांनी त्यांची मदत घेतली व त्यांना आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष बनविले.

यशवंतराव चव्हाणदेखील श्रीमती इंदिरा गांधींना शेवटपर्यंत सहकार्य देत होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातून नवी दिल्लीत गेले आणि त्यानंतर अखिल भारतीय राजकारणात त्यांचे असे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री अशा महत्त्वाच्या जागा विभूषित केल्या. त्यांची बुद्धिमत्ता असामान्य होती. त्यांची वक्तृत्वशैली लोकोत्तर होती. लोकांवर ते छाप पाडीत असत. ते नेहमी हसतमुख असत. आपल्या हास्याने निम्मी मने जिंकून घेत असत. त्यांची स्मरणशक्तीही मोठी तीव्र होती.

## पु. शं. पतके
## यशवंतरावांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व

श्री. यशवंतराव चव्हाण हे थार नेते तर होतेच, परंतु त्याहीपेक्षा त्यांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते. राजकीय झगमगाटामुळे व विविध वादविवादात त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील लोभसपणा, माणुसकी, लोकसंग्रही वृत्ती व पारदर्शक शुचिर्भूतता विसरून चालणार नाही. मी माझ्या दिल्लीतील २५ वर्षांच्या वास्तव्यात यशवंतरावांचे सर्व सहकारी नेत्यांना जवळून ओळखत होतो. पं. नेहरू यांच्या विश्वासातील सहकारी म्हणून राष्ट्रपतीपासून उपमंत्र्यांपर्यंत माझा सतत, संचार असे व या अनुभवामुळे मी छातीठोकपणे सांगू शकतो की, यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते. १९६० अखेर मी दिल्ली सोडली व त्यानंतर यशवंतराव दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून गेले असले तरी गेल्या २५ वर्षांत माझ्या दिल्लीला अनेक खेपा इंदिरा गांधी यांच्या कामासाठी होत असताना राजकीय प्रश्नावर कितीही मतभेद झाले तरी इंदिराजी यशवंतरावांना किती मानत याची मला विश्वसनीय खात्री आहे. ज्या ज्या वेळी इंदिराजी संभ्रमात पडत त्या त्या वेळी यशवंतरावांचा सल्ला त्या समक्ष अथवा माझ्यासारख्या विश्वासातील मध्यस्थामार्फत घेत. यशवंतरावांच्या भाषेत व वागण्यात मार्दव असे. स्वतःच्या मर्यादा ओळखण्याचा पंतप्रधानस्तरावर वकूब त्यांचेजवळ होता. तो ओळखून इंग्रजी व हिंदी भाषेवर प्रभुत्व संपादन करणे, जनतासंपर्क वाढवणे (अन्य प्रांतीयात) महाराष्ट्राची कामे परहस्ते करवून घेणे आदि मार्गाने त्यांनी अष्टपैलुत्व संपादन केले व संरक्षण, वित्त, गृह, उपपंतप्रधान मंत्री इ. जबाबदाऱ्या मुत्सद्दीपणे व कौशल्याने पार पाडून त्यांची व पर्यायाने महाराष्ट्राची शान राखली.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष**

दिल्लीमध्ये महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषिकांच्या २५० संस्थांचे मध्यवर्ती मंडळ असून या मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा यशवंतरावांनी श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्याकडून स्वीकारली व २० वर्षे ती समर्थपणे पेलली. या मंडळाचा पूर्वीचा कार्याध्यक्ष व कार्यवाह म्हणून माझी कार्यकारी मंडळावर नियुक्ती होत असे व त्यामुळे या संघाच्या विविध समस्यांची चर्चा करण्याची संधी यशवंतरावांनी मला दिली. त्या वेळचे श्री. रमेश मुळगुंद हे एक झंझावाती कार्यकर्ते होते. लोकशाही पद्धतीने प्रत्येक निर्णय दहा जणांना विचारीत न बसता त्यांना योग्य वाटेल त्या मार्गाने ते कार्य करीत असत. त्यामुळे जुन्या पठडीतले कार्यकर्ते नाराज होऊन यशवंतरावांच्याकडे जात. तेव्हा यशवंतराव ज्या मुत्सद्देगिरीने समन्वयाची भूमिका घेत ती सर्व सार्वजनिक कार्यकर्त्यांना आदर्श वाटेल अशीच होती. "सर्व गोष्टी नियम व घटना यांना धरून झाल्या पाहिजेत असा माझाही आग्रह आहे. परंतु कार्याची धुरा संभाळणाराला अनेक वेळा स्वतःचे जबाबदारीवर काही निर्णय घ्यावे लागतात. ते आपण समजावून घेतले पाहिजेत." असा त्यांचा अभिप्राय असे. जोपर्यंत धडाडीच्या कार्यकर्त्याला पर्याय पुढे येत नाही तोवर आपण त्याला त्याच्या गुणदोषांसह स्वीकारले पाहिजे व संघटना कार्य पुढे रेटले पाहिजे. बौद्धिक वादातील यशावर संस्था पुढे जात नाही, ती घाम गाळणारे निःस्वार्थी कार्यकर्ते चालवीत असतात. त्यांचा मान आपण राखलाच पाहिजे हा यशवंतरावांचा अभिप्राय सर्व सार्वजनिक क्षेत्रांना मार्गदर्शक ठरेल.

## एक थोर प्रशासक

माझे धाकटे बंधू यशवंतरावांचे कित्येक वर्षे पी. ए. म्हणून काम पाहात. त्या वेळी चव्हाण दांपत्य आपल्या सेवकांची सुखदुःखे स्वतःची समजून कशी देखभाल करीत असे याची शेकडो उदाहरणे माझे बंधू मला

सांगत असत. व्याख्यानांतून राजकीय नेते समता, बंधुभाव, उच्चनीच भेद नष्ट करणे इ. घोषणा करीत असतात परंतु प्रत्यक्ष आचरणात आणणारे यशवंतराव होते. काकासाहेब गाडगीळ यांच्याबरोबर मी २० वर्षे बृहन्महाराष्ट्र व महाराष्ट्र समाजाचे काम केले आहे. काकासाहेबांची सर्वसंग्राहकवृत्ती यशवंतरावांनी जोपासली पण त्याला मुत्सद्देगिरी व अंतर्मुखतेचे आवरण घातले. 'मी अमुक केले' अशी बढाई मारण्यापेक्षा तुमचे काम कसे होईल यावर त्यांचे लक्ष असे. महाराष्ट्राची शेकडो कामे यशवंतरावांनी पडद्याआड राहून केल्याचे मला ज्ञात आहे. दिल्लीतील सर्व मराठी भाषिकांचे ते अनभिषिक्त राजे होते. काकासाहेबांची प्रथा त्यांनी उज्वलतेने पाळली व आता ती जबाबदारी मा. वसंतराव साठे व विठ्ठलराव गाडगीळ पाळीत आहेत. महाराष्ट्राच्या थोर संस्कृतीचे हे पाईक दिल्लीच्या वृत्तपत्रीय झगमगाटात अन्य प्रांतीयांच्या तुलनेने कमी पडत असले तरी कर्तृत्वाने नेहमीच अग्रेसर राहिले आहेत व सत्य, स्वाभिमान, देशभक्ती, निष्ठा, इ. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची जोपासना व राजमान्यता त्यांनी टिकवली आहे. ही गोष्ट प्रत्येक मराठी भाषिकाला अभिमानास्पद वाटावी अशीच आहे.

आजपर्यंत स्वातंत्र्योत्तर काळात ज्या महाराष्ट्रीय नेत्यांनी आपले प्रतिनिधित्व व नेतृत्व केले त्या सर्वांत यशवंतरावांचे स्थान सर्वोच्च आहे. त्यांनी मिळवलेली पं. नेहरू व इंदिरा गांधी यांची प्रशस्ति व त्यांचे मनात निर्माण केलेली त्यांची प्रतिमा लक्षात घेऊन मी हे विधान करीत आहे. पंतप्रधान राजीव गांधी त्यांना किती मान देत याची मला जाणीव आहे; यशवंतराव विरोधात असतानाही त्यांना स्वतःकडे कसे आणता येईल ही विवंचना त्यांना असे. याला कारण यशवंतरावांचे नैतिक अधिष्ठान, शासन चातुर्य व समन्वयवादी मनोधारणा होते.

साहित्य, नाटक, नृत्य व अन्य काही क्षेत्रांची त्यांना आवड होती. पुस्तके वाचणे हा तर त्यांचा आवडता छंद होता. त्यावरील आपले अभिप्राय ते लेखकाला आवर्जून कळवीत. सामान्यांची पत्रे आली तरी

त्याला स्वतःची पोच देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. विरोधकांमधील सद्गुणांची ते नेहमीच दखल घेत व आवर्जून उल्लेख करीत. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून विरोधी नेत्यांनीही त्यांना 'अजातशत्रू' मानले होते.

यशवंतरावांनी पुढच्या पिढीसाठी फार मोठा वारसा ठेवला आहे. त्यांची स्मृती त्यांचे गुण आत्मसांत केले तरच होणार आहे. प्रत्येकातील चांगले गुण जोखून त्यांचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घेणे, मतभेद म्हणजे वैर नव्हे ही वृत्ती जोपासणे, व नैतिकतेवरील निष्ठा निग्रहीपणे व सातत्याने जागरूक ठेवणे एवढी शिकवण जरी आपण आत्मसात केली तरी यशवंतरावांच्या आत्म्याला निश्चित समाधान लाभेल.'

## श्री. अनंतराव पाटील
## ओसंडून वाहणारा माणुसकीचा गहिवर

त्या दिवशीची रविवारची रात्र झोप न येताच काढली. झोप येणार कशी? गेल्या चाळीस वर्षांतल्या सहवासातील घटना डोळ्यापुढून एक एक सरकत होत्या आणि आठवणींचे कढ बाहेर पडत होते. १९४४ ते १९८४ च्या दरम्यान काय काय घडले, किती किती घडले आणि कसे कसे घडले हे सारे एकामागून एक आठवू लागले. आठवणींच्या माळेतील एक एक मणी पुढे सरकत होते. भूमिगत चळवळीतील यशवंतराव, पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवंतराव, पुरवठामंत्री यशवंतराव, द्विभाषिकाचे मुख्यमत्री यशवंतराव, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव;' भारताचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, यशवंतराव; उपपंतप्रधान आणि शेवटी आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष यशवंतराव, ही सगळी स्थित्यंतरे, या सगळ्या अवस्था जवळून पाहिलेल्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस यशवंतराव आणि नेते यशवंतराव. काँग्रेस वर्किंग कमिटीत नेहरूंच्या शेजारी बसून सल्लामसलत करणारे यशवंतराव, साहित्यिक यशवंतराव, पत्रकार यशवंतराव, रसिक, सहकारी यशवंतराव यांच्या आठवणी लिहायच्या म्हणजे एक ग्रंथच लिहावा लागेल.

राजकारणात मी त्यांच्याबरोबर जवळजवळ तीस वर्षे काम केले. या काळात एक कार्यकर्ता, तर पत्रकार आणि संसदसदस्य अशा भूमिका पार पाडताना मला यशवंतरावांचा सहवास लाभला, प्रेम लाभले, मोलाचे मार्गदर्शन पण लाभले. ते मला धाकट्या भावाप्रमाणे मानीत आणि वागवीत. पुढे जाण्यासाठी, मोठे होण्यासाठी, त्यांनी मला संधी दिली, सहकार्य दिले आणि साहाय्य पण केले. मी त्यांना माझा नेता मानले होते. मार्गदर्शक मानले होते. काही वेळा आमचे वैचारिक मतभेद झाले. माझ्या

काही चुका पण झाल्या, पण माझ्यावर साहेब कधी रागावले किंवा चिडले असे मला आठवत नाही.

ज्या सह्याद्री बंगल्यावर परवा मी विमनस्क मनःस्थितीत बसलो होतो त्या बंगल्यावर १९५६ ते १९६२ या काळात आम्ही किती विषयांवर बोललो, किती विषयांवर हितगूज केले त्याची मोजदाद लक्षात नाही. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, द्विभाषिक मुंबई राज्य चालविण्याची जबाबदारी, त्यात निर्माण झालेल्या अडचणी आणि विरोध, ते अपमानाचे दिवस आठवले की यशवंतरावांजवळची सोशिकता आणि सहिष्णुता डोळ्यांपुढे उभी राहते. त्यांच्याबरोबर फिरताना रागावलेल्या लोकांकडून दगडफेक व्हायची, चपलाफेक व्हायची, आणि आम्ही ते सहन करीत पुढची वाट चालायचो. साहेब म्हणायचे, "संयुक्त महाराष्ट्र मिळेल आणि तो मिळायला हवा. पण संघर्ष करून नव्हे तर नेहरूंचे आणि केंद्रीय नेत्यांचे मन वळवून." त्यांना आपले म्हणणे पटवून देऊन साध्य हस्तगत करणे हा मार्ग लांबचा आणि अवघड होता. पण त्या मार्गानेच चव्हाण गेले आणि शेवटी यशस्वी ठरले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला आणि त्याच्या उद्घाटनाला स्वतः पंडित जवाहरलाल नेहरू आले. मुंबईतील राजभवनावरील तो सोहळा अजूनही आठवतो आणि चव्हाणांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री या नात्याने धोरणविषयक जे भाषण केले ते कानात अजूनही घुमतेय. "हे राज्य मराठ्यांच्याकरिता नसून मराठी माणसांकरिता आहे, याची जाणीव ठेवूनच त्याची सर्वांगिण प्रगती करण्याचे आटोकाट प्रयत्न केले जातील" असे त्यांनी निःसंदिग्धपणे सांगितले.

यशवंतराव चव्हाणांनी आपला वरील शब्द पाळण्याचा प्रयत्न कसोशीने केला. जाति-जमातीत सलोखा नांदेल याची दखल घेऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा गाडा पुढे हाकला. शेतीला पाणी दिल्याशिवाय ती सुधारणार नाही म्हणून धरणे, पाटबंधारे, कालवे यांवर भर दिला. उद्योग-धंद्याशिवाय प्रगती नाही म्हणून महाराष्ट्रात

अधिकाधिक उद्योग कसे उभे राहतील याकरिता जातीने प्रयत्न केले. ग्रामीण भागात प्रक्रिया करणारे कारखाने उभारल्याशिवाय शेतकऱ्यांची स्थिती सुधारणार नाही, हे जाणून साखर कारखाने, सूत गिरण्या, तेलाच्या गिरण्या, उभारण्यास उत्तेजन दिले, मदत दिली. शेतकऱ्याला कारखानदार बनविला, व्यापारी बनविला. ग्रामीण भागात शाळा-कॉलेज सुरू करण्यास प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, दलितांच्या मुलामुलींना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करून दिली. चव्हाणांचा दृष्टिकोण विशाल होता. बैठक उदारमतवादी होती, कामाचा उरक दांडगा होता. आपल्या सहकाऱ्यांना ते जवळ घेत, शिकवत-सांगत. त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींशी, कर्तृत्ववान मंडळींशी संपर्क ठेवीत, त्यांच्याशी सुसंवाद साधीत. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी या मंडळींचाही उपयोग करून घ्यायला हवा ही त्यांची दृष्टी होती. म्हणूनच टाटा, बिर्ला, मफतलाल, गोदरेज, किर्लोस्कर, चौगुले, गरवारे, यांसारख्या कारखानदारांना त्यांनी महाराष्ट्रात उद्योगधंदे उभारण्यास, वाढविण्यास, प्रवृत्त केले.

यशवंतराव कमी बोलत. चर्चेत, सभेत आणि सभागृहातही वृत्तपत्र प्रतिनिधींशीही आवश्यक तेवढाच संपर्क ठेवीत. पार्लमेंटच्या सेंट्रल हॉलमध्ये खासदारांच्या घोळक्यात बसून गप्पा-टप्पा करणे त्यांना आवडत नसे. उत्तर प्रदेश, बिहारचे खासदार विचारायचे, "काय रे तुझा साहेब असा सुस्त का वागतो! आमच्यात येऊन बसत नाही, चहा घेत नाही." मंत्र्यांना उत्तर द्यायचो, "येथे वृत्तपत्रांचे प्रतिनिधी हजर असतात आणि ते आपल्या वृत्तपत्रांतून काहीही बातम्या-अफवा प्रसिद्ध करतात म्हणून साहेब दूर राहतात." आणि खरोखरच अशी वस्तुस्थिती होती. सेंट्रल हॉल म्हणजे हितसंबंधी मंडळींचा राजकारणाचा अड्डा-ठिय्या. असले राजकारण करणे चव्हाणांच्या स्वभावात नव्हते. लोकसभागृहात उत्तरे देताना किंवा बोलताना चव्हाण कधी रागावत-चिडत-ओरडत नसत. शांत-संथ प्रवाह जसा पुढे पुढे जातो तशी ओघवती भाषा. साहेब म्हणायचे, "पार्लमेंटमध्ये काम करताना गृहावर प्रेम करावे लागते, राग-

रुसवा दूर ठेवावा लागतो." गृहाला त्यांचा दरारा असे, त्यांना कोणी कधी ठोकरलेले मला आठवत नाही.

माझ्यावर त्यांनी केलेले प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. १९५९ मध्ये राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या समवेत पत्रकारांच्या तुकडीबरोबर मी रशियाला जावे असे निमंत्रण दिल्लीहून मला आले. चव्हाणांची इच्छा होती मी जावे म्हणून.

तथापि वृत्तपत्र नुकतेच सुरू केले होते आणि अडचणी खूप होत्या म्हणून मी नम्र नकार कळविला. साहेबांना वाईट वाटले. पुढे १९६२ मध्ये मला अमेरिका भेटीचे निमंत्रण आले. मी मुंबईला जाऊन साहेबांच्या कानावर घातले. त्यांनी मी काही बोलायच्या आधीच पासपोर्टची व कपड्यांची तयारी करा असे सांगून श्री. डोंगरे यांच्याकडून माझ्या पासपोर्टची व कपड्यांची व्यवस्था केली. त्यानंतर ब्रिटन, जर्मनी, जपान, रशिया आदी देशांना मी वेळोवेळी भेटी दिल्या. या प्रत्येक वेळी यशवंतरावांनी मला उत्तेजन व प्रोत्साहन दिले. माझ्या प्रवासवर्णनांचे कौतुक केले. "विशाल सह्याद्री" वृत्तपत्र चालविताना येणाऱ्या लहानसहान अडचणींची ते दखल घेत, मार्गदर्शन करीत व मदतही करीत. पुण्यात एक दैनिक पत्र चांगले चालते, त्याची स्वतःची इमारत होते, लोकांत वृत्तपत्र प्रिय होते याचा त्यांना आनंद व अभिमान वाटायचा.

## वि. स. माडीवाले
## संयमी कणखर लोकशाहीवादी

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार श्री. यशवंतराव चव्हाण चतुर व संयमी मुत्सद्दी होते. प्रसंगानुरूप कसे वागावे, समयोचित निर्णय कसा घ्यावा, अचूक शरसंधान कसे करावे याचे त्यांना पुरेपूर ज्ञान होते. त्यांच्या कर्तृत्वाची व चाणाक्षपणाची खरी कसोटी लागली संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या कठीण काळात. वरिष्ठ काँग्रेस नेत्यांना तर दुखवावयाचे नाही, काँग्रेसची शिस्त तर पाळावयाची, त्याचबरोबर मुंबईसह महाराष्ट्र स्थापन करावयाचा. सर्कशीत ज्वालांच्या कड्यातून सिंह जसा अलगद उडी मारतो व प्रेक्षकांकडून टाळ्या मिळवितो तसेच या बिकट प्रसंगात त्यांचे झाले होते. त्यांच्या बाणेदार वागणुकीची मला वार्ताहर म्हणून प्रचिती आली ती हैदराबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले असताना. कार्यकारी मंडळाचे बैठकीत महाराष्ट्राचा प्रश्न निघाला तेव्हा काँग्रेस नेत्यांना या प्रश्नाचे महत्त्व पटवून देताना त्यांनी आर्जवी भाषा वापरली त्याचबरोबर वेळीच एक टाका घातला नाही तर पुढे नऊ टाके घालावे लागतील असा स्पष्ट इषाराही दिला आणि पुढच्या काळात तो इषारा खरा ठरला. आपले मत लोकशाहीच्या चौकटीत मांडण्याचे त्यांचे वाक्चातुर्य, मनाची पकड घेणारे होते. ते जितके संयमाने बोलत तितकेच प्रसंग पाहून कठोर प्रहार करण्यासही कचरत नसत. हा प्रश्न हृदयपरिवर्तनाने सोडवावा की, दबावाने सोडवावा असा अनेक वेळा काँग्रेस कार्यकर्त्यांचे सभेत खल झाला. साहेबांनी दोन्हीचा उपयोग चातुर्याने केला.

अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर शिर्डी येथे भरले होते. त्यात संयुक्त महाराष्ट्राची चर्चा झाली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करणे कसे न्याय्य आहे हे अनेक कार्यकर्त्यांनी सांगितले.या शिबिराला श्री. ठाकोरभाई देसाई आले होते. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये असे

हितसंबंधी लोकांचे प्रयत्न चालूच होते. काँग्रेस कार्यकर्त्यांची महाराष्ट्राची न्याय्य मागणी ऐकून ठाकोरभाईंचा रागाचा पारा चढला व ते तावातावाने बोलू लागले आपला या मागणीला विरोध असल्याचे त्यांनी कडक शब्दात सांगितले. त्यांचा संताप इतका शिगेला पोहचला की शेवटी ते रागाने म्हणाले, "माझ्या प्रेतावरूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होईल." या भाषणाचे वेळी साहेब मंडपात नव्हते. ठाकोरभाईंच्या या आततायी भाषणाबद्दल मी त्यांना प्रतिक्रिया विचारली असता साहेब शांतपणे पण हसत म्हणाले की, "लोकशाहीमध्ये कोणीच अशी अतिरेकी भाषा वापरू नये" साहेबांसारखा चतुर नेता अधिक टीका काय करणार? मुखात चपराक देतात पण त्याचे वळ इतरांना दिसत नाहीत ज्याला ती चपराक बसते तोही कुंठीत होतो.

पुण्यातील काँग्रेस भुवनात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर अनेक सभा होत. आठ आठ तास चर्चा चाले. विविध पर्याय येत पण मार्ग सापडत नव्हता. अशाच एका सभेत साहेबांचे मनाचा ठाव घेणारे भाषण झाले. या प्रश्नाची निकड त्यातून प्रगट होत होती. पण त्याची तड कशी लावावी हे उलगडत नव्हते. भाषण ऐन रंगात आले होते. कार्यकर्ते टाळ्या वाजवून पसंती दाखवीत होते. साहेब म्हणाले, आपण इंग्रजी वसाहतवादाविरुद्ध प्राण पणाला लावून लढा दिला व स्वातंत्र्य मिळविले. पण भाषावर प्रांतरचना करताना मुंबईचा प्रश्न सुटत नाही. इतर प्रांतांत तो सुटला आहे मग महाराष्ट्राचे बाबतीत माघार का घेण्यात येत आहे? याचा अर्थ उघडच स्पष्ट आहे की अद्यापि देशी वसाहतवाद संपलेला नाही. हा यशवंत बाणा बराच काळ गाजला. दिल्लीपर्यंत पोहोचला. संयमी भाषणाबरोबरच झणझणीत इषारा देण्याची त्यांची हातोटी अनेक वेळा अनुभवाला आली आहे. कृष्णाकाठचा ऊस गोड तशीच मिरची चरका देणारी.

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाचे पटांगणावर अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्याचवेळी बेळगांव कारवारचा सीमा प्रश्न

धसास लागला होता. श्री. जयंतराव टिळक सीमा लढ्यातील पहिले सत्याग्रही. त्यांनी बेळगावला सत्याग्रह करून तीन महिने कारावासाची शिक्षा भोगली होती. अर्थातच सीमा लढ्याचे केंद्र गायकवाडवाड्यात होते. काँग्रेस अधिवेशनाचे मंडपावर मोर्चा सीमावासियांचे गाऱ्हाणे काँग्रेस श्रेष्ठींच्या कानावर घालण्याचे ठरले. मोर्चाचे नेतृत्व क्रांतिवीर नाना पाटील यांनी करावे असे ठरले. या मोर्चासाठी महाराष्ट्रातून पाच हजारांवर कार्यकर्ते जमले होते. मोर्चा मंडपावर गेला असता तर प्रसंग बाका होता. अश्रूधूर, लाठीमार व प्रसंगी गोळीबार होण्याचा धोका होता. सीमा प्रश्नाची निकड साहेबांना होतीच. पण हा प्रश्न कडवटपणा निर्माण न करता सुटावा. प्रत्येक प्रश्नाची जाणीव व्हावी त्यासाठी मोर्चादेखील निघावा पण भलतेसलते वळण लागू नये अशा बिकट मनःस्थितीत साहेब होते. डोळ्यात गेलेला काचेचा कण धसमुसळेपणाने न काढता तो मोरपिसाने काढावा ही साहेबांची राजनिती. आणि मोर्चा निघण्याचे आदले दिवशी साहेब केसरी कार्यालयात अचानक आले. श्री. जंयतराव टिळक यांची भेट घेतली. दोन नेत्यांचे बोलणे, विचारविनिमय झाला. मोर्चा काढण्याबद्दल एक मत झाले पण हा मोर्चा संभाजी पुलाजवळ पोलिसांनी अडवावा व मोर्चातील लोकांनी अतिप्रसंग न करता काही तास धरणे धरून बसावे असे मनोमन ठरले. ठरल्याप्रमाणे मोर्चा निघाला. तो पुलाजवळ पोलिसांनी अडविला. दुसरे दिवसाचे वर्तमानपत्रांत मोर्चाची छायाचित्रे व वृत्तांत ठळकपणे छापून आला. तो काँग्रेस श्रेष्ठींनी पाहिला. साहेबांनी मोर्चाला चतुराईने मूक संमती दिली व महाराष्ट्रातील राजकीय कार्यकर्ते कसे संयमी लोक आहेत याचे दर्शन झाले. न्याय्य मागणीला डावलावयाचे नाही पण तो चिघळू द्यावयाचा नाही हा साहेबांचा संयमी व लोकशाही प्रेमाचा चतूर मुत्सद्दीपणा.

संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या लढ्याचे महाभारत झाले. मध्यंतरीच्या काळात साहेब द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. अनेक वेळा त्यांना तारेवरची कसरत करावी लागली पण तोल सुटला नाही. इंदिरा गांधी

काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्यावर त्यांनी महाराष्ट्राचा दौरा केला व मुंबईसह महाराष्ट्र व्हावा अशी त्यांची खात्री झाली. साहेबांनी हे ठरलेले दिल्लीला जाऊन पं. नेहरूंना आता द्विभाषिक डावलणे अवघड आहे असे सांगितले. दिल्लीत गेल्यावर त्यांनी श्रीं. मोरारजीभाईंची भेट घेतली नाही असा बराच बोभाटा झाला होता. खरे खोटे देवाला माहीत. पुढे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. साहेब मुख्यमंत्री झाले व त्यांनी चळवळीत धारातीर्थी पडलेल्या हुतात्मा स्मारकाला पुष्पहार घालून वंदन केले. वार्ताहर म्हणून अनेक दौऱ्यातून त्यांच्याबरोबर हिंडलो. जवळून पाहात आलो. अंतरंगात शिरून गूढ मनाचे धागेदोरे समजलो. पुण्यातील वार्ताहरावर तर त्यांचे भारी प्रेम. महत्त्वाची वार्ता साहेब पुण्यातील वार्ताहर परिषदेत सांगत. त्याबद्दल तर ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी तक्रारी केल्या. कदाचित साहेबांच्या दोन ओळींमधील गर्भीत अर्थ पुण्यातील वार्ताहरांना कळत असावा.

साहेबांच्या यशस्वी जीवनात सौ. वेणूताईंचे स्थान फार मोठे आहे. मुंबईला सह्याद्री बंगल्यावर एकदा निवडणुकीच्या याद्या तयार होत होत्या. महाराष्ट्रातून शेकडो कार्यकर्ते तेथे जमले होते. आलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत स्वतः वेणूताई करीत. कुणाला चहा फराळ मिळाला की नाही हे जातीने पाहात. अनेकांच्या घरची विचारपूस करीत. जुन्या आठवणींना उजाळा देत हास्यविनोद करण्यात वेणूताई रात्रंदिवस कष्ट घेत. त्या वेणूताई नव्हे तर महाराष्ट्राची मोठी आईच!

# सर्वोदय साधना
# मातृभक्त चव्हाण

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या राजकारणात ज्या काळात चमकले तो काळ मोठा धकाधकीचा होता. घाटी लोकांना भांडी घासता येतील, पण राज्य कसे चालवता येईल? अशी कुत्सित विचारणा बिगरमराठी धनदांडगे करीत होते. पंडित नेहरूंच्या मनातही काही शंकाकुशंका असाव्यात असेच ते वातावरण होते. पण पुढे पंडितजींनी यशवंतरावांकडे भारताच्या संरक्षणाची धुरा दिली, ही यशवंतरावांच्या कर्तृत्वाची पावतीच होती.

गेल्या एक ऑगस्टची गोष्ट आहे. "आम्ही दिल्लीत यशवंतरावांच्या "एक रेसकोर्स रोड" या बंगल्यावर साडे आठ वाजता सकाळचा फोन केला, "आम्ही उद्या भेटायला यावे का?" अशी विचारणी केली. फोन स्वतः यशवंतरावांनी घेतला आणि त्यांनी यायची परवानगी दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठ वाजता त्यांच्या सचिवांनी फोन करून आम्ही येत असल्याची खात्री करून घेतली. आम्ही पोहोचलो तेव्हा यशवंतराव स्वतः स्वागताला बाहेर आले आणि मित्रासारखे हस्तांदोलन करून आत घेऊन गेले. कॉफीपान झाल्यानंतर त्यांनी सगळी बारकाईने चौकशी केली आणि मग म्हणाले, "रमाकांतची भेट क्वचितच होते आणि वर्षातून एखाद दुसरे पत्र येते, मला भेटत जा, लिहीत जा."

१ जून १९८३ रोजी यशवंतरावांच्या सुशील धर्मपत्नी वेणूताई वारल्या आणि त्यावेळेपासून त्यांचे जीवन काहीसे एकाकी बनले असे वाटते. ज्या माणसाने संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, गृहमंत्री आणि लहानशा कालापर्यंत उपपंतप्रधानपदसुद्धा भूषविले ते यशवंतराव दिल्लीत दीर्घकाळ एकाच जागी राहात होते. त्या बंगलीने लोकांची खूप वर्दळ आणि अगदी शांत एकान्त या दोहोंचा अनुभाव घेतला. यशवंतरावांनी एकान्तात

“कृष्णाकाठ” हे आत्मकथनपर सुंदर पुस्तक लिहिले. त्यांना आणखी २ खंड लिहावयाचे होते. एकाचे नाव त्यांनी कृष्णाकाठ दिले तर दुसऱ्याचे नाव ते देणार होते “सागरतळी” आणि तिसऱ्याचे नाव ते देणार होते “यमुनातीरी” पण हा संकल्प आता अपुरा राहिला. कृष्णा नदीच्या काठावर यशवंतराव वाढले. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र हे त्यांचे गाव होते.

एखाद्या लहानशा गावाला नुसते राष्ट्रच नव्हे तर देवराष्ट्र असे महान नाव मिळालेल्या त्या गावात यशवंतराव वाढले, आणि या आधुनिक युगात या चिमुकल्या गावाचे नाव त्यांनी पुन्हा प्रकाशात आणले. १२ मार्च १९१३ रोजी यशवंतरावांचा जन्म झाला. लहानपणीच त्यांचे पितृछत्र हरपले. त्यांची आई विठाई ही मोठी जिद्दीची बाई होती. ती शाळेत शिकली नव्हती पण शिक्षणाचे मोल ती मनोमन जाणत होती. पहाटे दळण दळताना ती स्वतः रचलेल्या ओव्या म्हणत असे. आपल्या मुलांकडून ती ज्ञानेश्वरी वाचून घेई. एकदा मुलाने तिला विचारले, “हे सगळे तू ऐकतेस खरे पण त्याचा सारांश तू सांगू शकशील काय?” आईने एका वाक्यात उत्तर दिले, “श्रीकृष्ण भगवान अर्जुनाला सांगताहेत की, तू तुझा मीपणा सोड आणि तुझे जे नेमलेले काम आहे ते कर्तव्यभावनेने करीत राहा.” यशवंतराव म्हणतात, “माझा आईने सांगितलेला गीतेचा इतका साधा, सोपा, सरळ आशय मी कोणाही पंडिताकडून कधी ऐकला नाही. आमची आईच आमची खरी शाळा होती.”

यशवंतराव मातृभक्त होते याचे कारण आहे. ही त्यांची धीराची आई नसती तर त्या काळात त्यांचे शिक्षण आणि संरक्षण झालेच नसते. एकदा ते आई आणि आजी यांच्याबरोबर कित्येक मैल चालत पंढरपूरला गेले आणि चार तास रांगेत उभे राहून त्यांनी विठोबाचे दर्शन घेतले. बडवे लोक हटवीत असताना या लहान मुलाचे डोके आईने विठोबाच्या चरणावर टेकवले. हा प्रसंग सांगून यशवंतराव म्हणतात की, मंत्री

झाल्यानंतर आपण निवांतपणे विठ्ठलाचे अनेकवार दर्शन घेतले. परंतु आईसोबत घेतलेल हे विठ्ठलाचे दर्शन आगळेच होते.

यशवंतरावांची पहिली भेट आठवते ती संयुक्त महाराष्ट्राच्या काळातील. यशवंतराव आमच्या 'भूदानयज्ञ समितीचे' सभासद होते, त्या वेळची. त्यांनी आम्हाला बोलावले आणि म्हणाले की, "लहान लहान सभा तुम्ही घेतल्या तर मी येऊन विनोबांचा विचार सांगेन. तुमचा आणि माझा लहानसाच मतभेद आहे. विनोबा म्हणतात, सत्तेपासून अलग रहावे परंतु मी सत्तेवर आहे, त्यामुळे मला अधिक शाळा उघडता येतील. लोकांना त्यापासून शिक्षण मिळेल. मला लहानपणी फार उशिरा शिक्षण मिळाले. सत्तेमुळेही काही सेवा करता येते. म्हणून मी सत्तेला त्याज्य मानत नाही. एवढाच माझा मतभेद आहे."

पुढे पंढरपूरला १९५८ मध्ये सर्वोदय संमेलन झाले. विनोबांनी परधर्मीयांना घेऊन मंदिरप्रवेश केला म्हणून सनातनी संतापलेले होते. राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी चोख व्यवस्था ठेवली होती. साध्या वेशातील सी. आय.डी पंढरपूरच्या परिसरात सर्वत्र पसरलेले होते. स्वतः यशवंतराव नम्रपणे पाहुण्यांना पाणी वाढीत होते. या काळात यशवंतरावांनी आपल्या सर्जनतेने प्रतिपक्षाची मने जिंकली. त्याचे एक उदाहरण रावसाहेब पटवर्धनांनी आम्हांला सांगितले होते. एका विरोधी आमदाराने सकाळच्या डाकेने पत्र पाठवले आणि संध्याकाळच्या डाकेने त्या आमदाराला यशवंतरावांचे उत्तर मिळाले. त्या काळात पोस्टाची लोकल डिलिव्हरी नुकतीच चालू झाली होती आणि ती कार्यक्षमतेने चालत होती ही गोष्ट वेगळी, परंतु यात यशवंतरावांची प्रतिपक्षाला नम्रतेने जिंकण्याची दक्षता दिसून येते.

यशवंतराव पत्रांची उत्तरे तत्परतेने द्यायचे. महाराष्ट्रात महेंद्र कंपनीची वसाहत खोपोलीला यशवंतरावांनी लगेच उभारू दिली. अन्यथा तो कारखाना मद्रासला जायचा होता. मनात असे येते की, जर यशवंतराव दीर्घ काल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले असते तर कदाचित बऱ्याच

कटकटी टळल्या असत्या. पण हा “जर-तर” चा सवाल आहे. मी यशवंतरावांना पत्रात लिहिले, “समर्थ रामदासांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी मराठा तितुका मेळवावा असे सांगून ठेवले, परंतु महाराष्ट्रातले नेते अजूनही आपापसात भांडतच राहिले आहेत.” मला वाटले की, यशवंतराव या पत्राचे उत्तर पाठविणार नाहीत. पण त्यांचे चांगले उत्तर आले. त्यांनी आमच्या सर्वोदय साधनेविषयी लिहिले की, महाराष्ट्र सरकार तुम्हाला काय मदत करू शकते ते कळविल्यास मी माझा शब्द अवश्य खर्च करीन.

पण यशवंतरावांकडून फक्त प्रेमाचीच अपेक्षा होती, आर्थिक अपेक्षा असती तर आम्ही त्यांच्याजवळ गेली नसतो. उलट यशवंतराव देखील प्रेमाचीच अपेक्षा इतरांकडून करीत असणार! मी त्यांना उत्तरादाखल लिहिले, “आपले पत्र पाहून मला महाभारतातील एक गोष्ट आठवली, श्रीकृष्ण भगवंताच्या अवतारसमाप्तीचा काळ होता म्हणून ते आपल्या जुन्या सोबत्यांच्या शोधात निघाले. राजस्थानमध्ये उत्तंक नावाचा त्यांचा एक सोबती होता त्याच्याकडे जाऊन ते म्हणाले, ‘तुला काय हवे ते माझ्याकडे माग.’ उत्तंकाने भगवंताकडे पाणी मागितले. कारण राजस्थानमध्ये पाण्याचा दुष्काळ असतो, भगवंतांनी त्याला नखाने खोदून पाण्याची नदी दिली.

खरोखर उत्तंकाने श्रीकृष्णाला म्हणायला पाहिजे होते की, ‘तू आता अवतारकार्य संपवून निघाला आहेस. मला तुझे फक्त प्रेम दे,’ उत्तंकाला याहूनही खाली उतरायचे असेल तर त्याने म्हणायला पाहिजे होते की, “मला काय हवे ते तूच आणून दे.” माझ्या या पत्राचेही उत्तर यशवंतरावांनी दिले. त्यांची आई विठाई यांच्यासंबंधी त्यांच्याच शब्दात एक लेख आम्ही छापला आणि तो छापल्याचे पत्र गेल्या शनिवारी दि. २४ नोव्हेंबर रोजी त्यांना लिहिले. शनिवारी रजा असल्याने ते सोमवारी पोस्टात टाकावयाचे होते. पण त्या पूर्वी रविवारी २५ नोव्हेंबर ८४ रोजी यशवंतरावांची इहयात्रा संपली. ते म्हणाले होते, “मुंबईत मला भेटत जा”

पण मी आणि आमचा मित्र सुनील वागळे त्यांच्या अंत्यदर्शनासाठी “सह्याद्री” या त्यांच्या एकेकाळच्या निवासस्थानी गेलो. २ ऑगस्ट रोजी त्यांनी आम्हाला प्रेमपूर्वक परतभेटीचे निमंत्रण दिले होते. पण ती परत भेटही अशी एकतर्फी झाली! एक सामान्य शेतकरी मुलगा आपल्या शक्तीनुसार यशवंत कर्तृत्व गाजवून गेला, आणि आपल्या चिमुकल्या देवराष्ट्राचे नाव त्याने प्रकाशात आणले. त्यामुळे आई विठाईची कूस धन्य झाली!

## शशिकांत टेंबे
## दुरून ऐकलेले साहेब

यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणाचे सातारी वळणाचे घराणे आहे. मोजक्या, मार्मिक शब्दांची पखरण करीत चव्हाणसाहेब प्रेक्षकांचे रूपांतर श्रोत्यांमध्ये सहज करतात. श्रोते मग यशवंतरावांच्या पारदर्शक विचारांच्या शब्द-ब्रह्यामध्ये विलीन होऊन जातात.

वर्षे मोजायची झाली तर बत्तीस वर्षांपूर्वीची हकीगत आहे. बारामतीला मार्केट कमिटीच्या मैदानावर काँग्रेसची सभा होती. त्या काळात बारामती भागात शेतकरी काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, यांचा प्रभाव जाणवत होता. काँग्रेस सभेत साताऱ्याचे यशवंतराव बोलणार म्हणून जाहीर झाले होते. सभेमध्ये गोंधळ होणार या शक्यतेने गर्दी उसळली होती. सभा चाललेली असताना शे. का. पक्षाचे त्या वेळचे कार्यकर्ते उद्धवराव इंगळे यांनी माईकवर यावे आणि आपले म्हणणे मांडावे असे साहेबांनी आवाहन करून सभेतील गोंधळ आटोक्यात आणला. उद्धवरावांच्या भाषणानंतर काकासाहेब गाडगीळांच्या सभाशास्त्राचा हवाला देऊन यशवंतरावांनी सभेतील लोकांना सांगितले, "उद्धवरावांचे म्हणणे आपण सर्वांनी ऐकले. मला माझे विचार सांगावयाचे आहेत. सभेमध्ये शांतता राखण्याची हमी मला तुमच्याकडून हवी आहे." या सलामीच्या उद्गारांनी त्यांनी प्रारंभ केला. ते संपले केव्हा याची खबरबात ज्या श्रोत्यांना समजली नाही अशा असंख्य श्रोत्यांत मी एक होतो.

या काळात यशवंतराव आमदार, नामदार व खासदास नव्हते. काँग्रेसचा झेंडा महाराष्ट्राच्या खेडोपोडी निष्ठेने नेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पथकाचे ते बिनीचे सेनापती होते. त्या भाषणानंतर यशवंतराव चव्हाण यांची कित्येक भाषणे ऐकण्याचा योग आला. सत्तास्थानावर चढत्या श्रेणीने चव्हाण साहेब जात होते. चमकत होते. गर्दीचा तुटवडा त्यांना

कधी भासला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या वादळी कालखंडामध्ये काँग्रेसच्या जहाजाचे कप्तानपद त्यांच्याकडे चालून आले होते. त्या काळात अन्य काँग्रेस नेत्यांना बोलणे जनतेने अवघड केले होते. पण यशवंतराव यांची भाषणे जनतेने ऐकून घेतली. त्यांना विरोध केला, सभेमध्ये निदर्शने केली पण यशवंतराव काय बोलतात म्हणून मराठी जनतेचे कान त्यांच्या बोलण्याकडे संयुक्त महाराष्ट्राच्या काळात लागले होते. या कालखंडामध्ये त्यांच्या सभा ऐकतांना सारखे जाणवायचे की, या माणसाला मराठी माणूस समजला आहे, उमजला आहे. समोरच्या माणसाला आपलेसे करण्याची चव्हाणांची खास शैली आहे.

या खास शैलीचे अनुभव साहित्य संमेलनात आले. सार्वजनिक वाचनालयाच्या महोत्सवामध्ये आले. नाशिकला कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओलावा अगर नाटकातील वाक्यांचा उल्लेख केल्याशिवाय चव्हाण साहेबांनी आपले भाषण कधी थांबवले नाही. महाराष्ट्राच्या विविध शहरांना त्यांची त्यांची दैवते आहेत. चव्हाणसाहेबांना या दैवतांच्या महात्म्याची जाण चांगली आहे. त्याचा उल्लेख सभांमध्ये करून सभा जिंकण्याची यशवंतरावांची खासीयत मी अनेक वेळा अनुभवली आहे.

साहित्यावरील सभा वेगळ्या आणि राजकीय मैदानावरील सभा वेगळ्या आहेत. काँग्रेसच्या व्यासपीठावरून विचारांचे आणि निष्ठेचे आवाहान करताना सामान्य माणूस हा त्यांच्या भाषणाचा सदैव केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट जाणवले. त्यांच्या सभोवती गोळा झालेल्यांपैकी काहींना या विचाराचे वावडे असल्याचे लक्षात आले.

विशेषतः नाशिकला कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या सत्काराला यशवंतराव अगत्याने आले. दिलखुलास बोलले, दलितांच्या रास्त हक्काचा त्यांनी पाठपुरावा केला. त्या सभेच्या व्यासपीठावर अस्वस्थ झालेले काही नेते आम्हा पत्रकारांच्या नजरेतून सुटले नाहीत. यशवंतरावांच्या विचारांचा पल्ला प्रभावी आहे. नव्या जमान्याची चाहूल घेणारा आहे एवढेच नव्हे तर नव्या जमान्याचे स्वागत करणारा आहे याची

ग्वाही दलित नेते बुद्धवासी गायकवाडांच्या राजकारणाला त्यांनी डोळस साथ दिली तेव्हा सर्वांना पटली. दोन्ही पक्षाच्या सहजीवनावर त्यांचा कटाक्ष होता. पुरोगामी राजकारणाचे ते सदैव कैवारी राहिले आहेत. त्यांच्या या मोठेपणाची ग्वाही मिळालेले आज त्यांच्या सांगाती आहेत. सुखाचे व सत्तेचे सोबती आपापल्या सुखदुःखात मग्न आहेत.

सातारा-कऱ्हाड भागामध्ये यशवंतराव चव्हाण यांना आपल्या घरातील वडीलधारामाणूस म्हणूनच पाहिले जाते. ही जवळिक महाराष्ट्राच्या अन्य जिल्ह्यामध्ये कमी अधिक आहे. पण यशवंतराव हे केवळ राजकारणी नाहीत, साहित्य, संगीत, कला यांचे मर्मज्ञ जाणकार आहेत याचा प्रत्यय त्यांच्या भाषणातून येतो. दुरून ऐकलेल साहेब या तोलामोलाचे आहेत. ज्या भाग्यवंतांना त्यांच्याजवळ वावरण्याची, राहण्याची, चार शब्दांची देवाणघेवाण करण्याची संधी लाभली आहे त्या सर्वांना साहेबांबद्दल किती आपुलकी, आदर, वाटत असेल याची कल्पना करणे अवघड आहे.

## साधना साप्ताहिक
## महाराष्ट्राचा मोहरा हरपला

सातारा जिल्ह्यातील अगदी गरीब कुटुंबात जन्मलेल्या यशवंतरावांनी कष्टाने आणि हिमतीने शिक्षण केले. त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात, आईने त्यांच्यावर स्वाभिमानी जीवनाचा केलेला संस्कार, कराडमधील त्या वेळचे सार्वजनिक जीवन, म. फुले यांच्यामुळे बहुजन समाजात अंकुरलेल्या नव्या आकांक्षा, स्वातंत्र्य चळवळीचा संवेदनाक्षम विद्यार्थ्यांच्या मनावर झालेला परिणाम, यांचे मोठे बहारीचे चित्र रेखाटले आहे. विद्यार्थी असताना यशवंतरावांना वाचनाची आवड निर्माण झाली आणि ग्रंथांच्या संस्कारातून त्यांच्या मनास योग्य ते वळण लागले. समाजातील जातिभेदाविरुद्ध सत्यशोधक समाजाने घेतलेली भूमिका त्यांना पटत होती, परंतु त्याच वेळी लो. टिळक ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध ज्या झुंजारपणाने लढले त्याचेही त्यांच्या मनाला मोठे आकर्षण वाटत होते. १९३० साली यशवंतराव मॅट्रिकच्या वर्गात असताना त्यांनी म. गांधींच्या हाकेला ओ देऊन सत्याग्रह केला आणि त्यांना कारावासाची शिक्षा झाली. तुरुंगामध्ये त्यांच्या वाचनाला निश्चित वळण लागले. तुरुंगातील आठवणी लिहिताना आचार्य भागवत यांचे, कार्यकर्त्यांचे शिक्षण करणारे आदर्श आचार्य म्हणून यशवंतरावांनी आत्मचरित्रात केलेले वर्णन वाचताना तुरुंग हे कार्यकर्त्यांचे विद्यापीठ कसे होते योची योग्य कल्पना येते.

राजाराम कॉलेजमध्ये गेल्यावर यशवंतरावांच्या बौद्धिक जीवनाला एक शिस्त लागली व वाचनातही विविधता निर्माण झाली. बी. ए. व एल्.एल्.बी. झाल्यावर यशवंतरावांनी वकिली सुरू केली आणि चलेजावची चळवळ आली. एका वेळी रॉय यांच्या विचारांच्या प्रभावाखाली आलेल्या यशवंतरावांनी रॉय यांची भूमिका बाजूस सारून

राष्ट्रवादी भूमिकेवरून स्वातंत्र्य आंदोलनात धडाडीने काम करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीस झालेल्या पुढाऱ्यांच्या धरपकडीत पकडले न जाता यशवंतराव भूमिगत झाले. पुढे त्यांनी क्रान्तिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारमध्ये काम केले. या चळवळीच्या अंतरंगातील विविध प्रवाहांचे यशवंतरावांचे ज्ञान मोठे अचूक होते. मोजक्या शब्दात सातारा जिल्ह्यातील भूमिगत आंदोलनाची ठसठशीत वैशिष्ट्ये त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात रेखाटली आहेत.

१९४६ साली यशवंतराव चव्हाण मुंबई असेंब्लीत निवडून गेले आणि बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळात ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. यशवंतरावांना जी संधी मिळाली, तिच्यातून त्यांच्या गुणांचा अधिकाधिक विकास होत गेला. प्रशासनातील अडचणी त्यांना समजून आल्या. त्याच बरोबर पक्षातील कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाला वाव देऊन समाजाला नवीन वळण कसे द्यावयाचे या दृष्टीने ते आत्मविश्वासपूर्वक काम करू लागले. ग्रामीण भागातील कठोर वास्तव त्यांनी अनुभवले होते. हा अनुभव आणि प्रशासनकार्यातून आलेला आत्मविश्वास यामुळे अल्पावधीतच महाराष्ट्राच्या काँग्रेस संघटनेत व राजकीय जीवनात यशवंतरावांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

यशवंतराव चव्हाण यांचे काही राजकीय आडाखे पक्के होते. पं. नेहरूंच्यावर, त्यांच्या पुरोगामी विचारांवर त्यांची अविचल निष्ठा होती. त्याचबरोबर पक्ष संघटनेचे महत्त्वही त्यांनी अचूक ओळखले होते. काँग्रेस पक्षात ते त्यांचे विचार स्पष्टपणे मांडीत, परंतु मतभेद टोकाला नेणे हे त्यांना अव्यवहारीपणाचे आणि कार्यघातक वाटे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी त्यांनी हीच भूमिका घेतली. त्या वेळी यशवंतरावांच्यावर अनेकांनी कठोर टीका केली. परंतु यशवंतरावांनी पं. नेहरूच्या समवेतच राहण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या हिताची त्यांना काळजी होतीच. पण हे हित कोणत्या रीतीने साधावयाचे यासंबंधी ते मुत्सद्देगिरीने निर्णय घेत होते. १९५७ साली यशवंतराव हे महाराष्ट्राचे

मुख्यमंत्री असताना विरोधी पक्षाचे सामर्थ्य ओळखून यशवंतरावांनी तणावाचे वातावरण कमी करून महाराष्ट्राच्या जीवनात राजकीय सौहार्दाचे वातावरण ज्या तऱ्हेने निर्माण केले त्यातून लोकशाहीचा संस्कार मराठी मनावर निश्चितच झाला.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी माडखोलकरांना सडेतोड उत्तर देताना सांगली येथे केलेल्या भाषणात "संयुक्त महाराष्ट्र हे सर्व मराठी भाषिकांचे राज्य असेल. ते केवळ मराठ्यांचे राज्य असणार नाही" हे दिलेले आश्वासन फार महत्त्वाचे होते आणि त्यातून यशवंतरावांचा व्यापक दृष्टिकोण व्यक्त झाला.

१९५७ ते १९६२ या काळात मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांनी केलेले कार्य अतिशय मोलाचे होते आणि या कामामुळे ते आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीचे शिल्पकार मानले जातात. यशवंतरावांनी बहुजनसमाजाला एक नवीन आत्मविश्वास दिला. श्री. बाळासाहेब खेर व बऱ्याच अंशाने मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात शहरी, पांढरपेशा मंत्र्यांचे वर्चस्व होते. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यामध्ये ग्रामीण नेतृत्वाला निश्चित स्थान मिळाले. विधिमंडळाचे कामकाजही मुख्यतः मराठीतच होऊ लागले. मात्र केवळ मंत्रिमंडळात मूठभर व्यक्तींना स्थान देणे ही यशवंतरावांची दृष्टी नव्हती. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने व सहकारी बँका यांचे जाळे निर्माण करून कार्यकर्त्यांच्या उपक्रमशीलतेला वाव देता येईल हे यशवंतरावांनी अचूक हेरले. पद्मश्री विखे पाटील यांच्या नगर जिल्ह्याच्या उत्तरभागातील कामाचे महत्त्व त्यांनी बरोबर ओळखले. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा सल्ला यशवंतराव फार मानीत असत. पद्मश्री विखे पाटील तसेच स्वातंत्र्य चळवळीत कार्य केलेले रत्नाप्पा कुंभार, वसंतदादा पाटील आदींच्या संघटनाचातुर्याच्या आणि विधायक कर्तृत्वाच्या मागे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव खंबीरपणे उभे राहिले आणि त्यामुळेच महाराष्ट्रात सहकारी चळवळ फोफावली.

राजकीय क्षेत्रात सत्तेचे विकेन्द्रीकरण झाले पाहिजे आणि ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना विकासकार्यात सहभाग मिळावा हा यशवंतरावांचा दृष्टीकोण होता आणि या दृष्टीनेच ना. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून या समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांची त्यांनी उभारणी केली. आधुनिक महाराष्ट्राच्या जीवनातील हे फार महत्त्वाचे पाऊल होते. ही गोष्ट खरी की प्रत्यक्षात यामुळे बागाईत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची महाराष्ट्राच्या राजकारणात जबरदस्त पकड निर्माण झाली! सहकारी संस्था, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या या सत्तास्थानांमधून गटबाजी व गळेकापू स्पर्धा सुरू झाली. अर्थात याबद्दल दोष यशवंतरावांना देता येणार नाही.

दुसऱ्या एका गोष्टीचा येथे उल्लेख करणेही आवश्यक आहे. एका भाषणात श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, महाराष्ट्रातील प्रश्न हा मुख्यतः जिराईत शेतीचा प्रश्न आहे. परंतु या जिराईत शेतकऱ्याची स्थिती सुधारेल, त्याच्या जीवनावर कायम पडलेले दुष्काळाचे सावट दूर होईल यासाठी पुरेसे उपाय योजण्यात आले नाहीत.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शिक्षणाच्या प्रसारासंबंधीही यशवंतरावजींच्या कल्पना सुस्पष्ट होत्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या द्वारा ग्रामीण भागात जे शिक्षणप्रसाराचे कार्य केले त्याचे महत्त्व यशवंतराव पुरेपूर जाणत होते. रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी यशवंतराव हे पंचवीस वर्षांहून अधिक काल राहिले ही त्यांची कृती अत्यंत उचित होती. "ग्रामीण भागात महाविद्यालये काढण्याच्या निर्णयामुळे शिक्षणाचा दर्जा खाली येईल." अशी टीका झाली. त्या टीकेतील सत्य समजत असले तरी जो वर्ग पिढ्या न् पिढ्या ज्ञानापासून वंचित राहिला त्या शेतकरी समाजातील पहिल्या पिढीला उच्च शिक्षणाची संधी मिळणे हेही सांस्कृतिक जीवनातील दरी कमी करण्यासाठी जरूर आहे, ही यशवंतरावांची वास्तववादी भूमिका होती. ग्रामीण भागातील ग्रॅज्युएट झालेल्यांना नोकऱ्या मिळत नाहीत या टीकेला उत्तर देताना,

“अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार वेगळीत आव्हाने समाजापुढे निर्माण करील व त्यातूनच सामाजिक प्रगती होईल.” हे यशवंतरावांनी दिलेले उत्तर समर्पक व दूरदृष्टीचे द्योतक होते.

१९६२ साली चिनी आक्रमणाच्या वेळी भारतीय सेनेला जी माघार घ्यावी लागली त्यामुळे राष्ट्राचा तेजोभंग झाला. अशा वेळी पं. नेहरूंनी त्या वेळचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्या राजिनाम्यानंतर यशवंतरावांना संरक्षणमंत्री म्हणून बोलावून घेतले. त्या वेळी महाराष्ट्राला तो आपला गौरव वाटला आणि या घटनेचे वर्णन “हिमालयाच्या मदतीस सह्याद्री धावून गेला” असे करण्यात आले. यशवंतरावांनी ही जबाबदारी स्वीकारणे योग्यच होते.

यशवंतरावांनी दिल्लीमध्ये संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री, उपपंतप्रधान आदी विविध पदांवरून काम केले. ते अतिशय कुशल प्रशासक होते. मुख्य समस्या कोणत्या आहेत हे ते अचूक जाणीत असत. ते मोजकेच बोलत. चर्चा विचार-विनिमय सतत करीत. निर्णय घेताना ते हट्टाग्रह धरीत नसत. परंतु निर्णय तत्त्वांच्या आधारे व्हावा, तो करताना वास्तवाचे भान कायम राहावे आणि त्याचबरोबर एकदा निर्णय झाला की, त्याची अंमलबजावणी खंबीरपणे व्हावी ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये होती. देशाच्या दृष्टीने या जबाबदाऱ्या यशवंतरावांनी स्वीकारल्या हे योग्य झाले असले तरी त्यामुळे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांशी त्यांचा पूर्वीचा संपर्क काहीसा कमी झाला आणि त्यामुळे येथील काही अनिष्ट प्रवृत्तींना आटोक्यात ठेवणे त्यांना शक्य झाले नाही.

समाजपरिवर्तन झाले पाहिजे हा यशवंतरावजींचा दृष्टीकोण स्पष्ट होता. परंतु सत्तेचा वापर करून या परिवर्तनप्रक्रियेस गती दिली पाहिजे आणि असा सत्तेचा योग्य वापर सत्ताधारी पक्षाने सतत केला पाहिजे अशी यशवंतरावांची भूमिका होती.

राजकारणात असताना यशवंतरावांची रसिकता कधी लोपली नाही. त्यांच्या मनाला कधी रुक्षपणा आला नाही. साहित्यावर त्यांचे अलोट प्रेम

होते. ते स्वतः मराठी उत्तम लिहीत. त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला भाग हा मराठी साहित्याचा एक अलंकार आहे. हे आत्मचरित्र पुरे व्हावयास हवे होते. दुर्दैवाने ते घडले नाही. यशवंतरावांचे ग्रंथप्रेम हा त्याच व्यक्तिमत्त्वाचा एक विलोभनीय पैलू होता.

आज देश कठीण अवस्थेतून जात असताना कोणत्याही एका पक्षाचे नेतृत्व सर्व समस्या सोडवू शकणार नाही. अशा वेळी यशवंतराव चव्हाणांसारखा व्यापक दृष्टिकोण ठेवणारा मुत्सद्दी केन्द्रीय मंत्रिमंडळात असणे आवश्यक होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना यशवंतराव हे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांबरोबर अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करून नंतरच निर्णय घेत. ही कार्यपद्धतीच लोकशाहीला योग्य असून भारतासारख्या खंडप्राय देशात राज्यकर्त्यांनी विविध दृष्टिकोण सामावून घेतले पाहिजेत. यशवंतरावांसारखा ज्येष्ठ मुत्सद्दीच आत्मविश्वासाने अशी कार्यपद्धती स्वीकारू शकतो.

## श्री. एस. के. कुलकर्णी
## गरिबांच्या कणवेचा महापूर

यशवंतराव हे प्रारंभापासून झुंजार मनाचे व्यक्तिमत्त्व होते. टिळक हायस्कूल, कऱ्हाड ही त्यांची शाळा. त्या शाळेतल्या लिंबाच्या झाडावर काँग्रेसचा तिरंगा झेंडा फडकावून त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात झेप घेतली आणि तुरुंगवास पत्करला. पुढे १९६७ मध्ये त्या लिंबाच्या झाडाबद्दल आपला जिव्हाळा प्रगट करताना श्री. यशवंतराव म्हणाले, "ज्या झाडावर आम्ही बालपणी तिरंगा फडकावला ते झाड कृपा करून पाडले जाऊ नये अशी विनंती मी शाळाचालकांना केली आहे." या एकाच घटनेतून कितीतरी गोष्टी सहजपणे जाणवतात. चळवळीबद्दल नितांत आदर, तीत बालवयात झेप घेणारे साहसी मन आणि पुढे ते सारे स्मरणात ठेवून त्या झाडावरही नितांत प्रेम करणारे कविमन. सारांश यशवंतराव हे एक विविध अंगी आणि विविध छटांनी नटलेले अजोड व्यक्तिमत्त्व आहे.

जवळजवळ १९२९-३० पासून स्वातंत्र्यलढ्यात आणि राजकारणात सक्रिय भाग येऊन जवळजवळ पाच-साडेपाच दशके त्यांचे शरीर, मन आणि बुद्धी देशाच्या भल्यासाठी झगडत आली. इतका प्रदीर्घ काळ देशासाठी दिलेली फार थोडी माणसे आढळतील.

अशा असामान्य व्यक्तिमत्त्वाचा जवळून परिचय झाला आणि अनेक प्रसंगी त्यांना जवळून पाहता आले ही माझ्या आयुष्यातील एक मोठी विलक्षण संधी, असेच मी मानीत आलो आहे. त्याची सुरुवात १९५२ मध्ये ते मुंबई राज्याचे समाजकल्याणमंत्री असताना लिहिलेल्या एका साध्या पत्रातून झाली. एका ग्रामपंचायतीचा प्रश्न त्या पत्रात मांडला होता. पुढे तो सुटण्यास कैक वर्षे लागली, पण त्यातून जुळलेले नाते गेली ३२ वर्षे अखंडपणे कायम राहिले. समाधान याचे आहे की, माझे वय, माझी

पार्श्वभूमी असा कसलाच विचार न करता यशवंतरावांनी हिमालयाएवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने माझ्यासारख्या भुईसपाट ढेकळाशी जवळीक केली.

पुढे एके दिवशी माझ्या शिक्षणाची त्यांनी आपुलकीने चौकशी केली. त्या वेळी ते द्विभाषिकाचे मुख्यमंत्री होते. साहेबांनी आपली चौकशी केली, या एका विचारासरशी सारे अंग मोहरून उठले. ती जाणीव आणि त्यांच्या शब्दातील तो आपुलकीचा ओलावा अवीट आहे, न संपणारा आहे. तीच आपल्या जीवनातील नियतीने बांधून दिलेली आपुलकीची शिदोरी, असे मी मानीत आलो आहे. पुढे प्रत्येक भेटीत आणि त्यांच्या जमेल त्या कार्यक्रमास जातीने उपस्थित राहून त्यांच्या शब्दांचा कानात आणि मनात साठा करून ठेवण्याचा उद्योग आणि चाळाच लागला. मग ती ६२ ची निवडणूक असो, ६७ ची निवडणूक असो, ७१ ची निवडणूक असो, त्यांच्या पाठोपाठ पुष्कळ सभांना हजर राहण्यासाठी धडपड केली आहे.

दिल्लीत गेल्यानंतर एक मुख्य कार्यक्रम म्हणून "१ रेसकोर्स रोड" या ठिकाणाला आवर्जून भेट द्यायची हे ठरून गेलेले होते. हा सगळा प्रकार पाहिल्यावर पुष्कळांनी प्रश्न केला की, "आपला पक्ष कोणता? आपण काँग्रेसवाले काय?" त्यांना मी अनेकदा सांगितले की, "मला पक्ष असा नाही, पण साहेब ज्या पक्षात, त्या बाजूला मी ठामपणे उभा राहीन." लोकांना माझ्या उत्तरातील कोडे कधीच समजले नाही. जीवनातील प्रारंभीची वर्षे वणवण भटकणाऱ्या माझ्या कष्टांच्या झोळीत वर म्हटल्याप्रमाणे जी आपुलकीची भिक्षा आपण होऊन घातली गेली, तिचा मी ऋणाईत न राहू तर काय करू?

साहेबांबद्दल आपुलकीची अपूर्वाई वाढत जाण्याचे एक कारण म्हणजे त्यांच्यातील जुन्या-नव्यांचा अपूर्व संगम. त्यांचे कृष्णेवर प्रेम होते, त्यांचे कोयनेवर प्रेम होते, त्यांचे प्रीतिसंगमावर प्रेम होते, त्यांचे सज्जनगडावर प्रेम होते, त्यांचे कृष्णाकाठच्या ज्वारीवर प्रेम होते, गोट्याच्या वांग्यावर प्रेम होते. कृष्णेतल्या होडीवर त्यांची भक्ती होती. हा जसा एका बाजूला अपूर्व प्रीतीचा सोहळा, तसा दुसऱ्या बाजूला गरिबांच्या कणवेचा महापूर

होता. शेकडो भाषणांतून, साध्यासिध्या शब्दांतून जणू लोकांशी चर्चा-संवाद करीत त्यांनी आपले आवडते समाजवादाचे सिद्धान्त अशिक्षित, भोळ्याभाबड्या जनतेला थोरल्या भावाच्या मायेने समजावून सांगितले.

प्रत्येक गावात जाताना तेथली माणसे त्यांच्या लक्षात असत, परिस्थितीचा संदर्भ माहीत असे. आपल्याबरोबरच्या कार्यकर्त्यांची वास्तपुस्त ते सदैव ठेवत. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील पिंगळीजवळच्या ओढ्यातून साहेबांची गाडी पुढे येताच लोकांनी त्यांच्यावर हारांचा वर्षाव केला, तेव्हा ते सांगू लागले, "मागे बापू (राजारामबापू पाटील) आहेत, त्यांनाही हार घाला," बापूंबद्दल म्हणजे आपल्या पाठीमागच्या गाडीतून येणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल अशी एक वेगळी जाणीव त्यांच्या वागण्यात, बोलण्यात आणि चालण्यात असे.

साहेबांबद्दल लिहिताना श्रीपाद डोंगरेंबद्दल बोललेच पाहिजे. रामाबद्दल लिहिताना हनुमानाची आठवण नेहमीच येते. साहेबांविषयी अजोड प्रेम असणारा हा असामान्य कौटुंबिक सेवक होता. त्यांच्याबद्दलही खूप लिहावे लागेल. ते डोंगरे गेले आणि साहेबांना एक धक्का बसला. ते डोंगरे कसे होते? साहेबांच्या बरोबर असणाऱ्या जवळच्या माणसांना जेवण मिळाल्याशिवाय स्वतः जेवायला न बसणारे, साहेबांच्या कार्यक्रमांची नेहमीच गर्दी असे, लोकांचा गराडा असे, ते जेवायला बसले की, डोंगरे पत्रकार म्हणून आणि जवळचे म्हणून आम्हाला हुडकीत येत आणि आमची व्यवस्था झाल्यावर कडेच्या पानावर बसत. साहेबांकडे येणाऱ्या लोकांच्या प्रश्नांची, त्यांच्या वृत्तींची साऱ्यांची जाणीव असलेले ते एक खास सचिव होते.

साहेबांबरोबर असलेली ही जवळीक त्यांनी आणखी एका गोष्टीतून वाढवीत नेली. ती गोष्ट म्हणजे माझी इच्छा नसताना त्यांनी मला त्यांच्या आवडत्या देवस्थानच्या जीर्णोद्धाराच्या प्रयत्नात सामावून घेतले. त्यासंबंधात त्यांनी लिहिलेले एक पत्र अत्यंत आपुलकीने ओथंबलेले आहे. ते वाचून "आपण म्हणता तर हे काम पुरे झाले असे समजावे" या

शब्दातच मी माझी मान्यता कळवून टाकली. ते काम पुरे झाले, उत्तम रीतीने पार पडले याबद्दल त्यांना झालेला आनंद त्यांनी अनेकदा व्यक्त केला.

## श्री. द्वा. भ. कर्णिक
## वैचारिक जडणघडण

यशवंतराव चव्हाण ज्या काळात उमेदीने पुढे आले त्या काळात विचारमंथनाने शीग गाठली होती आणि प्रत्यक्ष क्रांतिकार्यालाही उधाण आले होते. त्या काळाचा विचार मनात आला की, वाटते केवढे प्रबळ विचारस्रोत तरुण मनाला मोहिनी घालण्यासाठी उगम पावले होते. गांधीवादी सत्याग्रह हा राष्ट्रवादी उद्रेकातील एक अभूतपूर्व पवित्रा होता. त्याच्या पूर्वीच १९१७ साली रशियन राज्यक्रांतीने साऱ्या जगाला हादरवून सोडले होते. त्या क्रांतीची परिणती म्हणून समाजवादी विचारसरणीचे एक नवे दालन जवाहरलाल नेहरू यांनी खुले केले होते. त्या तत्त्वप्रणालीचा विकास होत असतानाच स्वातंत्र्ययुद्धात प्रत्यक्षपणे पदार्पण करण्यासाठी एम्.एन.रॉय यांनी भारतात अनपेक्षितपणे प्रवेश करून कम्युनिझमचा व्यवहार्य मार्ग दाखवून आणि त्यातून ब्रिटिश राज्यसत्तेला कसा शह देता येईल याचे बौद्धिक आपल्या अनुयायांना शिकविण्याचा पवित्रा टाकला. संस्कारक्षम यशवंतरावांना त्यातून क्रांतिकारक चळवळीबद्दलची एक नवी दिशा मिळाली. पुढील काळात यशवंतराव चव्हाण हे रॉयवाद्यांचे सहयात्रिक राहिले नाहीत, पण रॉय यांच्या ऋणाचा त्यांना कधीही विसर पडला नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

यशवंतराव चव्हाण यांनी जे जे विचार ग्रहण केले ते ते प्रत्यक्ष कार्यातून जनतेच्या कसे उपयोगी पडेल या दृष्टीने त्यांनी आपल्या ध्येयधोरणाची आणखी केली. त्यांचे विचारग्रहण परांङ्पंडितांचे नव्हते. ते क्रियावान कर्तृत्वपूर्ण जसे आंदोलक तसेच आंदोलकांचे नेतेही होते. शिवाय जन्मजात दारिद्र्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असल्यामुळे समाजातील दुर्बल घटकांकडे साहजिकच त्यांचा कल झुकलेला असे. गांधीजींनी दरिद्रीनारायणाची सेवा करण्याचे जे व्रत अंगीकारले होते तिला नेहरूंनी

समाजवादी निष्ठेची धार दिली. यशवंतरावजींनी त्यात आणखी भर टाकली ती ही की जोतिबा फुले व शाहू महाराज, विठ्ठलरामजी शिंदे आणि भाऊराव पाटील यांच्यापासून स्फूर्ती घेऊन पददलित जनतेच्या शिक्षणासाठी व संवर्धनासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व प्रकारच्या शिक्षणाचे लोण खेड्यातील सामान्य आणि दरिद्री जनतेपर्यंत पोचविले. विशिष्ट किमान उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याचा पायंडा पाडण्यात यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यच आघाडीवर राहिले, हे कोणालाही विसरून चालणार नाही. त्यांच्याच प्रेरणेने सहकारी साखर व इतर कारखाने जसे उभे राहिले त्याचप्रमाणे जिल्हा परिषदांच्यातर्फे विकेंद्रीकरणाची योजनाही साकार झाली. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या वैचारिक प्रज्ञेचा जो तेजस्वी साक्षात्कार प्रगट केला तो नवबौद्धांना, अस्पृश्य समाजाला मिळणाऱ्या साऱ्या सवलतींची व अधिकारांची ग्वाही देण्यात साऱ्या देशात अग्रस्थान पटकावून होय. चव्हाण यांचे असामान्य वैशिष्ट्य होते ते हे की, दलितांच्या भावभावनांशी ते परिपूर्णपणे समरस झाले होते. त्याबद्दलचे एक उदाहरण देता येईल. ते असे की काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र टाईम्सच्या रविवारच्या आवृत्तीत श्री. शंकर सारडा यांनी परिश्रमपूर्वक नवोदित दलित कवींच्या कविता जमा करून त्यांना डोळे दिपवून टाकणारी प्रसिद्धी दिली व त्यावर साधकबाधक दोन लेखही छापले. यशवंतराव चव्हाण यांना ती कल्पना इतकी आवडली की, संरक्षणमंत्रिपदाची बोजड जबाबदारी सांभाळीत असतानाही त्यांनी दिल्लीहून पत्र पाठवून या उपक्रमाचे कौतुक केले आणि दलित कवींच्या भावना याच वेळी प्रथम आपल्या निदर्शनास आणण्यात आल्या अशीही कबुली दिली.

यशवंतराव चव्हाण यांच्या वैचारिक जडणघडणीत डॉ. आंबेडकर यांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असले तर त्यात नवल नाही. आंबेडकर हे घटनाकार तर खरेच, पण एका पददलित आणि छळवाद

सोसणाऱ्या समाजात स्वाभिमानाची ज्योत पेटविण्यात आणि त्याला माणुसकीचे हक्क संपादन करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आंबेडकर यांनी जी कामगिरी बजाविली तिच्याबद्दल चव्हाण यांच्या मनात नितांत आदर आणि कौतुक असे. त्या आदराच्या पोटीच नवबौद्धांना न्याय देण्यासाठी ते प्रवृत्त झाले आणि खुद्द केंद्रीय सरकार वा इतर प्रदेश राज्ये यांची तमा न बाळगता त्यांनी एकट्याने नवबौद्धांचे जन्मजात हक्क त्यांच्यापासून हिरावून घेतले जाणार नाहीत याबद्दल खबरदारी घेतली. अस्पृश्य समाजाला, दलितांना आणि दलित पँथर्सना सुद्धा यशवंतरावांच्याबद्दल आपुलकीची भावना वाटते. त्याच्या मुळाशी त्यांची मानवताप्रेरित वैचारिक जडणघडणच आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या वैचारिक जडणघडणीचा विचार करताना एक गोष्ट ठामपणे दिसून येते आणि ती ही की, नेहरूंच्याप्रमाणेच समाजवादाकडे कल असूनही चव्हाण हे राष्ट्रवादी प्रवाहापासून कधीही दूर झाले नाहीत. रॉय यांच्याशी त्यांची जी फारकत झाली ती याच कारणामुळे होय. कारण दुसऱ्या महायुद्धाच्या बाबतीत रॉय यांनी जो पवित्रा घेतला तो यशवंतरावांना राष्ट्रवादी प्रवाहाशी विसंगत असा वाटला आणि म्हणूनच युद्धसहकार्याच्या रॉय यांच्या भूमिकेला जाहीरपणे विरोध करून त्यांनी गांधीजींच्या "चलेजाव" आंदोलनात हिरीरीने उडी घेतली. नेहरू व चव्हाण यांच्यामध्ये जी वैचारिक समरसता दिसून आली ती ही की, समाजवादाबद्दलचा आग्रह धरताना दोघांनीही गांधीजींचे नेतृत्व कधीही अमान्य केले नाही. सत्याग्रही समाजवादी आणि प्रगतशील लोकशाहीवादी असे चव्हाण यांच्या वैचारिक जडणघडणीचे यथार्थ वर्णन करता येईल.

## श्री. गोविंद तळवलकर
## सुसंस्कारित मराठी नेता

यशवंतरावांनी राजकारणात प्रवेश केला. तो विशिष्ट संस्कार घेऊन, त्यांनी व्यासंगाने आपल्या मनाची मशागत केली. मॅट्रिक होण्यापूर्वी स्वातंत्र्य चळवळीने व सामाजिक जीवनाने ते आकर्षित झाले होते. म्हणून जतीनदासांनी उपोषण करून मृत्यू कवटाळला तेव्हा दुःखी होऊन ज्यांनी त्या वेळी उत्फूर्तपणे उपवास केला त्यात यशवंतराव होते. मॅट्रिकला असतानाच कराडात हरिजनांसाठी रात्रीची शाळा सुरू करण्यात पुढाकार घेणाऱ्या यशवंतरावांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना उद्धाटनासाठी आमंत्रण देण्याचे सुचले. पुढे अनेक दशकांनंतर त्यांनी पुणे विद्यापीठात विठ्ठल रामजींवर मार्मिक भाषणही केले ते त्यांच्या वाचनाची फलश्रुती म्हणून. कारावासात मार्क्सवाद, इतिहास याबरोबरच टागोर आणि कालिदास यांच्या वाङ्मयाचे वाचन झाले. या कामी ह. रा. महाजनी, आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन इत्यादींचे साहाय्य त्यांना मिळाले होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेल्या यशवंतरावांच्या मनावर वास्तविक वडील बंधूंचे सत्यशोधक समाजाच्या राजकारणाचे व सामाजिक विचारांचे परिणाम व्हावयाचे. पण ते त्यापासून दूर राहून राष्ट्रीय चळवळीत सामील झाले. तेथेही गांधींचा प्रभाव मान्य करूनसुद्धा त्यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा पगडा बसला. तुरुंगातून बाहेर पडल्यावर ते जवळपास कम्युनिस्ट पक्षात जाणार होते! आणि तसे नसते तर रॉयिस्ट पंथ त्यांनी स्वीकारला असता, पण राष्ट्रीय चळवळीला अग्रक्रम असून ती महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच करू शकते ही यशवंतरावांची पक्की समजूत होती. आधुनिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांचा मागोवा घेतल्यामुळे गांधीवादी कर्मकांडात यशवंतराव सापडले नाहीत आणि स्वातंत्र्यवीर गांधीवादी कर्मकांडात यशवंतराव

सापडले नाहीत आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतिकार्याचे महत्त्व त्यांना कमी वाटले नाही. म्हणून रत्नागिरीला जाऊन त्यांनी सावरकरांची भेट घेतली. पक्षाच्या वा पंथाच्या भिंती स्वतःभोवती उभ्या न केल्याने पुढे सत्तेवर असताना व नसताना यशवंतराव अनेकविध पक्षांच्या, मतपंथाच्या लोकांत, सहजपणे मिसळत. कारावासात असताना जशी वाचन व चर्चा याद्वारे यशवंतरावांनी आपल्या मनाची मशागत केली होती त्याचप्रमाणे महाविद्यालयातल्याप्रमाणेच अखेरपर्यंत त्यांचे ग्रंथप्रेम कमी झाले नाही. म्हणून मराठी व इंग्रजी पुस्तके ते आवडीने घेत व चोखंदळपणे वाचीत. परदेशात जात तेव्हाही पुस्तकाच्या दुकानात वेळ घालवून खरेदी केल्याशिवाय ते परत येत नसत.

तरुणपणी कराडहून कोल्हापूरला जाऊन पिटात बसून त्यांनी नाटके पाहिली. म्हैसूरकर महाराज, भागवतबुवा, बाबा आळतेकर यांची संगीत भजने व औंधच्या दाजी गुरवाचा पखवाज ऐकण्यात अनेक रात्री घालविल्या. गडकऱ्यांच्या नाटकातले संवाद त्यांनी पाठ केले होते आणि “राजसंन्यास” हे तर त्यांचे आवडते नाटक होते. रशियाला गेल्यावर मॉस्कोपासून काही अंतरावर असलेल्या टॉलस्टॉय यांच्या यस्नापलाना या निवासस्थानाला भेट देण्यास यशवंतराव विसरले नव्हते. तेथील शांतता व घनदाट वृक्षराजी पाहिल्यावर सोन्याच्या पिंपळाखाली ज्ञानदेवांनी ज्ञानसाधनेस बसावे असे ते ठिकाण असल्याची यशवंतरावांची भावना झाली. रॉय जेकिन्स हे एक काळ ब्रिटिश मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. आता ते सोशल डेमोक्रॅटिक पक्षात आहेत. जेकिन्स हे चांगले लेखक. त्यांनी ॲस्क्विथ यांचे सुंदर चरित्र लिहिले आहे. ते यशवंतरावांनी वाचले होते व लंडनला गेल्यावर त्यांनी जेन्किन्स यांची मुद्दाम भेट घेतली. स्वतःच्या मनाची मशागत त्यांनी अशी केली होती. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होते त्याचप्रमाणे स्वाभाविक आवडही होती. यामुळे त्यांचे लेखन व भाषण मोजके व अनेकदा मार्मिक असे.

स्वातंत्र्याबरोबरच यशवंतरावांचा प्रवास दीर्घकाळ सत्ताधारी या नात्याने झाला. पूर्वीच्या मंबई राज्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी या पदाचेपासून ते दिल्लीत निरनिराळ्या खात्याचे मंत्री झाले. द्विभाषिकाचे मुख्यमंत्रिपद, दिल्लीत संरक्षण व नंतर गृहमंत्रिपद ही पदे यशवंतरावांना मिळाली तेव्हा अगोदर त्या स्थानांवर असलेल्या व्यक्तींनी निर्माण केलेल्या परिस्थितीची पार्श्वभूमी मिळाली होती. त्यामुळे यशवंतरावांची कारकीर्द अधिकच उजळून निघाली. ते द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. तत्पूर्वी मोरारजीभाईंच्या एकांगी भूमिकेने लोकांची मने दुखावली होती. यशवंतरावांनी बंदुकीच्या जोरावर द्विभाषिक न राबविण्याचे ठरविले. त्यानंतरही ते चालणे शक्य नाही हे दाखवून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी मांडली. ती मान्य झाली. समितीच्या चळवळीचा रेटा, लोकमताचा दणका यांना यशवंतरावांच्या कारभाराची जोड मिळून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा मराठी मनाला नव्या आशेची पालवी फुटली. यामुळेच कुसुमाग्रजांसारख्या कवीने घोषणा केली ---

नव्या जीवनाचा नाद
  मला ऐकू येत आहे
लक्ष शून्यातून
  काही श्रेय आकारत आहे

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर यशवंतरावांनी ग्रामीण व शहरी या दोन्ही समाजांच्या मनाची पकड घेतली. सहकारी साखर कारखान्याचा प्रयोग पूर्वीच सुरू झाला होता, पण तो एकुलता एक होता. यशवंतरावांनी सरकारी धोरण म्हणून अशा साखर कारखान्यांची योजना आखली व ती पार पाडण्यासाठी सरकारी यंत्रणेचे पाठबळ उभे केले. नंतर या क्षेत्रात काही अपप्रवृत्ती निर्माण झाल्या खऱ्या, पण तसा विचार केला तर त्या अनेक क्षेत्रांत झाल्या व होऊ शकतात. तथापि सहकारी साखर कारखानदारीने राज्याच्या काही ग्रामीण भागात मोठा उत्पादक व्यवसाय

सुरू झाला. नवे रचनात्मक कार्य झाले. नवे कार्यकर्ते व पुढारी तयार झाले आणि ते काही कोटींचा व्यवहार करू लागले. सहकारी बँका, उपसासिंचन इत्यादींची वाढ हीसुद्धा रचनात्मक होती. यातून शिक्षणाच्या प्रसारास वाव मिळाला. शाळा व महाविद्यालये यांची संख्यावाढ झाली. ज्या भागात व समाजात शिक्षणाचा वारा लागणे शक्य नव्हते तेथे ते पोहोचला. हे एक सामाजिक परिवर्तन होते, त्यास चालना देण्याचे कार्य यशवंतरावांच्या धोरणामुळे झाले. जिल्हा परिषदांमुळे विकेन्द्रीकरण झाले. तीही गरज होती. मराठवाडा व शिवाजी या दोन विद्यापीठांच्या स्थापनेच्या मागे यशवंतरावांची प्रेरणा होती. या सर्वांचा गुणात्मक दर्जा वाढावयास हवा हे मान्य असले तरी प्रारंभ होणे अत्यावश्यक होते. हे फार मोठे महत्त्वाचे काम यशवंतरावांमुळे झाले. साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना, येथे साहित्य व संस्कृतीला वाव मिळावा, नव्या शास्त्रीय विचारांचा प्रसार व्हावा, यासाठी झाली. यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हा सर्व खात्यांचे सचिव मुख्यमंत्र्यांचे बोलावणे येताच यथायोग्य माहिती पुरविण्यासाठी तत्पर असत. त्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर ठरावीक अंतराने भेटी होत.

यशवंतरावांनी तात्यासाहेब केळकरांच्या संबंधात जे सुंदर भाषण केले होते त्यातील केळकरांच्या मध्यममार्गी धोरणाबद्दलचे विवेचन काही प्रमाणात यशवंतरावांनाही लागू होते. काही प्रमाणात म्हणण्याचे कारण असे की, तात्या-साहेब कधी सत्तास्थानावर होते? पण सत्तेच्या राजकारणात त्यांच्या वृत्तीचा कल मध्यममार्गी होता. यशवंतराव तात्यासाहेबांबद्दल लिहितात, "दुसऱ्यांच्या म्हणण्यातील तथ्य ते मान्य करीत... ते एकांतिक विचाराचे नव्हते, व्यवहारी व मध्यममार्गी होते... केळकरांची मध्यममार्गावर जी श्रद्धा होती त्यामागे एक तर त्यांचे त्याला अनुकूल असे सौम्य व बुद्धिवादी व्यक्तिमत्त्व होते आणि दुसरे, अनुभवी व्यवहारवाद होता. केळकरांनी मध्यमक्रमासंबंधी जे विवेचन केले आहे त्यात म्हटले होते की, मध्यमक्रम, म्हणजे निखालस वाईटाशी समेट

किंवा तडजोड असा नाही, तर जे सामान्यतः चांगले म्हणून समजले जाते त्याचीच मर्यादा शोधून तारतम्याने जे युक्त वाटेल, त्याचे आचरण म्हणजे मध्यमक्रम होय. "सदगुण्याच्या आचरणातही तारतम्याने सुचविणारे मर्यादादर्शन" असे त्याचे शास्त्रीय वर्णन केळकरांनी केले आहे.. "भावना जेव्हा उद्दीपित होतात तेव्हा अशा वृत्तीच्या लोकांची उपेक्षा होते, तशीच ती केळकरांची झाली." असे यशवंतरावांनी समर्पक रीतीने सांगितले.

शेवटी मनाने व शरीराने यशवंतराव खचले होते. प्रथम डोंगरे, नंतर किसन वीर आणि अखेरीस वेणूताई यांच्या निधनाने, त्यांच्या मनावरील जखम अधिकाधिक खोल होत गेली. आपल्या सार्वजनिक जीवनात इतके सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व असलेला नेता सहजासहजी भेटणार नाही.

## श्री. रमेश भोगटे
## टिळकांनंतरचा थोर मराठी नेता

श्री. स.का. पाटील बॉम्बे हॉस्पिटलात अत्यवस्थ होते. आम्ही काहीजण श्री. ए.आर. सुळेंसह आळीपाळीने तेथे बसत होतो. रात्री ८ नंतर मी घरी परतत असे. पाच सहा दिवस पाटीलजी अत्यवस्थ होते, भेटीला आलेल्या माणसांना ओळखू शकत नव्हते. एका रात्री मला यशवंतरावजी चव्हाण यांचा फोन आला, "अहमदनगरला श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या मुलीचे लग्न आहे. मी उद्या पहाटे विमानाने तेथे जाऊन येतो. परवा सकाळी आठ वाजण्यापूर्वी तू 'रिव्हिएरा' मध्ये ये, आपण तेथूनच बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जाऊ."

आणि मी तसा गेलो. दिवाणखान्यात मी वृत्तपत्र वाचीत बसलो असतानाच लगबगीने ते आत आले. माझ्या खांद्यावर हात टाकून जिना उतरलो. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आम्ही गेलो. महेश्वर ठाकूर तेथेच होते. यशवंतरावजींना घेऊन ते व मी आत गेलो आणि पाटीलजींची ती दशा पाहून यशवंतरावजींना गहिवरून आले. पाच-सात मिनिटे त्यांनी त्या अवस्थेतच इकडे तिकडे फिरून पाटीलजींना न्याहाळले आणि नजरेनेच त्यांनी मला बाहेर निघण्यास सांगितले. दाराबाहेर येताच गहिवरलेले यशवंतरावजी आपला हुंदका आवरू शकले नाहीत. "महाराष्ट्राचा सिंह आज असा अगतिक होऊन पडावा हे आमचे दुर्दैव होय." अशा शब्दांत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि दाराबाहेर जमलेल्यांना नमस्ते करून ते माझ्या खांद्यावर हात टाकून निघाले.

मी आज यशवंतरावजींवर लिहिताना हा प्रसंग एवढ्यासाठीच येथे नमूद केला आहे की, यशवंतराव आणि अप्पासाहेब पाटील यांच्यात खूप शत्रुत्व होते, एकमेकांकडे ते पाहतही नव्हते असे म्हणणाऱ्यांना यशवंतराव किती हळव्या मनाचे होते आणि वयाने आपल्यापेक्षा वडील

असणाऱ्यांना आणि खरोखरच तेवढे नेतृत्वगुण अंगी असणाऱ्या एका मराठी माणसाबद्दल त्यांना केवढा आदर वाटत होता, त्याचे दर्शन सर्वसाधारण मराठी माणसाला होण्यासाठी. यशवंतरावजी मोठे झाले ते अशा गुणपूजक वृत्तीमुळे. लोकमान्य टिळकांनंतर लुळ्या पडलेल्या महाराष्ट्रातील काँग्रेसला खरे नेतृत्व दिले ते यशवंतरावजींनी आणि आज बहुजन समाज ज्या दिमाखाने महाराष्ट्रीय राजकारणात वावरत आहे तोही यशवंतरावजींच्या दूरदृष्टीमुळे. १९५३ साली मी माझे "नवसंदेश" हे साप्ताहिक सुरू केले तेव्हा यशवंतरावजी चव्हाण हे मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात होते. माझी आणि त्यांची ओळख तशी जुनी. १९४२ च्या चळवळीत मला अठरा महिन्यांची शिक्षा झाली आणि १९४४ च्या मार्चमध्ये मी तुरुंगातून सुटलो तेव्हा मुंबईतील जुन्या काँग्रेस हाऊसच्या बाजूला आचार्य अत्रे यांनी आपल्या अत्रे प्रिंटिंग प्रेसच्या कार्याची मुहुर्तमेढ रोवली होती. मी "नवयुग" साप्ताहिकात प्रुफ रीडर म्हणून कामास लागलो होतो आणि पत्री सरकारबाबत नारायण पुराणिक हे मजकूर लिहीत असत. मलाही पत्री सरकारबद्दल एक प्रकारची आपुलकी वाटत होती. फलटणचे त्या काळचे राजेसाहेब श्रीमान मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्याशी माझ्या एका मित्राने माझी ओळख करून दिली होती आणि त्या जोरावर मी श्रीमंतांना पत्र लिहून फलटणला गेलो होतो. यशवंतरावजींची सासुरवाडी फलटणलाच होती. ज्या दिवशी मी फलटणला गेलो त्या दिवशी त्यांचा मुक्काम फलटणलाच असल्याचे श्रीमंतांकडून समजले. राजेसाहेबांनी त्यांची व माझी भेट घडवून आणली आणि आमचे त्या वेळी जे मेतकूट जमले ते यशवंतरावजींचे देहावसान होईतो कायम होते. मुंबईत पुढे ते बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमले गेले. त्या वेळी ते मरीन ड्राईव्हवरील जैन मंडळाच्या इमारतीत राहायचे. पगार जेमतेम दीडशे रुपये असावा. यशवंतरावजींची आर्थिक बाजू त्या काळात मुंबईतील खोक्याचे एक व्यापारी कै. बाबुराव गोडसे हे सांभाळायचे आणि हे पैसे पोहोचविण्याचे

काम अधूनमधून माझ्याकडे असायचे. साहजिकच यशवंतरावजींशी माझे संबंध जिव्हाळ्याचे झाले आणि त्यांच्या दिवसेंदिवस शुक्लेंदुवत वाढत जाणाऱ्या कार्यकर्तृत्वाची आणि बुद्धिमत्तेची चुणूक मला जवळून न्याहाळता आली. पुढे यशवंतरावजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, भारताचे संरक्षणमंत्री झाले, अर्थमंत्री झाले, गृहमंत्री झाले आणि अगेर चरणसिंग राजवटीत भारताचे उपपंतप्रधानही झाले. यशवंतराव मोठे होत होते, परंतु आमच्यासारख्या लहान कार्यकर्त्यांना मात्र ते शेवटपर्यंत विसरले नव्हते.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार म्हणून यशवंतरावजींनी मुख्यमंत्री असताना फार मोलाचे कार्य केले आहे. बहुजन समाजाला एक नवा आत्मविश्वास त्यांनी दिला. ग्रामीण नेतृत्वाला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मानाचे स्थान देण्याचा यशवंतरावजींचा प्रयत्न हा तर महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहावा असा क्षण आहे. पुऱ्या भारताला ललामभूत ठरणाऱ्या सहकारी क्षेत्राला यशवंतरावजींनी एक प्रकारची संजीवनीच दिली. ग्रामीण क्षेत्रातील संघटनाकुशल आणि विधायक कर्तृत्वामागे यशवंतराव दीपस्तंभासारखे उभे राहिले आणि परिणामी सहकारी चळवळ फोफावण्यास हातभार लागला. सहकाराबरोबर महाराष्ट्राच्या शेतीच्या प्रश्नाकडेही यशवंतरावजींनी आपुलकीने लक्ष दिले आणि महाराष्ट्राला या क्षेत्रातही अग्रेसरत्व प्राप्त झाले.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसारही यशवंतरावजींनी एका सुस्पष्ट भावनेने केलेला दिसेल. शिक्षणावाचून पिढ्यानपिढ्या वंचित राहिलेल्या शेतकरी समाजातील एका पिढीला उच्च शिक्षणाची संधी मिळवून देऊन सांस्कृतिक जीवनातील दरी कमी करण्याच्या उद्देशाने यशवंतरावजींनी वास्तववादी भूमिका स्वीकारली, त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक जीवनाला एक वेगळीच कलाटणी लागलेली आपणास दिसून येईल. यशवंतरावांच्या रूपाने हिमालयाच्या संरक्षणासाठी १९६२ च्या

सुमारास तो सह्याद्री धावून गेला नसता आणि पंडीत नेहरूंनी आणखी पाच वर्ष महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी यशवंतरावजींना ठेवले असते तर महाराष्ट्राचे आज हे चित्र दिसते त्याहून निराळे दिसते.

यशवंतराव हे महाराष्ट्राने या थोर देशाला अर्पण केलेले एक थोर अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. राजकारणाबरोबरच साहित्य आणि कला या प्रांतातील यशवंतरावजींचा स्वैर संचार कुणीही हेवा करावा इतक्या मोलाचा होता. लोकोत्तर राजकारणी म्हणून त्यांनी दिगंत कीर्ती मिळविली. त्याला त्यांच्यातील गुणग्राहकता आणि कलात्मकता यांनी विशेष हातभार लावला आहे.

सदैव प्रसन्न चेहरा, कोणाचाही द्वेष न करता वागण्याची पद्धत. होईल तितके आपल्या शक्तीप्रमाणे दुसऱ्यांच्या उपयोगी पडावे, काव्य, शास्त्र, विनोद, साहित्य या गुणांची केलेली जोपासना, कोणी एखादा माणूस एखादे काम घेऊन आलाच तर आणि ते काम ऐकून घेतल्यावर, करणे शक्य असले तर काम घेऊन येणाऱ्या त्या व्यक्तीशी आपुलकीने व प्रसन्नपणे बोलण्याची आणि तो इसम खोलीबाहेर पडताना त्याच्या ओठावर स्मित झळकत असलेले पाहणे ही किमया यशवंतरावजीच करू शकत होते. दुसऱ्याच्या मनाला यातना होतील असे बोलणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. एखाद्याची फसवणूक करणे, थापेबाजी करणे; यशवंतरावजींच्या स्वभावाशी जुळणारे नव्हते. यशवंतरावजी जी उत्तरे देत त्यांचा आशय स्पष्ट आणि निःसंशय असे. उद्धटपणाचा, तिरसटपणाचा अथवा तुच्छतेचा दुर्गंधही त्याला नसायचा. स्वतःच्या सामर्थ्याची बरोबर जाण असणारी, स्वाभिमानी पण स्वभावतःच नम्र असणाऱ्या अशा व्यक्ती या जगात फारच विरळा. यशवंतरावजी यांचे स्थान या विरळा व्यक्तींत होते.

## श्री. विश्वनाथ वाबळे
## लहान वृत्तपत्रासंबंधी आस्था बाळगणारे यशवंतराव

वयाच्या १६ व्या वर्षापासून यशवंतरावांना वर्तमानपत्राचे वेड लागले होते. त्या काळात "केसरी", "ज्ञानप्रकाश" आणि "नवाकाळ" एवढीच वर्तमानपत्रे वाचून यशवंतरावजी राष्ट्रीय स्वातंत्र्याकडे आकर्षित झाले आणि पुढे आपल्या साऱ्या सार्वजनिक जीवनामध्ये यशवंतरावजींनी वर्तमानपत्रांशी आणि पत्रकारांशी सदैव प्रेमाचे संबंध ठेवले. वर्तमानपत्र हा लोकशाहीचा चौथा आधार असल्यामुळे पत्रकारांच्या टीकेने ते कधीही विचलित न होता त्या टीकेपासून बोध येऊन ते आपला कारभार सुधारीत असत. यशवंतरावजींच्या आयुष्यातील कठीण काळामध्ये त्यांना वर्तमानपत्रांनी छेडले असता त्यांनी कधीही वर्तमानपत्रांबरोबर जाहीर वादविवाद केला नाही. परंतु ज्या वेळेला यशवंतरावांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा वृत्तपत्रांकडून प्रयत्न झाला त्या वेळी मात्र खंबीरपणे त्या टीकेची दखल येऊन त्यांनी प्रत्युत्तर केले.

यशवंतराव चव्हाण अत्यंत समंजस, संयमी आणि समजुतदार राजकारणी असल्याची त्यांची ख्याती होती. त्यामुळे समाजातील सर्व थरांतील मंडळींबरोबर समरस होण्याची कला त्यांना चांगलीच अवगत होती. पत्रकारांबरोबर कसे बोलावे आणि कसे वागावे हे माहीत असल्यामुळे त्यांनी पत्रव्यवसायातील मंडळींचेही प्रेम संपादन केले. पण त्यामध्येही त्यांचा एक आगळा-वेगळा दृष्टिकोण मला दिसून आला. जवळच्या पत्रकारांपेक्षा विरोधी पत्रकारांशी ते अतिशय अधिक प्रेमाने वागताना दिसत होते. यासंबंधी एकदा मी त्यांना विचारले असता यशवंतरावजी म्हणाले, "आपल्याकडे येणारे गिऱ्हाईक हे आपलेच असते पण दुसऱ्याकडे जाणारी गिऱ्हाईके खेचून घेण्यातच खरे कौशल्य दाखवता येते." श्री. यशवंतरावांच्या मनातील कौशल्यपूर्ण विचार मला

नेहमीच पटत असे. कारण यशवंतरावांनी त्यांच्यावर टीका करणाऱ्या पत्रकारांना खूष ठेवण्याचा जेवढा प्रयत्न केला तेवढे समाधान मात्र त्यांनी त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांना दिले नाही. तथापि, वैयक्तिक फायद्यातोट्यापेक्षा जेव्हा सामुदायिक प्रश्न उपस्थित होत असत तेव्हा यशवंतरावजी ताबडतोब पत्रव्यवसायाला मदत करण्यास धावून येत असत. १९७२ मध्ये ते अर्थमंत्री असताना पत्रव्यवसायावर पोस्टाने पाठविण्यात यावयाच्या अंकावरील तिकिटाच्या दरात वाढ झाल्यामुळे संकट ओढवले. त्या वेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचा मी अध्यक्ष असल्यामुळे हा अन्याय दूर करण्याकरिता मुंबई मराठी पत्रकार संघाच्या ठरावाप्रमाणे मी आणि श्री. नीलकंठ खाडिलकर (संपादक नवाकाळ) दिल्लीला जाऊन यशवंतरावजींना भेटलो आणि क्षणाचाही विलंब न लावता यशवंतरावजींनी १५ हजारापेक्षा कमी खप असलेल्या वृत्तपत्रांना पूर्वीची असलेली सवलत कायम ठेवण्याचे घोषित केले.

श्री. यशवंतराव चव्हाण गरिबीतून जन्माला आल्यामुळे गरिबांसाठी सतत प्रयत्नशील राहिले. कारण त्यांना गरिबीची जाणीव होती. मोठमोठ्या पत्रकारांबरोबर आणि भांडवलदारी वृत्तपत्रांबरोबर त्यांचे संबंध जरी प्रेमाचे होते तरी त्यांनी छोट्या वृत्तपत्रांकडे सदैव आपुलकीने पाहिले, हे मी स्वानुभवाने सांगू शकेन. संरक्षणमंत्री असताना श्री. यशवंतराव चव्हाण यांनी “शिवनेर” साप्ताहिकाच्या दशवार्षिक उत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहावे अशी त्यांना मी विनंती करताच यशवंतरावजींनी ती मान्य केलीच पण या छोट्या पत्राच्या समारंभासाठीही दिल्लीहून १९६४ साली ते खास मुंबईला आले. शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर झालेल्या घोडपदेव येथील कामगार मेळाव्यात यशवंतरावजींचे आणि “लोकसत्ता” कार श्री. ह. रा. महाजनी यांचे भाषण झाले. त्या वेळी यशवंतरावांनी छोट्या वृत्तपत्रांबद्दल काढलेले उद्‍गार त्यांच्या लोकशाही मनाची साक्ष देणारे आहेत. श्री. यशवंतरावजी म्हणाले होते की, “अमेरीकेमध्ये ५०० प्रतींचा खप असलेल्या

नियतकालिकांच्या मताचासुद्धा विचार केला जातो आणि शासन अशाही पत्रांना आदराने वागविते असे सांगून त्यांनी "शिवनेर" ने केलेल्या ऐतिहासिक कार्याची आठवण करून सांगतले की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सारी मराठी पत्रकार सृष्टी त्यांच्याविरुद्ध गेली असताना "शिवनेर' आणि "लोकसत्ता" ने या काळात यशवंतरावजींना दिलेला पाठिंबा ते विसरू शकत नाहीत. फुले, आंबेडकर, शाहू महाराजांच्या चळवळीतून निर्माण झालेले नवे नेतृत्व नव्या राज्यात देण्याची कामगिरी "शिवनेर" ने मोठ्या निष्ठेने केली हा विचार जेव्हा यशवंतरावजींनी व्यक्त केला तेव्हा घोडपदेव येथे जमलेल्या हजारो लोकांनी टाळ्यांच्या गजरात यशवंतरावांच्या विचारांचे स्वागत केले.

चिपळूण येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाला श्री. यशवंतराव चव्हाण अगत्याने आले होते. त्या प्रसंगी त्यांनी केवळ भाषणच केले नाही तर पत्रकारांबरोबर मनमोकळेपणाने गप्पाही मारल्या. त्या वेळी महाराष्ट्रातील तमाम ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पत्रकार उपस्थित होते आणि त्या सर्वांचे समाधान करणारी उत्तरे यशवंतरावजी मोकळ्या मनाने पण तल्लखपणाने देत होते. यशवंतरावजी पत्रकारांबरोबर बोलताना आणि वागताना इतका समंजसपणा दाखवीत असत की, स्वतःला विचारवंत म्हणविणारे बुद्धिवादी पत्रकार यशवंतरावजींच्या विचारामुळे दिपून जात असत. असे जरी असले तरी, "लहानपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा" या तुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे लहान पत्रातील महान विचारांचाही ते नेहमीच आदर करीत असत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जरी त्यांना "शिवनेर" ने संपूर्ण पाठिंबा दिला तरी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण होताच त्यांच्याविरुद्ध एक सणसणीत अग्रलेख मी लिहीला. त्या वेळी शिवनेर साप्ताहिकाचा प्रसार फार झालेला नव्हता, परंतु जेव्हा त्यांनी "शिवनेर" मधील टीका वाचली तेव्हा त्यांनी माझ्या घरी खास दूत पाठवून मला बोलावून त्यासंबंधी चर्चा केली. वास्तविक त्या वेळी "शिवनेर" चा प्रभाव लोकमतांवर पडण्याइतका त्याचा खपही नव्हता

तरी पण यशवंतरावजींनी मला बोलावताच मी त्यांना विचारले, “माझ्या या अग्रलेखाची आपण एवढी दखल का घेतली?” त्याबरोबर यशवंतरावजींनी दिलेले उत्तर त्यांच्या बहुजन समाजासंबंधी असलेल्या आत्मीयतेची साक्ष पटविणारे होते. यशवंतरावजी म्हणाले, “एकवेळ ‘टाईम्स ऑफ इंडिया’ मध्ये काय आले याला मी महत्त्व देणार नाही, पण “शिवनेर” सारख्या लहान वृत्तपत्रातून आलेल्या विचारांचा विचार मला केलाच पाहिजे. यशवंतरावजींच्या त्या विचारांचा प्रभाव माझ्यावर नेहमीच पडल्यामुळे मी माझ्या विचारांपासून आजपावेतो ढळलेलो नाही.

## श्री. कमलाकर कर्णिक
## यशवंतराव चव्हाण आणि पत्रकार

यशवंतरावांचे आजवरचे राजकारण, त्यांनी घेतलेल्या भूमिका यांचा ऊहापोह आजवर झाला असा तो पुढेही होईल. परंतु त्यांनी केलेला राजकारणप्रवेश हा विशेष संस्काराचा होता. विविध ज्ञानाच्या व्यासंगाने त्यांनी आपल्या मनाची मशागत केली होती. आधुनिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांचा मागोवा घेतल्यामुळे गांधीवादी कर्माकांडात यशवंतराव फारसे सापडले नाहीत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रातिंकार्याचे महत्त्व त्यांना कमी वाटले नाही. स्वातंत्र्याबरोबरच यशवंतरावांचा प्रवास दीर्घकाळ सत्ताधारी या नात्याने महाराष्ट्राला परिचित होता. अशा या चौफेर टोलेबाजी करणाऱ्या मुत्सद्दी राजकारणी यशवंतरावांचे आणि पत्रकारांचे संबंध अतिशय स्नेहाचे आणि सौहार्दाचे होते. हा एक त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या ऐन रणधुमाळीतही त्यांनी पत्रकारांशी अत्यंत सहकार्याचे संबंध ठेवले होते. विशेषतः यशवंतरावांच्या स्वभाववैशिष्ट्यामुळे सनदशीरतेच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या नाहीत. तसे पाहिले तर, त्या वेळी देशातील सर्वांत तरुण मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते. ते खरोखरच किमयागार ठरले. पोलिसांना शस्त्रे म्यान करून ठेवावयास सांगून त्यांनी जनतेतील असंतोषास युक्तीने तोंड दिले. श्री. चव्हाण यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत त्या वेळी तोंड दिले. कै. आचार्य अत्रे आणि अन्य पत्रकारांच्या जळजळीत लेखणीचा बॉम्ब गोळ्यांसारख्या लिखाणामुळे ते दुःखीकष्टी होत, परंतु त्यांनी आपल्या त्या कठीण काळात कुणाही पत्रकाराला उणेदुणे तर नाहीच उलट सौम्य आणि चोखंदळ मृदू शब्दांनी जिंकले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर श्री चव्हाण यांच्या कर्तबगारीस खरा बहर आला. या राज्याची सर्वोत्तम प्रगती

करण्याचे प्रयत्न अक्षरशः विद्युत गतीने सुरू झाले. महाराष्ट्राचे ते अवघे अडीच वर्षे मुख्यमंत्री होते. परंतु या अल्पावधीत त्यांनी जेवढे निर्णय घेतले त्यांत त्यांना बहुसंख्य पत्रकारांनी साथ दिली. एवढेच नव्हे तर, सारा विरोध त्यांनी जिंकला होता. विकासाच्या दिशेने त्यांची घोडदौड सुरू झाली होती. पत्रकारांच्या अनेक अडचणी सोडविण्यास त्यांनी मदत केली होती. विशेषतः पत्रकारांच्या व साहित्यिकांच्या घराच्या समस्या त्यांनी शासकीय पातळीवरून सोडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता. महाराष्ट्रात असताना किंवा दिल्लीत गेल्यावर त्यांच्या या स्वभावात कधी फरक पडला नाही. निदान महाराष्ट्रातील कुठल्याही ठिकाणच्या पत्रकाराचा तसा अनुभव खासच नाही. यशवंतरावांचा दरवाजा त्यास मोकळा असे. अर्थात प्रत्येकाच्या मनासारखे होणे कदापिही शक्य नाही. पण आपले मनोगत यशवंतरावांच्या कानावर घातले यातच अनेकांना मानसिक समाधान वाटत असे. लोकांच्या अडचणी अनेक असतात. त्यांना यशवंतराव आधुनिक काळातले धन्वंतरी वाटत हे मात्र खरे. किंबहुना यशवंतरावांनी स्वतःच आपल्या स्वभावाविषयी लिहिले आहे की, माझा एक स्वतंत्र स्वभाव आहे, मिळते घेऊन पुढे जाण्याचा व नेण्याचा. मुद्दाम दुःख द्यावे, कोणाचा अपमान करावा हे माझ्या स्वभावात नाही. कोणी अवमान केला तरी, त्यासाठी उगाच शत्रुत्व करावे असे वाटत नाही. कटुता न ठेवणे आणि कटुता नसणारे वातावरण वाढविणे हा माझा स्वभावधर्म आहे. याच अर्थाने त्यांनी टिंगल टवाळी करणाऱ्या साहित्यिक आणि पत्रकारांना सुद्धा सन्मानाने वागविले. मराठी भाषा तशी दणकट, काहीशी रांगडी पण ती मृदू मुलायम होऊ शकते हे महाराष्ट्रात आधुनिक काळात यशवंतरावांनी आपल्या उक्तीने आणि कृतीने सिद्ध केले आहे. साहित्य-संस्कृतीला वाव मिळावा; नव्या शास्त्रीय विचारांचा प्रसार व्हावा ही द्रष्टेपणाची भूमिका त्यांची होती. महाराष्ट्र राज्याची स्थापना ही मराठी मनाची स्वाभाविक सहज सुलभ प्रक्रिया होती. याचे स्वागत कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यपंक्तीत केले आहे. “नव्या जीवनाचा नाद

मला ऐकू येत आहे.” दै. केसरीचे माजी संपादक श्री. जयंतराव टिळकांना काँग्रेसमध्ये आणण्यात यशवंतरावांचा फार मोठा भाग होता. यात पत्रकारालासुद्धा आपल्या ध्येयधोरणात स्थान आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले आहे. पत्रकारसुद्धा समाजजीवनाचा महत्त्वाचा दुवा आणि धागा आहे, याची खूणगाठ त्यांनी मनात बाळगली होती.

प्रशासक हा शिस्ताचा असला तरी तो हृदयशून्यच असावा असा काही सामाजिक अथवा राजकीय मानदंड नाही हे यशवंतरावांनी आपल्या कृतीशील उदाहरणाने दाखविले आहे. पत्रकारांच्या हक्कावर त्यांनी कधीच आक्रमण केले नाही किंवा पत्रकारांना कुत्रे आदी शेलकी विशेषणे वापरली नाहीत. उलट त्यांच्या टीकेचे स्वागत करून आपल्या शासकीय धोरणात योग्य ते बदल घडवून आणण्यास त्याचा उपयोग करून घेतला. याचा इष्ट तो परिणाम त्यांनी शहरी आणि ग्रामीण या दोन्ही समाजाची पकड घेऊन आपला प्रभाव पाडला. यात ते पत्रकारांचा सिंहाचा वाटा असल्याचे मान्य करीत असत. त्यांच्याकडून मित्र-पत्रकारांच्या अपेक्षा होत्या त्या त्यांनी पुऱ्या केल्या असे नव्हे, त्यामुळे वादाचे प्रसंग आले. पण हाही एक मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पण त्यातूनही त्यांनी देण्याघेण्याच्या विचारापलीकडे आपले वर्तन ठेवले. आज मराठी पत्रसृष्टीत डझनवारी पत्रकार असे आहेत की, ज्यांना यशवंतरावांनी आपल्या कृपादृष्टीचा हात देऊन डोंगराएवढे मोठे केले आहे. परिस्थितीच्या रेट्यापुढे त्यांना काही पत्रकारांच्या इच्छा पुऱ्या करता आल्या नाहीत हे जरी खरे असले तरी, आपल्या जीवनात इतके सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व असलेला नेता यापुढे होणे शक्य नाही.

## दि. रा. घोरपडे
## व्युत्पन्न व्यक्तिमत्त्वाचे यशवंतराव

ना. यशवंतराव चव्हाण, तसे फारच आकस्मिकपणे गेले. वेणूताई गेल्या ! पुत्रवत् वाढवलेल्या डॉक्टर पुतण्याचे विक्रमचे अपघाती निधन झाले ! संयुक्त महाराष्ट्र निर्मितीत, ज्यांनी सक्रिय हातभार लावला व ज्यांचे सहकारी म्हणून, संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र मंत्री म्हणून काम केले, त्या पंतप्रधान इंदिरा गांधीही गेल्या ! या सर्व दुःखद घटनांच्यामुळे, त्यांचे संवेदनाक्षम अंतःकरण अतीव व्यस्थित झाले होते. वेणूताईंच्या जाण्याने, एकप्रकारे एकाकीपण फार मोठ्या प्रमाणात आले होते. कारण मुंबई सोडून, दिल्लीस जाण्याचा निर्णय त्यांनी पंडितजींनंतर, एकट्या वेणूताईंच्याच विचाराने घेतला होता. सखी सचीव असे अक्षरशः त्यांचे स्थान यशवंतरावांच्या जीवनात होते. त्यांनी, राष्ट्रभक्ती, अभ्यासूवृत्ती, निष्ठा, व्यापकता, कर्तव्यदक्षता, शांत सोशिकता, परम सहिष्णुता या सर्व गुणांनी यशस्वी प्रशासक म्हणून, महाराष्ट्राप्रमाणे, दिल्लीत व परराष्ट्रांत प्रभाव पाडला होता. चीनने केलेल्या पराभवानंतर यशवंतरावांनी, खुबीने, योजनापूर्वक, कौशल्याने, भारताची संरक्षण सिद्धता, अद्ययावत, भक्कम व कार्यक्षम केली. त्याचा प्रत्यय १९६५ त व १९७१ त आपण अनुभवला. थोर परकीय व्यक्ती भेटत तेव्हा, ते यशवंतरावांचेबद्दल फार आशेने, गौरवाने बोलत. त्यांच्या चतुर, व्यवहारी, मुत्सद्दी स्वभावाबद्दल त्यांना धन्यवाद देत.

मुख्यमंत्री या नात्याने, त्यांनी, प्रगतिशील महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला फार मोठी पायाशुद्ध गती व वेग प्राप्त करून दिला. सहकाराद्वारा उद्योग, कारखाने, कृषीउद्योग स्थापन करून, गरिबी हटवण्याचा कार्यक्रम त्यांनी गतिमान केला. महाराष्ट्रातील माणूस सर्वांगाने फुलावा म्हणून, सर्व सांस्कृतिक कार्याला संधी देऊन, प्रोत्साहनाचे कार्यक्रम आखले. गरिबांना शिक्षणाची द्वारे मुक्त केली. ती

करताना जातीपेक्षा “आर्थिक मागासलेपणाचे” मौलिक तत्त्व त्यांनी प्रस्थापिले ! जातिनिरपेक्ष, वर्गहीन समाज (casteless classless) स्थापण्याचे ध्येय त्यांनी कृतीत आणले. शिवछत्रपतींनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी राज्य व्यवहार कोश तयार करवून घेतला. यशवंतरावांनी मराठी भाषा व महाराष्ट्र संस्कृती वाढावी, प्रगत व्हावी, फुलावी म्हणून मराठी विश्वकोश मंडळ, साहित्य मंडळ स्थापले ! हे कार्य फार मोलाचे व चिरंतनचे असे आहे. या मंडळीचे काम साकार झाल्याने, मराठी भाषेची उंची साऱ्या देशात वाढेल व मराठी राज्यभाषा म्हणून वापरली जाण्यास गती मिळेल ही त्यांची अपेक्षा होती. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात ते अधिक काळ राहिले असते तर त्यांनी विधायक दूरदृष्टीने महाराष्ट्र आणखीही सर्वांगानी बहरून टाकला असता, याची खात्री वाटते.

यशवंतराव हे काँग्रेस पक्षाचे नेते होते. संसदीय पक्षाचे नेते पं. नेहरू, लालबहादूर शास्त्री व इंदिरा गांधी होते. शिवाय, तसेच ते काँग्रेस पक्षाचे राष्ट्रनेते होते. त्यांचे नेतृत्व पत्करून त्यांनी निवडलेले सहकारी म्हणून, यशवंतराव मंत्रिमंडळात व पक्षात काम करीत होते. पक्षात वा मंत्रिमंडळात, आपली स्पष्ट मते ते मांडीत. लोकशाहीच्या संकेतास त्यांचे हे वागणे पूर्णपणे सुसंगतच होते याची जाण न ठेवता, ते आपल्या नेत्याविरुद्ध उघड बोलत नाहीत, बंड करीत नाहीत, अशी टीका करण्यात येई. तिचा हेतू वेगळा असला पाहिजे. लोकशाहीच्या संकेतानुसार नेत्याची आज्ञा प्रमाण मानली पाहिजे असा प्रघात आहे. ते नैतिक कर्तव्य आहे. असे असता, ते लाचार आहेत, सत्तेमागे आहेत, असे म्हणणे चुकीचे आहे. एकीकडे महाराष्ट्राला राष्ट्रीय नेते विचारीत नाहीत, प्रतिनिधित्व देत नाहीत असे बोलावे, त्याच बरोबर यशवंतराव दोन तपाहून अधिक काळ जबाबदारीच्या जागेवर दिल्लीत राहिले म्हणून उणेदुणे बोलावे, हे सर्व चमत्कारिक व दूषित विचारसरणीचे द्योतक आहे. मिरजेतील भाषणातच प्रथम यशवंतराव चव्हाण म्हणाले, “उद्या

महाराष्ट्रनिष्ठा का राष्ट्रनिष्ठा असे पर्याय पुढे आले तर, मी पं. नेहरूंचे मागे राहीन." यात व्यक्त होणारी नेहरूनिष्ठा म्हणजेच राष्ट्रनिष्ठा आहे. राज्याच्या हितात व राष्ट्राच्या हितात, राष्ट्रहिताला अग्रक्रम व प्राधान्य देण्यात चूक कशी होते ? याही बाबतीत, अपसमजाने, विपर्यस्त टीका करणे योग्य होणार नाही.

यशवंतराव, पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री असे महाराष्ट्रात, व दिल्लीत संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र मंत्री व शेवटी उपपंतप्रधान अशा श्रेणीने वाढले. अभ्यासू, विचारवंत, मुत्सद्दी, साहित्यिक, नेते म्हणून त्यांनी राष्ट्रात व परदेशात नाव मिळवले.

अशा मोठ्या पदावर झपाझप ते चढले तरी त्यांची सर्वसामान्याबाबतीत सक्रिय सहानुभूती, क्रियाशील माणुसकी अखंड जागी होती. अनेकांना सामान्यजनांना, ते उच्चपदी असताही कामाचे, अडचणीचे सत्यत्व व महत्त्व पटताच मदतीस धावत हा त्यांचा फार मोठेपणा आहे. हीच खरी सुसंस्कृतता आहे. प्रत्येक माणसाच्या पत्राचे उत्तर धाडीत! हा विशेष, इतरांशी तुलना करता फार जाणवावा असाच आहे. उत्तरे स्वतःच्या सहीने शक्य तो धाडली जात!

पार्लमेंटरी सेक्रेटरी असता ते मिरजेत अधूनमधून राहात. ते स्टेशनवरच्या कोडोलीकरांच्या, बांधल्या जात असलेल्या घरी वास्तव्य करीत. त्यामुळे मिरजेच्या हवेत वेणूताईंची प्रकृती सुधारली, त्या बऱ्या झाल्या म्हणून मिरजेबाबत त्यांना कृतज्ञतेतून उद्भवलेली विशेष आपुलकी होती. मिरजेत मेडिकल कॉलेज होण्यास, ही आपुलकी उपयुक्त व प्रेरक ठरली.

याच काळात, प्रस्तुत लेखकाचा व त्यांचा संबंध आला तो अखंड तीस वर्षांहून अधिकाधिक वाढत गेला. पत्रकार व कार्यकर्ता म्हणून ते विश्वासाने व आदराने मला वागवीत. त्यांची भाषणे, त्यांच्या मुलाखती इंग्रजी मराठी पत्रांत योग्य रीतीने आली. त्यांचेविषयीचे लेख छापून आले की, गुणग्राहकवृत्तीने मनपसंतीचे त्यांच्या सहीचे पत्र आल्याविना राहात

नसे. निरपेक्षवृत्तीने, वस्तुनिष्ठेने योग्य ते महत्त्व जाणून लेखन करणारा जबाबदार पत्रकार म्हणून ते उल्लेख करीत व विश्वासाने काम करवून घेत. दि. ३ डिसेंबर १९५३ ला, त्यांचे सांगण्यावरून, ओगलेवाडीहून, श्री. पाध्ये यांची खालील तार प्रस्तुत लेखकास आली – "Yeshwantrao Chavan desires your presence at Karad tomorrow morning for press conference."

या पत्रकार परिषदेला बाळासाहेब देसाईही उपस्थित होते. इंग्रजी मराठी वृत्तपत्रात या पत्रकार परिषदेचा मजकूर व्यवस्थित आल्यावर, आभाराचे धन्यवादाचे पत्र आले. महाराष्ट्राचे अन्नमंत्री म्हणून शिधा पद्धती उठवणार हा निर्णय त्यांनी प्रस्तुत लेखकास, ते इचलकरंजीस आले असता, विशेष मुलाखतीत सांगितला. तो मुंबईच्या पत्रांनी पाहिले पानभर ठळक शीर्षकात छापला. या विश्वासामुळे ते विविध राजकीय घटना, त्यांची पार्श्वभूमी समजावून देत. अर्थात ते कार्यकर्ता म्हणून घडे.

मिरजेत, रेस्ट हाऊसवर कार्यकर्त्यांची एक महत्त्वाची बैठक भरली. वादग्रस्त गरमनरम चर्चा होती. प्रस्तुत लेखक पत्रकारही असल्याने काही कार्यकर्ते संशयाने टवकारून पाहात असल्याचे दिसताच, स्वतः यशवंतरावांनी भर सभेत खुलासा केला की -

"श्री. घोरपडे हे या सभेस कार्यकर्ते म्हणून हजर आहेत !"

मला, सभेतून बाहेर जाण्यास न सांगता, भावनांची बूज राखून त्यांनी अशा सन्मानाने वागवले. हा त्यांचा दुर्मिळ व आगळा गुण अनेकदा अनुभवण्यास मिळे. प्रस्तुत लेखकाला एस टी बसचा अपघात होऊन १९६८ साली खुब्याचे हाड मोडल्याने, मोठेच संकट आले. त्या काळात भारताचे गृहमंत्री असलेल्या यशवंतरावांनी सक्रिय सहानुभूती स्वयंप्रेरणेने व्यक्त केली.

प्रस्तुत लेखकाने, त्यांच्या मातोश्री श्रीमती विठाबाई यांची मुलाखत घेऊन, यशवंतरावांना मातेने कसे घडवले याचे चित्र, मातेच्या शब्दात लेखरूपाने उभे केले. हा लेख प्रसिद्ध होताच त्यांनी आभाराचे पत्र धाडले. पसंती व्यक्त केली इतकेच नव्हे मृत्यूपूर्वी काही महिने भेटले

असता, म्हणाले, मागचे कागदपत्र चाळीत होतो. तेव्हा तुमचा तो लेख व तुमची आठवण, नुकतीच विशेषपणे झाली.

मिरजेतील गेल्या पिढीतील नामवंत कायदेपंडीत कै. भा. वा. मराठे यांनी घेतलेल्या कर्जापायी त्यांचे घरदार, लिलावास निघण्याची सूचना आली. तेव्हा, प्रस्तुत लेखकाने त्यांना याबाबत, लक्ष घालून सहानुभूतीने प्रश्न सोडवण्याची विनंती केली असता, त्यांनी जप्ती त्वरेने थांबवली, एवढेच नव्हे तर सर्व ब्राह्मण वर्गाची म. गांधी वधोत्तरची कर्जे माफ करून, विशाल मनोवृत्तीची आपली राजवट असल्याचे प्रत्ययास आणून देऊन, सामाजिक सामंजस्य निर्माण केले.

मराठी भाषेवर, व साहित्यिकांवर त्यांचे प्रेम होते. अखंड वाचन हा त्यांचा छंद होता. ललित तसेच वैचारिक साहित्याची त्यांना आवड होती. प्रवासात, भले मोठे ग्रंथ त्यांचे सोबत असत. म्हणूनच, कोल्हापुरात, त्यांचे वि.स. खांडेकरांच्या साहित्यावरचे संमीक्षणात्मक भाषण एवढे रंगले की त्याचे स्मरण अद्यापीही तसेच आहे. म्हणूनच ते साहित्य संमेलनात, सामान्य साहित्यप्रेमी म्हणून रस घेत. साहित्यिकांना हातभार लावण्यात आनंद मानीत.

मराठी इतिहास संशोधक, नाटककार, कवि कै. वासुदेवशास्त्री खरे यांचे वाङ्मय व लेख संग्रह जपले जावे, ते रद्दीमध्ये विकले जाऊ नयेत म्हणून त्यांनी अंदाजे दहा हजाराला, महाराष्ट्र शासनातर्फे, अधिकाऱ्यांचा सल्ला बाजूस सारून सर्व विकत घेण्याची व्यवस्था केली. कै. खरे शास्त्री यांचे चिरंजीव यशवंतराव खरे हे वृद्ध झालेले. आपल्यानंतर मुले हे साहित्य रद्दी म्हणून विकतील हे त्यांना भय होते. आर्थिक ओढग्रस्तीने त्यांना पैशाच्या मदतीची गरज होती. प्रस्तुत लेखकाने, मुख्यमंत्री यशवंतरावांचे कानावर ही सर्व वस्तुस्थिती घातली. कै. खरे शास्त्री यांची “जन्मभूमी” कविता ना. चव्हाणांना आवडली होती. मुख्यमंत्री म्हणून दौऱ्यावर असता, अगोदर कार्यक्रम ठरला नसताही मिरजेच्या रेस्ट हाऊसमध्ये ना. चव्हाण व यशवंतराव खरे यांची भेट घडवून आणता

आली. खरे यांनी, यशवंतरावांना, काही ग्रंथ भेट म्हणून दिले. त्यानंतर पत्रव्यवहार झाला. एकेदिवशी शासकीय आधिकाऱ्यांची नकारात्मक तार आली. त्यानंतर ही वस्तुस्थिती नजरेस आणताच ना. चव्हाण यांनी चक्रे फिरविल्यावर कै. खरे शास्त्री यांचे सर्व साहित्य पुण्यास ३१ मार्च पूर्वी पोहोचविण्याची तार आली. त्यानुसार यशवंतराव खरे सारे ग्रंथ पुण्यास, शिक्षण संचालकाचे कचेरीत घेऊन गेले व चेक घेऊन परत आले. केंद्राचे महाराष्ट्रीय मंत्री जे करू शकले नाहीत ते, यशवंतराव चव्हाणांनी मनावर घेऊन केले. त्याने शास्त्रीबुवांच्या मुलांना, नातवांना आधार मिळाला व शास्त्रीबुवांचे सारे वाङ्मय जतन झाले. असे संपन्न, व्युत्पन्न व्यक्तिमत्त्वाचे यशवंतराव होते नि म्हणूनच, भारताच्या व महाराष्ट्राच्या आजच्या संक्रमणकालात त्यांच्यासारख्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी, सर्वांना जाणवते, सलते. त्यांच्या चरित्राचे 'सागरतीर' व 'यमुनाकाठ' हे खंडही अप्रकाशित, अलिखित राहिले याचीही बोच जाणवते. त्यांचे चरित्र लिहिले जात आहे; त्याच्या विधायक प्रवृत्तींना व विचारांना प्रगत करणारे स्मारक होत आहे. त्यातूनच यशवंतरावांचे कार्य पुढे नेण्याची जबाबदारी महाराष्ट्रीयांनी, विशेषत्वाने पत्करली पाहिजे.

कारण : - अतो न रोदितव्यंहि
क्रियाः कार्याः स्वशक्तिशः॥

## वि. ना. देवधर
## मंत्रदाता, द्रष्टा नेता

श्री. यशवंतराव चव्हाण हे एक सुसंस्कृत, समंजस, आणि शक्य तितके सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेते होते. त्यांचा मित्रपरिवार पाहिला म्हणजे त्याची साक्ष पटल्याशिवाय राहात नाही. प्रा. ना. सी. फडके हे तर त्यांचे गुरू होते. पण फडके, खांडेकर या त्यांच्या आधीच्या पिढीतील खंदे साहित्यिक, त्यांच्याशी यशवंतरावांनी जवळीक ठेवलेली होतीच. पण त्यांच्या पिढीतील अत्रे, भावे, माडगूळकर यांच्याशीही त्यांचे तेवढेच निकटचे संबंध होते. तसेच निकटचे संबंध त्यांनी द. मा. मिरासदार, धाकटे माडगूळकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर यांच्या पिढीतील साहित्यिकांशीही ठेवले होते. या क्षेत्रात त्यांनी "जनरेशन गॅप" येऊ दिली नव्हती, हे त्यांच्या रसिकतेबरोबरच ताजेतवानेपणाचेही गमक मानावे लागेल. त्याही नंतरच्या दलित साहित्यिकांशी त्यांचा उत्तम "रॅपोर्ट" होता, हे प्रासंगिक भाषणातून समजत असे. साहित्याच्या क्षेत्रातील त्यांचा हा संपर्क केवळ दलित साहित्याच्या क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता. महाराष्ट्राची जी एक वैचारिक साहित्याची परंपरा होती, त्या परंपरेशीही ते चांगले परिचित होते. मराठी भाषेत "विश्वकोश" ("एन्सॉयक्लोपीडिया") तयार व्हावा व त्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, हे त्यांना भावले ते या परिचयामुळेच. तर्कतीर्थ जोशी यांच्या समर्थ खांद्यावर ही जबाबदारी त्यांनी सोपविली. तीही केवळ मित्रकर्तव्य म्हणून नव्हे तर विश्वकोशाची निर्मिती "उत्तम" व्हावी या जाणिवेने. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रवाहाशी ते समरस झालेले होते. लोककला, रंगभूमी, चित्रपटसृष्टी या साऱ्याबद्दल त्यांची आस्था अनुपमेय होती, कलावंतांशी राज्यकर्ते म्हणून ते कधीही आश्रयदाते म्हणून वागले नाहीत, तर त्यांच्याशी आदरयुक्त स्नेहभाव त्यांनी ठेवला होता.

नेतृत्व यशस्वी व्हायला केवळ एवढ्या गोष्टी पुरेशा होत नाहीत. प्राप्त परिस्थितीत स्वतःची अशी खास “कॉन्ट्रिब्युशन” जो करू शकतो तोच नेता यशस्वी होतो.

अशा नेत्यांकडून इतर राजकीय डावपेचाच्या जोडीने आवश्यक असते, ती दूरदृष्टी. पायापासले पहाणारा राजकारणी पुरुष इतिहासावर ठसा उमटविणारा नेता कधीच होत नाही, होऊ शकणार नाही. ज्याची दृष्टी पिढ्या-दोन पिढ्यांच्या पुढल्या भविष्यकालाचा वेध घेते तोच द्रष्टा नेता. श्री. चव्हाण हे अशा प्रकारचे पुढचे पाहणारे द्रष्टे नेते होते. याची लहानमोठी अनेक प्रमाणे देता येतील. पण महाराष्ट्राला औद्योगिकदृष्ट्या सुरक्षित आणि विकसनशील असे राज्य बनविण्याचे धोरण अवलंबिले होते. याचे विस्मरण नको. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याला विरोध करणारे आक्षेप घेत होते की, हे शिपाई गडी मराठे यांना कारखानदारीतले काय कळते ? मुंबईतील कारखाने पळून जातील.

या विधानातील अतिशयोक्ती सोडून द्या, पण अशी भीती अनेक व्यापारी संघटनांनी व्यक्त केली होती. श्री. चव्हाण यांनी वर्ष दोन वर्षांतच असे धोरण अवलंबिले की, महाराष्ट्र हेही उत्तम औद्योगिक राज्य होऊ शकते; असा विश्वास उद्योगपतींत निर्माण झाला. एकीकडून टाटा, बिर्ला, मफतलाल या उद्योगपतींशी वैयक्तित संबंध स्नेहपूर्ण ठेवले तर दुसऱ्या बाजूने जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या लढाऊ कामगार नेत्यांशी व डांगे यांच्यासारख्या मुरब्बी नेत्यांशीही स्नेह ठेवून मुंबईतील औद्योगिक शांतता काबूत ठेवण्यात श्री. चव्हाण यशस्वी झाले, हे सत्य अनेक वेळा नजरेआड केले जाते. महाराष्ट्राच्या स्थापनाकाळातील ही औद्योगिक शांतता प. बंगालमधील कम्युनिस्टांच्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर एवढी उठून दिसली की, महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या पाच वर्षांत या राज्यात जेवढी भांडवल गुंतवणूक झाली तेवढी इतर राज्यात झाली नाही. औद्योगिक शांतता हा विकासाचा फार मोठा घटक असतो व तो यशवंतरावांच्या सामंजस्य आणि तडजोडवादी भूमिकेमुळे महाराष्ट्र व विशेषतः मुंबईत

उपलब्ध झाला. यशवंतरावांचे महाराष्ट्राचे नेते म्हणून मूल्यमापन करताना या एका घटकाचे विस्मरण होऊ देणे योग्य ठरणार नाही.

पण केवळ या गोष्टीमुळे ते द्रष्टे किंवा मंत्रदाते ठरले असे नव्हे तर ते त्यांचे वैशिष्ट्य वेळगेच आहे. तोच नेता यशस्वी होतो की जो आपल्या अनुयायांना भारून टाकणारा मंत्र देतो आणि या मंत्राच्या अंमलबजावणीसाठी तंत्र देतो. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनाकाळात यशवंतरावांनी महाराष्ट्राला असा मंत्र दिला तो "कृषि-औद्योगिक समाजरचनेचा". या एका मंत्राने महाराष्ट्राच्या विकासाचा मार्ग कार्यकर्त्यांना आणि प्रशासनाला स्पष्ट दिसू लागला. शेती हा महाराष्ट्राचा प्रमुख व्यवसाय. पण महाराष्ट्रात शेतीवर आधारित असे उद्योगधंदे निर्माण झाले पाहिजेत हा या कृषिऔद्योगिक समाजरचेना अर्थ होता. ऊस, कापूस ही महाराष्ट्रातील प्रमुख पिके. त्यावर आधारित उद्योगाची एक बृहत् योजना यशवंतरावांच्या डोळ्यासमोर होती. महाराष्ट्रात सहकारी साखरकारखाने, सूत गिरण्या, कापड गिरण्या यांच्या रूपाने गेल्या वीस वर्षांत ही कल्पना मोठ्या प्रमाणात साकार झाली. हे सारे या कृषिऔद्योगिक विकासाच्या मंत्रात सामावलेले होते.

## श्री. भा. द. खेर
## हे तो योगायोगाचे देणे

त्या दिवशी मी प्रथम विमानात बसलो गृहमंत्र्यांच्याच ! आकाशातून जाणारी विमानं तोपर्यंत मी जमिनीवरून पाहिली होती.

त्या दिवशी संक्रांत होती. वेणूताईंच्या हस्ते तिळगूळ मिळाला.

आकाशात विमानाने झेप घेतली. मी थोडा स्थिरस्थावर झालो.

यशवंतराव मला एकदम म्हणाले, "माझ्याकडे बरेच अर्ज आले आहेत." मी गोंधळून त्यांचाकडे बघायला लागलो.

मग हसत म्हणाले, "मी तुम्हाला रशियात पाठवतो आहे. आम्हालाही पाठवा, असा एकेक अर्ज येऊ लागला आहे. रशियात जाणं तसं सोपं आहे. मी पाठवलं की झालं!"

मग काहीशी गंभीर मुद्रा करून म्हणाले, "तुम्ही हे कुणाजवळ बोलत जाऊ नका. अशा वेळी कमी बोलायचं असतं."

कमी बोलणं हा त्यांचा स्थायिभाव, तर भडाभडा सारं बोलणं हा माझा स्थायिभाव! पण त्यांच्या संदर्भात कमी बोलण्याचं व्रत मी कसोशीनं पाळलं.

मला जपानला पाठविण्याची कामगिरीही त्यांचीच ! पण मी त्याबाबत तोंडाला कुलुप घातले होते. परवा ६ ऑगस्ट १९८४ ला "हिरोशिमा" च्या प्रकाशन समारंभाच्या वेळी मी तो गौप्यस्फोट केला.

हिरोशिमाला जाण्याची मनिषा मी तब्बल तीस वर्षे मनाशी बाळगून होतो. ती धाडसी कल्पना यशवंतरावांच्याजवळसुद्धा बोलून दाखविण्याची माझी छाती झाली नव्हती. शेवटी ती कल्पना मनात ठेवणे असह्य झाले. मी अत्यंत अस्वस्थ झालो. २२ जून १९७५ रोजी मनाला येईल तसे यशवंतरावांना पत्र पाठवले. मी माझे मन मोकळे करुन गप्प बसलो. ते माझे काम मनात ठेवून गप्प बसले. शेवटी जपानला जाण्याची परराष्ट्र

मंत्रालयाची तार मला ३ डिसेंबरला आली. तीस वर्षांपूर्वी उराशी बाळगलेले माझे स्वप्न अशा तऱ्हेने साकार झाले.

ही हकीकत मी ६ ऑगस्टला प्रकाशन समारंभाच्या वेळी सांगितली, त्या वेळी मी म्हणालो, “काही माणसं अशी असतात की, दुसऱ्यासाठी काही न करता सगळं केलं, असं सांगतात. उलट फारच थोडी माणसं अशी असतात की, दुसऱ्यासाठी सारं करून कोणतेही श्रेय स्वतःकडे घेत नाहीत. यशवंतरावजी दुसऱ्या प्रकारात मोडतात.”

माझ्या बोलण्याला उत्तर देताना त्या वेळी यशवंतराव म्हणाले, “खेरांनी आता जाहीर केलंच आहे. मीही आता माझं सांगतो. खेरांच्या २२ जूनच्या त्या पत्रावर मी गप्प बसलो होतो, ही गोष्ट खरी आहे. पण मी का गप्प बसलो होतो ? जपानला जाणं सोपं होतं. पण तिथली कामगिरी पार पाडणं कितपत सोपं होतं ? मी विचार करत होतो. ती कामगिरी खेर पार पाडतील, याची खात्री पटल्यावरच मी त्यांना जपानला पाठवायचं ठरवलं. त्या यशाची ग्वाही आता त्यांनी दिली आहे.”

त्या दिवशी प्रकाशक अनिलकुमार मेहता यांनी सुरेख जेवण दिलं. पण यशवंतराव फारसे जेवले नाहीत. अलीकडे माझ्या ध्यानात येत चालले होते, की वेणूताई गेल्यापासून गाडे थकच चालले आहे. मन उदास होत चालले आहे. वेणूताईंचा पहिला स्मृतिदिन कऱ्हाडला झाला. त्या वेळी त्यांच्यावर “ही ज्योत अनंताची” हे रामभाऊ जोशींनी लिहिलेले चरित्र तर्कतीर्थांच्या हस्ते प्रसिद्ध झाले. त्या प्रकाशन समारंभाच्या वेळी मला ऐनवेळी अध्यक्षस्थान पत्करावे लागले. माझ्या अध्यक्षीय भाषणात मी म्हणालो, “वेणूताई हा चव्हाणांच्या देवघरातला नंदादीप होता. नंदादीप कधी विझत नसतो, मालवत नसतो !”

यशवंतराव समोरच कोचावर बसले होते. माझे भाषण ऐकताना त्यांचे डोळे चांगलेच पाणावले होते !

## यदुनाथ थत्ते
## लोकशाहीची पायाभरणी

आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांपैकी एक प्रमुख शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे होते. लोकशाही सिद्धान्त आणि व्यवहार यांचे त्यांचे आकलन फार समंजसपणाचे होते. परस्पर विश्वास आणि आदर हा लोकशाही जीवनाचा पाया आहे, ही गोष्ट त्यांना चांगलीच माहीत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि त्यानंतर त्यांचे नेतृत्व कसाला लागले.

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद मिळताच त्यांनी लोकशाहीच्या एका संकेताचा मार्मिक उल्लेख केला. ते म्हणाले, "सरकारी नोकरांना मला हे सांगायचे आहे की तुम्ही 'हो' म्हणायला शिका आणि राजकीय नेत्यांना मला सांगायचे आहे की तुम्ही 'नाही' म्हणायची हिंमत दाखवा."

नोकरशाही अडंगे, लाल फिती कारभार यामुळे लोकशाहीला दिरंगाईचा रोग जडतो आणि लोकानुनयाच्या भिडेस्तव राजकीय नेते नियमबाह्य गोष्टी करून घेण्यासाठी दबाव आणतात. त्यामुळे लोकशाहीला लाचलुचपत, भ्रष्टाचार, वशिलेबाजी व सग्यासोयऱ्यांचे हित यांचा रोग जडतो. या दोन रोगांमुळे लोकशाही हास्यास्पद ठरते.

राजकीय पक्षांनी सर्व संमत अशा आचारसंहितेचे पालन केले तर लोकशाही निवडणुकांना निर्मळ रूप येईल, या कल्पनेने शंकरराव देव व प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने भाटघरला जी आचारसंहिता संमत करण्यात आली त्याच्यावर सही करणाऱ्यात यशवंतराव चव्हाणही होते.

महाराष्ट्राने अभिक्रम दाखवून देशाला चांगले वळण लावण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांची इच्छा होती आणि म्हणून निकोप अशा लोकशाही परंपरा महाराष्ट्राच्या विधिमंडळात घालून देण्याचा त्यांनी

प्रयत्न केला. मतभेद असूनही सुजनता राखता येते याचा धडा त्यांनी घालून दिला.

एकदा पत्रकारांच्या गप्पागोष्टींच्या वेळी त्यांना एका पत्रकाराने त्यांच्या यशस्वी कारभाराचे रहस्य विचारले. तेव्हा ते म्हणाले, "एकतर हजारो लोकांशी माझे जिव्हाळ्याचे घरगुती संबंध आहेत. प्रचंड सभास्थानीसुद्धा मी आवर्जून त्यांची अगदी कौटुंबिकसुद्धा चौकशी करतो. त्यामुळे आपलेपणाचे हे वर्तुळ सतत विस्तारत जाते. दुसरी गोष्ट म्हणजे कुठलाही प्रस्ताव समोर आला की, प्रशासनाचे मत जसे मी अजमावतो त्याचप्रमाणे प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या वसंतदादांसारख्या माणसाकडून लोकांच्या संभाव्य प्रतिक्रियाही जाणून घेतो आणि मगच काय तो निर्णय घेतो."

यशवंतरावांच्या भोवती नेहमी लोकांचा गराडा पडलेला असे आणि यशवंतराव सर्वांचे सस्मित स्वागत करत. पण यामुळे त्यांच्याकडून अपेक्षित वाचन होत नसे आणि याची खंत त्यांच्या बोलण्यात व्यक्ति होई. आपले ज्ञान अद्ययावत असावे असा त्यांचा प्रयत्न असे. त्यातून त्यांना विरंगुळाही लाभे.

लोकशाही हे केवळ व्यवहारतंत्र नसून ती एक संस्कृतीही आहे असे ते मानीत. त्या दृष्टीने अनेक महत्वाची पावले त्यांनी टाकली. महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना हे त्यापैकी एक कार्य.

अन्य विचारांच्या लोकांच्या सत्कार्याचा गौरव करण्याचा दिलदारपणा त्यांच्यात होता.

दोन तीन उदाहरणे याबाबत देण्यासारखी आहेत. हडपसरला महाराष्ट्र आरोग्यमंडळ आणि साने गुरुजी रुग्णालयाची ट्रस्टिशिप सिद्धान्तावर पंचवीस वर्षापूर्वी स्थापना झाली तेव्हा त्या तरुणांना शाबासकी देण्यासाठी यशवंतराव समक्ष आले होते.

राष्ट्रसेवादलाच्या कलापथकाचे ते चहाते होते. महाराष्ट्र स्थापन दिनानिमित्त दिल्लीकरांना महाराष्ट्राचे सांस्कृतिक कलात्मक दर्शन

घडविण्याची कामगिरी त्यांनी अत्यंत विश्वासाने सेवादलावर सोपवली आणि प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरूंनाही त्यांनी त्या कार्यक्रमाला हजर ठेवले. पुढे भारतदर्शन कार्यक्रमालाही त्यांनी शुभेच्छा दिल्या.

साने गुरुजींच्या साधनेने जेव्हा कुमार कला विशेषांक सुरू केला तेव्हा महाराष्ट्र शासनाने मदतीचा हातभार लावला पाहिजे असे त्यांना वाटले व अंकाच्या हजार प्रती त्यांच्यामुळे प्रसिद्धी खात्याने घेतल्या. पण त्याचे वितरण करण्याऐवजी त्याचे गठ्ठे त्यांच्या कार्यालयात तसेच पडून राहिले ! त्याची मला चीड आली. मी यशवंतरावांजवळ आपली चीड व्यक्त केली व पर्याय सांगितला. महाराष्ट्रातील मराठेतर माध्यमाच्या शाळा व महाराष्ट्राबाहेरच्या मराठी माध्यमाच्या शाळा यांना पोस्टाने पाठवल्याचे प्रमाणपत्र घेऊन माझ्या खर्चाने मी अंक पाठवायचे व शासनाने त्यांचे पैसे द्यायचे अशी ही योजना. यशवंतरावांना ती तर्कशुद्ध वाटली व त्यांनी तसे करण्याला संमती दिली, लेखी व्यवहार काहीच झाला नाही.

पुढे यशवंतराव दिल्लीला गेले आणि त्याचा फायदा घेऊन महाराष्ट्र शासनाचे प्रसिद्धी खाते पैशांबाबत घोळ घालून बसले. पुन्हा यशवंतरावांना भेटल्यावर ते काम मार्गी लागले.

दिल्लीला केंद्र सरकारात यशवंतरावांनी संरक्षण, गृह आणि अर्थ अशी महत्त्वाची खाती कार्यक्षमतेने सांभाळली आणि चांगला प्रशासक अशी आपली छाप बसवली.

अखेरच्या दिवसांत भारतीय लोकशाही व्यवहारामुळे ते चिताक्रांत होते. लोकशाहीत साधनसुचितेला फाटा दिला की ती लोकशाही धनिकांकडे गहाण पडते, जातीची रखेली बनते आणि दादांची दासी होते. मग लोकशाहीचे कलेवर फक्त शिल्लक उरते.साधनसुचितेचे पुनरुज्जीवन व्हावे अशी त्यांना तळमळ होती.

स्वातंत्र्य आणि लोकशाही यांना केवळ राजकीय अंगच नसते तर सामाजिक अंगही असते आणि राजकारणाला इतके अप्रमाण महत्त्व

चढल्यामुळे सामाजिक प्रश्नांची उपेक्षा होते याची खंत ते व्यक्त करत. त्यांनी ह्याच जाणिवेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र नॅशनल बुक ट्रस्टसाठी लिहायचे ठरवले होते, पण त्यांचा तो संकल्प कधीच पूर्ण झाला नाही.

त्यांची आत्मकथा ते लिहीत होते. त्यातील काही प्रकरणे वृत्तपत्रात आली तेव्हा मी त्यांना पत्र पाठवले. त्यांचे तत्काळ उत्तर आले आणि समग्र पुस्तक वाचून पुन्हा लिहावे असे त्यांनी लिहिले. ते त्यांचे अखेरचे पत्र.

यशवंतरावांजवळ कार्यकुशलता आणि कार्यक्षमता चांगलीच होती, पण त्यांच्या मनाने एक निर्णय घेतला होता आणि तो असा की अविकसित देशात शासन हे समाजबदलाचे एकमेव जरी नसले तरी प्रभावी साधन असते आणि शासकीय पक्षाबरोबर राहूनच आम्ही समाजकल्याण करू शकू. त्यामुळे १९४७ साली ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले आणि चळवळीचा अस्त काळ सोडला तर सतत सत्तेवर राहिले. पण सत्तेचा कैफ त्यांनी चढू दिला नाही आणि सुजनता कधी सोडली नाही.

## प्रा. सदाशिव माळी
## सह्याद्रीचा सिंहकडा

गेली तीस वर्षे महाराष्ट्राचे कुशल नेतृत्व यशवंतरावांनी केले. या मराठमोळ्या मातीतून शेकडो लहान मोठे कार्यकर्ते त्यांनी घडविले. या नापीक महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ऊस पिकवायला त्यांनी उद्युक्त केले. या दगडांच्या देशात शुभ्र दाणेदार साखरेचे अनेक कारखाने उभारायला शेतकऱ्यांना सहकार्य केले. महाराष्ट्राच्या सामान्य माणसांपर्यंत नियोजनाचे पाट नेण्याचा कसोशीने प्रयत्न केला. पाटबंधारे, रस्ते, दळणवळण, वाहतूक, शिक्षण, सहकार कृषी संदर्भात महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भांडवलदारी नेतृत्वाच्या जागी मराठमोळ्या नेतृत्वाची त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रमुखपदी प्रतिष्ठापना केली. साऱ्या जातिजमातींमध्ये सामाजिक सौहार्द निर्माण होण्यासाठी त्यांनी उपाययोजना केली. मराठी साहित्यिक, पत्रकार, ग्रंथलेखक यांची त्यांनी सन्मानाने बूज राखून त्यांना महाराष्ट्र कल्याणाकडे वळविले.

यशवंतराव चव्हाण हे चतुरस्त्र व बहुश्रुत नेते होते. पार्लमेंटरी सेक्रेटरी, पुरवठा मंत्री म्हणून त्यांचे वैशिष्ट्य महाराष्ट्राला विशेषेकरून दिसले नाही. पण मुख्यमंत्री झाल्यानंतर मात्र त्यांच्या गुणांची कल्पना महाराष्ट्राला आली. पूर्वाश्रमीचे सातारचे ताठर पहिलवानी मन त्यांनी झुगारून दिले व एक आर्जवी, लोकांच्या हृदयात हळुवारपणे घुसणारा, लोकभावनांना हळुवारपणे कुरवाळून लोकांत आत्मविश्वास, स्वाभिमान, जिद्द निर्माण करणारा मधुर वाणीचा लोकप्रिय नेता या नात्याने त्यांनी नवे रूप धारण केले. या मोहमयी रूपाने व्यक्तिशः त्यांना व उभ्या महाराष्ट्रालाही लाभ मिळाला. उत्तम वक्तृत्व, भाषेवर प्रभुत्व, लाघवी भाषा, आवश्यक तो सभाधीटपणा, कौशल्यपूर्ण समर्थन, विरोधकांबद्दल योग्य तो मान देण्याचे धोरण, असंतोष पेटू न देता त्यातून सामंजस्य

निर्माण करणारी नीती, नेत्यावर असीम निष्ठा, सहकाऱ्यांवर मनापासून प्रेम व विश्वास, या गुणसमुच्चयाने यशवंतरावांनी पंडित नेहरू, जयप्रकाश नारायण या बलाढ्य नेत्यांनाही आपलेसे केले होते. मोरारजीभाई देसाई यांच्या ताठर वृत्तीच्या तुलनेत हे नेतृत्व लोकाभिमुख, संयमी व चतुर वाटत होते. म्हणूनच नेहरूंनी हिमालयाच्या साहाय्यासाठी या सह्याद्रीची भारताच्या संरक्षणमंत्रिपदी नेमणूक केली होती. नेहरूंनंतर कोण या प्रश्नावर यशवंतराव अशी सदिच्छा जयप्रकाश नारायण यांनी व्यक्त केली होती. यशवंतरावांचे नेहरू घराण्यावरील प्रेमही त्यांना खूपसे देऊन गेले. त्यामुळे यशवंतरावांना महाराष्ट्राच्या नेतृत्वाबरोबरच भारताच्या राजधानीत भक्कम पाय रोवता आले.

यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात काही पथ्ये आवर्जून पाळली. त्याचा त्यांच्या नेतृत्वाला व व्यक्तिविकासाला खूप फायदा मिळाला. अर्थात त्यासाठी त्यांना खूप सोसावे लागले. भारताचे त्या वेळचे सर्वोच्च नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी त्यांनी अखंड निष्ठा ठेवली. ही निष्ठा व्यक्तिगत पातळीवरचीही होती व देशपातळीवरचीही होती. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचंड रणधुमाळीत विरोधकांप्रमाणे काही काँग्रेस कार्यकर्ते नेहरूंच्या संयुक्त महाराष्ट्राबद्दलच्या डळमळीत धोरणाबद्दल नापसंती व्यक्त करीत होते. देव-देवगिरीकर, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब गाडगीळ यांना नेहरूंचे स. का. पाटील धार्जिणे किंवा द्विभाषिक धोरण मान्य नव्हते. त्यामुळे या नेत्यांचे प्रसंगी नेहरूंशी खटकेही उडाले. पण यशवंतरावांनी मनाला मुरड घालून आपली नेहरूनिष्ठा सोडली नाही. महाराष्ट्राने दिल्लीशी जमवून घेतले पाहिजे ही यशवंतरावांची राजकीय नीती होती. महाराष्ट्राने देशाच्या राजकीय प्रवाहातच राहिले पाहिजे, राष्ट्रीय प्रवाहापासून आपली नाळ, तुटता कामा नये, हे त्यांचे तत्त्वज्ञान होते.

त्या दृष्टिकोणातूनच त्यांनी फलटणच्या ऐतिहासिक भाषणात "देशापेक्षा मला नेहरू मोठे वाटतात" असे सांगितले. या विधानाचे

महाराष्ट्रात तीव्र पडसाद उमटले. महाराष्ट्रात यशवंतरावांची सर्वत्र निर्भत्सना करण्यात आली. संयुक्ते महाराष्ट्राचे शत्रू म्हणून त्यांची संभावना करण्यात येऊ लागली. 'सूर्याजी पिसाळ' असा त्यांचा ठिकठिकाणी उल्लेख करण्यात येऊ लागला. आचार्य अत्रे यांनी तर एकदा म्हटले, "चव्हाण या नावातील 'च' काढून टाकला तर शेवटी 'वहाण' फक्त शिल्लक राहते." पण हे घणाघाती वार यशवंतरावांनी सहन केले. या काळात पुणे शहरातील भांबुर्ड्याच्या एका सभेत त्यांना जोड्यांची माळ घालण्याचा प्रयत्ना पुणे महानगरपालिकेच्या सदस्या दांगट बाई यांनी केला! ते जात तिथे त्यांच्या मोटारीवर जोड्यांची माळ घालण्यात येई. पण यशवंतराव रणांगणातून पळून गेले नाहीत की त्यांनी नेहरूनिष्ठा सोडली नाही! हे हलाहल त्यांनी पचविले. त्यामुळे नेहरूंचा त्यांच्यावरील विश्वास वाढला. यशवंतरावांचे मुख्यमंत्रिपद नेहरूंनी कायम केले.

पुढे संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश नेहरूंनी यशवंतरावांच्या हातात दिला. एवढेच नव्हे तर नेहरूंच्या हस्तेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे उद्घाटन झाले. त्यानंतर 'मुंबई' राज्याऐवजी 'महाराष्ट्र' राज्य हेही नाव राज्याला मिळाले. त्याच्या पुढचा कळस म्हणून चीनने भारतावर अतिक्रमण केले. त्या वेळी जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावांना सन्मानाने 'संरक्षणमंत्री' म्हणून दिल्लीला बोलाविले. यशवंतरावांच्या नेहरूनिष्ठेमुळेच त्यांनी राज्यातील नेतृत्वाची पातळी ओलांडली व अखिल भारतीय नेतृत्वाची पातळी गाठली. पंडित नेहरू हे त्यांचे खऱ्या अर्थाने 'गॉड फादर' होते. दिल्लीला यशवंतरावांचे स्थान मजबूत झाल्यावर स्वतः यशवंतराव महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे 'गॉड फादर' झाले. 'यशवंतराव बोले आणि महाराष्ट्र डोले' अशी स्थिती अनेक वर्षे महाराष्ट्रात होती. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आणि महाराष्ट्र राज्याचे मंत्रिमंडळ यशवंतरावांच्या मुठीत होते!

आपल्या सार्वजनिक भाषणात यशवंतरावांनी 'शिवराळपणा' कधी येऊ दिला नाही. विरोधकांनी भले त्यांच्यावर गलिच्छ प्रहार केले तरी त्यांनी कधी तोंडसुख घेतले नाही. विरोधकांबद्दल कधी शिवीगाळ, निर्भत्सना, निंदा, अनुदारवृत्ती त्यांनी दाखविली नाही. त्यांचे विचार नव्या समाजधारणेला आवश्यक व उत्साहवर्धक असत. बोलण्यात काव्यात्मक खुमारी असे. त्यामुळे यशवंतरावांचे भाषण म्हणजे एक 'मेजवानी' असे.

राजकारणात चातुर्य, लोकसंपर्क, दूरदृष्टी, जीवनविषयक तत्त्वज्ञान, समकालीन विचारसरणी, समकालीन राजकीय वारे, हे सगळे माहीत असावे लागते. यशवंतराव यात उजवे ठरले. त्या त्या वेळी त्यांनी समकालीनांवर जखम होऊ न देता प्यादेमात केली. राजकारणात टिकण्यासाठी एक स्वतःचा असा सामर्थ्यशाली गट तयार केला. जिल्ह्याजिल्ह्यात स्वतःची माणसे निर्माण केली. त्यामुळे यशवंतराव भराभर वरच्या पायऱ्या चढत गेले. यशवंतरावांच्या अगोदरच्या पिढीत व समकालीनांत त्यांच्यापेक्षाही अधिक बुद्धिवान, अधिक सेवाभावी, त्यांच्या इतकेच स्वातंत्र्य संग्रामात अग्रणी असलेले कार्यकर्ते होते, पण त्यांच्यापेक्षा यशवंतराव काळाची चाहूल घेऊन त्याप्रमाणे धोरण ठरविणारे मुत्सद्दी नेते ठरल्याने ते इतरांना मागे टाकून वरचढ झाले.

काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव, देवगिरीकर, भाऊसाहेब हिरे, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, रत्नाप्पा कुंभार, बाळासाहेब भारदे, अण्णासाहेब वर्तक, वसंतरावदादा, राजारामबापू पाटील, वि. स. पागे, भाई माधवराव बागल, बाळासाहेब देसाई, देवकीनंदन नारायण, ब्रिजलाल बियाणी, आबासाहेब-गोपाळराव खेडकर, बॅ. रामराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख लोकनायक अणे, स. का. पाटील अशी तोलामोलाची माणसे महाराष्ट्रात यशवंतरावांच्या अगोदरच्या पिढीत व समकालिनांत होती. पण या सर्व नेत्यांशी कधी चुचकारून तर कधी सख्य करून कधी मौन धारण करून, तर कधी हळूच

बगल देऊन यशवंतरावांनी वाट काढली व राजकारणातील अत्युच्चक स्थान मिळविले.

महाराष्ट्र दुभंगू द्यायचा नाही - तो अभंग राहावा हा विचार मनाशी पक्का करुन यशवंतरावांच्या राजकीय रथाचा प्रवास सुरू झाला.

महाराष्ट्राच्या विकासाचा जगन्नाथाचा रथ, केवळ मुख्यमंत्र्यांनी, इतर मंत्र्यांनी, लोकप्रतिनिधींनी, ओढावयाचा नसून या साऱ्यांसह सर्व जनतेने ओढावा अशी भावना यशवंतरावांनी महाराष्ट्रभर निर्माण केली. हे महाराष्ट्रात आजवर झाले नव्हते. मुख्यमंत्र्यांत व जनतेत पूर्वी एक प्रकारची दरी होती. ती दरी यशवंतरावांनी प्रयत्नतपूर्वक बुजविली. प्रत्येकाला हे राज्य माझे वाटावे या दृष्टीने त्यांनी कारभार पाहिला. संयुक्त महाराष्ट्र हे राज्य मराठ्यांचे न होता मराठी समाजाचे होईल असे समंजस उत्तर ग. त्र्यं. माडखोलकर यांना देऊन यशवंतरावांनी जाणत्यांची मने जिंकली व त्याप्रमाणे वागून दाखवले.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीनंतर व शे. का. पक्षाच्या निर्मितीनंतर बहुजनसमाज व उच्च वर्ग यांच्यात गेली अनेक वर्षे निर्माण झालेला दुरावा यशवंतरावांनी हळुवारपणाने व सौहार्दाने दूर केला. हे त्यांचे दुसरे राजकीय सुयश आहे. विचाराने 'बहुजनवादी' असूनही यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विचारवंतांशी, साहित्यिकांशी, पत्रपंडितांशी, अर्थजज्ज्ञांशी, बुद्धिवाद्यांशी, समंजस संवाद साधून त्यांचा स्नेह प्राप्त केला. शिवाय दुरून गंमत पाहणाऱ्या या वर्गालाही त्यांनी जगन्नाथाचा रथ ओढायला उद्युक्त केले. यशवंतरावांनी या वर्गाला वेगवेगळ्या कामात स्वखुशीने जुंपून दिले. उत्तम साहित्यिक कृतीला बक्षिसे देण्याची योजना सुरू केली. वाईला नव्या ज्ञान यज्ञाची मुहूर्तमेढ रोवली. विद्वज्ञसनांचे, पंडितांचे, सरकारी सत्कार सुरू केले. अनेक सांस्कृतिक संस्थांना अनुदाने सुरू केली. जाणत्या पत्रकारांना दौऱ्यावर जाण्याची संधी प्राप्त करुन दिली.

साहित्य संस्था, चित्रपट संस्था, वृत्तपत्र संस्था, नाट्य संस्था, शिक्षण संस्था, सांस्कृतिक संस्था, संशोधक संस्था, प्रकाशन संस्था, यांना जागा मिळवून देणे, अनुदान देणे, त्या त्या संस्था वाढीला लागतील असा प्रयत्नन करणे या विविध क्षेत्रातील हुन्नरी माणसांना सरकारच्या विविध कमिट्यांवर नियुक्त करून त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा करून घेणे हे यशवंतरावांनी आवर्जून केले. आपल्या सहकाऱ्यांनाही तसेच करायला भाग पाडले. त्यामुळे 'उदंड जाहले पाणी, स्नानसंध्या करावया' अशी महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाची स्थिती झाली, यशवंतरावांनी स्नेहाने विचारवंतांची मने जिंकली, आमीष दाखवून नव्हे. यशवंतरावांना मिळालेली ही विद्वन्मान्यता खरोखर हेवा वाटणारी अशी होती. विद्वानांना राजमान्यता हवी होती व यशवंतरावांना विद्वन्मान्यता हवी होती. महाराष्ट्रात परंपरांचा कृष्णा-कोयना संगम होणे हा केवढा महत्त्वपूर्ण योग आहे!

श्रेष्ठ राजकारणी पुरुषाला उज्ज्वल असे सार्वजनिक चारित्र्य असावे लागते. सत्ताधारी सर्वश्रेष्ठ पुरुष एका अर्थाने विराट समाज पुरुष 'ट्रस्टी' असावा लागतो. ट्रास्टीच लफंगा असेल तर त्या समुदायाचे ते महान दुर्दैवच समजले पाहिजे. यशवंतरावांचे सार्वजनिक जीवनाही उजाड होते. राजकारणी पुरुषासंबंधी कितीतरी वदंता ऐकायला मिळतात. पण यशवंतरावांसंबंधी त्यांच्या विरोधकांनीही - त्यांना खाली मान घालावी लागेल असे कुठे कधी आरोप केले नाहीत! सत्ताधारी व्यक्तीला लक्ष्मीचा मोह अनावर होतो. रम, रमी, रमा या राजकारणी पुरुषाच्या मार्गातील तीन प्रचंड मोहमयी चेटकिणी असतात. पण यशवंतराव या चेटकिणीपासून लीलया दूर राहिले. यशवंतरावांना लक्ष्मीने कधी भुलविले नाही की कधी तोंडघशी पाडले नाही! रम, रमी, रमा यांच्या भोवऱ्यात भ्रष्ट झालेल्यांना व शरणांगतांना यशवंतरावांनी भले कीव येऊन संरक्षण दिले असेल, पण या मोहांचा त्यांच्या जीवनाला जराही स्पर्श झाला नव्हता! विरागी पुरुषाचेच हे सारे लक्षण आहे.

यशवंतराव चव्हाण म्हणजे महाराष्ट्राचा सुसंस्कृत व सार्वजनिक चारित्र्याचा आरसा होता. श्रेष्ठ, शालीन जीवन कसे जगावे याचा तो किता होता.

राजकारणी पुरुषाला विचाराची बैठक असावी लागते. त्याचे जीवनविषयक, समाजधारणाविषयक स्वतःचे खास तत्त्वज्ञान असावे लागते. त्या शुद्ध व लोककल्याणकारी तत्त्वज्ञानाने तो समाजपुरुषाशी जवळिक साधीत असतो. मराठमोळ्या माणसांशी स्नेह राखून,त्यांचे सर्वांचे हित साधून महाराष्ट्राचे मंगल करायचे हे यशवंतरावांचे स्वप्न होते! जात, पंथ, नातेगोते, घराणे, धर्म यांच्या डबक्यात यशवंतराव कधी अडकले नाहीत. उगवत्या सूर्याला साक्षीदार ठेवून लोकोत्तर व राजकारणी पुरुषाची ती ध्येयस्पर्शी वाटचाल सुरूच होती. हिमालयाच्या सान्निध्यात राहणाऱ्या या झुंझार पुरुषाला सह्याद्रीचा कधी विसर पडला नाही. यशवंतराव म्हणजे भारतीय राजकारणाला लाभलेला अजिंक्य सिंहकडा होता.

## वरुणराज भिडे
## गप्पा राहूनच गेल्या

काँग्रेस (अर्स) सोडून साहेबांनी स्वगृही जाण्यासाठी प्रस्थान ठेवले त्याच्या आदल्या दिवशीची गोष्ट. साहेब त्या दिवशी पुण्यातच होते. मी सकाळीच फोन केला. त्यांचे पुतणे दादासाहेब फोनवर होते. ते म्हणाले, "लगेच ये, एकटेच आहेत. ते बोलतील." मी लगेच गेलो. साहेब दिवाणखान्यातच होते. नमस्कारचमत्कार झाल्यावर ते म्हणाले, "काय राज्याची परिस्थिती कशी काय आहे?" मला आश्चर्याचा धक्का बसला. ज्या राज्याच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा होता, ज्या राज्याच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांचा ठसा होता, त्याच राज्याची परिस्थिती ते विचारीत होते. मुख्य प्रवाहापासून तुटल्यासारखे त्यांना वाटत होते की काय कोण जाणे! माझे मत विचारले याबद्दल मला बरे वाटले. त्या वेळी अंतुलेंची धुमधडाका राजवट चालू होती. अंतुलेंचा कारभार, जनता दरबार, रायगड, भवानी तलावर वगैरे अनेक विषयांवरची माझी मते मी सांगत होतो. ते मधूनमधून एखादा प्रश्न विचारीत होते.

गावांची नावे बदलण्याचा प्रकार इतिहासशास्त्रांच्या दृष्टीने बरोबर नाही, असे म्हटल्यावर ते म्हणाले, "नावे मीही बदलली. चांद्याचे चंद्रपूर आणि मोमिनाबादचे अंबेजोगाई केले, पण मला तसा नाद नव्हता."

साहेबांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद अडीच वर्षेच सांभाळले. पण त्यांच्या काळात घेतल्या गेलेल्या निर्णयांचा परिणाम दीर्घकाळ टिकला होता. त्यासंबंधी मी अनेक शंका विचारल्या, प्रश्न विचारले. माझ्या प्रश्नांना उत्तरे देताना ते म्हणाले, "त्या वेळी घेतलेले निर्णय काही योगायोगाने घेतलेले नव्हते. त्यामागे बऱ्याच वर्षांपासूनचा विचार होता. हेतू होते. तुम्हाला वाटते त्या वेळी आम्ही बाराशे रुपयांच्या शैक्षणिक सवलतीचा विचार केला नाही. खूप आधी केला होता, पण मुंबई राज्यावर

गुजरातमधील मंत्र्यांची पकड होती. खर्चाच्या योजनांना जीवराज मेहतांचा सक्त विरोध असायचा. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यांवर आम्ही सगळी स्वप्ने पुरी करू लागलो.

प्रवरेचा कारखाना झाला त्या वेळी विखे पाटील आणि धनंजयराव गाडगिळांना फार आटापिटा करावा लागला होता. नंतरच्या लोकांना त्या मानाने फार कमी त्रास झाला. महाराष्ट्रात साखर कारखान्यांचे पीक उगाच आलेले नाही. त्यासाठी माणसांच्या मनाची आणि मुंबई, दिल्लीतील राजकारणाची आम्ही मशागत केली होती. त्या खटपटीमुळे तर भराभर कारखाने वाढत गेले.”

साहित्य संस्कृती मंडळाची प्रकाशने, विश्वकोश याबद्दल विचारल्यावर ते म्हणाले, “त्या वेळी अनेक लोक कुणाकुणाला घेऊन येत. यांना लिहायचे आहे, संशोधन करायचे आहे, मुख्यमंत्री निधीतून मदत द्या. मी मदत द्यायचो. ती माणसे गुणी होती. पण मला सारखे वाटायचे की गुणी माणूस झाला तरी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोचू शकतो त्यालाच मदत मिळते. पोचत नाही त्याच्यासाठी काहीतरी करायला पाहिजे. मी तर्कतीर्थांपाशी मंडळाची कल्पना बोललो. ते म्हणाले, “माझ्याही मनात हाच विचार होता.” कुठलीही कल्पना सांगितली तरी ती आपल्याला आधीच सुचली होती असे तर्कतीर्थ सांगतात. पण ज्या प्रकारे ते बोलले त्यावरून त्यांच्या मनात हा विचार बराच खोल गेला असणार. मी योजना करण्यास सांगितल्यावर ते “दोन दिवसांत देतो” म्हणाले, पण नेहमीप्रमाणेच दोन दिवसांत काहीच केले नाही, उलट वाईला निघून गेले. मी आठवण केल्यावर त्यांनी आठ दिवसांचा वायदा केला. असे तीन वेळा आठ दिवस गेल्यावर माणूस पाठवून त्यांना मुंबईत आणले आणि अक्षरशः खोलीत कोंडून योजना तयार करायला सांगितले.

तर्कतीर्थ कामाला सुरुवात करीत नाहीत हीच अडचण असते. कामाला लागल्यावर त्यांचा झपाटा विलक्षण असतो. त्यांनी योजना आखली, मंडळाची स्थापना झाली, काम सुरू झाले. आज जे वैभव दिसते त्याची

सुरुवात अशी होती. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री थोडी वर्षे होतो. पण माणसे हेरून, उभी करून वेगवेगळ्या क्षेत्रात जी घडी घालून दिली त्यामुळे तुम्हाला तो प्रभाव जाणवतो. आणखीही वीस-पंचवीस वर्षे मी घातलेल्या घडीचा परिणाम जाणवत राहील.

"पुणे शहर हा माझ्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय. त्याबद्दल त्यांनी अनेक प्रश्न विचारले. एका प्रश्नावर मी म्हणालो, "मुंबईची वाढ होणे अशक्य झाल्यावर पुण्याचे उद्योगीकरण झाले असे लोक म्हणतात. पण पुणेच का वाढले ? मुंबईनंतर नगर, नाशिक, औरंगाबाद का वाढले नाही ? पुण्याचे लोक १०० वर्षे उद्योगीकरण व्हावे यासाठी ओरडत होते, म्हणूनच मुंबईनंतर पुणे वाढले."

"तुम्ही म्हणता त्यात तथ्य आहे. पण पुण्यावर माझे प्रेम होते, प्रेम आहे म्हणून पुण्यात कारखानदारी वाढली. टाटा, गरवारे, कल्याणी यांना मी अक्षरशः हाताला धरून, ओढून पुण्यात आणले. त्यांच्यासाठी जागा शोधल्या. गरवारेसाठी जागा पाहायला तर मी गुडघ्यापर्यंत धोतर धरून चिखल तुडवीत गेलो होतो. पुण्याची कारखानदारी आपोआप वाढली नाही. कारखानदारांना ओढून आणून, आग्रह करून, हट्ट धरून, सवलती देऊन, उत्तेजन देऊन मी पुण्यात कारखाने आणि कारखानदार वाढवले."

या चर्चेत साहेब माझ्याशी बोलत होते असे म्हणण्यापेक्षा स्वतःशीच प्रकट चिंतन करीत होते. इतक्यात कुणीतरी येत असल्याची चाहूल लागल्यावर ते सावध झाले आणि म्हणाले, "मी स्वतःविषयी कधी बोलत नाही, मला तसे बोलायला आवडत नाही, आजच कसा बोललो कोण जाणे ? हे बोलणे तुमच्या माझ्यातच ठेवा, कुठे छापू नका."

पुढे एकदा साहेब आणि वेणूताई असे दोघेजण रामभाऊ जोशींकडे जेवायला आले होते. जेवणानंतर गप्पा मारताना पुणे हा आमच्या आवडीचा विषय निघाला. बोलताना मी म्हणालो, "पुण्याला स्वतःची संस्कृति नाही, भाषा नाही, इथे मुलकी-गैरमुलकी असे वाद नाहीत.

त्यामुळे येणारी संस्कृती, भाषा पुणे शहर आपलीशी करते. स्वतःचा पीळ नसल्याने पुण्याची संमिश्र भाषा; संमिश्र संस्कृती महाराष्ट्राची भाषा आणि संस्कृती झाली आहे.”

“पुण्याला स्वतःची संस्कृती नाही असे कसे म्हणता येईल ?” साहेबांनी प्रश्न केला.

“पुण्याला स्वतःचे रूढ अर्थाने ग्रामदैवत नाही, पुण्याची म्हणून जत्रा नाही. पुण्याला पाटील नाही आणि पुण्याला कुलकर्णी नाही. आपल्या समाजरचनेत पुण्याला फक्त देशपांडे आहे, पण देशपांड्याचा गावगाड्याशी संबंध नसतो.”

हे माझे उत्तर साहेबांना आवडलेले दिसले. ते म्हणाले, “रामभाऊ, मला पुणे आवडते, पुण्याबद्दल बोलायला यांचे विचार वेगळेच दिसतात. यांना घेऊन एकदा घरी या. पुण्याबद्दल मला खूप काही ऐकायचे आहे.”

पण “एकदा” भेटण्याची ही वेळ कधी आलीच नाही ! गप्पा तशाच राहून गेल्या !....

## गजानन शं. खोले
## आई आणि पूजा

साहेबांचे डोळे पाणावले. डोळ्याला त्यांनी रूमाल लावला, डोळे टिपले आणि म्हणाले, "आईच्या आठवणी सांगणं ही एक पूजाच आहे."

एक रेसकोर्स रोड, नवी दिल्ली या साहेबांच्या बंगल्यातील आठ वर्षांपूर्वी घडलेला हा प्रसंग आहे. त्या दिवशी पौर्णिमा होती. टिपूर चांदणं पडलं होतं. रात्रीचे बारा वाजून गेले होते. बंगल्यातील वरील दिवाणखान्यात साहेब, सौ. वेणूताई आणि मी आम्ही तिघेच होतो. त्या वेळी साहेबांच्या तोंडून अगदी सहजपणाने बाहेर पडलेले हे वाक्य आहे, "आईच्या आठवणी सांगणे ही एक पूजाच आहे."

वैधव्य आल्यानंतर प्रतिकूल परिस्थिती आणि गरिबी यांच्याशी मुकाबला करून ज्या मातांनी आपल्या मुलांना कर्तृत्वसंपन्न केलं, अशा मातांच्या जीवनगाथांवर मी "सात्विक समर्थ" या मासिकात लेखमाला लिहीत होतो. ग. दि. माडगूळकरांच्या मातोश्री बनूबाई-बिस्किटवाल्या आई सीताबाई साठे-पेपकोच्या जननी माईसाहेब पारखे, डॉ. खैर यांची माता बगूबाई-वेदप्रेमी जानकी आक्का घैसास वगैरे मातांवर माझे लेख प्रसिद्ध झाले होते.

श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मातोश्री विठाई यांच्यावरही अशाच स्वरूपाचा लेख लिहिण्याचे मी ठरवले. पुण्याच्या दैनिक 'सकाळ'चा मी वार्ताहर असल्याने साहेबांचा आणि माझा चांगला परिचय होता. दिल्लीहून ते पुण्याला आले होते तेव्हा सर्कीट हाऊसवर जाऊन मी त्यांची या संदर्भात भेट घेतली. माझ्या विनंतीला त्यांनी बिलकूल आढेवेढे घेतले नाहीत, लागलीच ती मान्य केली व मला म्हणाले, "या विषयासाठी निवांत अशीच वेळ पाहिजे, तुम्ही रात्री दहा वाजता या."

त्यानुसार मोठ्या आनंदानं रात्री दहा वाजता मी सर्किट हाऊसवर गेलो. गावातील कार्यक्रम संपवून साहेब नुकतेच सर्कीट हाऊसवर आले होते. हॉलमध्ये मी गेलो, कऱ्हाड भागातील साठ सत्तर कार्यकर्ते तिथे बसले होते. तेवढ्यात आतून साहेब आले आणि सर्वांकडे पाहत स्मितहास्य करीत समोरच्या कोचावर बसले.

मी त्यांच्या समोरच बसलो होते. मला त्यांनी हाताच्या खुणेने जवळ बोलावून घेतले आणि कोचावरच स्वतःच्या जवळ बसवून घेत अगदी हळू आवाजात म्हणाले, "खोले, सॉरी हं ! ही मंडळी गावाकडून अचानक आली आहेत. तास दीड तास तरी यांच्याशीच गप्पागोष्टी करण्यात जाईल. पंधरा दिवसांनी मी परत पुण्याला येणार आहे, तेव्हा आपण बसू या." हे ऐकताच माझा चेहरा स्वाभाविकपणे काहीसा उदास झाला, ते त्यांना जाणवले असावे. माझ्या पाठीवर हात फिरवीत मला म्हणाले, "आपण पंधरा दिवसांनी नक्की बसू या." तेव्हा काहीशा खट्टू मनाने मी घरी परत आलो.

पंधरा दिवसांनी साहेब पुन्हा पुण्यास आले. त्यांना मी भेटलो, पुन्हा त्यांनी रात्री दहाची वेळ दिली. त्यानुसार सर्कीट हाऊसवर रात्री दहा वाजता मी गेलो, पाहतो तो मागलाच प्रकार ! पुणे जिल्ह्यातील तीस-चाळीस कार्यकर्ते तेथे येऊन बसले होते. पुन्हा साहेबांनी मला जवळ बोलावून घेतले आणि मी परत नाराज होऊनच परतलो.

असे आणखीही पुण्यात एकदोन वेळा झाले. हेतुपुरस्सर हे करीत नव्हते. पण आईच्या आठवणी सांगायला त्यांना मनापासून निवांत वेळ हवी होती, आणि ती पुण्यात मिळू शकली नव्हती. प्रभूला भक्तीचे वंदन, तसे कार्यकर्त्यांच्या प्रेममय पडणाऱ्या वर्तुळातून साहेब सुटू शकत नव्हते.

या सुमारास पुणे जिल्ह्याचे नेते अण्णासाहेब मगर लोकसभेवर निवडून गेलेले होते-खासदार झालेले होते. माझा आणि त्यांचा स्नेह होता. आमच्या घरी ते येत असत. असेच ते घरी आले असताना विठाईच्या लेखाबाबत पुण्यात घडलेली हकिकत मी सहज त्यांना सांगितली. ते

मला म्हणाले, “दिल्ली, ही काही इंग्लंड अमेरिकेत नाही, तुम्ही याकरता दिल्लीला जा. साहेबांना पत्र पाठवा, दिवस आणि वेळ मागून घ्या. पुण्यात साहेब केव्हाही आले तरी कार्यकर्त्यांचे मोहोळ त्यांच्याभोवती राहणारच.”

खासदार मगर यांचा सल्ला मला एकदम पसंत पडला. मी साहेबांना दिल्लीला पत्र लिहिलं. त्यांचेकडून लागलीत पत्रोत्तर आलं. त्यांनी मला दिल्लीला येण्याचा दिवस कळविला होता. मी दिल्लीला गेलो. त्यांना फोन केला, त्याच दिवशी एक रेसकोर्स रोड वरील आपल्या बंगल्यात रात्री दहाची वेळ मला दिली-शांत व निवांत !

“यशवंता, देव पाठीशी आहे” हे माझ्या आईच्या वाक्य तिच्या जीवन कवितेतील ध्रुपद आहे.” साहेब सांगत होते, “कऱ्हाडला टिळक हायस्कूलमध्ये मी होतो. सोळा वर्षाचं माझे वय. द्विवेदी नावाचे गुरुजी, महात्मा गांधींचे भक्त होते. ते आम्हाला शिकवताना देशभक्तांच्याही कथा सांगत. त्या वेळी आम्ही मुलांनी शाळेतील लिंबाच्या झाडावर तिरंगा झेंडा लावण्याचे ठरवले. ही कामगिरी मजवर सोपवण्यात आली होती. मी ती केली, इतकेच नव्हे तर आम्ही मुलांनी नंतर गावातून प्रभात फेरी काढली. त्यात पोलिसांनी मला पकडले. कऱ्हाडच्या पोलिस कोठडीत मला ठेवले होते. आपुलकीने गावातील काही मंडळींनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि ‘यशवंता लहान आहे त्याला आम्ही माफी मागायला सांगतो, तुम्ही त्याला सोडून द्या. अशी विनंती त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांना केली. पोलिस अधिकाऱ्यांनी ती विनंती मान्य केली. पोलिस कोठडीत येऊन गावकऱ्यांनी मला तसे करण्यास सांगितले. त्याच वेळी माझे बंधू, माझी आई विठाईला घेऊन पोलिस कोठडीत आले होते. मला पाहताच तिचे डोळे पाण्याने भरून आले पाच-सात मिनिटे तिच्या तोंडून शब्दही फुटला नाही. कोठडीत मला भेटायला आलेले लोक मला माफी मागणीचा सल्ला देत असल्याचे तिच्या कानावर पडले. तेव्हा तशा स्थितीत ती मला म्हणाली, “यशवंता, तू चोरीबिरी काही केलेली नाहीस, माफी मागायची नाही, देव पाठीशी आहे.” आई घरी परत गेली. पुढे मला त्या

गुन्ह्यात तुरुंगवासाची शिक्षा झाली. असे अनेक प्रसंग पुढे माझ्या आयुष्यात आले. दुःखाचे आले तसेच सुखाचे पण आले. दर वेळी त्या त्या प्रसंगी एकच वाक्य आई बोलत असे, "यशवंता, देव पाठीशी आहे."

असे ते सुखदुःखाचे अनेक प्रसंग सांहेब मला सांगत होते. ते सांगता सांगता रात्रीचे बारा वाजून गेले होते. रात्री दीडपर्यंत आमची ती मुलाखत चालली होती. मुलाखत संपली तेव्हा काहीशा गद्गदलेल्या प्रेममय आवाजात ते म्हणाले, "आईच्या आठवणी सांगणे ही एक पूजा आहे-पूजा आहे !"

## मनोहर दत्तात्रय तथा बाळ पुल्ली
## छायाचित्र

माझे मामा चांगल्यापैकी फोटोग्राफर होते. त्यांच्यामुळे मला छायाचित्रकलेचे शिक्षण आपोआपच, सहजासहजी मिळाले. १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या रक्षा पुण्यात आणल्या होत्या. आळंदीला विसर्जन झाले. त्या वेळी तेथील कार्यक्रमाचे फोटे फक्त मीच एकट्याने घेतले आणि श्री. ठाकूर यांनी ते दैनिक सकाळमध्ये प्रसिद्ध केले. पत्रकार, छायाचित्रकार, म्हणून माझ्या जीवनाची सुरुवात अशी झाली.

या व्यवसायामुळे व पुणे हे देशातील महत्त्वाचे शहर असल्यामुळे पत्रकार, छायाचित्रकार म्हणून माझे बस्तान चांगले बसले. पं. नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, लॉर्ड माऊंटबॅटन वगैरेसारख्या फार मोठ्या नेत्यांच्याजवळ जाण्याचा योग येऊ लागला.

द्विभाषिक मुंबई प्रांत असताना पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांनी फार मोठी गती घेतली होती. आमदारांना या योजना दाखवाव्यात असे ठरले आणि त्यानुसार गुजराथचे आमदार कोयना पाहावयाला आले होते. प्रसिद्धी खात्याने माझ्याकडे त्यांच्याबरोबर जाण्याचे काम सोपविले.

कोयना पाहून आम्ही कऱ्हाडला आलो आणि एका आमदाराला तेव्हाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे घर तेथे आहे याची आठवण झाली. मला त्याने ते घर दाखवावे ही विनंती केली. आणि मग त्याच्याबरोबर सारेच तयार झाले. त्यामध्ये नंतर गुजरातचे मुख्यमंत्री झालेले हितेंद्र देसाई हेही असावेत असे वाटते. मला त्यांची विनंती नाकारता येईना. त्यांना 'थांबा' असे सांगून एका जीपने मी यशवंतरावांच्या घरी गेलो. घर जुनेच होते. शिवाय घरी फक्त त्यांची वृद्ध माता विठाबाई होत्या. दुसरे कोणीच नव्हते.

मी जाताच सारे शेजारी जमा झाले. त्यांना मी कशासाठी आलो आहे हे सांगताच ते सारे आनंदाने ‘घेऊन या आमदारांना’ असे म्हणाले. मी परत जाऊन बसमधून साऱ्यांना आणले. त्यांनी घर पाहिले. माता विठाबाईचे दर्शन घेतले. त्या गहिवरून गेल्या. आपला मुलगा केवढा मोठा झाला आहे याची कल्पना त्यांना होतीच. मी घेतलेले भावपूर्ण फोटो पुढे यशवंतरावांना मुंबईत दाखवले. तेव्हा दूरगावी असलेल्या आईच्या आठवणीने ते एकदम भारावून गेले. गद्गदलेल्या आवाजात ते मला म्हणाले, “बाळ, पाहिजे ते पैसे माग व हे फोटे मला दे.”

मी पैसे घेण्याचे नाकारताच ते दुःखी झाले. दुसऱ्याच्या कष्टाचा मोबदला दिलाच पाहिजे ही त्यांची भावना दृढ होती. मला मात्र ती उमजत नव्हती. त्यांचे खाजगी चिटणीस श्री. श्रीपाद डोंगरे शंभराच्या दोन नोटा घेऊन पुढे आले आणि त्यांनी ते पैसे मला घ्यावयाला लावून मगच फोटो ठेवून घेतले.

पानशेत धरण फुटल्यावर ते पाणी माझ्या डेक्कन जिमखान्यावरील स्टुडिओत शिरून माझी अतोनात नुकसानी झाली. पानशेतनी केलेली नुकसानी पाहण्यास पुढे त्या वेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आले होते. त्या वेळी यशवंतरावांनी रस्त्यावर त्यांची गाडी थांबवून माझी झालेली नुकसानी त्यांना सांगितली आणि पंडितजींनीही जेव्हा माझ्याबद्दल आपुलकीचे ‘बाळ फोटोग्राफर’ हे उद्गार काढले तेव्हा झालेला विध्वंस क्षुद्र वाटला. राज्याचा मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान आपल्या पाठीशी उभे आहेत या जाणिवेने ताठपणे उभा राहून पुन्हा कामाला लागलो.

## राष्ट्रवीर
## राजकीय प्रभावळीतील "कोहिनूर"

यशवंतराव चव्हाण यांनी आपले शिक्षण बिकट परिस्थितीत घेतले आणि स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. सातारच्या प्रतिसरकारने अन्यायी लोकांना व ब्रिटिश सरकारला धाब्यावर बसविले आणि ब्रिटिश सरकारचे शासन सातारा सांगली जिल्ह्यात जवळजवळ नामशेष झाले. त्या चळवळीत यशवंतराव चव्हाण यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता.

मानवेंद्र राय, महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे धन त्यांनी अंगीकारले होते. म्हणून समाजवादी महाराष्ट्र निर्माण करण्यास ते कटिबद्ध झाले होते.

उद्योगधंद्यात महाराष्ट्र सहभागी असला पाहिजे. म्हणून औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी ते सतत धडपडत होते.

शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्राने इतरांना पाठ शिकावेत यासाठी शिक्षणाचा प्रचार करण्यात त्यांनी अनेक संस्थांना प्रवृत्त केलेले आहे. साहित्य, संस्कृती मंडळातर्फे नाना भाषांतील व स्वभाषेतील पुस्तके प्रकाशित करण्यास त्यांचे मनस्वी प्रोत्साहन होते.

यशवंतराव चव्हाण ही एक व्यक्ती नसून संस्था बनली होती. अगदी अल्पकाळात महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांनी आपला अमर ठसा उमटविला होता.

लहान-थोर कोणताही समारंभ असो यशवंतरावजी तेथे आपली उपस्थिती लावीत. बहुजन समाजाच्या लोकांना भेटावे व त्यांचे मनोगत जाणून घ्यावे अशी त्यांची विचारधारा होती.

महाराष्ट्रात १०० हून अधिक साखर कारखाने आहेत. या कारखान्यांना "पुढे चला" असा हिरवा कंदील ते दाखवून गप्प बसणारे नव्हते, तर त्यांची प्रगती कशी होत आहे याकडेही ते जातीने लक्ष देत.

“आधुनिक किल्ले” असे ते साखर कारखान्यांना संबोधीत.”

यशवंतराव चव्हाण समंजस, उदार मतवादी व सर्वसमावेशक आणि समन्वयवादी नेते होते. आपल्या शत्रूबद्दल देखील तिळमात्र अभद्र भाषा ते बोलत नव्हते.

## म. सु. कारेकर
## आत्मनिर्झर हास्याचा धनी

माझ्या शालेय जीवनात मास्टर विनायक ही चित्रपटसृष्टीतील मान्यवर व्यक्ती माझे शिक्षक होते. शाळेत आले की ते प्रफुल्लित होत. एक आगळे हास्य त्यांच्या चेहऱ्यावर पसरे. आत्मनिर्झराचे दर्शनाचा लाभ होई.

कुमार वयाच्या त्या काळात स्वातंत्र्य चळवळ सर्व क्षेत्र व्यापून राहिली होती. ग्रामीण भागातील जनता महात्मा गांधींच्या मागे ठामपणे उभी राहिली होती तर आमचा शहरातील पुढारलेला वर्ग बुद्धिकौटिल्यवृत्तीने त्यांच्यापासून दूर होता. नवशिक्षित वर्ग त्यांच्यातच सामील होत होता. ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थी त्याला अपवाद नव्हते.

अशा या काळात माझ्या आतेभावाचे चुलते श्री. पंडितराव न. भद्रे, निवृत्त न्यायाधिकारी यांनी कायद्याची परीक्षा देऊन कराडला वकिली सुरू केली होती. त्यांच्याकडे समव्यायसायिकांचे जे कोंडाळे जमे त्यात भारताचे उपपंतप्रधान श्री. यशवंतराव चव्हाण हे होते. गरिबी, ग्रामीण संस्कार यामुळे बैठकीत ते फारसे पुढे पुढे नसत. पण त्यांच्या चेहऱ्यावरील हास्याने मला त्यांच्याकडे आकृष्ट केले आणि तो धागा कायमचा जोडलेला राहिला.

त्या वेळी शालेय जीवनकाळात हिंदुसभावादी नंतर महाविद्यालयात जाताच साम्यवादी विचारसरणीत सर्वजण गुरफटलेले असत. आणि गद्धेपंचविशी संपताच मंडळी संसाराला लागत. किंवा काँग्रेसमध्ये सामील होऊन राजकारणी होत. याशिवाय भाई मानवेन्द्रनाथ यांच्या ‘रॅडिकल डेमॉक्रॅटिक’ पक्षाचे प्रलोभन बुद्धिमंतांना असे. माजी आमदार आत्माराम पाटील यांची संगत त्यामुळे मला जास्त आवडे. यशवंतरावही या मंडळीत असत.

चर्चा बैठकीत तसे ते फार अबोल असत पण अफाट वाचन, विचारांची व्यवहाराशी सांगड, संदर्भाचा झटकन वापर, अतिशय मोजके बोलणे यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष होत नसे. स्वतःचा संसार, का केवळ बुद्धिमंतानी बुद्धिबळावर सत्ता गाजवावयाची का पुढारलेल्या समाजाची गुलामगिरी इतर समाजाने स्वीकारावयाची, का महात्मा गांधींचे सर्व समाजाला जागे करा, कार्यप्रवण करा, हा कार्यक्रम अंगीकारावयाचा याचा निर्णय घ्यावयाचा तो काळ होता. स्वतःला संपूर्ण ओळखून ज्यांनी निर्णय घेतले तेच भावी काळात यशस्वी झाले आहेत.

यशवंतरावांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांच्या मागे ग्रामीण भागातील समाज नव्हता. तसेच शहरातील वर्गही नव्हता. त्यामुळे काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून कार्य करीत असताना बी.ए., एल.एल.बी. पदवी असणाऱ्या या तरुणाचा होणारा तेजोभंग माझ्यासारख्या माहितगारांना उमजत होता. पण ते विचलित होत नव्हते. पक्ष सांगेल त्या पदाचा स्वीकार करून ते आपली सारी बुद्धी, शक्ती त्या कामासाठी वापरीत.

ती एक उमेदवारी होती. प्रशिक्षित तरुणाला उमेदवारी सहन होत नसते. यशवंतरावांनी ते हलाहल पिण्यास प्रारंभ केला होता.

काँग्रेस पक्षातून जेधे-मोरे-जाधव-वाघ ही मंडळी बाहेर पडून शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना झाल्यावर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये भाऊसाहेब हिरे ही एक प्रबल शक्ती बनली. त्या काळांत यशवंतरावांना पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावरून नगर विकास खात्याचे उपमंत्रिपद मिळाले होते. त्या वेळी ते कोल्हापूरला ना. हिरे यांच्याबरोबर रेल्वेने आले. पण सारा समाज हिरेंच्याबरोबर समोरच्या कोरगावकर तेल गिरणी प्रांगणात गेला आणि ती गर्दी कमी झाल्यावर मला यशवंतराव दिसले. मी जवळ जाताच ते त्यांच्या खास पद्धतीने हसले आणि मग त्यांना उपेक्षिले याचे कोणतेही वैषम्य न दाखवता गप्पागोष्टी करीत आम्ही कोरेगावकरांकडे गेलो.

माझा व्यवसाय पत्रकारितेचा होता. दुय्यम, तिय्यम दर्जाच्या वृत्तपत्रातून मी नोकरी करीत असे. जीवन ओढग्रस्तीचे असे. ही जाणीव त्यांना होती पण ते ती गोष्ट कधीही दाखवून न देता ते माझ्याशी अशी काही जवळीक दाखवून वागत की त्यामुळे अधिकारीवर्ग, पक्षाची मंडळी, मालकवर्ग यांना माझ्याशी वागताना आपोआपच बदल करावा लागे. थोराचे देणे हे असे अदृश्य असते.

भाऊसाहेब हिरे विरुद्ध मोरारजी देसाई या राजकारणात यशवंतरावांनी जी खेळी केली त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण नागरी नेतृत्वाकडून ग्रामीण नेतृत्वाकडे नेले हा इतिहास आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री असलेल्या यशवंतरावांची अवहेलना करण्यात सर्व पत्रकार आघाडीवर होते. समाजही सभेमध्ये टर उडवीत असे. पण यशवंतरावांनी वेळोवेळी, गावोगावी पत्रकार बैठकी घेऊन पत्रकाराचे स्थान जसे मानले तसेच विरोधी पक्षाचा वरचष्मा असलेल्या गावात पोलिसी-शासकीय साहाय्याचा वापर न करता सभा घेऊन जनता हे त्यांचे दैवत ही गोष्ट त्यांनी आचरणात आणली.

लोकप्रतिनिधिपदाचे पावित्र्य त्यांनी मनापासून मानले होते. त्यामुळेच शासकीय अधिकारपदावर असलेल्या काही बुद्धिमंतांना ते नकोसे वाटत. आपल्या खाजगी बैठकीत अगर कार्यालयात गावच्या पंचाचे आणि खासदाराचे गाऱ्हाणे ऐकताना ते सारखेच अवधान ठेवत व त्याची दखल घेऊन त्या गाऱ्हाण्याचे निराकरण करीत.

मुख्यमंत्रिपद प्रथम द्विभाषिकाचे व नंतर महाराष्ट्राचे स्वीकारल्यावर त्यांच्यावर कामाचा फार मोठा ताण पडला होता. केंद्र शासनात संरक्षणमंत्रिपदी ते गेल्यावर तो भार एकदम कमी झाला. आणि ते साहित्य संस्कृती वगैरे विषयांत रममाण होऊ लागले. दिल्लीला जाऊन स्थायिक व्हावे लागणार ही गोष्ट कदाचित त्यांना अगोदरच जाणवली असावी. त्यामुळेच लखनौ-कानपूरकडील एक उर्दू शिक्षक त्यांनी हिंदी बोली भाषा

येण्यासाठी मुंबईत ठेवला होता. त्यामुळेच लोकसभा व राज्यसभेतील त्यांची भाषणे भाषासौष्ठव म्हणूनही सुंदर ठरली.

राजकारणातील ही व्यक्ती स्व-विचार, पक्ष तत्त्वज्ञान, शासनाच्या जबाबदाऱ्या या बाबतीत अविचलित होती. त्यांच्या बैठकीमध्ये अन्य राजकीय नेत्यांच्या बैठकीत जसे चर्चा-वाद याची झुंज लागे तसे होत नसे. जुन्या आठवणी, आजचे संदर्भ याचा उल्लेख होई आणि त्याला वादाचे स्वरूप येते आहे असे दिसताच विनोदाची कारंजी उडवून वेगळीच बगल बैठकीला लाभे.

पुरंदर येथील एन.सी.सी. अकॅडमीच्या एका समारंभाला ते संरक्षणमंत्री या नात्याने आले होते. त्या वेळी कड्यावर आठ दिवसापूर्वी उभारलेली एक राहुटी सुसाट वाऱ्याला न जुमानणाऱ्या कापडाची आहे काय हे त्यांना तपासावयाचे होते. वाट बिकट होती. एका जीपमध्ये ते बसताच ड्रायव्हरने ती चालू केली. मागच्या जीपमध्ये अकॅडमीचे कमांडंट कर्नल गुणे ती जीप चालवायला बसताच त्यांच्या शेजारच्या मोकळ्या जागेवर मी बसलो. दोन्ही जीप बालेकिल्ल्यावरील पश्चिमेच्या ती राहुटी रोवलेल्या त्या टोकापाशी पोहचताच यशवंतराव व कर्नल गुणे खाली उतरले. यशवंतरावांच्या लष्करी ड्रायव्हरनें आपल्या जीपचे तोंड परतीसाठी वळविण्यास सुरुवात केली व मलाही मी बसलेल्या जीपचे तोंड वळविण्यास सांगितले. त्या अपुऱ्या जागेत ते मी वळविण्यात दहा मिनिटे तरी गेली असावीत. इतक्यात माझी दोन नंबरची जीप तोंड वळविल्याने पहिली झाली होती यशवंतराव माझ्या शेजारी बसले आणि 'चला' म्हणाले. मीही जीप चालू केली आणि पुरंदरचा तो बालेकिल्ला अगदी हळूहळू उतरत खाली आलो. तेव्हा तेथे जमलेल्या मंडळींनी टाळ्यांचा कडकडाट केला. तेव्हा त्यांचा हात हलवून स्वीकार करीत यशवंतराव मला म्हणाले, "कारेकर या टाळ्या माझ्यासाठी नाहीत. तुमच्या ड्रायव्हिंगबद्दल आहेत."

संरक्षणमंत्री असताना संरक्षण खात्याच्या जंगी जेट विमानाने ते सतत पुण्याला येत. त्या वेळी ग्लायडींग संबंधात माझे दिल्लीला काम होते. रजा-वेळ-अर्थकारण यामुळे मला दिल्लीला जाणे जमत नव्हते. तेव्हा यशवंतरावांना 'मी येऊ का तुमच्याबरोबर ?' असे विचारले. त्या वेळी डोंगरे खाजगी सेक्रेटरी, श्री. प्रधान हे शासकीय व एक तामिळ भाषिक खात्याचे सेक्रेटरी अशी मंडळी त्यांच्याबरोबर दौऱ्यात असत. माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी यशवंतरावांनी मला दुपारच्या जेवणानंतर आठवण कर असे सांगितले.

त्या वेळी ते आणि तामिळ सचिव इंग्रजीत बोलत होते. तेव्हा मीही त्यांना इंग्रजीतून 'मला दिल्लीला येण्यासाठी लिफ्ट द्याल काय ?' अस विचारले. त्यावर यशवंतराव इंग्रजीतूनच म्हणाले, 'तुम्हाला मी दिल्लीत ड्रॉप करू काय ?' मी 'होय' म्हणताच ते ठीक म्हणाले. दुसरे दिवशी सकाळी ८ वाजताच पुणे ते दिल्ली हा माझा विमानप्रवास सुरू झाला. पालम विमानतळावरून त्या वेळी एक विमान उड्डाण करावयाचे होते म्हणून मग आमचे विमान दिल्लीला प्रदक्षिणा घालू लागले. तेव्हा यशवंतराव हाताचा ताल धरून म्हणू लागले, "कारेकर, दिल्ली देखो, दिल्ली देखो, ये बादशहाका महाल देखो. ये है...." आणि मग एकदम आठवल्यासारखे करून इंग्रजीत बोलू लागले, "अहो, आपण कारेकरना लिफ्ट द्यावयाचे कबूल केले होते. ते केले आहे. आता त्यांना ड्रॉप करावयाचे आहे ना ?" त्या वेळी ते ऐवढे मनापासून हसले की प्रवासाचा सारा शीण निघून गेला.

## श्री. रामभाऊ जोशी

## यशवंतराव : उमगलेले न उमगलेले

यशवंतराव हे तसे घट्ट ओठाचे नेते. त्यांच्या अंतर्मनात डोकावणं कठीण. कमालीचे मुत्सद्दी, अत्यंत सावध. वर्षानुवर्षे दिल्लीत राहिल्यानंतरही, इथं मित्र कोण किंवा शत्रू कोण हे अजूनही कळत नाही. उमजत नाही. अशीच त्यांची प्रतिक्रिया असायची. यामुळेच सावध असलेला हा नेता आधिक सावध बनला असल्यास नवल नव्हे. या सावधपणातून त्यांना बाहेर काढून त्यांच्याशी गप्पा करणं म्हणजे आव्हान असे. परंतु योगायोगाने म्हणा किंवा आणखी कोणत्या कारणानं असेल, गप्पांची त्यांची माझी नाडी नेहमीच जमायची.

यशवंतराव स्वतः थोर बुद्धिमान असूनही विचारांची देवाणघेवाण करण्याला त्यांची तयारी असे. त्यांचे विचार वास्तववादी असले तरी अनुभवाच्या आणि तर्काच्या मुशीत घालून तावून सुलाखून घेण्याचीही त्यांची सिद्धता असे. राजकीय क्षेत्रात प्रसंगोपात त्यांनी अनन्य साधारण विजय संपादन केलेला असला तरी स्वतःचा मोठेपणा वाढविण्यासाठी नाटकीपणा, दिखाऊपणा यापासून कटाक्षाने ते लांब राहिले. पत्रक-पुढारी किंवा घोषणा-पुढारी बनण्यापासून अलिप्त राहिले. असं असूनही महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या ज्या पिढीनं त्यांना नेते म्हणून स्वीकारले, मानले, ती पिढी समजूतदार आणि शहाणी समजली पाहिजे. राजकारण, समाजकारण, सहकार, शेती उद्योग, कला, साहित्य अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांत माणसं घडविण्याचा, गुणी माणसाला संधी देण्याचा उद्योग त्यांनी संपूर्ण सत्ताकाळात केला. सत्ता नसतानाही केला. यशवंतरावांच्या विचारांची आणि कृतीची महनयिता चिरस्थायी असल्यामुळे आजच्या आणि उद्याच्या पिढीच्या मनातही त्यांचे नेतेपण दीर्घकाळ राहणार आहे.

यशवंतरावांच्या संदर्भात सत्ता कधी उतली नाही, मातली नाही, याचं कारण, ते सत्तेत नसलेल्या काळापासून त्यांच्या समोर प्रथमपासूनच सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्ट होतं. आर्थिक दुरवस्था त्यांनी स्वतः अनुभवली होती, आणि सभोवतालच्या समाजाची दूरवस्था पाहिली होती. मनापुढे दिशा निश्चित झालेली होती. सत्तेत आल्यानंतर त्याच ध्येयासाठी, त्याच दिशेने जाण्यासाठी सत्ता वापरण्याचा निश्चय होऊ शकला. त्यात वेगळेपणा निर्माण होऊ दिला नाही. सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारण्याचा विचार, समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न, त्यामुळेच ते करू शकले. त्यासाठी जेवढी संधी उपलब्ध करून देता येणे शक्य होते तेवढी ते देऊ शकले. महाराष्ट्रात असताना, मुख्यमंत्रिपदावरून त्यांनी यासाठी जे प्रयत्न केले, निर्णय घेतले त्याचा इष्ट परिणाम समाजमनावर निश्चितच झाला आणि टिकला.

यशवंतरावांची महाराष्ट्राला जी प्रमुख देन आहे ती समाजवादाचे विचार रूजविण्याची, आचरणाची. महाराष्ट्रात सर्वप्रथम समाजवाद आणण्याची घोषणा यशवंतरावांनी १९६२ साली केली आणि त्यांना अभिप्रेत असलेला समाजवाद प्रत्यक्षात आणण्याची जिम्मेदारीही त्यांनी स्वीकारली. केवळ जबाबदारी स्वीकारूनच ते थांबले नाहीत तर आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत कृषि-औद्योगिक समाजरचनेची निर्मिती करण्याची आखणी करून त्यांनी ही योजना अंमलात आणली. ग्रामीण समाजाचा आर्थिक चेहरामोहरा बदलण्याच्या ध्येयाची बांधिलकी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून-कार्यकर्ता या नात्याने ग्रामीण क्षेत्रात कार्य करीत असलेल्या काळापासून मनाने स्वीकारली होती. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात सत्तेच्या सर्वोच्च स्थानावर आरूढ होताच कृषि-औद्योगिक समाजरचना आणि त्यासाठी सहकारी चळवळीचा पुरस्कार करून महाराष्ट्राचे ग्रामीण कृषिजीवन त्यांनी आमुलाग्र बदलले. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, येथील सहकारी साखर कारखानदारी आणि सहकारी क्षेत्रातील अन्य प्रक्रियात्मक उद्योग यांनी आज देशात अग्रक्रमाचे,

वैभवाचे, समाजपरिवर्तनाचे आदर्श स्थान संपादन केलेले आहे. याचे श्रेय अर्थातच योजनापूर्वक आखणीला, सहकारी चळवळीच्या पाठीशी ध्येयवादाची शक्ती उभी करण्याला आणि तिला सत्तेचा भरभक्कम आधार देण्याला आहे, हे मान्य करावे लागते.

शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहेत असे ठोकपणे, जाहीरपणे सांगणारे यशवंतराव हे पहिले मुख्यमंत्री. शेतीच्या क्षेत्रात पुरोगामी पावलं टाकून प्रत्यक्ष निर्णय करण्याचे कार्य महाराष्ट्राने यशवंतरावांच्या कारकीर्दीतच सर्वप्रथम केले. शेती आणि उद्योगधंदे यांसाठी आवश्यक असलेल्या व्यक्तींना शिक्षण देण्यासाठी तांत्रिक व शेती शाळांची मालिका निर्माण व्हावी, महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात वीज उपलब्ध होऊन शेती आणि उद्योग यासाठी विजेचा वापर व्हावा यासाठी नुसत्या घोषणा करून ते थांबले नाहीत. त्यासाठी कोट्यवधी हात कामाला लावण्याचा जिवापाड प्रयत्न त्यांनी केला. शेत-जमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा (सीलिंग) कायदा करून या मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने पुरोगामी असल्याचे देशात याच काळात सर्वप्रथम प्रत्ययास आणून दिले. १९६१ च्या जानेवारीमध्ये महाराष्ट्रातल्या शेत-जमिनीबाबतचे (जमीन धारणेवर मर्यादा) विधेयक समोर आले आणि या विधेयकामुळे दूरगामी अशा, जमीन सुधारणेचा पाया घातला गेला. केंद्र सरकारने सीलिंगचा कायदा करण्याचा विचार त्यानंतर दहा-बारा वर्षांनी केला. यातच यशवंतरावांच्या ठिकाणचा; ग्रामीण आणि शेती विकासविषयक द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो.

उक्ती आणि कृती यांचा प्रत्यक्षात मेळ घालणारे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्या काळात यशवंतराव सर्वत्र गौरविले गेले. याचे कारण स्पष्ट आहे. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जेव्हा महाराष्ट्राची धुरा स्वीकारली तेव्हा, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी नेमके काय करावे लागणार आहे, महाराष्ट्रासमोर प्रमुख समस्या

कोणत्या, सरकारचे निर्णय आणि लोक यांच्यात फार मोठी दरी निर्माण होऊ नये, यासाठी काय करावयाचे आदीसंबंधी स्वतः विचार करून आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी विचारविनिमय करून त्यांनी सर्वप्रथम राज्याची धोरण सूत्रे निश्चित बनविली. महाराष्ट्र हे खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य बनावे हा या मुख्यमंत्र्यांचा हेतू होता. या धोरण-सूत्रांनुसार जेव्हा निर्णय होऊ लागले, विकासाचे कार्यक्रम निश्चित करून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली त्या वेळी ते निर्णय लोकांच्या दैनंदिन जीवनाला स्पर्शून जाणारे, चांगल्या अर्थाने स्पर्शून जाणारे, आणि लोकांना त्याचा वाजवी लाभ करून देणारे, त्यांचे जीवन सुसह्य ठरविणारे असेच हे निर्णय ठरले. शेती, शिक्षण, सहकार, उद्योग, विविध कला, साहित्य आणि प्रशासन या संदर्भात त्या काळात मुख्यमंत्री आणि त्यांचे सरकार यांनी केलेले निर्णय ऐतिहासिक ठरले. सांस्कृतिक आणि करमुणकीच्या क्षेत्रातले त्यांचे निर्णयही समाजाच्या या अंगाला उत्तेजन देणारे ठरले.

महाराष्ट्र राज्य हे सार्थ कल्याणकारी राज्य व्हावे या दिशेनेच यशवंतरावांची वाटचाल सुरू राहिली.

यशवंतराव हे स्वतः विचारवंत राजकारणी, मुत्सद्दी पुरुष होते. काँग्रेस पक्षाचे ते नेते होते. राजकीय क्षेत्रात राजकारण चालविण्यासाठी अनेक पक्ष असावे लागतात हे जरी खरे असले तरी यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी जो विचार सांगितला तो अत्यंत महत्त्वाचा विचार होता. पक्षोपक्षांच्या राजकारणाचा गोंधळ महाराष्ट्राला परवडणारा नाही या मुद्द्याचे विश्लेषण करताना त्यांनी सांगितले होते की, महाराष्ट्रापुढे फक्त एकच राजकारण आहे आणि ते म्हणजे सर्वांगीण विकास साधण्याचे राजकारण, महाराष्ट्रापुढे असलेल्या मुलभूत, सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने खटपट करणे हे महाराष्ट्राचे राजकारण होय.महाराष्ट्राचे राज्य म्हणजे सामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्याचे राज्य होय, याच दृष्टिकोणातून या राज्याकडे सर्वांनी पाहावे अशी त्यांची अपेक्षा होती, हाक होती.

ते अत्यंत उत्तम संसदपटू म्हणून यशस्वी झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना ही गोष्ट आपणास जाणवली असेल विशेषतः १९५६-५७ साली राज्यामध्ये काँग्रेस पक्षाला नाममात्र बहुमत असताना आणि एका बाजूला सर्वश्री एस. एम. जोशी, उद्धवराव पाटील, आचार्य अत्रे, यांच्यासारखे धुरंधर पुढारी असताना त्यांनी ज्या पद्धतीने सदनाचे काम चालविले त्यावरून हे सिद्ध होते. आणि त्यानंतर अतिशय कठीण काळामध्ये ते देशाचे गृहमंत्री झाले. विशेषतः त्या काळामध्ये अनेक राज्यांमध्ये वेगळ्या पक्षांची सरकारे सत्तेवर आली होती. देशात अनेक समस्या होत्या.; त्याचबरोबर पूर्वेकडील राज्यांचा प्रश्न बिकट झाला होता. अरुणाचलसारखी छोटी राज्ये निर्माण झालेली होती. त्या काळामध्ये प्रभावी संसदपटू म्हणून ते गाजले.ते चांगले प्रशासकसुद्धा होते. त्यांनी देशाला स्वच्छ प्रशासन दिले.

## बंडोपंत सरपोतदार
## बहुजन समाजवादी लोकशाहीचे चाहते : यशवंतराव चव्हाण

यशवंतरावांची प्रवृत्ती लोकशाहीची होती. संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून, लोकसभेमध्ये काँग्रेस पक्षाचा एक ज्येष्ठ नेते म्हणून, केंद्रामध्ये विविध मंत्रालयांचा कारभार हाकणारे धुरधंर मंत्री म्हणून त्यांची भूमिका लोकांना धरून व विशेषतः विरोधकांशी समन्वय सुसंवाद ठेवावा अशीच होती. इंदिरा गांधींची प्रवृत्ती आणि कार्यपद्धतीच अशी होती की त्यांना खऱ्या अर्थाने त्यांच्याशी संवाद साधता आला नाही.

यशवंतरावांचा आणि माझा निकटचा संबंध संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतच आला. त्या पूर्वीचा परिचय म्हणजे युवक चळवळीतील आणि काँग्रेस समाजवादी पक्षाचे सदस्य म्हणून. पण ते कऱ्हाडाचे आणि माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान त्यामुळे जवळीक साधली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये मी समितीचा सरचिटणीस आणि पहिल्या वर्षी विधान सभेमध्ये विरोधी पक्षाचा नेता म्हणून सतत संबंध येत राहिला. अनेक वेळा विरोधी भूमिका असूनही आमच्यामध्ये कटुता कधीच आली नाही. उलट ते विरोधी पक्षाचे म्हणणे पूर्णपणे ऐकून, समजून घेऊन ते शांतपणे उत्तरे देत. त्यामुळे विचारविनिमय होऊ लागला, आणि आमचा एकमेकांवरील विश्वास वाढत गेला. संयुक्त महाराष्ट्राचा कलश यशवंतरावांनी आणला असा बोभाटा आहे. कित्येक वेळी यशवंतरावांच्या भाषणामुळेही तो वाढीला लागला असावा. एकवेळ विधान परिषदेमध्ये भाषण करताना त्यांनी सांगितले की, “वाटाघाटी करून आम्ही आपले उद्दिष्ट मिळविले, समितीला ते करता आले नाही.” वास्तविक त्यांचे हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नव्हते. कारण समितीला पंडित नेहरूंनी वाटाघाटीला कधी बोलावलेच नाही. खरे म्हणजे उदारमतवादी आणि

लोकशाहीचे चाहते म्हणून त्यांनी समितीच्या नेत्यांशी वाटाघाटी करायला हव्या होत्या असे माझे मत आहे.

परिषदेतील यशवंतरावांच्या या भाषणाचा जो रिपोर्ट वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला त्या अनुषंगाने विधानसभेमध्ये आचार्य अत्र्यांनी तोफ डागली तेव्हा यशवंतरावांनी आपल्या भाषणातील तो भागच वाचून दाखविला. त्यामध्ये समितीच्या कामाचा उल्लेख न करता त्यांनी यशाचे माप लोकांच्या पदरात टाकले.

समाजवादातील मूलतत्त्व समतेचे आहे. त्यात सर्व प्रकारची समानता आर्थिक सामाजिक, शैक्षणिक अंतर्भूत आहे. आपल्या देशात तर सामजिक समतेला विशेष महत्त्व आहे. जातीय उच्च-नीचतेच्या कल्पनांनी आपला समाज आता पोखरलेला आहे. यशवंतराव ब्राह्मणेतर पक्षाकडे न वळता राष्ट्रीय चळवळीमध्ये आले आणि त्यांनी बहुजन समाजासाठी, त्यांच्या विकासासाठी लढले. त्यांच्या शोषणाविरुद्ध लढले. त्यांना समाजवादच अभिप्रेत होता. बहुजन समाजाला शोषणमुक्त करायचे असेल तर शासकीय सत्तेबरोबर त्यांच्या ठिकाणी आर्थिक सामर्थ्यही असावयास पाहिजे. त्याबरोबरच हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरण, सहकारी साखर कारखाने, बँका, अन्य सहकारी उत्पादन कारखाने यांना उत्तेजन दिले. कारखाने, बँका, जिल्हा परिषदांच्याद्वारा ग्रामीण नेतृत्व निर्माण करण्यासाठी परोपरीचे प्रयत्न केले. सर्व थरांतील माणूस वर आला पाहिजे. सर्वसामान्यांना न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची विचारधारणा होती. परंतु आपल्या हातात सत्ता असल्याशिवाय हे जमणार नाही अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली होती. सत्तेशिवाय जनहित साधता येणारच नाही असा त्यांचा ग्रह होऊन बसला होता. त्यांच्या या आग्रहामुळेच त्यांच्या भूमिकेमध्ये कमजोरी आली असे माझे मत आहे. नाहीपेक्षा इंदिरा गांधींच्या काँग्रेसविरुद्ध एकदा खंबीरपणे उभे राहिल्यावर पुन्हा त्यांच्याकडे जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला नसता. सत्ता हस्तगत करण्यासाठी ज्या समाजाचे आपण भले करू पाहतो त्याला

जागृत करून पुढे न्यावे लागते. वेळी संघर्षही करावा लागतो. हे त्यांच्या ध्यानात कसे आले नाही हे कळत नाही. काही काळ सत्तेबाहेर राहून पुन्हा सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणी नव्हता असे कित्येक वेळा वाटल्यावाचून राहात नाही.

शोषित जनतेच्या संघटना प्रभावी बनल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी आम्ही विरोधी लोकांनी कम्युनिस्टांच्या बरोबर एकजूट करुन मुंबईमध्ये कापड उद्योगातील श्रमिकांची एक युनियन स्थापन केली. ती युनियनला प्रतिस्पर्धी अशी होती. आम्ही एकदोन दिवसात लाख दीड लाख कामगारांना युनियनचे सभासद करून घेतले. हे यशवंतरावांना कळले तेव्हा त्यांनी खाजगीरीत्या आमचे अभिनंदन केले होते. ही गोष्ट माझ्या चांगली स्मरणात आहे. त्यांच्या आंतरिक चांगुलपणाचा, सौजन्यशीलतेचा आणि गुणग्राहकतेचा हा पुरावाच होता. त्यांचे मन सुसंस्कृत होते. म्हणूनच आचार्य अत्रे यांनी त्यांच्यावर कितीही तोंडसुख घेतले तरी अत्र्यांच्या वाङ्मयाबद्दल त्यांना आदर वाटे. तो कमी झाला नाही. हायकोर्टाच्या साक्षीतही त्यांनी तसे एक वेळ सांगितले होते. या गोष्टीचा उल्लेख आचार्य अत्रे यांनी विधानसभेतील एका भाषणाचे वेळी केलेला आहे.

त्यांचे आणि माझे संबंध जिव्हाळ्याचे होते. माझ्या कुटुंबियांबद्दलही त्यांना आपुलकीची भावना होती. कधी भेटले तर माझी पत्नी ताराबाई हिच्याबद्दल विचारपूस केल्याशिवाय राहात नसत. त्यामुळे आमच्या स्नेहाला आपलेपणाची किनार लाभली होती.

## मोहन कुलकर्णी
## कऱ्हाडचे कऱ्हाडपण

...ते दंगलीचे दिवस होते. कऱ्हाडला कधी नव्हे ती दंगल उसळली आणि तिला तथाकथित पुढाऱ्यांनी जातीय दंगलीचे स्वरूप दिले. हिन्दू-मुस्लीम समाज कऱ्हाडमध्ये गेली अनेक दशके गुण्यागोविंदाने राहात आला आहे. अनेक हिंदू, मुस्लिमांच्या उत्सवात सहभागी होतात तर अनेक मुस्लीम बांधव कऱ्हाडच्या आराध्यदैवताच्या वार्षिक यात्रेत आपला सहयोग देतात. एकीच्या या पार्श्वभूमीवर झालेली दंगल ही दोन्ही समाजातील काही समाजकंटकाची कृती होती. पण शासकीय पातळीवर मात्र ती जातीय नसल्याची ठाम भूमिका होती.

ना. यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या गावी उसळलेल्या दंगलीचे वृत्त समजले. ते मनातून अत्यंत अस्वस्थ होते. कऱ्हाडला आले तेव्हा ही अस्वस्थता चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवत होती. ते आले तेव्हा दंगल शमली होती पण दंगलीच्या खुणा जागोजागी दिसत होत्या. वृत्तपत्रांतून दंगलीचे वृत्त-वार्तापत्रे येत होती. माझी एक पत्रकार म्हणून या साऱ्या घटनेकडे पाहण्याची दृष्टी सर्वांपेक्षा वेगळी होती. मी तेव्हा 'तरुणभारत' मधून दोन वार्तापत्रे लिहिली आणि ती वार्तापत्रे यशवंतराव चव्हाण यांनी वाचली होती.

कऱ्हाडच्या ऐक्याचे स्वरूप सांगताना मी लिहिले होते, कऱ्हाडला कृष्णा आणि कोयना नद्या दोन आहेत पण प्रीतिसंगम एकच आहे. गुरुवार पेठेत मनोरे दोन आहेत पण पाया एकच आहे. एकीचे दोन करण्याचा या नगरीचा स्वभाव नाही. इथल्या मातीने ऐक्यच शिकविले आहे. कृष्णा कोयनेचा प्रीतिसंगम हा अद्वैताचा परमोच्चम आदर्श या नगरीला आहे. हिंदु-मुस्लीम ऐक्यही या नगरीचे वैशिष्ट्य आहे वगैरे. ही वार्तापत्रे मोहल्यामोहल्यामधून वाचली गेली होती.

कऱ्हाडला यशवंतराव आले ते मुख्यमंत्री वगैरे बरोबर असल्याने घाईत होते. पण मी समोर दिसताच थांबले. आसपासची मंडळी थबकली.

तुमची वार्तापत्रे वाचली. तुमच्या लेखातील मुद्यांचे ठळकपण माझ्या लक्षात आले.

कोणते?

कऱ्हाडचे 'कऱ्हाडपण' आपण तपशीलवार दिलेत ते बरे झाले. ते कऱ्हाडपण जपावे ही तुमची भूमिका मला भावली. (भावली हा नेमका शब्द यशवंतरावजींचाच. आवडलीपेक्षा तो अधिक परिणामकारक आहे) इतरांपेक्षा मी वेगळ्या भूमिकेतून या घटनांकडे पाहिले आहे. सध्याच्या गरम परिस्थितीत ...

मला तिथेच थांबवत ते म्हणाले, वृत्तपत्रानी घटनांचे भांडवल करण्यापेक्षा परिस्थिती बदलण्याकडे, अधिक सुधारण्याकडे आपल्या सामर्थ्याचा उपयोग करावा. ते राष्ट्रकार्य ठरेल. तुमची वार्तापत्रे मला त्या दिशेने जाणारी वाटतात.

त्या वार्तापत्रांचे मानधन आले नाही. पण यशवंतरावांनी माझ्या भूमिकेचे केलेले कौतुक त्या मानधनापेक्षा लाखपटीने मोलाचे वाटले.

## यशवंतरावांच्या भगिनी राधाक्का
## आमचा यशवंता

लहानपणी यशवंताला खेळण्याचा खूप नाद होता. आम्ही दोघेही शाळेला बरोबर जात असू. शाळेत न जाता सोनहिऱ्याच्या काठी वाळूत यशवंता आपली पाटी पुरुन ठेवीत असे. खुणेसाठी तो मला तिथे बसवायचा. नंतर इतर पोरांबरोबर खेळायला जायचा. परत आल्यावर पुरलेली पाटी बाहेर काढीत असे. दोघं मिळून घरी परत येत असू. कधी कधी मलाही शाळेत जाऊ द्यायचा नाही व स्वतः आपणही जायचा नाही!

यशवंता घरात सर्वांपेक्षा लहान म्हणून त्याचे लाडही फार झाले व वडिलांचा मारही त्याने भरपूर खाल्ला आहे. आईने कधी फाजील लाड पुरवले नाहीत. लहानपणी अभ्यासापेक्षा मित्रांबरोबर खेळण्यातच तो अधिक वेळ घालवी. आमच्या मामाच्या घराशेजारी रामोश्यांची, मुसलमानांची वस्ती होती. त्या मुलांत तो विटी-दांडू खेळायचा. सोनहिऱ्यात डुंबत राहायचा.

आम्ही विट्याला राहात होतो, तेव्हा आमचे वडील तिथल्या जज्जांच्या घरी दूध घालण्यासाठी जात. त्यांनी आमच्या वडिलांना बेलिफाची नोकरी दिली. त्या वेळेस विट्याच्या जज्ज साहेबांची बदली कराडला झाली, म्हणून त्यांनी आमच्या वडिलांना कराडमध्ये नोकरीला घेतले. त्यामुळे आम्ही सर्वजण कराडला आलो. शुक्रवार पेठेत डुबलांच्या घरात एक खोली भाड्याने घेऊन आम्ही राहात होतो. डुबलांची आई फार प्रेमळ होती.

नंतर तो चिकाटीने अभ्यास करू लागला. त्यानेच सांगितलेला एक प्रसंग सांगते. टिळक हायस्कूलमध्ये एकदा गुरुजींनी प्रत्येक विद्यार्थ्याला उभे करून तुम्ही कोण होणार? असे विचारले. तेव्हा, टिळक, सावरकर, आगरकर अशी त्यांनी नावे घेतली. यशवंताला जेव्हा विचारले तेव्हा तो

म्हणाला "मी यशवंतराव चव्हाण" होणार. यामुळे सगळी मुले हसली, पण मास्तरांनी त्याचे कौतुक केले.

यशवंताला प्रथम अटक करून नेले तेव्हा आईला फार दुःख झाले. ती सहा महिने रडत होती. तो काही काळ भूमिगत होता. तेव्हा त्याचे नुकतेच लग्न झाले होते. घरात नवी बायको आहे म्हणून तरी तो घरी येईल यासाठी घरावर पहारा होता. त्या वेळी घराची झडती घेतली. तुरुंगातही त्याने अभ्यास चालू ठेवला. दोन परीक्षा अशाच दिल्या.

त्या वेळेस यशवंता भूमिगत होता. त्याला पकडून देणाऱ्यास एक हजार रु. सरकारने इनाम लावले होते. यशवंताला तर आईला भेटल्याशिवाय राहवत नसे. त्या वेळेस आई माझ्याकडेच राहायला होती. तेव्हा यशवंता आईला भेटण्यासाठी येई. डोक्यावर लाल उंच टोपी व घोळ गुडघ्याच्या खालपर्यंत काळाभोर कोट असा पोषाख करी. आमच्या आजूबाजूच्या मुसलमानांच्या व बाकीच्या लोकांना यशवंता रात्री घरी येतो ते माहीत होते. गरिबी असूनही कोणीच पैशाच्या लोभाने ह्या कानाची गोष्ट त्या कानाला कळू दिली नाही.

यशवंताला लवकर पकडता यावे म्हणून नानींना (सौ. वेणूताईंना) नव्या नवरीला अटक केली. आईला पण नेली. माझं तेव्हा लग्न झालं होतं, त्यांना फलटणच्या तुरुंगात टाकले. त्या वेळी माझे बंधू गणपतराव अत्यवस्थ होते. त्यातच त्यांचा अंत झाला.

नानी कमालीच्या प्रेमळ होत्या. त्यांच्याबद्दलच्या आठवणी काढीत बसावेसे वाटते. मी व त्या हरिद्वारला देवदर्शनासाठी गेलो तेव्हा बोटीतून लक्ष्मण झूला पार करून आलो, तेव्हा नानींनी अगदी घरात केल्यासारखा गरम गरम ताजा चहा मला करून दिला. सर्वांना समाधान वाटले. त्यांच्यात गर्व नावालाही नव्हता.

यशवंताला नानींचा फार मोठा आधार होता. त्या स्वतः यशवंतरावांचे पथ्यपाणी औषध, कुठल्या कार्यक्रमास कुठले कपडे घालायचे सर्व काही नोकरचाकर असताना स्वतः पाहात असत.

त्यांच्या अकाली जाण्याने यशवंताला अतोनात दुःख झाले. त्याची प्रकृती ढासळली. औषधपाणी वेळेवर होईनासे झाले. सर्व काही स्वतःस पाहावे लागे. नोकर असले तरी हरवलेल्या मायेच्या माणसाची सर त्यांना कशी येणार? नानीची आठवण येताच अगर एखाद्याने काढताच त्याच्या डोळ्यात पाणी येई.

## सौ. लिलाबाई बाबूराव काळे
## आमचे काका : यशवंता

माझे वडील गणपतराव यांना मोठे काका, आणि चुलते यशवंतराव यांना धाकटे काका म्हणत असू. आमचे एकत्र कुटुंब होते, माझे मोठे चुलते दादा हे बेचाळीसच्या चळवळीतच ऑपरेशनमध्ये वारले. त्यांची तीन मुले, नानी (चुलती), आई (आजी) असे १०-१२ माणसांचे मोठे एकत्र कुटुंब होते. पूर्वी आमच्या घरची फार हालाखीची परिस्थिती होती, असे आई, नानी सांगत. पण माझे मोठे काका नोकरी सोडून व्यापारधंदा करू लागल्यापासून मला कळते असे घर चांगले चालले होते. धाकटे काकाही आमदार झाल्यावर मुंबईला साहेब झाले होते. त्यामुळे आम्ही मुले कराडात मोठ्या मजेत राहात असू. पण मोठे काका क्षयाने आजारी पडले व ते म्युनिसिपसलिटीचे प्रेसिडेंट असतानाच वारले. मी त्या वेळी दहा-बारा वर्षांची होते. मला थोडे कळत होते परंतु माझे तिन्ही लहान भाऊ सात-पाच-दोन वर्षांचे असतील. धाकटे काका, आई एकमेकांना धीर देऊन दुःख सावरीत. आता धाकटे काका मुंबईला होते. कराडचा सारा प्रपंच त्यांचेवर पडला. मोठ्या काकांच्या पाठोपाठ माझी आईही दोन वर्षांत क्षयाने वारली. आम्ही अगदी पोरके झालो. आई (आजी) आणि धाकट्या काकांनी आमचा सांभाळ केला. आता धाकटे काकाच आम्हाला वडिलांचे ठिकाणी होते. ते कराडला आले की, आम्हा सर्व मुलांना पोटाशी धरून कुरवाळीत, आम्हाला प्रेमाने काय हवे ते देत. त्यांनी आमची आई-वडिलांची उणीव भरून काढली.

आमचे काका बावन्न साली मंत्री झाले. त्यांनी मला मुंबईलाच राहावयास नेले. माझा आनंद तर गगनात मावेना. तसे आम्ही पूर्वी सर्व मुले सुट्टीत मुंबईला जात असू. पण मरीन लाईनच्या फ्लॅटमध्ये गर्दीच व्हायची. आता विंटर रोडच्या बंगल्यात नाचायला, बागडायला मोठे

आवार होते. उन्हाळी सुट्टीनंतर माझे भाऊ कराडला शाळेसाठी परत गेले. मला काकांनी मुंबईच्याच शाळेत घातले. ताई माझ्या शाळेचे सर्व काही करीत. मी इंग्रजी शाळेत जात असल्याने मला मोठी मजा वाटे. आता चोवीस तास काकांचे जवळ मी असे. सिनेमा बघायला मिळावा म्हणून काकांशी भांडत असे, मग काका दौऱ्यावर गेले की, मी ताईबरोबर सिनेमाला जात असे. एकदा ताई काकांसह आम्ही सर्वजण झाशीची राणी सिनेमा पाहावयास गेलो, त्यानंतर काका मला लाडाने 'मनू' म्हणू लागले. झाशीच्या राणीचे नाव लहानपणी 'मनू' होते हे मला सिनेमा पाहिल्यावर कळले. काका मला 'मनू' म्हणून हाक मारू लागले की, मोठी गंमत वाटायची. मी लाडाने त्यांना सतावीत असे. त्या वेळी मी तर अगदी सुखाच्या शिखरावर होते. दुसऱ्या वर्षी माझ्या धाकट्या भावाला अशोकला बोर्डीला शाळेत घातले. काकांना मुलांवर लक्ष ठेवता येत नाही म्हणून माझ्या धाकट्या दोन्ही भावांना राजा, दादांना पुण्यात मॉडर्न हायस्कूलमध्ये घातले. एक चुलतभाऊ कॉलेजला होता. फक्त धाकटा चुलतभाऊ कराडला आईजवळ होता. काकांना मंत्री म्हणून काम होते, तरी आम्हा साऱ्या मुलाबाळांची त्यांना सारखी काळजी वाटत असे. तेच आमच्या मोठ्या एकत्र कुटुंबाचे पालनकर्ते होते.

माझे लग्न काकांनी खूप मोठ्या हौसेने घरासमोरच्या पटांगणात केले. काका मंत्री असल्याने तर लग्नाला एवढी मोठी गर्दी होती की, सारे मैदान गच्च भरले होते. काकांना जावई वकील आहे त्यापेक्षा तो स्वातंत्र्यसैनिक आहे, याचा मोठा अभिमान वाटे. माझ्या लग्नात काकांनी कुणाकडूनही आहेर घ्यावयाचा नाही हे आधीच जाहीर केले होते. तसे काका शेवटपर्यंत वागले. माझे सासर कराडातच होते तरी मी सासरी जाताना, ताई काका मला पोटाशी धरून इतके रडले की, माझेही अंतःकरण कालवले, माझ्याही अश्रुधारा आटेनात, काकांना त्या वेळी मोठ्या काकांची आठवण झाली. त्यांनी हे लग्न पाहायला हवे होते असे ते म्हणाले. काकांनी केलेले आमच्या घरचे हे पहिलेच लग्न होते.

काकांना, मला खूप काही करावेसे वाटे. रीतिरिवाजाप्रमाणे त्यांनी सारे केले. परंतु माझे पतींचा स्वभाव थोडा मानीच होता. त्यांना काकांचेकडून संसाराला मदत घेणे आवडत नसे. त्यामुळे मी जे मिळवतो त्यातच मी संसार केला पाहिजे असे त्यांना वाटे. काकांना या गोष्टीचा एका बाजूने आनंद वाटे, तर दुसऱ्या बाजूने मला एवढे त्यांनी लाडात वाढवले तसे मला चांगल्या परिस्थितीत राहता यावे म्हणून त्यांचे अंतःकरण तुटत असे. यांनी नंतर काकांचे इच्छेविरुद्ध सरकारी नोकरी धरली म्हणून ते काकांशी तुटकच वागत. परंतु काका मी सांगली, औरंगाबाद, पुणे इथे असताना आणि ते मंत्री, मुख्यमंत्री होते तरी आपल्या साऱ्या व्यापात माझ्या घरी तासभर आल्याशिवाय त्यांचे समाधान होत नसे. तशी मी बंगल्यावरही जाऊन त्यांना भेटत असे, पण मला घरात येऊन भेटल्याचा त्यांना फार आनंद होई.

काका दिल्लीशला गेले तरी मी माझ्या मुलाबाळांसह वर्षातून एकदा तरी त्यांच्याकडे राहिल्याशिवाय त्यांचे समाधान होत नसे, आणि तेथून निरोप घेताना ते इतके अस्वस्थ होत की, कधीकधी त्यांचे डोळ्यातून अश्रूही येत! काकांच्या या प्रेमामुळे मला माझ्या आईवडिलांची कधीच आठवण येत नसे. माझ्या धाकट्या भावंडांना तर आईवडील कसे होते हेही माहीत नव्हते. आमचे ताईकाकाच त्यांचे आईबाप होते. काकांनी तसे आमचेवर अखेरपर्यंत प्रेम केले.

आमचे काका महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. एकसष्ट साली माझ्या दोन्ही मोठ्या भावांची लग्ने ठरली, काकांचे नंतर चव्हाणांचे घरातील मुलांचे हे पाहिलेच लग्न, ताईकाकांचा उत्साह एवढा मोठा होता की, लग्नातील प्रत्येक बारीकसारीक गोष्ट त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली केली. शिवाजी विद्यालयात भला मोठा टोलेजंग मांडव घातला होता. हजारो माणसांनी सारे कराड फुलले होते. गव्हर्नर श्रीप्रकाश खास लग्नासाठी आले होते. आईचे (आजी) तो खास सोहळा पाहून डोळ्याचे पारणे फिटले.

गव्हर्नर श्रीप्रकाश यांची एकदा कराडला भेट होती. त्या वेळी ते आमच्या घरी जेवायला येणार होते. त्यांना महाराष्ट्रीय पद्धतीचे जेवण हवे होते म्हणून पुरणपोळीचा स्वैपाक केला होता. श्रीप्रकाशांना काकांचे घर बघायचे होते, त्यांनी (काकांनी) गव्हर्नर आल्यावर गोंधळ करावयाचा नाही, शांतपणानं वागायचे असे आम्हाला सांगितले. आईलाही सांगून ठेवण्यास सांगितले. जेवणखाण झाल्यावर श्रीप्रकाश आईला नमस्कार करू लागले तसे आईने कमरेचा एक रुपाया काढून गुपचूप त्यांचे हातात दिला."कुणाला सांगू नका, जा बाबा आता." असे ती म्हणाली. आम्ही आईला ब्राह्मण जेवायला घालतेस तसे वागायचे नाही असे सांगूनही, आईनं गव्हर्नर श्रीप्रकाशनाही तसेच केले. काकांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी कसाबसा खुलासा केला, पाहुण्यांना घालवल्यानंतर आम्ही काका, आईची खूप थट्टा करीत हसत राहिलो.

आमची आई बाळबोध वळणाची होती. ती कराडला राहणे पसंत करी. काका मंत्री असताना कऱ्हाडला आले की, घरात राजकारणाच्या गप्पा रात्ररात्र चालत.एकदा रात्री अकरा वाजता आई बाहेरच्या दाराजवळ आली तर बाहेर पोलिस पहारा करीत असल्याचे तिला दिसले. आईने त्यांना विचराले, "का उगाच ताटकळत उभे राहिलाय? झोपा की आता?" आणि घरात येऊन मला सांगितले, "पोलिसांना सतरंजी, उशी नेऊन दे, त्यांना झोपू दे." आईचे हे आत बाहेर सरू असता, काका बाहेर आले आणि चौकशी केल्यावर पोलिसांना म्हणाले, "आमची आई तुम्ही झोपल्याशिवाय झोपणार नाही, तुम्ही झोपा." साहेबांनी सांगितले म्हणून पोलिस झोपले. नंतर रात्री एक वाजता इन्स्पेक्टर राऊंडला आले असता, पोलिसांना लाथा मारून उठवू लागले व बडबडू लागले, "अशीच ड्यूटी करता का?" काका बाहेर आले, त्यांना बाहेर काही तरी गडबड चालली आहे हे कळले, त्यांनी बाहेर येऊन फौजदाराला सांगितले, "पोलिसांची काही चूक नाही, आमच्या आईला पोलिस उगाच ताटकळत बसलेत असे वाटले, पोलिस झोपल्याशिवाय ती झोपणार नाही म्हणून

मीच पोलिसांना झोपावयास सांगितले.” आई अनेकवेळा काकांना भेटायला, काम सांगायला आलेल्या माणसांना घेऊन त्यांच्या कामाबद्दल आग्रह धरत असे. काकांना त्याचे काही वाटत नसे. पण आईला हा त्रास होत असे, म्हणून काका लोकांना आईला त्रास न देण्याबद्दल सांगत.

आमच्या काकांच्या डुबल आळीतील जुन्या घरात बैठकीची खोली अगदी भारतीय पद्धतीची असायची, तीन चार गाद्या, दहा बारा तक्के ठेवलेले असत. घरातही आम्ही सारी जमिनीवर अंथरूण टाकूनच झोपत असू. कॉट वगैरे काही नव्हते. साधी खुर्ची टेबलही नव्हते. एकदा काकांचा कराडला मुक्काम असताना, डी.आय.जी. कामटे काकांना घरी भेटायला येणार होते, काकांना काय वाटले कुणास ठाऊक पण घरात एकदम म्हणाले, “पोलिस खात्याचा मुख्य साहेब येतोय, त्यांना बसायला एखादी खुर्ची तरी आणा.” मग धावपळ करून समोरच्या वाड्यातील एक खुर्ची आणून ठेवली. आम्हाला मोठी गंमत वाटली.

एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत काकांचा मुक्काम महाबळेश्वरला होता. आम्हा साऱ्या मुलांनाही तेथे आणले होते. काका बाहेरच्या लोकांच्या भेटीगाठी बंद करून घरातल्या सर्वांशी गप्पागोष्टी करण्यात एखादा दिवस घालवत. प्रत्येकाची चौकशी करीत. पाठीमागच्या आठवणी काढून थट्टामस्करी होत असे. संध्याकाळी काकांचेसह आम्ही तळ्याच्या बाजूला फिरायला गेलो. कुठेतरी भजी तळल्याचा खमंग वास आला. काकांनी भजांची नुसती आठवण काढली, परत बंगल्यावर जाऊन बाहेर खुर्च्या टाकून बसेपर्यंत ताईंनी कुणाकडून तरी तिथले भजी भरलेले ताट आणले. मग काका सांगू लागले, ‘लहानपणी शाळेत असताना दादा (काकांचे थोरले बंधू) कराडच्या कोर्टात बेलीफ होते. मी शाळा सुटली की, सरळ दादांकडे जायचो, मग दादा मला जिरंग्याच्या हॉटेलमध्ये नेऊन भजी देत असत. मला तर भजी खायची सवयच लागली होती. त्यामुळे भजी तळतांना वास आला की, तोडाला पाणी सुटते, दादांची आठवण येते.’

सातारला जिल्हा परिषदेत माझे मिस्टर सभापती असता फिरतीवरून आल्यावर अचानक आजारी पडले. कावीळ झाली. डॉ. पांगरेंच्या हॉस्पिटलमध्ये ठेवले. रोज मला व डॉक्टरना काकांचे फोन येत. एके दिवशी उचकी लागली ती थांबेना, पावसाळ्याचे दिवस होते. काकांनी पुण्याहून डॉ. ग्रँटना रात्री नऊ वाजता पाठवून दिले आणि दुसरे दिवशी भेटायला येतो असा मला निरोप पाठवला. मी अगदी गोंधळून गेले होते पण काकांनी मला धीर दिला.

माझी दोन तीन वेळा अचानक ऑपरेशन्स झाली. काका दिल्लीत. त्यांचे खाण्या-पिण्यावर लक्ष नसायचे. घरात बसून फोनवर सारखी माझी चौकशी करावयाचे, आणि ताबडतोब मला कसे भेटता येईल हे ठरवायचे. मला भेटून मी आजारी असल्याचे कळल्यापासून त्यांची काय अवस्था होत होती हे सांगत बसायचे. मी ऑपरेशनमधून बाहेर आल्याचे कळले की त्यांना समाधान वाटायचे. मला ते ताबडतोब महिना पंधरा दिवसाच्या विश्रांतीसाठी आपल्याबरोबर घेऊन जायचे.

गेल्या वर्षी काकांची व माझी शेवटची भेट मुंबईत झाली. आम्ही दोघेही मुंबईला गेलो होतो. मुलीच्या घरी थांबलो होतो काका मुंबईत आल्याचे समजल्यावर मी व माझा भाऊ अशोक, काकांना भेटण्यास रिव्हेरावर गेलो. काकांशी मी तासभर गप्पा मारल्या. हे एकटेच काकांना नंतर भेटायला येणार होते, अशोकने माझी थट्टा केली. काका एकदम मोकळेपणाने खळखळून हसले. ते त्यांचे माझ्या डोळ्यासमोर शेवटचेच हसणे ठरले. मला म्हणाले, “तुझ्या मुलाची काळजी करू नकोस, तो माझ्याजवळच दिल्लीला आहे.” दुसरे दिवशी काका दिल्लीला गेले, आम्ही कराडला आलो आणि दोनच दिवसात काका आजारी असल्याची बातमी रेडिओवर ऐकली! फोनने चौकशी करेपर्यंत ते आम्हाला सोडून गेले होते! मला आकाश कोसळल्यासारखे झाले!

वाय ४१-२८

# श्री. बाबूराव कोतवाल
# मंतरलेले अनुभव

माझे सारे पालनपोषण मामांनी केले. मामांच्या घरातूनच लहानाचा मोठा झाल्यामुळे मामांना जवळून पाहण्याची संधी मला मिळाली.

ते दिवस काँग्रेस सेवादलात जाण्याचे होते. मी १० वर्षांचा होतो. १९३९-४० साली काँग्रेसचे प्राथमिक सदस्यत्वाची नोंदणी करण्याचे काम सुरू होते. मामांना म्हणालो, “मी सभासद करतो. मला पुस्तक द्या.” ४ आणे सभासद फी होती. सभासद करण्याचे मामांना सांगून बसलो होतो. ५ करता करता पंचाईत झाली. शेवटी ५ सभासदांची वर्गणी सव्वा रुपया मामांकडे सुपूर्द केली. शाबासकीची पहिली थाप पाठीवर पडली.

इंग्रजी ४ थी मध्ये असताना समजले की, मामा ए.आय.सी.सी. मध्ये गेले आहेत आणि चळवळीचे रणशिंग फुंकले आहे. आम्हीही त्यात सामील व्हावयाचे ठरविले. काँग्रेसच्या नेत्यांमागे इंग्रजांचा ससेमिरा सुरू झाला. मामा कराडला येणार असल्याचे समजले. बाबुराव काळे, गजानन पावसकर अशी आम्ही मंडळी गुपचूप स्टेशनावर गेलो. बाळकृष्णबुवांचा मठ आहे तेथे मामांना आणून ठेवले.

म. गांधी, नेहरूंना अटक झाली. काय करायला हवे ते ठरविले. शांताराम बरड, जयंती गुजर यांनी शाळा सोडावी असे ठरविले. मग बुलेटिन्स काढली. टेलिफोन्सच्या तारा तोडणे, सरकारी मालमत्ता लुटणे वगैरे कार्यक्रम ठरविले मामा भूमिगत होते. कराडवरून ढेबेवाडी रस्त्यावर विंगाचे पाण्याची टाकी होती तेथे लपून बसलो. टपालाची पिशवी घेतली व आगाशीनगर डोंगर चढलो. मनिऑर्डरचे १४५ रुपये मिळाले. ते घेऊन जखीनवाडीला आलो. तोपर्यंत पोलिसांचा फोन गेला होता. कार्वे, कोरेगाव, टेंबू करीत परतलो. पैसे मामांच्या स्वाधीन केले.

मामांनी कार्यकर्त्यांची विचारपूस केली व पैसेवाटप केले. कार्यकर्त्यांबद्दल अपार प्रेम व आपुलकी हे मामांचे मोठेच वैशिष्ट्य होते.

कामेरीचे के. डी. पाटील याचेकडे चळवळीला दिशा देण्यासाठी बैठक होती. परतताना केडींनी साहेबांना सायकल दिली. साहेब सायकलवरून परतले. सायकल कामेरीला नेण्याचे काम माझेवर आले. एक पत्रही मामांनी दिले होते. पत्र इंग्रजीत होते. वाटेत उत्सुकतेने वाचले. एक वाक्य कायमचे घर करून बसले आहे."आपण अत्यंत सुखरूप पोहोचलो." असे मामांना सांगायचे होते.

कराडमध्ये मोठा मोर्चा आयोजित करायचे ठरविले होते. पत्र येऊन बाळासाहेब उंडाळकरांकडे जायचे होते. मोर्चा निघाला. तांबवे, इंदोली, वगैरे भागातूनही लोक आले होते. बाळासाहेब उंडाळकरांना अटक करण्यात आली. मामांच्या कानावर घातले, तेव्हा ते ओगलेवाडीच्या व्यंकटराव ओगल्यांकडे राहात असत. पुसेसावळीला जायचे होते. बैलगाडी व गाडीवान घेऊन निघालो. शामगावच्या खिंडीत गाडी वेडीवाकडी होत होती. गाडीत बसायला भीती वाटत होती. मामा उतरून पायी चालत होते. मला गाडीत बसवेना. मामांनी खांद्यावर घेतलं आणि वाघेरीपर्यंत आणलं.

मोर्चा झाला, गोळीबार झाला, त्यात अनेकजण मृत्यूमुखी पडले. त्यांच्या मृत्यूची माहिती घ्यायला आयाचित वकिलांकडे मला पाठविले. अंधार पडता पडता आयाचित वकिलांच्या घरासमोर उभा राहिलो. पोलिसांची नुकतीच धाड पडली होती. आयाचितांना अटक झाली होती. नानासाहेबांना भेटायला मी आलोय हे कळल्याबरोबर त्यांचे वडील घाबरले. मला गंजीआड लपायला लावलं. पहाते तीन-साडेतीन वाजता औंधांच्या रायगावकर देशपांडे यांच्याकडे जायचं होतं. आता फार काळ मला इथं ठेवून घेणं धोक्याचं होतं. पहाटेची वेळ होती. रस्ता ठाऊक नव्हता. औंधाचा हत्ती दिवा वडूजला निघाला होता. अंधारात घंटेचा आवाज व प्रकाशणारा दिवा पाहून मला भीती वाटू लागली. जसजसा

आवाज जवळ येऊ लागला, तसतसा मी घामाने डबडबत होतो. भुताच्या भीतीने बोबडी वळली होती. गलितगात्र होऊन खाली पडलो. हत्तीबरोबरच्या म्हाताऱ्याने मला उठवलं, चौकशी केली, पाणी पाजलं, रायगावकर देशपांड्यांकडे जायचं आहे असे त्याला समजल्यावर त्याने आपल्या पोराला मैल, दोन मैल रस्ता दाखवायला सांगितले. रायगावकर देशपांड्यांच्या घरात पोहोचलो आणि समजलं त्यांची दोन्ही मुले गोळीबारात जखमी झाली आहेत. पाय वळले होते. तरी फार काळ तिथं थांबणं बरोबर ठरले नसते. माहिती गोळा केली. औंधावरून रहिमतपूर करीत कराड गाठले. मामांना हकिकत सांगितली. कार्यकर्त्यांकडे पैसे पोहोचते करण्यात आले.

मामांच्या सांगण्यावरून किसन वीरांकडे कवठ्याला पिस्तूल, काडतुसं व पत्र पोहोचतं करायचं होतं. कवठ्याला कसं जायचं हे ठाऊक नव्हतं. वाठार स्टेशनला पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. एक ट्रक त्या बाजूकडे निघाला होता. जोश्यांच्या विहिरीकडे सोडायला त्याला विनवलं. ५-६ मैलांवर शिरगावच्या घाटात गाडी बंद पडली. सरळ उतरून चालायला सुरुवात केली. २-३ फर्लांगावर घुंगराचा आवाज ऐकू येऊ लागला. बैलगाडी येत होती.

गाडीवानाने चौकशी केली. किसन वीरांकडे जायचे आहे हे कळल्याबरोबर आपल्यापैकी एकजण बरोबर दिला. सामान्य गाडीवानापर्यंत चळवळ कशी पोहोचली होती त्याचं प्रत्यंतर आलं. पिस्तूल, काडतुसं किसन वीरांकडे पोहोचती केली. रात्री भुईंजला बैठक होती. ती आटोपल्यावर परत फिरलो. आल्यावर पाठीवर थाप पडली...

कराडची चावडी जाळण्याचा कार्यक्रम पार पडला होता व आता शिरवड्याचे स्टेशन जाळण्याचा निर्णय घेतला होता. तांबवे, कराड कुंडल चरेगाव अस ४ कार्यकर्ते जमले. अंधार पडला. कासेगावकर वैद्य, सदाशिवराव पेंढारकर पुढे झाले. स्टेशनमास्तरला संशय आला. त्याने कराडला फोन केला. तोवर आम्ही धाड घातली होतीच. ७ बंदूका

मिळाल्या. मी, बाबूराव काळे, शांताराम इनामदार, गजानन पावसकर, गणपतराव चव्हाण, बभ्रुवाहन जाधव, माधवराव पवार आदी मंडळी बंदुका घेऊन निघालो. पोलिस वाटेत गाठणार या भीतीने वाटेतच एक खड्डा खणला, माती टाकली व परेड करीत कोपर्ड्यातून बाहेर पडलो व सैदापूर गाठले. दुसऱ्या रात्री जाऊन बंदुका आणल्या.

शांतारामबापू इनामदारांबरोबर पुण्याला जायचे होते. मामा तिथे लॉजवर गुपचूप उतरले होते. मी मामांना भेटून आल्याचा सुगावा पोलिसांना लागताच मला अटक केली. २७ दिवस छळ करण्यात आला. जीव गेला नाही एवढेच! कमरेच्या वरचा भाग फोडून निघाला होता. मामांचा पत्ता मी सांगत नव्हतो. एवढ्यात शिरवड्याचा खटला सुरू झाला. त्या वेळी १८ वर्षाखालच्या पोरांना केनिंगची शिक्षा असे. त्या जबर शिक्षेमुळे अपंगत्व येत असे. साहेबांचा निरोप मिळाला. वय जास्त लावून द्या. तसं केलं. पुणे, विसापूर, शहापूर अशा तुरुंगातून डांबण्यात आलं.

आम्ही २४-२५ आरोपी खटल्याच्या वेळी जेलमधून कोर्टाकडे जाताना गाणी गात असू. महात्मा गांधींच्या घोषणा देत असू. आमची केस शिराळकर वकिलांकडे होती. वाटेत लोकांनी आम्हाला देऊ केलेले पेढे, बर्फी पोलिस घेऊ देत नसत. कोर्टापुढे शिराळकरांनी ही गोष्ट नजरेला आणून दिली. पुढे आमच्या पोटाचा प्रश्नस तुरुंगात असताना सुद्धा अशा प्रकारे सुटला. लोकांच्या मनात पेटलेली इर्शा व स्वातंत्र्याची ऊर्मी अशा अनेक प्रसंगांतून अनुभवण्यास येत होती.

## बाबूराव काळे
## मामासाहेब-यशवंतराव

मी कराडला टिळक हायस्कूलमध्ये शिकत होतो. मराठी शाळेत श्री. कुंभार गुरुजींकडून काँग्रेसचे संस्कार झाले होते. त्यामुळे काँग्रेसचा एक तरुण नेता म्हणून यशवंतरावांचेबद्दल मला कुतूहल आणि प्रेम वाटे. विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यासाठी कारावास भोगल्याचा अभिमान वाटे. माझे गावी गांधीजयंतीचे कार्यक्रमासाठी १९४१ साली यशवंतरावांना आमंत्रण देणेसाठी सकाळीच मी त्यांचे घरी गेलो, यशवंतराव त्या वेळी नुकतेच एल्.एल्.बी झाले असतील. वकिली सुरू करण्याच्या बेतात असतील, मारुतीबुवाच्या मठाजवळील दोन खोल्यांत त्यांचे कुटुंब राहात होते. यशवंतरावांना प्रथमपासूनच जागरणे करण्याची सवय होती. त्यामुळे ते उशीरा उठत असत. शेजारच्या खोलीत झोपलेत त्यांना उठवून भेटा असे मला सांगितले. मी दार ढकलून आत गेलो तर यशवंतराव एक गोधडी (वाकळ) पांघरून गाढ झोपल्याचे दिसले. मला प्रथम आश्चर्य वाटले, एक वकील वाकळ पांघरून झोपला आहे? मला त्यांच्याबद्दल अधिक आदर वाटू लागला.

बेचाळीस साली ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात भूमिगत अवस्थेतील डुबल आळीतील त्यांची भेट तर आम्हा ४०-५० तरुणांना स्फूर्तिदायक होती. ते आम्हा तरुणांचे नेते होते, कराडमध्ये बेचाळीसचे चळवळीत जेवढे विद्यार्थी सामील झाले तेवढे जिल्ह्यात दुसऱ्या कुठल्याही शहरातून झाले नव्हते.

यशवंतराव येरवडा तुरुंगात स्थानबद्ध होते. आम्हाला एका बराकीतच ठेवले होते. यशवंतराव त्या वेळी सिगारेट्स ओढीत असत. एकदोनदा त्यांचे लक्षात आले की, आपले पाकिटातील सिगारेट्स कोणीतरी चोरून ओढीत आहे. एक लहान वयाचा कार्यकर्ता त्यांचे समोर सिगारेट

ओढायला लाजत असे; पण तुरुंगात सिगरेट मिळाली की चोरून ओढायची त्याला लहर येत असे. यशवंतरावांनी हे ओळखले आणि त्या कार्यकर्त्याला त्यांनी सिगरेट घ्या असे म्हटले. तो कार्यकर्ता इतका शरमला की, पुन्हा त्याने चोरून सिगरेट ओढली नाही.

बेचाळीसचा लढा १९४६ साली संपला. मी तुरुंगातून बाहेर आलो. विशेष म्हणजे तुरुंगातूनच मॅट्रिकची परीक्षा दिली होती, त्यात पासही झालो. यशवंतरावांना भेटलो त्या वेळी त्यांनी सांगितले आता चळवळ बंद. कॉलेजचे शिक्षण पुरे कर.

मी पुण्याला कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असेन, यशवंतराव त्या वेळी पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. एक दिवस अचानक माझे खोलीवर आले. यशवंतरावही कॉलेजला असताना टिळक रोडवर तिथेच जवळपास राहात होते, त्यामुळे माझे राहणेचे ठिकाण त्यांना लक्षात राहण्यासारखे होते. त्या वेळी त्यांचे थोरले बंधू क्षयाने वारले होते. कुटुंबाचा ते एकमेव आधार होते. त्यामुळे त्यांना घरी मोकळेपणाने रडणेही शक्य नव्हते. बंधूंच्या मृत्यूच्या आठवणीने अक्षरशः अर्धा तास ते अश्रू ढाळीत होते. त्यांना कसे आवरावे याचे मलाही भान राहिले नाही. नंतर आम्ही त्यांचे मित्र दयार्णव कोपर्डेकर यांच्या घरी गेलो.

१९५२ च्या अखेरीस मी बार कौन्सिलचे परीक्षेस मुंबईस गेलो त्या वेळी विंटर रोडचे त्यांचे बंगल्यावरच आठ दिवस थांबलो होतो. येताना तर रात्री बारा एक वाजेपर्यंत आम्ही दोघेच राजकारणाच्या आठवणी आणि इतर गप्पा मारीत बसलो होतो. त्यांचा निरोप घेऊन येताना पुण्यात दोन दिवस थांबलो. तिथे मित्रांचे बरोबर एका सेवानिवृत्त मामलेदाराची मुलगी पाहिली. घरच्या माणसांना दाखविण्यासाठी त्या मुलीचा फोटोही घेऊन आलो होतो. माझे मित्र बाबूराव कोतवाल यांचे घरात त्यांचे आक्कांनी चौकशी केली आणि विचारले, "आमचे गणपूची मुलगी का बघत नाहीस?" मी म्हटले, "पाहू. अजून कुठे काय ठरले आहे? घरच्यांच्या आग्रहासाठी मुली पाहणेचा कार्यक्रम तर सुरू केला आहे. त्या वेळी

रामानंद भारती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि किसन वीर व वसंतदादा पाटील हे सेक्रेटरी होते. त्या सर्वांची इच्छा मी जिल्हा लोकल बोर्डाचे चीफ ऑफिसरची नोकरी स्वीकारावी अशी होती. त्या वेळी सातारा लोकल बोर्डाचे चीफ ऑफिसर नुकतेच निवृत्त झाले होते. माझेसाठी पाचसहा महिने ती जागा भरली नव्हती. नोकरी करावयाची नाही हा माझा ठाम निर्णय होता. एक स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ता म्हणून माझेबद्दल सर्वांना प्रेम होते. नात्यातील एक मुलगी पसंत होती, परंतु नाताळात चुतले वारल्याने पसंती कळविता आली नाही. तेवढ्यात यशवंतरावांचा मुंबईहून फोन आला. थोडे प्राथमिक फोनवर बोललो आणि त्यांनी कराडला भेटायला येतो असे सांगितले. माझ्या मनात कल्पनाही नव्हती, आम्ही सातआठ दिवस अनेकदा गप्पा मारीत बसलो होतो. त्यांच्याही मनात हा विषय नव्हता. कराडला आलेवर मला बोलावून घेतले. आम्ही दोघेच होतो. त्यांनी पहिला प्रश्न विचारला, "तू चीफ ऑफिसरची जागा स्वीकारणार आहेस काय?" मी स्पष्टपणे सांगितले, "त्याबाबत मी सर्वांना नकार दिलेला आहे, त्याची चर्चा करू नये असे वाटते." ते म्हणाले, "ठीक, तू चीफ ऑफिसरची जागा स्वीकारणेचे मान्य केले असतेस तर मी लग्ना चा विषय काढणार नव्हतो. कारण साडू प्रेसिडेंट आहे आणि जावई चीफ ऑफिसर हे मला त्रासाचे झाले असते." नंतर मुलगी केव्हा पाहणार असे विचारले. मी आपले बंगल्यावर आठवडा राहिलो, एकत्र बसलो-उठलो, जेवलो आहे, तेव्हा आता नव्याने पाहून काय पसंत करावयाचे आहे? मी मुलगी पसंत म्हटले आणि दोघांतच माझे लग्न ठरले. २३ एप्रिल १९५३ रोजी मी यशवंतरावांचा जावई झालो.

१९५२ च्या निवडणुकीत केवळ यशवंतरावांचे शब्दाखातर मी बाळासाहेब देसाई यांच्या निवडणूक प्रचारासाठी भागात गेलो. त्या इंग्रजी रावसाहेबांनी पाटण तालुक्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांचा छळ केला होता म्हणून माझा त्यांचेवर राग होता. काँग्रेसचे काम पाटणमध्ये

करण्याऐवजी कराडमध्ये केलेले काय वाईट अशी माझी भूमिका होती. त्यामुळे पाटणला गेलो नव्हतो. बाळासाहेब देसाई अवघ्या ९१ मतांनी निवडून आले. मी गेलो नसतो तर काही हजारांनी त्यांचा पराभव झाला असता. प्रथमतः त्यांनी कृतज्ञता दाखविली पण यशवंतरावांचा जावई म्हणून पुन्हा त्यांचा मत्सर पेटला. त्यामुळे माझे राजकीय भवितव्य सीमित झाले होते. त्यातच संयुक्त  महाराष्ट्राची चळवळ, सर्वच संकटात. त्या वेळी कराडला "विचार" नावाचे साप्ताहिक सुरू केले. १९५७ च्या निवडणुकीत सर्व वेळ दिला. परंतु वकिली आणि संसार बसला.

मी काही दिवस मुंबईला गेलो, यशवंतराव त्यांना एखादी गोष्ट पसंत नसेल तर ती करू नको असे सांगत, परंतु काय करावे हे कधी सांगत नसत. एका दृष्टीने त्यांचे बरोबर होते, ज्याचा त्यानी निर्णय घेऊन वागणे हेच खरे! एकेकाळी नोकरी करावयाची नाही हे ठाम निर्धाराने सांगणारा मी संसाराचे जू मानेवर बसल्यावर वेळेला नोकरी करण्याचा निर्णय घेतला. मनपसंत नोकरी मिळवणेत दोन वर्षे गेली. १९५९ साली रतुभाई आदानी स्थानिक स्वराज्य मंत्री असताना जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी सार्वजनिक कार्यकर्त्यामधून घ्यायचे ठरले. मी प्रयत्न केला, मला इंटरव्ह्यूला बोलावले, यशवंतरावांना हे समजले, ते अस्वस्थ झाले. मी इंटरव्ह्यूला मुंबईला गेलो, त्या वेळी त्यांचे बंगल्यावर न उतरता गिरगाव लॉजमध्ये उतरलो. तिथे मला मामासाहेबांचा निरोप आला की, मी मुलाखतीस जाऊ नये आणि ही नोकरी स्वीकारू नये. त्या वेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे वातावरण तप्त होते. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी आपल्या जावयास डेप्युटी कलेक्टरची नोकरी वशिल्याने दिली म्हणून त्यांचेवर तुफान टीका झाली असती, असे त्यांना वाटले, त्यामुळे त्यांचा मला विरोध होता. शिवाय मी नुकतेच यशवंतरावांचे पहिले चरित्र प्रसिद्ध केले होते. त्यात संयुक्तव महाराष्ट्र समितीवर टीका होती त्यामुळे विरोधकांना यशवंतरावांचेवर राग काढायला ही संधी चालून आली होती.

मी निर्णय घेतला, मामासाहेबांचे ऐकायचे नाही. त्यांना भेटायचे देखील नाही. मी जर माझ्या पात्रतेने एखाद्या पदाला योग्य असेन तर नातेवाईक म्हणून यांचा विरोध का असावा ? आणि खरोखरीच द्विभाषिक मुंबई राज्यात त्या वेळी जे १५ पंचायत ऑफिसर डेप्युटी कलेक्टरचे ग्रेडवर घेतले त्यात माझ्यासह ३-४ च खरे सार्वजनिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्य सैनिक होते. वयाची आणि पदवीची अट होतीच. बाकीचे निवडलेले, कुणाचा बाप पुढारी, तर कुणाचा भाऊ पुढारी म्हणून, त्यांचा सार्वजनिक कार्याशी काही संबंध नसता ते निवडले होते. मी ताबडतोब सांगलीला हजर झालो तर समितीचे आमदार नागनाथ नायकवाडी, जी.डी. लाड, वाय.सी. पाटील यांनी तर माझे अभिनंदन केले. दत्ता देशमुख भेटले असता ठीक झाले असे म्हणाले. एस. एम. जोशी आणि मी येरवड्यात एकत्र होतो, त्यामुळे मला कुणाची भीती वाटत नव्हती. प्रथम काही दिवस यशवंतरावांची मात्र झोप उडाली होती. पुढे माझे संदर्भात यशवंतरावांचेवर कसलीही टीका झाली नाही त्यामुळे ते निर्धास्त झाले. टीका झाली असती तर नोकरी कस्पटासमान समजून मी नोकरीचा राजीनामा दिला असता. आता संसार सुरळीत चालू होता.

जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम करताना समाधान होते तरी मामासाहेबांच्या इच्छेविरुद्ध आपण वागलो याची खंत होती. तेव्हा ज्या वेळी आपण अडचणीतून बाहेर आलो असे वाटेल त्या वेळी नोकरीचा राजीनामा द्यावयाचा असे मी ठरवले होते. त्याप्रमाणे १९६७ साली मी राजीनामा देणार असे मामासाहेबांना सांगितले त्या वेळी राजीनामा देऊ नये असा त्यांनी सल्ला दिला. परंतु माझा निर्णय कायम असलेने मी राजीनामा दिला. मी जिल्ह्यात परत आल्यावर माझे संदर्भात यशवंतरावांचेवर टीका सुरू झाली. यशवंतरावांना पाहुण्यारावळ्यांचे राजकारण करावयाचे आहे. वास्तविक तसे काहीच नव्हते, आणि यशवंतरावांना पाहुण्यांचे मदतीने राजकारण करण्याइतके ते कमकुवतही नव्हते. परंतु काँग्रेसवालेच त्यांच्यावर ही टीका करू लागले. संयुक्त

महाराष्ट्र समितीचे नेत्यांनी मनाचा जो दिलदारपणा दाखवला तो सत्तेच्या राजकारणापायी स्वकीयांनी, आपल्याच पक्षबांधवांनी दाखवला नाही याची मला आणि मामासाहेबांनाही खंत वाटत होती. मामासाहेब मात्र आपल्या स्वकीय टीकाकारांचे अपराध उदारपणे पोटात घालत असत, त्यांना मदत करीत असत.

संयुक्त महाराष्ट्राचे चळवळीनंतर दहा वर्षांनी देशाचे राजकारणांतदेखील निर्नायकी परिस्थिती आली. बेंगलोर अधिवेशनानंतर राष्ट्रपती निवडणुकीत पक्षात मोठी फूट पडली, एक पक्षाचे दोन पक्ष झाले. यशवंतरावांनी राजकीय धोरणानुसार आपली भूमिका घेऊन थोडे जुळतेमिळते घेतले. तरी अंतस्थ वाद चालूच होता. देशात यशवंतरावांचेवर टीका होत होती. यशवंतरावांचे चरित्र मी मराठीत लिहिले होते, परंतु त्याचा प्रसार नागपूर, कोल्हापूर पलीकडे नव्हता. यशवंतरावांचे चरित्र महाराष्ट्राबाहेर इतरांच्या वाचनात आले तर काही प्रमाणात यशवंतरावांचा अकारण होणारा द्वेष, विरोध कमी होईल असे वाटते म्हणून मी यशवंतरावांचे इंग्रजी चरित्र लिहिले. माझ्या एका स्नेह्याची मला खूप मदत झाली. त्या पुस्तकात यशवंतरावांची एक मुलाखत घेण्यासाठी मी मित्रांसमवेत आठ दिवस दिल्लीत राहिलो आणि यशवंतरावांना वेळ मिळेल त्याप्रमाणे त्यांचेशी गप्पागोष्टी केल्या.

"मॅन ऑफ क्राइसीस" हा यशवंतरावांचा मी लिहिलेला चरित्रग्रंथ मुंबईत प्रकाशित करण्याचे ठरले. जयप्रकाश नारायण यांचे हस्ते त्या ग्रंथाचे प्रकाशन झाले. त्या वेळी जयप्रकाशबाबूंनी यशवंतरावांच्या कर्तृत्वाबद्दल जे गौरवोद्गार काढले ते ऐकून ती तृप्त झालो.

यशवंतराव १९४६ पासून मंत्री, मुख्यमंत्री म्हणून पंधरा वर्षे सत्तास्थानावर असताना सत्तेचा दुरुपयोग झाल्याचे एकही उदाहरण सापडणार नाही. आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या स्वार्थाच्या संदर्भात त्यांचा अलिप्तपणा इतका होता की केवळ तीनचारशे रुपयात कराडचा एकत्र कुटुंबाचा व्याप सांभाळत होते दोन्ही ठिकाणच्या खर्चाने त्यांची होणारी

ओढाताण मी अनेकदा पाहिली आहे. एकसष्ट साली त्यांच्या मोठ्या पुतण्यास मुलगी पाहण्यास वाळवे तालुक्यातील ऐतवडे गावी मी गेलो होतो. त्यांचा पुतण्या मुंबईत कुठेतरी नुकताच नोकरीला लागला होता. मलाही ते पुरेसे माहिती नव्हते, त्यामुळे मला काही सांगता आले नाही. मुलीच्या आईने विचारले, "त्यांची जमीनजुमला किती? त्यांचे उत्पन्नी काय? राग मानू नका पण चुलता मंत्री असला तरी, चुलताचुलतीने त्याला घराबाहेर काढलं तर माझी मुलगी कशी राहणार याची काळजी मला केली पाहिजे." खेडेगावातील एका अशिक्षित शेतकऱ्याच्या बायकोने केलेली ही चौकशी आहे. योगायोगाने त्या गावाजवळच्याच चिखलीचे एका मोठ्या कार्यकर्त्याची रुपवती कन्या यशवंतरावांची सून म्हणून आली. मग मात्र मी मामासाहेबांना थोड्या संतप्तपणेच विचारले, "तुम्ही इतका अलिप्तपणा ठेवता हे बरोबर नाही. पुतण्याचे कुटुंब चालेल एवढा व्यवसाय त्यांना करून देणार आहात की नाही?" मला काही उत्तर दिले नाही, पण पुतण्यांना त्यांचे पायावर हळूहळू उभे करणेचा प्रयत्न त्यांनी केला. एकजण-राजा चांगला शिकला, त्याला डॉक्टर केला. मामासाहेबांना त्याचेबद्दल फार समाधान होते.

माझी पत्नी सौ. लीलाबाईचे तिन्ही धाकट्या भावांनी लग्ने आम्हा दोघांचे मध्यस्थीने अनुरुप अशी झाली. त्या बाबतही मामासाहेब समाधानी होते. वरील ऐतवड्याच्या प्रसंगानंतर मला वाटायचे मामासाहेबांनी मुलांचेसाठी काहीतरी जमीनजुमला करावा. त्यांच्या मोठ्या भावाला जमिनीची हौस होती. ते तर एकदा मध्यप्रदेशात शेती करण्यासाठी गेले होते. मामासाहेबांनी जमीनजुमला करणेचा विचार सतत बाजूला ठेवला होता. त्याला अपवाद फक्त मित्रांचे आग्रहाखातर उरळीकांचन येथे सौ. वेणूताई चव्हाण यांचे नावे घेतलेली नऊ एकर जमीन! माझा मोठा मेव्हणा अशोक जमीन घेतो आहे असे म्हटल्यावर त्यालाही त्यांनी विरोध केला.

मी नोकरीचा राजीनामा देताना पाटसला जमीन घेतली होती. त्या जमिनीशेजारी १२-१३ एकर जमिनीचा व्यवहार मी साहेबांचे नावे परस्पर

ठरवला. आणि माझे स्नेह्याचे कुटुंबाचे नावे त्या जमिनीची खरेदी केली. त्यांचे एका पुतण्याला व्यवसायाचे काहीच साधन नव्हते म्हणून १९८० सालात एका सकाळी कुणालाही माहीत नसता साहेब माझे जमिनीवर तासभर आले. त्यांनी अशोकने परभारे व्यवहार केलेली जमीन पाहिली आणि त्या पुतण्याचे नावे ती जमीन करणेस संमती दिली. दैवदुर्विलास असा की त्या जमिनीची ट्रान्सफर ते असताना झाली नाही. अगदी या महिन्यातच तो व्यवहार पुरा झाला.

त्यांचा अधिक लाडका पुतण्या डॉ. राजा याच्या अपघाती निधनानंतर मामासाहेब अगदी खचून गेले होते. त्यातच काळाने सौ. वेणूताईंवर झडप घातली. मामासाहेब अगदी पुरते खचून गेले, सतत डोळ्यांतून अश्रुधारा, विमनस्क अवस्था. सौ. वेणूताई असताना दिल्लीच्या राजकारणाचा उबग येऊन कराडला "विरंगुळा" निर्माण केला होता. सौ. वेणूताईंनंतर त्यांचे स्मरणार्थ ट्रस्ट करून दिल्लीतील सर्व काही कराडला हलवायचा निर्णय त्यांनी घेतला होता. आता फक्त ऋषीसारखे विरक्त जीवन आणि समाजाची सेवा ही एकच बाब त्यांचेसमोर होती. प्रथम विरंगुळा बंगल्यातच सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टची वास्तू उभारणेचा मामासाहेबांचा विचार होता. माझा त्याला विरोध होता."विरंगुळा" ही चव्हाण कुटुंबाची खाजगी प्रॉपर्टी राहावी असे वाटे. शिवाजीनगर हौसिंग सोसायटी स्थापन करताना मी सार्वजनिक सोईसाठी सार्वजनिक मालकीच्या जागेची भरपूर व्यवस्था केली होती, मी त्या हौसिंग सोसायटीचा संस्थापकच होतो. तेव्हा शिवाजीनगर सोसायटीचे सोशल क्लबसाठी राखून ठेवलेली १८ गुंठे जागा सौ. वेणूताई ट्रस्टसाठी देणेचा निर्णय घेतला. या घटनेमुळे मामासाहेबांना खूप समाधान वाटले. मामासाहेबांचे विचार, सल्ला देणेचे आणि लेखनाचे काम सुरू झाले की, तेवढाच त्यांना दुःखाचा विसर पडत जाईल असे वाटे. त्यांनी "कृष्णाकाठ" पुरा केला होता. सागरतीर आणि यमुनाकाठ हे खंड पुरे

होतील असे वाटले, पण नियतीला ते मंजूर नव्हते. मामासाहेब अवचितच आमचेतून निघून गेले.

## श्री.ना.वा. ढवळे
## कऱ्हाडचे मामा

मामा प्रत्येकालाच असतात. किंबहुना प्रत्येकजण कुणा ना कुणाचा मामा असतो, पण यशवंतरावांसारखा जगावेगळा मामा फारच थोड्यांना मिळतो. अर्थात एका गरीब कुटुंबात जन्मलेला हा माणूस भारताच्या उपपंतप्रधान पदापर्यंत जाऊन पोहोचतो, म्हणून मी त्यांना मोठे म्हणत नाही. पण त्यांच्या वागण्या- बोलण्यातले बारकावे, जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी, त्यांची विचार करण्याची पद्धती... एक ना अनेक गोष्टी विचारात घेतल्या तर त्यांचे आगळेवेगळेपण नजरेला येईल.

"मामांचं कृष्णाकाठावर विलक्षण प्रेम होतं. मी त्या वेळी पाच-सहा वर्षांचा असेन. घरची परिस्थिती अगदी गरिबीची होती. पण आल्यागेल्यांना चटणी-भाकर तरी दिल्याशिवाय आज्जीनं कधी सोडलं नाही. मामा एकटे कधीच नसत. हातात एखादं पुस्तक आणि भोवती माणसांचं कोंडाळं सतत असे. संध्याकाळी प्रीतिसंगमावर निघाले की, बरोबर ह.रा. महाजनी, राम कापसे, शांताराम इनामदार असे मित्र असत. जिथे आज त्यांचे दहन करण्यात आले तिथेच त्यांची बैठकीची जागा असे. त्या वेळी चावडी चौकात सार्वजनिक वाचनालयाची इमारत होती. मामांचा जीव जसा या कृष्णाकाठी गुंतलेला असे तसेच या वाचनालयातही त्यांचे दिवसाचे दोन-तीन तास जात. आम्हाला शाळेत घातले ते त्यांनीच हाताला धरून. वरचेवर ते शाळेत यायचे. आमच्या अभ्यासाची चौकशी करायचे. आम्हाला इंग्रजी समजायचं नाही. तेव्हा चक्क मराठीत "माय नेम इज बाबू" असं लिहून पाठ करून घ्यायचे.

आमच्या घरची परिस्थिती बरी नव्हती. त्यामुळे मामांना आपले काही विचार आचारात आणताना अडचण पडे. तसे ते कधीच बोलून दाखवीत नसत. पण आपल्या घरातील माणसांनी वागावे कसे, बोलावे कसे, कपडे कसे घालावेत, याबाबत त्यांचे काही ठाम विचार असत. मला आठवते,

लहानपणी आम्ही चौकात उगाच टिंगल करीत असू. गुपचूप एखाद्याच्या शर्टाला चिंधी बांधून चेष्टा करीत असू. एकदा कुणीतरी माझ्याच शर्टाला चिंधी बांधली होती. मला ते ठाऊक नव्हते. मामा तेव्हा वकिली करीत. अशा अवस्थेत ते एकदा चौकातून कोर्टात चालले होते. मला पाहताच त्यांनी हाक मारली. "घरी असं असं कमी आहे? वेणूला तेवढं नेऊन दे," असे म्हणाले आणि त्यांचे माझ्या शर्टाकडे लक्ष गेलें."हे काय?" ते म्हणाले आणि "बाबू नेहमी चांगल्यांच्या संगतीत असावं," असे सांगून निघून गेले.

"स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातील मामा, शामराव खिंडीतून त्यांच्या खांद्यावर बसून केलेला प्रवास, कधी रेल्वेत आपण बाकावर आणि मामा बाकाखाली दडून असा प्रवास, त्यांचे मित्रमंडळ त्यांच्या वागण्यातील नम्रता, तितकाच वागण्यातील कठोरपणा, घरचे लोक, घरच्यांशी मामांचे संबंध अशा कितीतरी विषयांवरील आठवणींना बाबूराव उजाळा देत होते. देशभक्तीची त्यांची अंतःप्रेरणा, माणसे गोळा करण्याची हातोटी, हे केले पाहिजे, ते केले पाहिजे असा सारखा आग्रह.

"आमच्या कुटुंबावर दुःखाचे अनेक प्रसंग ओढवले. पण त्यांना कधी रडताना मी पाहिलं नाही. दुःखाला फार संयमानं ते आवर घालीत. १९४८ मध्ये माझे दुसरे मामा गणपतराव वारले. तेव्हा मी पुण्यात कॉलेजमध्ये शिकत होतो. टिळक रोडवरील लक्ष्मीसदनमध्ये राहात होतो. या घटनेनंतर मामा माझ्या खोलीवर आले नि पाच मिनिटं मोकळेपणानं रडत बसले. तसाच दुसरा प्रसंग आठवतो. तेव्हा मामा पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. ते १८ नंबरच्या बंगल्यात राहात होते. त्या वेळी पार्लमेंटरी सेक्रेटरीला बंगला असला तर फोन किंवा गाडी नव्हती. १५ नंबरच्या बंगल्यात त्या वेळचे मंत्री गणपतराव तपासे राहात होते. तिथे फोन होता. मामांसाठी फोन आला तर तिथून निरोप येई व मामा फोन घ्यायला जात. या दोन बंगल्यातील अंतर सुमारे एक फर्लांग होते. एके दिवशी सकाळी जिल्ह्याधिकाऱ्यांचा फोन आला. तो घ्यायला ते गेले. त्यांनी फोन घेतला आणि तिथेच हंबरडा फोडला! ओक्साबोक्सी रडतच

ते बंगल्यावर परतले. यशवंतराव का रडताहेत ?  घरची सगळी माणसे आणि नोकरचाकर अवाक् झाले. पण त्यांना विचारायचं कुणी, तरीही भीतभीतच मी विचारलं, त्यांचे एक जिवलग स्नेही के.डी. पाटील यांचा खून झाल्याचा तो फोन होता ! या घटनेला आता पंचवीस वर्षे झाली. तरीही त्यांची त्या कुटुंबावर पितृछाया होती. प्रत्येक अडीअडचणीला ते उभे राहिले. इतकंच काय के.डी. पाटील यांच्या मुलीचं लग्न झालं त्या वेळी तिचे यजमान साहेबांचे जावई म्हणूनच ओळखले जात.

१९४६ ते ६० यशवंतराव अव्याहत सत्तेवर होते. तरी शुक्रवार पेठेतील छोट्या घरात मर्यादित उत्पन्नात त्यांच्या कुटुंबाचा संसार सुरू होता. बाहेरच्या खोलीत एक मोठी सतरंजी बसायला, पण एकही खुर्ची नव्हती. घरी भेटायला मोठे मोठे लोक येत. साऱ्यांनाच अवघडल्यासारखे होई. एकदा त्यांचे पुतणे शिवाजी यांना दाखवायला एक मुलगी आली. तेव्हा मात्र घरच्यांनी त्यांना बजावले, "काय, तुम्ही मंत्री म्हणून लोकांनी इथं मुलगी द्यायची काय? सतत सार्वजनिक कामात मग्न. घरी काही लक्ष देणार की नाही? अर्थात सगळी मुले पुढे मोठी झाली. त्यांची लग्ने झाली. सगळे कुठल्या ना कुठल्या व्यवसायात पडले. परिस्थिती सुधारली. यशंवंतरावांनीही शक्य ती मदत केली.

त्यांच्या भगिनी राधा आक्कांची भाऊबीज कधी चुकली नाही. यशवंतराव दिल्लीला होते. तिथून कुणी कऱ्हाडला निघाला तर त्याला विनवून "एवढं आक्काला पोचवा,"असे सांगत.

आपल्या कर्तृत्वावर उभा राहिलेल्या या भावावर आक्काचेही खूप प्रेम होते. त्यांच्या निधनाचे वृत्त तिला कळले तेव्हा तिला मूर्च्छाच आली. अश्रूंच्या पुरात तिने आपल्या या भावावरील प्रेमाची बंधने खुली केली.

यशवंतरावांजवळ जातिभेद, धर्मभेद असल्या संकुचित विचारांना थारा नव्हता. उंडाळे येथील एका सभेत ते म्हणाले होते, "बेचाळीसच्या आंदोलनाची आखणी करण्यासाठी मी या भागातील खेड्याखेड्यातून हिंडलो आहे. आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी एका गावात बैठक सुरू

होती, जो तो काही ना काही सूचना करीत होता. लष्करातील एक मागासवर्गीय जवान काही सांगण्यासाठी उठला तेव्हा गावचा पाटील चटकन म्हणाला, “खाली बैस, तुला काय कळतंय?” माझ्या मनात विचार आला, कधी तरी बाजार करायला तालुक्याच्या गावी जाणारा हा पाटील, पाटील म्हणून शहाणा आणि दुसऱ्या महायुद्धात चार देश पायाखाली तुडवलेला हा जवान मागासवर्गीय म्हणून अडाणी, असल्या कल्पना आपण बदलणार तरी केव्हा?”

यशवंतरावांचा विवाह १९४२ च्या आंदोलनाच्या धकाधकीतच वेणुताईंशी झाला. लग्नानंतर पहिल्याच संक्रांत वाणादिवशी त्यांनाही अटक झाली. पण नंतरच्या जीवनात या गोष्टींचा त्यांनी कधीही उल्लेख केला नाही. राजकारणापासून अलिप्त राहून त्यांनी आपला प्रपंच शुभंकर केला. वस्तुतः त्यांचे माहेर एक सुखवस्तु घर होते. सासरी सुरुवातीच्या काळात जे तुटपुंजे होते तरीही त्यातच आनंद मानून चेहऱ्यावरचे स्मित हास्य कधी मावळू दिले नाही. यशवंतरावांसाराख्या कर्त्या पुरुषाची ही धर्मपत्नी. प्रपंचातील कर्तेपणा तिने नीटनेटका सांभाळला. जातिभेद, धर्मभेद यांच्या मर्यादा ओलांडलेले, शाश्वत मानवता धर्मावर आधारित असे हे घर होते. वेणूताईंनी पावित्र्य, भक्ती यांचे खोलवर संस्कार करून घराचे सुसंस्कृतपण वाढवले. घराचे देवघर बनवले.

आपल्या या मामा आणि मामींच्या वेगळ्या वैवाहिक जीवनातील आठवणी सांगताना बाबुराव कोतवाल म्हणाले, घरातल्या कुठल्याही घटकात नात्यातल्या फरकानं मामींनी कधी पाहिले नाही. एखादी उणीव नजरेत आली की, मामी मामांशी चर्चा करे. ती उणीव केव्हाच दूर होई. मामांना मामीशी बोलत बसण्यात वेगळा आनंद वाटे. घरगुती गोष्टी प्रमाणे तास तास राजकारणावरही तिच्याशी ते चर्चा करीत. आम्हाला याचं आश्चर्य वाटे. मामा एवढंच म्हणत, “तिची राजकीय दृष्टी खूप मोठी आहे.”

प्रेम, आतिथ्य, धीरोदात्तपणा, मनाची श्रीमंती हा चव्हाण घराण्याचा वारसां वेणूताईंनी द्विगुणित केला. पण या घराण्याला हा वारसा लाभला

तो यशवंतरावांच्या मातोश्री विठामाता यांच्या पुण्याईने."भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, मी पणा विसर आणि तू तुझे कर्तव्य कर," 'ज्ञानेश्वरी' चे सार आपल्या मुलाला एका वाक्यात सांगणाऱ्या विठामाता अडाणी होत्या. पण मानवतेच्या एक जिवंत मूर्ती होत्या.

विठामाता या देवराष्ट्रयाच्या. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यांचे पती, यशवंतरावांचे पिताजी बळवंतराव बेलिफाचे काम करीत. घरी सासरचा राबता मोठा. दोन जावा, सासूबाई, पती, दीर, नणंदेची दोन मुले असा मोठा परिवार होता. थोड्या उत्पन्नात जास्त समाधान मिळवून सुखी होणारे हे कुटुंब होते. विठामाता त्यात सहजतेने सामावून गेल्या.

पण विठामातांच्या संसार जीवनात त्यांना दुर्दैव, दुःख आणि संकटे यांच्याशीच सतत सामना करावा लागला. त्यांना सात अपत्ये झाली. पण ज्ञानोबा, राधाक्का, गणपतराव आणि यशवंतराव ही चार अपत्येच जगली. त्यात पतिनिधनाचे दुःख त्यांच्यावर कोसळले. मुले मोठी करायची होती. दुःख करीत बसायला त्यांना उसंतच नव्हती. पती वारले तेव्हा सगळ्यात धाकटे यशवंतराव चार वर्षाचे होते. पतिनिधनानंतर मुलांचे संगोपन करताना त्यांनी मुलांना संसारतापाचे चटके कधी बसू दिले नाहीत. तिने शेतात मोल मजुरी केली. पायली पायली ओझी डोक्यावरून आणली. अक्षरशः मिळतील ती कामे केली. दिवसभर कष्टात देह झिजवून पुन्हा पहाटे उठावे, घरचे दळण जात्यावर स्वतः दळावे, मुलांसाठी कोरड्यास भाकरी करावी आणि स्वतःसाठी भाकर घेऊन कामाला जावे हा त्यांचा दिनक्रम दहा-बारा वर्षे सुरू होता.

या त्यांच्या कष्टांना यशही आले. ज्ञानोबा सातवी पास झाले. नोकरी करू लागले. गणपतराव मॅट्रिक झाले, व्यापार करू लागले. कऱ्हाडचे नगराध्यक्षही झाले. आणि यशवंतराव... विठामातांच्या कष्टाचे चीज झाले.

पंतप्रधान जवाहरलाल नेहरू कोयनेला आले होते. त्या वेळी आमचे शुक्रवार पेठेतील घर अगदीच चंद्रमौळी होते. पंडितजींना विठामातांना

भेटायचे होते. पण त्यांना घरी नेणे प्रशस्त वाटेना. पंडितजी म्हणजे कोण, पंतप्रधान म्हणजे काय, हे माझ्या आईला सांगण्याचा खूप प्रयत्न केला व अखेर “बाबाचा (यशवंतराव) साहेब असं सांगून तिलाच शासकीय विश्रामधामावर नेले. एका खोलीतील कोचावर तिला बसवले होते. कार्यक्रम आटोपून पंडितजी व मामा बंगल्यावर आले. ते तडक आईच्या खोलीवर गेले. आई उभी राहू लागली तसे धावत धावत पंडितजी आईजवळ गेले. तिचे हात हातात घेतले व म्हणाले, “बैठिये माँ, मै सिर्फ आपके दर्शन के लिए आया हूँ!”

“१९३० मध्ये मामा शिकत होते. त्या वेळी त्यांच्या शाळेला गव्हर्नरने भेट दिली. त्याचा निषेध म्हणून मामांनी आवारात तिरंगा फडकावला. मामांना अटक झाली. प्रकरण  खूप चिघळले. माफी मागून सुटका करून घेण्याचाही सल्ला मिळाला. यावर आईने जाऊन सांगितले, “ आपलं काय व्हायचं असेल ते होऊ दे पण तू मुळीच माफी मागू नकोस.”

“आईच्यी घरी दारिद्रयाचा मुक्काम. मामांच्या राजकीय हालचाली काही वेळा त्रासदायक होत. अशा वेळी मामा वैतागत.” माझ्यामुळे त्रास होत असेल तर मीच घरात येत नाही. असे सांगून बाहेर पडत. मात्र आई वणवण हिंडून त्यांचा शोध घेत असे. त्यांना घरी आणून भरवत असे. ते जेवीपर्यंत स्वतः कधी घास घेत नसे.

“आईला या धाकट्या मामांच्या हालचालीबद्दल नेहमीच एका तऱ्हेचे कुतूहल होते. भोवताली अनेक मित्रांचा मेळावा पाहून तिला अभिमान वाटत असे. मोठी माणसेही त्यांचा सल्ला घेताना पाहून तिला आश्चर्य वाटे. ती घरात सर्वांना बजावे, “तो काय करतोय तो त्याला करू द्या. काही वाईट करीत नाही.” मामांच्या कोणा मित्राला अटक झाली, की साहजिकच त्यांच्या घरात चिंतेचे वातावरण निर्माण होई. आई तातडीने त्यांच्या घरी जाई आणि घरातल्यांना धीर देई.

“१९४३ चा एक प्रसंग आजही आठवतो. मामा अटकेत होते. त्यांना भेटण्यासाठी आईला घेऊन मी सातारला गेलो. जिल्हाधिकारी कचेरीच्या

एका बराकीत मामांना जेलमधून आणले. त्यांच्या हातात बेडी व पोलिसांच्या हातात तिची दोरी, हे पाहून आईचे मन कळवळले. आईकडे पाहून मामांच्या मुखातून शब्द फुटले नाहीत. दोघांनीही एकमेकांकडे साश्रू नयनांनी पाहिले व सद्गदित अंतःकरणाने एकमेकांचा निरोप घेतला...”

## सौ. शरदिनी मोहिते
## आमचे मोठे भाऊ

पुण्यनगरीत साने गुरुजी रस्त्यावरील जवाहर या वास्तूत २० जानेवारी १९८४ रोजी सकाळी विविध क्षेत्रातल्या गण्यमान्य लोकांचा आनंदोत्सुक मेळा जमला होता. समाज शिक्षण मालेच्या ४०० व्या पुस्तकपुष्पाचा (आदिमाया आदिशक्ति-कृ.भा. बाबर) प्रकाशन सोहळा संपन्न होत होता. या सोहळ्यात अध्यक्ष म्हणून सहभाग घेण्यासाठी मुद्दाम दिल्लीहून आलेले होते महाराष्ट्र शारदेचे लाडके कर्तबगार सुपुत्र श्री. यशवंतराव चव्हाण. आणि अपेक्षा होती त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री वसंतराव दादा पाटील यांच्या आगमनाची. दादा कधी उशीर न करणारे, पण उशीर झाला; मालादेखील वेळेवर कार्यक्रम सुरू करणारी .. कार्यक्रम वेळेवर सुरू होणार की नाही? ..दादा आल्याशिवाय कार्यक्रम सुरू करणं शक्य नव्हतं. प्रकाशन त्यांच्याच हस्ते होणार होतं. प्रश्न पडला होता. जमलेले लोक शांत होते. कितीही वेळ थांबायला तयार होते. कारण दादा आणि साहेब या अतिरथींना एकमेकांशेजारी शोभिवंतपणे बसलेलं पाहणं हा एक सोहळा होता. मनावर कोरला जाणार होता.. खुद्द साहेबही दादा आल्याशिवाय कार्यक्रम सुरू करायला तयार नव्हते. पाच पाच मिनिटांनी ते मला विचारत होते “दादांचा काही फोन आला का ? निरोप आला का ? केव्हा येतायत ?” नाईलाजानं मला पुनःपुन्हा तेच तेच उत्तर द्यावं लागत होतं - ‘काहीच कळत नाही अजून’.. वाट पाहणं जेव्हा मर्यादेपुढं जायला लागलं तेव्हा मग कार्यक्रमाचा एक भाग सुरू करण्यात आला. मालेनं आयोजलेला विविध क्षेत्रातल्या काही कर्तबगार स्त्री पुरुषांचा सत्कार सुरू करण्यात आला. हा सत्कार सोहळा चालू असतानाच दादा आले. या आगमनाला योग्य अशीच गजबज उठली. सर्वांनाच आनंद झाला. पण खरी खुशी उमटली ती यशवंतराव साहेबांच्या मुद्रेवर !

दादा उगीच उशीर करणारे नाहीतच. त्यांच्याबद्दल कोणाला रागही नव्हता. तरी त्यांनी जेव्हा खुलासा केला की, इथपर्यंत आलेलं विमान खराब हवामानामुळं उतरवता आलं नाही, मुंबईला परत जावं लागलं म्हणून उशीर झाला तेव्हा तो खुलासा ऐकून सर्वांनीच सुस्कारा सोडला. साहेब त्यानंतरच खऱ्या मोकळेपणानं कार्यक्रमात सहभागी होऊ शकले.

मुख्य कार्यक्रमानंतर भोजनाचे वेळी मला हाक मारून ते म्हणाले, "गंमत बघ .. कशी गंमत चालली आहे बघ! "ते दाखवत होते तिकडे मी पहिलं तर खऱ्या अर्थानि जनतेचे नेते असलेल्या दादांना त्यांच्या चाहत्यांचा आणि त्याचप्रमाणं आपलं काम करून घेण्यासाठी आलेल्या लोकांचा अक्षरशः गरडा पडलेला होता ! ह्या लोकांना हे कळत नव्हतं, की जिला आपण भेटतो आहोत त्या व्यक्तीला सुखानं चार घास खाऊ द्यावे. दादांना प्रत्येकाचं म्हणणं ऐकून घ्यायची सवय. त्यामुळे गराडा किंचित देखील कमी होत नव्हता. दादांचं खाण्याकडे काय लक्ष असणार ? सवयीनं चार घास खाणं चालू राहिलं होतं खरं! हा सगळा देखावा पाहताना साहेब खुदूखुदू हसत होते. ज्यानं वानप्रस्थाश्रम स्वीकारला आहे असा एखादा राजा सध्या राजा असलेल्या आपल्या मुलाकडे पाहील, अशा प्रकारची नजर या गमतीकडे पाहण्यात होती... मी त्यावेळी साहेबांना विचारलं, "दादा, तुम्ही आणि आम्ही तिघी बहिणी यांचा एक कौटुंबिक फोटो काढू या का?" तर ही कल्पना त्यांना आवडली. फोटो निघाले... जवाहर मध्ये त्यांनी ऐसपैस सवड काढून दिलेली ही भेट खरोखरच अविस्मरणीय होती.

यावेळी एक गोष्ट लक्षात येते ती ही की मी जरी वरती 'साहेब' असा उल्लेख केला, तरी प्रत्यक्षात मी त्यांना कोणत्याही संबोधनानं कधीही हाक मारली नाही. नेहमी जवळ जाऊन नमस्कार करून काय विचारायचं ते विचारलं. आता मात्र सोयीसाठी साहेब म्हणते. नाहीतर आठवण सांगणार कशी ? साहेब मला मी शिकत असताना गमतीदार हाक मारायचे."पाव्हणं "म्हणायचे! मला आठवतं की संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीचा जोर प्रचंड होता.जवाहरलाल नेहरू म्हणतात म्हणून द्विभाषिकच कसं चांगलं आहे हे पटवून देण्याचा चव्हाण साहेबांचा प्रयत्न कोणालाही आवडत नव्हता. त्यावेळी एकदा शनिवारवाडा ते काँग्रेस हाऊस यांच्या दरम्यान त्यांच्याविरुद्ध उग्र निदर्शनं झाली. निदर्शनं काही प्रमाणात खालच्या पातळीवर येऊन हिडीसही झाली होती. या वेळी त्यांच्याच घरातल्या आम्हा सर्वांच्या मनावर विलक्षण ताण पडला होता. साहजिकच त्याच मुक्कामात या प्रसंगानंतर ते जेव्हा आमच्या घरी आले, तेव्हा माझा चेहरा गंभीर आणि लांबडा. तर त्याची जाण लगेच होऊन जिना चढता चढताच ते हसत हसत म्हणाले, "काय पाव्हणं, जेवायला वाढणार ना ?" मनावरचा ताण चटकन् ढिला पडून मी खुदकन् हसले तेव्हा त्यांना हायसं वाटलं. ..

एकदा आळंदीला काँग्रेसजनांचं शिबिर होतं. त्यावेळी आम्ही आळंदीला गेलो. सौ. वेणूताई व मी (काँग्रेसचे तसे सक्रिय मेंबर नसल्यामुळे) अर्थातच शिबिराला गेलो नाही. तेव्हा आम्ही दोघीच कितीतरी वेळ गप्पा मारीत आळंदीतल्या एका देवळात बसलो होतो. शिबिराकडून आक्का आणि साहेब परतल्यावर मी विचारलं होतं, "किती वेळ आम्ही दोघींनी ज्ञानदेवाची तीच पोज बघत बसायचं ? मुक्ताईनं या वेळात कितीतरी मांडे भाजून काढले असतील ज्ञानदेवाच्या पाठीवर ! ...आम्ही दुसऱ्या सर्व देवळांमधून जाऊन येऊ शकलो असतो की सहज.." यावर सारेच हसले होते.

चव्हाण साहेबांनी आम्हा सर्वांवरच मनापासून प्रेम केलं. ज्या वेळी ते आमच्याशी बोलत त्या वेळी त्यांची नजर प्रेमानं, कौतुकानं ओथंबलेली अशी असायची. गंभीरही व्हायचे कधी कधी, नाही असं नाही. आमची आई गेल्यानंतर ते तसे बऱ्याच कालावधीनंतर आले होते. तरी सर्वांचीच मनं या वेळी भरून आली होती. आम्हाला खुद्द साहेबांबद्दल नाही म्हटलं तरी काळजीच वाटत होती. कारण राजकीय दृष्ट्या ते तेव्हा सुपरिचित अशा कुंपणावरच्या स्थितीत होते. आणि सौ. वेणूताईंची तब्येतही तेव्हा काळजी

करावी अशीच होती. त्यामुळे त्या काळजीचाही ताण त्यांच्यावर पडलेला स्पष्ट दिसत होता. तब्येत खरकलेली दिसत होती.. काही प्रसंगी शब्द मुके होतात. अशा वेळी वातावरणातला एकूण जडपणा हलका करण्यासाठीच शब्दांचा आसरा शोधला जातो. त्यानुसारच माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, "चहा घेणार ना ?"

तेव्हा कुठं ते नेहमीप्रमाणे हसून म्हणाले, " हो, स्वतः कर. आणि साखर कमीच बरं का. एक छोटा चमचा."

...असे कितीतरी प्रसंग आठवणीत साठवलेले आहेत.स्वतंत्र मराठी राज्य स्थापनेच्या वेळी त्यांनी हाती घेतलेला मंगल कलश हिमालयाच्या संकटकाळी त्याच्या संरक्षणासाठी सह्याद्रीचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी घेतलेली धाव, त्यांनी संरक्षणमंत्री म्हणून केलेली कामगिरी, सगळ्या धकाधकीच्या जीवनात देखील सतत जिवंत ठेवलेली रसिकता, आणि ठेवलेला व्यासंग, मधूनमधून केलेलं लेखन आणि आवर्जून ऐकावीत अशी त्यांची उत्कृष्ट भाषणं..अशा कितीतरी गोष्टी आहेत, की ज्यांच्या आठवणीनं कोणाही मराठी माणसाचा ऊर अभिमानानं भरून येईल?

चव्हाणसाहेबांच्या बाबतीत माझ्या मनात नेहमी विचार येत असे, की ताश्कंदला लालबहादूर शास्त्रींचा अगदी आकस्मिक अनपेक्षित मृत्यू घडला तेव्हा, त्या दौऱ्यात त्यांच्या बरोबर असलेल्या चव्हाणसाहेबांनी हे दैवाचं भयाण नाट्य कसं सहन केलं असेल ? .. त्यांना तेव्हा काय वाटलं असेल.. या प्रश्नाचं उत्तर सौ. ताईंच्या मृत्यूनंतर आम्ही तिघी बहिणी त्यांना भेटायला गेलो त्या वेळच्या त्यांच्या व्याकूळ नजरेत मिळालं... इंदिरा गांधींच्या निर्घृण हत्त्येनंतर टी व्ही पाहात असताना घडलेल्या तीन मूर्ती भवनात दिसलेल्या त्यांच्या खचून वाकून उभ्या राहिलेल्या आकृतीच्या दर्शनात मिळालं!

## सरवर (साहेबांचा नोकर)
## सायेब आमचे मायबाप

सायेब आमचे धनी, आम्ही नोकर, सायेबांचा स्वभाव फार प्रेमळ. त्यामुळे त्यांनी दिल्लीला येतोस का म्हटल्यावर मी त्यांचेबरोबर आलो. त्यांनी मला मुलासारखे सांभाळले. माझे लगीन करुन दिले.

माझ्या मुलाचे नाव त्यानी सलीम ठेवले व त्याचे पालनपोषण केले. बाईसायेब फार लाड करीत. त्याला तरू बाळ म्हणत.

बाईसायेब तर खरोखर माऊली होत्या. त्यांचे मन फार मोठे होते. इतके की, आकाश त्यात झाकून जाईल ! रोज सकाळी त्या चारला उठायच्या. देवाची पूजा स्वतः करायच्या. रांगोळी काढायच्या. नेपाळच्या शंकराची आरती करायच्या. त्या सणाचे दिवशी दानधर्म करणार. रोज सर्व नोकरांना नाष्टा देऊन मग दिवसाचे काम सुरू करणार.

माझी आई आजारी पडली तर सायेबांनी व बाईसायेबांनी मला प्लेनने मुंबईला पाठवले. त्यांचे फार उपकार.

आई मेली तरी मी नंतर गेलो नाही. बाईसायेब आजारी तर कसा जाऊ ? बाईसायेबांनी तर माझे पालनपोषण केले मग त्याना बरे नसताना कसा जाणार ?

सायेबांचे घरी आम्ही नोकर घरच्याप्रमाणे. मी मुसलमान पुण्याचा. गंगाराम नेपाळचा. वासू मंगलोरचा. नारायण राणीखेतचा. मोहनसिंग हरयाणाचा . विनोद लुधियानाचा. शेखर व घनश्याम गढवालचे. सगळे वेगवेगळ्या धर्मचे. पण सायेबांचे दरबारी सर्व एकत्र. ते सर्वांना सांभाळून घ्यायचे. आमचे हे धनी फार प्रेमळ. आम्हाला ते नोकर न मानता कुटुंबातले मानायचे. आमच्यावर त्यांचा फार जीव होता.

पण सायेब गेले. बाईसाहेब गेल्या. आम्ही पोरके झालो. देऊळ राहिले. पण विठ्ठल रखुमाई ? आम्ही कुणाचे दर्शन घ्यावे ? चांदीचे ताटात आम्हाला सोन्याचा घास देणारे गेले. आम्ही कुणाकडे पाहावे ?

त्यांच्याबरोबर ३५ वर्ष राहिलो. दिवस कसे गेले कळले नाही . पण आता दिवस जाता जात नाहीत. मन भरून येते.

शेवटी मी स्वतः त्यांची सगळी सेवा केली. आज ते स्वप्नात येतात. पण समोर का येत नाहीत?

## डॉ सरोजिनी बाबर
## माझा भाऊ जिम्मेदारीचा

उभ्या पुण्याला खाऊ का गिळू करीत आक्राळविक्राळ रूप धारण करून भरधाव वेगानं गावात शिरण्याच्या त्या दिवशीच्या महापुराची आठवण झाली. तरी अंग सरारून शहारतं न पाठोपाठ “आक्काताई कुठाय ?” विचारीत सदाशिव पेठेतून फेरफटका मारीत सर्वत्र फिरणाऱ्या साहेबांचा आवाज कानात घुमला की, अजूनही खरंच जिवात जीव येतो.

त्या दिवशी ध्यानीमनी नसताना पुण्यावर ओढवलेल्या ह्या भयानक आपत्तीनं माणसं हवालदिल झाली होती. पण साहेब देवासारखे अचानक मदतीचा हात देत पुण्यात येऊन ठेपल्याकारणानं माणसांना विलक्षण धीर आला होता.”साहेब आलेत ना ? मग काय व्हायचं ते होऊ देत “ म्हणत माणसांनी स्वतःला सावरलं होतं. इतरांच्या मदतीला धावली होती. साहेब आल्याकारणानं निचींतीनं वावरत होती. ज्यांचं सर्वस्व वाहून गेलं त्यांच्याकडे जात होती. जवळचं शक्य ते देत होती. ते बघून साहेब म्हणाले, “त्यांना पहिलं प्रेम द्या, जिव्हाळा द्या. बाकीचं हळूहळू मिळेल.” महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या या ग्वाहीनं पुणे गाव बघता बघता पहिलं रूप धारण करीत गेलं.

एवढं मोठं धरण फुटलं म्हणूनं पुण्याला पाण्याची टंचाई कधीच जाणवली नाही. शासनयंत्रणा पणाला लावीत स.गो. बर्व्यांसारख्या अधिकाऱ्याच्या सहाय्याने साहेबांनी पुण्याला जणू जीवदान दिलं. लोकं म्हणाली, “भारी लाख माणूस, मोठा जिम्मेदारीचा.याला म्हणावं मुख्यमंत्री. राजा-पालनकर्ता किती अगत्यानं सगळ्यांची विचारपूस केलीत पाहिलीत ना ?”

अडल्या माणसाला मदतीचा हात देत साजिवंत करणं हा साहेबांचा जणू स्थायिभावच म्हणावा. आणि अशावेळी त्यांनी अमूक करायला हवं

म्हणायचा अवकाश की, त्यांच्या लोकांनी पण त्यांच्या विनंतीला शिरोधार्य मानीत उचलून धरावी हे पण ठरलेलं जणू विधिलिखितच !

मला आठवतं, साहेबांची मुंबईहून दिल्लीला बदली झाली तेव्हाची गोष्ट. म्हणजे संरक्षण मंत्री म्हणून साहेब दिल्लीला निघाले ती काळवेळ. पुण्याच्या शनिवारवाड्यावर भली दांडगी सभा भरलेली न् साहेब म्हणाले, "देशाला सोन्याची गरज आहे. देशाला माणूसबळ हवं आहे. आर्थिक स्वावलंबन पाहिजेल आहे." तशी भराभर लोकांनी साहेबांपुढं पैशाचा जाणू पाऊस पाडीत म्हटलं अन् बायकांनी हातातल्या बांगड्या, गळ्यातल्या साखळ्या काढून भरारा देऊन टाकल्या. त्या वेळी साहेबांच्या पुढ्यात बसलेल्या माझ्याकडे खालचा ओठ मुडपीत त्यांनी पाहिलं मात्र न् मी क्षणाचाही विलंब न लावता हातातल्या बांगड्या काढून त्यांच्या हातावर ठेवल्या! ... साहेब खुश झाले. त्यांनी सांगून टाकलं, " बहिणीचा आधार फार मोठ्ठा असतो भावाला". इंदिराजींनीही आपली सगळी बाळलेणी न् भावल्यांचे अलंकार देऊ केलेले तर आम्हाला एकदम बरं वाटलं."आपल्यापेक्षा देश मोठा आहे." हे साहेबांचं बोलणं आपण अल्पांशानं का होईना सार्थ करू शकलो यातल्या समाधानानं आम्ही घरी परतलो..

दिल्लीला गेल्यावर साहेबांनी फोन केला, "आक्काताई, आपण समाधानी आहोत. वेणूबाईनंही पाटल्या दिल्यात. घरची अशी स्वयंस्फूर्त कृती लाख मोलाची." त्या वेळी काय वाटलं कसं सांगू ? साहेबांच्या नजरेतील त्या वेळच्या आनंदाश्रूंनी आम्ही जशा न्हाऊन उठलो !

आपल्या माणसाबद्दल साहेबांना अपार माया, उदंड प्रेम. कुणाला कधी काही स्वतःसाठी म्हणून मागायचे नाहीत. पण त्यांचे डोळेच एवढं बोलून जायचे की, शब्दांचा तिथं काय पाड लागावा ? साहेबांना माझ्याकडून एकच अपेक्षा असायची की , मी भरपूर लिहावं न् लेखक म्हणून नाव कमवावं, त्यासाठी ते म्हणायचे देखील, "आक्काताई, माझी लेखनाची

हौस तुझ्यामुळं भागू देत..." आणि मी पण 'हं !' करीत जे जे म्हणून लिहीन ते ते त्यांना पाठवून द्यायची.

पण एकदा खूपच गंमत झाली. लोकसंस्कृतीवर आधारित असा एक शोध निबंध मी अंग्रजीत लिहून दिल्लीला पाठवलेला तिथं अखिल भारतीय अशी या विषयातील सभा भरलेली. तर माझा निबंध वाखाणला जाऊन चारचौघांत झालेलं नाव छपून आलेलं हं ! तशी  साहेबांनी सगळीकडं माझी चौकशी केली. ओळखीतल्या लोकांकडे फोन केले न् कुठंच पत्ता गवसेना तशी त्यांनी पुण्याला फोन लावून आमच्या वडिलांना, अण्णांना विचारलं, "आक्काताई कुठाय ? लगेच परतली का ?" त्यासरशी मी तिथंच उभी तर अण्णा हसले न् म्हणाले, "आक्काताईशीच बोला." मग मला त्यांनी रागावून विचारलं, "असं न भेटता का परत गेलीस ?" म्हणताना शांतपणानं मी उत्तर केलं, "मी आलेच नव्हते ना ? फक्त निबंध पाठवला!"

"अच्छा!, मग असू दे. इथं आम्हाला कोण चिंता ? वेणूबाई सुचू देत नाही न् मलाही चैन पडत नाही. पुन्हा असं करू नको. स्वतः ये." साहेबांनी फोन ठेवला. परमुलखात मी गडबडून जाऊ नये ही त्यांची इच्छा. त्यातून तोंडी लावण्यागत मला चिडवीत बरोबर जेवायची त्यांना हौस. तर साहेब गेले हाडबडून!... अण्णा मला रागावले. आई म्हटली, "अशी दिशाभूल करूनी" सगळं खरं. पण मी काय केलंवतं म्हणून हा राग चहूबाजूंनी ? आलं हसू. दाबलं ओठात. केला विचार, "आपल्या भावाला आपली आठवण आहे तर!... फिर देखा जायेगा!" बसले एकलीच स्वतःशी बोलत. सुखसंवाद साधीत, कितीतरी वेळ!... एकलीच!...

लोक विचारायची, "साहेब तुम्हाला कोण लागतात?" मी चटकन हसून विचारायची, "का बरं?" मग त्यानी पुन्हा म्हणावं, "तुमची त्यांना फार काळजी. सारखी आठवण काढतात." आणिक मी पण हुंकार भरावा.

तसं पाहिलं तर साहेब आमच्या लांबच्या नात्यागोत्यातले. पण सख्खापेक्षा जवळचे. त्यातून मी त्यांच्या भाषेत 'पोटभर' शिकलेली नि

हातात लेखणी खेळू देतेली. त्यामुळे धाकल्या भैनीगत त्यांच्याजवळ माझी शान! म्हणून मग अधूनमधून चारदोन नवी पुस्तकं दिली न् एखादवेळ नवं कोरं पेन दिलं की; मनसोक्त हसून खुशीनं पोटाशी धरणारे साहेब मला कधी आमच्या कुटुंबाबाहेरचे वाटलेच नाहीत. म्हणून तर रागलोभाची कारंजी आमच्याकडे नेहमीच उसळायची."कधी आपली आज्ञा आपण जनतेला करायची असते तर कधी जनतेची आज्ञा आपण मानायची असते" ही संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळचा पंडित नेहरूंनी ऐकवलेला मंत्र आम्ही साहेबांच्या न् आमच्या वागण्या-बोलण्यात ठेवायला मागं पुढं पाहात नसू.

आमच्या ह्या साहेबांना छानछोकीचा नाद जरा कमीच. त्यातून वस्त्रालंकारांच्या बाबतीत तर आणखीनच कमी. आमचं न् वेणूताईंचं या बाबतीत नेमकं उलटं धोरण! म्हणजे तसा छानछोकीतला नखरा आमच्या वाऱ्यालाही नसला तरी नवीन नवीन दागिना करावा किंवा सुंदर सुंदर साड्या खरेदी करायचा नादिष्टपणा आमच्या ठायी मुरलेला.

तशी एकदा खूपच धमाल उडवून दिली आम्ही! काय झालेलं की, इंग्लंडची महाराणी एलिजाबेथ मुंबईला येतेय तर तिला महावस्त्र न् महाअलंकार भेट द्यावा ही भाषा निघालेली. साहेब मुख्यमंत्री. तर सोन्याचा कोल्हापुरी साज न् पैठणी द्यायचा बेत पक्का झाल्यासरशी आम्हाला वेणूताईनी न् कुसुमताई वानखेडेंनी वेठीला धरलं. आधीच 'नणंद न् कळीचा आनंद' हे ब्रीदवाक्य आमच्या एकी त्यांच्या मुखी रुळलेलं. त्यात त्यांनी भर घातली, "अगोदर आमच्या गळ्यात कोल्हापुरी साज आला तर बराय नाहीतर तुमचं बघून घेतो आम्ही दिवाणसाब!... सांगा जाऊन भावाला! म्हणावं आधी घरातल्या महाराणीचा मानपान! मग इंग्लंडच्या! कळलं ?" आणिक बसल्या की, दोघी पण संगनमतानं माझं डोकं भणाणून सोडीत! हरे राम! साहेबांना सोन्यानाण्याच्या खरेदीतला मनस्वी राग."पाहिजेल कशाला हा सोस ?" असं त्याचं म्हणणं न् ह्यांनी तर मला वेठीला धरलेली! आता? काय सांगावी कथा? गेले तशीच पक्कं

ठरवून न् घातलं साहेबांच्या कानावर असान असं आहे म्हणून! बापरे! रामा शिवा गोविंदा! साहेब एवढे भडकले हे ऐकून की, त्यांनी साफ नकार देत माझी कानउघाडणी केली, "तुला नाही कळत! त्या राणीला सरकारी भेट दिली जाईल. ह्यांचं कोण करील ?”

“तुम्ही! स्वतः तुम्ही!” मला पण जोर चढला. तशी साहेबांनी रागानं असं पाहिलं न् संतापून ते घरातून अशा झटक्यानं बाहेर पडले की, वाटलं आता आपलं कंबरडं ढिलं होणार!.. पण ह्या दोघी घरात दाराभिडून पाहात होत्या ना ? साहेब बाहेर पडल्यासरशी त्या आल्या पुढं न् बोलल्या, “शाब्बास! आता कृती हवी प्रत्यक्षात!”...

“पण तुमचा तरी का हटवादीपणा ?” साहेबांचा राग बघून सर्द झालेल्या मला पण राहावेना तर रोखली मी आपली नजर त्यांच्यावर! वाटलं गप्प बसतील. पण कुठलं काय ? त्यांना आणखीनच जोर चढला, “भाऊमोठ्ठा आहे ना ? मुख्यमंत्र्याला एवढं कोंड पडावं ?”

झालं! आगीत तेल पडावं तसा मग मलाही जोर चढला न् मग मी पण साहेबांना त्यांच्या कचेरीत जाऊन सुनावले, “हे ऐकलं नाही तर त्या दोघी राणीच्या स्वागताला येणार नाहीत पण खूप त्रास उभा करतील घरात रुसून फुगून! ..तुम्ही विचार करावा हे चांगलं. मी तुमचं ऐकलं नाही कोयनेचा उंच कडा माने इंजिनियरांबरोबर जीपनं चढत हेलमेट घालून वीज निर्मितीची चाचणी घेतेवेळी?... ते किती अवघड काम! त्यापूढं हे काहीच नाही. असा काय खर्च येईल ? “हो” म्हणा!”...

साहेब एकदम गप्प बसले न् मीही तरातरा निघून परतले ती थेट पुणं गाठलं!... घरी जाऊन त्या दोघींना कोण तोंड देईल तोफ डागल्यावर त्यांनी ?

पण साहेबांनी आमचं ऐकलं हं! कारण ती इंग्लंडची महाराणी भारतात यायच्या आदल्या दिवशी ह्या दोघींचा फोन आला, आम्हा दोघींचे साज झक्कासपैकी आलेत!... तुम्हाला काय हवं?”

"तुमचं डोंबल!" मी पण प्रतिसाद घातला खरा पण मग उगाचच जीव हळहळला, "साहेबांजवळ एवढे पैसे कुठले ?" आणिक जी मग गप्प गप्प झाले की विचारू नका. साहेब थोडेच श्रीमंत तेव्हा असला हट्ट कराचा आपण ? माझाच जीव मला खाऊन घेऊ लागला न् नजर डबडबून गेली!... तर आमची अशी गंमत!... जीवघेणी!...

पण म्हणून साहेबांनी माझा कधीच रागराग केला नाही. त्यांनी मग मला एकदाच दरडावून सांगितलं; "तू अंगावर दागिने घालून मिरवायचं नाहीस! आई अण्णांना सांगावं लागेल नाहीतर!" त्यासरशी आम्ही एकदम शरणागती पत्करली, "एकदम कबूल! कध्धी काही मागणार नाही यापुढं! मग तर झालं ?" आणि झालं गेलं आईअण्णांना सांगीत स्वारी बसली की, एक दिवस घरी येऊन चुलीपुढं पाट मांडून आईच्या हातचं गरमागरम चवीनं खात!

"आई" म्हणजे साहेबांचा मोठ्ठा वीक पॉईट! मग ती त्यांची आई असो की, त्यांच्या मित्रांची आई असो. साहेब तिथं एकदम नतमस्तक! आईच्या हातचं पोटभर खाऊन, तांब्या तोंडाला लावून पोटभर पाणी पिऊन, ढेकर दिला की, साहेब प्रसन्न न् आई खूश! बास! एवढ्या शिदोरीवर पुढची वाटचाल दणकून होणार न् आईनं मायेनं पाठीवरून फिरवलेल्या हाताच्या उबीला सांभाळीत साहेब दिलखुलास कामाला लागणार.

तर आम्ही पुण्याला घर बांधल तेव्हाची गोष्ट. आमच्या आई अण्णांनी बोलावलं तशी वसंतदादांना घेऊन साहेब पुण्याला आले. मोठा मुलगा म्हणून जमलेल्या मंडळींचे आगत स्वागत मांडीत सर्वांना घेऊन घरात प्रवेश करते झाले.

तशी लोकांनी टाळ्या वाजविल्या न् साहेबांकडून पेढे घेतले हं! तर साहेब कसे म्हणतात."आमची ही मंडळी पुण्यात आली खरी पण कशी स्थिरावतात याची मला पार काळजी लागली होती. मराठमोळ्या माणसांनी पुणेकरांशी सर्वार्थानं सामना करीत जगणं म्हणजे भारी अवघड. पण अण्णा आईनी न् अक्कानताईंनी इथंही आपलं वैशिष्ट्य राखून

बाजी मारली. मला समाधान आहे. हे माझं घर आहे. इथल्या विपुल ग्रंथसंपत्तीत मनसोक्त विहार करायला मी इथं वरचेवर विश्रांतीला येईन."... त्यासरशी आमच्या अण्णांनी त्यांच्या हातात घराच्या किल्ल्या दिल्या न् म्हटलं, "तेवढ्यासाठीच तर घर बांधलंय!"

साहेबांची नजर त्यावेळी कृतज्ञतेतल्या समाधानानं ओली झाली. वातावरण या सुखसोहळ्यात मंत्रमुग्ध होऊन गेलं.

आपल्या माणसात मनमुराद हास्यविनोद दरीत  घटकाभर स्वतःला हरवून बसावं हा साहेबांचा आवडता छंद. आम्ही सगळेच एकमेकांच्या सहवासात असा आनंद पोटभर भोगू शकलो हे आमचं परमभाग्य.

भाग्यावरून गोष्ट निघाली म्हणून सांगते. आमच्या बाबासाहेब पुरंदरेंनी एक दिवशी कानगोष्ट केली."प्रतापगडच्या देवीची स्थापना होऊन तीनशे वर्षे झालीत. तुम्ही यशवंतराव साहेबांना महापूजा करायला लावा. महाराष्ट्राचं कोटकल्याण होईल." ...मग काय ? आम्ही लगेचच साहेबांना कळवून टाकलं न् हे झालंच पाहिजे अशी वेणूताईंकडे कळ लावली.

होता होता महाबळेश्वरला काँग्रेस कार्यकर्त्यांचे एक शिबीर भरलं. तिथं या कल्पनेनं आकार घेतला. बासष्टची निवडणूक येऊन ठेपलेली. तर साहेबांनी घेतलं मनावर न् "ठीक आहे. सर्व व्यवस्था व्हावी." असा संदेश आला. त्या वेळी फलटणच्या राजांनी, मालोजीराव निंबाळकरांनी, हे यजमानपद स्वीकारलं न् कामाची डागडुजी निघाली. राजेसाहेब साहेबांचे सासरे ना ? त्यांनी आम्हाला प्रतापगडावर नेलं न् राजा येणार आहे देवदर्शनाला तर कडेकोट बंदोबस्त हवा म्हणून गडावरील सगळे काने कोपरे, पाऊलवाटा, बुरुज अशी इकडे तिकडे भटकंती करायला लावली तर फिरून फिरून हैराण व्हायला झालं. तशी मी महाराजांना म्हटलं देखील, "अहो, आपलेच तर साहेब येणार आहेत मग एवढं कशाला?" त्याउपर त्यांनी सांगितलं, "म्हणून काय झालं? गडावर सगळं ठाकठीक हवं. आपण बरोबर असा. उणंदुणं निघायला नको."

आता आली का पंचाईत ? आम्हाला टेहळणी बुरुजांची भटकंती निभणार नाही म्हणून सांगायचं कसं ? त्यातून मालोजी राजे म्हणजे वेणूताईचं माहेर. मुकाट्यानं सारा फेरफटका केला तर वेणूताईंचा निरोप आला, “देवीला महावस्त्रालंकार लागतील!” हाय रे भगवान! आता ? पण राजेसाहेबांनी हे साहेबांच्या कानावर घातलं. तशी व्यवस्था केली. सातारच्या राणीसाहेब आल्या. बाळासाहेब देसाईंनी सर्वांना गडावर यायचं निमंत्रण केलं. माणसं आली न् झोकात या महापूजेचा सोहळा पार पडला. साहेबांनी देवीच्या साक्षीनं शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला न् त्यांनी इतिहासकालीन प्रसंग साक्षात नजरेत भरतील अशा झोकनोकाचं भाषण केलं. जमलेल्या मित्रमंडळींबरोबर जेवणखाण करतेवेळी पोटभर गप्पागोष्टी झाल्या. बाळासाहेब देसाई न् ते बराच वेळ बोलत राहिले... मालोजी राजांशी कानगोष्टी झाल्या.. आम्ही सगळे गड उतरून आलो. .. जिवाला एकदम शांती आली. मित्रमंडळात राहिलं की, आयुष्यातलं सर्वोत्तम सुख भोगणाऱ्या साहेबांचीही कळी खुलली.. ग.दि. माडगूळकर अण्णा आलेवते तर काव्यविषयक चर्चेला ऊत आला.. साहेबांच्या मधल्या कवीनं मान वर केली आणिक जो आनंद सोहळा महाबळेश्वरी साजरा झाला त्याला तोड नसावी!

साहेब मुळातच भारी रसिक माणूस. संगीत, नाटक, नृत्य, लोकनाट्य यातला कलाविलास त्यांची ब्रह्मानंदी टाळी लावू देणारा प्रांत !... तास न् तास अशा मैफलीत त्यांचा जीव रमायचा !..

मला आठवतं. १९६८ सालच्या १ मे ची गोष्ट. मी नुकतीच राज्यसभेत गेलेली. तर त्या दिवशी महाराष्ट्रदिनाची धूमधाम चाललेली. सायंकाळी रसिकांसमोर महाराष्ट्राचं लोकनाट्य रंगमंचावर आलेलं. तिथे मी न् साहेब पुढल्या रांगेत!... होता होता एक कलावंतीण पदराचा मोरपिसारा उडवीत नाचत नाचत पुढं आली तशी कुणीतरी खेड्यातल्यागत शिट्टी मारली म्हणताना शेजारी बसलेल्या पु.लं.ना साहेबांनी हळूच सांगितलं.,

“आक्काताई आलीय. त्या माणसाला जरा बेतानं घे म्हणावं!”... त्यासरशी पुन्हा ती शिट्टी वाजली न् मी बोलून गेले, “काय हे ?... इथं कशाला ही असली दाद ?” म्हणताना कोणतरी कुजबुजलं, “इथं कशाला आलीय आक्काताई ? तिला घरी पाठवा.” हे ऐकलं मात्र न् मी चटदिशी उठून तिथून काढता पाय घेतला!.. साहेब पाठोपाठ आले न् त्यांनी डोंगरेंना सांगितलं, "हिला घरी पोचवून द्या” आणि स्वतः पुन्हा त्या संगीत सभेत जाऊन बसले... आहे की नाही म्हणजे ? ..अस्सा राग आला पण करणार काय? जाम बोलले नाही दोन दिवस त्यांचेशी तर! ..

पण आमचं सातारी घराणं ना ? तमाशाला बायकांनी गेल्यावर राहिलं काय? .. साहेब पुढारलेले खरे पण डोक्यात हीच संस्कृती ना ? .. आम्ही पण मग म्हटलं, “जाऊ देत! देखा जायेगा!”.. तर काय ? ... उग्गीच हे नको ते नको म्हणजे ?

आता आणखीन् एक सांगू ? आमच्या पुण्याच्या शाहूमंदिर महाविद्यालयाच्या पायाभरणी समारंभाला पं. जवाहरलाल नेहरूंना बोलावलेलं. तर त्या वेळी बाळासाहेब देसाई, भाऊसाहेब हिरे आणखी कोण कोण चिक्कार आलेले. त्या वेळी स्वागत गीतासाठी व्यासपीठाच्या एका कोपऱ्यात तंबोरा घेऊन मी बसलेली बघून साहेब आश्चर्याने थक्क झाले! त्यांना मी गायला बसावं हे आवडलं नाही असं त्यांचा चेहरा बोलला पण मी तोवर तंबोरा छेडायला सुरुवात केली! पेटीवादकासह इतरांना खुणावीत स्वर लावला पण!...

**चढले उंच निशाण**
**करूनी नव भारत निर्माण**

या मीच लिहिलेल्या गीताची आळवणी एवढी सुरेख झाली की, पंडितजींनी 'बहोत अच्छा' म्हटल्यासरशी साहेबांनी त्यांना सांगून टाकलं, "ही माझी धाकटी बहीण हिला आमच्या सांस्कृतिक जीवनाची सगळी माहिती विचारा. सांगेल ती!" ... आणि एरव्ही माझ्या लोकगीत गायनाची सर्वांकडून वाहवा ऐकताना खूश होणारे साहेब मला एका बाजूला बोलावीत म्हणाले कसे, "हे साहित्य संमेलन नव्हे! ..पुन्हा असं नकोय!" ...

तेव्हापासून साहेबांसमोर मी कधी साहित्य संमेलनाखेरीज लोकगीत म्हटलं नाही की, तंबोराही हाती धरला नाही!.. एरव्ही आमच्या लेखनाची तारीफ करणाऱ्या साहेबांना आमचं हे असलं वागणं खपत नव्हतं ना ?

पण मग कसं कोण जाणे एक दिवस साहेबांनीच मला गळ घातली, "पाळणा म्हणायचा आक्काताई!" म्हणताना मी 'आ' वासून त्यांच्याकडून आलेल्या फोनकडे पाहिलं तशी वेणूताई बोलून गेल्या, "आत्याबाई आहात ना ? बाळाचं नाव ठेवायचंय ?" ... मला एकदम समजेनाच त्यांचं हे टेलिफोनवरचं बोलणं! राहिले गप्प गप्प! उत्तरच केलं नाही.

तेवढ्यात आमचे जी.डी. पाटील गाडी सोडून आले न् मधुकरराव चौधरींच्या बाळाचं नाव ठेवायला मला मुंबईला घेऊन गेले! .. ही मंडळी तेव्हा साहेबांच्या मंत्रिमंडळातील ना? आणि मी 'कॅबिनेट सिस्टर!' ... गेले तर सगळे एकत्र जमलेले. बारशाचा थाट उडून गेलेला. बाळलेणी मांडून ठेवलेली. पाळणा सुगंधी फुलांनी सजविलेला. सगळी मंडळी नटूनथटून हजर!

"नाव काय ठेवायचं ?" मी सहजीच विचारलं. तर वेणूताई बोलून गेल्या, "ते तुम्हीच सांगायचं. आम्ही फक्त तुमच्या तोंडात पेढा घालून पाठीत बुक्क्या घालणार!"

बापरे! मी कुठं काही विचार केलावता? गेले गडबडून तर साहेब लांबून बोलले, "आवरा लौकर. आम्हाला मीटिंग आहे. आणि लेखकाला कशाला हवा एवढा विचार ? चटकन सांगून टाका न् म्हणा पाळणा. एकदम सातारी!".. त्यासरशी मागचा पुढचा विचार न करता बाळाचं नाव मी 'शिरीष' ठेवलं न् आमच्याकडे बारीक मोतीराम म्हणतात तो पाळणा म्हटला!..

"भले शाब्बास!" साहेबांनी पाठीवर शाबासकीची माया थापली. ते निघून गेले न् मग आम्ही सगळ्या बसलो गप्पागोष्टी करीत. सगळ्यांनी उखाणा घालीत नाव घेतलं. वेणूताई मुख्य यजमानपदी. तर त्यांनी लाजत मुरकत प्रारंभ केला, "पाची पांडव साध्वी धुरपती, यशवंतरावांसारखे मिळाले पती तर देवा तुमचे आभार मानू किती".. सगळ्यांनी टाळ्या पिटल्या. पाठोपाठ सगळ्यांनी लाह्या फुटाव्यात तशी "नावं" घेतली... बारसं मग जेवण खाण होत मस्तपैकी रंगलं... आनंदी आनंद झाला... साहेबांनी आपल्या नेत्रांच्या साक्षीनं भरभरून कवतिक मांडलं.. माझ्याकडून नवीन कविता म्हणून घेतल्या... "आक्का ताईला साडी द्या वेणूबाई" म्हणाले न् मग जो हशा पिकला की, विचारू नक्का!... साहेब देखील खळखळून हसले...

साहेब खरंच मोठा गुणाचा, अगत्याच्या विचारपुशीचा माणूस. कोणा एकाचं काही आवडलं की, दाबून कवतिक मांडणार. स्वतः लिहिलेल्या पत्रानं आपली आवडनिवड कळवणार. प्रत्येकाचा वडीलधारा होणार. उत्तेजनाची थाप पाठीवर टाकीत 'आगे बढो' म्हणणार. अशा वेळी त्यांच्यातला गुणग्राही रसिक खडबडून जागा होणार.

आमच्या बाबतीत मागं एकदा अशीच वेळ चालून आली. त्या वेळी मी फलटणच्या राणीसाहेबांच्या आग्रहाखातर विकास योजनांचे संदर्भात एक

कविता लिहून दिलेली. तर साहेब फलटणला आल्यासरशी त्यांच्यापुढं मुलींनी ती गाऊन दाखविलेली. साहेबांना ती कविता त्या वेळी एवढी आवडली की, रातोरात खास दूताकरवी त्यांनी मला आपला अभिप्राय स्वतःच्या हस्ताक्षरात कळविला –

भल्या पहाटेला हे पत्र घेऊन माणूस आला तशी काय वाटलं कसं सांगू? "भाऊ असावा तर असा" हा विचार मनात घोळला न् मी घरातल्यांशी बोलून गेले, "साहेब, स्वतः लेखन का नाही करीत? त्यांनी लिहिलं तर लोक त्यांचं पुस्तक डोक्यावर घेऊन नाचतील!" त्या वेळी आमच्या कुटुंबानं तसा ठराव पास केला. साहेब पुन्हा भेटले रे भेटले की, त्या ठरावाची प्रत सदैव वाचली गेली... आमच्या त्या तगाद्यातूनच मग 'होय' 'नाही' करीत 'कृष्णाकाठ' चा जन्म झाला!

साहेबांची जिद्द तशी दांडगी. मनावर घेतलं की, ठरली गोष्ट करणार म्हणजे करणारच! मग काही होवो. पण आमचा हा भाऊ तसा फार हळवा. माणसांचा लोभी. इष्टमित्रांच्या सहवासाला हपापलेला. मतभेदांच्या पोटी रागावेल, चिडेल, संतापेलही. पण मनाचा दिलदार. सुप्पाएवढ्या काळजाचा. आभाळाएवढ्या मायेचा. तर त्यातलं सगळं ठाकठीक राहावं म्हणून आमची कधी कधी तारांबळ उडायची!

एकदा मोठा विलक्षण गंभीर प्रसंग उभा राहिला. साहेबांचं न् बाळासाहेब देसाईंचं कडाक्याचं भांडण झालेलं!... एकमेकांचं बोलणं भाषण एकदम बंद! कारणंबिरणं हरी जाणे! पण कुणालाच चैन पडेना. हे मेतकूट जमवायचं कसं ? वेणूताईंनी विचार केला. मला बोलावून घेतलं न् म्हणाल्या, "मोठ्या दिराला बोलावून घ्या. साहेब पार्लमेंटमध्ये असू देत. तेवढ्या वेळात येवून जा म्हणावं. लावा फोन."

बापरे! केवढं अवघड काम ? पण आमच्या किसनवीर आबांनी दिलेला अत्तराचा फाया कानातून काढून वेणूताईंच्या न् माझ्या हाताला माखला. फोनलाही लावला! मग फोन करून बाळासाहेब देसाईंना रातोरात या म्हटलं." गळ घातली. मेहेरबानही ठरल्या वेळी आले!...

साहेब पार्लमेंटकडे गुंतले असताना बाळासाहेब वेणूताईंकडे जाऊन भेटले. काय बोलणं झालं देवाला माहीत! पण दोघेही हुंदक्यानं दाटले असावेत असा अंदाज आला. दीरभावजय जेवले खावले. बोलले बसले. बऱ्याच वेळानं जेवायला म्हणून साहेब न् मी घरी आलो तर पाहताक्षणीच बाळासाहेब न् साहेब क्षणार्धात एकमेकांच्या मिठीत विसावल्याचं भाग्य साक्षात आम्हाला दिसलं!.. तीच गोष्ट पुढं काही दिवसांनी अशी मध्यंतरी वसंतदादांच्या न् साहेबांच्या बाबतीत घडून गेली.. अंकलखोपला दोघांची दिलजमाई झाली. महाराष्ट्राला या मित्रांचा भरभक्कम आधार मिळाला!..

त्या वेळी तर आम्ही आपापल्या घरी. पण हे कळलं मात्र न् असा ब्रह्मानंद झाला की, त्यापुढं इंद्राघरचं वैभव पार फिक्कं फिक्कं पडून जावं! ..

## तुळशीदास जाधव
## महाराष्ट्राचे शिल्पकार

यशवंतराव म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे यशवंतराव असे समीकरण भारताच्या इतिहासात भारतीय इतिहासकाराला नमूद करावेच लागेल. महाराष्ट्राच्या राजकीय व आर्थिक तसेच सामाजिक जीवनात बदल घडविण्यात श्री. यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांना स्वतःला दैन्य, दारिद्र्य आणि दुःख यांचे चटके कसे असतात; दारिद्र्याचे, पिळवणुकीचे आणि प्रसंगानुसार अपमानाचे जिणे कसे असते याचा कटू अनुभव त्यांच्याही वाट्यास आला आहे. गांधीजींच्या आध्यात्मिक अहिंसावादी तत्त्वाची कास धरून ते राजकारणाच्या आखाड्यात उतरले असले तरी त्यात पुरोगामी विचारांचे, जागतिक कीर्तीचे पुढारी दे.भ. एन्. एम्.रॉय यांच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास आणि प्रत्यक्ष अनुभव याची त्यात भर पडली आहे. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात सरदार होऊन व या देशाच्या आणि समाजाच्या उत्कर्षासाठी कारागृहातील खडतर नि माणुसकीशून्य अशा वागणुकीला तोंड देऊन त्यावर विजय मिळविला आहे. ते खंदे वीर होते. विचारांची थोडक्यात परिणामकारक मांडणीही त्यांनी चांगलीच कमाविली होती. लोकसंग्रहाचे तर त्यांना वरदानच होते असे म्हणावे लागते. सभेत, असेंब्लीत, पार्लमेंटमध्ये व शिबिरात त्यांचे मोजक्या शब्दात, विषयानुरोधाने पण तितकेच वेळेच भान ठेवून होत असलेले अचूक अन् प्रभावी वक्तृत्व ऐकण्यास श्रोतृगण उत्सुक असे. समाजातील सध्या मानली जात असलेली जीवनमूल्ये एखाद्या कार्यकर्त्याच्या वैयक्तिक जीवनात असण्याचा त्यांचा अनाग्रही स्वभाव असल्यामुळे जवळच्या कार्यकर्त्यांबद्दल ते जिद्दीने अनुकूलता दाखवीत. एवढेच नव्हे तर त्यास आग्रही पाठिंबा देत. वैयक्तिक जीवन व राजकीय जीवन यांची सांगड

घालण्याचा ते आग्रह धरीत नसत. कोमल मनाच्या अस्तित्वाबरोबर कठोर मनाचा धगधगीत जीवन्तपणा त्यांच्यात काही कमी नव्हता. महाराष्ट्रातील गरीब, श्रमजीवी, शेतकरी, कामगारांना ते आपलेसे वाटत. मोठ्या शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना, मध्यमवर्गीयांनासुद्धा त्यांच्याविषयी  जिव्हाळा वाटून ते हवेहवेसे वाटत. कामाचा डोंगर रात्रंदिवस उरकत असताना प्रकृतीवर ते चांगलाच ताबा ठेवून असत. चर्चेने, सामोपचाराने, विचारांच्या देवघेवीने व सर्वांना बरोबर नेल्यानेच लोकशाही चांगली निरोगी राहते, अशी त्यांची विचारधारणा असल्यामुळे कुठेही आणि केव्हाही, इतरांचे विचार ऐकून घेण्यास ते तयार असत. नापसंत विचारास, कृतीस त्यांची विरोध करण्याची, विरोध दर्शविण्याची, रीत बेमालूम असे. समोरचा भिडू परस्पर घायाळ करण्याचे असे कौशल्य फारच थोड्यांना साधत असते.

१९४६ सालापासून सतत महाराष्ट्रात पार्लमेंटरी सेक्रेटरी, डेप्युटी मिनिस्टर, मिनिस्टर, चीप मिनिस्टर असे पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे त्यांचे कार्यवलय वाढत जाऊन भारत सरकारच्या निरनिराळ्या महत्त्वाच्या खात्यात आणीबाणीचे वेळी महत्त्वाची कामगिरी बजावून ते भारतात भारताचे आर्थिक भाग्य घडविण्याचे जागी विराजमान होऊन त्यांनी देशहित केले.

“लोकांनी, लोकांसाठी, लोकांच्या हितासाठी चालविलेले राज्य” असा खऱ्या लोकशाहीचा सिद्धान्त यशवंतरावांनी आपला जीवनपाया मानल्यामुळे ते सतत वरील तीन गोष्टी लक्षात ठेवून वागत. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागाला आणि कष्टाला ते जुमानीत नसत, पण त्याचबरोबर लोकांनाही, लोकांच्या समूहालाही, आपल्याबरोबर नेण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात ते कसूर करीत नसत आणि विशेष हे की, आतापर्यंत त्यांच्या अशा प्रयत्नास यशही आले होते.

देशाच्या भाग्यविधात्या आणि सर्व थरात सर्वांच्या अंतःकरणात मायेचे ठाण मांडून बसलेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांच्या “नव्या भारत”

घडविण्याच्या कामात ते चांगलेच साथीदार होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा मी सेक्रेटरी असताना सर्व महाराष्ट्रभर फिरलो. यशवंतरावांच्या पुण्याच्या सभेत त्यांच्या सभेवर दगडांचा वर्षाव झाला होता. माझ्या महाड, कोल्हापूर आदी शहरातील मोठमोठ्या सभांवरही दगडांचा, काठ्यांचा वर्षाव झाला. सर्व महाराष्ट्रभर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा त्या वेळी बहर होता. गांधी टोपी घालून फिरणे, सभा करणे अत्यंत कठीण झाले होते. अशा वेळी यशवंतरावांनी लोकांना नावे न ठेवता, "प्रसंगी लोक फुलांचे हार घालतील, प्रसंगी तेच लोक जोडा-चप्पलाच्या माळाही चढवतील. तेव्हा ते दोन्हीही समसमान मानून त्यांच्यात त्यांच्यासाठी काम करणे हे खऱ्या राजकीय पुढाऱ्याचे काम आहे." अशी त्यांची विचारवन्त भूमिका होती. कधी-कधी, "लोकांना समाधान वाटेल असे केले पाहिजे." असेही ते म्हणत. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्यात मुख्यतः श्रीमती इंदिरा गांधी यांचा हात आहे असे ना. चव्हाणांनीच आपल्या भाषणात सांगितले होते हे जरी खरे असले तरी ना. चव्हाणांचे श्रम व यशही काही कमी नाही! एवढेच नव्हे तर श्रीमती इंदिरा गांधी यांच्या संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या कार्यातील पूर्वपीठिका तयार करण्याचे कौशल्यापूर्ण कार्य ना. यशवंतरावांनीच केले होते. हे आजवरचे गुपित आम्ही त्या वेळच्या निकटवर्तीयांखेरीज इतर कोणालाही फारसे माहीत असणे शक्य नाही.

शिक्षणाचा प्रसार सर्वसामान्य जनतेत स्वस्त व सुलभरीत्या झाला पाहिजे. ज्ञानमंदिराचे दरवाजे सर्वांना खुले असल्याशिवाय सरस्वतीचे खरे दर्शन घडणार नाही. सरस्वतीदेवीच्या दर्शनाशिवाय खऱ्या माणुसकीचे कमळ उमलणार नाही. महात्मा फुले, महर्षी कर्वे, शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील आदी महापुरुषांनी मोठ्या महत्प्रयासाने या ज्ञानमंदिराचे दरवाजे दगड-धोंड्याचे, शेणामातीचे मार खाऊन खाड्खाड् उघडले म्हणूनच या मंदिरात बहुजनसमाज शिरला. पण उंच उंच पायऱ्या, कठीण टप्पे आडवे असल्यामुळे झपझप, लवकर,

चढणे कठीण झाले होते. यशवंतराव आणि बाळासाहेब देसाई यांनी अर्थकठिणाईच्या पायऱ्या, इमारत अभावाचे टप्पे तोडून-फोडून रु. १२००/- नंतर रु. १८००/- वगैरे उत्पन्नाच्या आतील पालकांच्या मुलामुलींना फी माफ करून सरस्वतीदेवीचे डोळे भरून "जवळून" दर्शन घेण्याची संधी प्राप्त करून दिली. दर्शनक्षणी त्या मातेने गुरे राखणाऱ्या, कुळवातिफणीमागे जाणाऱ्या अशा हजारो मुलामुलींमधून उत्तम डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्रोफेसर्स, कलेक्टर्स, मिनिस्टर्स तसेच कायदा घडविणारे एम. एल. ए., एम.पी. आदी लोकप्रतिनिधी तयार केले. त्यांचे सर्वसामान्य समाजाला दान केले एवढेच नव्हे तर त्याच गरीब, श्रमजिवी, शेतकरी, कामगारांच्या गावी, तालुक्यात, जिल्ह्यांत अनुक्रमे ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद देऊन स्वतंत्र स्वराज्य चालविण्यास भरपूर अधिकार व मुबलक पैसा दिला. हे ज्ञानगंगेचे पाचक-पाणी खालपर्यंत पोहोचविण्याचे खरे काम यशवंतराव चव्हाण यांनीच आपल्या सहकारी मित्रांच्या मदतीने केले आहे. या मित्रांत कर्मचाऱ्यांपैकीही काही प्रमुख मंडळी आहेत, त्यात मुख्य म्हणजे त्या वेळचे सोलापूरचे कलेक्टर श्री. झुबेरी व कमिशनर कॅप्टन श्री. एस. पी. मोहिते हे होते. अशा तऱ्हेचा ज्ञानाचा, विकेंद्रित सत्तेचा पर्जन्य महाराष्ट्राशिवाय दिसत नाही.

महाराष्ट्राचा राज्यकारभार भारतात नावलौकिकास येण्यास जी अनेक कारणे आहेत त्यात ना. यशवंतराव यांच्या महाराष्ट्रातील चोख राज्यकारभाराला प्राधान्य दिले पाहिजे.

"स्टडी ग्रुप ऑफ रोड सेफ्टी" या दिल्ली सरकारने नेमलेल्या कमिटीचा चेअरमन म्हणून दोन अडीच वर्षे मला भारतभर फिरून काम करण्याची संधी मिळाली होती. आमच्या स्टडी ग्रुपमध्ये तज्ज्ञ, इंजिनिअर्स, आय. जी., बॅरिस्टर वगैरे चांगल्या मंडळींचा समावेश होता. भारत देशातील रस्त्यावर इतर देशांच्या मानाने अपघात जास्त होतात, ते कमी कसे होतील, त्यासंबंधीच्या सूचना गोळा करणे, प्रत्यक्ष रस्ते पाहणे, लोकांशी व अधिकाऱ्यांशी चर्चा करणे वगैरेही कामे आम्ही केली. अनुभव असा

आला की, महाराष्ट्र राज्याचे पोलिस खाते, पी. डब्ल्यू. डी. खाते आदींचे काम भारतातील इतर सर्व राज्यांपेक्षा पहिल्या प्रतीचे आहे. याचे श्रेय ना. यशवंतराव यांनी मुख्यमंत्री असताना घालून दिलेल्या कार्यपद्धतीला आणि त्यांच्या दक्ष कारभाराला आहे.

ज्या वेळी भारतावर चीनचा हल्ला झाला त्या वेळी दिल्ली सरकारमधील त्या खात्याचे संरक्षणमंत्री आदी संबंधित मंडळी कमी पडली. पंडितजींनी एवढ्या मोठ्या भारतात महाराष्ट्राकडे आशेने पाहून त्यातील सह्याद्री ना. यशवंतराव चव्हाण यांची संरक्षणमंत्री म्हणून निवड केली व परकीयांच्या हल्ल्यास तोंड देऊन देशाचे संरक्षण करण्यास हिमालयाच्या मदतीस बोलाविले. पंडितजींच्या या सन्माननीय आमंत्रणाचा स्वीकार करून महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीस धावून गेला. श्री. यशवंतराव चव्हाणांनी मोठ्या धैर्याने, शिताफीने युद्धनीतीच्या खेळात पाकिस्तानचा चांगलाच पराभव केला व जगात भारत शांत पण तितकाच बलवान आहे हे सिद्ध करून दाखविले. यशवंतरावांना ज्या महाराष्ट्राने मोठे केले, त्यांचे कौतुक केले, ज्या महाराष्ट्राच्या शौर्यशाली बाण्याने ते देशात अधिक उजळ झाले, त्या महाराष्ट्राची जोपासना, वाढ व प्रगती होऊ देण्यास मोकळ्या मनाने व लोकशाही पद्धतीने ते हातभार लावत आणि महाराष्ट्राचा ज्वलंत अभिमान कार्यकर्त्यांत निर्माण व्हावा म्हणून ते सतत प्रयत्नशील असत. असे देवदानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून विष व अमृत उत्पन्न झाले तसे समाजसुधारक व प्रतिगामी (सनातनी) यांच्या महाराष्ट्र मंथनातून अमृतरुपी यशवंतराव चव्हाण उत्पन्न झाले होते.

महाराष्ट्राने टिळक, आगरकर यांच्याशिवाय सर्वसामान्य जनतेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, महर्षी शिन्दे, शाहू महाराज, भाऊराव पाटील, जेधे, मोरे व यशवंतराव चव्हाण असे मोठेमोठे सामाजिक, राजकीय पुढारी तयार केले. तीच टांकसाळ महाराष्ट्राने पुढे चालू ठेवावी असे वातावरण आपण सर्वांनी निर्माण केले पाहिजे. तरच यापुढे महाराष्ट्राची मान आहे त्यापेक्षा अधिक उंचावेल. सामुदायिक

हितात वैयक्तिक हित आहे असा विचार महाराष्ट्रात फारच मोठ्या प्रमाणात वाढविला पाहिजे असे त्यांचे मत होते. शेतीप्रधान महाराष्ट्रास शेतीबरोबर कच्च्या शेती मालाचे रूपांतर इतर पक्क्या मालात करण्यासाठी उभ्या करावयाच्या कारखान्याची कल्पना व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यशवंतरावांनी चांगलेच यश मिळविले आहे. खेड्यातील आजचे सहकारी साखर कारखाने हे त्यांच्याच विचारांचे आणि प्रोत्साहनाचे प्रतीक आहेत. शेतीउद्योग प्रधान महाराष्ट्र झाला पाहिजे अशी त्यांची तळमळ वरचेवर दिसून येत होती.

## सौ. ताराबाई साठे
## समय सूचक चतुर यशवंतराव

श्री. बाळासाहेब खेर मुंबईचे प्रधानमंत्री (मुख्यमंत्री) असताना त्यांच्या पाठीशी त्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून असेंब्लीत बसलेले यशवंतराव पहिल्याने पाहिले. तेव्हापासून ते शेवटपर्यंत या ना त्या कारणाने ते महाराष्ट्राच्या पुढाऱ्यात सदैव गणले जाऊ लागले. काही काळ तर यशवंतरावांचा शब्द म्हणजेच महाराष्ट्राचा शब्द झाला होता! इतके यश फार थोड्या पुढाऱ्यांच्या वाट्याला येत असेल.

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसची सभा मुंबईस मला वाटतं पाटकर हॉलमध्ये भरली होती. बंगलोर अधिवेशनातील दुफळीमुळे काँग्रेसची दोन शकले नुकतीच झाली होती. यशवंतराव सिंडिकेट काँग्रेसमध्ये एक महत्त्वाचा घटक होते. राष्ट्रपतींच्या निवडणुकीत महाराष्ट्र असेंब्लीने सर्वच्या सर्व २०३ सदस्यांची मते श्री. गिरींचे बाजूने न टाकता, श्री. संजीव रेड्डी यांच्या बाजूने टाकून ओ काँग्रेसमध्ये असण्याचा निर्वाळा अगोदरच दिलेला होता! सभेचे वातावरण जरा गरमच होते. मा. इंदिराजींच्या बाजूने श्री. खाडिलकर, श्री. आनंदराव चव्हाण व श्री. तुळशीदास जाधव हे तिघे प्रामुख्याने होते. श्री. खाडिलकरांनी भाषण केले. सभेच्या ओरड्यास न जुमानता आपले मत स्पष्टपणे सांगितले. श्री. तुळशीदास जाधव बोलायला उभे राहिले. ते इंदिराजींचे बाजूने बोलू लागले मात्र आणि सभेत गलबला सुरू झाला! मा. वसंतदादा पाटील अध्यक्ष होते. त्यांच्या उजव्या बाजूस जराशी दूर स्टेजवरच मी बसलेली असल्याने कोण कोण पुढारी मंडळी उठत आहेत, ओरडत आहेत, सर्व मला स्पष्ट दिसत होते. श्री. तुळशीदासजींचे भाषण कोणासच नको होते! पण ते थाबंण्याचे लक्षण दिसेना! सभागृहात उभे राहून, ओरडून, साहेब, यांचे बोलणे बंद करा असे सभासद म्हणू लागले होते. यशवंतराव चतुर व समयसूचक

असल्याने ते चटकन उठून उभे राहिले. माईकला हातबीत लावण्याच्या भानगडीत न पडता त्यांनी तुळशीदास जाधवांच्या गळ्याला आपल्या उजव्या हाताने मिठी मारल्यासारखे करून त्यांना हसत हसत अलगद माइकपासून दूर घेतले ? टपलेल्या वर्तमानपत्रांच्या फोटोग्राफर्सनी चटकन फोटो घेतला. तो दुसरे दिवशी प्रसिद्धही झाला. तो पाहिला तर, जणू प्रेमानेच यशवंतराव तुळशीदासना मिठी मारताहेत असाच कोणालाही आभास होईल!

पंडित जवाहरलाल नेहरू कोथरुडच्या गांधीभवनाच्या उद्धाटनास मागे एकदा आले होते. समारंभ संपण्यापूर्वीच पावसाने झोड उठवली. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. कोथरूड पुणे रस्त्यावरील सखल नाले असलेल्या जागी रस्त्यावरून गाडी जाणे शक्य नाही असा पोलिसचा रिपोर्ट आला! पंडितजींना तर लगेचच जायचे होते. पाणी केव्हा ओसरेल याचा नेम नव्हता. यशवंतराव स्वतः गांधीभवनाहून त्या सखल जागी गेले. स्वतः पाण्यात उतरून त्यांनी त्याचा अंदाज घेतला, व पंडितजींची गाडी यातून जाऊ शकेल असे सांगून गाडीस बोलावलेही! गाडी पाण्यापार जाऊन पुढील कार्यक्रम वेळेवर झाला. अंग व धोतर भिजलेले मुख्यमंत्री यशवंतराव तसेच पंडितजींच्या बरोबर कार्यक्रमास गेले. सर्वांनी यशवंतरावांच्या या गुण वैशिष्ट्याचे कौतुक केले.

ता. १२ जुलै १९६१ रोजी पानशेत व खडकवासला या धरणांच्या फुटण्याने पुण्यनगरीचे सर्व स्वास्थ्य नाहीसे झाले. पुण्यावर महासंकट आलेले समजताच ताबडतोब यशवंतराव पुण्यास आले. डेक्कन जिमखान्याच्या कोपऱ्यावर उभे राहून त्यांनी सर्व अवलोकन तर केलेच पण सर्व पुणेकरांना धीर दिला. श्री. धनंजयराव गाडगीळ व श्री. स. गो. बर्वे यांच्या साहाय्याने ताबडतोबीच्या सर्व इलाजाची व्यवस्था तर केलीच पण पुनर्वसनाचीही आखणी केली. अवघ्या दोन दिवसांत इंद्रायणीचे पाणी स्पेशल ट्यूबने पुण्यास पुरविणेची व्यवस्था केली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या अमोल व तत्पर कामगिरीमुळे पुणेकरांना धीर आला. पण शासनाच्या

तत्परतेचीही धन्यता जाणवली. पुणेकर यशवंतरावांची ही कामगिरी न विसरता त्यांचे सदैव कृतज्ञतेने स्मरण करतील...

साल होते १९६२. भारत चीनबरोबर निकराने लढत होता. श्री. कृष्ण मेनन संरक्षणमंत्री होते. ते बदलायचे होते; पण मग त्यांच्या जागी दुसरा योग्य कोण हा प्रश्न होता. पंडितजी मोठे गुणग्राही होत. त्यांना, अटकेवर झेंडा लावणाऱ्या व मोगलांना सदैव त्राहि भगवान करून सोडणाऱ्या दख्खनच्या शूर मराठ्यांचा नेता साहजिकच आठवला. संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची नेमणूक झाली. त्या वेळी आम्हा सर्व महाराष्ट्रीयन लोकांची मान अभिमानानं उंच झाली. विमान सायंकाळी यायचं होतं. अंधार झाला होता. आम्ही महाराष्ट्रातले सर्व संसद सदस्य व आणखी बरेच लोक विमानतळावर आमच्या महाराष्ट्राच्या नेत्याचे स्वागत करायला गेलो होतो. यशवंतराव यशवंत खरेच. ते आले आणि 'सीज फायर' झाला! युद्ध थांबले. यशवंतरावांना दिल्लीतील प्रथमपदीच यश मिळालं. यशवंतरावांना राज्यसभेचे सभासदस्यत्व दिले गेले. शपथ घ्यायला ते महाराष्ट्रीयन पोषाखातच आले होते. महाराष्ट्राचा त्यांना फार अभिमान होता.

त्यांचे भाषण ऐकायला सर्वांनाच आवडत असे. ते मोजके बोलत. योग्य ठिकाणी तोलून मापून योग्य शब्द घालण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांना वाचनाचाही खूप नाद होता.

## ना. प्रा. राम मेघे
## सुंदर लेण्यांचा शिल्पकार

"प्राप्त काल हा विशाल भू-थर
सुंदर लेणी तयात खोदा,
निज नामे त्यावरती नोंदा
विक्रम काही करा चला तर."

आधुनिक मराठी काव्याचे जनक कवी केशवसुत तथा कृष्णाजी केशव दामले यांच्या "तुतारी" या क्रांतिकारक कवितेतील ह्या ओळी आहेत. महाराष्ट्र भाग्य-विधाते श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी मी जेव्हा जेव्हा विचार करतो, तेव्हा तेव्हा केशवसुतांच्या तुतारीची आणि विशेषेकरून ह्या चार ओळींची मला तीव्रतेने आठवण होते. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचे सारे सार ह्यातून प्रतिबिंबित होते असे मला वाटते. प्राप्त परिस्थितीचे संधीत रूपांतर करून नव्या जीवनाची, नव्या आशा-आकांक्षांची शिल्पे त्यांनी निर्माण केली.

१९४२ च्या "छोडो भारत" आंदोलनात त्यांनी सर्व प्रथम भाग घेतला आणि सातारा, कोल्हापुरचा सारा परिसर त्यांच्या चळवळीने भारावून गेला. घरा-घरातून स्वातंत्र्याची तुतारी फुंकली गेली, स्वराज्याची गीते गायली जाऊ लागली आणि त्यातूनच यशवंतराव चव्हाण या कार्यकर्त्यांचा, कुशल संघटकांचा जन्म झाला. १९४६ साली त्या वेळच्या मुंबई राज्याच्या गृहमंत्र्याचे संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून त्यांनी प्रशासनक्षेत्रात पदार्पण केले. अन्न आणि नागरी पुरवठा, स्थानिक स्वराज्य, जंगल आणि विकास आदी खात्यांची जबाबदारी त्यांच्याकडे आली. ही जबाबदारी म्हणजे एक संधीच आहे असे मानून त्यांनी लोककल्याणाचे आणि जनहिताचे अनेक निर्णय घेतले. प्रभावीपणे त्यांची

अंमलबजावणी केली, आणि कुशल, पुरोगामी विचारांचा प्रशासक म्हणून नावलौकिक मिळविला.

१९५७ साली श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यावर त्या वेळच्या द्विभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी आली. तो काळ असा होता की, महाराष्ट्रातील सारे वातावरण संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने भारावून गेलेले होते, आणि यशवंतरावजी तर महाराष्ट्राचे खंदे पुरस्कर्ते होते. पण भावनिक आंदोलनाच्या लाटेवर स्वार होऊन लोकप्रियता मिळविण्यापेक्षा राष्ट्रीय प्रवाहाशी महाराष्ट्राची सांगड कायम राहावी म्हणून त्यांनी या भावनेवर विवेकाचे बंधन घातले आणि अतिशय नाजूक व कठीण परिस्थितीत द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रिपद स्वीकारले.

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या या अचूक आणि विवेकी निर्णयाने मी आणि माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते त्यांच्याजवळ आलो. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन अमरावती, वर्धा जिल्ह्यात कामाला लागलो. त्या वेळी विदर्भावर भांडवलदारांचे  वर्चस्व होते. ते कमी करून विदर्भाला समाजवादी विचाराकडे वळवावयाचे असेल तर तो महाराष्ट्राबरोबरच राहिला पाहिजे अशा विचारांची आम्ही अनेक तरुण मंडळी होती. गावोगाव फिरून सभासंमेलातून हे विचार हिरीरीने मांडत होतो. अशाच एका माझ्या सभेला श्री. यशवंतरावजी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांच्या सहवासात राहण्याची, बरोबर काम करण्याची ही माझी पहिली संधी होती. त्यांच्या विचारांचा आणि वागणुकीचा फार मोठा परिणाम माझ्यावर झाला.

पुढे १९६० साली १ मे रोजी विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्र यांचे एक सलग मराठी भाषिकांचे राज्य अस्तित्वात आले आणि ह्या यशाचे शिल्पकार असलेल्या यशवंतरावांचीच मुख्यमंत्रीपदी एकमताने निवड झाली. भविष्याची भूमी फुलविण्याची आणखी एक संधी त्यांना मिळाली. अर्थात या पदावर यशवंतराव अवघी दोन अडीच वर्षे होते. पण या दोन वर्षांच्या अल्प काळातही त्यांनी अनेक क्षेत्रांत नवविचारांचे वारे निर्माण

केले. मराठी भाषिकांच्या समर्थ आणि समृद्ध महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या अनेक योजना सुरू केल्या. गरीब मुलांसाठी फी माफीची योजना, औद्योगिक वसाहतींची स्थापना, कसेल त्याची जमीन हा कायदा, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची निर्मिती करून संस्थेच्या विकेंद्रीकरणाला व ग्रामीण नेतृत्व जोपासण्याला त्यांनी गती दिली. साहित्य, संगीत, कला, नाट्य, लोककला यांना ऊर्जितावस्था येण्यासाठी अनेक योजना त्यांनी हाती घेतल्या. या साऱ्या प्रयत्नातून एका नव्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, औद्योगिक परिवर्तनाला श्री. यशवंतरावांनी प्रारंभ केला. आज महाराष्ट्र राज्याचा रौप्य महोत्सव साजरा केला जातो आहे. या प्रसंगी मला वळून पाहिले की, यशवंतरावांनी लावलेल्या रोपट्याचे आज भरदार वृक्षात रूपान्तर झालेले दिसते.

प्रबोधन आणि परिवर्तनाचा विचार करताना यशवंतरावांनी राज्याचा अविकसित आणि उपेक्षित भागांना नेहमीच झुकते माप दिले. विदर्भातील जल, वन आणि खनिज संपत्तीचा उपयोग करून विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पारस वीज केंद्राची स्थापना, औद्योगिक वसाहतींची निर्मिती यातून त्यांच्या प्रयत्नांची दिशा आपल्याला दिसते.

यशवंतरावांनी नेहमीच बेरजेचे राजकारण व समाजकारण केले. जोडण्यावर, वाढविण्यावर त्यांचा नेहमी भर असायचा. एखादा चांगला कार्यकर्ता दिसला की, ते त्याला जवळ करीत, कामाला लावीत. याचा मी अनुभव घेतला आहे. विदर्भ युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी श्री. मधुसुदन वैराळे यांनी माझे नाव यशवंतरावांना सुचविताच त्यांनी त्याला लगेच संमती दिली.

त्यानंतरचा लक्षात राहण्याजोगा प्रसंग १९६६ साली विधान परिषदेसाठी शिक्षक मतदारसंघातून माझे नाव मा. यशवंतरावांनी बडोदा येथे भरलेल्या पार्लमेंटरी बोर्डात जाहीर केले. हा निर्णय मला कळताच

धक्का बसला. त्याचे कारण त्या वेळी शिक्षक मतदारसंघात एकूण १३ जिल्हे होते. आठ जिल्हे विदर्भाचे व पाच जिल्हे मराठवाड्याचे हा अती विस्तारित मतदारसंघ मला पूर्णपणे अपरिचित होता. यामुळे मी यशवंतरावांना भेटून मला तिकिट देऊ नये अशी विनंती केली त्या वेळी यशवंतराव म्हणाले, "ही उमेदवारी तुम्हाला देऊन मी तुम्हाला विदर्भ व मराठवाड्याच्या जनतेसमोर प्रोजेक्ट करीत आहे. नव्या नव्या शिक्षण संस्था निघत आहेत. त्या संस्थांच्या प्रश्नाबाबत परिणामकारक व अर्थपूर्ण उकलीसाठी त्यांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी काँग्रेसने भरीव कार्य करण्याचे ठरविले. काँग्रेस संघटना मजबूत बांधावयाची आहे. निवडणुकीच्या पराजयामध्ये सुद्धा यश दडलेले असते. त्यामुळे रामभाऊ तुम्ही लढले पाहिजे." यशवंतरावांच्या प्रेमाच्या सल्ल्याने मी निवडणुकीस तयार झालो. १३ जिल्ह्यांचा अहोरात्र दौरा करून आटोकाट प्रयत्न केले. दुर्दैवाने मला अपयश आले. मी निवडणूक हरलो पण खचलो नाही. कारण यशवंतरावजींची प्रेरणा मला कार्यप्रवण करीत होती. मी अधिक जोमाने कामाला लागलो.

यशवंतरावजी हे खऱ्याखुऱ्या अर्थाने शिल्पकार होते. कलावंताची सर्जनशीलता, कारागिरीचे कसब आणि भविष्याची स्वप्ने पाहण्याची दृष्टी त्यांच्याजवळ होती आणि या साऱ्यांच्या जोडीला होते व्यावसायिक शहाणपण, विवेचक विचारशक्ती, आणि म्हणूनच आज जरी ते शरीराने आपल्यात नसले तरी विचाराने, आचाराने आणि आत्मिक शक्तीने साऱ्या महाराष्ट्राच्या मातीत, माणसात आणि मनात सामावले आहेत. एकरूप झाले आहेत. त्यांच्या स्मृतीला माझे विनम्र अभिवादन!

## श्री. आप्पासाहेब भाऊराव पाटील
## रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. चव्हाण साहेब

कर्मवीर भाऊराव पाटील हे हयात असताना सन १९५८-५९ मध्ये रयत शिक्षण संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचे ठरले. त्या वेळी या सुवर्णमहोत्सव समितीचे अध्यक्ष त्या वेळचे ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव शिंदे हे होते आणि उपाध्यक्ष त्या वेळच्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मा. नामदार यशवंतरावजी चव्हाणसाहेब हे होते. त्यांनी या सुवर्णमहोत्सवास शासनाच्या वतीने रु. २,००,०००/- (रु. दोन लाख) देणगी दिली होती. यावरून मा. चव्हाणसाहेब यांच्या मनामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कार्याविषयी व कर्मवीर अण्णांच्या विषयी किती आस्था होती हे दिसून येते.

संस्थेचे संस्थापक कर्मवीर अण्णा यांचे निधन ता. ९ मे १९५९ रोजी झाले. त्या वेळी मा. चव्हाणसाहेब आजारी होते व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ते पन्हाळ्यास विश्रांती घेत होते. तरीदेखील कर्मवीर अण्णांच्या अंत्यसंस्काराला ते सातारा येथे हजर राहिले व त्यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांना दिलासा दिला.

कर्मवीर अण्णांच्या निधनानंतर संस्थेच्या कार्यात एकदम पोकळी निर्माण झाली. कारण संस्थेतील प्रत्येक गोष्ट अण्णा स्वतः निर्णय घेऊन करीत असत. तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व असामान्य होते व कार्यकुशलताही अफाट होती. यामुळे अण्णांच्या निधनानंतर संस्थेच्या कार्यकर्त्यांना व सेवकांना दिलासा देऊन संस्थेचे कार्य नेटाने  चालविण्यास योग्य ते मार्गदर्शन करणारी संस्थेच्या अध्यक्षपदी एखादी महान व्यक्ती असावी असा विचार संस्थेच्या कार्यकर्त्यांमध्ये चालू झाला. त्या वेळी विचारविनिमय होऊन मा. चव्हाणसाहेब यांचे नाव अग्रक्रमाने पुढे आले. तथापि त्यांच्या कानावर ही बाब घालून त्यांचा होकार मिळविणे अगत्याचे

होते. त्यासाठी संस्थेची काही मंडळी त्यांना भेटण्यास गेली, त्यामध्ये मी होतोच. त्यांना कल्पना देताच, त्यांनी ताबडतोब अनुमती दिली.

सन १९६० मध्ये नेर्ले ता. वाळवा जि. सांगली येथील संस्थेच्या हायस्कूलचे "कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय" असे नामकरण मा. चव्हाणसाहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्या वेळी ते म्हणाले, "मुंबई राज्याचा मुख्यमंत्री झाल्यावर मला जे समाधान झाले होते, त्यापेक्षा अधिक समाधान मला रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झाल्याने होत आहे."

मा. चव्हाणसाहेब हे संस्थेचे अध्यक्ष झाल्यावर ते नियमाने दरवर्षी ९ मे रोजी कर्मवीर अण्णांच्या पुण्यतिथीचे वेळी सातारा येथे हजर राहात. याच दिवशी संस्थेच्या जनरल बॉडीची बैठक होत असे. या बैठकीस ते उपस्थित राहात. या बैठकीत संस्थेचा गतवर्षाचा आढावा घेतला जाई, नवीन वर्षाच्या कामाची आखणी होई आणि या वेळी मा. चव्हाणसाहेब हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत. तसेच कार्यकर्त्यांमध्ये काही समस्या निर्माण झाली असल्यास सर्वांना विश्वासात घेऊन व वाटाघाटी करून त्या समस्या दूर करीत.

मा. चव्हाणसाहेब हे १९६० पासून संस्थेचे अध्यक्ष होते. परंतु त्यांनी "अमूक नोकराची बदली करा अगर अमूक नोकरास नेमून घ्या" असे कधीही म्हटले नाही ! संस्थेच्या प्रशासनात त्यांनी कोणत्याही स्वरूपात हस्तक्षेप केला नाही. इतके ते काटेकोरपणे पथ्य पाळीत.

मा. चव्हाणसाहेब हे संस्थेचे अध्यक्ष झाल्याने अप्रत्यक्षरीत्या संस्थेचे अनेक फायदे झाले. संस्थेची सर्व कामे सुकर होण्यास फारच मदत झाली. तसेच जनतेतील राजकीय लहान मोठे कार्यकर्ते संस्थेच्या कार्यात अधिक जोमाने मदत करू लागले. संस्थेचे सेवक व कार्यकर्ते यांनाही काम करण्यास अधिक उत्साह मिळून संस्थेच्या कार्याचा उठाव एकसारखा होत राहिला. अशा रीतीने कर्मवीर अण्णांच्या निधनानंतर संस्थेच्या कार्यात जी पोकळी निर्माण झाली होती ती त्यांनी संस्थेचे

अध्यक्षपद स्वीकारून काही अंशाने का होईना भरून काढली यात मुळीच संदेह नाही.

## मुकुंद शं. किर्लोस्कर
## मला भेटलेले गुणग्राही यशवंतराव

राजकारणात विरोधकाला नामोहरम करण्याचे किंवा जिंकण्याचे अनेक मार्ग असतात. त्यापैकी एक प्रभावी मार्ग म्हणजे विरोधकाचीही अचूकवेळी गुणग्राहकता प्रकट करणे. आपल्याबद्दल अनपेक्षितपणे प्रकट झालेल्या या गुणग्राहकतेने, विरोधकाची अस्मिताही क्षणभर सुखावते व विरोधातला कडवटपणा किंवा धार आपोआप बोथट होते.

श्री. यशवंतरावजी चव्हाण गुणग्राहकतेचा या प्रकारे वापर करण्यात मोठे प्रवीण होते, हे मी अनेकांकडून ऐकले होते. परंतु याचा अनुभव मला एका अनपेक्षित प्रसंगाने आला.

प्रसंग होता निवडणूक प्रचाराच्या धामधुमीचा!

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी त्यावेळी महाराष्ट्रभर जोरदार आंदोलन चालू होते. वास्तविक, खऱ्याखुऱ्या मराठी जनतेच्या या चळवळीचे नेतृत्व श्री. यशवंतरावजींसारख्या महाराष्ट्राच्या उमद्या, तरुण नेत्याकडेच असावयाचे. परंतु, "महाराष्ट्रापेक्षा पंडीत जवाहरलाल नेहरु हे अधिक थोर" असल्याचा साक्षात्कार श्री. यशवंतरावजींना त्या सुमारास झाला, व त्यांनी विशाल द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास मान्यता दिली.

माझे स्वतःचे मत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे बाजूने होते. स्वाभाविकच, माझ्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या "किर्लोस्कर" मासिकातून मी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोरदार पुरस्कार करीत होतो. श्री. यशवंतरावजी हे 'किर्लोस्कर' मासिकाचे एक नियमित वाचक. एरवी मी श्री. यशवंतरावजींच्या चहात्यांपैकी एक असलो, तरी संयुक्त महाराष्ट्र चळवळीने आम्हा दोघांना परस्पर विरोधी गटात नेऊन दाखल केले होते. माझ्या संपादकीय स्फुटांतून श्री. यशवंतरावजींच्या द्विभाषिक

राज्याच्या भूमिकेवर मी घणाघाती हल्ला चढवीत होतो. माझ्यामधील चाहत्याचे रूपांतर श्री. यशवंतरावजींच्या विरोधकात झाले होते. म्हणून, आमची कधी धावती गाठभेट झाली, तरी श्री. यशवंतरावी पद्धतीने माझ्या पाठीवर मित्रत्वाची थाप मारीत श्री. यशवंतरावजी विचारीत, "हं! मुकुंदराव! काय म्हणतो आहे तुमचा संयुक्त महाराष्ट्र!" - आणि मीही तेवढ्याच मिष्किलपणे प्रत्युत्तर देई, "मिळवू! मिळवू! एक दिवस संयुक्त महाराष्ट्र आम्ही मिळवूच!"

याच सुमारास द्विभाषिक राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका उद्भवल्या. निवडणुका म्हणजे चुरस आलीच! या वेळी तर चुरशीला विलक्षण धार चढली होती. कराण, सत्ता काँग्रेस पक्षाकडे, पण मराठी जनता मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमागे! त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचे भवितव्य मोठ्या धोक्यात आले होते. स्वतः श्री. यशवंतरावांची निवडणूकही याला अपवाद नव्हती.

त्या वेळी 'किर्लोस्कर' च्या निवडणूक विशेषांकासाठी माझे लेखक मित्र प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांचे समवेत मी श्री. यशवंतरावजींची खास मुलाखत घेतली होती.

निवडणुकीनिमित्त घेतलेल्या अशा खास मुलाखतीवरील लेख संबंधित मुलाखतदाराकडून संमत करून घेतल्याखेरीज मी तो 'किर्लोस्कर' मधून प्रसिद्ध करीत नसे.

स्वतःच्या निवडणुकीनिमित्त श्री. यशवंतरावजी त्या वेळी कराड मतदारसंघात प्रचार दौऱ्यावर होते. मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी, त्यात काँग्रेस पक्षाचे पुढारी म्हणून महाराष्ट्रातल्या निवडणुकांची जबाबदारी, श्री. यशवंतरावजींच्या शिरावर! त्यामुळे अहोरात्र त्यांची धावपळ चालू होती. मिनिटाची फुरसत मिळणेही कठीण!

पण माझे ओगलेवाडीचे मित्र श्री. भैय्यासाहेब पाध्ये यांनी मोठ्या प्रयासाने श्री. यशवंतरावजींशी माझी मुलाखत ठरविली.

किर्लोस्करवाडीस मला श्री. भैय्यासाहेबांचा फोन आला "उद्या सकाळी सहा वाजता तुम्हाला श्री. यशवंतरावांची भेट घ्यावयाची आहे!"

"ही कसली वेळ ?" असे मी मनाशी म्हणालो खरा. परंतु दुसरे दिवशी किर्लोस्करवाडीहून कराडला जाऊन कोयनेकाठच्या सरकारी डाकबंगल्यावर वेळेवर दाखल झालो. माझ्यासमवेत प्रा. ऊर्ध्वरेषे व श्री. पाध्येही होतेच.

आम्ही गेलो तेव्हा श्री. यशवंतरावजी झोपलेले होते. आपल्या मतदारसंघातील निवडणूक प्रचार सभा आटोपून ते पहाटे दोन तीन वाजता डाक बंगल्यावर परतले होते. तथापि, आम्ही येताच आपणास उठविण्याबद्दल त्यांनी नोकरमंडळींजवळ आठवणीने निरोप दिला होता. पण त्यांना विश्रांती मिळावी म्हणून आम्ही वाट पाहणेच पत्करले.

सातचे सुमारास तोंड धुऊन श्री. यशवंतरावजी बाहेर आले. हंसतमुखाने त्यांनी आमचे स्वागत केले; उशीराबद्दल दिलगिरी व्यक्त केली; दाढीचे सामान समोरच्या टेबलावर ठेवले, व स्वतःच्या तोंडाला साबण लावीत ते म्हणाले, "करा सुरुवात!" क्षणभर आम्हीच ओशाळलो. परंतु अंगात गंजिफ्रॉक व खाली धोतर अशा वेषात दाढीचा ब्रश चेहऱ्यावरून फिरवीत श्री. यशवंतरावजी फिरून म्हणाले, "करा सुरुवात! मी ऐकतो आहे.!"

प्रा. ऊर्ध्वरेषेनी मुलाखत वाचनास प्रारंभ केला. इकडे दाढी करता करता श्री. यशवंतरावजी एक चित्राने शब्दन् शब्द बारकाईने ऐकत होते. मधूनच एखाद्या शब्दाची दुरुस्ती सुचवीत होते.

सुमारे वीस-पंचवीस मिनिटात प्रा. ऊर्ध्वरेषेंचे मुलाखत वाचन संपले. मान वर करून त्यांनी श्री. यशवंतरावजींकडे पाहिले. एखाद्या गवयाने सुंदर तान घेताच रसिक प्रेक्षकांनी हात उंचावून त्याला दाद द्यावी, तसा आपला मोकळा असलेला डावा हात वर फेकीत श्री. यशवंतरावजी म्हणाले, "उत्तम! उत्तम! फारच उत्तम!" नंतर माझेकडे वळून ते मिष्किलपणे हसत म्हणाले, "मुकुंदराव ! तुम्ही आम्हीतर विरोधक, परंतु

मला जे म्हणावयाचे होते, ते माझ्यापेक्षाही अधिक परिणामकारक शब्दात तुम्ही मांडले आहे. त्याबद्दल मी तुम्हाला मनापूर्वक धन्यवाद देतो !" क्षणभर थांबून ते पुढे म्हणाले, "आता माझ्यासाठी कृपा करून आणखी एक गोष्ट करा ! ही मुलाखत इतकी उत्तम लिहिली गेली आहे की तिच्या एक दहा हजार प्रती मला छापून दिल्यात तर माझ्या मतदारसंघात त्या वाटण्याची मी व्यवस्था करेन ! माझी भूमिका मतदारांना समजण्यासा या मुलाखतीची मोठी मदत होईल !"

तशी व्यवस्था मी यथाकाल केली. ती निवडणूक अगदी निसटत्या बहुमताने श्री. यशवंतरावांनी जिंकली.

तीनहून अधिक तपांच्या माझ्या संपादकीय जीवनात कौतुक वा शाबासकीचे अनेक छोटेमोठे प्रसंग मी अनुभवले. पण "राजकीय" विरोधक असणाऱ्या श्री. यशवंतरावजींनी निखळ स्नेहभावनेने, आणि अत्यंत प्रामाणिकपणे दिलेल्या या शाबासकीचे स्मरण आजही माझ्या स्मरणात ताजे आहे.

पुढे आणखी एका सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त दिल्लीत श्री. भा. कृ. केळकर व मी यांनी त्यांची चारपाच तासांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. दुपारी जेवणासाठी अत्यंत आग्रहाने त्यांनी आम्हाला आपल्या घरीच ठेवून गेतले. जेवणातील गोड पदार्थाकडे मी त्यांचे लक्ष वेधले व प्रश्नचिन्हांकित नजरेने त्यांचेकडे पाहिले तेव्हा ते हसतहसत म्हणाले, "रोज असे गोड नसते! पण आज वेणूताईंचा वाढदिवस आहे ना ?"

अशीच आणखी काही वर्षे गेल. आता ते इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळामध्ये नव्हते. दरम्यान सौ. वेणूताईंचेही अनपेक्षित निधन झाले होते. तथापि दिल्ली भेटीत श्री. यशवंतरावजींची उभ्या उभ्या तरी गाठ घ्यावयाची या माझ्या अनेक वर्षांच्या परिपाठास अनुसरून मी त्यांचे घरी फोन केला.

मी विचारले, "Can I speak to Shri. Yeshwantraoji ?" दुसऱ्या टोकावरून उत्तर आले, "मी यशवंतरावच बोलतो आहे !"

आता ते मंत्री नसल्याने घरी नोकरवर्ग नव्हता. फोन त्यांनी स्वतःच घेतला होता.

ठरल्याप्रमाणे मी १ रेसकोर्स, बंगल्यावर त्यांचे भेटीस गेलो. आमच्या बोलण्यात स्वाभाविकच सौ. वेणूताईंचा उल्लेख आला. बोलता बोलता श्री. यशवंतरावांचा गळा दाटून आला. डोळ्यात जमलेल्या अश्रूंना ते महत्प्रयासाने मागे हटवू पाहात होते. त्यांच्या डोळ्यातील नेहमीचे तेज कोठच्या कोठ लुप्त झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावर गेल्या तीस वर्षांत मी कधीही न पाहिलेला एक विलक्षण भकासपणा आला होता !

दिल्लीहून मी पुण्यास परतलो तेव्हा मित्रमंडळींनी श्री. यशवंतरावजींची खुशाली मला विचारली. मी म्हणालो, "वेणूताई तर गेल्याच ! पण जाताना त्यांनी यशवंतरावांनाही आपणाबरोबर नेलेले आहे. मागे राहिले आहेत ते यशवंतराव नव्हेतच!"

## श्री. शरश्चंद्र वासुदेव चिरमुले
## एकदाच भेटलेली माणसं

११ मे १९८४ या तारखेला इंदूर-मुक्कामी माझी यशवंतराव चव्हाणांबरोबर एकमेव आणि अखरेची भेट झाली. राजकारणी पुरुषांना आवश्यक उपचार म्हणून (किंवा हौस म्हणूनही) धारण करावी लागणारी कवचकुंडले मोठी अभेद्य असतात. (सद्यःस्थितीत ही कवचकुंडले अलंकारिक अर्थाने राहिली नसून वाच्यार्थाने चिलखतासारखी आवश्यक होत चालली आहेत.) जवळिकीचे हत्यार वापरून एखाद्या दृढ परिचितालाही त्या कवचकुंडलांचा भेद करता येत नाही. यशवंतरावांसारख्या जन्मजात सौम्य प्रकृतीच्या आणि हृद्य सभ्यतेच्या व्यक्तिमत्त्वावर ही कवचकुंडले असली तरी ती चमकदार किंवा उग्र होत नसत.

यशवंतराव इंदूरला भेटले तेव्हा राजकारणाच्या ऐन आखाड्यात जवळजवळ नव्हतेच. पण आठव्या अर्थआयोगाचे अध्यक्ष होते. त्या दर्जानुसार सरकारी इतमामाप्रमाणे इंदूरच्या “सर्किट हाऊस” वर राहिले होते. त्यांची भेट हा निव्वळ योगायोग होता. पं. कुमार गंधर्वाच्या षष्ठ्यब्दी-समारंभाला हजर राहून मी त्यांच्याकडेच देवासला मुक्काम किंचित लांबवला होता. अकरा मैलांवरील इंदूरच्या काही मंडळींनी यशवंतराव चव्हाणांना मुख्य पाहुणे म्हणून निमंत्रित करून, कुमार गंधर्वांचा सत्कार आणि दुसरा एक समारंभ अशी दोन कार्यक्रमांची योजना केली होती. कुमार गंधर्वांवरील लोभामुळे कऱ्हाडचा एक कार्यक्रम रहित करून यशवंतराव इंदूरला आले होते.

नियोजित समारंभाआधी “सर्किट हाऊस” वर अगदी घरगुती वातावरणात यशवंतरावांबरोबर निमंत्रितांना चहापान होते व समारंभानंतर वसंत पोतदारांकडे जेवणाचा विश्रब्ध कार्यक्रम होता. कुमार

गंधर्वांच्या सूचनेनूसार मी व श्रीराम पुजारी यांनी सपत्नीक कार्यक्रमाला हजर रहायचे होते. पोतदारांनी आमंत्रण अर्थातच दिले होते.

संध्याकाळी सहाच्या सुमारास आम्ही सात-आठ मंडळी "सर्किट हाऊस" वर चहापानाला जमलो. पाच मिनिटात यशवंतरावजी आले. ते बसल्यावर इतरांसारखाच माझाही यशवंतरावांशी परिचय करून दिला.

"मी तुम्हाला नावाने ओळखतो" यशवंतराव मला म्हणाले, "तुमचं काही लेखन मी वाचलं आहे." बोलणे औपचारिक नव्हते. त्यांनी आशय सांगून एका ताज्या कथेचा उल्लेख केला. मी त्यामुळे सुखावलो हे खरेच.

आता यशवंतरावांना आपली आणखी एक ओळख द्यावी असा मला मोह झाला. त्यांच्याकडून काही मिळवायचे तर मुळीच नव्हते.

"यशंवतरावजी, मी आपल्याला दुसरी एक ओळख देतो." मी म्हणालो, "मी आबा शेणोलीकरांचा दुसरा मुलगा."

ते शब्द ऐकताच यशवंतराव मिनिटभर माझ्याकडे पहात राहिले ! त्यांच्या मुद्रेवरचे भाव हळूहळू विश्रब्ध झाले. कवचकुंडले किंचित बाजूला झाली.

"आबा शेणोलीकरना कोण विसरेल ?" यशवंतराव उद्गारले. हे बोलणेही औपचारिक नव्हते. यशवंतराव कऱ्हाडच्या "टिळक हायस्कूल" मध्ये शिकत असता माझे (जनक) वडील त्यांचे शिक्षक होते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नेमका आणि यथार्थ तपशील यशवंतरावांनी "कृष्णाकाठ" या आत्मकथेत दिला आहे हे मला त्या वेळी माहीत नव्हते ! त्यानंतर काही महिन्यांनी मी "कृष्णाकाठ" हे पुस्तक वाचले.

मग दोन जुने कऱ्हाडकर रहिवाशी खूप वर्षांनी भेटल्यावर, पेठा, माणसे, वस्ती, असे संदर्भ घेऊन बोलू लागतात, त्याप्रमाणे यशवंतराव माफक प्रमाणात पण या सुरात बोलू लागले.

"बापू कुठं असतो ? तो मला फार वर्षात भेटला नाही." यशवंतरावजींनी विचारले.

बापू हे माझे धाकटे काका आणि त्यांचे वर्गमित्र. पण तेही आबांप्रमाणेच निःसंग, यशवंतरावासारख्या मित्राच्या स्थानाचा काही फायदा करून घ्यावा असे चुकूनही त्यांच्या मनात आले नाही. डोंबिवली ते फोर्ट व परत असा प्रवास ते लोकलमधून तीस वर्षे विनातक्रार करीत राहिले. निवृत्तीनंतर कारणाशिवाय ते डोंबिवली सोडीत नाहीत, असे मी बापूंचे वर्तमान सांगितले.

"तुमचा भाऊ कुठं आहे ?" यशवंतरावांचा दुसरा प्रश्न.

"तो पुण्यातच निवृत्त होऊन राहिलाय" मी म्हटले.

"सगळे एकंदर रिटायर झाले !" यशवंतराव स्वतःशीच पुटपुटले.

कऱ्हाडातल्या पंतांच्या कोटाचा उल्लेख झाला. यशवंतरावांनी तिथल्या काही मंडळींची चौकशी केली. कोट फार बदलून गेलाय असे मी म्हणालो. त्यावर यशवंतराव उद्गारले, "अहो, ती नकट्या रावळ्याची विहीर देखील पहिल्यासारखी राहिली नाही!"

"यशंवतरावजी, आपण साताऱ्याला चिरमुल्यांच्या घरी कसे काय आला नाहीत ?

चिरमुल्यांकडे कॉंग्रेसमधील अनेक मंडळी ये-जा करीत असत." मी विचारले.

"अहो, चिरमुले होते त्या काळात मी फार छोटा होतो !" यशवंतराव उत्तरले.

हा त्यांच्या सौजन्याचा भाग असावा. यशवंतरावांचे येणे घडले नसावे एवढेच.

कारण चिरमुले एक्कावन्न साली गेले, आणि १९४६ पासूनच यशवंतराव विधिमंडळात आणि राज्यात, ज्यांची दखल घेतलीच पाहिजे अशा मंडळीत समाविष्ट झालेले होते.

चहापानासाठी आलेल्या इतर मंडळींना मुग्ध ठेवून अधिक घरगुती बोलणे उचित नव्हते.

आम्ही कार्यक्रमासाठी निघालो, तेव्हा यशवंतरावांनी कुमार गंधर्वांना आधी गाडीत बसवले. जन्मजात सौजन्याने माझ्या पाठीवर हात ठेवून त्यांनी मला आत बसायला लावले. मगच स्वतः आत बसले.

गाडीतल्या पाच मिनिटांच्या प्रवासात त्यांचा हात हाती घेऊन मी म्हणालो, "यशवंतरावजी, देण्याघेण्याचा काहीही मतलब नसतो तेव्हा जुनी माणसं भेटल्यावर फार बरं वाटतं. तुमच्या भेटीनं आज मला फार बरं वाटलं. आबांचं गुडविल मला अनेकदा अचानक मिळत गेलेलं आहे. आणि वय वाढलं की, मला वाटंत, आपला नोस्टाल्जियाही वाढत जातो."

"खरं आहे !" यशवंतराव उद्गारले.

समारंभ संपल्यावर आम्ही जेवायला पुन्हा एकत्र आलो, तेव्हा यशवंतराव थकले आहेत हे जाणवले. आम्ही पाचसहाजण सतरंजीवर बसलो ऊठबस करत असताना पायाला त्रास होत असल्याने "मी कोचावर बसूनच जेवतो," असे यशवंतराव म्हणाले. रात्री अकरानंतर जागरण होत नाही असेही त्यांच्या बोलण्यात आले. जेवणे झाली. जातांना निरोप घेतेवेळी ते म्हणाले, पुण्यात तुम्ही कुठेसे रहाता ते माझ्या लक्षात आलंय. पुण्याला निवांत आलो म्हणजे तुमच्या घरी जरूर येईन.

पुढे यशवंतरावजी पुण्यात दोनदा येऊन गेल्याचे वृत्तपत्रात वाचले. त्यांच्या जाहीर कार्यक्रमांचा तपशीलही वृत्तपत्रात आला होता. शिवाय ते "सर्किट हाऊस" मध्ये उतरले होते. अशा प्रसंगी "सर्किट हाऊस" मध्ये जाऊन भेटून बोलायचे तरी काय ? असेही वाटले. सहज जमलेल्या भेटी, गायकाने मैफिलीत सहज घेतलेल्या मुष्कील जागेसारख्या असतात. ती जागा एकदा घेता आली म्हणून पुन्हा घेता येईलच असे नसते. घेता आली तरी तीच-तीच जागा गाण्यातला मजा घालवून बसते!

शिवाय पुनर्भेटी झाल्या नाहीत तरी आपला नोस्टाल्जिया तर कुणी हिरावून घेत नाही ? पंचवीस नोव्हेंबर चौऱ्याऐंशीला यशवंतरावांनी अकल्पितपणे जीवनयात्रा संपवून नोस्टाल्जिया अधिक तीव्र केला इतकेच!

## सौ. शैलजा राजे
## एक जागते रसिक

मला वाटतं ते ६५-६६ साल असावं. मी त्या वेळी केसरी-मराठा संस्थेनं पुन्हा सुरू केलेल्या 'सह्याद्री' मासिकाचा बालविभाग सांभाळीत होते. श्री. भा. द. खेर यांनी भाषांतरित केलेल्या "दि प्रिन्सेस" या श्री. मनोहर माळगावकरांच्या कादंबरीचा प्रकाशन सोहळा होता. त्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे यशवंतराव चव्हाण होते. प्रकाशन त्यांच्या शुभहस्ते होणार होते. त्या समारंभाची बहुतेक सर्व तयारी मी केली होती. स्त्रीच्या प्रवृत्तीनुसार!

यशवंतराव आले. त्यांनी ते सर्व पाहिलं न् सहज चौकशी केली. माझी ओळख करून दिली गेली. आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या वेळी माझं एकुलतं एक पुस्तक 'खणानारळाची ओटी' हे नुकतंच प्रसिद्ध झालं होत. माझी ओळख करून देताच यशवंतराव म्हणाले, "व्वा! तुमचं ते खणानारळाची ओटी पुस्तक आम्ही वाचलंय बरं का! आमच्या घरात ते सर्वांना आवडलंय!"

क्षणभर काय बोलावं मला कळेना! या एवढ्या मोठ्या माणसानं असं बोलावं हा आपला केवढा सन्मान ही भावना मात्र मनात जागी झाल्याशिवाय राहिली नाही.

त्याच दिवशी चहापानाच्या वेळी श्री. बाळ ज. पंडित यांच्या घरी श्री. भा. द. खेरांनी माझ्या लहान मुलीशी यशवंतरावांशी ओळख करून दिली. (ती त्या वेळी छोट्या छोट्या कविता करीत होती.) तिनं वाकून नमस्कार केला आणि यशवंतरावांनी चटकन तिला उचलून मांडीवर बसवली. तिची चौकशी केली.

पुढे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं माधुरीनं (माझी मुलगी) त्यांच्यावर कविता केली न् पाठवली. लगेच त्याची पोच तिच्या नावावर

आली. पत्र टाइप केलेलं होतं, पण सही त्यांची होती. ते पत्र आता कदाचित तिच्या संग्रही तिच्या सासरी असेल. फारच छान कौतुकाचं पत्र होतं ते!

पुढे यशवंतराव संरक्षण मंत्री असताना त्यांच्या मिनिस्ट्रीनं माझ्या 'तुळशीपत्र' या कादंबरीच्या एकदम ७५० प्रति खरेदी केल्या. सोमय्या प्रकाशनानं ती कादंबरी प्रकाशीत केली होती. वर्षाच्या आत ऑफसेटवर दुसरी आवृत्ती निघण्याची ही अपूर्व संधी त्यामुळेच मिळाली. यामागे कुणाची प्रेरणा असावी याचा विचार मनात आला की एकच नाव ओठावर येतं. यशवंतराव चव्हाण! सर्वच दृष्टीनं एक जाणते रसिक नेते!

# डॉ. दि. ग. केळकर
# सद्गुणी माणूस

यशवंतराव दिल्लीत गेल्याचे वर्तमान कानी पडलं आणि क्षणभर मन विचलीत झालं. आपल्या घरातील जवळचं माणूस गेल्यानंतरची बातमी ऐकल्यानंतरची मनःस्थिती आणि यशवंतराव गेल्याची बातमी ऐकल्यानंतरची माझी मनःस्थिती यात मला तरी काही फरक वाटला नाही. यशवंतरावांचा अन् माझा संबंध मुंबईत सचिवालयात आला. कोणीतरी मोठ्या माणसाने माझी ओळख करून दिली असावी इतकंच स्मरतं. त्या वेळी त्यांनी पुण्यात आल्यावर माझे संग्रहालय बघावं अशी मी त्यांना विनंती केली होती. यशवंतराव पहिल्यांदा १९६० पूर्वी माझेकडे आले होते. तसं पाहिलं तर हे संग्रहालय लहानही होतं. दुपारी ४ चे सुमारास मंडईजवळील टिळकांचे पुतळ्याजवळून मी चाललो होतो. समोरून यशवंतरावांची गाडी येत होती. गर्दी असल्यामुळे गाडी हळूहळू जात होती. मी त्यांना अगोदर खूप लांबून पाहिलं व मी जसा गाडीच्या जवळ गेलो तशी त्यांनी गाडी उभी केली. माझ्या हातात नुकत्याच विकत घेतलेल्या औषधाच्या बाटल्या होत्या. सहज यशवंतरावांनी मला विचारलं, “ही औषधं कोणासाठी घेऊन चाललात ?” मी म्हटलं, “माझ्या आईसाठी. ती सध्या अंथरूणाला खिळली आहे. तुम्हाला जर पाच मिनिटं वेळ असेल तर तुम्ही माझेकडे जाऊन येऊ शकाल.” जितक्या सहजपणे मी त्यांना विचारलं तितक्याच सहजतेने ते मला म्हणाले, ‘मग मी येतोच’. आणि मिनिटा-दीड मिनिटात ते माझ्या घरातही आले. जिथे माझी आई अंथरूणाला खिळून पडली होती तिथे मी त्यांना घेऊन गेलो. त्या खोलीत जमिनीवरील गादीवर आई निजलेली होती. त्या खोलीत दोन खुर्च्या होत्या. तीन-चार पाट भिंतीला टेकून ठेवलेले होते. मी सहजच खुर्ची ओढून त्यांना बसण्यासाठी ठेवू लागलो. मी खुर्ची आणतो आहे इतक्यातच ते स्वतः भिंतीवरील टेकलेला पाट घेऊन आईच्या शेजारी दोन हातावर

बसलेले मला दिसले! हे मुख्यमंत्री आहेत हे क्षणभर त्या वेळी मी विसरलो! कदाचित तेही विसरले असावेत! आईशी थोडंसं बोलल्यावर आम्ही परत निघालो. मी घरी राहिलो आणि  आणि ते गाडीतून निघूनही गेले.

मला जर कुणी विचारलं की, “तुमचं यशवंतरावांच्याबद्दल खासगी मत काय आहे हो?” तर मी त्यांना सांगीन, “हा मोठ्या पदावर असलेला माणूस म्हणून जग त्यांना मानत आहे पण मी त्यांना फार मोठ्या हृदयाचा माणूस म्हणून मानतो.” शोधून न दिसणारी शालीनता व माणुसकी त्यांच्यात ओतप्रोत होती. दुसरा प्रसंग जो मला आठवतो आहे तो-एकदा ते मंत्रालयातील मुख्यमंत्र्यांच्या दालनातून बाहेर पडत असताना झालेली भेट. तेव्हा देखील ते असेच दोन मिनिटे माझ्यासाठी थांबले. तसेच डावलून पुढे गेले नाहीत! १९६२ साली त्यांना मी पुन्हा एकदा संग्रहालय दाखविण्यासाठी आणले होते. हा प्रसंग माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा होता. त्या वेळी त्यांनी २५ वर्षाच्या कराराने सरकारकडे संग्रहालय घेतले. तिसरा मोठा प्रसंग, दिल्लीतील सचिवालयातील भेट. त्या वेळी दिल्लीच्या मंत्रीमंडळात ते संरक्षण मंत्री होते. त्यांच्या दिल्लीतील वास्तव्यात सह्याद्रीने हिमालय वाचविल्याचे चित्र हिंदुस्थानच्या सगळ्या लोकांच्या डोळ्यापुढे होते. त्यांच्या घरी मी एकदा गेलो होतो. त्या वेळी त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई आजारी होत्या. त्यांनी स्वतः मला घरात नेऊन त्यांच्या पत्नीची ओळख करून दिली. दिल्लीतील एवढा मोठा मंत्री माझ्यासारख्या सामान्य माणसाची बूज ठेवतो खरंच हे आश्चर्य आहे. ह्या सगळ्याच्या मागे त्यांच्यातील असलेली माणूसकी मला दिसते.

एकदा सौ. वेणूताई सकाळी ९-१० चे सुमारास श्री डोंगरे (त्या वेळचे यशवंतरावांचे खासगी सचिव) यांना घेऊन अचानक संग्रहालय पाहण्यासाठी आल्या. मी दिल्लीला गेलो होतो. घरात माझी बायको व मुलगी होती. माझ्या मुलीने घाईघाईने जाऊन मोठा हार आणण्याची सोय केली. माझ्या पत्नीने त्यांना संग्रहालय पाहून झाल्यावर २ मिनिटे

थांबण्याची विनंती केली. डोंगरे सहजपणे म्हणाले, “केळकरांचा माणूस हार आणण्यासाठी गेला आहे तो आत्ता येईल.” त्यावर सौ. वेणूताई म्हणाल्या की, “मी मुख्यमंत्र्यांची पत्नी म्हणून आले नाही.” संग्रहालयाची प्रशंसा केली आणि तडक त्या मोटारीकडे गेल्या. त्यांची गाडी निघाली आणि मागील दाराने हार आला. अशा कितीतरी लहानमोठ्या गोष्टी मला आठवतात. माझ्या आईला जेव्हा यशवंतराव भेटावयास आले होते त्या वेळेस माझ्या पुतण्याने त्यांचा फोटो काढला होता. पण दुर्दैवाने आज मला तो सापडत नाही.

यशवंतरावांसारखी सद्गुणी माणसं आपल्या देशात होती व आजही आहेत आणि त्यांच्या ह्या सद्गुणामुळेच हा आमचा देश मोठा होत आहे. सद्गुणांच्या जोरावरच त्यांना स्वर्गात उत्तम स्थान मिळाले असेलही. आमच्या जमिनीवरील लोकांच्या प्रार्थनेमुळे नव्हे तर त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावरच त्यांना शांति लाभणार आहे.

## गंगाराम (साहेबांचा नोकर)
## मैं सेवामें हाजीर था

मै थानेश्वर शर्मा। सन १९६३ से साहब और बाईजी की सेवा मे हाजीर हुआ। मै उस वक्त छोटा ही था। धीरे धीरे मुझे वहाँ का अनुभव होता रहा। और माँ बाप की तरह मुझे प्यार मिलता रहा। दिन बीतते - मुझे अपना घर और माँ बाप का खयाल नही आया। साहब और बाईजी बहुतही नम्र स्वभाव के थे। उन्के सभी के साथ अच्छे बर्ताव थे और प्यार से सभी लोगो ने उन्हे चाहा है। उस समय साहब गृहमंत्री थे। उन्होने कभी भी हमे अपने नौकर की तरह नही बल्कि सगे बच्चो से भी ज्यादा चाहा है। जब भी साहब और बाईजी टूरपर जाते थे तो कहते थे कि घर का ख्याल रखना। उन्होंने कभी भी हमे किसी चीज की कमी महसूस होने नही दी। और हम भी १२ महिने हमेशा रात दिन उनकी सेवा मे लगे रहे। और बाईजी यह कहती थी की जब तक हम है तुम चिंता मत करना। अचानक दो तीन दिन बीमार होनसे उनका १ जून १९८३ मे निधन हो गया। बाईजी अपने जीवन मे बीती हुई बाते बताती थी। फिर साहब अकेले ही रह गए। साहब बाईजी की रात दिन सेवा करते थे। साहब के रिश्तेदार आते थे और चले जाते थे। हमने साहब को बाई साहब की कमी महसूस होने नही दी।

सन १९८४ मे २२ नवम्बर की रात को साहब की तबियत अचानक खराब हो गई। और २५ नवम्बर की शाम को उनका स्वर्गवास हो गया। और हम सब बेघर हो गए। साहबके पार्थिव शरीर को हम बाहर लेकर आए और कोठी बंद कर दी। उसके बाद उनके रिश्तेदार ५ फरवरी १९८५ को आए और ६-७ दिन में सामान लेकर चले गये। और हमने उन्हे कहाँ की हमारे लिए कुछ करिये तो उन्होने कहाँ की हम क्या कर सकते है। अब तो साहब गुजर गये है। लेकिन साहब और बाईजी की कृपा से हमे दो वक्त की रोटी तो मिलती है।

सन १९६३ से लेकर १९८४ तक हमे उनके साथ रहते हुए ही गए है। और हमारी इमानदारी, और सच्चा प्यार उनके साथ है। वे हमारे लिए अपना आशीर्वाद छोड गए है। यही भविष्य के लिए अच्छा है।

हमेशा साहब और बाईजी गंगा कहते थे। लेकिन मेरा नाम थानेश्वर शर्मा है।

## प्रा. माधव द. तबीब
## बुद्धीवादी यशवंतराव

१९४१ ची गोष्ट. दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन कराड येथे भरले होते. कवि साधुदास संमेलनाचे अध्यक्ष होते. यशवंतराव तेव्हा स्वागतसमितीत होते. त्यांचे या संमेलनप्रसंगीचे स्वागतपर भाषण एक साहित्याचा उत्तम नमुना ठरेल. त्यांचे भाषण कराड-कऱ्हाटक या गीताचा इतिहास, भूगोल या भोवती गुंफलेले होते. जनमानसात हे भाषण गाजले.

मला यशवंतरावांची गाठ घ्यावयाची होती. पण ती दुसऱ्या संदर्भात. मी त्या वेळी फर्ग्युसन महाविद्यालयात इन्टर सायन्सच्या वर्गात शिकत होतो. मी कॉलेजच्या वसतिगृहात राहात होतो. शेजारच्या खोलीत श्री. गोवर्धनदास पारीख राहात असत. शेजारपणाचे रूपांतर ओळखीत झाले. पुढे परिचय वाढला. श्री. पारीख वेलणकर बंगल्यात अभ्यास मंडळ (Study Circle) चालवीत असत. या मंडळाचे रूपांतर पुढे रेनायसन्स क्लब मध्ये झाले. या क्लबचा मी सभासद होतो. प्रसिद्ध विचारवंत लक्ष्मण शास्त्री जोशी, सेवानिवृत्त सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश बॅ. व्ही. एम. तारकुंडे, लोकसत्तेचे माजी संपादक ह. रा. महाजनी, डॉ. कर्णिक कामगार नेते बाबुराव कर्णिक वगैरे मान्यवर मंडळी या क्लबचे सभासद होती. येथे मार्क्सवाद हेगेलचे डायलेक्टीक्स, लेनीनवाद, रॉयवाद वगैरे विचारधारांचं चर्चेतून दर्शन होत असे.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. हिटलरची फॅसिस्ट सेना पोलंडमध्ये शिरली. ३ सप्टेंबर १९३९ रोजी ब्रिटिश पंतप्रधान चेंबरलेननी युद्धाची घोषणा केली. हे युद्ध साम्राज्यशाही युद्ध की लोकशाही युद्ध यावर चर्चा-विचारमंथन सुरू झाले. रॉयसाहेबांनी हे युद्ध साम्राज्यशाही युद्ध नसून लोकयुद्ध आहे व आपण या युद्धात फॅसिझमविरोधी शक्तींना मदत

करुन लोकशाही वाचवली पाहिजे हे रॉयसाहेबांनी गणित मांडले. इंडिपेंडंट इंडियामध्ये आकडे देऊन हिंदुस्थान इंग्लंडचा धनको होऊ लागला आहे व युद्धअखेर आर्थिकदृष्ट्या वसाहती स्वतंत्र होतील व यातून राजकीय स्वातंत्र्य मिळेल हा सिद्धांत त्यांनी मांडला. १९४० जून मध्ये फ्रान्स पडला. १९४१ मध्ये हिटलरच्या फौजा रशियात घुसल्या. रशिया हे एकमेव त्या वेळचे समाजवादी राष्ट्र. आमच्यासारख्या रेनायसन्स क्लबच्या सभासदांना हे लोकयुद्धच आहे ही खात्री पटली.

यशवंतराव हे जुने रॉयीस्ट. त्यांचेशी युद्धाच्या स्वरूपाविषयी चर्चा करावी म्हणून साहित्य संमेलनप्रसंगी मी त्यांना भेटलो. आम्ही त्यांच्या घरी गेलो. ते तेव्हा देशपांडे वाड्यात राहात असत. दोन दिवस त्यांनी घरी ठेवून घेतले. विठामातेच्या हातची जोंधळ्याची भाकरी-ती ही हातावरची, थापलेली नव्हे-आम्ही पोटभर खाल्ली.

यशवंतराव त्या वेळी लॉ कॉलेजमध्ये शिकत होते. घरची गरिबी, आर्थिक मदत नाही. त्यांच्या विठामातेचा मायेचा हात हेच प्रेरणास्थान. खोलीचे भाडे देण्यासाठी पैसा नाही. पुण्यात डास भरपूर, रात्रभर चावायचे. त्यातून ते अभ्यास कसा करणार ?

यशवंतराव हे खरे बुद्धिवादी. विरुद्ध पक्षाचा मुद्दा पटो वा ना पटो ते समजून घेत. मुद्याचे खंडन वा मंडण घणाघाती आघाताने पण नम्रपणे करत. आपला मुद्दा तार्किक सुसंगतेने मांडत. दुसऱ्या विचारांना किंमत देणारे यशवंतराव पुढे उत्तम संसदीय वाक्पटू झाले हे सांगणे नलगे.

आमचे त्या वेळचे एक ग्रामीण नेतृत्व म्हणजे आत्माराम बापू पाटील. त्यांनी त्यांना मच्छरदाणी आणून दिली. शैक्षणिक वर्ष संपत आले. खोली सोडून द्यावयाची तर मालकाचे भाडे कोठून देणार ? सर्व मित्रांनी एके दिवशी रात्री २ वाजता त्यांचे सामान-सामान ते काय ट्रंक व वळकटी हळूच काढली व खोलीतील एक मोडके तोडके कुलूप लावून पसार झालो.

पण मालकाचे भाडे द्यावयाचे ही रुखरूख मागे राहिली. शेवटी आम्ही मित्रांनी पैसे गोळा करून भाडे चुकते केले. यशवंतरावांना खूप आनंद झाला.

यशवंतराव मला मनमिळावू, बुद्धिवादी, स्वाभिमानी व उदारमतवादी दिसले.

देशापुढील आर्थिक, सामाजिक व राजकीय समस्यांचे उकलन करावयास यशवंतराव आज हवे होते असे मन मला सांगते.

आजही ४५ वर्षापूर्वीची ही स्मृती ताजी वाटते.

## चंद्रकांत मांढरे
## सावळी सतेज मूर्ती

ना. यशवंतरावजी चव्हाण साहेबांचा व माझा अल्पसाच पण संस्मरणीय असा दृढ परीचय होता. ते माझ्या अनेक ग्रामीण चित्रपटांचे चाहते होते. कोल्हापुरात राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी माझे चित्रपट पाहिलेले. ते स्वतः एकत्र शेतकरी कुटुंबातील असलेने त्यांना त्या चित्रपटांमधील विषय मनोमनी पटत असत. त्यांच्या अनेक भाषणातून त्यांनी बालवयात पाहिलेल्या माझ्या पहिल्या चित्रपटाचा, के. बाबूराव पेंटर यांच्या "सावकारी पाश" याचा, उल्लेख असायचा-त्यामधील निरक्षर शेतकऱ्याचे रंगविलेले सजीव चित्राचे वर्णन ते करावयाचे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना साहेबानी माझ्या निसर्गचित्रांच्या प्रथम प्रदर्शनाचे उद्घाटन सांगली मार्केट यार्ड ना. वसंतदादा पाटील यांच्या उपस्थितीत सांगलीमध्ये केले होते. ना. वसंतदादा व साहेब या दुग्धशर्करायुक्त योगात माझे चित्रकलेचे कौतुक झालेले होते. त्यानंतर पुढे प्रायव्हेट हायस्कूलच्या अमृत महोत्सव प्रसंगी तेच मुख्य पाहुणे व त्यांचेच हस्ते व शंकरराव किर्लोस्कर यांच्या उपस्थितीत माझ्या चित्रकलेच्या प्रदर्शनाचे कोल्हापुरी उद्घाटन झाले. अगदी अलीकडे कऱ्हाडमध्ये नामदेव शिंपी समाज परिषद प्रसंगी त्यांनी माझ्या चित्रांचे प्रदर्शनाचे कऱ्हाडमध्येही उद्घाटन केले होते.

पण साहेबांचा जवळचा अनुभव आला तो आमच्या दिल्ली भेटीत - १९६५, ६६, ६७ साली चित्रपटांचे पुरस्कार स्वीकारणेसाठी मी लागोपाठ तीन वर्षे दिल्लीला गेलो व न चुकता प्रत्येक वेळी साहेबांना त्यांच्या निवासस्थानी भेटून आलो. प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाला साहेबांचे निवासस्थान आपलेच घर वाटत होते. तेथे औपचारिकपणा नव्हता. तेव्हा

ते भारताचे संरक्षणमंत्री होते तरी ही आमचे साहेबच राहिले. कौतुकाने जवळ बसूनच चहापानाचा आग्रह व सर्वांची आठवणीने चौकशी. खादी पेहेरावातील स्मितवदन, मनमोकळेपणाने संभाषण जुन्या कोल्हापूरच्या अनेक आठवणी सांगणारे कथन. साहेबांची ती सावळी सतेज मूर्ती नेहमी लक्षात येते.

अनेक भेटीत त्यांनी 'चंद्रकांत, तुमचे वय किती ?' हे आवर्जून विचारायचे व मी त्यांच्यापेक्षा वयाने मोठा असून प्रकृती उत्तम ठेवली याचे ते कौतुक करायचे. दुसरे, त्यांना मी सिनेमाक्षेत्र सांभाळून पेंटींग केव्हा व कसे करतो याचे कुतूहल वाटायचे. माणसाने पत्करलेल्या कामात वा एखाद्या छंदात नेहमी गुंतलेले असावे हे त्यांना आवडायचे.

आता खरे ते हवे होते....

माझ्या चित्रसंग्रहालयांच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचा तो मायेचा हात पाठीवर फिरायला हवा होता. ....

पण दैवापुढे मनुष्य प्रयत्न अपुरेच!

त्यांच्या पवित्र स्मृतीस नम्र अभिवादन ...

## बाबूराव शेटे
## मोठ्या मनाचा मानवप्रेमी अधिकारी

यशवंतराव हे नांव उच्चारल्याबरोबर अनेक आठवणी मनात दाटून येतात. यशवंतराव हे महाराष्ट्राचे, देशाचे राजकीय नेते. महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांची इतिहासात नोंद झालेली आहे. महाराष्ट्राचा आर्थिक, सामाजिक शैक्षणिक, कृषि, सहकार, उद्योग इत्यादी क्षेत्रातील विकासाला त्यांनी केवळ चालना दिली असं नव्हे तर त्या त्या क्षेत्रात विकासाची शिखरे निर्माण केली. या सर्व भौतिक विकासाविषयी महाराष्ट्रातील प्रत्येक थरातील माणूस यशवंतरावांचा कृतज्ञतेनं उल्लेख करताना आढळतो.

मुंबई शहर हे महाराष्ट्राची राजधानी. मंत्री, मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांचं मुंबईत वास्तव्य सुरू झाल्यानंतर देशावरून, कोकणातून मुंबईत जगण्यासाठी, हमालीसारखी कष्टाची कामे करून पोट भरण्यासाठी आलेल्या सामान्यांच्या, गरीबांच्या जीवनाला स्थिरता लाभावी, भांडवलदारी वर्गाकडून होणारी हजारो गरीबांची मनमानी पिळवणूक रोखली जावी, तशी ती रोखण्यासाठी कष्टकऱ्यांना कायद्याचा आधार मिळावा यासाठी यशवंतरावांनी पुढाकार घेतला. कायदेविषयक निर्णय केले. त्या संदर्भात आठवण आणि कृतज्ञता केवळ माझ्याच नव्हे तर हजारो कष्टकऱ्यांच्या मनात निरंतरची राहणार आहे.

यशवंतरावांनी, मुंबई शहरातील आणि महाराष्ट्रामध्ये अन्य शहरातील लक्षावधि असुरक्षित कामगारांना, कष्टकऱ्यांना कायद्याचे सरंक्षण उपलब्ध करून दिलेले आहे. यशवंतरावांची ही फार मोठी देन आहे. या देणगीचा प्रारंभ मुंबईपासून झाला आणि नंतर ती उभ्या महाराष्ट्रात पोहोचली.

पूर्वी मुंबईत कष्ट करणाऱ्या कामगारांच्या टोळ्या असावयाच्या. वीस-पंचवीस जणांची एक टोळी, पन्नासाची टोळी, शंभराची टोळी असे ते एकत्र येत असत. हे कामगार वखारीत, गोदीभागात, रेल्वे फलाटावर

मालाची चढउतार करण्याची कामे करीत असत. हे कष्टकरी कामासाठी एकत्र आले तरी तसे ते विखुरलेले होते. त्यांची संघटना नव्हती की कोणी पुढारी नव्हता. मालाची चढउतार करण्याचे काम ठेकेदारामार्फत होत असे. ठेकेदार सांगेल त्यानुसार कष्टकरी कष्ट करीत असत. ही कामे अत्यंत कष्टाची असतात. कामगारांना त्यासाठी अक्षरशः घाम गाळावा लागतो. ठरविलेल्या वेळी कामे करावी लागत. ठेकेदार त्यासाठी भरपूर मजुरी वसूल करावयाचे परंतु या मजुरीच्या पैशातील फार थोडा हिस्सा कामगारांना प्रत्यक्षात दिला जात असे. कष्टकऱ्यांना अर्धपोटी राहण्यावाचून गत्यंतर उरावयाचे नाही. कारण त्यांनी आपली दाद लावून घ्यावी यासाठी कायद्याचे संरक्षण नव्हते. १९६१-६२ सालापर्यंत मुंबई कामगारांची, हमालांची हीच स्थिती होती.

१९६१-६२ सालात, या सर्व कष्टकऱ्यांना एकत्र करावे, त्यांची संघटना बांधावी आणि त्यांना आर्थिक न्याय मिळवून द्यावा असा विचार सुरू झाला. कामगारांना आपल्या हक्काची जाणीव झालेली होती. गिरणी कामगार असो किंवा अन्य कारखान्यातील कामगार असो त्यांना संरक्षण मिळावे यासाठी निरनिराळे कायदे अस्तित्वात आलेले होते. शिक्षणापासून सरकारी कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण कायद्याचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी चळवळी उभारीत होते. अंगमेहनतीचे कठीण काम करणारा कष्टकरी समाज, हमाल मात्र अर्धपोटी जीवन जगत होते. त्यातूनच कायद्याचे संरक्षण मिळविले पाहिजे व त्यासाठी संघटित आवाज उठविला पाहिजे असे वातावरण निर्माण झाले.

विखुरलेल्या, शैक्षणिकदृष्ट्या अडाणी कष्टकऱ्यांची संघटना बांधणे हे काम अवघड होते. परंतु हळूहळू त्याला मूर्तस्वरूप येत आहे असे दिसताच मी आणि श्री. आण्णा पाटील यशवंतरावांकडे गेलो आणि सविस्तर चर्चा केली. अर्धपोटी राहून घाम गाळणाऱ्यांची हलाखी त्यांनी ऐकली आणि म्हणाले, "ठीक आहे, तुम्ही संघटना बांधा, माझे आशीर्वाद

आहेत. या कामगारांसाठी, त्यांना संरक्षण मिळण्यासाठी, कायद्याची तरतूद करण्याची गरज आहे. आम्ही तसा कायदा करू."

यशवंतरावांचे विधायक आश्वासन मिळाले. आम्हाला त्यांचा स्वभाव माहिती होता. गरीबांविषयीची त्यांच्या मनातील कणव आमच्या परिचयाची होती. संघटना बांधण्याचे काम आम्ही जिद्दीने सुरू केले. लोकनेते बाळासाहेब देसाई, वसंतराव नाईक, नरेंद्र तिडके, राजारामबापू पाटील यांचा सल्ला घेतला. मदत मिळविली. त्यातूनच मुंबईतील असुरक्षित कामगारांची एक परिषद घेण्याचा विचार बळावला. परिषदेचे आयोजन केले आणि या परिषदेला स्वतः यशवंतरावांनी उपस्थित रहावे यासाठी त्यांची अनुमति मिळविली.

दीड-दोन लाख असुरक्षित कष्टकऱ्यांचा तो जमाव परिषदेच्या ठिकाणी एकत्रित आलेला पाहून यशवंतराव आश्चर्यचकित झाले. या परिषदेला श्री. वसंतराव नाईक, श्री. बाळासाहेब देसाई, श्री. नरेंद्र तिडके हजर होते. मुंबईतली ही प्रचंड शक्ती अर्धपोटी अवस्थेत राहून वाया जात आहे हे पाहून त्यांना धक्का बसला. या असुरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण देऊ असे आश्वासन त्यांनी पूर्वी दिले होते परंतु त्या परिषदेचे भव्य रूप पाहून कायदा करण्याची नितांत गरज आहे याविषयी त्यांची खात्री पटली. त्यांनी तसे आपल्या शब्दात व्यक्त केले.

त्यानंतर सरकारी चक्रे फिरू लागली. कायदा करावयाचा तर त्यासाठी पूर्व तयारी करावी लागणार होती. सुरुवातीला सरकारने एक आदेश काढून कमेटी नियुक्त केली. या कमेटीने असुरक्षित कामगारांच्या एकूण समस्यांचा अभ्यास करावा असे ठरविण्यात आले. या अभ्यासानंतर सरकारने 'लेबर बोर्डस्' बनविले. ग्रोसरी, लोखंडी जथा, कापड कामगार, कॉटन कामगार, गोदी कामगार अशा प्रकारची 'लेबर बोर्डस्' अस्तित्वात आली. असा उठाव सुरू होताच, मीठ कामगार, मच्छी कामगार असे निरनिराळ्या क्षेत्रातील कामगार संघटनेत सामील झाले.

इतके सर्व घडून आल्यावर आता प्रत्यक्ष कायदा तयार होऊन तशी घोषणा होण्याचे आणि या नव्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे हुकूम जारी होण्याचेच काय ते शिल्लक उरले होते.

त्या वेळी हा कायदा अस्तित्वात यावा यासाठी यशवंतराव कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. महाराष्ट्र सरकारलाही त्यांनी स्वस्थ बसू दिले नाही.

अखेर कायदा झाला. या कायद्याचे स्वागत करून कायद्याची अंमलबजावणी सुरू करून देण्याचे ऐतिहासिक कार्य यशवंतरावांच्या उपस्थितीतच झाले पाहिजे असा संघटनेचे नेते श्री. आण्णासाहेब पाटील यांनी आग्रह धरला. त्यानुसार यशवंतरावांना पाचारण करण्यात आले. त्यांनी अत्यंत समाधानाने आमंत्रणाचा स्वीकार केला. खास विमानाने तेवढ्या कार्यक्रमासाठी दिल्लीहून मुंबईला आले आणि उद्घाटन करून लगेच दोन तासात दिल्लीरला परतले. त्या दिवशी प्रजासत्ताकदिन होता. दि. २६ जानेवारी १९७० या दिवशी यशवंतरावांच्या मुद्रेवर कार्यपूर्तीचे एक आगळेच समाधान होते.

या कायद्यामुळे कामगाराना रजा, रजेचा पगार, बोनस, औषधविषयक सवलती, घरभाडे असे विविध प्रकारचे लाभ घडले. मुख्यतः कष्टकऱ्यांच्या मजुरीची निश्चिती होऊन त्यांच्या पिळवणुकीला आळा बसला. यशवंतरावांकडून असुरक्षित कामगारांना ही देन मिळाल्यामुळे त्यांच्याबद्दलचा आदर शतपटीने दुणावला. गरीब कष्टकऱ्यांचे ते दैवत बनले.

मुंबईमध्ये महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट ॲण्ड जनरल कामगार युनियन अस्तित्वात आली, भक्कम बनली आणि या संघटनेमुळे पन्नास हजारावर कामगारांना संरक्षण मिळाले ते यशवंतरावांच्या मार्गदर्शनामुळे, कर्तृत्वामुळे होय. कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळाल्यामुळे ते एकत्र आले आणि नंतरच्या काळात मुंबईप्रमाणे महाराष्ट्राच्या अन्य शहरात हे

लोण पोहोचले. तेथील कष्टकरी कामगारांनाही हा कायदा लागू करण्यात आला.

माथाडी कामगार बंधू यशवंतरावांचे नेहमीच कृतज्ञ राहिले. यशवंतराव मुंबईत असले आणि त्या दिवशी दसरा असला तर बहुसंख्य कामगार बंधू यशवंतरावांना आणि सौ. वेणूताईंना सोने देऊन वंदन करण्यास जाण्याची प्रथा होती. कामगारांबरोबर ते गप्पागोष्टी करीत असत. तास दोन तास एकत्र बसून चर्चा करीत असत. त्यांचा तो एक वेगळा आनंद होता. सोने द्यावयास येणारामध्ये महिला कामगार असल्या तर सौ. वेणूताई त्यांना चोळी-साडी देत असत.

मला स्वतःला तर ते आपल्या घरातलाच एक मानीत असत. त्यांच्याविषयी माझ्या मनात कमालीचा आदर असावयाचा. आम्ही दोघेही सातारा जिल्ह्यातले. मुख्यतः कराडचे. मुंबईमध्ये आल्यावर, सामान्य स्थितीतून मार्ग काढीत काढीत मी मुंबई महानगरपालिकेचा सभासद झाल्याबद्दल त्यांना अभिमान वाटत असे. १९७४ मध्ये महापालिकेत मी सभागृहाचा नेता म्हणून निवडून आलो. त्या वेळी मी त्याना आवर्जून भेटावयास गेलो. त्यांना पुष्पगुच्छ देऊन नमस्कार केला आणि आशीर्वाद मागितला तेव्हा म्हणाले, ‘बाबूराव, मुंबई महापालिकेचा नेता होणे हे मंत्री होण्याइतके प्रतिष्ठेचे आहे. फोन करून मीच तुमचे अभिनंदन करणार होतो.”

१९८१ मध्ये यशवंतराव सत्तेवर नव्हते. तरीपण सातारा जिल्ह्यातले, कराड  भागातले लोक त्याच्याकडे मदतीच्या अपेक्षेने जात असत. त्या वेळी त्यातल्या काही जणांना ते मुंबईस माझ्याकडे पाठवीत असत. त्या वेळी “आपल्याकडीलच खेड्यातला हा माणूस मुंबईत स्थीर बनलेला आहे. व्यवहारचतुर आहे. बाबूरावांचे कर्तृत्व आपण ओळखले पाहिजे. तुम्ही त्यांचा जरूर लाभ घ्या.” असे सांगत असत. माझी त्यांची भेट झाली की त्यांनी ज्यांना माझ्याकडे पाठविलेले असेल त्यांच्याबद्दल चौकशी

करीत असत. मी मुंबई महापालिकेचा महापौर झालो त्या वेळी यशवंतरावांनी दिल्लीलहून फोन करून माझे अभिनंदन केले.

माथाडी कामगारांचे नेते आण्णा पाटील यांचे निधन झाल्याचे समजताच ते दिल्ली येथून मुंबईस आले आणि आण्णा पाटील यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी आवर्जून उपस्थित राहिले. प्रसंग सुखाचा असो वा दुःखाचा असो त्या त्या वेळी उपस्थित रहावयाचे हा कटाक्ष त्यांनी आयुष्यभर पाळला. राजकारणात वावरणारे यशवंतराव मोठ्या मनाचे मानव 'माणूस' असलेले मुत्सद्दी होते.

## श्री. भा कृ. केळकर
## यशवंतराव : एक शैलीदार माणूस

श्री यशवंतराव चव्हाण दिल्लीत आले ते संकटाच्या छायेतच. चिनी आक्रमणामुळे एक काळजीची मनःस्थिती देशात निर्माण झाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी मिळविलेला लौकिक त्यांच्या पाठीशी होता. पं. नेहरुंचा वरदहस्त होता. पण दिल्ली ही फसवी नगरी आहे. पाण्यातल्या भोवऱ्यासारखे येथे राजकाणात भोवरे आहेत. निसरडी, परंतु वरून मोहविणारी सत्तेची वाट आहे. जिभेवर मध, पण आत पाताळयंत्री मन असे दिल्लीचे राजकीय मत आहे. संसद गाठली तरी तिचा दबदबा मोठा आहे. अशा दिल्लीत यशवंतराव आले तेव्हा माझ्यासारख्या व इतर असंख्य हितचिंतकांना काळजीच होती.

यशवंतराव आले तेव्हा अनेकांना पोटदुखी सुरू झाली. मत्सर, असूया यांनी ग्रासलेली राजकीय पुढाऱ्यांची मने हा दिल्लीचाच नव्हे तर सगळीकडचा अनुभव. यशवंतराव दिल्ली दरबारात नवीन. त्यांना स्वतःची लॉबी किंवा प्रशंसकही नव्हते. स्वतःच्या कार्यशैलीने व मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी नोकरशाहीला आपल्या बाजूला केले. संरक्षण खात्यातील वातावरण बदलून टाकले. संसदेवर आपल्या वाक्पटूत्वाने व कार्यक्षम कारभाराने प्रभाव टाकला. यशवंतरावांची ही शैली गृहखात्याचा कारभार हाती घेतल्यावर विशेष अनुभवास आली.

पोलिसांचे आंदोलन, विद्यार्थ्यांतील असंतोष, गव्हर्नरांचे अधिकार, केंद्र-राज्य संबंध, हिंदु-मुस्लीम दंगे असे अनेक आजही न सुटलेले प्रश्न यशवंतरावांच्या गृहमंत्री कारकीर्दीत उपस्थित झाले. तथापि त्यांनी गृहखात्यातील संशोधन विभाग कामास लावला व अनेक माहितीपूर्ण शोध निबंध तयार करविले.

यशवंतराव राजकीय पुढारी होते तरी ते सनदी अधिकाऱ्यांकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहात नसत. त्यांच्या अनुभवांचा, निर्णयक्षमतेचा फायदा यशवंतरावांना सर्व मंत्रालयात झाला. नोकरशहा हे स्वभावतः शंकेखोर असतात. नकार देण्यात पटाईत असतात. पण यशवंतरावांचे म्हणणे असे होते की, "राजकीय पुढाऱ्यांनी "नाही" म्हणावयास शिकावे व नोकरशहांनी "हो" म्हणावयास शिकावे म्हणजे राज्यकारभार नीट चालेल." यातील खोच स्पष्ट आहे. जे सनदी नोकरांचे आहे तसेच तंत्रज्ञांचेही आहे.

यशवंतराव हे काँग्रेसला सर्वस्व मानणारे होते. श्री. काकासाहेब गाडगीळ म्हणत, "काका - काँग्रेस = गल्लीतील वकील" हे समीकरण काकासाहेबांनी आपल्या शैलीत मांडले होते. याचे कारण काँग्रेसनेच या पिढीचे जीवन घडविले होते. तीच गत यशवंतरावांची होती. काँग्रेस सोडून त्यांचे मन कुठेच रमले नाही. पण यशवंतराव हे लोकशाहीवादी होते. त्यांनी लोकहिताची व राष्ट्रकल्याणाची कोणतीही योजना झिडकारली नाही. मी मजूर खात्याच्या प्रसिध्दीचे काम करीत असतानाच दक्षिण रेल्वेच्या एंजिन ड्रायव्हर्सचा संप झाला. त्यांना अमानुष वागणूक मिळे. यशवंतरावांकडे मी ते प्रकरण नेले आणि त्यांना अनुकूल भूमिका देण्याची विनंती केली. पुढे एंजिन ड्रायव्हर्सना कामाचे तास कमी करून मिळाले. न बोलता, जाहिरात न करता काम करणे हा त्यांचा स्वभाव होता. खरे म्हणजे ते जुन्या पठडीतले काँग्रेस नेते होते.

राजकारणात गुंतलेले यशवंतरावांचे मन साहित्य, संगीत, काव्य यांच्यात अधिक रमत असे. त्यांची वाणी सुभाषित वाणी होती. बुध्दिवर चिंतनाचे, वाचनाचे संस्कार झालेले होते. श्री. काकासाहेब गाडगीळांच्या निधनानंतर झालेल्या शोकसभेत यशवंतराव म्हणाले होते की काकासाहेब भेटून गेले म्हणजे मनाला अंघोळ घातल्यासारखे वाटे. अशी सुभाषितवजा वाक्ये ते सहज बोलून जात. त्यांना शब्दांची जाण फारच चांगली होती. सूर व शब्द यांची त्यांच्या भावजीवनाला साथ होती. म्हणूनच संगीतावर व

कवितेवर त्यांचे अतोनात प्रेम होते. तो त्यांचा विरगुंळाच नव्हता तर त्यांचे ते अन्न होते. सुधीर फडकेंना ते म्हणूनच एकदा म्हणाले "मन जेव्हा विषण्ण होते तेव्हा तुम्ही म्हटलेली भावगीते ऐकत बसतो. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हे त्यांचे आवडीचे गीत होते. ग. दि. माडगूळकर गेले तेंव्हा त्यांच्या आठवणीने यशवंतरावांचे डोळे डबडबून आल्याचे मी पाहिले.

मराठी माणसावर व महाराष्ट्राच्या मातीवरच यशवंतरावांचे प्रेम होते. कितीही कामाच्या गडबडीत असले, ताण असला तरी मराठी साहित्यिक, विद्वान, कलावंत यांना त्यांचे दरवाजे उघडेच असत.

## डॉ. वसंत पटवर्धन
## महाराष्ट्राची एक कर्तबगार व्यक्ती

यशवंतरावजींबद्दल मी ऐकलं बरंच ते संयुक्त महाराष्ट्राच्या काळात, १९५६ साली आणि त्यानंतर. आणि त्यांच्या वैचारिक वाटचालीबद्दलच ते बरंचसं होतं. मग सत्तावन्न सालच्या महाराष्ट्र समरांत एस्. एम् च्या निवडणुकीत पुण्यात मी बराचसा वैयक्तिक भाग घेतला त्यावेळेला त्यांचे विचार सतत आवर्जून बघत होतो ते त्या वेळी तरुण मनाला निष्ठेच्या दृष्टीनं अव्यभिचारी वाटत नव्हते. मग संयुक्त महाराष्ट्र झाला, तरी लक्षावधि नसले तरी हजारो निष्पक्ष कार्यकर्त्या व्यक्तींनी जी तळमळ दाखवली त्याबद्दल आंतरिक ओलावा दिसला नाही म्हणून खंत वाटत असतानाच महाराष्ट्र बँकेच्या रजत जयंतीनिमित्त मुख्य अतिथी म्हणून डिसेंबर १९६० मध्ये ते आले. त्या वेळी त्यांची माझी प्रथम भेट झाली ती कै. वामनराव वर्दे यांनी आवर्जून करून दिल्यामुळे. मराठीत अर्थशास्त्र सोपं करुन शिकवताच येत नाही म्हणून महाविद्यालयांतही तो विषय घेणाऱ्यांची व उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या कमी असते असं व्हीनस बुकस्टॉलचे श्री. अनंतराव लिमये म्हणाले तेव्हा 'हे शक्य आहे' असं सांगून मी 'सोन्याचं हरिण' हे पुस्तक लिहिलं होतं. ते सगळ्यांनाच आवडलं व आमचे त्या वेळचे अध्यक्ष वामनराव वर्दे यानाही आवडलं म्हणून त्यांनी मला एक प्रत यशवंतरावजींना देण्यास सांगितली व त्यासाठी बँकेत मुद्दाम स्वतंत्रपणे त्यांची माझी पांच मिनिटे गांठ घालून दिली. महाराष्ट्र सरकारचं त्या वर्षीचं म्हणजे खरं तर पहिल्याच वर्षाचं अर्थशास्त्र विभागातील उत्कृष्ट पुस्तक म्हणून पारितोषिक मिळालं.

त्यानंतर माझी गाठ पडली ती ते अर्थमंत्री असताना. यशवंतराव ग्रंथप्रेमी होते त्यामुळे त्यांच्या अर्थसंकल्पात त्यांनी करमुक्त मर्यादेत व्यावसायिक ग्रंथासाठी ५०० रुपयाची सवलत दिली होती. ही सवलत

स्तुत्य असली तरी कमी आहे व त्यांत व्यावसायिक वा करमणुकीची असा भेदभाव न करता सर्रास ती १००० रुपयाची असावी अशी मी त्यांना विनंती केली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या अर्थसंकल्पावर विशालसह्याद्रीसाठी मी चार लेख लिहिले होते ते त्यांच्या नजरेला आणावेत अशी श्री. अनंतराव पाटील यांची इच्छा होती. त्यांची प्रतिक्रिया काय होती ते कळले नाही. कारण समोरच्या व्यक्तींच्या सूचना, शंका, विचारणा यावर त्यांचं मत बहुधा कळत नसे वा मिळत नसे असं मी अनेकांकडून ऐकलं होतं. त्याच कारकीर्दीत मग बँकांच्या व्याज-उत्पन्नावर कर (Interest Tax) लावला गेला तेव्हा ही रक्कम सर्व अंदाजपत्रकी उत्पन्नात जमा होण्यापेक्षा त्यातून बँकांची गंगाजळी जर वाढवता आली तर चांगलं होईल असं मी सुचवलं होतं. पण १९६९ ते १९८४ पर्यंत बँकांचं भाग भांडवल, गंगाजळी, ठेवींच्या काही टक्के असावी असं कुणालाच वाटलं नव्हतं. (८४-८५ मध्ये मात्र भारत सरकारनं त्यात लक्ष घालून यंदा सर्व बँकांचं भाग भांडवल घसघशीतपणे वाढवलं आहे.)

महाराष्ट्र बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा पडल्यावर मी आवर्जून त्यांचे आशीर्वाद मागण्यासाठी गेलो होतो. ‘आर्य’ कादंबरीची माझी टिपणंही त्यावेळी माझ्या बरोबर होती. बंगल्यावर ते एकटेच होते. त्यामुळे बऱ्याच वेळ मनमोकळ्या गप्पा झाल्या. कादंबरी प्रसिध्द झाल्यावर श्री. पारखे यांनी त्यांचेकडे ती पाठवली होती व त्यानी ती आवर्जून वाचली होती असं मला नंतर कळलं तेव्हा मला आनंद झाला होता.

त्यांची माझी आणखी एक प्रदीर्घ गांठभेट झाली ती दुसऱ्या एका बँकेसंबंधीच्या महाराष्ट्र बँकेच्या एका प्रस्तावाबाबत. जाहीररित्या राष्ट्रीयीकरणाची अर्थमंत्री म्हणून धुरा वाहून भलावणी केली असतानाही त्या वेळचे त्याचे ‘राष्ट्रीयीकरण’ चांगलेच असते असे नाही असे उद्गार ऐकल्यावर मी चक्रावलो होतो. पण तो विषय वाढवायचा नसल्याने त्याबद्दल जास्त चर्चा वाढवण्यात कुणालाच स्वारस्य नव्हते.

या सर्व भेटी वेगवेगळ्या संदर्भात झाल्या तरी येणाऱ्या व्यक्तीचं म्हणणं पुरं ऐकून घ्यायची त्यांची तयारी असायची व त्यात मंत्रीपदाचा भपकारा नसायचा ही गोष्ट सुखद वाटायची. म्हणूनच विषय कुठलाही असला तरी त्यांचेकडे जायला कधी संकोच वा भीती न वाटता महाराष्ट्राची एक कर्तबगार व्यक्ती म्हणून मतभिन्नता असली तरी आदर वाटायचा हे मात्र खरं !

## आत्मराम सावंत
## शब्दबंधू यशवंतराव

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदापासून भारताच्या उपपंतप्रधानपदापर्यंत यशवंतराव चव्हाणांच्या गेल्या पावशतकातील प्रवास आपण पाहिला. ६२ साली संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत गेल्यापासून, पं. जवाहरलाल नेहरू, लालबहाद्दूर शास्त्री आणि श्रीमती इंदिरा गांधी या तीन पंतप्रधानांबरोबर, मंत्रिमंडळातील एक निकटचा विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी काम केले. संरक्षण खात्यानंतर गृह, अर्थ, परराष्ट्र अशी खाती सांभाळली. यातली प्रत्येक जबाबदारी कसोटीच्या वेळी त्यांच्यावर टाकण्यात आली आणि प्रत्येक वेळी यशवंतरावांनी आव्हान म्हणून ती स्वीकारून आपल्यावरचा विश्वास सार्थ ठरवला. या पावशतकात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या धबडग्यात सतत वावरत असतानाही, यशवंतरावांचा मुळचा मराठमोळा, रसिक, सुसंस्कृत पिंड मात्र कायम राहिला.

राजकारण, हे बोलूनचालून संघर्षाचे क्षेत्र. त्यात मित्र आणि शत्रू परिस्थितीनुसार बदलत असतात.त्या त्या वेळी जो प्रतिस्पर्धी म्हणून समोर येईल, त्याच्याशी कधी सरळ दोन हात करून, तर कधी कुटील डावपेचानी लढावे लागते. बाजी मारण्यासाठी भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. या सर्व गदारोळात सतत वावरणारा माणूस रुक्ष, कठोरच नव्हे, तर निगरगट्टही बनतो. त्याच्यामध्ये मृदूता, सुसंस्कृतता, रसिकता, खिलाडूवृत्ती मुळात असली तरी ती टिकणे शक्यच नसते. पण यशवंतराव आयुष्यातील पन्नास वर्षे राजकारणात घालवूनही, या नियमाला एक सन्माननीय अपवाद ठरले. ही किमया खरोखरच अद्‌भूत म्हणावी अशी. यशवंतरावाना ती साधली याचे कारण त्यांच्यावर मुळात झालेले संस्कार सखोल व पक्के होते हे तर आहेच, पण सबंध राजकीय कारकीर्दीत त्यांनी ते प्रयत्नपूर्वक जपले हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## कृष्णाकाठचे संस्कार

ज्या कृष्णाकाठावर यशवंतराव जन्मले आणि वाढले, त्याने बालवयातच त्यांच्यावर साहित्य, संगीत, कलेचे संस्कार केले. अभिजात साहित्याचे वाचन त्यानी त्यावेळी जसे झपाटून केले, तसाच संगीताचा स्वादही मनमुराद घेतला. परिसरातल्या नामांकित गायकांची भजने, पखवाजवादन ऐकण्यात, स्वतः टाळ वाजवून त्यात रंगण्यात यशवंतरावांनी रात्रीरात्री जागवल्या. कराडबाहेरच्या नामांकित भजन मंडळ्यांची भजने आपल्या गावात आयोजित केली. नाटकांची भूक कराडमध्ये येणाऱ्या कंपन्यांच्या नाट्यप्रयोगांनी भागेना, तेव्हा कोल्हापूरात जाऊन नाटके पाहिली. गंधर्व नाटक मंडळी, महाराष्ट्र नाटक मंडळी, ललितकलादर्श अशा कंपन्यांची नाटके कोल्हापुरात पिटात बसून त्यानी पाहिली. नाटकांची पुस्तके मिळवून ती वाचण्याचा नाद त्यांनी मनसोक्त केला. गडकऱ्यांच्या नाटकातले संवाद तर त्यांना तोंडपाठ असत. कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये ना. सी. फडके यांच्यासारखा साहित्यिक त्यांना प्राध्यापक म्हणून लाभला. वि. स. खांडेकरांच्या साहित्याने त्यांचा समाजाभिमुख पिंड घडवण्यात मोठी मदत झाली. खांडेकरांच्या 'दोन ध्रूव' व 'पांढरे ढग' या कादंबऱ्यांनी यशवंतरावांच्या मनावर खोल ठसा उमटवला होता. आपल्या गावात हरिजन मुलांसाठी शाळा उघडण्याचा व तिचे उद्घाटन कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या हस्ते करण्याचा जो उपक्रम वयाच्या विशीत त्यांनी केला, त्याच्यामागे हेच सामाजिक संस्कार होते. क्रिकेट हा त्यांचा आवडता खेळ होता. स्वतः क्रिकेट खेळलेही पण गरिबीमुळे क्रिकेटचे साहित्य विकत घेता येत नाही, म्हणून त्यांनी खेळणे सोडले. आवड मात्र गेली नाही. त्या काळातल्या कवींमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राष्ट्रीय काव्याने यशवंतराव प्रभावित झाले होते. इतके की, ३२ साली राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्याबद्दल तुरुंगवास घडला, तेव्हा तेथे सावरकरांच्या 'कमला' सारखे दीर्घकाव्य लिहिण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तो काही

ओळीनंतर सोडून दिला, तरी इतर अनेक कविता त्यांनी केल्या होत्या. काही कथाही लिहिल्या होत्या व त्या प्रसिद्धही झाल्या होत्या.

**साहित्य सहवास**

'तरुण वयात प्रत्येकजण कविता करतो, अशाच त्या माझ्या कविता होत्या,' असे यशवंतराव थट्टेने म्हणत. त्यातला थट्टेचा भाग बाजूला सारून विचार केला तर यशवंतरावांच्या मनाची घडण समजू शकेल. कविता करण्यासाठी मुळात माणसाकडे हळवे मन असायला हवे. ते यशवंतरावांपाशी होते. कृष्णाकाठच्या निसर्गाने या मनावर केलेले संस्कार स्वतः यशवंतरावांनी फार सुरेख शब्दांकित करून ठेवले आहेत. 'नदीकाठचे गाव' हा ठसा त्यांच्या मनावर इतका पक्का उमटला की, पुढे राजकारणाच्या निमित्ताने भारतभर आणि जगभर फिरताना कुठल्या गावाशेजारून नदी वाहताना पाहिली की, यशवंतरावांचे कविमन उचंबळून येत असे. परराष्ट्र मंत्री म्हणून रशियाला गेले तेव्हा वोल्गा नदीच्या काठावरच्या शहराने त्यांना असेच उल्हसित केले. एका रेस्टॉरन्टमधील भोजनासाठी यशवंतराव गेले. तिथे एका वाद्यवृंदांने गायलेल्या गीताचे प्रथम त्यांना सूरच आवडले. शब्द कळले नाहीत. पण मग त्यांनी चौकशी केली आणि त्या गीतात वोल्गा नदीचे वर्णन आहे असे जेव्हा त्यांना कळले, तेव्हा त्या गीताचे इंग्रजी भाषांतर त्यांनी ताबडतोब आपल्या डायरीत उतरवून घेतले. पुढे जेव्हा जेव्हा त्यांना नदीकाठचे गाव हा विचार आठवे तेव्हा ते वोल्गागीत डायरीतून काढून वाचीत, ते वाचतांना प्रत्यक्ष पाहिलेला तो परिसर, धुंद वातावरणासह माझ्या डोळ्यापुढे येतो, असे यशवंतरावानी लिहून ठेवले आहे.

राजकारणाच्या धबडग्यात यशवंतरावांनी आपले हे हळवे साहित्यिक मन अगदी प्रयत्नपूर्वक जपले. जिथे, जेव्हा आणि जितका वेळ मोकळा मिळाला, तितका त्यांनी तो साहित्याच्या आस्वादासाठीच खर्च केला. त्यांच्या दिल्लीच्या व मुंबईच्या निवासस्थानाला भेट देणाऱ्या कोणाही

रसिक व्यक्तीला, त्यांच्या ग्रंथसंग्रहाचे थक्क करणारे दर्शन घडे. इतर राजकीय नेत्यांच्या घरात ग्रंथ नसतात असे नव्हे. पण ते बहुधा संग्रहासाठीच असतात. त्यातले किती त्यांनी वाचलेले असतात कोण जाणे. गांधी-बुद्धाच्या पुतळ्यासारखेच शोभेच्या वस्तूचे स्थान ग्रंथानाही दिलेले असते. यशवंतराव याला अपवाद होते. त्यांच्या संग्रहातील प्रत्येक पुस्तक त्यांनी मनःपूर्वक वाचलेले असे, त्यावर चिंतन केलेले असे. त्यांच्याशी त्या विषयावर बोलणाऱ्यांना याची प्रचिती आल्याशिवाय राहात नसे. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील नाना प्रकारची पुस्तके यात होती आणि त्यात नित्य नवी भर पडत होती. राजकीय, आर्थिक, संरक्षणविषयक, सामाजिक प्रश्नावरील चरित्रे, आत्मचरित्रे याबरोबरच गाजलेल्या उत्तमोत्तम ललित कृतीही त्यात होत्या. मराठीतील अनेक नवी पुस्तके त्यांना भेट म्हणून मिळालेली असत, पण बहुसंख्य ग्रंथ त्यांनी विकत घेतलेले होते. भारतात व परदेशात कोठेही गेले तरी यशवंतराव कटाक्षाने एक गोष्ट करीत. तिथल्या ऐतिहासिक स्थळांना द्यावयाच्या भेटीच्या यादीत, नाट्यगृह व ग्रंथालय यांचा समावेश आहे हे पाहात. नाट्यगृहात शक्य तर नाटक पाहात आणि ग्रंथालयात ग्रंथखरेदी करीत. ज्या ग्रंथाबद्दल ऐकले वा वाचले असेल त्याची चौकशी करीत. अहोरात्र देशाच्या कठीण प्रश्नांची चिंता वाहताना, या माणसाने हे साहित्यप्रेम कसे टिकवले असेल, त्यासाठी किती त्रास घेतला असेल, याची कल्पनाही करता येत नाही.

## काव्यानंदाच्या मैफली

साहित्यात इतका रस, तर प्रत्यक्ष साहित्यिकांच्या भेटीत किती असेल ? मराठीतल्या अनेक लेखक-कवींना याचा सुखद साक्षात्कार कित्येक वेळा झालेला आहे. ग. दि. माडगूळकर, ना. धों. महानोर हे त्यांच्या आवडत्या कवींपैकी. बैठकातील काव्यानंद, हा अत्तराच्या कुपीसारखा आपण आपल्या स्मरणात जपून ठेवला आहे, असे यशवंतरावांनी लिहून

ठेवले आहे. दिल्लीच्या धबडग्यातून यशवंतराव महाराष्ट्रात आले की, मूळचे मराठीपण त्यांच्यात संचारे. दिल्लीत अचकन आणि परदेशात सुटबूट घालणारे यशवंतराव विमानाने मुंबईत उतरले की, धोतर, सदरा, जाकीट आणि कोल्हापुरी वहाणा हा त्यांचा पेहराव सुरू होई. त्या वेषात मग पूर्वीसारखेच त्यांचे मराठमोळे दौरे, भेटीगाठी आणि चर्चा सुरू होत. या दौऱ्यातील सरकारी कार्यक्रमातूनही वेळात वेळ काढून आपल्या साहित्यिक मित्रांच्या खाजगी भेटी ते आर्वजून घेत. साहित्यिक मित्रही 'यशवंतराव गावात आहेत' हे कळले की त्यांच्या भेटीसाठी आसुसलेलेच असत. कोल्हापुरात खांडेकर, पुण्यात ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, मुंबईत तर अनेक जण ठरलेले असत. त्यांच्या कुठल्याही मुक्कामात साहित्यिकांना भेटीला मुक्तद्वार असे. मग ज्या बैठका रंगत त्यात यशवंतराव तासन तास रमून जात, राजकारणाचा शीण तितका वेळ विसरून जात आणि पुन्हा ताजेतवाने होत. माडगूळकरांच्या प्रत्येक भेटीत त्यांच्याकडून आग्रहपूर्वक 'जोगिया' ऐकत, तशीच महानोरांकडून त्यांची मळ्यावरची कविता. दिल्लीला गेलेल्या कोणीही साहित्यिकाने केव्हाही यशवंतरावांकडे जावे. आधी कळवले तर ते सरबराईसाठी स्वतः सज्ज असत. चिनी आक्रमणानंतर लडाखच्या सरदहद्दीला भेट देण्यासाठी माडगूळकर, पु. भा. भावे व पु. ल. देशपांडे निघाले होते.जाताना यशवंतरावांच्या दिल्लीतील बंगल्यात रात्री गप्पांची मैफल जमली. 'तिघांच्या प्रतिभाशाली संवादानी सुगंधित झालेली रात्र' असे तिचे वर्णन यशवंतरावांनी केले आहे. वस्तुतः या तिघापैकी माडगूळकर सोडल्यास इतर दोघांचे यशवंतरावांशी राजकीय विचारात कधीच जुळण्यासारखे नव्हते. पण ते साहित्यिक संवादाच्या आड आले नाही.

हीच गोष्ट आचार्य अत्रे यांच्याबाबतीत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात व महाराष्ट्र राज्य झाल्यावर विधानसभेतही यशवंतराव व अत्रे परस्परविरोधी भूमिकात होते. जाहीर सभातून एकमेंकावर तोफा डागत होते. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या घोषणेला उत्तर

देताना एकदा यशवंतराव म्हणाले, 'झाला पाहिजे हे मान्य, पण त्यात 'च' कशाला ?' त्यावर अत्र्यांनी उत्तर दिले, च फार महत्त्वाचा आहे. तुमच्या आडनावातला 'च' काढून टाकला तर काय राहील ?"

पण या चकमकी राजकारणापुरत्याच राहिल्या. दोघांच्या साहित्यिक स्नेहात त्याचा कधीही अडथळा आला नाही याचे श्रेय दोघांच्याही जाणकारीला आणि निखळ साहित्यिक दृष्टीला आहे.

**नाट्यप्रेम**

गेल्या जानेवारीत श्री. विद्याधर गोखले यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळ्याला अध्यक्ष म्हणून यशवंतराव आले होते. त्या वेळी केलेल्या भाषणात त्यांनी आपल्या साहित्यिक रसिकतेचा एक वेगळा पैलू नकळत प्रकाशात आणला. रविवारच्या लोकसत्तेतील गोखल्यांच्या, उर्दू शायरीने व संस्कृत सुभाषितांनी नटलेल्या रसिल्या अग्रलेखांचे आपण अनेक वर्षाचे वाचक आहोत, त्या अग्रलेखानी आपल्याला उर्दू व संस्कृतची गोडी लावली, असा गौप्यस्फोट यशवंतरावांनी केला. पंचवीस वर्षापूर्वी गोखल्यांचे 'पंडितराज जगन्नाथ' हे नाटक दिल्लीत गेले होते. ते पाहण्यासाठी पं. नेहरूना आणण्यात यशवंतरावांचा मोठा वाटा होता. हेच प्रेम त्यांनी इतर मराठी नाटककारांवर व कलावंतांवर केले. बाळ कोल्हटकर हा त्यातला सर्वात भाग्यवान नाटककार. त्यांच्या 'वेगळं व्हायचंय मला' पासून 'देणाऱ्याचे हात हजार' पर्यंत जवळजवळ सर्वच नाटके यशवंतरावांनी आवर्जून पाहिली. 'दुर्वांची जुडी' हे तर त्यांचे अतिशय आवडते नाटक. 'सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो' हे कोल्हटकरांच्या नाट्यलेखनातील सूत्र चव्हाणांना फार मोलाचे वाटे. 'दुर्वांची जुडी' मधला 'सुभाष' प्रत्येक घरात असतो', असे ते म्हणत. चिनी आक्रमणानंतर संरक्षणाची जाणीव निर्माण करणारे 'सीमेवरून परत जा' हे नाटक कोल्हटकरांनी लिहिले आणि सादर केले. त्याला केंद्र सरकारचे खास अनुदान यशवंतरावांनी मिळवून दिले. यशवंतरावांनी

आपल्यावर कसे प्रेम केले हे सांगताना परवा बाळ कोल्हटकरांनी एक आठवण सांगितली. सातार्‍याला ‘दुर्वांची जुडी’ चा प्रयोग होता आणि यशवंतरावांचाही योगायोगाने मुक्काम होता. भेट झाली आणि बैठक जमली. गांधीजींचा अहिंसेचा विचार ज्ञानेश्वरीत कसा सांगितलेला आहे हे बाळ कोल्हटकर यशवंतरावांना ‘समजावून’ सांगत होते आणि यशवंतरावही जणुकाही आपण ज्ञानेश्वरी प्रथमच ऐकत आहोत अशा भोळ्या भावाने ते सर्व ऐकत होते. यशवंतरावांच्या मोठेपणाचे उदाहरण म्हणून कोल्हटकरांनी ही आठवण सांगितली. अशा आठवणी आज अनेक नाटककारांकडे आणि कलावंतांकडे आहेत. यशवंतरावांच्या या सहवासाने त्या सर्वांच्या भेटी सुगंधीत झाल्या. तो सुगंध यशवंतरावांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीतील धबडग्यात काळजीपूर्वक जपून ठेवला. साहित्यावर पोसलेला पिंड साहित्याच्या सहवासाच्या बळावर टिकवला.

**शब्दबंधुत्व**

‘यशवंतराव राजकारणात गेले नसते तर उत्कृष्ट साहित्यिक झाले असते’ असे अनेकजण म्हणत, त्याचे कारण यशवंतरावांच्या साहित्यिक पिंडाची वेळोवेळी आलेली प्रचिती वेळात वेळ काढून यशवंतरावांनी लेखन केले. ‘ऋणानुबंध’, ‘भूमिका’ आणि ‘कृष्णाकाठ’ हा आत्मचरित्राचा पहिला खंड या तीन ग्रंथात ते आज समाविष्ट आहे. त्यातले कोणतेही पान काढून वाचावे, विषय कोणताही असला तरी त्यांच्या कथनाला साहित्यिक शैलीचा मोरपिशी स्पर्श झाला असल्याचे जाणवल्यावाचून राहात नाही. ‘कृष्णाकाठ’ या ग्रंथाला न. चि. केळकर पारितोषिक याच वर्षी मिळाले आणि यशवंतरावांना साहित्यिक म्हणून मान्यताही मिळाली. अर्थात ती औपचारिकच. खरी मान्यता त्यांना यापूर्वीच मिळाली होती. पण स्वतः यशवंतरावांनी मात्र स्वतःकडे साहित्यिक अधिकार कधीच घेतला नाही. विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक म्हणून चौसष्ट साली

त्यांनी केलेले भाषण, किंवा पंचाहत्तर साली कराडच्या साहित्य संमेलनात स्वागताध्यक्ष म्हणून केलेले भाषण हे मराठी साहित्य समीक्षेचे उत्तम नमुने मानता येण्यासारखे आहेत. पण तरीही यशवंतरावांची साहित्य क्षेत्रातील भूमिका नेहमीच रसिक वाचकाची राहिली. आणि 'ही भूमिका खऱ्या अर्थाने स्पर्धातीत व टिकून राहणारी आहे' असे आपले मत त्यांनी आपल्या पहिल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतच नोंदवले आहे.

राजकारणी आणि साहित्यिक यांचे नाते या प्रस्तावनेत अतिशय समर्पक शब्दात यशवंतरावांनी विशद केले आहे. ते म्हणतात, नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात, तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळवण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दात आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे. शब्द हे साहित्यिकाचे प्रमुख शस्त्र आहे. तर मी ज्या कार्यक्षेत्रात गेली जवळजवळ पन्नास वर्षे क्रियाशील आहे त्या राजकारणाचे प्रमुख माध्यमही शब्दच आहेत, या अर्थाने साहित्यिक व राजकारणी हे शब्दबंधू आहेत. शब्दांचे आणि आमचे साहचर्य आणि सोहार्द पुराणे आहे'. साहित्याच्या क्षेत्राशी काही नाते सांगावयाचे असेल तर एवढेच आहे' राजकारणी व साहित्यिक यांच्यातील हे शब्दबंधुत्व यशवंतरावांच्यामध्येच एकवटलेल होते.

यशवंतरावांच्या या सौजन्यशील साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला की त्यांच्या निधनाने आपली कोणती व केवढी हानी झाली आहे, याची विदारक जाणीव होते. राजकीय हानी एका व्यक्तीच्या जागी दुसरी व्यक्ती आल्याने कदाचित भरून निघणे शक्य असते. पण संस्कृतीची हानी तशी भरून निघत नाही.

## माधवी रणजित देशाई
## आभाळाला प्रचंड खिंडार पडलंय

आजवर मी अनेक भाषणातून मृत्यूबद्दल बोललो आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात मृत्यूला आव्हान देणं फार धाडसाचं वाटायचं. तेव्हा स्वतःचा मृत्यू डोळ्यासमोर असायचा. पण प्रियजनांच्या मृत्यूला आपण कसं तोंड देऊ हे मी कल्पनेतही जाणून घेतलं नव्हतं. वेणूबाई गेल्या आणि सारा आवेश संपला. अश्रूंनी माझा साफ पराभव केला आहे.”

“हे तुलसीवृन्दावन, ही गोठ्यातली गाय आहे ना ? ती वेणूबाईच्या आग्रहानं इथं आणलीय.”

“हे सारं सामान तिनं जसं लावलं होतं तसंच ठेवलं आहे. मी त्यात बदल केलाच नाही. हे सारं तिला कऱ्हाडला न्यायचं होतं. ‘विरंगुळ्या’ त आम्ही दोघं राहणार होतो.”

“मी आता ज्या खुर्चीवर बसलोय ना, त्याच खुर्चीवर ती बसायची. सर्व घर सांभाळायची. इथं बसून पुणं, मुंबई, कऱ्हाडची सर्व घरं ती जपायची.”

“माधवी, देवघर बघून या. हे सारे देव तिनं जमवलेले. तो एकमुखी रूद्राक्ष, ती साईबाबांची मूर्ती सारा हट्ट तिचा. एरवी मी देवभोळा नाही. पण हे घर आजही तिच्याच पद्धतीनं मी जपतोय.”

अशी साहेबांची अनेक वाक्यं आज परत परत ऐकू येताहेत, हे सारं यशवंतरावजी सांगत असायचे. कुणी पुरुष आपल्या पत्नीवर इतकं प्रेम करू शकतो ? इतका हवालदिल, हळवा होऊन दीड वर्षात या जगातून निघून जातो ? साहेब गेले. आज साऱ्या आठवणींचा पट उलगडून गेलाय. मन व्याकूळ होऊन उठलय. कऱ्हाडला जाताना वाटेवर रस्त्याच्या कडेला गुलमोहर फुललेले असतात. या गुलमोहरी वाटेवरून हा अश्रूंचा सौदागर आज निघून गेला. पण जाताना साऱ्यांची जीवनं आपल्या स्नेहानं, मायेने चिंब भिजवली.

**स्नेहाळ आदरातिथ्य**

१ रेसकोर्स रोडवरचं आमंत्रण आलं. “नेपाळला जाताना, दिल्लीत थांबा. चार” दिवस माझ्या घरी राहा. तुम्ही याल तेव्हा मी कोणतेही कार्यक्रम घेणार नाही. जेवढा वेळ तुम्हा लोकांचा सहवास लाभेल तेवढा थोडाच अशी माझी भावना आहे.” साहेबांचं पत्रं आलं. एवढ्या मोठ्या माणसाच्या घरी जायचं कसं ? या विचाराने मी धास्तावून गेले होते. आम्ही दोघे १ रेसकोर्सवर पोचलो दारात टॅक्सी गेली न गेली, साहेब स्वतः पोर्चमध्ये स्वागताला उभे ! वाकून नमस्कार केला.

“नमस्कार” भरदार आवाज आला. घरात पाय ठेवला. आणि क्षणभर अडखळलेच. समोरच वेणूताईंचा नथ घातलेला, डोकीवर पदर घेतलेला हंसरा फोटो, त्यासमोर दोन समया तेवत होत्या. फोटोला घवघवीत हार ! मी पुढे जाऊन फोटोपुढे माथा टेकला. मागे वळले. साहेबांच्या डोळ्यातून धारा लागल्या होत्या. अशावेळी आपण काय करायचं असतं ?

मी चटकन आम्हाला दिलेल्या खोलीत पळाले. रणजितना म्हणाले, “मला फार संकोच वाटतो. त्यांच्याशी काय बोलू ? खोलीत शिरले आणि आश्चर्य करण्याची पाळी आता माझी होती. चांदीचे करंडे घासून चकचकीत केलेले, त्यात कुंकू, ड्रेसिंग टेबल सज्ज होतं. तेल, शांपूपासून पेस्टपर्यंत सर्व सरंजाम होता. ती सारी व्यवस्था साहेबांनी स्वतः उभी राहून करवून घेतली होती. असं नंतर गंगारामनं (त्यांचा नोकर) मला सांगितलं. या घरात एक स्त्री पाहुणी येणार , तिला काही कमी पडू नये, ही त्यांची धडपड होती. मी त्याच करंड्यातलं कुंकू लावलं. सुवासिनीचा तो करंडा होता. प्रत्येक स्त्रीला हेच भाग्य हवं असतं.

संकोचाचा अर्धाच दिवस होता. आजवर कुणा राजकीय पुढाऱ्यांशी कधीच परिचय नव्हता. उलट या साऱ्या “बड्या” मंडळींची एकप्रकारे धास्ती किंवा आकसच माझ्या मनांत असे. पण यशवंतरावजींच्या घरातल्या सहा दिवसात माझी विचारांची धारा पूर्ण बदलून गेली. त्या

सहा दिवसांत त्यांनी आईच्या मायेनं आम्हाला जपलं. त्या घरातल्या प्रत्येक क्षणी त्यांनी, आमची काळजी घेतली, आमचं जेवणं, उठणं, फिरणं सारं कौतुकानं बघत असायचे. नंतर नंतर माझा संकोच कमी झाला. त्या घरातल्या त्यांचा एकाकीपणा लक्षात आला. त्यांना स्नेहाची गरज आहे, मायेनं जपणं आवश्यक आहे, याची जाणीव झाली व त्यांना हंसवणं, रिझवणं हेच आमचं काम सुरू झालं. काहीच मागायचं नव्हतं. देवघेव होती स्नेहाची. जपणूक होती हळव्या भावनांची.

अश्रूत बुडालेले हळवेपण

आमच्या खोलीतून बाहेर आलो की बैठकीची खोली. कधीही बाहेर यावं-साहेब कोचावर बसून वाट बघत असायचे.

"या माधवी." शेजारच्या कोचाकडे हात दाखवून म्हणायचे आणि सरीवर सरी कोसळाव्यात तसे वेणूताईंच्या आठवणीत ते हरवून जायचे. डोळ्यातून धारा लागलेल्या असायच्या. प्रत्येक खोलीत ताईंचा ४ हार घातलेले फोटो, समया जळत असायच्या. ते घर एक मंदिर बनलेलं होतं. दुःखाबद्दल माझा अनुभव असा आहे,दुःख जितकं कुरवाळाल तेवढं ते जास्त वरचढ होतं. माणसाला हतबल करून टाकतं. सतत दीड वर्ष ते या दुःखातच गुरफटून गेले होते. त्यांना बाहेर कसं काढायचं ? एक दिवशी धीर करून मी म्हणाले, 'साहेब, प्रत्येक स्त्रीला वाटतं, की नवऱ्याच्या आधी आपण जावं. ताई आधी गेल्या बरोबर नव्हे का ? हेच उलट झालं असतं तर त्यांना सोसवलं नसतं. अनेक संकटांना त्याना तोंड देता आलं नसतं." हसून ते म्हणाले, " तर्काच्या दृष्टीनं बरोबर आहे. मला समजतं. हळवेपणा सोडून दिला पाहिजे. प्रयत्न करतो आहे. पण जमत नाही."

मी म्हणाले, "तुम्हा कोवाडला आला होता ना ? त्यापूर्वी फक्त अठरा दिवसच आधी माझा मोठा भाऊ गेला होता. माझ्या जखमेवर घट्ट पट्टी बांधून मी सर्व कार्यक्रम पार पाडला. तुम्ही माझं कौतुक केलंत. माझ्या भाषणाचं, माझ्या कवितेचं, माझ्या समाजकार्याचं सोनं झालं. तुम्ही येऊन

गेलात आणि खरंच माझ्या दुःखावर उतारा देऊन गेलात. स्वतः इतकं दुःखी असून आमचं दुःख तुम्ही झेलताय."

ते म्हणाले, "स्त्रीला मुळातच सहनशक्ती असते. पुरुष दिसतो कणखर, पण मुळांत दुबळा असतो. तुमचा गेलेला भाऊ माझ्या जागी बघायला शिका, तुमचं दुःख आपोआप कमी होईल."

## नवीन जाणीवांचे देणे

सकाळी ६॥ ते ८ व संध्याकाळी ६॥ ते ८ ते हिरवळीजवळच्या सिमेंटच्या छोट्या पायवाटेवरून फेऱ्या घालत.

"कुणीतरी सोबत असलं की फिरणं सोपं वाटतं" हे ऐकलं आणि सकाळी-संध्याकाळी त्यांना सोबत करण्याचं मी ठरवलं ते सहा दिवस माझ्या जीवनाला अनेक वळणं देऊन गेले. नवीन जाणीव घेऊन मी स्वतः खूप शिकत होते. वेगळी दृष्टी घेऊन स्वतः बदलत होते.

"साहेब, राजकारणात तुम्ही लोक भांडता, परत एक होता, खरंच मागचं वैर विसरता का ?"

"साहेब, नको असलेला उमेदवार उभा असेल तर खरंच मत कुणाला द्यावं? मत द्यावं की वाया घालवावं ?

एक ना अनेक बालीश प्रश्न मी विचारायची. नेहमीप्रमाणे हसायचे. म्हणायचे "फार चांगला प्रश्न विचारलात" "भालजींनी स्टुडिओ सोडला ? अगदी भालजींचीच स्टाईल आहे ही"

"सुलोचनाबाईचा अभिनय, काशिनाथ घाणेकरांचा संभाजी, लताबाईंचा आवाज, नरहर कुरुंदकरांची बुद्धिमत्ता, कुमार गंधर्वांचं गाणं, रणजित देसाईचे 'राधेय' एक ना अनेक विषय त्या साऱ्या दिवसांतून उजळून निघाले: एक अतूट धागा विणला जात होता. कलावंतांवर, साहित्यिकांवर, माणसावर माझ्यासारख्या सामान्य स्त्रीवर जिवापाड हळवेपणाने प्रेम करणारे साहेब अचानक गेले. आभाळाला प्रचंड खिंडार पडलंय. जाणवतेय फक्त पोकळी -

**प्रोत्साहन द्यायची वृत्ती**

दिल्लीला जाताना रिकाम्या हातानं कसं जायचं ? मी खादीचे नॅपकिन्स आणून त्यावर रेशमानं भरतकाम केलं होतं, चष्म्यासाठी खादीचं कव्हर करून, त्यावर भरतकाम केलं होतं, मफलर विणला होता. देताना संकोचानं विचारलं होतं,

"आपण वापराल का?"

नेहमीप्रमाणे नुसते हास्य, "फार स्त्रास घेतलेत माधवी." आणि दररोज त्यातलं एक नॅपकिन हातांत असे. चष्मा कव्हरमध्ये कधीच जाऊन बसला होता. साध्या साध्या गोष्टीतून दुसऱ्या माणसाला ते जपत असत. स्वतः समाजासाठी इतके झिजले. देशासाठी सारं जीवन वाहिलं. पण माझं एवढंसं कोवाडमधलं काम ते केवढं ? पण त्यांनी त्याचं फार कौतुक केलं. 'सह्याद्रीचे वारे' हा त्यांच्या भाषणांचा संग्रह वाचावा. महाराष्ट्रावरचं त्यांचं प्रेम, त्यांच्या विचाराची नस त्या भाषणातून सापडते. प्रचंड वाचन, प्रचंड विचारक्षमता, अंतर्मुख होऊन स्वतःला पडताळून बघण्याची सवय ही फार क्वचित सापडते. इतकं असून गर्व नाही. दुसऱ्याचे गुण जाणून त्यांना ते प्रोत्साहन देत. इतकं कौतुक करायचे की आत्मविश्वास जागा व्हावा. माझं कोवाडचं भाषण, माझ्या कविता यांचं अपार कौतुक केलं. खरंच माझा आत्मविश्वास दुणावला होता.

"माधवी, तुमची महत्त्वाकांक्षा काय आहे ? कोण व्हावं अस वाटतं तुम्हाला ? इंदिराजी ?"

"मला मदर तेरेसा व्हायचंय" मी चटकन म्हणाले, आश्चर्यचकित होऊन ते म्हणाले, "तसं साधलं तर फार उदात्त जीवन जगता येईल. तुम्हाला ते जमेल."